नं प्र. ग्रंथ
चरित्र
9337

प्रल्हाद केशव अत्रे

# कऱ्हेचें पाणी

आत्मचरित्र


( खंड तिसरा )

प्रकाशन क्रमांक
३२५

आ. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

CFBK-0014425

मूल्य पंधरा रुपये



आचार्य अत्रे

आत्मवृत्त



नों.क्र. ४०९६३ विषय: चरित्र
क्रमांक = 9339 दि.नां. 29.3.६६

प्रल्हाद केशव अत्रे

# कऱ्हेचें पाणी

आत्मचरित्र

( खंड तिसरा )

REFBK-0014425

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबआी ४

मूल्य पंधरा रुपये

प्रकाशक :
विष्णु गजानान परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ २
गिरगांव, मुंबआी ४

पहिली आवृत्ति :
१ डिसेंबर १९६५

© प्रल्हाद केशव अत्रे १९६५

मुखपृष्ठ सजावट :
श्री. रघुवीर मुळगांवकर

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती' टिळक रस्ता
सदाशिव पेठ : पुणें २

१७८२९

# अर्घ्य

अकरा वर्षांपूर्वी ' मी कसा झालों ? ' हें माझें ' वाङ्मयीय आत्मचरित्र ' मीं प्रसिद्ध केलें. दोन वर्षांपूर्वी माझ्या ' जीवन–चरित्रा 'चा पहिला खंड प्रसिद्ध झाला. गेल्या वर्षी दुसरा खंड प्रसिद्ध झाला. त्यामध्यें वयाच्या तिसाव्या वर्षापासून तो चाळिसाव्या वर्षापर्यंतचा वृत्तांत मीं सांगितलेला आहे. आज तिसरा प्रसिद्ध होतो आहे. ह्यांत चाळीस सालापासून तो शेहेचाळीस सालापर्यंतचा भाग आलेला आहे. असे निदान सहा तरी खंड प्रसिद्ध होतील. मराठी भाषेंतच काय, पण जगामधील कोणत्याहि भाषेंत एका माणसाचें एवढें मोठें आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्याचें मला तरी निदान आठवत नाहीं.

कोणी विचारील, कीं एका लहान माणसानें इतकें मोठें आत्मचरित्र काय म्हणून लिहावें ? त्याला उत्तर असें कीं, ह्यांत ' मी 'ला महत्त्व नाहीं. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रामध्यें ज्या ज्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन घडामोडी घडल्या, त्यांचा इत्थंभूत वृत्तांत सांगण्यासाठीं ' आत्मचरित्र ' हें एक माझें निमित्त आहे. हें मराठी समाजाचें चरित्र आहे. मीं पाहिलेल्या, मीं ऐकलेल्या आणि मीं अनुभवलेल्या अनेक व्यक्तींचें, घटनांचें, गोष्टींचें आणि अनुभवांचें हें चरित्र आहे. माझें काम पुष्कळसें प्रेक्षकाचें आणि निवेदकाचें आहे.

' तुम्ही कोण ? ' असें कोणी म्हणेल. मी कोण ? मी एक जीवनाचा यात्रेकरू आहें. कसली ना कसली तरी पताका माझ्या खांद्यावर नेहमीं असतेच, जन्मापासून माझ्या पायाला जें एकदां चक्र लागलें आहे, तें एकसारखें फिरतेंच आहे. कोणत्याहि एका ठिकाणीं मी फार वेळ थांबत नाहीं. जिथें रंगतों, तिथें कांहीं वेळ थांबतों. कंटाळलों कीं पुढें चालूं लागतों.

कोणत्याहि एका व्यवसायांत मला रस नाहीं. कारण, व्यवसाय हें कांहीं माझें जीवन नाहीं. जीवन हाच व्यवसाय आहे. जीवनाची मला विलक्षण जिज्ञासा आहे. सारें मला दिसलें पाहिजे, सारें मला समजलें पाहिजे, सारें मला आलें पाहिजे, ही एकच माझ्या जिवाची तडफड असते.

आयुष्याला जीवन कां म्हणतात ? कारण, जीवन म्हणजे पाणी. आयुष्य हें पाण्याप्रमाणें सारखें वहात राहिलें, तरच तें जीवन. सांचून राहिलें तर तें डबकें. जीवन म्हणजे एक प्रचंड मौज आहे. तिचा कितीहि आस्वाद घ्या. कंटाळा कधीं येत नाहीं आणि तृप्ति कधीं होत नाहीं.

रोज सकाळीं सूर्याबरोबर नवीन जीवन जन्माला येतें. चिरंतन नावीन्य म्हणजेच जीवन. जीवनाच्या आकर्षणाला अंत नाहीं. मला जीवनाचा लोभ नाहीं, पण ओढ आहे. चोहोंकडून मला तें हांका मारतें आणि त्या ऐकूं आल्या म्हणजे शाळेंतून सुटलेल्या पोराप्रमाणें सारे देहकण जीवनाकडे धांवत सुटतात.

जीवनाचें हें विलक्षण वेड माझ्यामध्यें कसें आलें? लहानपणापासून निसर्गाची अन् इतिहासाची मला सोबत मिळाली. ब्रह्मदेवाच्या कमंडलूंतून उगम पावलेल्या कऱ्हेच्या कांठीं मी जन्माला आलों. आणि तिच्याच अंगा-खांद्यावर जेजूरीच्या खंडोबाच्या भंडाऱ्यानें वाढलों. मोठा झालों. उशाला शिवाजीमहाराजांचा पुरंदर किल्ला अष्टौप्रहर पहारा करी. तर श्री सोपानदेवांची भक्तिवीणा शेजारीं सदैव वाजे.

शक्तीचें आणि भक्तीचें पावनतीर्थ होतें माझें सासवड गांव. महाराष्ट्रांतील संतांच्या नि वीरांच्या पदस्पर्शानें त्याच्या भूमीचा कण न् कण पुनीत झालेला आहे. शिवशाहीचा नि पेशवाईचा महत्त्वाचा इतिहासच मुळीं त्याच्या पंच-क्रोशींत घडलेला आहे. आजहि सासवडच्या रस्त्यांतून जाऊं लागलें, कीं उंच उंच वाड्यांच्या पडक्या भिंतींवरून दोनतीनशें वर्षांचा इतिहास तुमच्या कानांत कुजबुजूं लागतो. ज्ञानोबांची पालखी दर वर्षी सोपानदेवाचें दर्शन घेऊनच पुढें पंढरीला जाते. त्या वेळीं आमच्या गांवांत दिंड्यापताकांची अशी गर्दी उडते आणि टाळमृदुंगांच्या नि ग्यानबातुकारामांच्या गजरानें सारें शिवार असें दुमदुमतें म्हणतां ! बालपणांत झालेल्या ह्या सर्व संस्कारांनीं माझा पिंड घडविलेला आहे.

जें रम्य आणि भव्य आहे, त्याचें दर्शन खेडेगांवांतच घडतें. पावलोपावलीं परमेश्वर तुमच्याशीं बोलत असतो तिथें. त्याची कृपा नदीच्या रूपानें तुमच्या घराजवळून वहात असते. शिवारामधल्या शेतांत डोलणाऱ्या पिकावरचा वारा परमेश्वराचा सुवासिक श्वासच प्रतिक्षणीं घेऊन येतो. शहरांत रहावयाला आलों, तरी निसर्गाची संगत मीं कधींच सोडलेली नाहीं. मुंबईचा सागर आणि खंडा-

ळ्याचा डोंगर हे माझे सोबती आहेत.

जीवनाच्या आनंदामधूनच माझें वाङ्मयाचें वेड निर्माण झालें आहे. वाङ्मया-पेक्षां मला अधिक प्रिय कांहीं नाहीं. वाङ्मय म्हणजे जीवनाचा अनुभव. जीवनाचा शोध. जीवनाचे जे जे अनंत साक्षात्कार मला घडले, ते प्रकट करण्या-साठींच मीं वाङ्मयाचा आसरा घेतला. मी आयुष्यांत पुष्कळच भटकलों. पण वाङ्मयाची सोबत कधीं सोडली नाहीं. जीवनाची सेवा मीं वाङ्मयानें केली.

मी उपदेशक नाहीं. उपासक आहें. सिद्ध नाहीं. साधक आहें. समाजांतील अनंत दुःखांची आणि दैन्यांची मला जाणीव आहे. त्यांजवर फुंकर घालण्याचाच माझ्या लेखणीनें मीं सतत प्रयत्न केला आहे. रंजल्यागांजल्यांचा कैवार घेण्यांतच मीं माझें सामर्थ्य खर्च केलें आहे. जगांतील म्लान वदनें प्रफुल्लित कशीं होतील ह्याचीच मीं सदैव चिंता केली आहे. माझ्या दोषांची आणि चुकांची मला जाणीव आहे. पण सज्जनांच्या निंदेचें पाप माझ्या हातून कधीं घडलेलें नाहीं. लोक-गंगेचें जीवन गढूळ करण्याचें दुष्कर्म मीं कधीं केलेलें नाहीं.

मी गुणांचा पूजक आहें. हें माझें सर्वांत मोठें सामर्थ्य आहे. भुंगे जसे फुलांवर झेप घेतात, तसे गुण मला दिसले रे दिसले कीं मीं त्यांजवर तुटून पडतों. चांगल्या गोष्टीवर प्रेम करण्याची मला उपजतच आवड आहे. सद्‌गुणांच्या दाराशीं जन्मभर मीं जी माधुकरी मागितली, त्याच शिदोरीवर आजपर्यंत मीं गुजराण करीत आलों आहें.

माझें जीवन हें आदर्श आहे असा माझा मुळींच दावा नाहीं. माझ्या विचारांत, उच्चारांत आणि आचारांत अनेक प्रमाद झाले असतील. अजूनहि होतील. पण मीं जें जें केलें आहे तें तें निर्भयतेनें, मिजासीनें आणि संतोषानें केलें आहे. लोक काय म्हणतील ह्याची मीं कधींहि पर्वा केलेली नाहीं. समाजां-तील अनेक रूढ संकेतांविरुद्ध मीं बंड पुकारलेलें आहे. माझ्या शब्दकोशांत भय हा शब्द नाहीं. खऱ्या मृत्यूच्या आधीं भित्रीं माणसें शेकडों वेळां मरतात. म्हणून त्यांना ढोंगाचा आधार घ्यावा लागतो.

आयुष्यांत मीं काय वाटेल तें केलें असेल, पण ढोंग कधीं केलें नाहीं. ढोंगाचा मीं पहिल्यापासून शत्रु. माझ्या नाटकांतून, चित्रपटांतून आणि वृत्तपत्रां-तून ढोंगाचें मीं क्रूरपणानें वाभाडे काढले आहेत. गेलीं पन्नास वर्षें समाजाच्या सर्व अंतरंगामधून मी वावरलों आहें. मजुरापासून तों महाराजापर्यंत, शाळा मास्तरापासून तों गिरणीमालकापर्यंत आणि कंगालपासून तों कुबेरापर्यंत मीं अनिरुद्ध संचार केलेला आहे. त्यामुळें समाजाच्या बहिरंगामध्यें आणि त्याच्या अंतरंगामध्यें केवढी फारकत आहे, ह्याची जाणीव माझ्याइतकी दुसऱ्या कोणालाहि असणें शक्य नाहीं. आज जीवनाच्या सर्व क्षेत्रांत दंभाचा

आणि ढोंगाचा जो बुजबुजाट झालेला आहे त्याचें कारण सत्य काय आहे हें जाणण्याचें आणि सांगण्याचें फार थोड्या लोकांत धैर्य आहे. तें धैर्य दाखवण्याचा मीं प्रयत्न केला आहे.

जीवनाशीं मी कृतज्ञ आहें. कारण माझे त्यानें कोणतेहि लाड पुरवण्याचें बाकी ठेवलें नाहीं. दारिद्र्य पाहिलें आहे. श्रीमंती अनुभवली आहे. अनवाणी चाललों आहे. मोटरींतून हिंडतों आहें. महाराष्ट्रांतले सर्व मानसन्मान मिळविले आहेत. भारतीय कीर्तीचीं मानचिन्हेंहि लाभलीं आहेत. अर्धे जग मी हिंडून आलों आहे. अनेक महापुरुषांना जवळून पाहण्याचें भाग्यहि मला आयुष्यांत लाभलें आहे.

महाराष्ट्राचा मला प्रखर अभिमान आहे. भारतांत जन्माला येणें हें दुर्लभ असलें, तरी महाराष्ट्रांत जन्माला येणें हें दुर्लभतर आहे. 'दुर्लभं भारते जन्म, महाराष्ट्रे त्वतिदुर्लभम्'. शौर्य आणि साधुत्व ह्यांचा दुर्मिळ संगम ह्या भूमींत झालेला आहे. अशा ह्या महाराष्ट्रावर द्विभाषिक राज्य जबरदस्तीनें लादून कॉंग्रेसच्या राज्यकर्त्यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाला आणि कर्तृत्वाला आव्हान दिलें होतें. तें आव्हान चार कोटी मराठी जनतेनें स्वीकारून संयुक्त महाराष्ट्राचा जो घनघोर संग्राम केला, त्यामध्यें आघाडीवर लढण्याची जी मला संधि मिळाली, तेंच माझ्या जीवनाचें सर्वांत मोठें साफल्य मी समजतों

अधिक काय लिहूं? जीवनांतील कृतज्ञतेच्या आणि कृतार्थतेच्या अगणित भावना या क्षणीं अश्रूंच्या रूपानें नेत्रांतून उचंबळत आहेत. त्यांचा अर्घ्य 'कऱ्हेच्या पाण्यां'त देऊन ह्या 'वाग्यज्ञा'च्या चौथ्या खंडाला आतां प्रारंभ करतों.

डिसेंबर १९६५ प्रल्हाद केशव अत्रे

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | नवयुग चित्रपट लि. | १ |
| २ | साप्ताहिक ' नवयुग ' | ९ |
| ३ | खटले नि मारामाऱ्या | १६ |
| ४ | अत्रे-फडके वादाचा प्रारंभ | २३ |
| ५ | ' नवयुग चित्रपटां 'तून बाहेर | ३० |
| ६ | ' पंधरा हरामखोर ' | ३८ |
| ७ | माझें पुणें मीं सोडलें | ४६ |
| ८ | चित्रमंदिर | ५२ |
| ९ | दत्तू बांदेकर | ५९ |
| १० | ' गच्छ, सूकर भद्रं ते ' | ६९ |
| ११ | पायाची दासी | ७७ |
| १२ | काकासाहेब लिमये ह्यांची निवृत्ति | ८५ |
| १३ | नारायण महाराज पळाले | ९३ |
| १४ | परशुरामभाऊ कॉलेजांतला हल्ला | ९९ |
| १५ | महात्मा गांधींचें मला पत्र ! | १०८ |
| १६ | नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं | ११४ |
| १७ | वसंतसेना—१ | १२२ |
| १८ | वसंतसेना—२ | १२८ |
| १९ | वसंतसेना—३ | १३७ |
| २० | अखेर माझा चारुदत्त झाला | १४४ |
| २१ | साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं | १५२ |
| २२ | ललितवाङ्मय हेंच लोकवाङ्मय ! | १६० |
| २३ | ' चित्रमंदिर ' विकलें ! | १६८ |
| २४ | मी लक्षाधीश झालों असतों ! | १७८ |
| २५ | अत्रे प्रिंटिंग प्रेस | १८६ |

२६ नसत्या कटकटी १९३
२७ गडकऱ्यांचा पंचविसावा स्मृतिदिन २००
२८ ललित वाङ्मयाची कैफियत ! २०८
२९ मुंबईचा पहिला नाट्यमहोत्सव २१४
३० मासिक समीक्षक २२१
३१ छापखान्यामधल्या घडामोडी २२७
३२ मला भेटलेला बदमाष २३६
३३ ' वासे ' मंडळांचें ' बांबू ' संमेलन २४८
३४ नाना फडनवीस जमीनदोस्त २५८
३५ काँग्रेसच्या स्वातंत्र्यआघाडीवर २६८
३६ काँग्रेसनें रणशिंग फुंकलें ! २७६
३७ साताऱ्याचें प्रतिसरकार २८६
३८ निवडणुकीची तुतारी मी फुंकली ! २९६
३९ निवडणुकीची धुळवड ३०६
४० मंडईतली ' ती ' विराट् सभा ३१२
४१ मी न केलेलें भाषण ३२१
४२ स्वातंत्र्यसंग्रामाचें उपान्त्य वर्ष ३२९
४३ माझा काँग्रेस-प्रचार ! ३३८
४४ सातारा जिल्हा झिंदाबाद ! ३४६
४५ जग काय म्हणेल ? ३५५
४६ लोकमान्यांचें पुण्यस्मरण ३६४
४७ समाजवादाच्या आघाडीवर ३७३
४८ संयुक्त महाराष्ट्राची घोषणा ३८३
४९ ' पाणिग्रहण ' ३९२
५० सहा हजारांचा जामीन ! ४०३



# १

# नवयुग चित्रपट लि.

चित्रपट निर्मितीच्या व्यवसायांत मी पडेन असें मला स्वप्नांत सुद्धां कधीं वाटलें नव्हतें. 'धर्मवीर'पासून तों 'अर्धांगी'पर्यंत मीं 'हंस पिक्चर्स'साठीं एकंदर सहा चित्रपट लिहिले होते. ह्या चित्रपटांबद्दल आर्थिक दृष्ट्या मला सहा-सात हजार रुपयांपेक्षां अधिक प्राप्ति झाली नव्हती. पैसे मिळविण्याच्या दृष्टीनें मीं जशीं नाटकें लिहिलीं नाहींत, त्याप्रमाणें चित्रकथाहि लिहिल्या नाहींत. जबरदस्त हौस हीच माझी लेखनाची प्रेरणा होती म्हणून पैशाच्या व्यवहाराबद्दल ज्याप्रमाणें 'बाल्मोहन नाटक मंडळी'शीं मीं कधीं लेखी करार केला नाहीं, त्याप्रमाणें 'हंस पिक्चर्स'शींहि पैशाचा करार करण्याच्या भानगडींत मी कधीं पडलों नाहीं. माझ्या ह्या वृत्तीला गैरहिशेबीपणा म्हणून पुष्कळदां नांवें ठेवलीं जात. पण त्याला कांहीं इलाज नव्हता. तो माझा जन्मजात स्वभाव आहे.

एकदां मी कोल्हापूरला गेलों असतां मला प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं आपल्या घरीं चहाला बोलावलें. त्या वेळीं बोलतां बोलतां प्रा. फडके ह्यांनीं मला सहज प्रश्न केला कीं, "एका चित्रपटाच्या गोष्टीसाठीं

तुम्हांला काय मिळतें ?"

मी म्हणालों, "मिळतात अदमासें बाराशें रुपये !"

तेव्हां प्रा. फडके मला रागावून म्हणाले, "तुम्ही इतके कमी पैसे घेऊन इतर चित्रपट-लेखकांचा 'भाव' खालीं उतरवला आहे. प्रत्येक कथेसाठीं तुम्हीं कमींत कमी दहा हजार रुपये तरी घेतले पाहिजेत !"

चित्रपट-निर्माते जर एका चित्रपटावर हजारों रुपये (त्या काळांत हजारोंच) रुपये मिळवतात, तर चित्रपटाच्या लेखकाला त्याच्या कथेबद्दल भरपूर मोबदला कां मिळूं नये असा प्रा. फडके ह्यांच्याप्रमाणें अनेकजण युक्तिवाद करून मला भंडावीत असत. त्या युक्तिवादाला पुढें हळूहळू दुसरा फाटा फुटूं लागला. तो असा कीं, "उत्तम चित्रकथा लिहिण्यांत जर तुम्ही आतांपर्यंत यश मिळविलें आहे, तर मग तुम्ही स्वतःच आपले चित्रपट निर्माण केले तर लाखों रुपये कां कमावणार नाहीं ?"

महिना शेंपाऊणशें रुपये मिळवणाऱ्या माझ्यासारख्या शिक्षकाच्या अंतश्चक्षूं-समोर जेव्हां लाखों रुपयांचा ढीग चकाकूं लागला, तेव्हां त्याची मनःस्थिति काय झाली असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी ! त्याचबरोबर चित्रपट-निर्मितीला देखील लाखों रुपयांचें भांडवल लागतें, ह्या गोष्टीची जेव्हां मला कोणी आठवण करून दिली, तेव्हां लाखों रुपये मिळवण्याच्या माझ्या उत्साहावर एकदम विरजण पडलें.

पण चित्रपट-निर्मितीचा हा जो विचार माझ्या मनामध्यें डोकावूं लागला होता, त्याला पुणें म्युनिसिपालिटींत गेल्यानंतर एक निराळीच चालना मिळाली. 'राजगुरु प्रेस'चे मालक बापूराव राजगुरु हे माझ्याप्रमाणेंच कॉंग्रेस पक्षातर्फे म्युनिसिपालिटींत निवडून आले होते. त्यांची नि माझी म्युनिसिपालिटींत रोज गांठ पडे. आणि गांठ पडली कीं, चित्रपट-व्यवसायासंबंधीं त्यांच्या नि माझ्या खूप गप्पा चालत. आम्हां उभयतांचे मित्र श्री. रामभाऊ अभ्यंकर हे त्या वेळीं 'कॉमनवेल्थ विमा कंपनी'चे मॅनेजिंग डायरेक्टर होते. तेहि कॉंग्रेस पक्षातर्फे आमच्याबरोबरच म्युनिसिपल निवडणुकीला उभे राहिले होते. पण ते निवडून आले नाहींत.

अभ्यंकर हे विलक्षण उत्साही नि महत्त्वाकांक्षी गृहस्थ होते. फर्ग्यूसन कॉलेजांत असतांना ते माझे सहाध्यायी होते. तेव्हांपासून मी त्यांना ओळखत होतों. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर 'कॉमनवेल्थ'चा प्रचंड संसार त्यांनीं पुणें शहरांत उभा केला होता. पैशाच्या सृष्टींत मोठमोठ्या उलाढाली करण्याची त्यांना धमक होती. आपण एक दिवस महाराष्ट्राचे 'सर पुरुषोत्तमदास टाकूरदास' होऊन दाखवूं, असें अनेकदां ते आपल्या मित्रांना बोलून दाखवीत असत.

चित्रपट कंपनी काढण्याबाबत माझ्या नि बापूराव राजगुरूंच्या गोष्टी चालत, त्या जेव्हां अभ्यंकरांच्या कानांवर गेल्या, तेव्हां त्यांनीं त्या कामीं विलक्षण उत्साह दाखविला. किंबहुना त्याची धुराच त्यांनीं आपल्या खांद्यावर उचलली.

ते मला म्हणाले, "पैशाची काळजी तुम्ही कशाला करतां ? त्यासाठीं आपण एक 'पब्लिक लिमिटेड' कंपनीच काढूं. आपली कंपनी रजिस्टर झाली रे झाली कीं महाराष्ट्रांतून पैसा धों धों वहात आपल्याकडे येईल. मग तुम्ही बघतच रहाल !"

'लिमिटेड कंपन्या' काढण्याच्या बाबतींत रामभाऊ अभ्यंकर हे अत्यंत वाकबगार गृहस्थ होते–नव्हे, त्या बाबतींत त्याचा हातखंडाच होता. ( तोच पुढें आयुष्यांत त्यांना नडला ! ) मी त्या बाबतींत सपशेल अडाणी होतों. तथापि, अभ्यंकरांकडून कांहीं रजिस्टर्ड कंपन्यांचे 'प्रॉस्पेक्टस' मीं आणले आणि त्यांचा नीट अभ्यास करून आमच्या नव्या चित्रपट कंपनीचे संपूर्ण उद्देश अन् नियमपत्रक इंग्रजींत लिहून तयार केलें. 'नवयुग वाचनमाले'पासून 'नवयुग' हें माझें आवडतें नांव होतें. तेंच मीं नव्या चित्रपट कंपनीला द्यावयाचें ठरविलें. मी, राजगुरु आणि अभ्यंकर असे तिघेजण त्या कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स झालों, आणि आम्हां तिघांच्या आडनांवांचीं आद्याक्षरें एकत्र करून त्या मॅनेजिंग एजन्सीला 'आरा ( A-R-A ) अँड कंपनी' हें नांव दिलें.

अशा रीतीनें 'नवयुग चित्रपट' कंपनीची प्राथमिक जुळवाजुळव तर झाली. ह्या कंपनीचे डायरेक्टर्स कोणाला करावयाचें हा प्रश्न पुढें उभा राहिला. श्रीमंत मंडळींपैकीं माझी तशी फारशी कोणाची ओळख नव्हती. पुण्यांत कोणतीहि नवीन रजिस्टर्ड कंपनी निघाली, कीं कांहीं कांहीं मंडळी तिचे डायरेक्टर होणारच हें अगदीं ठरून गेल्यासारखें होतें. अशांपैकीं कांहीं मंडळींचीं नांवें अभ्यंकरांनीं डायरेक्टर बोर्डावर घालूनच टाकलीं. त्यांची अनुमति आणि पैसे त्यांनीं घेतले कीं नाहीं हें त्यांचें त्यांना ठाऊक.

चित्रपट-निर्मितीसाठीं लिमिटेड कंपनी काढणें हें एक फार मोठें धाडसच होतें. अशा तऱ्हेची कंपनी महाराष्ट्रांतच काय पण भारतांतसुद्धां त्यापूर्वीं कोणी काढलेली नव्हती. चित्रपटाची सृष्टि ही एक मयासुराची सृष्टि होती हें साऱ्या जगाला माहीत होतें. चित्रपट यशस्वी झाले तर लाखों रुपये मिळतात हें जसें लोकांनीं ऐकलें होतें, त्याप्रमाणें चित्रपट अयशस्वी झाले तर निर्मात्याचें दिवाळें निघतें हेंहि पण त्यांना ठाऊक होतें. चित्रपटाच्या धंद्यांतली लाखों रुपयांची उलाढाल म्हणजे लंकेमधल्या सोन्याच्या विटांची देवघेव. अशा बेभरंवशाच्या धंद्यावर विश्वास कोण ठेवणार आणि त्यामध्यें पैसे तरी कोण गुंतवणार ?

म्हणून ह्या लिमिटेड कंपनीसाठीं सामान्य जनतेच्या मनांत विश्वासाची भावना कांहीं तरी करून आपण निर्माण केली पाहिजे, त्याशिवाय ही कंपनी आपल्या पायावर उभी रहाणें अशक्य आहे, ही गोष्ट थोड्याच दिवसांत मला कळून चुकली. महाराष्ट्रांतली सर्वसामान्य जनता फार हुषार आहे. आपला पैसा चांगला सुरक्षित राहील अशी खात्री वाटल्याखेरीज कोणत्याहि नव्या उद्योगांत ती पैसा गुंतवीत नसते. येवढ्यासाठीं ज्यांच्या प्रामाणिकपणावर आणि कर्तबगारीवर जनतेचा विश्वास आहे अशा एखाद्या नामवंत

व्यक्तीच्या हातीं कंपनीचीं सूत्रें सोपविणें हें धंद्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें.

त्या काळीं प्रा. वामन गोविंद काळे, एम्. ए. ह्यांचें नांव अर्थक्षेत्रांत प्रख्यात होतें. फर्ग्यूसन कॉलेजांत मी विद्यार्थी असतांना माझे ते प्रोफेसर होते. म्हणून त्यांची-माझी थोडीशी ओळख होती. त्यांच्यासारखा विद्वान् अर्थशास्त्रज्ञ जर आपल्या कंपनीच्या डॉयरेक्टर्स बोर्डाचा ' चेअरमन ' झाला, तर मग आपल्या कंपनीच्या यशाबद्दल भीतीच नको असा विचार करून एके दिवशीं सकाळीं मी आणि अभ्यंकर त्यांच्या बंगल्यावर गेलों. चित्रपटाच्या धंद्याची त्यांना विशेष कांहीं माहिती नव्हती. आणि मला तरी त्या धंद्याचें प्रत्यक्ष ज्ञान असें कोठें होतें? तथापि त्यासंबंधीं ' हंस पिक्चर्स 'च्या मालक मंडळीकडून वेळोवेळीं जें मीं ऐकलें होतें, त्याच्या आधारावर एक चित्रपट निर्माण करण्यास किती खर्च येतो आणि त्यावर फायदा किती ह्याचें गणित मी वामनरावांच्यापुढें मांडलें.

ते म्हणाले, " तुम्ही म्हणतां एवढा जर या धंद्यांत फायदा असेल, तर ह्या धंद्यांत लोक जरूर पैसा गुंतवतील. पण तुम्ही सांगतां त्यावर लोकांचा विश्वास कसा बसणार?"

" म्हणून तर आम्ही तुमच्याकडे आलों आहोंत; " मी हंसून म्हणालों, " तुम्ही आमच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन व्हावें, अशी आमची इच्छा आहे!"

" त्याबद्दल मी तुमचा आभारी आहें!" वामनराव हंसून म्हणाले, " पण तुमच्या कंपनीचा डायरेक्टर व्हायचें म्हणजे मला तुमचे शेअर्स विकत घ्यावयाला पाहिजेत. ते पैसे मी कोठून आणूं? मी कांहीं श्रीमंत माणूस नाहीं—"

" ते तुमचे पैसे आम्ही भरतों–" रामभाऊ अभ्यंकर मध्येंच म्हणाले, " मग मागाहून तुम्हांला जशी सवड होईल तसे तुम्ही आमचे पैसे परत करा!"

ती गोष्ट वामनरावांनीं मान्य केली. आणि त्याप्रमाणें त्यांच्या ' शेअर्स 'चे पैसे रामभाऊ अभ्यंकरांनीं आपल्या पदरचे भरून त्यांना डायरेक्टर केलें. पुढें ' बोर्डा 'च्या सभेंत त्यांची ' चेअरमन 'च्या जागेवर नियुक्ति झाली.

एवढ्यांत एके दिवशीं माझे मित्र काकासाहेब लिमये माझ्याकडे आले. आमच्या नवीन उद्योगाबद्दल त्यांच्या मनांत कांहीं शंका होत्या. त्या त्यांनीं मोकळेपणानें माझ्या-पुढें व्यक्त केल्या.

ते म्हणाले, " हंस पिक्चर्सच्या मंडळींना वगळून तुम्हीं चित्रपट कंपनी काढण्याचा हा जो उद्योग सुरू केलेला आहे हा कांहीं मला पसंत नाहीं. चित्रपटाची गोष्ट तुम्ही चांगली लिहूं शकतां, यापेक्षां या व्यवसायाची तुम्हांला काय माहिती आहे? तुमचे सहकारी रामभाऊ अभ्यंकर किंवा बापूराव राजगुरु ह्यांना तर त्या धंद्याची काडीइतकी माहिती नाहीं. मग तुम्ही हा धंदा चालविणार कुणाच्या जोरावर? तुम्ही काय आपली शाळेंतली नोकरी सोडून ह्या व्यवसायाला सर्वस्वीं वाहून घेणार आहांत? आणि तुमच्या सार्वजनिक जीवनावर पाणी सोडणार आहांत? तुम्हांला मी

तसें करूं देणार नाहीं. तो शुद्ध आत्मघातकी वेडेपणा होईल !"

काकासाहेबांचा युक्तिवाद मला पटला. त्यांना द्यावयास माझ्याजवळ समर्पक उत्तर नव्हतें.

"मग मीं काय करावें असें तुमचें म्हणणें आहे ?" मीं त्यांना विचारलें.

त्यावर ते म्हणाले, "'हंस पिक्चर्स'च्या मंडळींना तुम्हीं आपल्या ह्या नव्या उद्योगांत सामील करून घ्यावें असा माझा तुम्हांला आग्रह आहे. नाहीं तरी तुम्हांला कोणी तरी दिग्दर्शक आणि कॅमेरामन आणावाच लागणार. आतां विनायकापेक्षां तुम्हांला अधिक चांगला दिग्दर्शक आणि नट कोठून मिळणार ? आणि पांडुरंग नाईकांपेक्षां अधिक कलावंत कॅमेरामन तरी तुम्ही कोठून आणणार ? शिवाय धंद्याच्या दृष्टीनें बाबूराव पेंढारकरांसारख्या अनुभवी आणि वाकबगार माणसाच्या हातीं निर्मितीचीं सूत्रें तुम्हीं सोपविल्यखेरीज तुमचे चित्रपट यशस्वी होणें अशक्य आहे. ही अगदीं काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यांत ते नामांकित नटहि आहेत. ह्या सर्व गुणी माणसांना तुम्ही 'नवयुग'च्या निशाणाखालीं एकत्र आणून महाराष्ट्रांत चित्रपट-निर्मितीचा एक नवा आदर्श निर्माण करा. तरच तुम्हांला पाहिजे तो लोकाश्रय मिळूं शकेल !"

काकासाहेबांचें हें म्हणणें बिनतोड होतें. तें राजगुरु आणि अभ्यंकर ह्यांनाहि पटलें.

'हंस पिक्चर्स'चे बहुतेक सर्व चित्रपट जरी यशस्वी झाले होते, तरी त्यांची सांपत्तिक स्थिति कांहीं फारशी चांगली नव्हती. कारण, धंद्याला लागणारें भांडवल असें स्वतःजवळ त्यांचें मुळींच नव्हतें. म्हणून भारी व्याजाच्या दरावर आणि वितरणासाठीं जास्त कमिशन देऊन त्यांना सावकारांकडून प्रत्येक चित्रपटासाठीं कर्जाऊ पैसा घ्यावा लागे. मीं लिहिलेला 'ब्रह्मचारी' बोलपट हा प्राप्तीच्या नि लोकप्रियतेच्या दृष्टीनें पराकाष्ठेचा यशस्वी होऊनहि केवळ सावकाराचा तगादा चुकवण्यासाठीं 'हंस पिक्चर्स'ला तें चित्र अगदीं थोड्या फायद्यांत 'व्ही. आर. मेहता आणि कंपनी'ला विकून टाकावें लागलें. त्यांनीं मात्र त्यावर लाखों रुपयांचा फायदा मिळवला, हें मागेंच मीं सांगितलें आहे. म्हणून आम्ही सुरू करीत असलेल्या 'नवयुग चित्रपटां'त भागीदार होण्याची जेव्हां मीं 'हंस पिक्चर्स'च्या मंडळींना सूचना केली तेव्हां त्यांनीं तिचा आनंदानें स्वीकार केला.

आम्हीं आमच्या 'मॅनेजिंग एजन्सी'चें पूर्वीचें 'आरा आणि कंपनी' हें नांव बदलून तिच्या जागीं 'हंस पिक्चर्स' हें नांव धारण केलें. आणि त्याचे मी, राजगुरु, अभ्यंकर, विनायक, पांडुरंग नाईक आणि बाबूराव पेंढारकर असे सहाजण भागीदार झालों. 'हंस पिक्चर्स'चा कोल्हापूरला जो 'स्टूडिओ' होता तो सर्व यंत्रसामग्रीसह आम्हीं विकत घेतला. 'नवयुग'चें ऑफिस पुण्याला 'कॉमनवेल्थ'च्या नव्या इमारतींत उघडलें आणि निर्मितीचें काम कोल्हापुरांत सुरू करावयाचें ठरविलें.

चित्रनिर्मितीच्या कामाची आम्हीं आपापसांत वांटणी करून घेतली ती अशी :

कोणत्याहि चित्रपटासाठीं कथा निश्चित करण्याचा अधिकार माझ्याकडे देण्यांत आला. मग ती कथा मीं लिहिलेली असो वा दुसऱ्या कोणा लेखकानें लिहिलेली असो. चित्रपट-निर्मितीचे अधिकार बाबूराव पेंढारकरांकडे आणि दिग्दर्शन विभागाचीं सूत्रें मास्टर विनायक ह्यांच्याकडे सोंपविण्यांत आलीं.

पण कंपनीचे शेअर्स महाराष्ट्रांत खपविणें हें सर्वांत महत्त्वाचें काम माझ्याकडे आलें. फारच अवघड काम होतें तें. पहिल्या चित्रपटासाठीं गोष्टहि लिहावयाची आणि पुन्हां शेअर्स खपविण्यासाठीं गांवोगांव दौरे काढावयाचे ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. त्याखेरीज पुणें म्युनिसिपालिटीमध्यें मी स्टँडिंग कमिटीचा चेअरमन होतों. आणि कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा प्रिन्सिपल होतों. तींहि कांहीं कमी जबाबदारीचीं कामें नव्हतीं. पण एका वेळीं अनेक कामें अंगावर घ्यावयाचीं हा जणुं कांहीं माझा जन्मजात स्वभावच होता म्हणानात.

'नवयुग'च्या पहिल्या चित्रपटासाठी 'लपंडाव' ही स्वतंत्र सामाजिक कथा मीं लिहिली. पुण्याच्या सुशिक्षित जगांत मी वावरत असल्यामुळें प्रौढ वयाच्या पदवीधर कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न दिवसेंदिवस किती बिकट होत चालला होता हें रोजच्या रोज मी पहातच होतों. त्यांपैकीं कित्येक कुमारिकांच्या करुण कहाण्या मला प्रत्यक्ष माहीत होत्या. स्वतःला 'पुरोगामी' किंवा त्या वेळच्या भाषेंत सांगावयाचें झालें म्हणजे 'सुधारक' म्हणवणारे कित्येक पिते आपल्या मुलींना विश्वविद्यालयीन शिक्षण देऊन बी. ए. किंवा एम्. ए करीत. पण त्यांच्या विवाहाचा विचारसुद्धां त्यांच्या डोक्यांत कधीं शिरत नसे. त्यांना वाटे कीं, आपल्या मुलींनीं खूप शिकावें आणि आजन्म अविवाहित राहून समाजाच्या सेवेसाठीं स्वतःला वाहून घ्यावें.

पूर्वीच्या काळीं अज्ञानी नि देवभोळे आईबाप ज्याप्रमाणें आपल्या मुली देवाला वाहून टाकीत आणि त्यांना 'देवदासी' किंवा 'मुरळ्या' बनवीत, त्याप्रमाणें सुधारलेल्या जगांतले शिकलेले आईबाप आपल्या सुशिक्षित मुली समाजाला वाहून टाकून त्यांच्या 'समाजसेविका' बनवूं लागले. पण दोन्हीहि नमुने एकच. 'देवदासी'चें किंवा 'मुरळ्यां'चें जें होई, तेंच अर्थात् निराळ्या रूपानें आणि वेगळ्या रीतीनें ह्या प्रौढ सुशिक्षित समाजसेविकांचें होत असे. शारीरिक वासनांचा कोंडमारा झाल्यानंतर मग जन्माचा जोडीदार निवडण्यासाठीं लागणारा मनाचा समतोल आणि विवेक त्यांच्याजवळ रहात नसे. त्यामुळें त्यांच्या सान्निध्यांत येणाऱ्या कोणाहि धूर्त पुरुषाशीं पात्रापात्रतेचा विचार न करतांना त्या एकदम विवाहबद्ध होत. आणि मागाहून जन्मभर पस्तावत. ह्या कथावस्तूवर माझ्या 'लपंडाव' चित्रपटाची कथा आधारलेली होती.

वस्तुतः हा विषय गंभीर होता. एका महत्त्वाच्या सामाजिक समस्येवर आधारलेला अशा तऱ्हेचा गंभीर चित्रपट महाराष्ट्रांत तोंपर्यंत कोणी काढण्याचें धाडस केलें नव्हतें. मीं मनांत विचार केला कीं, ह्या चित्रपटानें 'नवयुग'ला कदाचित् फारसा

पैसा मिळणार नाहीं, पण सामाजिक प्रतिष्ठा मात्र निःसंशय मिळणार. नाटकाप्रमाणें चित्रपटहि सामाजिक प्रश्नावर लोकजागृति घडवून आणण्याचें एक प्रभावी माध्यम आहे, ही गोष्ट ह्या चित्रपटानें आपल्याला जनतेला पटवून देतां येईल, अशा विश्वासानें मीं ह्याच गोष्टीवर ' नवयुग 'चा पहिला चित्रपट काढावयाचें ठरविलें.

नवीन कंपनीचा नवीन चित्रपट निर्माण करावयाचा म्हणजे त्याला नवीन नटी असावयाला पाहिजे. नव्या डावाला जशी नवी विटी, तशी नव्या चित्रपटाला नवी नटी. नाहीं का ? आणि योगायोग असा कीं, अशी सुविद्य आणि रूपसुंदर नटी माझ्याच परिवारांत होती. माझ्या ' आगरकर हायस्कूल 'च्या प्रिन्सिपल सौ. कमलिनी दामले ह्यांच्या थोरल्या बहिणीची मुलगी सुशीला पवार ही त्या वेळीं तेवीस चोवीस वर्षांची होती. ग्वाल्हेर राज्याचे मंत्री कर्नल बापूराव पवार ह्यांची ती कन्या. तिचें बालपण ग्वाल्हेरचे महाराज कै. जिवाजीराव शिंदे आणि त्यांच्या थोरल्या भगिनी कै. कमलाराजे ह्यांच्या सहवासांत ग्वाल्हेरच्या राजवाड्यांत गेलें. त्यामुळें घोड्यावर बसणें, बंदूक उडविणें, शिकार करणें, पोहणें, धांवणें ह्या कलांत ती त्यांच्या बरोबरीनें तरबेज झालेली होती. हिंदी ही तर जवळ जवळ तिची मातृभाषाच होती. त्याखेरीज आग्रा युनिव्हर्सिटीची ती बी. ए. होती. महाविद्यालयांत असल्यापासून तिला काव्याची, नृत्याची आणि नाट्याची आवड होती. प्रिं. कमलिनी दामले ह्यांच्यामुळें माझ्या ' आगरकर हायस्कूल 'मध्यें कांहीं दिवस ती अध्यापिकेचें काम करावयास आली त्याच वेळीं तिच्याशीं माझा परिचय झाला.

' लपंडाव ' चित्रपटांत नायिकेचें काम करण्याला तिनें मोठ्या आनंदानें संमति दिली. वडिलांचा नि आप्तांचा विरोध असतांनाहि तिनें चित्रपटांत काम करण्यास तयार व्हावें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. पण त्यासाठीं लागणारें लोकोत्तर धैर्य तिच्याजवळ होतें ह्यांत कांहीं शंका नाहीं. चित्रपटासाठीं मीं तिला 'वनमाला' हें नांव दिलें. तिच्या धाकट्या बहिणीचें काम मीनाक्षीला देण्यांत आलें. बाबूराव पेंढारकर आणि विनायक ह्यांना अनुक्रमें नायक आणि उपनायक ह्यांच्या भूमिका देण्यांत आल्या. अशा रीतीनें ' लपंडाव ' साठीं नटनटींची निवड तर उत्तमच झाली.

वास्तविक, ह्या चित्रपटाचें दिग्दर्शन विनायकनें करावयाला हवें होतें. पण ह्या चित्रपटांतील नायकाचें काम त्याला स्वतःला आणि नायिकेचें मीनाक्षीला न मिळाल्या कारणानें तो मनांतून अत्यंत नाखूष होता. ' ह्या चित्रपटांत मला नुसती भूमिकाच करूं द्या. पुढल्या चित्रपटाचें दिग्दर्शन मी करीन ' अशी सबब सांगून त्यानें आपल्या अंगावरची दिग्दर्शनाची जबाबदारी मोठ्या हिकमतीनें टाळली. त्यामुळें ' लपंडाव 'च्या दिग्दर्शनासाठीं मला माझे मित्र श्री. के. नारायण काळे ह्यांना बोलवावें लागलें. ती जबाबदारी त्यांनीं उत्तम तऱ्हेनें पार पाडली ह्यांत कांहीं शंका नाहीं.

मास्टर विनायक हा वृत्तीनें अत्यंत तऱ्हेवाईक आणि मर्जिखोर कलावंत होता.

‘ लपंडाव ’ चित्रपट निर्माण होत असतां, तोच आमच्याशीं ‘ लपंडाव ’ खेळत होता. आमचा हा चित्रपट यशस्वी होऊं नये अशी मनामधून त्याची इच्छा होती. तेवढ्यासाठीं त्यानें ह्या चित्रपटामधून दामुअण्णा माल्वणकरांना ‘ उडवून ’ लावलें. ‘ लपंडाव ’मध्यें ‘ स्वयंवर मंडळा ’च्या चिटणिसाची अत्यंत विनोदी भूमिका मीं दामूअण्णांसाठीं लिहिली होती. आणि चित्रपटाचा मुहूर्तसुद्धां त्यांच्यावरच केलेला होता. तथापि, ‘ लपंडाव ’मध्यें दामूअण्णांनीं काम केलें तर तो अत्यंत लोकप्रिय होईल म्हणून विनायकाच्या चिथावणीनें पगाराबाबत कांहींतरी खुसपट काढून दामूअण्णांनीं ह्या चित्रपटांत काम करावयास नकार दिला आणि म्हणून त्यांच्या जागीं मुहूर्तांचें दृश्य रद्द करून आम्हांला बापूराव पवार नांवाच्या दुसऱ्या एका नटाला घेणें भाग पडलें.

ह्या एका गोष्टीसाठीं दामूअण्णा मालवणकर ह्यांच्यावर माझा अतिशय राग आहे. बाहेरून मी तो त्यांना कधीं दाखवीत नाहीं, इतकेंच. वस्तुतः, त्यावेळीं अन्नाला महाग असलेल्या ह्या बेकार दामूअण्णाला मीं माझ्या ‘ ब्रह्मचारी ’ चित्रपटांत घ्यावयासाठीं विनायकाला सांगितलें. ‘ ब्रॅण्डीची बाटली ’ आणि ‘ अर्धांगी ’ ह्या माझ्या बोलपटांत त्यांच्यासाठीं पराकाष्ठेच्या विनोदी भूमिका मुद्दाम लिहून साऱ्या महाराष्ट्रांत त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर चढविलें! पण त्याबद्दल एका अक्षरानेंहि त्यांनीं माझे कधीं उपकार मानले नाहींत. आणि ‘ लपंडाव ’मध्यें तर त्यांनीं माझा केंसानेंच गळा कापला. दामूअण्णा मालवणकर हे एक श्रेष्ठ विनोदी नट आहेत ह्यांत मुळींच शंका नाहीं. पण कृतज्ञता म्हणून जी एक गोष्ट आहे ती त्या बिचाऱ्याजवळ औषधापुरतीहि नाहीं, त्याला कोण काय करणार ?

‘ लपंडाव ’ बोलपट ठराविक मुदतींत पूर्ण झाला. मुंबईच्या ‘ वेस्टएण्ड सिनेमा ’त तो प्रथम प्रदर्शित झाला. आणि एका रात्रींत त्याचें आणि मुख्य नायिका वनमाला हिचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. वनमालेनें आपल्या अभिनयाचे विविध पैलू दाखवून प्रेक्षकांना चकित करून टाकलें. आणि रुपेरी सृष्टींतील आपल्या उज्ज्वल भवितव्याचा निश्चित दिलासा दिला.

ह्या चित्रपटांतील संवादाप्रमाणेंच माझीं गाणींहि अत्यंत लोकप्रिय झालीं. विशेषतः ‘ प्रीती मिळेल का हो बाजारीं, प्रीती मिळेल का हो शेजारीं ’ हें केशवसुतांच्या काव्यावर आधारलेलें भावगीत आणि ‘ चल, वेंच फुलें, वेंच भराभर रमणी, ही सकाळ जाइल सरुनी ’ हें ‘ Gather Ye Rosebuds while Ye may ’ ह्या राबर्ट हेरिकच्या इंग्रजी काव्याचें रूपांतर अत्यंत लोकप्रिय झालें.

जी ‘ नवयुग चित्रपट ’ कंपनी मीं स्वतः स्थापन केली, तिनें निर्माण केलेलें ‘ लपंडाव ’ हें माझें पहिलें नि शेवटचेंच चित्र ठरलें!

# २

# साप्ताहिक ‘ नवयुग ’

मित्रांच्या आग्रहावरून मी चित्राच्या व्यवसायांत शिरलों. आणि चित्राच्या व्यवसायांतून मी पत्राच्या व्यवसायाकडे वळलों. आणि तोच आतां माझ्या आयुष्यांतला सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा उद्योग होऊन बसलेला आहे. शिक्षणामधून साहित्यांत, साहित्यांतून नाटकांत, नाटकांतून चित्रकथेंत,त्या लौकिकाच्या आधारानें नगरपालिकेंत, तेथून चित्रपटांत आणि चित्रपटांतून वृत्तपत्रांत आणि वृत्तपत्रांतून राजकारणांत अशा रीतीनें एकांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें अशीं माझ्या आयुष्याचीं एकसारखीं स्थित्यंतरें होत गेलीं.

पंचवीस लाख रुपये भांडवलाची ‘ नवयुग चित्रपट लि. ’ कंपनी काढल्यानंतर जेव्हां तिचे शेअर्स खपविण्यासाठीं मी महाराष्ट्रामधून संचार करूं लागलों, तेव्हां ह्या कंपनीच्या कार्याचा प्रचार करण्यासाठीं एखाद्या नियतकालिकाची आवश्यकता मला भासूं लागली. दैनिक पत्र काढणें अर्थात् त्या वेळीं शक्यच नव्हतें. तेव्हां साहजिकच साप्ताहिकाचाच मी विचार करूं लागलों.

त्याच सुमारास ‘ नवयुग चित्रपटा ’-मधील आमचे सहकारी बापूराव राजगुरु

ह्यांनीं ' लोकमत ' नांवाचें एक दैनिक पां. वा. गाडगीळ ह्यांच्या संपादकत्वाखालीं सुरू केलें होतें. हें दैनिक दहाबारा दिवस चाललें. एका रात्रीं राजगुरूंनीं तें बंद करून टाकलें. तेव्हां संपादक गाडगीळ नोकरी शोधण्यासाठीं मुंबईला निघून गेले. त्याच्या दुसऱ्या दिवशीं मी आणि राजगुरु कंपनीचे शेअर्स खपविण्यासाठीं नगरला जाणार होतों. म्हणून मी राजगुरूंना घेण्यासाठीं त्यांच्या मुद्रणालयांत गेलों. तेथें बंद पडलेल्या ' लोकमता 'चे बेकार लेखक आणि नोकरवर्ग कपाळाला हात लावून सचिंत मुद्रेनें बसला होता.

मला त्यांच्या चिंतेचें कारण जेव्हां समजलें, तेव्हां मागला पुढला विचार न करतां जणुं कांहीं स्फूर्तीचा एकादा झटका यावा त्याप्रमाणें मी त्यांना एकदम बोलून गेलों, " कांहीं चिंता करूं नका. पंधरवड्यानें मी साप्ताहिक नवयुग सुरू करीत आहें. त्या पत्राच्या संपादकीय आणि नोकरवर्गावर तुम्हां सर्वांच्या पूर्वींच्या पगारावर नेमणुका करण्याचें मी जाहीर आश्वासन देतों ! "

ती सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क होऊन गेली. जणुं कांहीं एकादा ' देव 'च माझ्या मुखांतून बोलतो आहे असें डोळ्यांत अश्रु आणून त्यांपैकीं कांहीं जण कृतज्ञतेनें मला त्या वेळीं म्हणाले. कारण, ' लोकमत ' बंद पडल्यानंतर अक्षरशः उपासमारी आपला जबडा उघडून त्यांच्यापुढें बसली होती. तो स्फूर्तीचा झटका एकाएकीं मला कसा आला हें समजत नाहीं. त्या झटक्यांत मी माझ्या साप्ताहिकाला ' नवयुग ' हें समर्पक नांवहि देऊन मोकळा झालों. पां. वा. गाडगीळ ह्यांना मीं मुंबईच्या पत्त्यावर ताबडतोब पत्र लिहून टाकलें कीं, " तुम्ही मुंबईची नोकरी पत्करूं नका. मीं ' नवयुग ' साप्ताहिक काढावयाचें ठरविलें आहे. त्याचे सहसंपादक म्हणून जर तुम्ही काम कराल तर मला आनंद होईल. " दुसऱ्या दिवशीं गाडगीळ मुंबईहून आले आणि त्यांनीं माझी विनंति मान्य केली.

' साप्ताहिक नवयुगा 'ची जाहिरात महाराष्ट्रांतल्या नियतकालिकांत जेव्हां प्रसिद्ध झाली तेव्हां अभिनंदनाच्या पत्रांचा मजवर पाऊसच पडला. चोहोंकडून एजंटांच्या पत्रांचा वर्षाव झाला. तोंपर्यंत मुंबई हें साप्ताहिकांचें केंद्र समजलें जात असे. त्या काळांत ' नवयुग ' हें पुण्यामधून निघालेलें पहिलेंच साप्ताहिक होतें. म्हणून त्याचें विशेष कौतुक झालें. ' साप्ताहिक नवयुग 'चें कार्यालय कॉमनवेल्थ इमारतीच्या एका प्रशस्त आणि सुंदर दालनांत आम्ही आयोजित केलें. मुद्रणाचें काम ' राजगुरु प्रेस 'कडे सोपविण्यांत आलें. संपादक म्हणून माझें, संचालक म्हणून ' नवयुग चित्र-पट 'चे एक तरुण डायरेक्टर चंदुलाल हिरालाल गांधी ह्यांचें आणि सहसंपादक म्हणून पां. वा. गाडगीळ ह्यांचें अशीं तीन नांवें ' नवयुग ' वर झळकलीं मुखपृष्ठावर दर वेळीं एखाद्या सुप्रसिद्ध चित्रपट-तारकेचा फोटो द्यावयाचें ठरलें. पहिला अंक बत्तीस पानांचा असून त्याची किंमत अवघा दीड आणा होती. पहिला अंक प्रारंभीं पांच

हजारांचा आम्ही छापणार होतों. पण छापतां छापतांच अंकाची मागणी दहा हजारां-पर्यंत वाढत गेली.

२१ जानेवारी १९४० रोजीं 'साप्ताहिक नवयुग'चा अंक प्रसिद्ध झाला. पण-त्याच्या दोन दिवस आधीं त्या अंकाचें उद्घाटन माझें जन्मगांव जें सासवड त्यापासून तीन कोस अंतरावर असलेल्या छत्रपति शिवाजी महाराजांच्या पुरंदर किल्ल्या वरील एका रमणीय पठारावर करण्यांत आलें. श्री महाराष्ट्र शारदा मंदिराचा शिशिर-विहार आम्हीं त्या ठिकाणीं आयोजित केलेला होता. त्यामुळें पुण्याच्या प्रथितयश कवींच्या नि साहित्यिकांच्या स्फूर्तिदायक मेळाव्यांत 'नवयुग' जन्माला आलें. हा आमच्या नवीन उपक्रमाला एका तऱ्हेनें शुभशकूनच ठरला.

वस्तुतः चित्रपटाच्या प्रचारासाठीं म्हणून साप्ताहिक काढावयाची मूळची कल्पना होती. पण प्रत्यक्ष जेव्हां त्याची रचनाच करावयाला बसलों तेव्हां ओघानेंच त्याला राजकीय स्वरूप आलें. त्या वेळीं मी कॉंग्रेसमध्यें असल्याकारणानें साहजिकच 'नवयुग'चें अधिकृत धोरण कॉंग्रेसमध्यें राजकारणाला पाठिंबा देणें हें ठरावें ह्यांत नवल नव्हतें. त्या काळीं पुण्यामुंबईत आणि महाराष्ट्रांत प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकां-मध्यें कॉंग्रेसविरोधक पत्रांचाच जास्त भरणा होता. त्यामुळें कॉंग्रेसच्या धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या साप्ताहिकाचा बहुसंख्य वाचकांकडून मोठ्या अपेक्षेनें आणि उत्साहानें सत्कार झाला.

'नवयुग'च्या लेखनाची वांटणी आम्हीं अशी केली : 'नवयुग'ची राज-कीय बाजू गाडगीळांनीं सांभाळायची, म्हणजे 'अग्रलेख' नि राजकीय स्फुटें, टीका, टिपणें त्यांनीं लिहावयाचीं. कारण, गाडगीळांचा राजकारणाचा अभ्यास नि त्या विषयांतील अधिकार माझ्यापेक्षां निःसंशय अधिक होता. आणि 'नवयुग'चा साहित्य-विभाग मीं पहावयाचा. प्रत्येक अंकांत माझें कांहींतरी वैशिष्ट्यपूर्ण लेखन यावयालाच पाहिजे म्हणून 'अत्रे उवाच' हें सदर मीं अगदीं पहिल्या अंकापासून सुरू केलें. ह्याखेरीज अंक आकर्षक करण्याच्या दृष्टीनें बारकीची सर्व व्यवस्था मीं रमाकांत वेलदे ह्यांच्याकडे सोपविली. 'नवयुग'च्या प्रारंभींच्या काळांत वेलदे ह्यांची मला फारच मदत झाली. वेलदे शरीरानें अपंग होते. पण त्यांच्या उत्साहाला मर्यादा नव्हती. त्यांच्याइतका हजरजबाबी आणि सव्यसाची लेखक मराठी पत्रव्यवसायाला क्वचितच लाभला असेल. कोणत्याहि विषयावर दोन अडीच कॉलमांचा चांगला वाचनीय मजकूर अर्ध्यापाऊण तासांत झपाट्यानें आणि सुन्दर अक्षरांत लिहून काढण्यामध्यें त्यांचा अगदीं हातखंडा असे. त्याखेरीज मुद्रण-व्यवसायाच्या सर्व अंगोपांगांत नि तंत्रांत ते चांगलेच तरबेज होते.

महाराष्ट्रांतील अनेक नांवाजलेले कवि आणि लेखक आमच्या सहाय्याला धांवले. अगदीं पहिल्या अंकांतील लेखकांचीं आणि त्यांनीं लिहिलेल्या विषयांचीं नांवें वाचलीं

तरी आजच्या वाचकांना त्याची कल्पना येईल. नटश्रेष्ठ गणपतराव बोडसांनीं आपल्या आगामी आत्मचरित्रामधल्या कांहीं मनोरंजक आठवणी दिल्या. श्रीमती शकुंतला परांजपे ह्यांनीं संततिनियमनासंबंधीं आपले अनुभव सांगितले. प्रा. श्रीकृष्ण क्षीरसागर ह्यांनीं पुरोगामी विचारसरणीच्या चतुःसूत्रीची चर्चा केली. प्रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर ह्यांनीं 'महाराष्ट्राच्या मानगुटीवरचा समंध' या मथळ्याचा अत्यंत खळबळजनक असा लेख लिहून महाराष्ट्रांतल्या इतिहाससंशोधकांवर जबरदस्त हल्ला चढवला. त्या-खेरीज य. गो. जोशी, कविवर्य गिरीश आणि शांताराम आठवले ह्यांची गोष्ट, लेख नि कविताहि या अंकांत होत्या.

ह्या पहिल्या अंकामध्यें 'अत्रे उवाच' खेरीज माझे दोन लेख आहेत. पहिल्याच पानावरील विनोदी टिपणें आणि 'व्यक्ति आणि वल्ली' या सदराखालीं 'साहित्य फौजदार' ह्या टोपण नांवानें प्रा. श्री. नी. चापेकर ह्यांनीं आपल्या 'सुवर्णचंपक' ह्या काव्यसंग्रहांत 'गोल्डन ट्रेझरी'मधील कांहीं इंग्रजी कवितांचीं अक्षरशः मराठी भाषांतरें स्वतःच्या नांवावर खपविण्याचें जें वाङ्मयचौर्य केलें तें मीं उघडकीस आण-लेलें आहे.

'अत्रे उवाच' मध्यें मीं गडकऱ्यांच्या आठवणी सांगितल्या होत्या. त्यामध्यें कित्येक महत्त्वाच्या समकालीन व्यक्तींवर गडकऱ्यांनीं ज्या विनोदी ओव्या रचल्या होत्या, त्यांतल्या नमुन्यादाखल दोन ओव्या मीं दिलेल्या होत्या. त्या सांगण्यासारख्या आहेत :

**नमावा तो आधीं । अच्युत कोल्हटकर,**
**ज्याच्या घरावर । जप्ती सदा !**
**नमूं म्हणूं तरी । कृष्णा प्रभाकर,**
**गंधर्वाचा पदर । आड येतो !**

ह्या पहिल्या अंकामध्यें प्रसिद्ध झालेला 'कांचेच्या कपाटांतील सिंह' हा वीर सावरकरांवर व्यक्तिगत हल्ला चढवणारा लेख रमाकांत वेलदे ह्यांनीं लिहिला होता. हा लेख ह्या अंकाला लागलेलें एक गलिच्छ गालबोट होतें. सावरकरांसंबंधीं अत्यंत अना-दराची नि तुच्छतेची भावना त्यांत व्यक्त केलेली होती. हिंदुमहासभेचीं सूत्रें वीर सावर-करांनीं हातीं घेतल्यापासून काँग्रेस नि हिंदुसभा ह्यांच्यांतला विरोध अत्यंत विकोपाला गेला असला तरी व्यक्तिशः सावरकरांचे नि माझे संबंध आदराचे नि स्नेहाचे होते. म्हणून मीं नव्यानें सुरू केलेल्या साप्ताहिकाच्या अगदीं पहिल्याच अंकांत त्यांची वैयक्तिक निर्भर्त्सना करणारा असा लेख प्रसिद्ध व्हावा ही गोष्ट खरोखर मला लाजेनें मान खालीं घालावयाला लावणारी होती. पण मला त्याची कल्पनाच नव्हती. साप्ताहिकाचा संपादक जरी मी होतों तरी माझें सारें लक्ष होतें 'नवयुग चित्रपटांत'.

म्हणून वेलद्यांनीं हा लेख आपल्या अखत्यारांत मला न विचारतां छापून टाकला.

वेलदे लेखक जरी चांगला होता तरी वृत्तीनें अत्यंश खुनशी आणि दुराग्रही होता. त्याला राजकारणाचें फारसें ज्ञान नव्हतें. त्यानेंहि एवढाच विचार केला कीं, ज्याअर्थीं ‘नवयुग’ हें काँग्रेसच्या विचाराचें साप्ताहिक आहे त्या अर्थीं काँग्रेसच्या शत्रूंना एकजात झोडपून काढणें हें आपलें कर्तव्य आहे. तें ‘कर्तव्य’ मात्र त्यानें भलत्याच इमानानें पार पाडलें. त्यांत एका शब्दाची सुद्धां कुचराई त्यानें केली नाहीं. पण त्याच्या पापाचें खापर मात्र निष्कारण माझ्या डोक्यावर फुटलें. ‘नवयुग’च्या दुसऱ्याच अंकांत ‘डॉ. आंबेडकरांच्या कोलांट्या’ हा लेख लिहून त्यानें आंबेडकरांवर असाच हल्ला चढविला. त्याचा परिणाम असा झाला कीं, नागपूर येथें आंबेडकरांच्या अनुयायांनीं ‘नवयुग’च्या त्या अंकाची जाहीर होळी केली.

ज्या सुभाषचंद्र बोस ह्यांच्याबद्दल माझ्या मनांत पहिल्यापासून आदराची भावना होती, त्यांच्याबरहि गाडगीळ ह्यांनीं आपल्या ‘भेरी आणि तुतारी’ मध्यें ‘सुभाषबाबूंचें दिवाळें वाजलें’ या मथळ्याखालीं कडक टीका केली. कारण काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या नि गांधीजींच्या प्रमुख राजकीय धोरणास उचलून धरण्याची घोषणा त्यांनीं ‘नवयुगचें धोरण’ ह्या पहिल्याच अग्रलेखांत केली होती. वृत्तपत्राचा संपादकीय वर्ग हा सतारीच्या तारांसारखा असावयाला पाहिजे. सर्वांचे सूर एकमेकांशीं जमावयाला पाहिजेत तरच त्यांतून ‘सुसंगत’ विचारांचें संगीत बाहेर पडूं शकतें. त्याची जाणीव त्या वेळीं मला नव्हती.

वृत्तपत्राचा संपादक हाण्याचा माझा तो पहिलाच अनुभव होता. त्यावरून मला माझ्या एका मित्राची आठवण होते. त्याचें लग्न झालें नि नव्या संसाराला त्यानें प्रारंभ केला. पण बायकोशीं त्याचीं रोजच्या रोज भांडणें होऊं लागलीं. तेव्हां सासऱ्यानें जांवयाला विचारलें, “लग्न होऊन महिना झाला नाहीं तोंच तुमची जर अशी भांडाभांडी होऊं लागली तर तुमचा संसार चालणार कसा?” तेव्हां जांवईबुवानें उत्तर दिलें, “यापूर्वी लग्नाचा मला अनुभव कुठें होता? त्यामुळें हें असें होतें!” तशीच कांहींशी माझी स्थिति झाली.

गाडगीळांचें तोंड एकीकडे, माझें दुसरीकडे नि वेलद्यांचें तिसरीकडे. आम्ही लिहीत होतों सारे पोटतिडकीनें. त्यांत अंगचुकारपणा काडीमात्र नव्हता. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, आमच्या अंकाचा खप जसा वाढत गेला तशी आमच्या शत्रूंची संख्याहि झपाट्यानें वाढत गेली. स्तुतीचा आमच्यावर जेवढा वर्षाव झाला तितकी शिव्याशपांची आगहि आमच्यावर पाखडण्यांत आली. तेवढ्यांत वेलद्यानें आपलें लैंगिक लिखाण कु. शैलजा या टोपण नांवानें ‘नवयुग’मधून प्रसिद्ध करण्याला सुरुवात केली. त्यामुळें कोठल्याच राजकीय पक्षाचे नसलेले सनातनी लोक आमच्यावर भलतेच भडकले. सारांश, पहिल्या पांच सहा अंकांत ‘नवयुग’नें

महाराष्ट्रांत असा कांहीं धूमधडाका उडवून दिला कीं ' नवयुग चित्रपटा 'च्या प्रचारासाठीं सुरू केलेल्या ह्या साप्ताहिकाची त्या संस्थेला मदत होण्याऐवजीं उलट त्याचा तिला उपसर्गच होऊं लागला.

म्हणून सातव्या अंकांत मला मुद्दाम खुलासा करावा लागला कीं, " नवयुग साप्ताहिक हें माझ्या वैयक्तिक मालकीचें पत्र असून ह्या पत्राचा व ' नवयुग चित्रपट लि. ' या संस्थेचा कांहींहि संबंध नाहीं. अर्थात्‌च, या पत्रांत वेळोवेळीं प्रगट होत असलेल्या राजकीय वा सामाजिक किंवा टीकात्मक मतांबद्दल वैयक्तिक मीच जबाबदार आहें. " ' नवयुग ' च्या आक्रमक नि हिंसक विनोदामुळें अन् टीकेमुळें मीं कोणाकोणाला दुखवलें, कोणाकोणाला हैराण केलें नि कोणाकोणाचे शिव्याशाप अन् फिर्यादी ओढवून घेतल्या, त्याचा एक स्वतंत्र ग्रंथराज होईल. छोट्या ' जॉर्ज वॉशिंग्टन ' च्या हातांत कुऱ्हाड पडल्यानंतर त्यानें बागेंतल्या रोपट्यांची नि झुडुपांची जशी सरास कत्तल करून टाकली, त्याचीच पुनरावृत्ति मीं केली म्हणाना !

मुंबईच्या ' धनुर्धारी ' पत्राचे संपादक प्रभाकर पाध्ये हे माझ्या विनोदाचे पहिले बळी. त्यांनीं ' नवयुग ' च्या पहिल्या अंकावर आपल्या पत्रांत पुढीलप्रमाणें अभिप्राय दिला : " प्रल्हाद केशव अत्रे हे धाडसी गृहस्थ आहेत. गांधीवादी धोरणाच्या पत्रास ' नवयुग ' असें नांव देणें हें त्यांचें धाडसच होय ! " त्यावर मीं जी विनोदी मखलाशी केली ती अशी : " पोटासाठीं भटकत असतां अचानकपणें त्रिभुवन रोडवर ' सांपळ्यां 'त अडकून पडलेल्या चिरचिऱ्या आवाजाच्या एका उंदरानें स्वतःला ' धनुर्धारी ' म्हणवून घेण्यापेक्षां अत्रे यांचें धाडस फार कमी आहे. " ह्या विनोदांतलें ' विष ' आजच्या वाचकांना उमगणार नाहीं. ' धनुर्धारी ' पत्र हें ' त्रिभुवन रोड ' वर होतें. त्याचे मालक होते बाबूराव ' सापळे ' ! त्यांचे नोकर होते प्रभाकर पाध्ये. पाध्यांचा फाटका नि चिरचिरा आवाज जगप्रसिद्धच आहे. म्हणून पाध्यांचें मीं केलेलें वर्णन जितकें ' अक्षरशः ' खरें होतें, तितकेंच तें त्याच्या जिव्हारीं जाऊन झोंबणारें होतें.

पुण्यांत त्या वेळीं न. का. घारपुरे आणि मा. का. देशपांडे हे दोघे मासलेवाईक प्रोफेसर होते. त्यांच्या नांवांचीं न. का. आणि मा. का. हीं आद्याक्षरें त्या वेळीं पुण्याच्या विद्यार्थ्यांमध्यें विनोदाचा विषय होऊन बसलीं होतीं. ' झाका न. का. नि काढा मा. का. ' अशी त्या वेळीं एक म्हण सुद्धां झाली होती. ह्या मा. का. ना स्वतःच्या इंग्रजी भाषेंतील प्राविण्याची एवढी घमेंड चढली होती कीं, त्या भरांत रँग्लर परांजपे नि सुप्रसिद्ध इंग्रजीचे प्रोफेसर सदाशिव आय्यर ह्यांच्या ' इंग्रजी 'वर त्यांनीं अद्वातद्वा तोंडसुख घेतलें होतें.

त्याच वेळीं ' सकाळ 'च्या रविवारच्या अंकांत ' लेकराची सोय ' ह्या नांवाची एक गलिच्छ लघुकथा मा. का. नीं लिहिली होती. तिच्यांत ' शेंबूड ' हा शब्द आठ वेळां आला होता, त्या गोष्टीला अनुसरून मीं ' नवयुगां 'त ' महाराष्ट्राचा शेंबडा प्रोफेसर'

ह्या मथळ्यानें मा. का. ची खूपच टर उडविली होती त्या लेखाच्या पाठोपाठ उपद्व्यापी न. का. वर 'महाराष्ट्राचा चोंबडा प्रोफेसर' असा दुसरा एक हास्यकारक लेख मीं लिहिला. ह्या दोन्ही विनोदी लेखांनीं विद्यार्थी जगांत त्या वेळीं खूपच खळबळ उडवली होती.

# ३

# खटले नि मारामाऱ्या

' साप्ताहिक नवयुग'च्या चौथ्या अंकापासूनच अब्रूनुकसानीच्या खटल्यांना प्रारंभ झाला. ह्यावरून एक महिन्याच्या आंतच ह्या नवीन पत्राचा लोकमतावर केवढा प्रभाव पडूं लागला होता तें दिसून येण्यासारखें आहे. बरें, ' नवयुग'-वर हा अब्रूनुकसानीचा पहिला खटला जो करण्यांत आला, तो तरी कांहीं कोणा आलतूफालतू माणसाकडून नव्हे. तर मध्य प्रदेशाचे माजी मुख्य मंत्री डॉ. नारायण भास्कर खरे ह्यांच्यासारख्या एका अखिल भारतीय प्रसिद्धीच्या थोर पुरुषाकडून. आणि गंमत ही कीं ज्या लेखामधून हें अब्रूनुकसानीच्या खटल्याचें प्रकरण उद्भवलें, तो लेख म्हणजे केवढा होता म्हणाल तर अवघा पांच सहा ओळींचा.

महात्मा गांधींनीं मोठ्या धूर्तपणाचा डाव टाकून डॉ. खऱ्यांना आपल्या मुख्य मंत्रिपदाचा राजीनामा द्यावयास लावला. डॉ. खरे हे स्वभावानें अगदीं सरळ आणि वृत्तीनें अत्यंत साधेभोळे असून त्यांचें राजकारण अगदीं रोखठोक पद्धतीचें होतें. त्यामुळें कॉंग्रेस-श्रेष्ठींच्या कुटिल नीतीला ते बळी पडले. डॉ. खऱ्यांच्या राजीनाम्याचें प्रकरण

त्या वेळीं भलतेंच गाजलें.

मी त्या वेळीं काँग्रेसमध्यें असल्यानें महात्माजींच्या आणि काँग्रेस नेत्यांच्या प्रामाणिकपणावर माझा अंधविश्वास होता. त्यामुळें डॉ. खऱ्यांच्या भावना मला समजूं शकल्या नाहींत. त्यांची मनःस्थिति त्या काळांत एखाद्या दुखावलेल्या सिंहासारखी झाली होती. त्यांची यत्किंचित्‌हि कोणी खोडी काढली तर ती सहन करण्याच्या अवस्थेमध्यें ते राहिले नव्हते. आणि त्यांतल्या त्यांत महात्मा गांधींनीं तर त्यांच्या वाटेला जाण्याचें मुळींच कारण नव्हतें. कारण महात्माजींवर त्यांचा सर्वांत जास्त राग होता. पण डॉ. खरे ह्यांच्याशीं जणुं कांहीं आपलें भांडणच झालें नसून पूर्वीप्रमाणेंच त्यांच्याशीं आपलें सख्य आहे असा आविर्भाव आणून महात्माजींनीं त्यांना एक पत्र लिहिलें कीं, "माझी तब्येत अलीकडे बिघडली असून ती आपल्याकडून तपासून घ्यावी आणि आपल्याकडून औषधोपचार करून घ्यावा अशी मला इच्छा झाली आहे. तरी आपण माझी प्रकृति तपासावयाला कधीं येतां तें कळवावें."

महात्माजींचें तें पत्र वाचून डॉ. खरे खूपच खवळले. त्यांची प्रामाणिक समजूत अशी झाली कीं, केवळ आपली कुचाळी काढण्यासाठीं अत्यंत खवचटपणानें महात्माजींनीं हें पत्र आपल्याला लिहिलें असावें. म्हणून त्यांनीं तितक्याच व्रात्यपणानें महात्माजींना उत्तर पाठवलें कीं, "तुमची प्रकृति प्रत्यक्ष येऊन तपासण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. तुमची प्रकृति मी चांगलीच जाणतों. तुम्हांला एकाच औषधाची जरुरी आहे. आणि तें म्हणजे जमालगोटा. तुम्हांला चांगला जमालगोटा मिळाल्याखेरीज तुम्ही ताळ्यावर येणार नाहीं!"

डॉ. खरे ह्यांच्या ह्या पत्रावर मीं 'नवयुग'च्या पहिल्या पानावर येणाऱ्या 'विनोदी टिपणा'मध्यें एक छोटेंसें टिपण लिहिलें. तें असें कीं, 'दुसऱ्यांना जमालगोटा देण्यापलीकडे डॉ. खरे ह्यांना वैद्यकी व्यवसायाचें फारसें ज्ञान नसावें.' अर्थात् हें मीं केवळ गंमतीगंमतीनें लिहिलें होतें. डॉ. खरे ह्यांची बदनामी करावी किंवा त्यांच्या भावना दुखवाव्यात अशी कल्पनासुद्धां त्या वेळीं माझ्या डोक्यांत नव्हती. पण डॉ. खरे हे त्या वेळीं अत्यंत प्रक्षुब्ध मानसिक अवस्थेंत असल्यानें त्यांनीं त्या मजकुरानें आपली बेअब्रू झाल्याबद्दल नवयुगाचा संपादक म्हणून मी, संचालक म्हणून चंदूलाल हिराचंद गांधी अन् सहसंपादक म्हणून पां. वा. गाडगीळ अशी आम्हां तिघांवर नागपूरच्या कोर्टांत फिर्याद गुदरली.

ही फिर्याद डॉ. खरे ह्यांनीं आमच्यावर कां केली त्याचें आणखी एक कारण होतें. तें पुढें सांगतों.

एप्रिलचे दिवस. विदर्भांत उन्हाळा म्हणजे कोण. आम्ही तिघेजण माझ्या मोटरींतून पुण्याहून नागपूरला गेलों. वाटेंत उमरावतीला थांबलों. तेथें माझे परम मित्र ॲडव्होकेट नानासाहेब देव ह्यांचें त्या वेळीं वास्तव्य असे. महाविद्यालयीन

काळापासून नानासाहेब माझे मित्र होते. इंग्रजी भाषेवर त्यांचें त्या वेळेपासून प्रभुत्व असे. गडकऱ्यांची नि त्यांची मीं ओळख करून दिली. मी गडकऱ्यांना म्हणालों, " देव नांवाचे माझे एक मित्र आहेत. ते तुमच्या काव्याचे फार मोठे भक्त आहेत ! "

तेव्हां गडकरी हंसून म्हणाले, " स्वतः देव असून पुन्हां तो माझा भक्त आहे ? म्हणजे कमाल आहे ! "

वयाच्या पंचविसाव्या वर्षी नानासाहेब देव हे कोल्हापूरचे राजर्षि छत्रपति शाहू महाराज ह्यांचे कायद्याच्या बाबतींतले अत्यंत विश्वासू असे सल्लागार होते. त्यानंतर पुढें वकिली व्यवसाय करण्यासाठीं ते विदर्भांत आले. आणि त्यांनीं त्या प्रांतांत यशस्वी ॲडव्होकेट म्हणून फार मोठा नांवलौकिक मिळविला. त्यांना घेऊन आम्ही नागपूरला गेलों.

१७ एप्रिल १९४० रोजीं बरोबर सकाळीं अकरा वाजतां आम्हीं नागपूरचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट श्री. गुलाम मुस्ताफा ह्यांच्या कोर्टांत हजर झालों. ह्या खटल्याकडे नागपूरच्या अनेक लोकांचें लक्ष लागून राहिलें असल्यामुळें सुनावणीच्या पहिल्याच दिवशीं कोर्टांत पुष्कळच गर्दी जमून राहिली होती.

खटल्याच्या प्रत्येक तारखेला उपस्थित न रहाण्याची सवलत आपल्याला मिळावी म्हणून आमच्यातर्फे ॲड. देव ह्यांनीं कोर्टाला प्रथम एक अर्ज सादर केला, त्याला डॉ. खरे ह्यांचे वकील रावसाहेब फुले ह्यांनीं विरोध केला. ते म्हणाले, " डॉ. खरे ह्यांची बदनामी करणारा लेख बुद्धिपुरःसर लिहिला असल्याकारणानें आरोपींना कसलीच सवलत देऊं नये. " त्यावर आमचे वकील ॲड. देव म्हणाले, " येथें आपण केसच्या सत्यासत्यतेचा विचार करीत नसून सोयीचा विचार करीत आहांत ! "

तथापि कोर्टानें हजर रहाण्याच्या बाबतींत माफी मिळावी हा आमचा अर्ज धुडकावून लावला. तेव्हां डॉ. देव ह्यांनीं ताबडतोब हायकोर्टांत अपील करून प्रत्येक तारखेला उपस्थित न रहाण्याची सवलत आम्हांला मिळवून दिली.

त्यानंतर चारपांच दिवसांनीं पुढें एका दुपारीं मी सरळ डॉ. खरे ह्यांच्या घरीं आपण होऊन गेलों. त्या वेळीं ते झोंपले होते. पण माझी चिठ्ठी आंत जातांच ते एकदम जागे झाले आणि आश्चर्यचकित मुद्रेनें बाहेर आले.

" कोण ? अत्रे ! अन् तुम्ही माझ्या घरीं ? " अर्धवट हंसून त्यांनीं मला विचारलें.

" कां, तुमच्या घरीं आम्हीं येऊं नये कीं काय ! " मी हंसून उलट विचारलें.

" छे, छे! तसें मुळींच नाहीं. पण मीं तुमच्यावर फिर्याद केल्यानंतर तुम्ही आपण होऊन माझ्या घरीं याल अशी माझी मुळींच कल्पना नव्हती ! "

डॉ. खरे ह्यांनीं घरांतून माझ्याकरतां संत्र्याचा रस मागवला.

रसप्राशन करीत करींत मी म्हणालों, " अहो डॉक्टर, मीं आपलें सहज गमतीनें लिहिलें होतें तें ! त्यानें तुम्हांला एवढा राग येईल ह्याची मला कल्पना नव्हती ! "

तेव्हां डॉ. खरे हंसून म्हणाले, " अहो, विनोद हा माझा आवडता रस आहे. तुमच्याएवढाच मी त्या रसाचा भोक्ता आहें. पण तुमच्या या विनोदाच्या मागें कांहीं तरी राजकारण असावें असा मला संशय आला म्हणून मीं तुमच्यावर फिर्याद केली."

" तसा तुम्हांला संशय येण्याचें कारण ? " मीं विचारलें.

" तुमच्या 'नवयुग' पत्राचे संचालक हे जे चंदुलाल गांधी आहेत ते कोण आहेत ? "

" ते एक सोलापूरचे तरुण धनिक आहेत ! "

" महात्मा गांधींशीं त्यांचें कांहीं नातें आहे ? "

" छे, छे, मुळींच नाहीं ! " मी म्हणालों, " नुसत्या नामसादृश्यापलीकडे त्यांचा काडीमात्र संबंध नाहीं ! "

" असें म्हणतां ? मला वाटलें हा तुमचा चंदुलाल गांधी त्या महात्मा गांधीचा कोणी तरी नातेवाईक असावा, म्हणून त्यानें ही माझी खोडी काढलेली असावी ! म्हणून इतक्या तांतडीनें मीं ही तुमच्यावर फिर्याद केली ! " डॉ. खरे ह्यांनीं खुलासा केला.

त्यानंतर मग उभयतांचा समझोता व्हावयाला कांहींच अडचण उरली नाहीं. पुढल्या तारखेला आपापसांत तडजोड झाल्यामुळें खटला चालवण्याचें कारण उरलें नाहीं, असें डॉ. खरे ह्यांच्या वकिलांनीं कोर्टाला कळविलें नि हें चहाच्या प्याल्यांतलें वादळ सामोपचारानें मिटलें.

हें प्रकरण मिटतें न मिटतें तोंच दुसरी एक मारामारीची भानगड नागपुरांतच उपस्थित झाली. मी मागेंच सांगितलें कीं 'नवयुग'च्या पहिल्याच अंकांत 'कांचेच्या कपाटांतील सिंह' हा वीर सावरकरांची निर्भर्त्सना करणारा एक लेख रमाकांत वेलदे ह्यांनीं लिहिला होता. त्याच्यानंतर सावरकरांच्या विरुद्ध आणखीन दोन तीन लेख 'नवयुगां'त प्रसिद्ध झाले. अर्थात् ते लेख कांहीं मीं स्वतः लिहिले नव्हते; पण संपादक म्हणून त्या लेखांची सर्व जबाबदारी माझ्यावर होतीच. त्यामुळें सावरकर-भक्तांचा साहजिकच माझ्यावर रोष झाला.

सावरकरांवर प्रेम करणारा तरुण हिंदुत्वनिष्ठांचा एक कडवा गट त्या वेळीं नाग-पुरांत होता. मी नागपूरला आलेला पाहून 'नवयुगां'तील सावरकरविरोधी लिखाणा-बद्दल मला चांगलीच अद्दल घडवण्यासाठीं त्यांनीं एक कट रचला. असा कांहीं प्रयत्न त्या वेळीं माझ्याविरुद्ध चाललेला असावा ह्याची मला गंधवार्ता देखील नव्हती. त्यावेळीं मी नागपूरच्या 'एम्पायर हॉटेल'मध्यें उतरलों होतों. तथापि दुपारच्या जेवणा-साठीं मी गांवांत एका मित्राच्या घरीं जात असें. तेथें सावरकरनिष्ठांपैकींही कांहीं मंडळी येत असत.

फिर्यादीचें काम संपल्यामुळें केवळ 'नवयुग चित्रपट' कंपनीचे शेअर्स

खपविण्याचें कार्य मी करीत होतों. नागपूरच्या उन्हाळ्यामुळें माझ्या मोटर-ड्रायव्हरला उष्माघात झाला होता. म्हणून मीं त्याला मेयो हॉस्पिटलमध्यें ठेवलें होतें. त्यामुळें गाडी हांकण्याचें काम मीच करीत होतों. माझ्याबरोबर मला सोबत अशी कोणाचीच नव्हती. एकटाच होतों मी.

ज्यांच्या घरीं मी दुपारचा जेवायला जात होतों, त्यांच्या घरीं एक दिवस कांहीं मंडळी आली आणि 'मराठी रंगभूमि' या विषयावर 'नील सिटी हायस्कूल'मध्यें मीं व्याख्यान द्यावें अशी त्यांनीं मला विनंति केली. त्यांच्या हेतूचा मला सुतराम् संशय आला नाहीं. म्हणून मीं त्यांची विनंति एकदम मान्य केली. अध्यक्ष-स्थानीं नागपूरच्या 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'चे तरुण सदस्य मोहनराव शहाणे, एम्. ए. ह्यांची योजना माझ्याच संमतीनें करण्यांत आली.

'नील सिटी हायस्कूल'च्या बाहेरच्या मोकळ्या पटांगणांत हें व्याख्यान होतें. संध्याकाळचा साडेपांचचा सुमार होता. सभेला चार पांचशें लोक जमलेले होते. त्यांपैकीं एकहि माणूस माझ्या ओळखीचा नव्हता. सर्व मंडळी खालीं वाळूंतच बसली होती. व्याख्यानाला मीं नेहमींच्या विनोदी पद्धतीनें प्रारंभ केला. पण दहा पंधरा मिनिटें होऊन गेलीं तरी श्रोत्यांकडून अपेक्षित असा साद मला मिळेना. म्हणून मी स्वतःशींच अचंबा करूं लागलों, कीं ह्या साऱ्या मंडळींना झालें आहे तरी काय? कुठें हंशा नाहीं कीं कुठें टाळ्या नाहींत, कुठें हश नाहीं कीं हुश नाहीं. अगदीं स्मशानांत बसल्यासारखे सारे श्रोते अगदीं मख्खाप्रमाणें लांबोडे चेहरे करून माझें व्याख्यान ऐकत होते.

तीस चाळीस मिनिटेंपर्यंत श्रोत्यांना हसवण्यासाठीं मीं जंग जंग प्रयत्न केला. पण पालथ्या घागरीवर पाणी पडावें तशी माझ्या वक्तृत्वाची अवस्था झाली. व्याख्यान कुठेंच रंगेना. तेव्हां मग माझा मलाच बोलण्याचा कंटाळा आला आणि कसें तरी मीं व्याख्यान संपविलें. माझें व्याख्यान जसें संपत आलें तशी गर्दी वाढूं लागली. शेवटीं समारोपासाठीं अध्यक्ष बोलावयाला उठले. तोंच समोरच्या बाजूनें आमच्या अंगावर वाळू, दगड आणि जोडे ह्यांचा वर्षाव झाला. श्रोत्यांनीं आमच्या भोंवतीं गर्दी केली आणि आमच्या रोखानें रेटारेटी सुरू केली.

त्या आरडाओरडींत आणि गोंधळांत आपला मित्र कोण आणि शत्रु कोण ह्याचा बोध आम्हांला होणें कठीण होतें. अध्यक्ष शहाणे ह्यांच्याखेरीज मी कोणालाहि ओळखीत नव्हतों. एवढ्यांत आमच्या रक्षणासाठीं दहा बारा मंडळी धांवली नि त्यांनीं आमच्या भोंवतीं कडें करून आम्हांला शाळेच्या इमारतीमध्यें सुरक्षितपणें नेलें. त्यावरून ती मंडळी आमच्या बाजूची आहेत हें आम्हांला समजून आलें. आंतून दारें बंद करून आम्ही हेडमास्तरांच्या खोलींत बसलों होतों.

बाहेर कमींत कमी हजार माणसें तरी शाळेला वेढा घालून बसलीं होतीं. पुष्कळांच्या हातांत काठ्या होत्या. खिडक्या फोडून आंत शिरण्याचाहि त्यांनीं प्रयत्न

केला. पण तो कांहीं त्यांना जमला नाहीं. मधून मधून दगडफेक आणि अचकट विचकट घोषणा ह्यांचा बाहेरून मारा होत होता. आम्हीं आंतून पोलिसांना फोन करूं नये म्हणून बाहेरच्या टेलिफोनच्या ताराहि कापून टाकण्यांत आल्या होत्या.

सायंकाळच्या साडेसात वाजल्यापासून तों रात्रौ साडेदहा वाजेपर्यंत मी आणि शहाणे त्या शाळेंत कोंडून पडलों होतों. अखेर, बाहेरचे लोक कंटाळून निघून गेले. तेवढ्यांत आमच्या मदतीला शाळेमधलीं कांहीं मुलें आलीं. त्यांनीं आमच्या भोंवतीं सांखळी करून आम्हांला बाहेर काढलें. अगदीं शाळेसमोरच प्रिन्सिपल तात्याजी वझलवार रहात असत. त्यांच्या बंगल्यांत आम्ही गेलों.

ते आपल्या ओटीवर अगदीं शांतपणें बसलेले पाहून मी आश्चर्यचकितच झालों. तेव्हां मी चिडून त्यांना म्हणालों, " अहो, तुम्ही शाळेच्या इतके जवळ रहात असून तिकडे आमच्यावर केवढें प्राणांतिक संकट ओढवलें होतें, ह्याची तुम्हांस कल्पनादेखील असूं नये आणि तुम्ही आमच्या मदतीला धांवून येऊं नये याचें मला आश्चर्य वाटतें ! "

तात्याजी अगदीं निर्विकार चेहेरा करून म्हणाले, " मला कल्पनाहि नाहीं तिकडे काय चाललें आहे त्याची ! मला वाटलें तुमचें व्याख्यानच चाललें आहे अजून ! "

त्यांचें तें उत्तर ऐकून मी सर्दच झालों. अधिक कांहीं न बोलतां मी आणि शहाणे तडक तेथून बाहेर पडलों.

नशिब माझें कीं बाहेर माझी मोटर मीं ठेवली होती तिला अपाय करण्याचें कोणाहि दंगेखोराला सुचलें नाहीं. मोटरीला ड्रायव्हर नसल्यानें कोणालाहि ती बेशक जाळतां आली असती. आम्ही हॉटेलांत परत आलों तेव्हां साडेअकरा वाजून गेले होते.

वृत्तपत्राच्या संपादकाला नुसतें लोकप्रियतेचें ' तेल अन् तूप 'च मिळत नाहीं, तर त्याबरोबर जनताक्रोधाचा ' बडगा 'हि त्याच्या पाठींत बसतो, ही गोष्ट त्या वेळीं मला कळून आली. अप्रिय लेख लिहिल्याबद्दल लोक पत्रकारावर जाहीरपणें हल्ला करतात किंवा ' अब्रूनुकसानी 'च्या फौजदारी फिर्यादी करतात ह्याची तोंपर्यंत मला कल्पना नव्हती.

नागपूरला जाण्यापूर्वी मी नाशिकला एकदां मोटरीनें जात असतां वाटेंत माझ्या मोटरीला अपघात होऊन, मी त्यांत मरण पावलों, अशी एक सनसनाटी बातमी माझ्या कांहीं हितशत्रूंनीं उठवून चार पांच तास तरी पुण्यांत खूपच गोंधळ उडवून दिला. ' नवयुगा 'च्या कचेरींत सारखे टेलिफोन्स येऊं लागले. माझ्या घरासमोर मित्रांची नि हितचिंतकांची बरीचशी गर्दी जमली. त्या वेळीं माझ्या कुटुंबीय मंडळींची काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी.

अखेर सायंकाळीं नाशिक येथें कोणीतरी फोन केला, तेव्हां मी जिवंत असल्याचें त्यांना समजलें. या प्रसंगाला अनुसरून ' मी जिवंत आहें ' असें महाराष्ट्राला सांगण्यासाठीं त्या मथळ्याचा एक लेख मला ' नवयुगां 'त लिहावा लागला.

त्या लेखाचा समारोप मीं पुढीलप्रमाणें केला.

" माझ्या मरणामुळें जे माझे अनेक मित्र हळहळले, ज्यांनीं माझ्यासाठीं अश्रु-सिंचन केलें आणि ' चांगला मनुष्य गेला ' म्हणून एकदां तरी तोंडांतून उद्गार काढले, त्या सर्वांचा मी आभारी आहें. माझ्या मरणासाठीं टपलेल्या थोड्याशा मंडळींना मी जिवंत आहे हें वाचून मरणप्राय दुःख होईल, पण त्याला माझा नाइलाज आहे. पण माझ्या मृत्युपत्रांत त्यांच्यासाठीं मी कांहीं एक ठेवलेलें नाहीं, हें त्यांना समजलें म्हणजे त्यांना माझ्या मरणाबद्दल एवढी उत्कंठा वाटणार नाहीं ! "

४

# अत्रे-फडके वादाचा प्रारंभ

चोविसावें महाराष्ट्र साहित्य संमेलन रत्नागिरी येथें ४ मे १९४० रोजीं प्रा. नारायण सीताराम फडके ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. स्वागताध्यक्ष होते मामा वरेरकर आणि संमेलनाचें उद्‌घाटन केलें सावंतवाडीच्या महाराणीसाहेबांनीं. वस्तुतः, त्या संमेलनाचा मीच अध्यक्ष होणार होतों. कारण, साहित्य परिषदेनें त्या वर्षीं रत्नागिरीच्या स्वागत मंडळाकडे अध्यक्षपदासाठीं ज्या तीन नांवांची शिफारस केलेली होती, त्यांत माझें एक नांव होतें. बाकीचे दोघे प्रा. फडके आणि माडखोलकर हे होते. ह्या दोघांनींहि आपलीं नांवें ह्या ना त्या कारणासाठीं मागें घेतलीं होतीं. प्रा. फडके ह्यांनीं 'जबरदस्त वैयक्तिक दुःखाचा धक्का बसल्यामुळें' आपलें नांव मागें घेतलें होतें. अर्थात्, दोघांनीं आपलीं नांवें मागें घेतल्यामुळें साहजिकच रत्नागिरीच्या संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ माझ्याच गळ्यांत ओघानेंच पडणार होती.

पण पुढें गंमत अशी झाली कीं रत्नागिरी येथील स्वागत संमेलनाच्या कार्याध्यक्षांनीं आणि इतर कांहीं मंडळींनीं

फडके ह्यांना अतिशय आग्रह केल्यामुळें ‘ पवित्र साहित्यसेवेपुढें आपण आपलें वैयक्तिक दुःख कःपदार्थ समजतों ’ अशी घोषणा करून त्यांनीं आपलें नकारपत्र मागें घेतलें. त्यामुळें अध्यक्षपदीं प्रा. फडके ह्यांची रीतसर निवड झाली.

वस्तुतः एकदां एखाद्या नांवाचा राजीनामा साहित्य परिषदेकडे सादर केल्या नंतर परिषदेच्या परवानगीवांचून त्या नांवाचा विचार संमेलनाच्या स्वागत मंडळाला परस्पर करतां येणार नाहीं, हा कायदेशीर मुद्दा उपस्थित करून प्रा. फडके ह्यांच्या नांवाचा अध्यक्षपदासाठीं रत्नागिरीकरांनीं जो फेरविचार केला, त्याला त्या वेळीं मला हरकत घेतां आली असती. पण मी त्या भानगडींत पडलों नाहीं. कारण प्रा. फडके हे माझ्यापेक्षां वयानें ज्येष्ठ होते. मराठी साहित्याचीहि त्यांनीं माझ्यापेक्षां अधिक सेवा केलेली होती. आणि शिवाय, त्यावेळपर्यंत त्यांचे नि माझे संबंधहि प्रेमाचे नि स्नेहाचे होते. आणि ह्या ना त्या वर्षी केव्हां तरी मी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होणारच होतों. मला तरी अध्यक्ष होण्याची एवढी घाई कुठें होती ? म्हणूनच प्रा. फडक्यांच्या अध्यक्षीय निवणुडकीच्या वाटेला जाण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं.

तसें पाहिलें तर ‘ मराठी साहित्य संमेलना ’बद्दल प्रा. फडक्यांना काडीमात्र प्रेम नव्हतें. उभ्या आयुष्यांत कोणत्याहि साहित्य संमेलनाला ते हजर राहिले नव्हते. एवढेंच नव्हे तर कोल्हापुरांत भरलेल्या संमेलनप्रसंगीं कोल्हापुरांत हजर असूनहि त्या संमेलनाकडे ते नुसते फिरकले देखील नाहींत. कोठें तरी भाषण करतांना ‘ मला अध्यक्ष केल्याखेरीज मी साहित्य संमेलनाला हजर राहणार नाहीं ’ अशा तऱ्हेची आढ्यताखोर घोषणा त्यांनीं केली होती. म्हणून हा मनुष्य साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होतो आहे ना एकदांचा. मग होऊन जाऊं द्या, पुन्हा नको त्याची कटकट, अशा भावनेनें मी त्यांच्या अध्यक्षीय निवडणुकीकडे पाहिलें.

त्या वेळीं मी कोल्हापुरास ‘ लपंडाव ’ बोलपटाच्या निर्मितीच्या कामांत गुंतलेलों होतों. एप्रिल महिन्यांत माझा मुक्काम कोल्हापुरालाच होता. एक दिवस मी फडके ह्यांना आमच्या ‘ नवयुग ’ चित्रपटाच्या स्टूडिओंत बोलावलें. त्यांच्या गळ्यांत गळा घालून एकत्र फोटो काढला. घरीं बोलावून त्यांना आंबरसपुरीची मेजवानी दिली. एवढेंच नव्हे तर त्यांच्या सन्मानार्थ ‘ ५ मे १९४० रोजी ’ मी ‘ नवयुग ’चा खास अंक काढला. ह्याच अंकाच्या मलपृष्ठावर ‘ आमचे आप्पासाहेब ’ असा मथळा देऊन आमचा दोघांचा तो फोटो छापला.

ह्या अंकाचें वैशिष्ट्य म्हणजे फडके ह्यांच्या त्या वेळच्या शिष्या आणि नंतर त्यांच्या झालेल्या द्वितीय पत्नी कु. कमल दीक्षित ह्यांचा ‘ आप्पा मला कसे दिसतात ? ’ या मथळ्याचा एक खास लेख होय. महाविद्यालयांत जरी त्या वेळीं उभयतांचें नातें गुरुशिष्याचें होतें, तरी त्यांचें प्रणयाराधन त्या वेळीं चांगलेंच जोरांत आलें असलें पाहिजे, ही गोष्ट आतां तो लेख वाचला म्हणजे उघड उघड लक्षांत येते. कमलाबाईंच्या

त्या लेखांतले कांहीं उतारेच नमुन्यादाखल देतों.

" विद्यार्थ्यांत आपलेपणानें मिसळण्याची आप्पासाहेबांना भारी हौस. नाट्य, संगीत, क्रिकेट, टेनिस यांपैकीं एखाद्या गोष्टींत ज्यांनीं प्रावीण्य मिळवलें आहे, असे विद्यार्थी त्यांच्या विशेष मर्जींतले. त्यांच्याशीं ते खेळीमेळीनें वागून, त्यांचा व स्वतःचा उत्साह सतत ताजा ठेवतील. राजाराम कॉलेजची क्रिकेटची टीम घेऊन सामन्यासाटीं ते परगांवीं गेले कीं त्यांचें व त्यांच्या खेळाडू विद्यार्थ्यांचें परस्पर-प्रेम पाहून परगांवचे विद्यार्थी उद्‌गार काढतात, ' असे प्रोफेसर आम्हांला लाभले असते तर ! ' लॉजिकच्या वर्गांतहि आप्पासाहेब आपल्या अध्यापनशैलीनं आणि विनोदानं उत्साहमय खेळकर वातावरण सतत कायम ठेवतात. त्यांचा तास म्हणजे उत्कृष्ट इंग्रजी, गंमत, कोट्या, हास्य ह्यांची मेजवानी ! ते उंच व्यासपीठावरच्या खुर्चीवर असतात. विद्यार्थी–विद्यार्थिनी दूर डेस्कवर असतात; पण आप्पासाहेब हंसत बोलूं लागले कीं सर्वांना वाटतं मधलं अंतर तुटलं, आपले प्रोफेसर आपल्याला अगदीं निकटचे आहेत.

" अगदीं वेचक माणसांशीं जिव्हाळ्याची मैत्री ते करतील. अतिपरिचय ते कुणालाहि करूं द्यायचे नाहींत. निकामी गप्पा छाटायला त्यांच्याकडे यायची कुणाची छाती नाहीं. मात्र ते आपल्या प्रेमांतल्या माणसांत बसून बोलूं लागले, कीं विनोदी गोष्टी सांगून व नकला करून ते इतकं हंसवून सोडतात कीं विनोद हा त्यांच्या स्वभावांतला प्रधान गुण वाटूं लागतो. आप्पासाहेब अतिशय पटाईत नकलाकार आहेत ही गोष्ट फार थोड्यांना माहीत असेल. तल्ल्यारखानाची नक्कल तर ते कमालीची उठवून देतात. त्यांच्या वेळच्या फर्ग्यूसनमधल्या प्रोफेसरांच्या, नाटक कंपनींतल्या गमतीदार पात्रांच्या अथवा घरीं भेटायला आलेल्या चक्रम लोकांच्या नकला, त्यांचे आवाज काढून, त्यांच्यासारख्या विचित्र मुद्रा करून व हातवारे दाखवून आप्पासाहेब करूं लागले कीं हंसून हंसून माझी तर मुरकुंडी वळते. नक्कल संपली कीं तेहि खूप गदगदून हंसतात. अति हंसण्यानें पोट दुखूं लागलें कीं, ' अरे बाप रे मेलों ! ' असा त्यांचा ठराविक उद्‌गार आहे. तो मला पुनःपुन्हा ऐकावासा वाटतो. या असल्या कोट्यांना व हंसण्याला ऊत यावयाचा म्हणजे बहुधा आम्ही एकत्र जेवत असतांना. मग अशा हंसण्यापुढें मला जेवणहि सुचत नाहीं. आणि आप्पासाहेबांचेंहि जेवणाकडे लक्ष राहात नाहीं.

" त्यांना टॉयलेट अन् पोषाख आटपायला किती वेळ लागतो तें मला माहीत आहे. नुसत्या दाढीलाच त्यांना अर्धा तास पुरत नाहीं. आपल्या काळ्याभोर अन् किंचित् कुरळ्या केसांवरून ते पुनःपुन्हा ब्रश फिरवतील अन् अगदीं निघायच्या क्षणाला ते पुन्हां एकदां आरशांत डोकावतील. ते सभेच्या ठिकाणीं येऊन पोहोंचल्यावर जिकडे तिकडे प्रसन्न वातावरण निर्माण होतं यांत मग काय आश्चर्य ? आणखी कितीतरी गोष्टी ! आज पांच वर्षें झालीं. त्यांच्या सहवासांतल्या माझ्या प्रत्येक क्षणाची स्मृति त्यांच्या कोणत्या ना कोणत्या मधुर स्वभावविशेषानें भरली आहे. त्यांच्या नव-

नवोन्मेषा प्रतिभेप्रमाणेंच त्यांच्या स्वभावाची गोडी अवीट आहे. आप्पासाहेबांच्या ललित लेखनाचा आनंद हजारों स्त्रीपुरुष उपभोगतात. पण ज्यांना त्यांच्या प्रेमळ सहवासाचा लाभ झाला, त्यांचं भाग्य विशेषच म्हटलं पाहिजे.

" आप्पासाहेबांच्या व माझ्या ज्या परिचयाचं आतां निकट, निरंतर, स्निग्ध ऋणानुबंधांत रूपांतर झालं आहे, त्या परिचयाच्या प्रारंभाची आठवण काव्यमय आहे. त्या वेळीं मीं त्यांची विद्यार्थिनी होतें. संक्रांतीच्या दिवशीं मीं एक कविता रचली व त्यांना दिली. दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं कवितांत उत्तर दिलें. त्या कविता वाचून हर्षामुळें मला घेरीच आली. दुसऱ्या दिवशीं आप्पासाहेबांनीं मला म्हटलं, ' माझी कविता कांहींतरी होती नाहीं ? पण कवितेंतच उत्तर द्यायचं मीं कां ठरवलं सांगू ? तुझी कविता फार सुंदर होती. तेव्हां तिला उत्तर द्यायचं तें म्हटलं—' पुढचे त्यांचे शब्द मला धड ऐकूंहि आले नाहींत; इतका आनंद मला झाला. महाराष्ट्रांतल्या सर्वश्रेष्ठ कादंबरीकाराची शाबासकी मीं मिळविली होती.

" त्यांची माझी मैत्री जसजशी वाढत गेली तसतसा त्यांच्या स्वभावांतला हा सुंदर विशेष मला अधिकाधिक कळला. अन् त्यांच्या या गुणांचा माझ्या जीवितावर केवढा परिणाम झाला ! मला लेखन करतां येईल हें पूर्वीं मला कधीं खरं वाटलं नसतं. पण आप्पासाहेबांचा स्नेह झाला अन् मला नवीनच क्षितिज दिसूं लागलं. त्यांनीं मला कधीं स्वस्थ बसूं दिलं नाहीं. सतत उत्तेजन दिलं. दिशा दाखविली. त्यांच्या हाताखालीं मी लॉजिक शिकलें. पण तें शिकलेले इतर हजार विद्यार्थी–विद्यार्थिनी असतील. त्यांच्याकडून लेखनकलेच्या ज्या अध्यापनाचा लाभ मला झाला तें मात्र मीच एकटीन मिळविलं. याचा मला अमर्याद अभिमान कां वाटूं नये ? पण या अभिमानांत पुढची जबाबदारी मी विसरत नाहीं. आप्पासाहेब ती मला विसरूं देणार नाहींत. मला अजून आप्पासाहेबांपासून किती तरी शिकायचं आहे अन् कितीतरी लिहायचं आहे. "

प्रा. फडक्यांना उद्देशून कमला दीक्षित हिनें जाहीरपणें, लिहिलेलें हें एक अप्रत्यक्ष प्रेमपत्रच होय आणि तें माझ्या ' नवयुगां 'त मी छापावें हा सर्वांत विलक्षण योगायोग होय.

गंमतीची गोष्ट ही कीं, ह्याच अंकांत ' सोळा वर्षांपूर्वीचे प्रो. फडके ' हा श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचा जो लेख मीं छापलेला आहे, त्यांत त्यांनीं फडक्यांच्या कौटुंबिक वात्सल्याचें अत्यंत ' हृदयंगम ' चित्र रेखाटलेलें आहे. त्यांतला देखील एक उतारा देतों.

" त्यांच्या घरांत पाऊल ठेवतांच जें प्रेमळ दृश्य नजरेस पडे तें अर्थातच त्यांच्या अपत्यवात्सल्याचें. त्यांच्या बैठकीच्या जागींच मुलांचा धुडगूस दिवसभर चालू असावयाचा. एकीकडे मुलें खेळत आहेत. दंगामस्ती करीत आहेत किंवा खेळांत सामील होण्यासाठीं आप्पासाहेबांना सारखा त्रास देत आहेत आणि त्यांच्या त्या गलबल्यांतच

आप्पासाहेबांचें वाचन किंवा लेखन चालू आहे, अशा प्रकारचीं दृश्यें मीं अनेकदां बघितल्याचें आठवतें.

"गेल्या जानेवारींत मी कोल्हापुरास त्यांच्या घरीं गेलों असतां, आतां मोठ्या झालेल्या त्यांच्या मुलाशीं मीं त्यांचे जे संबंध पाहिले, तेहि मला अत्यंत मोकळेपणाचे वाटले. ते संततिनियमनाचे पुरस्कर्ते असूनहि त्यांना स्वतःला त्या मानानें बरींच मुलें आहेत. त्यावरून मीं त्यांची एकदां थट्टा केली असतां, ते मला म्हणाले, 'संतति-नियमन म्हणजे नियमानें संतति!' प्रो. फडके ह्यांचे स्वतःच्या मुलाशीं असलेले प्रेमळपणाचे संबंध हे त्यांच्या मनाचें तारुण्य अद्याप कायम असल्याचे निदर्शक आहेत."

रत्नागिरी संमेलनाचे प्रो. फडके अध्यक्ष झाले, म्हणून त्यांच्या सन्मानार्थ दुसऱ्या कोणत्याहि मराठी नियतकालिकांनीं खास अंक काढला नाहीं. तो फक्त मीं काढला, त्याचें जणु कांहीं प्रायश्चित्त प्रो. फडक्यांनीं मला दिलें. वस्तुतः प्रो. फडके हे एक मराठी भाषेंतील श्रेष्ठ कादंबरीकार आणि कथाकार. वृत्तपत्रांशीं त्यांचा कांहीं एक संबंध नाहीं. म्हणून त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत महाराष्ट्रांतील कथा नि कादंबरी वाङ्मयाबद्दल कांहीं तरी मूलगामी आणि रहस्योद्ग्राही चर्चा असेल अशी सर्वांची अपेक्षा होती. पण वाङ्मयीन विचारांकडे अजिबात पाठ फिरवून फडके ह्यांनीं आपलें सबंध अध्यक्षीय भाषण प्रचलित वृत्तपत्रांना अर्वाच्य शिवीगाळ देण्यामध्यें खर्च केलें आणि सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांच्या ह्या टीकेचा सारा रोख 'नवयुग'वर होता, हें शेवटीं त्यांना आपल्या समारोपाच्या भाषणांत कबूल करावें लागलें.

वस्तुतः महाराष्ट्रांत त्या वेळीं शें-दीडशें तरी वर्तमानपत्रें होतीं. आणि 'नवयुग' सुरू होऊन त्या वेळीं अवघे चारच महिने झाले होते. असें असतां 'नवयुग' हें एक ग्राम्य नि अश्लील पत्र आहे हें ठरविण्यासाठीं फडक्यांनीं आपल्या भाषणांतील दोन पानें खर्चीं टाकावींत ही आश्चर्याची गोष्ट होती. पण त्याहीपेक्षां ज्यांनीं तरुणींचीं स्तनें, गाल, नाभिकमळें ह्यांच्या तपशीलवार वर्णनामधें आपल्या कथा-कादंबऱ्यांचीं पानेंच्या पानें खर्चीं घातलीं, त्यांनीं 'नवयुग'सारख्या चार महिने उमरीच्या साप्ताहिकाला अश्लील वाङ्मय न लिहिण्याबद्दल आदेश द्यावयाचा म्हणजे एकाद्या जन्मजात वेश्येनें आपल्या मुलीला वा सुनेला पातिव्रत्याचा उपदेश करण्यासारखें होतें.

फडक्यांच्या अध्यक्षीय भाषणानें वृत्तपत्र-प्रतिनिधि खूपच खवळले. वृत्तपत्रांवर निष्कारण ताशेरे झाडल्याबद्दल अध्यक्षांना कांहींतरी धडा शिकवला पाहिजे म्हणून अनंत काणेकर आणि सुंदर मानकर ह्या दोन पत्रकारांनीं अध्यक्षांविरुद्ध एक निंदाव्यंजक ठरावसुद्धां आणला. तेव्हां आतां आपली फटफजिती होण्याचा प्रसंग येतो आहे, असें पाहून प्रो. फडक्यांनीं आपला मोहरा बदलून पत्रकारांची माफी मागितली आणि आपला रोख फक्त 'नवयुग'वर आणि 'नागरिक' (तटणीसांचें दैनिक) वर होता,

इतर पत्रें प्रामाणिक आहेत अशा तऱ्हेचा भोंदू बहाणा केला.

ज्या 'नवयुग'नें फडक्यांच्या गौरवासाठीं मुद्दाम खास अंक काढला, घरीं बोलावून मीं ज्यांचा अगत्यानें सत्कार केला, त्या माझ्या स्नेहभावाची अशी हिडिस हेटाळणी करून फडके ह्यांनीं उपकाराची फेड अपकारानें केली. सापाला दूध पाजलें तरी त्याचें विष होतें हेंच खरें.

फडक्यांच्या भिकार अध्यक्षीय भाषणानें रत्नागिरी संमेलन जितकें गाजलें, तितकेंच त्यांच्या अशिष्ट, उद्दाम आणि बेजबाबदार वर्तनानेंहि. त्यांनीं अध्यक्षीय आसनाची विटंबना केली. कमल दीक्षितला व्यासपीठावर एकसारखें आपल्या शेजारीं बसवून तिच्याशीं त्यांनीं जे शृंगारिक चाळे केले त्यांची प्रतिनिधींना अगदीं शिसारी आली. अध्यक्षांसाठीं रोजच्या होणाऱ्या खर्चाबरोबर कमलसाठीं लागणाऱ्या 'फुलांच्या वेण्यां'चाहि खर्च संमेलनाच्या स्वागत मंडळाला करावा लागला. एका बाजूला फडक्यांचे मित्र शंकरराव किर्लोस्कर नि दुसऱ्या बाजूला कमल दीक्षित ह्यांच्यामध्यें फडके बसलेले असत. त्यावरून कोणीतरी त्या वेळीं कोटीही केली कीं, 'किर्लोस्कर' आणि 'मनोहर' 'स्त्री' ह्यांच्यामधें फडके वावरत आहेत म्हणून. फडके नि कमल दीक्षित ह्यांची 'दोस्ती' हा रत्नागिरी साहित्य संमेलनामधला एक चर्चेचा विषय होता.

संमेलनामधील कोणत्याहि कार्यक्रमाला वेळेवर हजर न राहण्याचा फडक्यांनीं जणूं कांहीं विडाच उचलला होता. अनेकदां तर ते दोन दोन तास उशिरां येत. आणि हजार दीड हजार लोकांना आपल्यासाठीं तिष्ठत बसवीत. मुक्कामाच्या ठिकाणीं कमलशीं शृंगार-चेष्टा करीत बसल्यामुळें अध्यक्षांना सभेला येण्याची आठवणच रहात नाहीं असें प्रतिनिधि उघड उघड बोलत. प्रत्यक्ष सभा चालू असतांना कित्येकदां फडक्यांचें वर्तन अत्यंत चढेलपणाचें होई. त्यामुळें त्यांना श्रोत्यांची माफीहि मागावी लागत असे. सगळ्यांत लोकांना चीड आणण्यासारखें फडक्यांनीं जें वर्तन केलें, तें शोकपर ठरावाच्या वेळीं. हे ठराव आपल्या खुर्चीवर शांतपणें बसून फडक्यांनीं वाचले.

प्रा. फडक्यांनीं कारण नसतांना 'नवयुग'ची आगळीक केल्यानंतर मी काय डोळ्यांवर कातडें ओढून स्वस्थ बसणारा माणूस होतों ? मीं 'नवयुग'च्या पुढल्याच अंकांत 'प्रो. फडके म्हातारे झाले !' असा मथळा देऊन त्यांच्यावर टीकेची पहिली तोफ डागली.

त्यांतला कांहीं भाग येथें देतों :

"अखिल मराठी दुनिया प्रो. फडके ह्यांना कादंबरीकार ह्या नात्यानेंच बघते. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं जनतेनें कादंबरीकार फडके ह्यांनाच बसविलें होतें. पण प्रो. फडके ह्यांनीं अध्यक्षस्थानावरून जें भाषण केलें, तें मराठी वृत्तपत्राचे वाचक या नात्यानें. समारोपांत त्यांनीं खुलासा केला कीं माझा प्रत्यक्ष वृत्तपत्रांशीं संबंध नसला तरी मी एक वाचक तरी आहे किंवा नाहीं ? पण फडके हें विसरलेले

दिसताहेत कीं मराठी वृत्तपत्रांचा एक वाचक म्हणून त्यांना अध्यक्षस्थान दिलेलें नव्हतें. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून आजपर्यंत तेवीस भाषणें झालीं. पण इतकें गैरलागू आणि सामान्य भाषण आजपर्यंत एकाहि अध्यक्षानें केलें नसेल.

"आम्हांला वाटलें प्रा. फडके हे कादंबरी लेखनाबद्दल कांहीं तरी नवीन विचाराचें भांडार फोडतील. ज्या विशिष्ट लेखनाची प्रा. फडके ह्यांनीं इतकीं वर्षें तपश्चर्या केली, त्यांतील कांहीं तरी रहस्यें ते श्रोत्यांना समजावून सांगतील अशी आमची अपेक्षा होती. कादंबरीकार म्हणून आपली स्वतःची भूमिका काय आहे, आपल्यापुढें कोणतीं ध्येयें आहेत, तीं ध्येयें साध्य करण्यासाठीं आपण आजपर्यंत कोणत्या साधनांचा अवलंब करीत आलों इत्यादि मूलगामी गोष्टींची प्रा. फडके हे चर्चा करतील असें आम्हांला वाटलें होतें.

"किंवा आज प्रा. फडके यांच्या लेखनावर प्रतिगामी व सनातनी विचारांच्या लोकांचे जे आक्षेप आहेत—किंबहुना सर्वच ललित वाङ्मयावर त्यांचा सरसहा जो कटाक्ष आहे, कीं 'शृंगारिक गोष्टींच्या अतिरिक्त वर्णनानें प्रा. फडके ह्यांनीं सर्व तरुण पिढी बिघडवून टाकली आहे, प्रो. फडके ह्यांच्या कादंबऱ्या कामोत्तेजक अतएव अश्लील आणि अनीतिकारक आहेत' असा जो त्यांच्या विरोधकांचा त्यांच्यावर दावा आहे, त्याला प्रो. फडके ह्यांच्या भाषणांत कांहीं तरी ठणठणीत उत्तर मिळेल, अशा आशेनें आम्हीं तोंडें वासून या साहित्य-मेघाकडे बघत होतों. पण काय ? पर्जन्याच्या शीतल धारांऐवजीं चार धोंड्यांचाच वर्षाव झाला. मराठी वाचकांची नि श्रोत्यांची आजपर्यंत एवढी निराशा कधींच झाली नसेल. अरेरे, त्यांना कल्पना नव्हती कीं प्रो. फडके म्हातारे झाले !"

अशा रीतीनें अत्रे-फडके वादाला १९४० च्या मे महिन्यांत प्रथम तोंड लागलें.

## ५

## ' नवयुग चित्रपटां 'तून बाहेर

'लपंडाव' चित्रपट तयार होत असतांनाच 'नवयुग चित्रपट' कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीमधल्या आम्हां सहा भागीदारांमध्यें आपापसांत कुरबुरी सुरू झाल्या होत्या. कुरबुरींचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे 'लपंडाव' चित्रपटांत नायिकेची भूमिका मीनाक्षीला देण्यांत आली नाहीं आणि विनायकला त्याचें दिग्दर्शन मिळालें नाहीं हेंच. 'लपंडाव'मध्यें काम न करण्याची चिथावणी विनायकनें दामूअण्णा मालवणकरांना कशी दिली ती हकीकत मागेंच सांगितली. त्याखेरीज कंपनीच्या चित्रपट-निर्मितीचीं सर्व सूत्रें जीं बाबूराव पेंढारकरांच्या हातीं पहिल्यापासून होतीं, तीं त्यांच्या हातून काढून घेण्यांत येऊन आपल्याकडे सोपविण्यांत यावींत अशा तऱ्हेची एक ईर्ष्या विनायकाच्या मनांत एकाएकीं उत्पन्न झाली. त्या दृष्टीनें बाबूरावांच्या विरुद्ध कंपनीच्या डायरेक्टर-मंडळींचे कान रामभाऊ अभ्यंकर आणि बापूराव राजगुरु ह्यांच्या मदतीनें हळूहळू फुंकावयाला विनायकनें सुरुवात केली.

वस्तुतः, अभ्यंकर—राजगुरु हे माझे मित्र. मीं त्यांना कंपनींत आणलें. पण चित्रपटाच्या

मयासुरी सृष्टींत आल्यानंतर त्यांनाहि शिंगें फुटलीं. माझ्या नि बाबूराव पेंढारकरांच्या पुढें त्या दोघांची फारशी मात्रा चालत नसे. त्यामुळें आमची त्यांना अडचण वाटूं लागली. म्हणून आम्हां दोघांना कंपनींतून उडवून लावलें, तर विनायकाला हातीं धरून कंपनीचीं सारीं सूत्रें आपल्या मुठींत ठेवतां येतील अशी महत्त्वाकांक्षा त्या दोघांच्या अंतःकरणांत निर्माण झाली. सारांश ' लपंडाव ' चित्रपट जसा संपत आला, तशा आमच्या मॅनेजिंग एजन्सीमध्यें दोन फळ्या पडल्या. एका बाजूला मी नि बाबूराव पेंढारकर अन् दुसऱ्या बाजूला विनायक, राजगुरु नि अभ्यंकर. पांडुरंग नाईकाला कोठलीच बाजू नव्हती. तो उदासीन होता.

विनायकचा स्वभाव अत्यंत विचित्र होता. बाबूराव पेंढारकरांचा तो धाकटा भाऊ. पण बाबूरावांचें त्याच्यावर पोटच्या मुलाप्रमाणें प्रेम होतें. ' विनायकाला मी शांतारामापेक्षां मोठा करीन ! ' अशी त्यांची आयुष्यांतली महान् जिद्द होती. म्हणून त्याला घेऊन ते ' प्रभात 'मधून बाहेर पडले आणि त्यांनीं ' हंस पिक्चर्स ' ही कंपनी काढली. तिचाच समावेश नंतर ' नवयुग चित्रपटां 'त झाला. चित्रपट-व्यवसायांत विनायकचा नांवलौकिक कसा वाढेल ह्याची इकडे बाबूराव विवंचना करीत बसले होते, तर तिकडे ' नवयुग चित्रपट ' कंपनीचीं सूत्रें बाबूरावांच्या हातून कशीं हिसकावून घेतां येतील, ह्याच्या कारवाया विनायक करीत बसला होता. बाबूरावांबद्दल विनायकाला वाटणारी असूया आणि वैरभाव पुढें इतका विकोपाला गेला कीं ' बोर्ड ऑफ डायरेक्टरां 'च्या एका सभेंत विनायकानें आपल्या हातांतलें कांचेचें ' पेपरवेट ' बाबूरावांच्या रोखानें इतक्या जोरानें भिरकावलें, कीं जर तें त्यांच्या डोक्याला लागलें असतें तर त्यांचा तेथल्या तेथें कपाळमोक्ष झाला असता. पण थोडक्यांत चुकलें, म्हणून बाबूराव बचावले.

' नवयुग चित्रपटा 'च्या कथाविभागाचा मी प्रमुख होतों. माझ्या मान्यतेवांचून कोणतीहि चित्रकथा कंपनीनें स्वीकारावयाची नाहीं, अशी मूळची योजना होती. त्याप्रमाणें ' लपंडाव ' नंतर ' संत सखू ' हा भक्तिप्रधान चित्रपट घ्यावयाचें मीं ठरविलें आणि त्याप्रमाणें त्या कथेचे संपूर्ण संवाद मीं लिहून तयार केले. ह्या चित्रपटांतली मुख्य भूमिका मीनाक्षीला द्यावयाचें ठरलें होतें. आणि त्याचें दिग्दर्शन अर्थात्च विनायकाला देण्यांत येणार होतें. पण विनायकला ' संत सखू 'चें दिग्दर्शन करण्याची इच्छा नव्हती. एवढ्यांत ' प्रभात फिल्म कंपनी 'नें आपल्या आगामी चित्रपटासाठीं तोच विषय जाहीर केला. तेवढी सबब विनायकला पुरे झाली. ज्या अर्थीं ' प्रभात कंपनी 'नें ' संत सखू ' हा बोलपट घेण्याचें जाहीर केलेलें आहे, त्या अर्थीं आपण तो घेणें म्हणजे शांतारामसारख्या थोर दिग्दर्शकाचा आणि ' प्रभात 'सारख्या श्रेष्ठ कंपनीचा अपमान करण्यासारखें आहे, असें विनायकनें डोळ्यांत अश्रु आणून अत्यंत भावनाविव्हल स्वरांत ' बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ' ना सांगितलें.

त्यावर मीं आणि बाबूरावांनीं बोर्डाला पुष्कळ] समजावून सांगितलें कीं, "संत सखू हा विषय 'प्रभात कंपनी'च्या किती तरी आधीं आपण जाहीर केलेला असून, त्याचे संपूर्ण संवादसुद्धां लिहून आतां तयार झालेले आहेत. अशा परिस्थितींत ऐन वेळीं तो चित्रपट घेण्याचा बेत आपण रद्द करावयाचा ही गोष्ट आमच्या कंपनीच्या प्रतिष्ठेला शोभण्यासारखी नाहीं. आणि व्यवहाराच्या दृष्टीनें तर असें करणें आत्मघातकीपणाचें ठरणार आहे. कारण 'संत सखू' हा चित्रपट एका अत्यंत लोकप्रिय कथाभागावर आधारलेला असून, तो लोकांच्या धार्मिक भावनेला आवाहन करणारा आहे. म्हणून आर्थिक दृष्ट्या कंपनीला तो फारच फायदेशीर ठरल्यावांचून राहणार नाहीं. इथें शांतारामाच्या नि प्रभात कंपनीच्या मानापमानाचा मुळीं प्रश्नच निर्माण होत नाहीं."

'बोर्डा'ला आमचा युक्तिवाद पटला. पण 'संत सखू'चें दिग्दर्शन करण्यास विनायकनें साफ नकार दिल्यानंतर बोर्डानें तरी काय करायचें? तेव्हां 'संत सखू'चें दिग्दर्शन करावयास स्वतः बाबूराव पेंढारकर तयार झाले. पण मुहूर्ताच्या दिवशीं 'मेक-अप' करून 'सेट'वर यावयास मीनाक्षीनें नकार दिला. काय वाटेल तें करून 'संत सखू' चित्रपट होऊ द्यायचा नाहीं, असा विनायकानें आंतून मुळीं पक्का बंदोबस्तच करून ठेवला होता. त्यामुळें कंपनीच्या अंतर्गत व्यवस्थेमध्यें एक मोठा पेचप्रसंग निर्माण झाला.

'संत सखू' बोलपट घेण्याचें रहित केलें तर नवीन चित्रपटाची कथा लिहिण्यासाठीं वेळ लागेल अन् त्यामुळें कंपनीच्या कामाचा खोळंबा होईल, हा आक्षेप आमच्याकडून यावयाला नको, म्हणून 'अमृत' चित्रपटाची कथा विनायकांनीं श्री. वि. स. खांडेकरांकडून आधींच लिहवून तयार ठेवली होती. आणि तेवढ्यासाठीं त्यांनीं आपल्या अखत्यारांत ललिता पवार ह्या नटीला नेमून देखील टाकली होती. ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर मग 'बोर्डा'नें 'संत सखू' चित्रित करण्याचें रहित केलें आणि खांडेकरांनीं लिहिलेला 'अमृत' हा चित्रपट निर्माण करण्याचा सर्वाधिकार विनायकाकडे सोपविला.

कथाविभागाचा मी प्रमुख असतांना मीं लिहिलेली कथा रहित करून मीं न मान्य केलेल्या कथाभागावर चित्रपट निर्माण करण्याचा बोर्डानें ठराव करणें, हें केवळ माझ्या अधिकारावरील अतिक्रमण नसून, तें माझ्या प्रतिष्ठेला आणि स्वाभिमानाला उघड उघड आव्हानच होतें. माझ्यासारखा मानधन माणूस असली मानहानि कशी सहन करणार? शिवाय 'मॅनेजिंग एजन्सी'मध्यें विनायकचें आतां बहुमत झालेलें होतें! म्हणून मागला पुढला कसलाहि विचार न करतां 'मॅनेजिंग एजन्सी'मधील माझ्या जागेचा राजिनामा कंपनीच्या बोर्डाचे चेअरमन प्रा. वामनराव काळे ह्यांच्या टेबलावर ताडकन् फेकून देऊन मी कंपनीबाहेर पडलों.

माझ्या राजिनाम्याचें बाबूरावांना जसें कांहीं आश्चर्य वाटलें नाहीं, तसें त्यामुळें त्यांना फारसें दुःखहि वाटलेलें मला दिसलें नाहीं. असें कांहीं तरी होईल ही त्यांना आधींपासून कल्पना होतीच. वस्तुतः, मीच त्यांना 'नवयुग चित्रपट'मध्यें आणलें नि 'बोर्डा'चे चेअरमन केलें. कंपनीचा सारा डोलारा मींच उभा केला होता, हें त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेलें होतें. म्हणून कंपनी सोडून मीं जाऊं नये, एवढ्यासाठीं त्यांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाला हवी होती. पण तसें कांहीं त्यांनीं केलें नाहीं.

नाहीं म्हणावयाला औपचारिकपणें मला ते म्हणाले, "तुम्ही कंपनी सोडून जाऊं नका. तुम्ही सहा महिने स्वस्थ बसा. मग पाहूं यांतून कांहीं वाट निघते आहे का ती!"

त्यावर मी आवेशानें म्हणालों, "सहा महिने स्वस्थ बसा? काय, सांगतां काय तुम्ही हें? अहो, एक क्षणभर स्वस्थ बसणारा माणूस मी नाहीं. ही कंपनी जशी मी काढली तशा छपन्न कंपन्या मी आणखी काढीन!" असें म्हणून मी तावातावानें बाहेर पडलों.

कंपनीचे प्रमुख निर्माते बाबूराव पेंढारकर हे होते. त्यांचेही निर्मितीचे अधिकार काढून घेऊन विनायकाकडे सोपविण्यांत आले, हा वस्तुतः त्यांचा अपमानच होता. आणि म्हणून त्यांनींहि माझ्याप्रमाणें राजिनामा देऊन त्याच वेळीं बाहेर पडायला पाहिजे होतें. पण विनायकनें मोठ्या धूर्तपणें आपल्या नव्या चित्रपटांत बाबूरावांना एक महत्त्वाची भूमिका देऊन त्यांना अडकवून ठेवलें. म्हणून ते मागें राहिले. आणि मीच एकटा बाहेर पडलों.

ज्या कंपनीच्या नांवापासून आणि घटनेपासून मीं तिची निर्मिति केली, मोठमोठ्या धनिकांची मनधरणी करून कंपनीचे डायरेक्टर्स होण्याला मीं त्यांना प्रवृत्त केलें, साऱ्या महाराष्ट्रांत जातीनें संचार करून हजारों रुपयांचे शेअर्स मीं खपविले, आणि ठिकठिकाणीं जाहीर व्याख्यानें देऊन कंपनीला मीं पराकाष्ठेची प्रसिद्धि दिली, त्या कंपनीमधून अवघ्या सहा महिन्यांच्या आंत पहिल्यानें मलाच बाहेर पडावें लागलें, हा दैवाचा किती चमत्कारिक योगायोग?

ज्या 'कॅम्प एज्युकेशन सोसायटी'मध्यें आजन्म सेवक म्हणून सतत अठरा वर्षें मीं माझ्या सर्वस्वाचा होम करून ज्ञानदानाची प्रचंड साधना केली, त्या संस्थेच्या सेवेचें त्यागपत्र सुद्धां केवळ हें चित्रपटाचें अंगीकृत कार्य माझ्या हातून उत्तम रीतीनें व्हावें म्हणून मला द्यावें लागलें! ती घटना कशी घडली तें पहा.

'नवयुग चित्रपट' कंपनीचे शेअर्स खपविण्यासाठीं मला महाराष्ट्रांतून हिंडावयाचें होतें. म्हणून मीं शाळेंतून कांहीं महिन्यांसाठीं रजा घेतली होती. पुढें ती मला आणखी वाढवावयाची होती म्हणून तसा अर्ज मीं शाळेच्या 'मॅनेजिंग कमिटी'चे

चेअरमन रा. ब. डॉ. आर. के. नायडू ह्यांच्याकडे पाठविला. त्या वेळीं मी दक्षिण हैद्राबादला होतों. डॉ. नायडूंचे नि माझे संबंध विशेष प्रेमाचे नव्हते. सारे लोक आमच्या शाळेला 'अत्र्यांची शाळा' असें म्हणत. तें त्यांना आवडत नसे. कॅम्प एज्युकेशन सोसायटीचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं यावींत अशी त्यांची इच्छा होती. पण त्यांच्या मार्गांत मी मोठा अडथळा होतों. म्हणून मला शाळेंतून घालवावयाला त्यांना हा मोका आयताच मिळाला.

त्यांनीं मला तारेनें जबाब पाठवला कीं, 'अधिक रजा वाढवितां येणार नाहीं. ताबडतोब नोकरीवर रुजू व्हा !'

ती गोष्ट मला सर्वस्वी अशक्य होती. पुणें नगरपालिकेंत प्रवेश केल्यानंतर आणि 'नवयुग चित्रपट' कंपनी काढल्यानंतर आतां कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधील आपलें अध्यापकीय जीवन संपुष्टांत येण्याच्या मार्गाला लागलें आहे, हें मला त्याच वेळीं समजून चुकलें होतें. म्हणून सोसायटीचे चेअरमन डॉ. नायडू ह्यांनीं माझी रजा वाढवण्याला जेव्हां नकार दिला, तेव्हां अत्यंत व्यथित आणि विव्हळ अंतः-करणानें अठरा वर्षांच्या नोकरीचा तारेनें राजिनामा पाठवून माझ्या आवडत्या संस्थेच्या ऋणानुबंधांतून मी कायमचा मुक्त झालों. शाळेच्या मर्यादेंत राहून जेवढें म्हणून शैक्षणिक कार्य मला करतां येणें शक्य होतें, तेवढें मीं केलें असल्यानें, संस्था सोडतांना मला कितीहि दुःख वाटलें असलें, तरी मनाला कृतकृत्यतेचें एक प्रकारें विलक्षण समाधान वाटत होतें.

त्याचबरोबर पंचवीस लाख रुपये भांडवलाची आपण जी चित्रपट कंपनी काढली आहे, तिच्या निशाणाखालीं भारतांतले उत्तमोत्तम आणि आदर्श चित्रपट काढण्याचें आपलें ध्येय आज साकार करण्यासाठीं आपण अनायासें मुक्त झालों आहोंत, ह्या कल्पनेनें मनाला मनस्वी आनंद झाला होता. पण अवघ्या सहा महिन्यांच्या आंत माझें हें भव्य आणि विशाल स्वप्न एकऱ्या विनायकाच्या अविचारी आणि अदूरदर्शी स्वभावामुळें आणि स्वार्थी महत्त्वाकांक्षेमुळें कोलमडून पडलें आणि त्याचा चक्काचूर झाला.

'नवयुग चित्रपट' कंपनी ही सर्वस्वी माझी निर्मिति होती. आणि केवळ मी त्या कंपनींत होतों, म्हणून अनेकांनीं त्या कंपनीचे शेअर्स विकत घेतले होते. विनायक किंवा बाबूराव ह्या मंडळींना ह्या कंपनींत घेण्याचा पहिल्यानें माझा मुळींच विचार नव्हता. केवळ काकासाहेब लिमयांच्या आग्रहामुळें मी त्यांना घेतलें. एवढेंच नव्हे तर त्यांच्या 'हंस पिक्चर्स'च्या स्टुडिओ आणि सामान नवयुग कंपनीसाठीं विकत घेतांना वाजवीपेक्षां पुष्कळच जास्त म्हणजे अदमासें साठ हजार रुपये किंमत लावून मी त्यांचा आर्थिक फायदाच करून दिला.

त्या वेळीं कृतज्ञतेच्या भावनेनें ओथंबलेलें एक पत्रसुद्धां विनायकांनीं मला

लिहिलें होतें कीं, "कर्जाच्या गर्तेमधून तुम्हीं आम्हांला बाहेर काढलें. तुमचे उपकार आम्ही जन्मांत विसरणार नाही!" पण 'लिमिटेड कंपनी'मधील आर्थिक दृष्ट्या स्वास्थ्याचें आणि निश्चितीचें वातावरण पाहिल्यानंतर विनायकाच्या महत्त्वाकांक्षेला पंख फुटले नि पूर्वीच्या ऋणानुबंधांची साधी आठवण सुद्धां त्याला राहिली नाहीं.

मला सगळ्यांत वाईट हें वाटलें कीं, मीं जेव्हां मॅनेजिंग एजन्सीचा राजिनामा दिला तेव्हां 'तुम्ही राजिनामा देऊं नका, तुम्ही कंपनीमधून जाऊं नका!' असें एका अक्षरानें, एका शब्दानें, एका सुसकाऱ्यानें किंवा एका अश्रूच्या थेंबानें, विनायकानें मला विनविलें नाहीं. विनायक हा पडद्यावरचा फार मोठाच नट होता. पण त्यापेक्षांहि पडद्याच्या पाठीमागें तो जास्त प्रभावी नट होता. त्यामुळें त्याचें खरें स्वरूप त्याच्या उभ्या आयुष्यांत कोणाला समजलेंच नाहीं न त्याच्या भावांना, न त्याच्या मित्रांना, न त्याच्या परिचयांत आलेल्या अनेक भोळ्याभाबड्या मुलींना. त्याचे थोरले बंधु बाबूराव पेंढारकर हे पडद्यावर खलनायकाचीं कामें करीत असल्यामुळें बाबूरावांच्या रंगेल आणि मोकळ्या जीवनाचा वाजवीपेक्षां जास्त विपर्यास आणि बभ्रा करण्यांत आला. पण बाबूराव पडद्यावर जें करीत, तें विनायक पडद्यामागें करी, एवढें सांगितलें म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें.

विनायकानें पूर्व वयांत 'ब्रह्मचर्या'ची प्रतिज्ञा घेतली होती. विनायक हा थिऑसॉफिस्ट होता. तो एका काळीं विवेकानंदांसारखा पोशाख करीत असे. 'साने गुरुजी' तर त्याला मुखोद्गत असत. बोलतां बोलतां सत्रा वेळां त्याच्या डोळ्यांतून खळकन् पाणी गळे आणि त्याचा गळा गद्गदून येई. 'परस्त्री'ला त्यानें 'ताई' आणि 'माई'खेरीज कधीं संबोधलें नाहीं. आपल्या आईवर त्याचें विलक्षण प्रेम. यशवंतांच्या 'आई'चें नुसतें पहिलें कडवें ऐकलें, कीं त्यानें ओक्साबोक्शी रडावयाला सुरुवात केलीच म्हणून समजा! भारतीय संस्कृतीमधल्या साऱ्या मांगल्याची नि साऱ्या पावित्र्याची मुंडावळच जणुं कांहीं चोवीस तास विनायकानें आपल्या कपाळाला बांधून ठेवली होती. सारांश, 'बुवा' होण्यास लागणारें अभिनयाचें नि वर्तनाचें सर्व कांहीं भांडवल विनायकाजवळ जय्यत तयार होतें.

माझ्या 'धर्मवीर' बोलपटाचें चित्रण जेव्हां मुंबईला ताडदेवच्या स्टुडिओंत चालू होतें, त्या वेळीं त्या चित्रामधल्या 'नायिके'शीं 'नायक' विनायकाचें पडद्यामागलें प्रणयाराधन सुरू होतें. आणि त्याच सुमारास दादरमध्यें रहाणाऱ्या एका तरुणीला लग्नाचें वचन देऊन तिच्याशीं त्यानें विवाहपूर्व संबंध ठेवले होते. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. त्या तरुणीला कांहीं दिवस गेले आणि चित्रपटाच्या नायिकेशीं विनायकाचें वितुष्ट आलें. तरी देखील विशेष कांहीं बिघडलें नव्हतें. विनायकानें लग्न केलें असतें म्हणजे सगळें सरळ झालें असतें.

पण विनायक म्हणाला, "मी त्या मुलीशीं संसार करीन. पण लग्न करणार

नाहीं. लग्न ह्या संस्थेवर माझा विश्वास नाहीं!" मी त्याला म्हणालों, "लग्न या संस्थेवर तुझा विश्वास नसेल, पण जगाचा आहे ना? आणि ह्याच जगांत तुला जन्मभर रहावयाचें आहे!" शेवटीं मोठ्या कष्टानें मीं लग्नाला त्याला प्रवृत्त केलें.

त्याला नि त्या मुलीला मीं पुण्याला नेलें. तेथें पौरोहित्य करण्यासाठीं बरोबर यशवंतराव दात्यांना घेतलें. आणि माझ्या मोटरींत सर्वांना घालून सासवडला गेलों नि तेथें वटेश्वराच्या देवळांत त्यांचें यथासांग नि विधिपूर्वक लग्न लावलें. मुलीचें कन्यादान मीं आणि माझ्या पत्नीनें केलें. सासवडच्या गांवकऱ्यांना वाटलें कीं कोठल्या तरी चित्रपटांतल्या दृश्याचें तें चित्रण आहे.

शांतारामाच्या कंपनींत विनायक राहिला असता, तर त्याला जास्तींत जास्त 'शकुंतला' चित्रपटांतील दाढीवाल्या कण्वाची भूमिका मिळाली असती. पण विनोदी चित्रपटाचा नायक म्हणून विनायकाला चित्रव्यवसायांत मीं सुप्रतिष्ठित केलें आणि त्याला पराकाष्ठेची लोकप्रियता मिळवून दिली. त्याचा वैवाहिक संसार आतांच सांगितल्याप्रमाणें मी जबरदस्तीनें उभा केला. चित्रव्यवसायांत त्याच्या गुणांचा नि कर्तृत्वाचा विकास व्हावा म्हणून मीं त्याला 'नवयुग चित्रपटां'त घेतला. आणि एवढें करून त्यानें, माझा केंसानें गळा तर कापलाच, पण 'नवयुग चित्रपट' कंपनीचें कल्पनातीत नुकसान केलें.

कारण मी गेल्यानंतर कांहीं महिन्यांनीं बाबूराव पेंढारकरांनीं ती कंपनी सोडली. आणि पुढें खुद्द विनायकाची त्या कंपनींतून हकालपट्टी झाली आणि सरतेशेवटीं उरले कोण तर बापूराव राजगुरु, जे सगळ्या भांडणाचे 'कळीचे नारद' होते. त्यांनीं कंपनीचें दिवाळें वाजवून सूप फुंकलें. अशा रीतीनें महाराष्ट्रांत—नव्हे भारतांत निघालेल्या पहिल्याच 'लिमिटेड' चित्रपट कंपनीची वाताहात झाली. आणि त्याला मूळ कारण कोण म्हणाल तर विनायक. एवढें असूनहि विनायकच्या अंतकाळीं त्याच्या भावांनीं सुद्धां त्याची जी सेवा केली नाहीं ती मीं केली! पण ती हकीगत यथाकाल मी पुढें सांगेनच.

आतां 'नवयुग चित्रपट' कंपनीसंबंधींचा एकच प्रसंग सांगून मी हें प्रकरण संपवतों. मी कंपनी सोडण्यास विनायक हा जरी प्रत्यक्ष कारणीभूत झाला असला, तरी त्याच्या पाठीमागें कंपनीचे चेअरमन प्रा. वामनराव काळे यांचा हात निश्चितपणें होता हें मला माहीत होतें. वस्तुतः, त्यांना कंपनींत मीं आणलें. शेअर्सचे पैसे त्यांनीं भरले नसूनहि त्यांना आम्हीं डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन नेमलें. माझ्या नि विनायकच्या भांडणामुळें कंपनीच्या कारभाराचे सर्वाधिकारी ते झाले. त्याबद्दल त्यांना मासिक सातशें रुपये वेतनहि देण्यांत आलें. अशा रीतीनें कंपनीची चेअरमनशिप त्यांना चांगली फायद्यांत पडली. त्यांच्या त्या पक्षपाती वर्तनामुळें त्यांच्यावर माझा राग होता.

वर्षाअखेर जेव्हां कंपनीची वार्षिक सभा भरली, त्या वेळीं मी त्या सभेला मुद्दाम हजर राहिलों. कंपनी सोडली तरी कंपनीचा मी भागीदार होतोंच. अध्यक्षस्थानीं प्रा. वा. गो. काळे होते. सभेच्या प्रारंभीं कंपनीचा अहवाल राजगुरूंनीं वाचला. त्याला पाठिंबा देण्यासाठीं कंपनीच्या चित्रपटाचे वितरक बी. पी. सामंत हे उभे राहिले.

त्याबरोबर मी एकदम उभा राहिलों नि म्हणालों, " कंपनीचा वार्षिक अहवाल मंजूर होण्यापूर्वी ही सभा कायदेशीर आहे कीं नाहीं यासंबंधीं मूलभूत प्रश्न मला विचारावयाचा आहे. "

अध्यक्षांसह सर्व सभासद सर्दच झाले. मला काय म्हणायचें होतें त्याचा बोध त्यांना होईना.

" अध्यक्ष महाराज, " मी पुढें म्हणालों, " आम्हीं जेव्हां आपणाला कंपनीचे डायरेक्टर केले, तेव्हां आपण शेअर्सचे पैसे दिले नव्हते. तसा आपला रिवाज नाहीं, असें आपण मला सांगितलें होतें. (त्याबरोबर अध्यक्षांना घाम फुटला) आतां मला एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे, कीं मीं कंपनींतून गेल्यानंतर तरी आपण ते शेअर्सचे पैसे भरले आहेत कीं नाहींत? भरले असल्यास ठीक आहे. नसले भरल्यास आपल्याला ह्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारतां येणार नाहीं ! "

अध्यक्षांच्या डोक्यावर अक्षरशः बॉंबगोळा पडला. शेअर्सचें पावतीपुस्तक शोधण्यासाठीं राजगुरु-अभ्यंकरांची धांवपळ सुरू झाली. पण नुसती धांवपळ सुरू होऊन काय उपयोग? अध्यक्षांनीं शेअर्सचे पैसेच भरले नाहींत तर त्यांच्या पावत्या कुठून मिळणार?

अध्यक्षांच्या चेहऱ्याकडे बाकीचे डायरेक्टर्स टकाटका पाहूं लागले. त्यांना मनांत वाटलें असेल कीं, आपण शेअर्स विकत घेऊन डायरेक्टर झालों नि हा गृहस्थ मात्र फुकटांतच चेअरमन झाला! अध्यक्षांना 'दे माय धरणी ठाय' असें होऊन गेलें.

ते मुकाट्यानें आपल्या खुर्चीवरून उठले नि त्यांनीं आपल्या डायरेक्टर-शिपचा तेथल्या तेथें राजिनामा देऊन टाकला!

आणि मीहि कृतार्थ होत्साता त्या सभेतून जो बाहेर पडलों तो पुन्हां 'नवयुग चित्रपट' कंपनीचें तोंड पाहिलें नाहीं !

## ६

## ' पंधरा हरामखोर '

ज्या कँप एज्युकेशन सोसायटीचा मी सत्रा-अठरा वर्षें आजन्म सेवक होतों तिच्या सेवेंतून आणि जी पंचवीस लाख रुपये भांडवलाची ' नवयुग चित्रपट लि. ' ही कंपनी मीं काढली होती तिच्या व्यवस्थापक मंडळांतून त्यागपत्र देऊन मी बाहेर पडल्यानंतर, पुणें शहरांतील माझ्या तीस वर्षांच्या वास्तव्याचा आधारस्तंभच जवळ जवळ कोलमडून पडला असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यानंतर उदरनिर्वाहाचा उद्योग असा पुण्यामध्यें मला उरला नाहीं.

१९३९ च्या नोव्हेंबरअखेर पुणें म्युनिसिपालिटीमधील माझ्या 'स्टॅण्डिंग कमिटी'च्या चेअरमनपदाच्या कारकीर्दीचें एक वर्ष समाप्त झालें. पहिल्या वर्षी म्युनिसिपालिटीचें अध्यक्षपद देव–गाडगीळ ह्यांच्या जातीयवादी धोरणामुळें मला मिळूं शकलें नाहीं. तर दुसऱ्या वर्षी काँग्रेसमधल्या व्यापारी हितसंबंधांचें समाधान करण्यासाठीं म्हणून त्यांनीं अध्यक्षपदाची माळ सहा महिन्यांसाठीं म्हणून पोपटलाल शहा ह्यांच्या गळ्यांत घातली आणि माझ्या तोंडाला चक्क पानें पुसलीं. मग मींहि त्यापुढें पुणें नगरपालिकेचा अध्यक्ष होण्याची आशा

सोडूनच दिली. माझ्यानंतर चेअरमनच्या जागेवर श्री. गिरमे ह्यांची नेमणूक झाली. यामुळें माझ्या हातांत अधिकाराची अशी कोणतीहि जागा राहिली नाहीं. मी नगर-पालिकेंतील कॉंग्रेस पक्षाचा नुसता नेता म्हणूनच उरलों. हें सांगायचें कारण म्हणजे पुणें म्युनिसिपालिटींतहि माझ्या दैनंदिन उपस्थितीची त्यानंतर फारशी आवश्यकता राहिली नाहीं.

कांहीं दिवस एखाद्या त्रिशंकूसारखा मी अधांतरीं लोंबकळतच राहिलों. शाळा नाहीं. चित्रपट नाहीं. म्युनिसिपालिटी नाहीं. त्यामुळें माझ्या जीवनांत एक मोठी पोकळीच निर्माण झाली. वर्षानुवर्षं अहोरात्र काम करणारा मी मनुष्य. एकदम बेकार झालों. त्यामुळें वेड लागायची पाळी आली. एक आठवडाभर मी घरांत नुसता बसून होतों. कांहीं वाचीत नव्हतों. कांहीं लिहीत नव्हतों. कुठें जात नव्हतों कीं कोणाला भेटत नव्हतों.

एवढ्यांत एक दिवस मुंबईचे हरिभाऊ मोटे माझ्याकडे आले. 'विभावरी शिरूरकर'चे प्रकाशक म्हणून ते माझ्या परिचयाचे होते. शिवाय ज्या 'टकीच्या लग्ना'चे संवाद मीं पूर्वी लिहिले होते, त्या सांगलीच्या 'भट–वेडेकर प्रॉडक्शन्स'चे ते आर्थिक सूत्रधार होते. त्या कंपनीच्या भानगडींत त्यांना चांगलाच तडाखा बसल्या-मुळें ते पुष्कळच डबघाईला आलेले होते.

चित्रपटाच्या धंद्यांत बुडालेले पैसे चित्रपटाचा धंदा करूनच परत मिळूं शकतात, असा त्या व्यवसायांतला एक चमत्कारिक ठोकताळा आहे. त्या न्यायानें सांगलीची चित्रपट कंपनी बंद करून हरिभाऊंनीं मुंबईत 'आशा पिक्चर्स' ह्या सार्थ नांवाची स्वतःच्या मालकीची संस्था स्थापन केली होती. आणि तिच्यासाठीं पहिला चित्रपट मीं लिहावा अशी त्यांची इच्छा होती.

मीहि मोकळाच होतों. हरिभाऊंकडून सुरुवातीलाच पैसे मिळण्याची कांहीं आशा नव्हती. उलट मींच त्यांना कांहीं दिले असते, तर ते त्यांना हवे होते. पण मी मनांत विचार केला कीं पैसे नाहींत तर नाहींत; निदान कांहीं काम तर मिळालें. त्याप्रमाणें एक दिवस मी त्यांच्याबरोबर मुंबईला गेलों. त्यांच्याकडेच राहिलों आणि माझ्या 'पराचा कावळा' ह्या नाटकावर आधारलेली 'घरजांवई' ही चित्रकथा सात आठ दिवसांच्या आंत संवादांसह पूर्ण करून त्यांच्या स्वाधीन केली.

हरिभाऊंच्याकडे रहात असतांना मुंबईमधल्या चित्रपट-निर्मितीच्या व्यवसायाची कांहीं जुजबी माहिती आपोआपच झाली. त्या वेळीं मनांत प्रथम कल्पना आली कीं, 'आपणहि हरिभाऊंप्रमाणें मुंबईमध्यें स्वतःच्या मालकीची चित्रपट कंपनी कां काढूं नये?' नुसती कल्पनाच मनांत चमकून गेली. तिचा जास्त विचार करण्याच्या भानगडीमध्यें मी पडलों नाहीं.

चित्रपट कंपनी काढायची खरी? पण तिला लागणारें भांडवल कोठून आणा-

वयाचें ? ‘ नवयुग चित्रपट ’ कंपनीच्या वेळीं मला त्या गोष्टीची चांगलीच कल्पना आली होती. लाख दीड लाख रुपयांचे शेअर्स खपवितांना माझा जीव अगदीं मेटाकुटीस आला होता. आतां लिमिटेड कंपनी काढण्याचा मुळीं प्रश्नच नव्हता. त्या कामीं माझे हात चांगलेच पोळले होते. काढलीच चित्रपट कंपनी तर ती कोणाशींहि भागीदारी न करतां स्वतःच्याच मालकीची काढावयाची, अशी मीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेविली होती.

माझ्या स्वतःजवळ तर कवडीहि नव्हती. ‘ नवयुग चित्रपट ’ कंपनीकडून माझ्या दोन चित्रपट-कथांचे अणि मॅनेजिंग एजन्सीच्या मासिक कमिशनचे असे सात हजार रुपये येणें होते. त्या सात हजारांनीं काय कात होणार ? पुण्यांत एक श्रीमंत सेवानिवृत्त न्यायाधीश होते. ते सावकारी करीत असत. त्यांच्या मुली माझ्या विद्यार्थिनी होत्या. त्यामुळें ते मला चांगले ओळखत होते.

एक दिवस सकाळीं मी त्यांच्या घरीं गेलों. माझ्या येण्याचें कारण मीं त्यांना सांगितलें.

“ किती रुपयांची गरज आहे तुम्हांला ? ” त्यांनीं विचारलें.

“ अदमासें पन्नास हजार रुपयांची ! ” पन्नास हजार रुपये म्हणजे जणुं कांहीं पांच रुपये अशा सरळ आणि निष्काळजी स्वरांत मी उत्तरलों.

“ किती दिवसांसाठीं ? ”

“ अवघ्या सहा महिन्यांसाठीं ! ” मी हंसत हंसत म्हणालों. माझा हिशेब अगदीं सोपा होता. चार महिन्यांत ‘ पिक्चर ’ पुरें झालें कीं तें दीड दोन लाखांना विकून टाकायचें नि सावकाराचें कर्ज त्याच्या तोंडावर फेंकून द्यायचें.

“ अन् ह्या पैशांना तारण ? ” रावसाहेबांनीं गंभीर मुद्रेनें प्रश्न विचारला.

‘ तारण ’ हा शब्द कानांवर पडतांच एखाद्या बुडणाऱ्या माणसाप्रमाणें नाका-तोंडांत पाणी गेल्यासारखी माझी अवस्था झाली.

“ त–त–तारण ! म–म्हणजे ? ” मी असहाय्यपणें विचारलें.

“ म्हणजे, कशाच्या आधारावर तुम्ही हें कर्ज मागताहांत ! ” कोर्टामधल्या एखाद्या साक्षीदाराला विचारावें तशा खणखणीत आवाजानें रावसाहेबांनीं मला विचारलें, “ तुमच्याजवळ काय आहे ? घर–”

“ ना-हीं ! ” मी भाड्याच्या घरांत रहातों आहें ह्या जाणीवेचा त्याच वेळीं प्रथम माझ्या जिवाला चिमटा बसला.

“ शेतवाडी ? ” रावसाहेबांनीं अधिक खोचून विचारलें.

“ नाहीं ! ”

“ दागदागिने ? ”

“ नाहींत ! ”

“मग आहे काय तुमच्याजवळ ?” रावसाहेबांच्या खंवचटपणांत आतां तुच्छतेची अधिक भर पडली. “नुसती कीर्ती ! कीर्तीला काय किंमत आहे ?”

एका वाक्यांत रावसाहेबांनीं माझा अर्ज ‘डिस्मिस्’ करून टाकला.

कीर्तीला काय किंमत आहे ? खरंच, कीर्तीला काय किंमत आहे ! वक्ता, लेखक, कवि, नाटककार, चित्रपट-कथालेखक म्हणून जगांत मीं वाटेल तेवढी कीर्ति मिळविली असली, तरी सावकारीच्या दारीं त्या माझ्या कीर्तीला कवडीचीहि किंमत नव्हती, हें व्यवहारी जगांतलें भयानक सत्य त्या दिवशीं मला प्रथम समजलें.

एक अक्षर न बोलतां मान खालीं घालून मी रावसाहेबांच्या घरांतून मुकाट्यानें बाहेर पडलों. रस्त्यावर आल्यानंतर आणि कांहीं वेळानें डोकें थंड झाल्यानंतर मनांतल्या मनांत मी रावसाहेबांचे आभार मानले. व्यवहारी जगांत माझें नेमकें स्थान कोणतें आहे, हें त्यांनीं मला अगदीं उघड्यानागड्या शब्दांत दाखवून दिलें. त्यामुळें माझ्या डोक्यांत अनेक वर्षें सांचून राहिलेली ‘वाफ’ पुष्कळशी कमी झाली.

ह्याच सुमारास पुणें म्युनिसिपालिटींत अशी एक घटना अकस्मात् घडली कीं, जिच्यामुळें आमचा म्युनिसिपल कॉंग्रेस पक्ष एकदम संपुष्टांत आला आणि माझ्या डोक्यावरची नेतृत्वाची उरली सुरली टोपी वरचेवर उडून गेली अन् मी अक्षरशः बोडखा पडलों.

मे १९४० अखेर पोपटलाल शहा ह्यांची अध्यक्षपदाची मुदत संपली. तेव्हां त्यांनीं राजिनामा देऊन बाजूला व्हायचें नि त्यांच्या जागीं दुसरा कोणी तरी अध्यक्ष व्हावयाचा हें पूर्वीच ठरलें होतें. पण पोपटलालजींच्या नंतर अध्यक्ष कोणाला करावयाचें ह्याचा वाद निर्माण झाला. बहुसंख्य सदस्यांचें म्हणणें रघुनाथराव वाळवेकरांना करावें असें होतें. आणि देव–गाडगीळ ह्यांची आचार्य लिमये ह्यांना अध्यक्ष करावें अशी इच्छा होती. ह्या भांडणांत पोपटलालजींचें फावलें. त्यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजिनामा देण्याची अळंटळं सुरू केली. त्यांचें म्हणणें असें कीं, “नव्या अध्यक्षाच्या निवडीबाबत पक्षांत निष्कारण भांडण-तंटे होऊं देण्यापेक्षां मलाच अध्यक्षपदावर आहे तसे आणखी सहा महिने राहूं द्या !”

रघुनाथराव वाळवेकरांचा धंदा शर्यतींच्या जुगाराचें ‘बेटिंग’ घेणें हा होता. त्या बाबतींत त्यांना मद्रास येथें चार का सहा महिन्यांची पूर्वीं शिक्षा झाली होती. एऱ्हवीं मनुष्य मनानें उदार नि हातानें सढळ होता. आमच्या कॉंग्रेस पक्षामध्यें एकंदर चौतीस सभासद होते. त्यांपैकीं चौदा सदस्यांची यथास्थित सरबराई करून त्यांना रघुनाथरावांनीं आपले अंकित करून टाकले होते.

४ जुलै १९४० ची गोष्ट. विश्रामबाग वाड्यांत आमची सर्वसाधारण सभा चाललेली होती. कॉंग्रेस पक्षाच्या कोणत्या तरी एका ठरावावर अध्यक्षांनीं मतदान

मागितलें. त्याबरोबर आमच्या पक्षांतले रघुनाथराव वाळवेकर नि त्यांचे चौदा साथीदार अशा पंधरा सदस्यांनीं कोणाच्याहि ध्यानींमनीं नसतां ठरावाच्या विरुद्ध मतदान केलें आणि विरोधी पक्षाच्या टाळ्यांच्या कडकडाटांत ते आमच्या डोळ्यांसमोर आमची बाजू सोडून समोरच्या बाजूला जाऊन मिळाले.

एखाद्या नाटकामधल्या 'ट्रॅन्स्फर सीन 'सारखा हा सारा प्रकार एका निमिषार्धांत घडून आला. आमच्या डोळ्यांवर आमचा विश्वास बसेना. आमच्या विरोधकांच्या हर्षाला नि आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्यांनीं टाळ्यांच्या कडकडाटानें अन् पदाघाताच्या खडखडाटांनीं सारें सभागृह डोक्यावर घेतलें. कित्येकांनीं तर वाळवे-करांच्या नांवानें जयजयकाराच्या आरोळ्या ठोकल्या. पोस्टाच्या पेटीसारखीं तोंडें उघडून आम्हीं निर्जीव डोळ्यांनीं आणि थिजलेल्या बुबुळांनीं समोर चाललेला एकंदर सारा प्रकार पहात बसलों होतों.

त्यानंतर सभेचें काम पुढें चालणें शक्यच नव्हतें. दीड वर्ष पुणें म्युनिसिपालिटींत सत्तारूढ असलेला आमचा काँग्रेस पक्ष एका क्षणांत सत्ताभ्रष्ट झाला. विरोधी पक्षाचें संख्याबळ एकेचाळीस झालें आणि आमची संख्या चौतिसावरून एकदम एकोणिसावर घसरली. राजकारणाच्या क्षेत्रामधल्या संधिसाधु माणसांच्या हलकटपणाचा तो हिडिस नमुना पाहून मला जसें अनावर दुःख झालें, तशीच संतापानें माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली. डबडबलेल्या डोळ्यांनीं फणफणत तसाच मी माझ्या 'नवयुग 'च्या कचेरींत गेलों आणि 'काँग्रेस पक्षांतले पंधरा हरामखोर ' या मथळ्याचा एक अत्यंत झणझणीत आणि जळजळीत लेख ताशी ऐंशी मैल धांवणाऱ्या आगगाडीच्या वेगानें लिहून तो ७ जुलै १९४० च्या 'नवयुग 'च्या अंकांत प्रसिद्ध केला.

ह्या लेखानें पुण्यांत हलकल्लोळ उडाला. कारण काँग्रेस पक्षांतून फुटलेल्या पंधरा 'हरामखोरां 'च्या भयानक आयुष्यांवर मीं जो माझ्या त्या लेखांत प्रकाश टाकला होता तो वाचून पुणेंकर हादरून गेले. आणि म्हणूं लागले, कीं असे जर हे लोक होते तर त्यांना काँग्रेसनें मुळीं तिकिटेंच दिलीं कशीं ? सारे लोक देव-गाडगीळांच्या नांवांनीं बोटें मोडूं लागले.

काका गाडगीळांनीं 'पथिक ' नांवाच्या आपल्या आत्मचरित्रांत ( भाग १ : पान २६२ ) 'अत्रे ह्यांच्या स्वभावाप्रमाणें बोलण्यांतील अतिशयोक्ति व अफाटपणा साऱ्या पक्षाला नडला-नव्हे, पक्ष विसर्जित करावा लागला ' असें पुणें म्युनिसिपालिटींतील काँग्रेस पक्ष मोडण्याचें सारें खापर माझ्या डोक्यावर फोडून स्वतःच्या दोपांवर पांघरूण घालण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला आहे.

काँग्रेस पक्ष कां मोडला ह्याचें इथंभूत वर्णन आतांपर्यंत मीं जें केलें आहे, त्यावरून कोणालाहि कळून येईल कीं पक्षाला जो तडा पडला त्याच्याशीं माझा कांहीं एक संबंध नाहीं. देव-गाडगीळांनीं गांवांतल्या अत्यंत नालायक इसमांना निवडणुकीचीं

तिकिटें दिलीं. कॉंग्रेसच्या पुण्याईवर ही मंडळी निवडून आली आणि त्यानंतर त्यांच्यापैकीं कांहीं लोकांच्या महत्त्वाकांक्षेला जीं एकेक शिंगें फुटलीं, तीं काबूंत ठेवण्यास देव-गाडगीळांचें नेतृत्व असमर्थ ठरलें. म्हणून म्युनिसिपालिटींतला कॉंग्रेसपक्ष अखेर फुटला नि शहर कॉंग्रेसच्या अब्रूचे तीन तेरा वाजले. उलट, मी कॉंग्रेस पक्षाचा नेता होतों, म्हणून तरी दीड वर्ष नगरपालिकेंतील त्या पक्षाची एकजूट कशीबशी मीं कायम राखली. तसें करतांना मला काय एकेक आपदा सहन कराव्या लागल्या त्या माझ्या जिवालाच ठाऊक.

त्यांतला एकच नमुना सांगतों. देव-गाडगीळ ह्यांनीं काय किंमतीच्या नि काय लायकीच्या लोकांना तिकिटें दिलीं होतीं, तें ह्यावरून लक्षांत येईल. पुण्याच्या एका स्थानिक कॉलेजाच्या पहिल्या वर्षांत शिकत असलेला 'पाटसुपे' नांवाचा एक मातंग जातीचा वीस एकवीस वर्षांचा विद्यार्थी नव्या पुलाच्या खालच्या झोपडपट्टींत रहात होता. त्याला तिकीट देण्यांत आलें.

त्याच्या निवडणूक प्रचाराच्या वेळीं केशवराव जेधे अगदीं घसा खरडून खरडून सांगत कीं, ' हा आमचा हरिजन बंधु जितका गरीब तितकाच निःस्वार्थी आहे. त्याच्यापुढें पैशांच्या राशीच्या राशी जरी कोणी ओतल्या तरी त्यांतल्या एका पैलाहि तो स्पर्श करणार नाहीं !'' त्या वेळीं सभेंतले श्रोते टाळ्यांचा कडकडाट करीत आणि त्या ' हरिजन बंधू'ला स्वर्ग दोन बोटें उरत असे.

पण निवडून आल्यानंतर हे हरिजन बंधु मिस्टर पाटसुपे ह्यांनीं आपले खायचे दांत दाखवायला हळूहळू सुरुवात केली. फीच्या साठीं किंवा पुस्तकासाठीं पैसे पाहिजेत अशा सबबीखालीं त्यांनीं आमच्या पक्षांतल्या वीस पंचवीस सदस्यांकडून अदमासें हजार ते बाराशें रुपये गोळा केले. पण एकाकडून पैसे गोळा केल्याचा पत्ता दुसऱ्याला लागूं दिला नाहीं. त्याला पैसे देतांना प्रत्येक जणाला वाटे कीं ह्या पोराला जर आपण अशा रीतीनें मदत केली तर निदान त्याचें मत तरी एखाद्या पोट-कमिटीच्या निवडणुकींत हमखास आपल्याला उपयोगी राहील.

पाटसुप्यानें पक्षाच्या सदस्यांकडून चालवलेल्या ह्या पैशाच्या चोरट्या जमवा-जमवीची गंधवार्ता देखील मला पुष्कळ दिवसपर्यंत नव्हती. ती सहज कोणाच्या तरी तोंडून माझ्या कानांवर पडली, तेव्हां मीं त्याला असा कांहीं फैलावर घेतला म्हणतां, कीं त्याची अक्षरशः बोबडीच वळली.

पण त्या त्याच्या पैशाच्या भानगडीमधून आणखीन एक भलतीच भानगड बाहेर पडली. पुस्तकासाठीं आणि फीसाठीं म्हणून जमविलेले ते हजार बाराशें रुपये पाटसुप्यानें एका 'देवकी' नांवाच्या पोरीशीं प्रेमचाळे करण्यांत खर्च केले आणि त्या लफड्यांत ते पैसे जाऊनच्या जाऊन त्यांतून तिसरेंच लचांड निर्माण झालें.

आमच्या पक्षाचे एक सभासद माझे शालेय कालांतले वर्गबंधु डॉ. भगवंत अनंत

शिरोळकर म्हणून होते. ते पहिल्या वर्षी व्हाईस-प्रेसिडेंट होते. त्यांच्याकडे एक दिवस हा पाटसुपे गेला. डॉक्टरांच्या आजूबाजूला पुष्कळ पेशंट बसले होते. तरीपण पाटसुपे आपल्या काँग्रेस पक्षाचा नगरपिता म्हणून डॉ. शिरोळकरांनीं हातांतलें काम बाजूला सारून त्याला मोठ्या अगत्यानें विचारलें, " काय पाटसुपे, काय काम काढलेंत ? "

" कांहीं नाहीं डॉक्टरसाहेब, माझी एक मैत्रीण आहे. तिचं पोटचं पाडायचंय ! " जणु कांहीं कानांतला मळ काढायचा आहे इतक्या सहजपणें पाटसुपे डॉक्टरांना म्हणाला—अगदीं सगळ्यांना सहज ऐकूं येईल एवढ्या मोठ्या आवाजांत.

डॉक्टरांच्या डोक्यावर कोणी तरी एकादा सोटा मारावा असा त्यांनीं चेहरा केला. फेंफरें आल्यासारख्या थरथरत्या तोंडानें डॉक्टर पाटसुप्याच्या चेहऱ्याकडे बघत राहिले. आणि दवाखान्यांतले बाकीचे पेशंट एकादें भूत समोर दिसावें असे चेहेरे करून डॉक्टरांच्या तोंडाकडे टकाटका पाहूं लागले.

" क-क-काय ? " डॉक्टरनीं पुन्हां विचारलें. न जाणों, कदाचित् आपल्या ऐकण्यांत कांहीं तरी चूक झाली असेल असें त्यांना वाटलें.

" एका मुलीच्या पोटचं पाडायचंय—" पाटसुप्यानें त्याच शब्दांची पुन्हां ठण-काबून फेर झाडली.

त्याबरोबर डॉक्टरांनीं एकदम फोन उचलला आणि मला केला.

" कोण अत्रे का ? जसे असाल तसे आतांच्या आतां माझ्या दवाखान्यांत या ! " ते घाबऱ्या घाबऱ्या म्हणाले.

त्यांच्या त्या बोलण्याचा मला अर्थ कळेना. मी देखील थोडासा घाबरलों.

" काय डॉक्टर, काय भानगड आहे ? " मीं विचारलें.

" तें फोनवरून सांगतां येत नाहीं " डॉक्टर म्हणाले, " तुम्ही आधीं इकडे या— "

तसाच मी माझ्या मोटरींतून डॉक्टरांच्या दवाखान्यांत गेलों. पाटसुपे तेथें बसलाच होता. मला पहातांच त्याचा चेहरा पडला. डॉक्टरांनीं मला नि पाटसुप्याला आंतल्या खोलींत बोलावलें. आणि ज्या कामासाठीं पाटसुपे आपल्याकडे आला होता त्याची मला त्याच्याच शब्दांत कल्पना दिली.

त्याबरोबर पाटसुप्याचें मी मुंडकेंच पकडलें आणि त्याच्या अंगावर कडाडलों " पोटचं पाडायचं होय तुला ? थांब, त्याच्या आधीं साल्या, तुझ्याच पोटचें पाडतों ! "

तेव्हां पाटसुप्यानें तेथून धूमच ठोकली. पुढें त्यानें आपल्या अडलेल्या मैत्रिणीची सुटका कशी केली हें त्याचें त्यालाच ठाऊक ! असलीं माणसें काँग्रेसश्रेष्ठींनीं निवडून म्युनिसिपालिटींत पाठविल्यानंतर हा पक्ष दीड वर्ष टिकला हीच गोष्ट मोठी शहामत म्हणायची !

कॉंग्रेस पक्ष म्युनिसिपालिटींत अल्पसंख्य झाल्यावर काकासाहेब गाडगीळांनीं तो तावडतोब विसर्जित करून टाकला हें मात्र खरें. त्यानंतर मी पुढें दीड वर्ष नगरपालिकेचा सभासद होतों. तरी एक दिवस सुद्धां मी विश्रामबागवाड्यांत फिरून पाऊल टाकलें नाहीं.

तथापि, कॉंग्रेस पक्ष विसर्जित झाला तरी त्याचें ‘ कवित्व ’ चार दोन महिने मागें उरलें. ज्या ‘ पंधरा हरामखोरां ’विरुद्ध मीं ‘ नवयुग ’मध्यें तो जळजळीत लेख लिहिला होता, त्यांतील चौदा मेहेरबानांनीं माझ्यावर पुण्याचे फर्स्ट क्लास ऑनररी मॅजिस्ट्रेट सरदार बापूसाहेब विंचूरकर ह्यांच्यापुढें अब्रुनुकसानीच्या चौदा फौजदारी फिर्यादी एकदम दाखल केल्या. मराठी वर्तमानपत्रावर झालेल्या अब्रुनुकसानीच्या फिर्यादींचा हा उच्चांकच होय. ह्या फिर्यादींत माझ्यातर्फे ॲ. रा. ब. गडकरी, ॲ. बाळासाहेब करमरकर आणि ॲ. वसंतराव म्हैसूर असे तीन वकील मीं दिले होते. तर ‘ चौदा हरामखोरां ’नीं श्री. अण्णासाहेब भोपटकर आणि श्री. अण्णासाहेब ढमढेरे ह्यांना आपलें वकीलपत्र दिलें होतें.

तथापि, खटला सुनावणीला निघण्यापूर्वीं आधल्या रात्रीं त्यांतील ‘ हरामखोर नं.१ ’ला पुण्याच्या ‘ न्यू क्लब ’मध्यें नेऊन मीं त्याला यथास्थित ‘ तीर्थ प्रसाद ’ खाऊंपिऊं घातला. त्यामुळें त्याची नि माझी कोर्टाबाहेरच तडजोड झाली. ती दुसऱ्या दिवशीं कोर्टांत नोंदल्यानंतर पहिला खटला निकालांत निघाला.

चौदा फिर्यादींच्या म्होरक्यानेंच अशा रीतीनें माझ्याशीं तडजोड करून टाकल्यानंतर मग बाकीच्या फिर्यादींनीं हातपाय गाळले आणि पुढच्या तारखेपर्यंत सर्वांची नि माझी तडजोड होऊन हें ‘ हरामखोर प्रकरण ’ कायमचें निकालांत निघालें.

हें सर्व होत असतांनाच मुंबईला स्वतःची चित्रपट कंपनी काढण्याचा माझा निश्चय मात्र ठाम झाला. आतां पुण्यांत मला कांहींच काम उरलें नव्हतें.

# ७

# माझें पुणें मीं सोडलें !

अखेर १९४० च्या जुलै महिन्यामधल्या एका सकाळीं मीं पुणें सोडलें. तो कोणता मुहूर्त होता कोणास ठाऊक ! सर्व आठवतें पण तेवढा दिवस मात्र आठवत नाहीं. आणि तो दिवस आठवण्याचा मीं प्रयत्नहि करीत नाहीं. कारण ती खपली एकदां का काढली, कीं तिच्या खालची ओली जखम अजूनहि वाहूं लागेल, अशी मला भीति वाटते. अगदीं रिकाम्या मनानें मी पुण्याहून निघालों. कुठें जायचें, कुठें उतरावयाचें आणि कोणाला भेटावयाचें ह्याचा यत्किंचित् विचार मीं केला नाहीं. फर्स्ट क्लासचें तिकीट काढलें नि खिशांत कांहीं तरी एकोणीस रुपये उरले. इंग्लंडला जातांना माझ्या खिशांत अवघे दीडशें रुपये होते. तशीच जवळजवळ मुंबईला जातांना माझी स्थिति होती. बोरीबंदरला उतरलों नि तसाच चालत चालत सरदारगृहांत गेलों. माझ्या हातांत एक लहानशी बॅग होती. तिच्यांत अवघे दोनच दिवसांचे कपडे मीं भरले होते.

जेवण झाल्यानंतर सरळ शिवडीला गेलों. मिनर्व्हा स्टुडिओंत सोराब मोदींना भेटलों. त्यांची माझी ओळख होती. एक

चित्रपट काढण्याची आपली इच्छा आहे असें मीं त्यांना सांगितलें. पण आपल्याकडे तशी कांहीं सवड नाहीं असें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां त्यांचा निरोप घेऊन मी रणजित स्टुडिओंत गेलों.

तेथें चंदुलाल शहा भेटले. त्यांनीं एका चित्रपटासाठीं माझ्याशीं भागीदारी करण्याची एक योजना मांडली. मीं ती नुसती ऐकून घेतली. कारण कोणाही तिऱ्हाइताशीं भागीदारी करावयाची नाहीं, अशी मीं स्वतःच्या मनाशीं खूणगांठ आधींपासूनच बांधली होती.

त्यांचा निरोप घेऊन मी आणखी दोनतीन स्टुडिओंत चक्करा मारून आलों. पण कुठेंच कांहीं जमण्याचा रंग दिसेना. अखेर, ' नवयुग चित्रपट लि. 'चे प्रमुख वितरक भाई सामंत ह्यांच्या ' पिअरलेस पिक्चर्स 'मध्यें गेलों.

त्यांना विचारलें, "एका चित्रपटासाठीं तुम्ही मला भांडवल देऊं शकाल काय ?"

तेव्हां, " माझें सर्व भांडवल सध्यां ' नवयुग 'मध्यें गुंतलेलें आहे. तुम्ही सहा महिने थांबा. मग पाहूं !" असें ते म्हणाले.

मी म्हणालों, " नवयुगचे चेअरमन प्रा. काळे ह्यांना मीं जें सांगितलें, तेंच तुम्हांला सांगतों. सहा महिनेच काय, पण सहा दिवस देखील मी थांबणार नाहीं. आजपासून सहाव्या दिवशीं माझी ' अत्रे पिक्चर्स ' ही संस्था स्थापन झालेली तुम्हांला दिसेल ! "

भाई सामंत पोट धरधरून हंसले. ते म्हणाले, "तुम्ही खरोखरच कवि आहांत, हें आतां पटलें. म्हणून म्हणतों कीं तुम्ही नुसती चित्रपटाची कथा लिहा. चित्रपट काढण्याच्या भानगडींत पडूं नका !"

त्यांना उत्तर द्यावयाला माझ्याजवळ त्या वेळीं कांहींच सामर्थ्य नव्हतें. मी सरदारगृहांत परत आलों. त्यांचें दीड दिवसाचें बिल दिलें. आणि दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या वर्गानें हात हालवीत पुण्यांत परतलों. आणि योगायोग हा कीं माझें नशिब त्याच गाडीनें पण दुसऱ्या डब्यांतून माझ्या मागोमाग पुण्याला प्रवास करीत होतें.

त्या वेळीं मी माडीवाले कॉलनींत ' ज्योतिर्मंदिर ' ह्या घरांत रहात होतों. तें घर माझ्या मेहुण्याच्या निं बायकोच्या मालकीचें होतें. त्यांच्या आईनें त्यांच्यासाठीं जे पैसे ठेवले होते, त्यांतून त्यांनीं तें बांधलें होतें. ह्या घरासमोर जो विजेचा खांब अजूनहि आढळेल, तो मी पुणें म्युनिसिपालिटीचा चेअरमन असतांना मुद्दाम बसवून घेतला. पुण्याचा नगरपिता असतांना तेवढा एकच स्वार्थ मीं साधला बरें का ?

त्याचें कारणहि सांगण्यासारखें आहे. एके दिवशीं संध्याकाळीं माझ्याकडे वामन मल्हार जोशी आले. बाहेर चांगला अंधार पडला होता. माझ्या घराची पायरी कांहीं त्या अंधारांत वामनरावांना दिसली नाहीं. आणि ते ठेंचाळून पडले. त्यांच्या नडगीला थोडेंसें लागलें. तेव्हां, त्यांच्या मदतीला मी धांवलों.

त्यांच्या नेहमींच्या करुण पण खणखणीत स्वरांत ते उठतां उठतां मला म्हणाले, " अत्रे, चेअरमनच्या घरासमोर जिथें एवढा अंधार आहे, तिथें म्युनिसिपालिटींत त्यांच्या कामाचा काय उजेड पडणार आहे तें दिसतेंच आहे. "

मी म्हणालों, " पुन्हां तुम्ही माझ्याकडे याल ना वामनराव, तेव्हां मुद्दाम रात्रीं या, म्हणजे तुमच्या स्वागतासाठीं ह्या ठिकाणीं एक विजेची झगझगीत बत्तीच उभी असलेली तुम्हांला आढळेल. "

पण पुन्हां माझ्या घरीं वामनराव कधींच आले नाहींत. त्याचें कारण अत्रे-फडके वादानंतर वामनरावांचें मत माझ्याबद्दल बरेंचसें कलुषित झालें.

पण मी काय सांगत होतों, कीं मुंबईहून अत्यंत निराश परिस्थितींत पुण्याला परत येऊन, मी माझ्या घरांत झोपलों होतों.

मुंबईला मी केवढ्या आशेनें गेलों होतों. नि किती निराश मनानें पुण्याला परत आलों !

शाळेंत असतांना इंग्लंडच्या इतिहासांतल्या एका प्रसंगावर कोणीतरी अज्ञात कवीनें रचलेल्या एका मौजेच्या काव्याची मला त्या वेळीं आठवण झाली.

There was a ship
that went to Spain,
When it got there,
It came back again.

त्याचें मराठी भाषांतर असें :

**एक होतें जहाज,**
**तें स्पेनला गेलें,**
**कांहीं न करतां,**
**परत आलें !**

स्पेनला जाऊन हात हालवीत परत आलेल्या जहाजासारखी माझी स्थिति झाली होती.

**एक होता माणूस**
**तो मुंबईला गेला !**
**कांहीं न करतां,**
**परत आला !**

एवढ्यांत माझ्या दाराची घंटा वाजली. मी झोपेंतून गडबडीनें उठलों. टर्र-टर्र-टर्र !

मीं दार उघडलें. कारण, त्या वेळीं माझ्याजवळ गडी नव्हता.

" काय पाहिजे आपल्याला ? " मीं डोळे चोळीत चोळीत विचारलें.

"आपण अ-त्रे-च ना ?" आलेल्या गृहस्थानें विचारलें.

"य–स्स, या देहाला अत्रे असें म्हणतात !" मी अर्धे दांत विचकून उत्तरलों नि त्याला आंत येण्याची विनंती केली.

मला भेटायला आलेल्या त्या माणसाचें नांव जिनसीवाले असें होतें. तो वकील होता. रहाणारा खानदेशचा.

"आपण सिनेमा कंपनी काढणार असल्याचें समजलें—" जिनसीवाल्यांनीं भीत भीत मला विचारलें.

"होय–" एकाद्या साहेबाच्या उर्मट ऐटीनें मी उत्तरलों, पण त्याला जणुं काय मराठी कळणार नाहीं अशा घमेंडीनें मी पुढें त्याला विचारलें, "Yes, so what ?"

माझा तो उग्र अवतार पाहून जिनसीवाले अगदीं गरिबीच्या स्वरांत बोलले, "माझं नांव जिनसीवाले. मी वकील आहें. ज्यांच्यातर्फे मी आलों आहें, त्यांचें नांव फकीरचंद जानकीदास आगरवाले. ते चोपड्याचे रहाणारे आहेत. खूप श्रीमंत आहेत. त्यांची इच्छा तुमच्या नव्या चित्रपट कंपनींत भागीदार व्हावें अशी आहे."

"पण मला भागीदार नको आहे. माझ्याजवळ पुरेसें भांडवल आहे–" मामा वरेरकरांच्या दडपेगिरीनें मी ठणकावून बोलून गेलों.

त्यानंतर जिनसीवाल्यांचा नि माझा पुष्कळ वादविवाद झाला. अखेर, त्यांच्या अशिलावर उपकार करण्याच्या आविर्भावानें मीं असें ठरविलें, कीं एका चित्रपटासाठीं आमची दोघांची भागीदारी व्हावी. मी जितके पैसे घालीन, तितके त्यांनीं घालायचे.

मी म्हणालों, "मी पाऊण लाख रुपये घालीन." जिनसीवाले म्हणाले, "म आम्ही पाऊण लाख रुपये घालूं !"

"ठीक, छान, उत्तम !" मी उद्गारलों.

दुसऱ्या दिवशीं मुंबईला तो करार करायचें ठरलें. त्या दिवशीं सकाळीं मी नि जिनसीवाले मुंबईला निघालों. बोरीबंदरहून भाई सामंतच्या 'पिअरलेस पिक्चर्स'मध्यें सरळ गेलों. फकीरचंद जानकीदास तिथें बसला होता.

रंगानें काळा, अंगानें जाड, तोंडावर देवीचे वण, असा तो फकीरचंद जानकीदासाचा अवतार पाहून मी तर खलासच झालों.

हा माझा फायनॅन्सर ? हा माझा भागीदार ? हरे राम ! हरे राम !

पण आतां पुढें काय ?

**आलीया रोगाशीं ( भोगाशीं नव्हे ) असावें सादर**

फकीरचंदांचा नि माझा पुढीलप्रमाणें संवाद झाला.

**फ** : तुम्ही अत्रे ?

**मी** ( घाबरून ) तु–तु–तुम्ही फ–क–की–र चंद—

**फ** : यस–I is the फकीरचंद ! माझा मुंबईत पेट्रोल पंप आहे—

**मी :** Oh, I see, you are that patrol pump ?

**फ :** Y–U–S, मी शिनेमा ॲक्टर पण आहें—'रायगड' पिक्चर तुम्ही पाहिलें आहे का ? त्यांत मी Collector of Raigad चें काम केलें आहे—

**मी :** अच्छा, येसूबाईचें काम दुर्गाबाईनीं केलें आहे. त्यांचा जो एक मूर्ख गडी आहे, ते तुम्ही काय ?

**फ :** Yus, he is मी !

**मी :** बरं, मग तुम्हीं काय मला फायनॅन्स करणार आहांत—?

**फ :** Yus, I am financing, you are producing, I am acting—

**मी :** ( ओरडलों, ) व्हॉ ऽऽऽ ट ?

**फ :** म्हणजे काय, मी 'हीरो'चें काम करणार—

**मी :** मिस्टर फकीरचंद, तुम्हीं आपला चेहेरा कधीं आरशांत पाहिला आहे काय ? तुम्हांला 'हीरो'चंच काय पण 'झीरो'चें काम सुद्धां मी देणार नाहीं !

तेथें आमचें बोलणें अडून बसलें. मग जिनसीवाले वकिलांनीं फकीरचंदाला काय समजावलें कोणास ठाऊक ! तेवढ्यांत भाई सामंतांना घेऊन मी आंतल्या खोलींत गेलों नि त्यांना सांगितलें, "चांगला बकरा मी घेऊन आलों आहें. तेव्हां त्याला कापायच्या कामीं तुमची मदत हवी आहे."

भाई सामंत हंसले. म्हणाले, "ठीक आहे !"

नंतर फकीरचंदाचें नि माझें कॉंट्रॅक्ट ठरलें. त्यांनीं मला पाऊण लाख रुपये द्यावयाचे नि मीं त्या चित्रपटाच्या निर्मितीमध्यें पाऊण लाख रुपये घालावयाचे.

मीं भाई सामंतांना डोळा मारला. त्यांना बाजूला नेऊन मी हळूंच म्हणालों कीं, "तुम्ही माझी पाऊण लाखाची गॅरंटी घ्या ! कांहीं ध्यायचें नाहीं, कांहीं द्यायचें नाहीं. नुसती गॅरंटी !"

ते त्या गोष्टीला तयार झाले. करारांत असें ठरलें, कीं त्यांनीं 'अत्रे पिक्चर्स'च्या पहिल्या चित्रपटासाठीं मला पाऊण लाख रुपये द्यावयाचें. त्या करारापोटीं त्यांनीं मला दहा हजार रुपयांचा चेक दिला.

कुठला ? चोपड्याच्या बॅंकेचा. त्यावर त्यांची सही होती मोडीमध्यें.

मीं स्वतःशीं विचार केला कीं, हा चेक मुंबईहून चोपड्याला जावयाचा. तेथें तो 'कॅश' व्हायचा. कोणास ठाऊक हा चेक कॅश होईल कीं नाहीं ?

म्हणून मीं भाई सामंतांच्या एका माणसाला तो चेक घेऊन चोपड्याला पाठविलें. दोन दिवसांनीं तो दहा हजार रुपयांचा चेक वटवून मुंबईला तो परत आला. ते पैसे सॅण्डर्स्ट रोडवरील 'इम्पीरियल बॅंक'मध्यें भरुन मीं माझा मुंबईतला 'अकाउन्ट' पहिल्या प्रथम उघडला.

काय त्या वेळीं मला वाटलें असेल ? मुंबईच्या बॅंकेमध्यें माझे दहा हजार

रुपये जमा ! माझ्या आनंदाला सीमाच राहिली नाहीं.

मी पुण्याला गेलों. नि माझी ' शेव्हर्लें ' मोटर घेऊन मुंबईला परत आलों. मला रहावयाला जागा नव्हती. पण माझे मित्र हरिभाऊ मोटे ह्यांनीं माझें ' घरजांवई ' नांवाचें जें चित्र घ्यावयाचें कबूल केलें होतें, त्या चित्राचे दिग्दर्शक श्री. कुमारसेन समर्थ ह्यांनीं माझ्यासाठीं ताबडतोब एक जागा मुक्रर केली.

कुठें ? त्यांच्या घरासमोर कॅडल रोडवर ते ज्या घरांत राहत होते, त्याच्या बरोबर समोर ' तिकोना ' नांवाची एक तीन मजली इमारत होती. त्याच्या तिसऱ्या मजल्यावरची ऐसपैस जागा महिना एकशेंवीस रुपयांच्या भाड्यानें त्यांनीं माझ्यासाठीं ठरविली. मला वाटतें कीं, तो दिवस चाळीस सालचा अकरावा किंवा बारावा ऑगस्ट होता.

तेरावा ऑगस्ट हा माझा वाढदिवस होता. त्या दिवशीं माझें सर्व सामान घेऊन मी ' तिकोना 'मध्यें रहावयाला गेलों. अन् त्या रात्रीं माझे मित्र हरिभाऊ मोटे ह्यांनीं ' क्रिकेट क्लब ऑफ इंडिया ' मध्यें मला थाटाची मेजवानी दिली. त्या मेजवानीमध्यें चित्रपटसृष्टींतल्या अनेक नटनटी आल्या होत्या.

त्याच दिवशीं मी पुणें सोडून मुंबईचा नागरिक बनलों. माझें पुणें. टिळकांचें पुणें. शिवरामपंत परांजप्यांचें पुणें. तात्यासाहेब केळकरांचें पुणें. मीं सोडलें. सतत तीस वर्षें ज्या पुण्यांत मी हजारों विद्यार्थ्यांना शिक्षण दिलें, ज्या पुण्यांत शेंकडों लोकांना मीं माझ्या व्याख्यानांनीं हंसविलें नि रमविलें, तें पुणें अखेर मला सोडावें लागलें.

पुणें-माझी ज्ञानभूमि—
माझी कर्मभूमि —
माझी त्यागभूमि—
ती मीं सोडली नि मुंबईमध्यें आलों !
कायमचा आलों.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४७२५

# ८

# चित्रमंदिर

राहावयाला समुद्राजवळचा तिसऱ्या मजल्यावरचा सहा खोल्यांचा प्रशस्त फ्लॅट – गॅरेज – टेलिफोनसह भाडें अवघें एकशेंवीस रुपये – बँकेंत खात्यामध्यें दहा हजार रुपये आणि फिरावयाला कोरी करकरीत शेव्हर्ले गाडी अशा 'साग्रसंगीत' थाटामाटामध्यें १९४० च्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईमधील माझ्या वास्तव्याला मीं प्रारंभ केला. माझ्या स्वतःच्या चित्रपट कंपनीला 'अत्रे पिक्चर्स' हें नांव द्यावयाचें नि पहिला चित्रपट मराठी आणि हिंदी असा दोन भाषांत 'पायाची दासी' आणि 'चरणोंकी दासी' ह्या नांवानें काढावयाचा असें मीं त्यापूर्वीच म्हणजे २१ जुलै १९४० लाच माझ्या 'नवयुग'-मध्यें जाहीर करून टाकलें होतें.

'नवयुग चित्रपट लि.'साठीं 'संत सखू' ह्या नांवाचा जो चित्रपट मीं संवादांसह लिहून ठेवला होता, त्याचेंच आधुनिकीकरण करून मीं दोन चार दिवसांत 'पायाची दासी' ही चित्रकथा तयार केली. त्याचें हिंदी भाषांतर मी पंडित आनंदकुमार ह्यांच्याकडून तावडतोब करून घेतलें. चित्रपटाचें दिग्दर्शन स्वतः मींच करावयाचें

ठरविलें आणि त्याप्रमाणें जाहीरहि करून टाकलें.

आतां मुख्य प्रश्न राहिला तो 'स्टुडिओ'चा. मुंबईमध्यें त्या वेळीं स्टुडिओ फारच थोडे होते. आणि जे होते ते त्या त्या कंपनीच्या मालकीचे. ते दुसऱ्या कंपनीच्या चित्रपट-निर्मितीसाठीं भाड्यानें कसे मिळणार? आम्हांला दोन चित्रपट निर्माण करावयाचे होते. एक माझा स्वतःचा 'पायाची दासी' नि दुसरा माझे मित्र हरिभाऊ मोटे ह्यांच्या 'आशा पिक्चर्स'साठीं मींच लिहिलेला 'घरजांवई'. तेव्हां कमींत कमी सहा महिन्यांसाठीं तरी आम्हांला एकादा स्टुडिओ भाड्यानें हवा होता.

तेव्हां एके दिवशीं सकाळीं मी नि हरिभाऊ परेल टँक रोडवर असलेल्या नानुभाई देसाई ह्यांच्या 'हिंदुस्तान स्टुडिओ'मध्यें गेलों. स्टुडिओ लहानच होता. पण अत्यंत सोयीस्कर, आटोपशीर अन् नीटनेटका होता. स्टुडिओला लागणारीं सर्व लहानसहान अंगेंउपांगें त्यामध्यें होतीं. स्टुडिओच्या प्रवेशद्वारामधून आंत शिरतांच मला तो एकदम आवडला.

कुमारसेन समर्थ आमच्या बरोबर होते. त्यांची नि नानुभाईची चांगली ओळख होती. कारण त्यांच्या पत्नी शोभना समर्थ ह्या नानुभाईच्या 'स्वामीनाथ' ह्या चित्रपटाच्या नायिका म्हणून त्या वेळीं काम करीत होत्या. दिग्दर्शन नानुभाई स्वतः करीत होते. त्या चित्रपटाचे नायक प्रेम अदीब हे होते. खलनायक के. एन्. सिंग आणि उपनायिका स्नेहप्रभा प्रधान ही होती. चित्रपटाच्या क्षेत्रांतलें तें स्नेहप्रभेचें पहिलेंच पदार्पण असावें. दिसावयाला त्या वेळीं ती भलतीच भिकार होती. नानुभाईनीं तिला त्या चित्रपटांत कां घेतली हेंच मला कळेना.

स्टुडिओच्या प्रथमदर्शनींच नानुभाईचें ऑफिस होतें. नानुभाई हे त्या वेळीं बावन्न त्रेपन्न वर्षांचे, वाटोळया चेहेऱ्याचे, अर्धवट पिकल्या केंसांचे, मध्यम उंचीचे नि स्थूल बांध्याचे होते. त्यांचा आवाज विलक्षण घोगरा होता. संगीताच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ते नेहमीं खर्जामध्यें बोलत. टेलिफोनवरून भाषण करतांना दुसऱ्या बाजूच्या माणसाच्या म्हणण्याला रुकार देतांना ते जेव्हां 'हॉं-हॉं-' असा होकार देत तेव्हां एकाद्या वारुळांतून संतापलेला अजगर फुसकारे सोडतो आहे, असा ऐकणाराला भास होई.

मुंबईच्या सिनेसृष्टीमधलें नानुभाई एक प्रचंड प्रस्थ होतें. मूकपटाच्या जमान्यापासून त्यांनीं ह्या क्षेत्रामध्यें पदार्पण केलें होतें. नव्या नव्या चित्रपट कंपन्या काढण्याचा नि कमींत कमी कालमर्यादेंत जास्तींत जास्त चित्रपट निर्माण करण्याचा उच्चांक त्यांनीं मोडला होता. चित्रपटाच्या व्यवसायांतली अशी एक गोष्ट नव्हती कीं जी नानुभाईला माहीत नव्हती. चित्रपटाची गोष्ट तेच लिहायचे, त्याचें दिग्दर्शन तेच करायचे, संगीत तेच द्यायचे, त्याचें वितरण तेच करायचे !

आणि चित्रपटाच्या आर्थिक व्यवहारांत तर नानुभाई वाघ होता वाघ!

स्वतःच्या अंगाला यत्किंचितहि तोशीस न लावून घेतां, भांडवलदारांना पालथे पाडण्यांत आणि त्यांना खडे चारण्यांत त्यांच्याइतका वाकबगार माणूस त्या काळीं मुंबईच्या सिनेव्यवसायांत दुसरा कोणी नव्हता.

मी जेव्हां त्यांच्या ऑफिसांत पाय टाकला तेव्हां नानुभाई त्यांच्या अविस्मरणीय खर्ज स्वरांत कोणाला तरी फोन करीत होते. गळ्याला त्यांनीं एक मळकासा मफलर गबाळ्यासारखा गुंडाळला होता. फोनवरचें बोलणें संपल्यानंतर नानुभाईनीं आमच्याकडे पाहिलें.

कुमारसेन : ( माझ्याकडे हात करून ) आपल्याला भेटायला हे अत्रे आले आहेत.

नानुभाई : ( गुजराती स्वरांत ) कोण अत्रे ऽ ऽऽ ?

कुमारसेन : आचार्य अत्रे – नाटककार – चित्रपट कथालेखक—

नानुभाई : ( एकदम आश्चर्यचकित होऊन ) एटले ब्रह्मचारीवाला आचार्य अत्रे ?

मी : होय–मीच तो—

नानुभाई : ( एकदम उठून आणि माझे दोन्ही हात आपल्या हातांत धरून ते जोरानें हालवीत ) What a surprise ! You are that great lion ! I thought because you are an आचार्य, you must be an old man with a long beard !

मी : ( हंसून ) I don't pretend to be a lion, but if at all you think that I am a lion, I belong to the beardless variety.

तेव्हां नानुभाई पोट धरधरून हंसले नि म्हणाले " Now I am sure, you are that Atre. हवे बोलो अत्रेसाहेब, आजे तमे अत्रे केम आव्या ? ( गुजरातींत ' अत्रे ' म्हणजे ' इथें ' )

मी मराठींत म्हणालों, " मी आणि माझे हे मित्र हरिभाऊ मोटे. आम्हांला तुमचा हा स्टुडिओ भाड्यानें मिळूं शकेल काय ? आम्हांला दोन पिक्चर्स काढावयाचीं आहेत. "

" अरे, तमे एटला मोटा माणस " नानुभाई गुरगुरल्या आवाजांत म्हणाले, " भाडेथी तमे आ स्टुडिओ केम लेवो छो— You purchase this studio ! "

बाप रे, मुंबईतला स्टुडिओ विकत घ्यावयाचा ! म्हणजे हा नानुभाई मला समजतो तरी काय ? माझ्याजवळ बँकेंत फक्त दहा हजार रुपये आणि ते देखील दुसऱ्याचे ! त्यांत दोन भाषांमध्यें एक चित्रपट काढायचा नि पुन्हा स्टुडिओ विकत घ्यावयाचा ?

मी हंसून गुजरातींत म्हणालों, ' तमे नकारण मारी मश्करी केम करो छो ? "

" No no-!" नानुभाई गंभीर चेहरा करून म्हणाले, " I am not joking–this studio at present is on sale ! "

" म्हणजे, हा स्टुडिओ आपण विकणार आहांत ? " मी आश्चर्यानें म्हणालों.

" अत्रेसाहेब, आ स्टुडिओ मारो नथी ! " नानुभाई म्हणाले, " I am not such a fool to own a film studio ! As only fools build studios where wise men like me produce pictures ! "

" वा, वा, नानुभाई, खूप केलीत ! " मी मोठमोठ्यानें हंसून म्हणालों, " And now you want to pass that fool's cap on to me ? "

त्याबरोबर नानुभाई अधिक गंभीर झाले. नि भावनेनें आपल्या गुजराती मराठींत म्हणाले, " तसं नाहीं अत्रे शेट, ज्येला पिक्चर निकलायचं हाये, तेचा पोताचा ( म्हणजे स्वतःचा ) स्टुडिओ जोइए ! That's my experience you know ! मी तो ये पिक्चर लाईन छोडी देवानो छुं. एटले मी म्हणतों कीं बीजा माणसाच्या ताब्यामंदी आ स्टुडिओ जाण्याकरतां ( म्हणजे पेक्षां ) तुमच्यासारख्या सारा साणसाच्या हातामधीं हा स्टुडिओ जाणें वधारे सारूं, केम मिस्टर समर्थ ? "

" माझें तसेंच मत आहे ! " कुमारसेन म्हणाले.

माझ्या मनांत काय आलें कोणास ठाऊक ? मीं नानुभाईंना मोठ्या रुबाबानें विचारलें, " What would be the Sale Price of this Studio ?

" Only पचास हजार ! " नानुभाई आपल्या पांच बोटांची उघडझांप माझ्या डोळ्यांसमोर करीत म्हणाले.

पन्नास हजार ! बाप रे बाप ! एवढे पैसे मी आणायचे कोठून ? तरी देखील मनांतल्या मनांत थोडेंसें बरें वाटलें. कारण, माझी जी मूळ कल्पना होती कीं स्टुडिओची किंमत चार दोन लाख रुपये तरी असेल तिच्याऐवजीं नानुभाईंच्या तोंडून फक्त पन्नास हजार रुपयांचा आंकडाच बाहेर पडला ! मनांतल्या मनांत कसला तरी विचार करीत आहे असें मी दाखविलें.

" तमे सुं आपशो ? " नानुभाईंनीं मला उलट विचारलें.

कांहींतरी बोलायचें म्हणून मी बोलून गेलों.

" ह्या स्टुडिओला मी तीस हजारपेक्षां जास्त देणार नाहीं. "

क्षणभर नानुभाई गप्प बसले. आणि आपल्या खुर्चीवरून उठून त्यांनीं माझा हात धरून मला बाहेरच्या बागेंत नेलें नि हलक्या आवाजांत विचारलें, " मने तमे पांच हजार रुपिया पागडी आपशो तो हुं तमने त्रीस हजारमां स्टुडिओ आपीश ! Positively. "

" By all means ! " मी त्यांचा हात दाबून म्हणालों, " पण एका अटीवर. स्टुडिओची तीस हजार रुपये रक्कम मी आपल्याला पांच पांच हजार रुपयांच्या सहा

हप्त्यांनीं देईन. आणि सगळे हप्ते पूर्ण झाल्यानंतर मी तुम्हांला तुमचे पांच हजार रुपये देईन."

"कई वांधो नथीं!" नानुभाई गळ्यांत हात घालून म्हणाले.

मी हरिभाऊ मोट्यांना आमचें उभयतांचें काय ठरलें तें सांगितलें. हरिभाऊ चकित झाले. ते म्हणाले, "कमाल आहे तुमची! स्टुडियो भाड्यानें घ्यायला आपण आलों नि तो विकत घेऊन बाहेर पडलों! पण बँकेंत तुमच्या खात्यांत फक्त दहा हजार रुपये असतांना तुम्ही तीस हजार रुपये कुठून देणार?"

मी म्हणालों, "त्याचा विचार आपण पुढें करूं. पहिल्यानें स्टुडिओ आपल्या ताब्यांत तरी येऊं द्या!"

दुसऱ्या दिवसापासून आम्ही दोघे नानुभाईंचे सॉलिसिटर्स 'भाईशंकर, गिरिधरलाल ॲण्ड कांगा' ह्यांच्या ऑफिसमध्यें जाऊन बसलों. त्या स्टुडिओच्या अनंत भानगडी होत्या. त्याची जागा होती महिना नऊशें रुपये भाड्याची. वरची इमारत आणि सामानसुमान होतें कोणा एका 'आर. डी. शहा' नांवाच्या माणसाचें. तें दोन माणसांकडे गहाण होतें. त्यांतला एक होता अहमदाबादचा 'कांति भडक' नांवाचा सटोडिया. नि दुसरे गहाणदार होते मुंबईचे चित्रपट-व्यवसायांतले सुप्रसिद्ध सावकार कपूरचंद.

ते सर्व गहाणाचे व्यवहार सोडवतां सोडवतां तब्बल पंधरा दिवस लागले. ह्या कागदावर सह्या-त्या कागदावर सह्या-कांहीं विचारूं नका. मुंबईमधल्या सॉलिसिटरच्या कारभाराचा कचका काय असतो त्याचा अनुभव त्या वेळीं प्रथम आला. शेवटीं एकदांचें सगळें प्रकरण संपलें. माझ्या खात्यांतल्या रकमेपैकीं पांच हजार रुपयांची रोख रकम कपूरचंदांच्या हातीं ठेवली नि उरलेल्या पंचवीस हजारांपोटीं पांच पांच हजारांच्या पांच हुंड्या मीं कपूरचंदांच्या नांवानें लिहून दिल्या आणि हा सर्व व्यवहार 'मरीन ड्राईव्ह'वरील कपूरचंदांच्या 'कपूर महाल' ह्या सहा का सात मजली राजप्रासादाच्या सौधभागावर पूर्ण करून मी अखेर मुंबईतल्या एका चित्रपट स्टुडिओचा मालक बनलों. हरिभाऊ मोटे ह्यांना त्या मालकीच्या भागीदारीमध्यें मीं घेतलें. मनांत विचार केला कीं उद्यां ह्या स्टुडिओच्या भानगडींत आपलें कांहीं बरें वाईट झालें, तर तें आपल्या एकट्याचें व्हावयाला नको. त्या कामीं आपल्याला एकादी सोबत असलेली बरी.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी स्टुडिओचें नामकरण 'चित्रमंदिर' असें केलें. आणि प्रवेशद्वारावर 'प्रोप्रायटर्स : अत्रे ॲण्ड मोटे' अशी पाटी लावली. रस्त्यावर उभें राहून त्या पाटीकडे जेव्हां मी ऐटीनें पाहूं लागलों, तेव्हां मला काय वाटलें असेल? खिशांत दमडी नसतांना मी मुंबईला आलों काय नि महिना-पंधरा दिवसांच्या आंत एका मोठ्या स्टुडिओचा मालक झालों काय? सगळेंच जसें कांहीं

स्वप्नांत घडावें तसें झालें. माझ्या आयुष्यांतल्या सगळ्याच महत्त्वाच्या घटना जवळ जवळ अशाच आकस्मिक आणि अनपेक्षित रीतीनें घडलेल्या आहेत.

मुंबईमध्यें मराठी माणसाच्या मालकीचा तो पहिलाच चित्रपट स्टुडिओ होता. ह्या विचारानें तर स्वर्ग मला अक्षरशः दोन बोटें राहिला. स्टुडिओचा महिना खर्च त्यावेळीं अवघा पांच हजार रुपयांचा होता. छायालेखक नि ध्वनिमुद्रक ह्यांना फक्त सवाशें का दीडशें रुपये मासिक तनखा होता. संगीत दिग्दर्शक म्हणून माझे विद्यार्थीसदृश मित्र श्री. अण्णासाहेब माईणकर ह्यांची मी महिना चारशें रुपयांवर नेमणूक केली. पुढें कांहीं वर्षांनीं ज्यांचीं नांवें सिनेक्षेत्रांत प्रसिद्ध झालीं, अशीं श्रीधर पार्सेकरांसारखीं कित्येक वाद्यकुशल कलावंत माणसें त्या वेळीं मीं महिना पाऊणशें शंभर रुपयांवर नेमलीं. माझ्या साऱ्या संगीत विभागाचा मासिक खर्च बाराशें रुपयांच्या आंत-बाहेर होता.

माझे भागीदार हरिभाऊ मोटे हे हुंड्यांच्या व्यवहारांत अत्यंत तरबेज होते. त्यांच्यामुळें पैशाची आम्हांला कधींहि टंचाई पडली नाहीं. आम्ही स्टुडिओचे मालक झालों ही गोष्ट बाहेर ' बाजारांत ' समजतांच अनेक मुलतानी आपण होऊन आमच्या-कडे आले आणि त्यांनीं हुंड्यांवर हजारों रुपये आम्हांला दिले. त्यामुळें आर्. सी. ए. कंपनीचें सव्वा लाख रुपयांचें कोरें करकरीत ध्वनिमुद्रण यंत्र आम्हीं ताबडतोब खरेदी केलें.

' अत्रे पिक्चर्स 'च्या पहिल्या चित्रपटापुरता माझा भागीदार झालेला फकीरचंद जानकीदास आगरवाले ह्याला जेव्हां मीं स्टुडिओ घेतल्याचें समजलें, तेव्हां तो धांवत माझ्याकडे आला नि स्टुडिओच्या मालकींत आपल्यालाहि भागीदार घ्यावें असा तो माझ्याजवळ हट्ट धरून बसला.

मी त्याला म्हटलें, " मी तुला चित्रपटाच्या व्यवहारामध्यें आणि तें देखील एकाच चित्रपटापुरतें भागीदार घेतलेलें आहे. स्टुडिओशीं तुझा कांहीं एक संबंध नाहीं ! "

त्यावर तो संतापला नि म्हणाला, " मग ह्यापुढें मी तुमच्या चित्रपटाला आर्थिक मदत करणार नाहीं. "

मी तेवढ्याच आवेशानें म्हणालों, " तुझ्या पैशाची आतां मला मुळींच जरुरी नाहीं. पण तुला हें ठाऊक आहे ना कीं आपलें ठरल्याप्रमाणें पुढचे पैसे जर का तूं दिले नाहींस, तर तुझा पहिला दहा हजार रुपयांचा ॲडव्हान्स रद्द ( forfeit ) होतो."

" त्या दहा हजार रुपयांवर मी पाणी सोडतों ! " फकीरचंद ओरडून म्हणाला.

त्याप्रमाणें खरोखरच फकीरचंदानें त्या दहा हजार रुपयांवर पाणी सोडलें नि ती रक्कम फुकटांत माझ्या पदरांत पडली. ( फकीरचंदानें त्या रकमेसाठीं पुढें माझ्या-वर कोर्टांत दावा केला. पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. थोड्या दिवसांपूर्वींच

तो मरण पावला. )

चित्रमंदिरांत जसें मीं हरिभाऊ मोटे ह्यांना भागीदार घेतलें, त्याप्रमाणें 'अत्रे पिक्चर्स'मध्यें वनमाला ही माझी भागीदार झाली. प्रारंभी मीं चित्रपटाचें दिग्दर्शन स्वतःच करावयाचें ठरविलें होतें. पण पैशाच्या व्यवहारांत दिग्दर्शनासाठीं मला पुरेशी सवड, आणि मानसिक स्वास्थ्य मिळणार नाहीं म्हणून हरिभाऊ मोटे ह्यांच्या सूचनेवरून मीं गजानन जागिरदार ह्यांच्याकडे 'पायाच्या दासी'चें दिग्दर्शन सोपविलें. त्या चित्रपटांतील नायिकेची भूमिका अर्थातच वनमालेकडे होती. पण तिच्या 'सासू'च्या भूमिकेसाठीं मीं दुर्गा खोटे ह्यांची निवड केली; ती किती अचूक ठरली हें कालांतरानें सिद्ध झालेंच. हरिभाऊ मोटे ह्यांच्या 'आशा पिक्चर्स'च्या 'घरजांवई'चें दिग्दर्शन कुमारसेन समर्थ ह्यांनीं करावयाचें आणि त्याबरोबर चित्रमंदिरची व्यवस्थाहि पण त्यांनींच करावयाची असें ठरलें.

३१ ऑक्टोबर १९४० रोजीं दिवाळीच्या पाडव्याच्या सुमुहूर्तावर 'पायाची दासी' ह्या 'अत्रे पिक्चर्स'च्या पहिल्या बोलपटाचा मुहूर्त मोठ्या थाटामाटानें पार पडला. चित्रमंदिराच्या मध्यवर्ति स्टूडिओंत सकाळीं साडेआठ वाजतां सत्यनारायणाची पूजा माझे बाळपणीचे गुरुवर्य अण्णा लागवणकर ( वय ७५ ) ह्यांच्या हस्तें झाली. त्या प्रसंगीं तीनचारशें पाहुणे हजर होते. त्यामध्यें नानुभाई देसाई, बाबूराव पै, रामभाऊ तटणीस, पृथ्वीराज कपूर, काकासाहेब लिमये, शामराव भोळे हीं नांवें विशेष उल्लेखनीय होतीं. मुंबईच्या चित्र आणि पत्रव्यवसायांतील बहुतेक नामवंत माणसें उपस्थित होतीं.

चित्रपटाचा मुहूर्त बरोबर बारा वाजतां वनमालेच्या एका दृश्यावर झाला. रात्रीं पांचशें माणसांना मी थाटाचें भोजन दिलें. सारी मुंबई 'अत्रे पिक्चर्स'च्या नांवानें दुमदुमून गेली. अशा रीतीनें 'नवयुग चित्रपट' सोडल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांच्या आंत स्वतःच्या मालकीच्या स्टूडिओसह मी माझ्या चित्रपट-व्यवसायाची मुहूर्तमेढ मोठ्या दिमाखानें मुंबई शहरांत रोवली !

# ९

## दत्तू बांदेकर

'नवयुग चित्रपट' कंपनीच्या कार्याला आणि चित्रपटांना प्रसिद्धी मिळावी म्हणून 'साप्ताहिक नवयुग' मीं २१ जानेवारी १९४० रोजीं काढलें हें मागें सांगितलें. त्या पत्राचे संचालक म्हणून 'नवयुग चित्रपट' कंपनीचे एक तरुण डायरेक्टर चंदुलाल हिराचंद आणि सहसंपादक पां. वा. गाडगीळ ह्यांचीं नांवें त्या पत्रावर छापण्यांत आलीं. मॅनेजिंग एजन्सीमधील माझे सहकारी श्री. बापूराव राजगुरु ह्यांच्या 'राजगुरु प्रेस'मध्यें सदर पत्राच्या छपाईची व्यवस्था करण्यांत आली. १९४० च्या मे महिन्याच्या प्रारंभीं मी 'नवयुग चित्रपट लि.'मधून बाहेर पडलों. साहजिकच साप्ताहिक 'नवयुग'च्या छपाईचें काम मी 'राजगुरु प्रेस'मधून काढून तें १९ मे १९४० पासून माझे पुणें नगरपालिकेंतील मित्र श्री. अमृतराव ढेरे ह्यांच्या 'शिवाजी प्रिंटिंग प्रेस'मध्यें नेलें आणि 'संचालका'चें नांव अजिबात काढून टाकून त्या ऐवजीं व्यवस्थापक 'आर्.वाय्. वेलदे' ह्यांचें नांव घालण्यास प्रारंभ केला.

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत रत्नागिरीला भरलेल्या साहित्य संमेलनांत

प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं ‘ नवयुग ’वर कांहीं कारण नसतां व्यक्तिगत हल्ला चढविल्यापासून आमच्या नि त्यांच्या वादाला कशी सुरुवात झाली हें पूर्वी मी सांगितलें आहेच. केवळ ‘ नवयुग ’वर टीका करून प्रा. फडके थांबले नाहींत तर त्यांनीं मुंबईच्या ‘ चित्रा ’ साप्ताहिकाचे तरुण, विनोदी आणि लोकप्रिय संपादक दत्तू बांदेकर ह्यांच्या विरुद्धहि व्यक्तिगत प्रचाराची आघाडी उघडली. ‘ चित्रा ’ चे मालक श्री. रणछोडभाई लोटवाला हे एक विद्याव्यासंगी गुजराती गृहस्थ होते. प्रा. फडके हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी असल्यानें त्यांना लोटवाला ह्यांनीं पुष्कळशी आर्थिक मदत दिली होती आणि मुंबईच्या वास्तव्यांत आश्रयहि दिला होता. त्या ओळखीचा फायदा घेऊन प्रा. फडके ह्यांनीं श्री. लोटवाला ह्यांना एक पत्र लिहिलें. आणि त्यांत ‘ तुम्ही बांदेकरांना ताबडतोब काढून टाका. नाहीं तर ‘ पुण्याच्या विद्यार्थिनी ‘ चित्रा ’ विरुद्ध पिकेटिंग करतील ! ’ अशी त्यांनीं एक लोणकढी धमकी दिली. प्रा. फडके ह्यांचें तेंच मूळ इंग्रजी पत्र जसेंच्या तसें येथें देतों :

“ Your paper CHITRA is the worst sinner today in respect of vulgar humour. Humour of such a type that all our women will soon have to organise and rise in revolt against it. There is a movement afloat in Poona amongst the College-going girls to picket the stalls and check the sale of ‘ Chitra ’, because in each issue your editor slings dirty mud on women in general. I had invited Mr. Bandekar to attend the meeting, but he had ‘ no time ’. I have therefore to appeal to you that you must take up this matter immediately in your hands, and instruct Mr. Bandekar to stop that dirty feature which appears under the head-line ‘ Sakhya Hari ’.

“ He is perhaps taking advantage of your inability to understand Marathi thoroughly. But take it from me that Chitra is getting widely known as a paper with an editor who must be sexually a pervert and who therefore delights in vilifying women and outraging their modesty. Let me please know what steps you are taking. I would publicly thank you if that turbid feature ‘ Sakhya Hari ’ is discontinued by you by an instantaneous command. Otherwise as a President of the Literary Conference I shall have to issue to the press a clear censure of your paper.

" We have been friends for a long time and I would not like to bring into popular disfavour your paper. I am sure you will yourselves never encourage writing of the sort in which Bandekar indulges. Chitra must have dignity. I love the paper and hence I have to implore you to help me, instead of embarassing me. Awaiting your kind reply early. "

Yours Sincerely
(Sd.) **N. S. Phadke**

वस्तुतः, दत्तू बांदेकरांच्यावर प्रा. फडक्यांनीं हे जे सर्व आरोप केलेले आहेत ते त्यांच्या स्वतःच्या कादंबऱ्यांतील गलिच्छ लैंगिक वर्णनांना लागू पडतील. महाराष्ट्रांतल्या महिलांनीं आणि कॉलेज-कन्यकांनीं फडक्यांच्या कादंबऱ्यांविरुद्ध बंड करून उठावयाला हवें होतें नि फडक्यांच्या कादंबऱ्या किंवा कथा-वाङ्मय ज्या ज्या दुकानांत विकलें जात होतें त्यावर ' पिकेटिंग ' करावयाला हवें होतें. पण स्वतः शेण खाऊन दुसऱ्याच्या तोंडाला घाण येते, म्हणून कांगावा करणाऱ्या ढोंगी लोकांची जी एक जात असते ना; त्यांच्यापैकीं प्रा. फडके हे होत.

बिचारे बांदेकर, ते तसे स्वभावानें अत्यंत लाजाळू आणि भिडस्त होते. ते रहाणारे कारवारचे. सर्व शिक्षण त्यांचें कानडी भाषेंत झालें. घरांत ते कोंकणी बोलत असत. अठरा विश्वे दारिद्र्य त्यांच्या पाठीमागें लागलेलें. अशा परिस्थितींत केवळ खाजगी व्यासंगाच्या जोरावर त्यांनीं मराठी भाषेमध्यें विलक्षण प्रावीण्य मिळवून ते मराठी साहित्यांतले अग्रगण्य विनोदी लेखक बनले. ' सख्या हरि ' हें सदर म्हणजे शृंगार आणि विनोद ह्यांचा एक अपूर्व मनोहर नमुना त्यांनीं आपल्या स्वतंत्र प्रतिभेमधून निर्माण केलेला होता. मुंबईच्या चाळींत राहणारे मध्यमवर्गीय मराठी वाचक तर त्यांच्या ह्या ' सख्या हरी 'वर त्या काळीं बेफाम खूष होते. ' चित्रा ' म्हणजे ' बांदेकर ' आणि ' बांदेकर ' म्हणजे ' सख्या हरि ' हीं जणुं कांहीं त्या वेळीं समीकरणें होऊन बसलेलीं होतीं.

महाराष्ट्राच्या अशा एका नवोदित आणि प्रतिभाशाली तरुण लेखकाला साहित्यक्षेत्रांतून आणि पत्रव्यवसायांतून अजिबात उठवून लावण्याचा जेव्हां ह्या नतद्रष्ट आणि मत्सरी फडक्यांनीं चंग बांधला, तेव्हां मी दत्तू बांदेकरांच्या मदतीला धांवलों आणि फडके हा लेखक स्वतःच किती कामविकारानें पछाडलेला आहे हें दाखविण्यासाठीं त्यांच्या कथा–कादंबऱ्यांतील गलिच्छ उतारे मी शितरेंच्या शितरें भरून ' नवयुग 'मधून प्रसिद्ध करूं लागलों.

त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. दत्तू बांदेकरांनीं ' चित्रा ' साप्ताहिकाचें

हरि म्हणजे मस्ती आणि धुंदी. सख्या हरि म्हणजे उन्माद. सख्या हरि म्हणजे शृंगाराचा बादशहा. सख्या हरि म्हणजे जीवनाच्या जोबनवंतीवर तख्तनशीन झालेला शहेनशहा. सख्या हरीचा जन्म प्रथम गोकुळांत झाला. यमुनेच्या कांठावर रासक्रीडा खेळतां खेळतां बेभान झालेल्या व्रजयुवतींनीं धुंद नेत्रांनीं त्या श्यामल कृष्ण कन्हय्याला जेव्हां 'सख्या हरि' म्हणून हांक मारली, कुंजवनांतील शिलातलावर मुरलीचे सूर आळवीत बसलेल्या मुरलीधराच्या खांद्यावर बेहोष होऊन मान टाकतांना राधिकेच्या थरथरत्या ओठांतून जेव्हां 'सख्या हरि' असे शब्द निघाले, तेव्हांच आर्यावर्तांतील खऱ्या शृंगाराचा जन्म झाला. आणि तेव्हांपासूनच 'सख्या हरि'ला शृंगाराच्या सर्व संबोधनांचें पुढारीपण मिळालें. तेव्हांपासूनच कृष्ण हा तरुणांचा देव झाला व म्हातारे नि पेन्शनर लोक मारुतीची पूजा करायला लागले.

"म्हाताऱ्यांना वाटतें कीं श्रीकृष्ण जन्मभर राक्षसांशीं कुस्त्या खेळला आणि शेवटीं कुरुक्षेत्रावर त्यानें धाबळी नेसून भगवद्गीता सांगितली. असें जर कृष्णाचें स्वरूप असतें तर लोकांनीं त्याला 'हरि हरि' कृष्ण असें म्हटलें असतें. पण कृष्ण हा 'सख्या हरि' आहे; 'हरि हरि' नाहीं. शृंगारावांचून जीवनांत पुरुषार्थाचे पराक्रम होऊं शकत नाहींत; हा तेजस्वी संदेश आर्यावर्तांतील तरुणांना ह्याच 'सख्या हरी'नें दिला. श्रीकृष्ण हा गवळ्यांचा, शेतकऱ्यांचा किंबहुना बहुजनसमाजाचा देव असल्यानें हजारों वर्षें जनतेच्या ओठांवर खेळत असलेली शृंगारिक कविता ही ह्या 'सख्या हरि' कृष्णाला वाहिली आहे. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास 'सख्या हरि' हा लावणी वाङ्मयाचा नायक आहे.

"अलीकडे महाराष्ट्रांत पांढरपेशा वर्गांत एक ढोंगी पंथ निघालेला आहे. ह्या पंथांतील कांहीं प्रतिगामी वृत्तीच्या लोकांना प्रेम, शृंगार, चुंबन इत्यादि गोष्टी साहित्यांत आल्या कीं ते लोक झीट येऊन पडतात. 'कला' हा शब्द त्यांना 'कलावंतिणी'-इतका तिरस्करणीय वाटतो. तरुणांना जें जें आवडतें तें तें ह्यांना अश्लील, ग्राम्य, पावित्र्यविभंजक आणि संस्कृतिविध्वंसक वाटतें. ह्या पंथाच्या विचारसरणीची वाढ जर दिवसेंदिवस समाजांत होऊं लागली, तर समाज रुक्ष, म्हातारा आणि कर्तव्यशून्य होऊन जाईल अशी भीति मला वाटते. एवढ्याचसाठीं समाजाचें तारुण्य, चैतन्य, रंगेलपणा, शृंगार, विनोद आणि पराक्रम जागृत करणारें आणि शाबूत ठेवणारें वाङ्मय महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर निर्माण व्हावयाला पाहिजे.

"बांदेकरांचा 'सख्या हरि' हा लावणी वाङ्मयांतील 'सख्या हरी'चा गद्य आणि आधुनिक अवतार आहे. हा सख्या हरि मुंबईच्या एकाद्या सामान्य चाळीमध्यें आंबेवाडी, कांदेवाडी, चिखलवाडी ह्यांसारख्या मध्यमवर्गीय वसतीमध्यें रहात असतो. विसकटलेल्या केसांच्या झिज्या कपाळावर आलेल्या, रात्रौ जागरण झाल्यामुळें (किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें) डोळे तारवटलेले, अंगांत थोडासा

छिद्रायमान झालेला गंजिफ्रॉक पेहेरलेला, गळ्यांत सरीसारखें जानवें घातलेलें, तलम धोतराचा पुढचा सोगा निष्काळजीपणें खांद्यावर टाकलेला, पायांत फाटलेली वहाण, एका हातांत टमरेल आणि दुसऱ्या हातांत जळकी सिगारेट, तोंडांतून 'तुमने मुझको प्रेम सिखाया'च्या ललकाऱ्या निघत आहेत, अशा थाटांत सकाळीं सात साडेसातचे सुमारास ही 'सख्या हरि'ची स्वारी चाळीच्या सज्जांतून नळाच्या बाजूला जातांना कोणासहि दिसून येईल.

"गोकुळांतला तो 'सख्या हरि' दिवसभर यमुनेच्या तीरावर मुक्काम करून असे. कारण, पाणी भरावयाला येणाऱ्या गवळणींशीं मनमुराद थट्टामस्करी करावयाला त्याला इतकी सोयीस्कर जागा दुसरी कुठें मिळणार ! त्याचप्रमाणें विसाव्या शतकांतला हा चाळकरी 'सख्या हरि' चाळींतल्या नळावर बहुधा घुटमळतांना आढळून येईल. डोक्यावर नळाची धार सोडून हा दोन दोन तास तरी आंघोळ करीत बसतो. एवढ्या वेळांत पाणी भरण्यासाठीं आलेल्या 'मंडळीं'ना तो मोठ्या औदार्यानें संधि देत असतो. आणि आपल्या खेळाडू नि मनमिळाऊ स्वभावाचें जादा प्रदर्शन करून तो आजूबाजूच्या आपल्या ओळखी वाढविण्याच्य उद्योगांत असतो.

"फारसें शिक्षण न झाल्यामुळें सख्या हरीला कोणी नोकरीवर ठेवणें शक्य नसतें. म्हणून निरनिराळे धंदे करून आर्थिक दृष्ट्या हा स्वतंत्र रहाण्याचा प्रयत्न करीत असतो. कधीं कधीं हा फेरीवाला बनतो. आणि लुगडीं विकत चाळीचाळींतून दुपारीं (म्हणजे तिकडच्या स्वाऱ्या ऑफिसांत गेल्या असतांना) हिंडतो. अर्थात् सुंदर गिऱ्हाइकाकडून हा रोख कधींच घेत नसल्यामुळें, ह्याचा हा धंदा लवकरच आंतबट्ट्यांत येतो. खिशांत पैसे नसले तरी हा खुशाल इराण्याच्या हॉटेलांत जातो व पैशाऐवजीं इराण्याला टोपी देऊन एकाद्या कम्युनिस्टाप्रमाणें बोडक्यानें बाहेर येतो.

"शिवरात्रीच्या दिवशीं हा माधवबागेंत भांग पिऊन जातो. गटारी अमावस्या साग्रसंगीत साजरी करतो. साहित्यसंमेलनाची सबब सांगून हा रत्नागिरीला ताडी प्यायला जातो नि पुढें गोव्यालाहि एकादी चक्कर टाकून येतो. शिमग्याचा सण आला म्हणजे ह्याला हिंदुधर्माचा भयंकर उमाळा येतो. अंगांत रंगीत कपडे घालून हातानें डबा वाजवीत अन् तोंडानें अश्लील कोट्या करीत हा साऱ्या चाळींतून हिंडून येतो. सुंदर सुंदर पोरींकडे हा शिमग्याचें पोस्त मागावयाला जातो. प्रभातफेरी म्हटलें म्हणजे सख्या हरीच्या अंगावर रोमांच उठतात. चाळींतल्या प्रत्येक खोलींतल्या पोरींना हा भल्या पहांटे जाऊन स्वतः उठवतो. आणि गळ्यांत तबला-पेटी अडकवून आपल्या भसाड्या सुरांत 'उठा बंधुनो, उठा भगिनींनो' हें पालुपद गात हा ऐन बिनीला चालत असतो.

"एकूण बांदेकरांनीं चित्रित केलेला हा 'सख्या हरि' रंगेल, रोमँटिक, वात्रट, क्वचित् फाजील पण प्रामाणिक आणि खेळाडू असा एक गुंड तरुण आहे. त्याचें

संपादकत्व सोडून दिलें आणि तें माझ्याकडे आलें. श्री. पां. वा. गाडगीळ ह्यांच्याबरोबर 'नवयुग'चे सहसंपादक म्हणून मी २१ जुलै १९४० पासून त्यांचें नांव छापूं लागलों. त्याच अंकापासून त्यांचें 'सख्या हरि' हें सदर 'नवयुग'मधून प्रसिद्ध होऊं लागलें.

'नवयुग' मध्यें प्रसिद्ध झालेल्या त्या 'सख्या हरी'चा एक थोडासा नमुना येथें देण्यासारखा आहे. त्या वेळीं 'नवयुग' पुण्यामधून प्रसिद्ध होत होतें हें लक्षांत ठेवावें.

"माझ्या गुंड प्रियकरा, पुणें शहरांत सायकलवर बसून तू निरनिराळ्या बोळांतून आतां चक्कर मारतोस असें कळतें. तुझ्या सायकलीला ब्रेक नसल्यामुळें ती एकाद्या म्हशीवर किंवा बैलावर जाऊन आदळेपर्यंत थांबतच नाहीं म्हणतात. ह्याच सायकलीवर बसून तूं मंडईतून भाजी आणतोस म्हणे. गडकऱ्यांच्या 'फुलं वेंचलीं पण—' या चालीवर 'भाजी घेतली पण–' असा तुला प्रश्न पडून तूं फार हळहळतोस म्हणे. भाजी घेतली, पण ती द्यायची कोणाला ? अशी तुला विवंचना पडते. आणि मग हताश होऊन तूं ती रस्त्यावरच्या गायी-म्हशींना चारतोस. सख्या हरि, शोक करूं नकोस. भाजी म्हणजे कोण्या झाडाचा पाला ! ती म्हशीनें खाल्ली काय किंवा बायकोनें खाल्ली काय दोन्ही सारखेंच !"

'शितावरून भाताची परीक्षा' ह्या न्यायानें ह्या लहानशा विनोदी उताऱ्यावरून बांदेकरांच्या आल्हादकारक विनोदाची वाचकांना कल्पना येईल. आणि हा विनोद म्हणे 'ग्राम्य' आणि त्या विरुद्ध म्हणे बायकांनीं बंड करून उठावयाचें ! गाढवाला गुळाची नि फडक्यांना विनोदाची काय चव ?

बांदेकरांच्या विनोदाचा ह्याहिपेक्षां एक बहारीचा नमुना 'नवयुग'च्या १ सप्टेंबर १९४० च्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. तोहि प्रत्येकानें वाचण्यासारखा आहे.

तो आणि ती.
  तीं दोघेंहि नुकतींच
प्रेमांत पडलीं होतीं.
  तो अत्यंत प्रेमळ आणि
देखणा होता.
  तीहि अत्यंत प्रेमळ आणि
देखणी होती.
  तो रात्रीं दहा वाजतां
आपल्या खोलींत
  आला आणि कोट काढून
त्यानें खुंटीला लावला.
  ती रात्रीं दहा वाजून

पांच मिनिटांनीं खोलींत
आली आणि लुगडें बदलून
तिनें तें खुंटीला लावलें.
तो एक पुस्तक घेऊन पलंगाच्या
एका टोकाला वाचीत बसला.
तीहि एक पुस्तक घेऊन पलंगाच्या
एका टोकाला वाचीत बसली.
कांहीं वेळानें त्यानें पुस्तक फेकून दिलें.
आणि तो पलंगावर आडवा झाला.
तिनें दिवा मालवला आणि
तीहि पलंगावर आडवी झाली.
तो उजव्या कुशीवर झोपला.
ती डाव्या कुशीवर झोपली.
तो मुंबईत एका बोर्डिंग ॲण्ड
लॉजिंग हाऊसमध्यें होता.
ती पुण्यांत आपल्या घरीं होती.

असला फर्मास शृंगार आणि बहारीचा विनोद फडक्यांना दहा जन्मांत तरी कधीं लिहितां येईल काय ?

ह्याच सुमारास ' सख्या हरि ' हा दत्तू बांदेकरांचा लेखसंग्रह प्रसिद्ध झाला, त्याला मीं प्रस्तावना लिहिली. बांदेकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण विनोदाचें अत्यंत सूक्ष्म रसग्रहण मीं या ' प्रस्तावनें 'त केलेलें असल्यानें त्यांतला कांहीं भाग येथें देण्यासारखा आहे.

" अखेर शेवटीं ' सख्या हरि ' आला. मुंबईचा सख्या हरि पुण्याला आला, आणि आतां महाराष्ट्र-संचाराला निघाला. ' सख्या हरि ' म्हटलें कीं ढोंगी सनातनी लोकांच्या छातींत धसका बसतो. पेन्शनरांच्या घशांत बेडका अडकतो. तरुण वयांत आत्याबाई आणि काकूबाई बनलेल्या अविवाहित स्त्रिया कावऱ्याबावऱ्या होऊन पाहूं लागतात. पण जगण्यांत ज्यांना आनंद वाटतो, अशा हजारों तरुण-तरुणींच्या कानांवर ' सख्या हरि ' हें नांव पडतांच त्यांच्या काळजांत हर्षाचा चोरटा आणि तरल रोमांच उठतो. ' सख्या हरि ' म्हटल्यानंतर लावणी वाङ्मयांतील शृंगार-संगीताशीं परिचित असलेल्या मराठी बहुजनसमाजांतील प्रत्येक व्यक्तीचा चेहरा प्रफुल्लित झाल्यावांचून रहाणार नाहीं.

" कारण सख्या हरि म्हणजे तारुण्य. सख्या हरि म्हणजे रंगेलपणा. सख्या

हरि म्हणजे मस्ती आणि धुंदी. सख्या हरि म्हणजे उन्माद. सख्या हरि म्हणजे शृंगाराचा बादशहा. सख्या हरि म्हणजे जीवनाच्या जोबनवंतीवर तख्तनशीन झालेला शहेनशहा. सख्या हरीचा जन्म प्रथम गोकुळांत झाला. यमुनेच्या कांठावर रासक्रीडा खेळतां खेळतां बेभान झालेल्या व्रजयुवतींनीं धुंद नेत्रांनीं त्या श्यामल कृष्ण कन्हय्याला जेव्हां 'सख्या हरि' म्हणून हांक मारली, कुंजवनांतील शिलातलावर मुरलीचे सूर आळवीत बसलेल्या मुरलीधराच्या खांद्यावर बेहोष होऊन मान टाकतांना राधिकेच्या थरथरत्या ओठांतून जेव्हां 'सख्या हरि' असे शब्द निघाले, तेव्हांच आर्यावर्तातील खऱ्या शृंगाराचा जन्म झाला. आणि तेव्हांपासूनच 'सख्या हरि'ला शृंगाराच्या सर्व संबोधनांचें पुढारीपण मिळालें. तेव्हांपासूनच कृष्ण हा तरुणांचा देव झाला व म्हातारे नि पेन्शनर लोक मारुतीची पूजा करायला लागले.

"म्हाताऱ्यांना वाटतें कीं श्रीकृष्ण जन्मभर राक्षसांशीं कुस्त्या खेळला आणि शेवटीं कुरुक्षेत्रावर त्यानें धावळी नेसून भगवद्गीता सांगितली. असें जर कृष्णाचें स्वरूप असतें तर लोकांनीं त्याला 'हरि हरि' कृष्ण असें म्हटलें असतें. पण कृष्ण हा 'सख्या हरि' आहे; 'हरि हरि' नाहीं. शृंगारावांचून जीवनांत पुरुषार्थाचे पराक्रम होऊं शकत नाहींत; हा तेजस्वी संदेश आर्यावर्तातील तरुणांना ह्याच 'सख्या हरी'नें दिला. श्रीकृष्ण हा गवळ्यांचा, शेतकऱ्यांचा किंबहुना बहुजनसमाजाचा देव असल्यानें हजारों वर्षे जनतेच्या ओठांवर खेळत असलेली शृंगारिक कविता ही ह्या 'सख्या हरि' कृष्णाला वाहिली आहे. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास 'सख्या हरि' हा लावणी वाङ्मयाचा नायक आहे.

"अलीकडे महाराष्ट्रांत पांढरपेशा वर्गांत एक ढोंगी पंथ निघालेला आहे. ह्या पंथांतील कांहीं प्रतिगामी वृत्तीच्या लोकांना प्रेम, शृंगार, चुंबन इत्यादि गोष्टी साहित्यांत आल्या कीं ते लोक झीट येऊन पडतात. 'कला' हा शब्द त्यांना 'कलावंतिणी'-इतका तिरस्करणीय वाटतो. तरुणांना जें जें आवडतें तें तें ह्यांना अश्लील, ग्राम्य, पावित्र्यविभंजक आणि संस्कृतिविध्वंसक वाटतें. ह्या पंथाच्या विचारसरणीची वाढ जर दिवसेंदिवस समाजांत होऊं लागली, तर समाज रुक्ष, म्हातारा आणि कर्तव्यशून्य होऊन जाईल अशी भीति मला वाटते. एवढ्याचसाठीं समाजाचें तारुण्य, चैतन्य, रंगेलपणा, शृंगार, विनोद आणि पराक्रम जागृत करणारें आणि शाबूत ठेवणारें वाङ्मय महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर निर्माण व्हावयाला पाहिजे.

"बांदेकरांचा 'सख्या हरि' हा लावणी वाङ्मयांतील 'सख्या हरी'चा गद्य आणि आधुनिक अवतार आहे. हा सख्या हरि मुंबईच्या एखाद्या सामान्य चाळीमध्यें आंबेवाडी, कांदेवाडी, चिखलवाडी ह्यांसारख्या मध्यमवर्गीय वसतीमध्यें रहात असतो. विसकटलेल्या केसांच्या झिंज्या कपाळावर आलेल्या, रात्रौ जागरण झाल्यामुळें (किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें) डोळे तारवटलेले, अंगांत थोडासा

छिद्रायमान झालेला गंजिफ्रॉक पेहेरलेला, गळ्यांत सरीसारखें जानवें घातलेलें, तलम धोतराचा पुढचा सोगा निष्काळजीपणें खांद्यावर टाकलेला, पायांत फाटलेली वहाण, एका हातांत टमरेल आणि दुसऱ्या हातांत जळकी सिगारेट, तोंडांतून 'तुमने मुझको प्रेम सिखाया'च्या ललकाऱ्या निघत आहेत, अशा थाटांत सकाळीं सात साडेसातचे सुमारास ही 'सख्या हरि'ची स्वारी चाळीच्या सज्जांतून नळाच्या बाजूला जातांना कोणासहि दिसून येईल.

"गोकुळांतला तो 'सख्या हरि' दिवसभर यमुनेच्या तीरावर मुक्काम करून असे. कारण, पाणी भरावयाला येणाऱ्या गवळणींशीं मनमुराद थट्टामस्करी करावयाला त्याला इतकी सोयीस्कर जागा दुसरी कुठें मिळणार? त्याचप्रमाणें विसाव्या शतकांतला हा चाळकरी 'सख्या हरि' चाळींतल्या नळावर बहुधा घुटमळतांना आढळून येईल. डोक्यावर नळाची धार सोडून हा दोन दोन तास तरी आंघोळ करीत बसतो. एवढया वेळांत पाणी भरण्यासाठीं आलेल्या 'मंडळीं'ना तो मोठ्या औदार्यानें संधि देत असतो. आणि आपल्या खेळाडू नि मनमिळाऊ स्वभावाचें जादा प्रदर्शन करून तो आजूबाजूच्या आपल्या ओळखी वाढविण्याच्य उद्योगांत असतो.

"फारसें शिक्षण न झाल्यामुळें सख्या हरीला कोणी नोकरीवर ठेवणें शक्य नसतें. म्हणून निरनिराळे धंदे करून आर्थिक दृष्टया हा स्वतंत्र रहाण्याचा प्रयत्न करीत असतो. कधीं कधीं हा फेरीवाला बनतो. आणि लुगडीं विकत चाळीचाळींतून दुपारीं (म्हणजे तिकडच्या स्वाऱ्या ऑफिसांत गेल्या असतांना) हिंडतो. अर्थात् सुंदर गिऱ्हाइकाकडून हा रोख कधींच घेत नसल्यामुळें, ह्याचा हा धंदा लवकरच आंतबट्ट्यांत येतो. खिशांत पैसे नसले तरी हा खुशाल इराण्याच्या हॉटेलांत जातो व पैशाऐवजीं इराण्याला टोपी देऊन एकाद्या कम्युनिस्टाप्रमाणें बोडक्यानें बाहेर येतो.

"शिवरात्रीच्या दिवशीं हा माधवबागेंत भांग पिऊन जातो. गटारी अमावस्या साग्रसंगीत साजरी करतो. साहित्यसंमेलनाची सबब सांगून हा रत्नागिरीला ताडी प्यायला जातो नि पुढें गोव्यालाहि एकादी चक्कर टाकून येतो. शिमग्याचा सण आला म्हणजे ह्याला हिंदुधर्माचा भयंकर उमाळा येतो. अंगांत रंगीत कपडे घालून हातानें डबा वाजवीत अन् तोंडानें अश्लील कोट्या करीत हा साऱ्या चाळींतून हिंडून येतो. सुंदर सुंदर पोरींकडे हा शिमग्याचें पोस्त मागावयाला जातो. प्रभातफेरी म्हटलें म्हणजे सख्या हरीच्या अंगावर रोमांच उठतात. चाळींतल्या प्रत्येक खोलींतल्या पोरींना हा भल्या पहांटे जाऊन स्वतः उठवतो. आणि गळ्यांत तबला—पेटी अडकवून आपल्या भसाड्या सुरांत 'उठा बंधुनो, उठा भगिनींनो' हें पालुपद गात हा ऐन बिनीला चालत असतो.

"एकूण बांदेकरांनीं चित्रित केलेला हा 'सख्या हरि' रंगेल, रोमँटिक, वात्रट, क्वचित् फाजील पण प्रामाणिक आणि खेळाडू असा एक गुंड तरुण आहे. त्याचें

अगदीं थोडक्यांत वर्णन करावयाचें झाल्यास मी त्याला ‘ वात्रट आणि खेळाडू गुंड ’ असेंच म्हणेन. वाङ्मयाच्या दृष्टीनें ‘ सख्या हरी ’कडे बघावयाचें झाल्यास प्रत्येक वाक्यावाक्यांतून वाहणारा तारुण्याचा निरागस प्रवाह आणि खळखळाट आणि त्यांतून अंगावर उडणाऱ्या वात्रट विनोदाचा थंडगार शिडकावा वाचकांच्या अंगावर आनंदाचे रोमांच निर्माण केल्याशिवाय रहाणार नाहीं. रेखीव आणि डौलदार भाषा, कलात्मक लेखनपद्धति, सूक्ष्म अवलोकनशक्ति आणि खुसखुशीत पण खोंचक विनोद हें ‘ सख्या हरी ’च्या प्रतिभाशाली लेखनाचें तेजस्वी गुणवैशिष्ट्य आहे. ‘ देवळांत आणि हॉटेलांत स्त्रिया आणि छत्र्या नेहमीं हरवल्या जातात ’, ‘ बायकांना बरोबर नेल्याखेरीज गर्दीत तिकिट मिळत नाहीं, ’ ‘ कुरूप वेश्या आणि खोटीं नाणीं रात्रींच चालतात ’, ‘ प्रेम हें एखाद्या चित्रपटाप्रमाणें चारपांच आठवड्यांपेक्षां जास्त काळ टिकत नाहीं ’, ‘ स्त्री ही इस्त्रीसारखी आहे, एकदां बिघडली कीं ती कायमची बिघडली ’ अशा तेजस्वी सुभाषितांची आल्हाददायक पखरण ठिकठिकाणीं वाचकांना आढळून येईल.

“ शृंगार व विनोद ह्यांचें गुलाबपाणी बांदेकराच्या प्रत्येक वाक्यावाक्यावर शिंपडलेलें असल्यानें त्याच्या सुगंधानें क्षणभर आपलें देहभान विसरल्यासारखेंच कोणालाहि वाटेल. आणि डोकें धुंद होईल. विश्रामधामांतील म्हाताऱ्या मंडळींनीं ‘ जवानमर्द मोदक ’ खाण्याऐवजीं रोज सकाळीं ‘ सख्या हरि ’ वाचण्याचा परिपाठ ठेवला तर हिमालयाची चक्कर वांचून घरबसल्या कायाकल्पाचें पुण्य त्यांच्या पदरीं पडल्याशिवाय रहाणार नाहीं. आतां वाङ्मयाकडे मनोरंजनापेक्षां उपदेशाच्या अपेक्षेनें पहाणाऱ्या वाचकांना सख्या हरीकडून बोध असा काय मिळणार ? तथापि, त्याहि दृष्टीनें पाहिलें तरी पुस्तकी शिक्षणाच्या निष्क्रिय वातावरणांत दुबळ्या होत चाललेल्या आजच्या तरुण पिढीला ‘ खेळाडू गुंड व्हा ’ हा महत्त्वाचा संदेश ‘ सख्या हरी ’नें दिलेला आहे — आणि हा संदेश मोलाचा नाहीं असें कोणी म्हणूं शकेल काय ? ”

ह्या माझ्या प्रस्तावनेवरून बांदेकरांच्या ‘ सख्या हरी ’चें स्वरूप काय असेल ह्याची आजच्या वाचकांना कल्पना येईल. ‘ नवयुग ’, ‘ चित्रा ’ किंवा ‘ विविध-वृत्त ’ हीं साप्ताहिकें अश्लील आणि व्यक्तिद्वेषानें बरबटलेलीं आहेत अशी स्वतःची समजूत करून घेऊन प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं ‘ अश्लीलतेपासून आणि व्यक्तिद्वेषापासून अलिप्त ’ अशा आव्हानात्मक मथळ्याखालीं आपलें स्वतःचें ‘ झंकार ’ नांवाचें एक पडेल साप्ताहिक काढलें.

‘ आप्पां ’च्या ह्या ‘ झंकार ’वर ‘ नवयुग ’मध्यें बांदेकरांनीं एक बहारीचें विडंबन काव्य लिहून त्याचें स्वागत केलें. त्यांतलीं दोन तीन कडवीं येथें देण्यासारखीं आहेत :

हें कोण बोललें बोला ?
झंकार आमुचा पडला !
दुर्दैव नगाच्या शिखरीं,
आप्पा अन् कमलाताई;
तें हृदय कसें अप्पांचें,
मी उगाच सांगत नाहीं,
जें लिहितांनाही रडतें,
पडतांच कसें मग होई ?
हें कुणी कुणा सांगावें,
संपादक रडव्या ठावें,
आप्पांच्या गांवा जावें;
मग ऐकावें या बोला,
झंकार आमुचा पडला !
मांडीवर पडला अंक,
तो हृदया धक्का बसला,
होऊनी कळस शोकाचा,
सोडिलें धूम्रवलयाला
टकमका बघत मग राही,
प्रिय शिष्येच्या मुखकमला !
'टांकाच्या फेंकी' देखा,
ते उचके ठसके शिंका,
खरडिले बहुतची लेखा
परि कोण विचारी त्याला ?
झंकार आमुचा पडला !
हें असें जाहलें म्हणतां,
एजंटच निजला कां हो ?
जरि निर्दय होउनि निजला,
आळवीन फोडुनि टाहो,
कीं विका अंक दिडकीला,
परि अब्रू माझी राहो,
ते 'भिडे' आणखी 'ओक'
नालायक सारे लोक
किती किती करावा शोक ?

नाहींच दया कोणाला,
झंकार आमुचा पडला !

'झंकार'च्या प्रारंभापासून 'नवयुग'चा नि त्याचा अगदीं उभा दावा ठरून राहिला होता. त्याचा वृत्तान्त यथाक्रम पुढें येईलच. ऑगस्ट १९४० पासून माझा मुक्काम मुंबईतच होता. तेव्हां 'साप्ताहिक नवयुग' मुंबईला आणण्याच्या खटपटींत मी होतों. त्या माझ्या खटपटीला यश येऊन मीं ८ डिसेंबर १९४० चा 'नवयुग'चा अंक माझे मित्र रावसाहेब पारकर ह्यांच्या 'न्यू जॅक प्रिंटिंग प्रेस'मध्यें छापून मुंबई येथें प्रसिद्ध केला.

'नवयुग'चा सारा संपादकीय आणि नोकरवर्ग मी पुण्याहून मुंबईला घेऊन आलों. पण दत्तू बांदेकरांनीं पुणें सोडून मुंबईला यावयाचें साफ नाकारलें. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या प्रा. फडक्यांशीं नि त्यांच्या 'झंकार'शीं त्यांचा उभा दावा होता, त्यांच्याच त्या पत्रांत त्यांनीं संपादकीय नोकरी पत्करली. बांदेकरांचा हा विक्षिप्तपणा बघून मला तर हंसावें का रडावें हेंच कळेना. पण बांदेकरांचा तो मुळीं स्वभावच होता. एकदां त्यांच्या डोक्यांत एकादी गोष्ट आली कीं ती काढून टाकणें ब्रह्मदेवाच्या बापालाहि शक्य नाहीं.

मुंबईला आलों नि 'नवयुग'ला दुसरा टोला बसला. पां. वा. गाडगीळ 'नवयुग' सोडून गेले आणि शांतिलाल शहांच्या दैनिक 'लोकमान्या'चे संपादक झाले. त्यांच्या जागीं मीं माझे मित्र प्रा. अनंत काणेकर ह्यांची योजना केली.

'झंकार'मध्यें दत्तू बांदेकर अवघे दोनच महिने टिकले. फडक्यांशीं त्यांचें कालत्रयीं जमणें शक्य नव्हतें. पुण्याची नोकरी सोडून मुंबईला आल्यानंतर एकदां रस्त्यामधून ते भ्रमिष्टासारखे हिंडत असतांना मला दिसले. मीं एकदम मोटर थांबविली आणि त्यांना जबरदस्तीनें मोटरींत घालून सरळ 'नवयुग'च्या ऑफिसमध्यें नेऊन बसविलें. तेव्हांपासून ते पुढें माझ्याजवळ सतत वीस वर्षें होते. मृत्यूनें त्यांना ओढून नेलें म्हणूनच ते माझ्या हातून निसटले.

दत्तू बांदेकरांच्या एकेक गंमती सांगितल्या तर हंसून हंसून मुरकुंड्या वळतील ! सांगेनच मी त्या पुढें !

# १०

## ‘ गच्छ, सूकर भद्रं ते ’

२० जानेवारी १९४१ रोजीं ‘ साप्ताहिक नवयुग ’चा पहिला वाढदिवस माझ्या ‘ चित्रमंदिर ’ स्टुडिओंत मोठ्या थाटा-माटानें साजरा करण्यांत आला. अध्यक्ष-स्थानीं ‘ ज्ञानप्रकाश ’चे सुप्रसिद्ध संपादक आणि माझे परममित्र काकासाहेब लिमये ह्यांची योजना करण्यांत आली होती. ह्या समारंभास मुंबईतल्या वृत्तपत्र व्यवसायांतली आणि चित्रपट व्यवसायांतील नामवंत मंडळी उपस्थित राहिली होती.

मुंबईमधला महाराष्ट्रीयाच्या मालकीचा एकत्र एक स्टुडिओ पाहून प्रत्येकजण हर्षभरित अंतःकरणानें माझें अभिनंदन करीत होता. स्टुडिओच्या निरनिराळ्या भागांत ‘ घरजांवई ’ नि ‘ पायाची दासी ’ या दोन आगामी चित्रपटांसाठीं उभारलेलीं आधुनिक पद्धतीचीं भव्य सेटिंग्ज येणाऱ्यांचें लक्ष सकृद्दर्शनींच आकर्षित करीत होतीं. प्रारंभीं चित्रमंदिरातर्फे आलेल्या सर्व साहित्यिकांचा, वृत्तपत्रकारांचा नि पाहुण्यांचा ‘ ग्रुप फोटो ’ काढण्यांत आला आणि नंतर समारंभाला सुरुवात झाली.

सर्वांचें स्वागत करतांना मी म्हणालों, “ नवयुग ’च्या लिखाणाबद्दल अनेक

जणांचा मतभेद होणें शक्य आहे. तो मतभेद बाजूला ठेवून आपण सर्वजण येथें आलांत याबद्दल मी आभारी आहें. वृत्तपत्रीय लिखाण अनेक वेळां अनेक कारणांमुळें मनांत नसलें, तरी लिहावें लागतें. यामुळें त्या लेखांतील मतें हीं सर्वतोपरी आपणांस मान्यच असतात, असें कोणीहि समजण्याचें कारण नाहीं. महायुद्धामुळें कागदाची महागाई, पुण्याहून मुंबईला स्थलांतर अशा अनेक अडचणी सोसूनहि 'नवयुग'नें एका वर्षांत सारा महाराष्ट्र गर्जून सोडला. 'नवयुग'चा प्रसार, प्रचार आणि पराक्रम केवळ माझा एकट्याचा नसून त्यांत अनेक भागीदार आहेत!"

अध्यक्षीय भाषणांत काकासाहेब लिमये म्हणाले, "आचार्य अत्रे ह्यांच्या जीवनांत कर्तबगारीचीं अनेक अंगें आहेत. साहित्यिक, नाटककार, कवि, चित्रपट-कथालेखक नि निर्माते, सार्वजनिक पुढारी व या सर्वांवर शोभायमान करणारे धडाडीचे संपादक म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखीत आहे. साहित्यिक नुसती ग्रंथनिर्मितीच करून थांबत नाहींत. तर ते वृत्तपत्रव्यवसायांत पडून राजकारण करूं लागले आहेत, हें आचार्य अत्रे ह्यांच्या 'नवयुग'नें सिद्ध केलें आहे. राजकारण, समाजकारण व वृत्तपत्रव्यवसाय ह्यांची अशी सांगड घालण्याचें श्रेय आचार्य अत्रे ह्यांना द्यावेंसें वाटतें."

ह्या प्रसंगीं अभिनंदनपर संदेशांचा नि पत्रांचा महाराष्ट्रांतून 'नवयुग'वर वर्षाव झाला. तथापि, त्या सर्व पत्रांमध्यें प्रा. बापूसाहेब माटे ह्यांचें पत्र अत्यंत भावनापूर्ण होतें. 'अत्रे–माटे' वादामुळें त्यांचे नि माझे संबंध जरी कितीहि दुरावलेले असले, तरी माझ्यावर त्यांचा किती लोभ होता, हें त्या पत्रावरून कळून येण्यासारखें आहे; म्हणून तें सर्वच्या सर्व पत्र मुद्दाम येथें देतों :

"श्री. प्रल्हादपंत अत्रे यांस—

सा. न. वि. वि. 'नवयुग'च्या वाढदिवस-समारंभास यावें असें आमंत्रणाचें पत्र काल पोहोंचलें. आमंत्रणाबद्दल आभारी आहें. आभाराचें तांत्रिक पत्र धाडावयाचेंहि कसेंसेंच वाटतें. आपण दोघे एकमेकांपासून दूर गेलों, याबद्दल वाईट वाटतें. तुमच्या सार्वजनिक परिभ्रमणांत तुमची व माझी पुन्हां गांठ पडली तर मला मनापासून आनंद होईल. सार्वजनिक जीवनाच्या कल्पना आणि साहित्यिक ध्येयवाद व आग्रह या बाबतींत आपण दोघेहि अभिमानी असल्यामुळें आपलें दुरावणें हें ओघानेंच प्राप्त झालें. आणखी काय काय होत जाईल ह्याचा अजमास करवत नाहीं. पण कांहीं झालें तरी आपल्या-बद्दलचा माझ्या मनांतील गूढस्थ भाव अगदीं मूळच्यासारखाच जिवंत आहे. माझ्या संबंधानें आपण काय मानून आहां हें कल्पनेनें ओळखितां येतें. पण अजमास चुकीचा ठरण्याचा संभव असल्यामुळें कागदावर नमूद करवत नाहीं. आपल्या पत्राविषयीं माझें मत चांगलें नाहीं. एक सर्वोत्तम, बुद्धिमान् आणि प्रतिभा-

शाली माणूस वहावलेला आहे व तो याचा संपादक आहे, एवढेंच माझें मत आहे. अत्रे, असें म्हणूं नये तर काय करावें? उगाच कांहीं तरी खोटें व तोंडदेखलें लिहावें? मी तें आजन्म शिकलों नाहीं. तुमच्या सुखप्रद व आल्हादकारक संगतीचें स्मरण पुष्कळदां होतें. मला एकदां असेंहि वाटलें होतें कीं, आपल्याला कांहीं सार्वजनिक कामें एकत्र करतां येतील. पण – पण तें व्हावयाचें नव्हतें. वाङ्मयप्रेम, विनोदबुद्धि, परस्पर प्रेमभाव एवढीच आपली सामान्य भूमिका आहे असें दिसून आलें. माझीं मतें, ज्ञान, माझे कल, आग्रह कायम झालेले होते. तुमचे अर्धप्रवाही होते. त्यामुळें भलत्याच ठिकाणीं घर्षण होतांच विपरीत झगडा झाला. बरें, तेवढ्यावर संपलें म्हणावें, तर तुमचें नित्य नवें कांहीं तरी निघतें व तें व्यक्तिजीवनाच्या व सार्वजनिक ध्येयवादाच्या माझ्या कल्पनांशीं विसंगत ठरतें. आतां याला काय करावें? असो. पत्रद्वारां का होईना तुमच्याशीं मनमोकळेपणानें बोलल्यामुळें बरें वाटलें. देव तुम्हांस सुखी ठेवो!"

विरोध असतांनाहि प्रतिपक्षावर मनापासून माया करणारे कुठें प्रा. माट्यां-सारखे महापुरुष तर दुसऱ्यांच्या गुणांशीं अकारण वैर नि मत्सर करणारे कुठें प्रा. फडक्यांसारखे क्षुद्र आणि हीन मनोवृत्तीचे लेखक! १९४० च्या मे महिन्यांत रत्नागिरी साहित्य संमेलनामध्यें प्रा. फडके ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'नवयुग'वर आग पाखडल्यापासून त्यांचा नि माझा जो वाद सुरू झाला तो १९४१ च्या प्रारंभापासून पराकाष्ठेचा विकोपाला गेला. 'नवयुग'शीं स्पर्धा करण्यासाठीं म्हणून फडक्यांनीं 'झंकार' साप्ताहिक काढलें. ह्या साप्ताहिकाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तिशः माझ्या आणि महाराष्ट्रांतल्या इतर लोकप्रिय साहित्यिकांच्या नांवानें दर शनिवारीं 'शिमगा' करावयाचा हा होता. 'व्यक्तिगत आणि अश्लील टीके-पासून अलिप्त' अशी डोक्यावर पाटी लावून जास्तींत जास्त वैयक्तिक आणि गलिच्छ टीका किती करतां येईल ह्याचें हिडीस प्रात्यक्षिक आठवड्याच्या आठवड्याला आपल्या 'झंकार'मधून प्रा. फडके हे दाखवीत होते.

वस्तुतः, तात्यासाहेब केळकरांसारख्या साहित्याचार्यांची टवाळी करण्याची फडके ह्यांना कांहीं जरुरी होती का? पण 'झंकार'च्या एका अंकांत 'हिंदी साहित्य संमेलना'मध्यें तात्यासाहेब हे हिंदीमध्यें भाषण करीत आहेत अशी कल्पना करून 'हिंदीमध्यें भाषण वाचतांना तात्यांच्या उच्चाराच्या जेव्हां चुका होऊं लागल्या तेव्हां मग शेवटीं फजिती होऊन ते मराठींत बोलावयाला लागले.' अशी त्यांची टवाळी करून "यापुढें हिंदी चांगलें बोलतां यावें म्हणून एखाद्या चित्रपटांत काम करण्याचा 'चान्स' त्यांनीं मिळवावा" अशी फडक्यांनीं त्यांना सूचना केली होती. तात्या-साहेबांसारख्या वयोवृद्ध साहित्यिकाची अशा तऱ्हेनें विटंबना फडक्यांनीं करावी ह्याची मला साहजिकच चीड आली. म्हणून मीं 'नवयुग'च्या एका अग्रलेखांतून

फडक्यांना जाहीरपणें विचारलें कीं, " तात्यासाहेबांच्या हिंदीच्या चुका काढायला तुमची आई कानपूरची होती का बाप लखनौचा होता ? "

' झंकार 'च्या दुसऱ्या एका अंकांत त्यांनीं वि. स. खांडेकरांवर पुढीलप्रमाणें चुटका लिहिला. एक दुसऱ्याला विचारतो, ' तुझें नांव काय ? ' दुसरा म्हणतो, ' खांडेकर ! ' पहिला म्हणतो, ' सबंध नांव सांग ! ' दुसरा म्हणतो, ' वि. स. खांडेकर. ' तेव्हां पहिला म्हणतो, ' अरे वा, बरेंच प्रसिद्ध नांव आहे तुझें ! ' तेव्हां दुसरा उत्तरतो, ' होय साहेब, आज दोन वर्षें इथं मी वर्तमानपत्रें विकतों आहें ! '

त्यावर मींहि ' नवयुग 'मध्यें फडक्यांवर पुढीलप्रमाणें ' चुटका ' लिहिला.

एक : तुझें आडनांव काय रे ?

दुसरा : फडके.

एक : कोण फडके ?

दुसरा : ना. सी. फडके.

एक : अरेच्या, तुझें नांव ऐकल्यासारखें वाटतें.

दुसरा : म्हणजे काय ? गेलीं दोन तीन वर्षें तुमचा शौचकूप मी साफ करतों नव्हे का ?

' वि. स. खांडेकर ' हा एक वर्तमानपत्रें विकणारा कोणी पोऱ्या असला, तर ' ना. सी. फडके ' ह्या नांवाचा एकादा भंगी महाराष्ट्रांत असणें कांहीं अशक्य नव्हतें. पुण्यांत पूर्वी ' पांगारकर ' आडनांवाचा एक चांभार नव्हता का ?

महाराष्ट्रांत् पूर्वी पुरुषोत्तम मंगेश लाड आय्. सी. एस्. ह्या नांवाचे अत्यंत विद्वान् आणि रसिक न्यायाधीश होऊन गेले. त्यांनीं ' वसंत व्याख्यानमालें 'त प्रा. फडक्यांच्या साहित्यिक तत्त्वज्ञानावर टीका केली. त्याबरोबर फडक्यांनीं आपल्या ' झंकार 'मधून त्यांच्यावर पुढीलप्रमाणें शिव्यांची खैरात केली. ' लाडसाहेब सरकारी नोकर आहेत. ते वायकांत वडबडणारे न्यायाधीश आहेत. रोजच्या काळ्या झग्याचा कंटाळा आल्यामुळें तो टाकून देऊन विदूषकाचा पोषाख घातलेले ते विद्वान् आहेत. ते रामदासांनीं सांगितल्याप्रमाणें एक पढतमूर्ख आहेत. इ. इ. ' कुठें लाड ? कुठें फडके ! कोठें सरस्वतीच्या मुकुटावरील तुरा ? नि कुठें तिच्या मंदिराच्या उंबरठ्यावर मारलेला नाल ? लाडांसारख्या व्यासंगी आणि तेजस्वी विद्वानाला विदूषक आणि पढतमूर्ख म्हणणाऱ्या माणसाच्या अंगांत सभ्यता किंवा माणुसकी औषधापुरती तरी शिल्लक उरलेली आहे, असें चुकून तरी कोणास वाटेल काय ?

पण ह्या सर्व साहित्यिकांपेक्षां सुप्रसिद्ध लघुकथा-लेखक य. गो. जोशी ह्यांच्यावर फडके ह्यांनीं बदनामीचा जो शेणसडा ओतला, तो म्हणजे हलकटपणाचा उच्चांक होता. ' साहित्यिकांची सफर ' ह्या य. गों. च्या नवीन पुस्तकाचें परीक्षण करण्याच्या मिषानें फडके ह्यांनीं आपल्या मनांतली जोशीबुवांवरची सारी मळमळ आणि खळखळ

ओकून त्यांच्यावर सूड उगवण्याचा निकरानें प्रयत्न केला. ऐका तर हीं फडक्यांचीं मुक्ताफळें :

“ जोशीबुवा मेले तर पुण्याबाहेरचें कुत्रें सुद्धां गळा काढणार नाहीं. त्यांचें लेखन भांग्या मारुतीछाप असतें. ते साहित्य-भडभुंजी आहेत. ते दुसऱ्यांच्या घरीं जाऊन फुकट चहा ढोसतात. पैशाच्या मोबदल्यासाठीं ते अडून बसतात. ”

त्यावर आम्हीं ‘ नवयुग ’ मध्यें लिहिलें, “ जोशीबुवा मेले तर पुण्याबाहेरचीं कुत्रीं रडणार नाहींत, ही गोष्ट खरी आहे. कारण कुत्र्यांचा नि त्यांचा काय संबंध ? पण फडके मेले तर मात्र महाराष्ट्रांतील अनेक ‘ कुत्र्या ’ ओक्साबोक्शी रडतील ही गोष्ट अगदीं खरी आहे. य. गो. चें लेखन ‘ भांग्या मारुतीछाप ’ तर फडक्यांचें लेखन ‘ [illegible]नाळ बालाजी छाप ’ असेंहि म्हणतां येईल. य. गो. चहा ढोसतात, तर फडके र[illegible] मं[illegible]काळीं कोल्हापूरच्या एका डॉक्टराच्या ‘ डिस्पेनरी ’त जाऊन काय ढोशीत [illegible] ? पैशासाठीं अडून बसण्याच्या कामीं य. गो. पेक्षां फडक्यांचाच बदलौकिक [illegible]ट्टांत जास्त आ[illegible]. व्ही. पी. नें कादंबरीचीं प्रकरणें य. गों. नीं पाठवल्याचें के[illegible]त नाहीं. दुसऱ्या वर्गाचा प्रवासखर्च घेऊन तिसऱ्या वर्गानें व्याख्याना[illegible] [illegible]च्या हलकट [illegible]टसरीबद्दल य. गों. ची कांहीं ख्याति नाहीं. साहित्यसंमेलना[illegible]यक्षांच्या किरकोळ खर्चाच्या बिलांत चटोर शिष्येच्या फुलांच्या वेण्यांचा खर्च य. गों. [illegible]वल्याचें ऐकिवांत नाहीं. एवंच फडक्यांनीं हल्लीं कमरेची विजार सोडून तिचें ज[illegible]किट केलेलें दिसतें आहे. ”

हें झालें बाकीच्या साहित्यिकांबद्दलचें. आतां आमची नि फडक्यांची जी [illegible]गश्चक्री झाली तिची हकीगत सांगतों.

१९४१ च्या जानेवारींत ‘ प्रभात कंपनी ’ चा व्ही. शांताराम-दिग्दर्शित ‘ शेजारी ’ हा बोलपट प्रसिद्ध झाला. ह्या चित्रपटावर ‘ नवयुग ’ मध्यें मीं सहा टीकालेख लिहिले. चित्रपटाचें वाङ्मयीन परीक्षण कसें करावें याचा मराठी साहित्यांतला तो पहिलाच प्रयत्न होता. शांतारामबापूंच्या त्या बोलपटांत ‘ तंत्र ’ होतें पण ‘ मंत्र ’ नव्हता. हीच गोष्ट आम्ही आमच्या सहा लेखांकांत विस्तारानें सांगितली होती. शांतारामबापूंवर आम्हीं टीका केली एवढी एकच गोष्ट आमच्यावर हल्ला करावयाला फडके ह्यांना पुरेशी होती.

तेवढ्यांत आमचा ‘ घरजांवई ’ हा चित्रपट मुंबईच्या ‘ वेस्ट एण्ड ’ चित्रगृहांत प्रदर्शित झाला. मग काय विचारतां ? शांतारामबापूंच्या भाडोत्री एजंटाचा आव आणून एखाद्या गिधाडासारखे फडके आमच्या त्या चित्रपटावर हिरीरीनें तुटून पडले आणि ‘ वेस्ट एण्ड ’ शब्दावर गलिच्छ कोटी करून त्यांनीं ‘ झंकार ’ मध्यें आपल्या सभ्यतेचा साक्षात् शौचकूपच खुला केला. त्यांनीं लिहिलें कीं, ‘ वेस्ट एण्ड ’ सिनेमांत लागलेल्या ‘ घरजांवई ’ चित्रपटानें ‘ ऊर्ध्वाय दिशे ब्रह्मणे नमः ’ म्हणून ‘ मागील

एण्ड ' गांठलें आहे. ' वेस्ट एण्ड 'मध्यें हें ' पश्चिम एण्ड ' गांठलें जात असतां अजूनहि ' प्रभात ' हजारों लोकांच्या साक्षीनें उगवत आहे. '

त्यावर ' अखेर फडके ह्यांनीं आपलें पश्चिम एण्ड उघडलें ' ह्या मथळ्याखालीं ' नवयुग 'मध्यें एक झणझणीत लेख लिहून मीं फडक्यांना जाहीरपणें वजावलें कीं, " राजरोसपणें तुम्ही आपल्या पत्रांत पश्चिम एण्डची भाषा करीत आहांत, एवढा तुम्हांला आपल्या पश्चिम एण्डचा काय म्हणून अभिमान वाटावा? याद राखा, तुम्ही जें हें कमरेचें सोडून आपल्या ' पश्चिम एण्ड 'चें जाहीर प्रदर्शन चालवलेलें आहे, त्याचें उत्तर महाराष्ट्रांतले शेकडों स्वाभिमानी स्त्रीपुरुष तुमच्या ' पश्चिम एण्ड 'वर चपलांचा भडिमार करून देतील हें पक्कें लक्षांत ठेवा. अजून जर तुम्ही ताळ्यावर आलां नाहींत तर तुमचीं सारीं ' एण्डस् ' बंद करून तुम्हांला महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामधून नेस्तनाबूद करून टाकणें भाग पडेल ! "

हा अत्रे-फडके वाद आतां भलत्याच थराला चालला आहे, अशा भयानें श्री. वा. रा. ढवळे, माधव मनोहर, दि. वि. आमोणकर आणि डॉ. अ. ना. भालेराव ह्यांनीं आम्हां दोघांना उद्देशून पुढीलप्रमाणें एक जाहीर पत्रक काढलें. " प्रा. फडके व श्री. अत्रे हे दोघेहि मराठी साहित्याचे अग्रगण्य पुढारी आहेत. दोघेहि व्यक्तिशः समंजस आहेत. ह्या दोघां श्रेष्ठ साहित्यिकांनीं परस्पर चिखलफेक करण्यांत आपल्या प्रतिभेचें सार्थक समजावें ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा परिस्थितींत मराठी साहित्याचे जे असंख्य वाचक आहेत, त्यांच्या वतीनें आम्ही प्रा. फडके व श्री. अत्रे ह्यांना अशी नम्र विनंती करतों कीं, अतःपर हा वैयक्तिक वाद त्यांनीं अविलंब बंद करावा. ज्यांना आम्ही ही प्रार्थना करीत आहोंत, त्यांच्या सत्प्रवृत्तीवर आमचा अढळ विश्वास आहे. "

मीं ह्या मंडळींना जाहीर हमी दिली कीं, " मूळ वाद कांहीं मीं सुरू केलेला नाहीं. तो फडके ह्यांनीं रत्नागिरी साहित्य संमेलनांत प्रथम सुरू केला. म्हणून त्यांच्या टीकेला उत्तर देणें मला भागच पडलें. आतां तुमची इच्छाच असेल तर फडके ह्यांच्यावर एक अक्षरहि मी लिहिणार नाहीं. पण फडके अशा तऱ्हेनें ग्वाही द्यावयाला तयार आहेत काय ? "

ह्याच सुमारास वि. स. खांडेकरांच्या अध्यक्षतेखालीं सोलापूर येथें ' महाराष्ट्र साहित्य संमेलन ' भरलें. वस्तुतः, रत्नागिरीच्या साहित्य संमेलनापासून माझें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलें जात होतें. सोलापूरच्या साहित्य संमेलनाच्या वेळीं ' अत्रे-फडके ' वाद अगदीं ऊतू आला होता. म्हणून वामन मल्हार जोशांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकांनीं माझ्या नांवाला विरोध केला. आणि खांडेकरांची निवड झाली. तो जणुं कांहीं ' अत्रे ' ह्यांचा पराभवच होता अशा आनंदानें फडक्यांना स्वर्ग जणुं कांहीं ' दोनच बोटें ' उरला.

‘झंकार’मध्यें ज्या खांडेकरांची तुलना फडके ह्यांनीं ‘वर्तमानपत्रें विकणाऱ्या पोऱ्याशीं’ केली होती त्या खांडेकरांचे ‘पाठीराखे’ म्हणून फडके ह्यांनीं सोलापूर साहित्य संमेलनांत स्वतःला मनसोक्त मिरवून घेतलें. व्यासपीठावर फडके हे खांडेकरांच्या एकसारखे शेजारीं असून त्यांना शाबासकी देत होते, त्यांच्याशीं हस्तांदोलन करून मधून मधून त्यांना टाळ्या देत होते. आणि खांडेकरहि फडक्यांनीं किल्ली दिलेल्या एकाद्या ग्रामोफोनप्रमाणें सर्वस्वी त्यांच्या तंत्रानें वागत होते.

फडके ह्यांच्या ह्या उपस्थितीचा खांडेकरांच्या अध्यक्षीय भाषणावर आणि संमेलनांतील एकंदर कार्यक्रमावर जो व्हावयाचा तोच परिणाम झाला. राजकीय दृष्ट्या सोलापूर शहर एवढें पुरोगामी! स्वातंत्र्याच्या होमांत सोलापूरनें तीन आहुति देऊन ह्या शहराचें नांव हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासांत अमर केलें. पण त्याच सोलापुरांत खांडेकरांसारख्या पुरोगामी साहित्यिकाच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या या संमेलनांत हुकूमशाहीविरोधी ठराव नापास झाला नि सोलापूरच्या राजकीय कीर्तीच्या तोंडाला डांबर फांसलें गेलें!

या संमेलनानंतर फडके यांनीं सोलापूर येथें साहित्य विषयावर भाषण करून आपली प्रतिगामी विचारसरणी अक्षरशः वेशीवरच टांगली व आपण पुरोगामी साहित्याचे पहिल्या नंबरचे शत्रु आहोंत अशी जणुं कांहीं साऱ्या महाराष्ट्रांत दवंडीच पिटली.

त्यांत ते म्हणाले, “बहुजन समाजाच्या पायथ्याशीं हल्लीचें वाङ्मय जात आहे. साहित्यावर बहुजन समाजाची हुकमत चालूं लागलेली आहे, ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे. ह्यामुळें वाङ्मयाची प्रगति होत नसून अधोगति होत चालली आहे. साक्षरतेचा प्रसार होणें हें देखील धोक्याचें आहे. कारण माणूस साक्षर झाला म्हणजे तो दिसेल तें वाचत सुटतो. आणि अशीं हजारों माणसें दिसेल तें वाचीत सुटलीं म्हणजे घाणेरडें वाङ्मय निर्माण होतें.

ज्या वेळीं एकादी कला राजाश्रयापासून लोकाश्रयाकडे येते त्याच वेळीं मोठा धोका निर्माण होतो. राजाश्रयाखालीं निर्माण झालेलें पूर्वीचें खानदानी संगीत आज वाटेल त्या फडतूस हॉटेलवाल्याला आपल्या दुकानांत ऐकतां येतें. डाक्क्याची मलमल एकाद्या श्रीमंताच्या बायकोच्या अंगावर शोभते. पण ती एकाद्या टांगेवाल्याच्या बायकोच्या अंगावर शोभत नाहीं. उलट त्यापासून ‘मळमळ’ उत्पन्न होते.”

फडक्यांच्या ह्या भाषणांतलें वाक्य न् वाक्य ‘नवयुग’मध्यें अनेक लेख लिहून मीं झोडपून काढलें. हा आमचा वाद चांगला १९४१ च्या ऑगस्टपर्यंत चालला होता.

मध्यंतरीं ‘पायाची दासी’ हा माझा पहिलाच चित्रपट मुंबईंत प्रकाशित झाला त्यानें एकदमच लोकप्रियतेचा उच्चांक गांठला. त्यामुळें फडक्यांच्या पोटांत पुन्हा जोराची कळ उठली. ‘झंकार’च्या गटारांतून पुन्हां शिव्याशापांचा शेणसडा तुडुंब भरून वाहूं लागला. जुलै महिन्यांत करवीर प्रांतिक साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून

माझी निवड झाली त्या वेळीं आपल्या विद्यार्थ्यांकडून माझ्या व्याख्यानाच्या वेळीं दंगल घडवून आणण्याचा फडके ह्यांनीं निष्फळ प्रयत्न केला. उलट माझ्या व्याख्यानांनीं कोल्हापूर शहर दणाणून गेलें. अशा रीतीनें वृत्तपत्राच्या, चित्रपटाच्या नि साहित्याच्या तीनहि आघाड्यांवर मीं फडक्यांना पळतां भुई थोडी करून सोडली.

१७ ऑगस्ट १९४१ रोजीं मुंबई येथें आचार्य जावडेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ' मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन ' भरणार होतें. म्हणून त्या संमेलनाचा मुहूर्त साधून आम्हीं हा आपापसांतला वाद मिटवावा, अशी वामन मल्हार जोशी, अनंत काणेकर, वा. दा. गोखले आणि डॉ. अ. ना भालेराव ह्यांनीं पुन्हा आम्हां दोघांना विनंती केली. फडके आधींच अगदीं घायकुतीला आले होते. म्हणून त्यांनीं ती विनंति ताबडतोब मान्य केली.

मी ' नवयुग 'मध्यें फडके ह्यांना शेवटची शिवी ' गच्छ सूकर भद्रं ते ' ह्या मथळ्याखालीं एक झणझणीत अग्रलेख लिहून दिली. आणि ह्या जवळ जवळ एक वर्षपर्यंत चाललेल्या वादावर पडदा टाकला. त्या लेखाचा शेवट करतांना मी म्हणालों, " फडके ह्यांच्याबद्दल मला वाटणारा तिरस्कार विसरण्याइतकें औदार्य व खेळाडू-पणा माझ्यांत भरपूर आहे. या वादांत आपण पत्करलेल्या भूमिकेबद्दल फडके ह्यांना खरोखरच पश्चात्ताप वाटला व त्यांनीं तो तसा व्यक्त केला तर फडके ह्यांच्याशीं प्रेमानें हस्तांदोलन करावयाची माझी तयारी आहे. अशा विशुद्ध स्वरूपांत ते मुंबई साहित्य संमेलनांत दाखल झाले तर माझें घर आणि पाहुणचार त्यांच्या सेवेला सिद्ध आहेतच. "

हा वाद चालू असतां माझे सहकारी दत्तू बांदेकर ह्यांनीं फडक्यांची एक ' आरती ' ' नवयुग 'मध्यें प्रसिद्ध केली होती. तिच्यांतलें पहिलें कडवें देऊन हें फडके प्रकरण येथें संपवितों :

टिचभर छाती आणिक
सायकल भाड्याची,
कंठीं झळके ' टाय '
' जुन्या बाजार 'ची,
वामांगीं प्रिय शिष्या शोभे नखऱ्याची
सर्वांगी पावडर उटि अत्तराची
गेली अब्रू गेली कीर्तीही गेली,
' झंकारा 'ची रद्दी नशिबाला आली !
जयदेव जयदेव जय मत्सरमूर्ति
वाङ्मयचोरी करण्या दे आम्हां स्फूर्ति !
जय देव जय देव !

# ११

# पायाची दासी

'अत्रे पिक्चर्स 'चें पहिलें चित्र 'पायाची दासी ' हें २१ जून १९४१ रोजीं मुंबईच्या वेस्ट एंड ' सिनेमांत प्रकाशित झालें. तें मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत काढलें होतें. हिंदी आवृत्तीचें नांव 'चरणोंकी दासी ' असें होतें. रोज दोनदां मराठी प्रत दाखवली जात असे. आणि एकदां हिंदी आवृत्ति दाखवण्यांत येत असे. वस्तुतः, ह्या सुमारास मुंबईत हिंदु–मुसलमानांच्या दंग्याची हवा सुटली होती. म्हणून नवीन चित्रपट लावणें बरेंचसें धोक्याचें होतें. पण तो धोका पत्करून आणि रात्रीचा अगदीं शेवटचा खेळ रद्द करून 'पायाची दासी ' प्रदर्शित करण्याची मीं हिंमत केली. ती अपेक्षेपेक्षांहि यशस्वी झाली.

पहिल्या दिवशीं सकाळींच साऱ्या खेळाचीं तिकिटें संपून गेलीं. पहिल्या खेळाच्या प्रारंभीं माझ्या नव्या चित्रपटाच्या स्वागतार्थ थिएटरवर अफाट जनसंमर्द जमलेला होता. अनेक साहित्यिक आणि पत्रकार माझ्या निमंत्रणावरून त्या खेळाला उपस्थित होते. त्यांत पुढील नांवें उल्लेखनीय आहेत. मामा वरेरकर, प्रा. कृ.

पां. कुलकर्णी, ना. म. जोशी, डॉ. अ. ना. भालेराव, डॉ. शं. दा. पेंडसे, अप्पासाहेब खाडिलकर, डॉ. ग. य. चिटणीस, अनंतराव गद्रे इत्यादि.

ह्या चित्रपटाचें कथानक, संवाद आणि गाणीं मीं लिहिलीं होतीं. दिग्दर्शन गजानन जागिरदार ह्यांनीं केलें होतें. संगीत अण्णासाहेब माईणकरांनीं दिलें होतें. ह्या चित्रपटांतील पात्रांची निवड अत्यंत समर्पक अशी करण्यांत आली होती. सासूचें काम दुर्गा खोटे ह्यांना आणि सुनेचें काम वनमाला ह्यांना देण्यांत आलें होतें. नणंदेचें काम कुसुम देशपांडे ह्यांनीं केलें होतें. या चित्रपटाच्या सर्व यशाचें श्रेय ह्या तिघींनाच द्यावयाला पाहिजे. किंबहुना, हा बोलपट स्त्रीभूमिकाप्रधानच होता हें त्याचें सर्वांत वैशिष्ट्य होतें.

सदर बोलपटांत सर्वांत जास्त बोलण्याचें काम जसें सासूकडे–म्हणजे दुर्गाबाईकडे गेलें होतें, तसें सर्वांत कमी बोलण्याचें काम साहजिकच सुनेकडे म्हणजे वनमालेकडे आलेलें होतें. सून विचारी दळते, कांडते, धुणीं धुते, पाणी आणते. तिला कोणाची सहानुभूति नाहीं, सहाय्य नाहीं. स्वतःच्या दुःखांत ती सदैव चूर असते. आणि माहेरच्या मायेच्या माणसांची आठवण करून स्वतःशींच रडत असते. त्यामुळें सुनेची भूमिका करतांना भाषेपेक्षां मुद्रेच्या मूक अभिनयावरच अधिक अवलंबून रहाणें प्राप्त होतें. ही कामगिरी वनमालेनें अत्यंत कोमलतेनें आणि परिणामकारक रीतीनें बजावली होती.

माझ्या ‘ घरजांवई ’ बोलपटांत एका हंसऱ्या आणि नाचऱ्या मुलीची भूमिका करणारी वनमाला जेव्हां ‘ पायाच्या दासीं ’ त सुनेच्या भूमिकेमध्यें प्रकट झाली, तेव्हां तिच्या डोळ्यांतलें तें मूर्तिमंत कारुण्य, कोमल असहायता, थरथरत्या ओठावरचें तें निर्दोष मार्दव, चालण्याबोलण्यांत दिसून येणारें तें घरंदाज नि बाळबोध सौजन्य आणि विनय पहातांच प्रेक्षक क्षणभर स्तिमित होत असत आणि विचारीत असत कीं, हीच का ती ‘ घरजांवई ’मधली वनमाला ? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ‘ गुड अर्थ ’ या बोलपटांत लुई रेनरनें जशी भूमिका केली होती, अगदीं तशीच भूमिका वनमाला हिनें पायाच्या दासीमध्यें केली होती.

पायाची दासी या बोलपटाचा विषय ‘ सत्तागंड ’ ( Power Complex ) असलेली वडीलधारी व्यक्ति कुटुंबांतील इतर व्यक्तींना किती निर्जीव करून टाकते आणि त्यामुळें त्या व्यक्तीमध्यें नैकृष्ट्यगंड निर्माण होऊन कुटुंबाचा समतोल कसा एकदम बिघडून जातो हा आहे. तथापि, सामान्य प्रेक्षकांच्या दृष्टीनें सांगावयाचें झाल्यास सासू-सुनेचा संसारांतील झगडा हा ह्या बोलपटांतील प्रधान भाग आहे.

अशा गोष्टींत सासूची भूमिका जितकी जोरदार, आक्रमक आणि प्रभावी व्हावयाला पाहिजे तितकीच सुनेचीहि भूमिका सोशिक, सात्त्विक आणि नम्र असावयाला पाहिजे; तरच त्या झगड्यांत उत्तम तऱ्हेचें नाट्य निर्माण होईल. दुर्गा खोटे ह्यांनीं

सासूची भूमिका इतक्या झंझावाती आवेशानें आणि झपाट्यानें पार पाडली, कीं ती भूमिका तशा तऱ्हेनें त्या वेळच्या कोणाहि सुप्रसिद्ध नटीला करतां आली नसती, असाच चित्रपटव्यवसायांतील अनेक तज्ज्ञांचा आणि बहुसंख्य प्रेक्षकांचा अभिप्राय पडला.

मराठी चित्रपटामध्यें त्यापूर्वी तेवढी जबरदस्त स्वभावदर्शक भूमिका (Character role) आलेली नव्हती किंवा कोणीहि केलेली नव्हती. ती अविस्मरणीय आणि अमर भूमिका दुर्गाबाईनीं करून चित्रपटीय अभिनयकौशल्याचा उच्चांक गांठला आणि 'पायाच्या दासी'ला अभूतपूर्व यश मिळवून दिलें. हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्यें तोंपर्यंत दुर्गाबाईनीं एकापेक्षांहि एक सरस भूमिका करून फार मोठें नांव मिळवलें होतें. पण कजाग सासूच्या या भूमिकेनें, दुर्गाबाईनीं आपल्या कीर्तिमंदिरावर कळस चढवला असे अनेक रसिकांनीं उद्गार काढले.

दुर्गाबाईसारख्या प्रथितयश आणि धुरंधर अभिनेत्रीच्या समोरासमोर काम करून आपलें व्यक्तिमत्त्व तितक्याच आग्रहानें प्रस्थापित करावयाचें, ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. पण ती अवघड कामगिरी वनमालेनें उत्तम तऱ्हेनें बजावली. एकादा प्रबळ झंझावात सुटावा आणि त्या झंझावातानें सारीं घरें, दारें, शेतें नि बागा हादरून जाव्यात, झाडें नि वेली तळापासून गदगदा हालवल्या जाव्यात, चोहोंकडे हाहाःकार उडावा, आणि मग तो झंझावात शांत झाल्यानंतर एकाद्या बागेंतील जाईजुईच्या मांडवाखालीं चुरडून पडलेल्या कळया-फुलांचा सुगंध येतांच मनाला जसा आल्हाद वाटावा तसा वनमालेच्या भूमिकेचा हा चित्रपट पहातांना परिणाम होत असे.

सासूचा जहांबाजपणा आणि आक्रस्ताळेपणा अन् सुनेचें सौजन्य आणि सोशिकपणा ह्या विरोधांतूनच या चित्रपटाचा विकास होत जातो. त्यामुळें, दुःख आणि आनंद, अश्रु आणि हास्य, खेळकरपणा आणि गांभीर्य अन् प्रसन्नता आणि कारुण्य अशा मिश्र भावनांचा पाठशिवणीचा खेळ आरंभापासून अखेरपर्यंत एकसारखा ह्या चित्रपटांत चालू असतो. आणि त्यामुळेंच प्रेक्षक भारून जातात.

या चित्रपटाच्या लोकप्रियतेचें दुसरें महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे त्यामधला खेळकर विनोद. करुणरसाच्या पार्श्वभूमीवर हास्यरस निर्माण करावयाचा ही कांहीं सोपी गोष्ट नव्हे. पूर्वीच्या माझ्या चित्रपटांतल्या विनोदाची जात निराळी होती. उपहास, प्रखर विडंबन आणि कोटीबाजपणा ह्यांवर माझा विनोद सर्वसामान्यपणें आधारलेला असे. पण 'पायाच्या दासीं'तला विनोद हा अत्यंत सौम्य, सहजसुलभ आणि प्रसंगनिष्ठ आहे. त्यामुळें कित्येकदां तर प्रेक्षक हंसतां हंसतां रडतात आणि रडतां रडतां हंसूं लागतात. शुद्ध विनोद हा हास्य आणि अश्रु ह्यांच्या मिश्रणापासून निर्माण होतो.

सासू संतापी, सासरा नेभळा, मुलगा बावळा नि सून गाईसारखी गरीब ह्या चार पात्रांच्या परस्परविरोधी संघर्षांतून ह्या चित्रपटांतला विनोद निर्माण होतो.

चित्रपटाच्या प्रारंभींच सासू आणि सासरा 'मुली' पहावयाला एका बैल-

गाडींतून तिच्या गांवीं चाललेले असतात. सासऱ्याचें म्हणणे असें होतें कीं, 'मुलगी' पहावयाला आपल्या मुलाला बरोबर घेतलें असतें तर ठीक झालें असतें. त्यावर सासू आपल्या नवऱ्यावर कडाडते, "एवढंसं कार्टं! त्याला काय, मुलगी दाखवायची आहे?"

त्यावर 'सासरा' म्हणतो, "माझं म्हणणं विचारशील तर इतक्या लहान वयांत आपल्या विन्याचं लग्न करण्याची कांहीं जरुरी नाहीं!"

त्यावर सासूच्या संतापाला सीमाच राहिली नाहीं. "विन्या चांगला एरंडासारखा वाढला आहे. हा लहान आहे होय? बायको असती तर चार पोरं झालीं असतीं त्याला! अन् हल्लीं लहान पोरांना तर 'सारं' कांहीं कळतं! अन् आपल्या लग्नांत तुम्ही तरी काय मोठे होतां! कांहीं कळत तरी होतं का तुम्हांला? मग झाला ना आपला संसार? कुठं कांहीं अडलं नाहीं ना?"

मुलामुलींचीं लग्नें होण्याच्या आधीं त्यांनीं एकमेकांना पहाण्याची कांहीं एक जरुरी नसते, असें सांगतांना आपल्या विधवा मुलीला–रंगीला सासूबाई सांगतात, "अग, माझं लग्न झालं तेंव्हां मी तरी ह्यांना पाहिलं होतं म्हणतेस कीं काय? नांव नको. अन् मी जर ह्यांना पाहिलं असतं आधीं, तर ह्यांच्याशीं कधींतरी लग्न केलं असतं का! अहाहा, लग्नाच्या वेळीं काय दिसत होतं ध्यान पण! अगदीं एखाद्या माकडासारखे दिसत होते–अन् अंगावर बोट बोट केंस–अजून माझ्या अंगावर कांटा येतो—"

सासूबाई जेव्हां प्रत्यक्ष मुलीला पहावयाला गेल्या, तेव्हां तिच्या वडिलांनीं सहज बोलतां बोलतां सांगितलें कीं, मुलीला लिहितां वाचतां येत आहे म्हणून. ती बातमी ऐकून सासूबाईंना जबरदस्त धक्का बसला, "म्हणजे हिला लिहितां वाचतां येतं आहे कीं काय? मग हें आधीं कां नाहीं सांगितलंत? अहो, आमच्या घरांत आमचे 'हे'च काय ते दोन बुकं शिकले. तरी देखील हे दुसरींत सहा वेळ नापास झाले!"

त्यावर मुलीचे वडील म्हणाले, "आमची मुलगीसुद्धां काय एक दोन बुकं शिकली असेल—पण लग्न झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत तुमच्या हाताखालीं ती शिकलेलं सगळं विसरून जाईल!"

लग्न झाल्यानंतर सासूनें आपल्या सुनेच्या छळाला सुरुवात केली. आपला मुलगा आपल्या बायकोला झोडपीत नाहीं म्हणून सासूबाईची सर्वांत मोठी तक्रार.

त्या आपल्या मुलावर एकसारख्या ओरडत, 'असा कसा रे विन्या तूं नेभळा आपल्या बापासारखा? असल्या पोरींना उठतां लाथ अन् बसतां बुक्की पाहिजे!"

त्यावर विन्या केविलवाणा चेहरा करून आईला सांगतो, "पण आई, तूंच मला सांगितलंस ना कीं तिच्या अंगाला हात लावायचा नाहीं म्हणून!"

बायकोच्या छळाला कंटाळून जेव्हां सासरा वैतागून म्हणतो कीं, "असं वाटतं

कीं कुठंतरी जावं अन् संन्यास घ्यावा ! ”

त्यावर सासूबाई त्यांचा हात पकडून त्यांच्या अंगावर दरडावतात, “ संन्यास घ्यायचा काय तुम्हांला ? थांबा, इथल्या इथंच संन्यास देतें मी तुम्हांला. विन्या!, जा रे आत्तांच्या आता एखाद्या न्हाव्याला घेऊन ये--” बोलतां बोलतां सासूबाईनाच आत्महत्येचा झटका येतो, त्या आपल्या मुलीला सांगतात, “ नाहीं तर रंगे, तूंच बाजारांत जा, अन् अर्धा शेर विष तरी घेऊन ये---म्हणजे चांगली मरेन तरी मी---”

अंगावर जेव्हां सगळीच बाजू उलटते आणि मुलाचें सुप्त पौरुष जागृत होऊन तो आपल्या बायकोची बाजू घेऊन आईला फडाफड बोलूं लागतो. तेव्हां सासऱ्याचा आनंद गगनांत मावेनासा होतो. ते हर्षभरित होऊन ओरडतात, “ बोल बेट्या, बोल, तुझ्या बापाला जें जन्मभर बोलतां आलं नाहीं तें तूं आतां सारं एकदम बोलून घे ! ”

त्या वेळीं प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां अगदीं मुरकुंड्या वळतात आणि सारें चित्रगृह हंशांनीं आणि टाळ्यांनीं दणाणून जातें.

‘ पायाच्या दासी ’च्या यशाचें तिसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यामधील माझीं भावमधुर गाणीं. अर्थात् त्याला संगीतदिग्दर्शक अण्णासाहेब माईणकर ह्यांनीं अत्यंत प्रसंगोचित आणि प्रभावी चाली दिल्या होत्या ह्यांत मुळींच संशय नाहीं. ‘ पायाच्या दासीं ’तल्या ह्या माझ्या भावगीतांची स्वतः मामा वरेरकर ह्यांनीं ‘ नवयुग ’ मध्यें खास लेख लिहून अगदीं मुक्तकंठानें प्रशंसा केली.

त्यांत त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, “ आचार्य अत्रे हे आधीं कवि आहेत आणि मग नाटककार आहेत. विनोदाची निर्मिति करण्यांत ते सिद्धहस्त असल्यामुळें जरी त्यांची ख्याति विनोदकार या नात्यानें झालेली असली, तरी विनोदाच्या त्या अजस्र पसाऱ्यामागें काव्यमयतेची असलेली नाजुक सूक्ष्म भावना सामान्य वाचक-प्रेक्षकांच्या ध्यानीं येऊं शकली नाहीं. ‘ घराबाहेर ’ आणि ‘ उद्यांचा संसार ’ या दोन नाटकांतलीं पदें या विधानाची सत्यता पटवावयाला समर्थ होतील. ‘ पायाची दासी ’ या चित्रपटांतील प्रत्येक काव्य जितकें निर्दोष आहे, तितकेंच तें भावनात्मक आणि अस्सल महाराष्ट्रीय वृत्तीचें निदर्शक आहे. काव्य या दृष्टीनें हीं भावगीतें जितकीं उच्च दर्जाचीं आहेत, तितक्याच त्यांना अनुरूप चाली मिळाल्यामुळें आणि भावमधुर संगीत-योजना झाल्यामुळें ‘ पायाची दासी ’ या बोलपटांत संगीताचें जें वातावरण निर्माण झालें आहे, तें कुठल्याहि अस्सल महाराष्ट्रीय अंतःकरणांत आनंदाच्या उकळ्या निर्माण करण्यास समर्थ होईल इतकें प्रभावी आहे. ”

या चित्रपटांतलें सर्वांत जास्त लोकप्रिय झालेलें गाणें म्हणजे ‘ अंगणांत फुलल्या जाईजुई ’ हें. घरांतल्या घरांत सासूच्या छळामुळें आपल्या पतीची भेट होऊं शकत नाहीं ह्या सुनेच्या व्यथेमधून हें प्रणयमधुर गाणें निर्माण झाल्यामुळें तें हृदयाचा एकदम ठाव घेतें. रात्रींच्या वेळीं सारें घर झोपलें आहे; तिकडे नवरा अंथरुणावर एक-

टाच तळमळत पडलेला आहे; आणि सून एकटीच मागल्या दारीं तांदूळ कांडीत आहे. त्या तांदूळ कांडण्याच्या तालावर हें गाणें म्हटलें जातें :

अंगणांत फुलल्या जाईजुई
जवळीं ग पति माझा नाहीं,
बाई नाहीं हो !
चैत्राची नवी नवलाई
आली मोहरून ही आंबराई
दारीं पोपट साळुंकी गाई
अन् जवळीं ग पति माझा नाहीं
बाई नाहीं हो !
राया, मी किती वाट पाहूं
किति उकलून जिव माझा दावूं ?
रडूं कुठवर मी धाई धाई
जवळीं ग पति माझा नाहीं,
बाई नाहीं हो !

ह्या गाण्याचे सूर त्या वेळीं महाराष्ट्रामधल्या बाळबोध वृत्तीच्या घराघरांमध्यें देखील उमटले आणि त्याच्या ध्वनिमुद्रिका त्या वर्षी जास्तींत जास्त खपल्या.

ह्या चित्रपटांतलीं नायकाच्या तोंडीं घातलेलीं सर्व गाणीं अभिजात शाहिरी थाटाचीं आहेत.

आपल्या पत्नीच्या सौंदर्याचें वर्णन नायकानें पुढील गाण्यांत केलेलें आहे.

लाखों बायकांत अशी देखणी
तिच्याविण पाहिली ग नाहीं कुणी !
नजरेच्या मारित गोफणी
चालते कडकड बिजलीवाणी !
जशी नागीण केवड्याच्या बनीं
तशी ती फिरते आमच्या मनीं
तिच्या डोळ्यांत लकाके–नीळ ग,
मुखि डाळिंब फुटलें–लाल ग
गोऱ्या गालावर हिरवा–तीळ ग
पाहून तुटे जीव–तिळतीळ ग !
रूप शुक्राची जशी चांदणी,

तिच्याविना पाहिली ग नाहीं कुणी !

ह्याखेरीज

ऐन दुपारीं एकटी अशी का फिरतेस वनांत !
फिरतेस वनांत, अशी कां ग उन्हांत !

आणि

सख्या, सोड ना–राया, सोड ना–
तुझ्या हाताची मिठी जरा सोड ना

हीं दोन गाणींसुद्धां त्या वेळीं अतिशय लोकप्रिय झालीं होतीं. सारांश, चित्रपट यशस्वी होण्यास लागणारा सर्व मालमसाला माझ्या या पहिल्या चित्रपटांत मी ठासून भरलेला असल्यानें पहिल्या दिवसापासून या चित्रपटाला पराकाष्ठेची लोकप्रियता मिळाली आणि ती एकसारखी वाढतच गेली. पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश'नें आणि मुंबईच्या 'विविध वृत्ता'नें जे या चित्रपटावर अभिप्राय दिले ते सांगण्यासारखे आहेत :

"दुर्गा खोटे यांची सासूबाईच्या भूमिकेंतील वेषभूषा इतकी वास्तवतानिदर्शक आहे कीं घरोघर पुष्कळांच्या दृष्टीला पडणाऱ्या एखाद्या सासूबाईलाच आपण पहातों आहोंत कीं काय असें वाटतें. दुर्गा खोटे यांची कजाग सासूची भूमिका इतकी अकृत्रिम वाटते कीं मागेंपुढें त्यांच्या चिरंजीवांना मुलगी देऊं इच्छिणारा वधूपिता त्यांची ही भूमिका पाहून कदाचित् आपल्या इच्छेपासून परावृत्त होणें अशक्य नाहीं. वनमाला ह्यांच्या यमूच्या भूमिकेचा पूर्वार्ध इतका करुणरसात्मक झालेला आहे, कीं मराठी रजतपटावर भवभूतीची एकादी कृतीच आपण पहातों आहोंत असें वाटतें. यमूची भूमिका पहातांना हरिभाऊ आपटे ह्यांच्या 'पण लक्षांत कोण घेतो' या अभिजात कादंबरींतील कांहीं हृदयद्रावक प्रसंगांची आठवण होते."

ह्या चित्रपटाचें मोठमोठ्या व्यक्तींनीं आणि वृत्तपत्रांनीं तारा आणि पत्रें पाठवून मुक्तकंठानें अभिनंदन केलें.

साहित्याचार्य तात्यासाहेब केळकर ह्यांनीं चित्रगृहांत तेथल्या तेथें इंग्रजींत अभिप्राय लिहून दिला,

Real Social Play. Most comical and effective.

मुंबईच्या तीन चित्रगृहांत हा चित्रपट प्रत्येकीं पंचवीस आठवडे चालला होता. महाराष्ट्रांत त्यानें लोकप्रियतेचे उच्चांक मोडले. एवढेंच नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानांतहि अनेक ठिकाणीं ह्या चित्रपटाची हिंदी आवृत्ति अत्यंत लोकप्रिय झाली. 'ब्रह्मचारी' चित्रपटानंतर मला जर कोणत्या एका चित्रपटानें जास्तींत जास्त लोकप्रियता मिळवून दिली असेल तर ती 'पायाच्या दासी'नें. स्वतःच्या मालकीच्या स्टुडिओंत स्वतः

निर्माण केलेल्या या माझ्या पहिल्याच चित्रपटानें ‘अत्रे पिक्चर्स’ ला भरपूर पैसा नि प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याबरोबर मुंबईच्या चित्रपटाच्या व्यवसायांत माझें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें आणि मोठमोठे धनिक आणि भांडवलवाले पैशांच्या थैल्या घेऊन माझ्या मागें धांवूं लागले.

त्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. इतक्या सहजासहजीं आणि विशेष आयास न करतां यश मिळाल्यानंतर माझें डोकें जमीन सोडून ढगांकडे भराऱ्या मारूं लागलें. माझें वय त्यावेळीं बेचाळीस त्रेचाळीस वर्षांचें होतें. म्हणजे मी तरुणच होतों. हातांत एकदम पैसा आला होता. हाताखालीं तीनचारशें माणसें काम करीत होतीं.

‘यौवनं, धनसंपत्तिः प्रभुत्वं अविवेकता। एकैकमप्यनर्थाय किं यत्र चतुष्टयम्’

यौवन, संपत्ति आणि प्रभुत्व एकत्र झाल्यानंतर त्यांतून अविवेक निर्माण व्हावयाला कितीसा वेळ लागणार? आणि तसेंच माझें झालें. पण तो सारा इतिहास पुढें सांगेन!

# १२

# काकासाहेब लिमये ह्यांचीं निवृत्ति

माझे वृत्तपत्रीय व्यवसायांतले एक गुरु आणि माझ्यावर ज्येष्ठ बंधूप्रमाणें ममता करणारे 'ज्ञानप्रकाशाचे' सुप्रसिद्ध संपादक श्री. कृष्णाजी गणेश उर्फ काकासाहेब लिमये ह्यांना १९४१ च्या जूनअखेर आपल्या बावीस वर्षांच्या संपादकीय कारकीर्दींतून सेवानिवृत्त व्हावें लागलें. 'ज्ञानप्रकाश' हें पत्र 'सव्हंट्स ऑफ इंडिया' या संस्थेच्या मालकीचें होतें. १९१८ सालीं एम्. ए. झाल्यानंतर काकासाहेब हे ना. गोखले ह्यांच्याबद्दल त्यांना वाटणाऱ्या अतीव आकर्षणामुळें, 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीला' जाऊन मिळाले. त्यावेळीं 'ज्ञानप्रकाश' हें दैनिक पुण्यांत आणि महाराष्ट्रांत पराकाष्ठेचें उपेक्षणीय आणि हास्यास्पद वृत्तपत्र म्हणून समजलें जात होतें.

१९१९ सालीं काकासाहेब त्या पत्राच्या संपादकीय वर्गांत दाखल झाले आणि त्यानंतर पुढें सात वर्षांनीं जेव्हां त्या पत्राचीं मुख्य संपादकीय सूत्रें त्यांच्याकडे सोपविण्यांत आलीं. तेव्हांपासून त्या पत्राची लोकप्रियता आणि खप हळूहळू एकसारखा जो वाढत गेला, तो १९३० सालीं महात्मा

गांधींच्या सत्याग्रहाच्या नि कायदेभंगाच्या काळांत त्यानें लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. त्यामुळें महाराष्ट्राच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनांत 'ज्ञानप्रकाश'ला कमालीची प्रतिष्ठा प्राप्त झाली. हें सर्व एकट्या काकासाहेबांचें कर्तृत्व होतें. पुणें म्हणजे 'ज्ञानप्रकाश' आणि 'ज्ञानप्रकाश' म्हणजे काकासाहेब लिमये हीं महाराष्ट्रामध्यें जणुं कांहीं दोन समीकरणें होऊन बसलीं होतीं.

काकासाहेबांची अखिल महाराष्ट्रांतली ही लोकप्रियता सहन न झाल्यामुळें 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' मधील त्यांच्या कांहीं मत्सरी सहकाऱ्यांनीं बहुमत करून त्यांना संपादकीय स्थानावरून सक्तीनें सेवानिवृत्त केलें. त्यामुळें पुण्यांतील आणि महाराष्ट्रांतील त्यांच्या असंख्य मित्रांना आणि भक्तांना जबरदस्त धक्का बसला.

३० जून १९४१ रोजीं पुण्याच्या 'ग्लोब चित्रगृहांत' माझ्या अध्यक्षतेखालीं काकांचा जो सत्कार करण्यांत आला, त्यावेळीं काकांवर प्रेम करणाऱ्या हजारों लोकांच्या डोळ्यांमध्यें अक्षरशः अश्रु डबडबले. मला तर माझ्या भाषणांत वारंवार थांबावें लागलें; इतका भावनेनें माझा गळा दाटून आलेला होता. त्या प्रसंगीं केलेल्या माझ्या भाषणांतला कांहीं भाग देण्यासारखा आहे :

"माझे नि काकासाहेब लिमये ह्यांचे संबंध काय आहेत, ते सांगावयाला का पाहिजेत ? त्यांनीं स्वतः अंधारांत राहून मला प्रकाशांत आणलें आहे. विद्यार्थी दशेंत त्यांच्याप्रमाणेंच मीहि स्वतः 'ज्ञानप्रकाश'ला शिव्या देणारा एक विद्यार्थी होतों. पूर्वी पुण्यांतील तरुण मंडळी 'केसरी'च्या बाजूची असत. आणि म्हातारीकोतारी मंडळी 'ज्ञानप्रकाश' वाचीत असत. पण आतां मात्र अगदीं त्याच्या उलटा प्रकार झालेला आहे. आज ज्ञानप्रकाश तरुणांचा झाला असून 'केसरी' हा वृद्धांचा झाला आहे. पूर्वीची परिस्थिति पालटवून 'ज्ञानप्रकाश'ला आजचे उज्ज्वल दिवस दाखविण्यास काकासाहेबांचे श्रम कारणीभूत झालेले आहेत.

"वाइटांतून चांगलें निघतें असें म्हणतात. हें 'ज्ञानप्रकाश'च्या बाबतींत खरें झालें आहे. कारण किबेवाड्याला आग लागून तो भस्मसात् झाल्यावर 'ज्ञानप्रकाश'ला एक सुंदर नवी इमारत लाभली, त्याचप्रमाणें त्याच सुमारास 'ज्ञानप्रकाश'ला एका सुंदर संपादकाचाहि लाभ झाला. तेव्हांपासून गेल्या पंधरा वर्षांत काकांनीं केलेल्या महाराष्ट्र-व्यापी कामगिरीचें वर्णन थोड्या अवकाशांत या सभेमध्यें करणें शक्य नाहीं. काका लिमये हे संपादक म्हणून जेवढे थोर आहेत, त्याहून कितीतरी पटीनें त्यांचें व्यक्तिमत्त्व मोठं आहे. त्यांच्या त्या थोर व्यक्तिमत्त्वाचा फारच थोडा भाग त्यांच्या संपादकीय भूमिकेंत प्रकट झालेला आढळतो.

"वृत्तपत्र म्हणजे प्रसिद्धीचा एक भला मोठा चव्हाटा किंवा पुण्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे खुंटच होय. त्या खुंटावर बसून स्वतः गुप्त रहावयाचें हें सर्वांत कठीण काम होय. इतकीं वर्षें ते प्रसिद्धीच्या प्रकाशांत राहिले. पण त्या प्रसिद्धीपासून

त्यांनीं स्वत:ला मात्र संपूर्णपणें अलिप्त ठेवलें आहे. ‘ काकासाहेब लिमये ’ हें नांव सर्वप्रसिद्ध आहे. पण ‘ काकासाहेब लिमये ’ ही व्यक्ति फारच थोड्यांनीं पाहिली आहे. आपल्या ‘ ज्ञानप्रकाश ’मध्यें त्यांनीं अनेकदां फाटक्यातुटक्या नि फडतूस व्यक्तींचे फोटो छापले असतील. पण स्वत:चा फोटो चुकूनसुद्धां आपल्या पत्रांत छापून येऊं नये याबाबत डोळ्यांत तेल घालून ते काळजी घेतात.

“ प्रसिद्धिपराङ्मुखतेचा हा गुण त्यांच्यापासून मला कांहीं घेतां आलेला नाहीं, हें मला ह्या ठिकाणीं कबूल करणें भाग आहे. भालाकार भाऊसाहेब भोपटकरांनीं तर एकदां आपल्या ‘ भाल्यां ’तून अशी जाहीर पृच्छा केली होती कीं, “ हा ‘ ज्ञानप्रकाश ’चा संपादक काकासाहेब लिमये म्हणतात तो आहे तरी कोण ? त्यांनीं एकदां तरी आपला फोटो ‘ ज्ञानप्रकाश ’च्या वर छापावा ! ” ह्यावरून काकांच्या प्रसिद्धिविन्मुखतेची कल्पना येईल.

“ दैनिकाचें काम सांभाळून काका इतर सर्व उद्योग केव्हां व कसे करतात ह्याचें आमच्यासारख्या त्यांच्या निकटवर्ती मित्रांना सुद्धां कोडें आहे. ते पुस्तकांत गढून गेलेले कधींच दिसत नाहींत. परंतु त्यांच्या हातून लेखन जें होतें तें मात्र अत्यंत विद्वत्ताप्रचुर आणि विचारपरिप्लुत ! संपादक हा साहित्यिक असलाच पाहिजे असें नाहीं. पण काकांचे लेख उत्कृष्ट साहित्यिकांच्या लेखनाच्या तोडीचे असतात. त्यांचें हें लेखन सतत गेलीं बावीस वर्षें अखंड चालू आहे. त्यांनीं इतकें विपुल लेखन केलेलें आहे कीं महाराष्ट्रांत तरी हरिभाऊ आपटे किंवा विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांच्याखेरीज त्यांना अन्य तोड सांपडणार नाहीं.

“ ज्ञानप्रकाश वाचला म्हणजे पुणें डोळ्यांपुढें उभें रहातें. रूपर्ट ब्रुक ह्या आंग्ल कवीनें स्वत:संबंधीं एका कवितेंत असें लिहिलें आहे, कीं—इंग्लंडच्या हवेवर आणि अन्न-पाण्यावर वाढलेलें आपलें शरीर इंग्लंडच्या बाहेर कुठेंहि पुरलें जाईल, तर तेथली तेवढी जमीन हें एक छोटेंसें इंग्लंड आहे असें समजावयाला हरकत नाहीं. – काकांच्या ‘ ज्ञानप्रकाश ’ बाबत देखील नेमकें असेंच म्हणतां येईल, कीं जेथें कुठेंहि हिंदुस्थानांत ‘ ज्ञानप्रकाश ’ जाईल तेथें तेथें तो छोटेंसें पुणेंच निर्माण करील. पुण्यांत इतर अनेक वृत्तपत्रें आहेत. पण त्यांत तुम्हांला पुण्याचें प्रतिबिंब उमटलेलें आढळणार नाहीं.

“ पुणें हें सर्व महाराष्ट्रीय चळवळींचें स्फूर्तिस्थान आहे. पुण्यांत जें घडत नाहीं असें महाराष्ट्रांत काय घडतें ? अशा या पुण्यांतील बारीकसारीक सार्वजनिक चळवळींची नोंद तुम्हांला ‘ ज्ञानप्रकाशांत ’ पहावयाला सांपडेल. पुण्यांतील अनेक चळवळींच्या मागें राहून त्या सर्व चळवळींचीं सूत्रें काकांनीं हालविलेलीं आहेत. स्वत: सर्व कार्यांत भाग घेऊन मागें राहण्याचा मोठेपणा त्यांच्या अंगीं आहे. काकांच्या घरीं पुण्यांतीलच नव्हे तर महाराष्ट्रांतील एकंदर राजकारणाची नोंद झालेली आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आजच्या तरुण पिढीचे लिमये हे ‘ सार्वजनिक काका ’च आहेत.

" ज्ञानप्रकाशां 'त महाराष्ट्रांतील बारीकसारीक गोष्टींची संगतवार नोंद झाली असल्यामुळें महाराष्ट्राचा इतिहास लिहिणारास ' ज्ञानप्रकाश ' ची फाईल चाळावीच लागेल. ' ज्ञानप्रकाशां 'त आपलें नांव एकदां तरी छापून यावें असें पुण्यांतील आणि महाराष्ट्रांतील प्रत्येक लहानथोर कार्यकर्त्याला मनापासून वाटतें. मोठमोठ्या संभावित आणि लब्धप्रतिष्ठितांना सुद्धां तेवढेंच आपलें नांव ' ज्ञानप्रकाशां 'त यावें असें मनापासून वाटतें, त्याचेंच विडंबन नाट्यछटाकार दिवाकरांनीं आपल्या एका नाट्यछटेंत केलेलें आहे.

" अच्युतराव कोल्हटकर हे लोकप्रिय मराठी दैनिकाचे आद्य जनक होते. पण काका लिमयांनीं हें दैनिकाचें लोण मध्यमवर्गापर्यंत आणि बहुजनसमाजापर्यंत नेऊन पोहोंचविलें आहे. मराठी भाषेच्या शुद्धिकरणाची चळवळ वीर सावरकरांनीं सुरू केली. पण ह्या चळवळीचा प्रत्यक्ष पुरस्कार काकांनीं आपल्या ' ज्ञानप्रकाशां 'त केला. ' दिनांक ' हा शब्द काकांनीं लोकप्रिय केला. बहुजनसमाजाला काय आवडतें, काय रुचतें आणि काय पचतें, याचें काकांना अचूक ज्ञान आहे. आकर्षक आणि परिणाम-कारक असे मथळे द्यावे काकांनींच !

" शंकरराव मोरे ह्यांनीं जेधे मॅन्शनमध्यें एका भाषणांत ब्राह्मणांना सडकून शिव्या दिल्या होत्या. त्या भाषणाचा अक्षरशः वृत्तांत काकांनीं ' ज्ञानप्रकाशां 'त देऊन त्याला ' मोऱ्यांची तुंबलेली मोरी ' असा मथळा दिला होता. त्यानें त्या भाषणाची जेवढी बंभेरी उडवली, तेवढी त्यावर एक अग्रलेख लिहून सुद्धां उडवतां आली नसती. ' ज्ञानप्रकाश 'ची विविधता हें त्याचें सर्वांत मोठें आकर्षण होतें. ललित वाङ्मय, नाट्य, चित्रपट वगैरे विविध कलांना ' ज्ञानप्रकाशां 'त स्वतंत्र स्थान देऊन काकांनीं त्याच्या प्रचाराला नि संवर्धनाला फार मोठा हातभार लावला आहे.

" व्याख्यानें हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार काकांनीं आपल्या ' ज्ञानप्रकाशां 'तून निर्माण केला. पुण्यांत किंवा महाराष्ट्रांत पूर्वी फार मोठमोठ्यांचीं महत्त्वाचीं भाषणें होत होतीं. पण वृत्तपत्रांतून त्या व्याख्यानांचे अक्षरशः आकर्षक वृत्तान्त देण्याची प्रथा सर्वस्वी ' ज्ञानप्रकाश 'ची आहे. ' ज्ञानप्रकाशां 'तील सभांचे वृत्तान्त इतके विस्तृत आणि यथातथ्य असतात कीं ते घरीं बसल्या बसल्या वाचूनहि प्रत्यक्ष सभेंत हजर असल्या-सारखें वाटतें. आधुनिक सार्वजनिक जीवनांत व्याख्यानाला फार महत्त्वाचें स्थान आहे. तें त्याचें महत्त्व ओळखून काकांनी सार्वजनिक महत्त्वाच्या वक्त्यांचीं भाषणें ' ज्ञानप्रकाशांत ' इत्थंभूत छापून प्रसिद्ध केलीं आणि लोकमत जागृत करण्यांत फार मोठी मदत केली.

" काकांच्या जागीं ' ज्ञानप्रकाशां 'त दुसरे अनेक संपादक येतील. कदाचित् ते काकांपेक्षां थोडेसे अधिक विद्वान् असतील किंवा कर्तबगार असतील. पण ' ज्ञानप्रकाशां 'तलें जें ' तें ' होतें, ' तें ' पुन्हां कधीं पहावयाला मिळणार नाहीं. काकांचा ' ज्ञानप्रकाश '

ही कांहीं एक और चीज होती. ती काकांच्या बरोबरच नाहींशी होणार, याचें आम्हांला अतिशय दुःख होतें. काकांच्या गौरवाची जरी ही सभा असली तरी या गौरवावर आमच्या विषादाची आणि दुःखाची छाया पडलेली आहे. त्यामुळें काकांचा गुणगौरव करतांना आमचीं हृदयें शतशः विदीर्ण होत आहेत ! ”

काकांचा सत्कार केवळ पुण्यांत करूनच मी थांबलों नाहीं, तर काकांना मुद्दाम मुंबईला घेऊन आलों आणि ‘ मुंबई मराठी पत्रकार संघा ’तर्फे सेंट्रल सिनेमांत प्रा. न. र. फाटक ह्यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा एक भव्य जाहीर सत्कार आयोजित केला. त्या सत्कारसमारंभाशीं मुंबईच्या साहित्य संघानेंहि सहकार्य केलें आणि मुंबईतील अनेक नियतकालिकांनीं, चित्रपट कंपन्यांनीं, जाहिरातसंस्थांनीं, छापखान्यांनीं, प्रकाशकांनीं आणि व्यक्तींनीं त्या समारंभांत भाग घेतला. त्यासाठीं बाहेरगांवांहूनहि अनेक मंडळी आली होती. ‘ सेंट्रल सिनेमा ’चे सारे मजले नि आवार स्त्रीपुरुषांनीं तुडुंब भरून गेलें होतें. दैनिक वृत्त-पत्राच्या सेवानिवृत्त संपादकाचा एवढा प्रचंड सत्कार महाराष्ट्रांत पूर्वी क्वचित्‌च झाला असेल.

ह्या सत्काराच्या वेळीं मामा वरेरकर, आप्पा खाडिलकर, पां. वा. गाडगीळ, श्री. शं. नवरे, प्रा. अनंत काणेकर आणि त्या वेळीं ठाण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज असलेले पी. एम. लाड ह्यांचीं अत्यंत सुंदर नि समर्पक भाषणें झालीं. शेवटीं माझें भाषण झालें.

मी म्हणालों, “ महाराष्ट्रामध्यें गेल्या अर्धशतकांत लोकमान्य टिळक, आगर-कर आणि ‘ संदेश ’कार कोल्हटकर हे जे मोठमोठे आदर्श संपादक होऊन गेले त्यांच्या मालिकेंत काकासाहेब लिमयांचा समावेश करावा लागेल, एवढी त्यांची कामगिरी श्रेष्ठ दर्जाची आहे आणि एवढें असून त्यांच्यापेक्षांहि काकांच्या कार्याचें वैशिष्ट्य वेगळें आहे. सामाजिक जीवन प्रत्यक्ष अनुभवणाऱ्या आणि समाजाच्या विविध थरांशीं समरस होणाऱ्या समाजसेवकांपैकीं काका हे एक आहेत. म्हणून त्यांच्या संपादनांत सामाजिक जीवनाचे खरेखुरे पडसाद उमटलेले आढळतात. त्यांनीं ‘ ज्ञानप्रकाश ’च्या अग्रलेखांतून निर्माण केलेलें वाङ्मय हें जीवनाच्या प्रयोगशाळेंतल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुभवांतून निर्माण झालेलें आहे. म्हणूनच त्यांच्या ‘ ज्ञानप्रकाश ’ला एवढी प्रचंड लोकप्रियता लाभलेली आहे. काका हे साहित्यिक नसते, तर ते उत्तम पत्रकार कधींच झाले नसते.

“ अलाहाबादच्या ‘ लीडर ’ पत्राचे संपादक कै. सर सी. वाय. चिंतामणी ह्यांचें दैनंदिन जीवन ‘ पी ’ हीं इंग्रजी आद्याक्षरें असलेल्या तीन गोष्टींवर आधारलेलें असे, असें त्यांच्या एका चरित्रकारानें म्हटलेलें आहे. ‘ पूजा–पेपर–आणि पिक्चर ’ ( Pooja, Paper and Picture ) काकांच्या दिनक्रमाचें वर्णन तीन अंत्याक्षरी ‘त्र’नीं करतां येईल. सकाळीं ‘ मित्र ’, दुपारीं ‘ पत्र ’ आणि सायंकाळीं ‘ चित्र ’. काका-साहेब म्हणजे साक्षात्‌ हौस. सार्वजनिक जीवनांतील प्रत्येक लहानमोठ्या उलाढालीची

बारीकसारीक खबर आपल्या 'ज्ञानप्रकाशां'त यावी ह्याची त्यांना प्रचंड हौस!

"ज्या काकासाहेबांनीं 'ज्ञानप्रकाश'ला एवढी मानमान्यता मिळवून दिली, त्याला लोकप्रियता आणि भरभराट प्राप्त करून दिली, त्यांना त्याच 'ज्ञानप्रकाश'च्या खुर्चीवरून एकदम निवृत्त केलें जातें ह्याचा अर्थ काय? अजून काकांची पन्नाशी देखील उलटलेली नाहीं. ह्या पन्नास वर्षांपैकीं निम्मीं वर्षें त्यांनीं आपली काया 'ज्ञानप्रकाश'च्या सेवेंत झिजवली. ह्या त्यांच्या सेवेचें पारितोषिक काय तर त्यांच्यावर सक्तीनें लादलेली ही संपादकीय निवृत्ति! काका वृत्तीनें शांत आहेत–शांतिब्रह्माचा अवतारच ते आहेत म्हणानात! 'उतरा खुर्चीवरून' असें म्हटल्यानंतर ते उतरले बिचारे! त्यांच्या जागीं मी असतों तर-! पण नाहींच मी तें बोलत. पुनश्च 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकपदावर त्यांना अधिष्ठित करण्याची सुबुद्धि 'भारत सेवक समाजा'ला लौकरच प्राप्त होवो!"

उत्तराच्या भाषणांत काकासाहेबांच्या सौजन्याचा आणि संयमाचा श्रोत्यांना जो उज्ज्वल साक्षात्कार घडला तो पाहून त्यांचे अक्षरशः डोळे दिपले. ते म्हणाले, "आजचा सत्कार हा वस्तुतः माझा सन्मान नसून ज्या वृत्तपत्रव्यवसायांत 'भारत सेवक समाजा'चा सदस्य या नात्यानें गेलीं बावीस तेवीस वर्षें कार्य करण्याची संधि मला मिळाली त्या वृत्तपत्रव्यवसायाचा हा बहुमान आहे. कांहीं वक्त्यांनीं माझ्या 'कार्य-निवृत्ती'ला अनुलक्षून 'भारत-सेवक-समाजा'संबंधानें जी टीका केली तिचा इन्कार करणें हें माझें कर्तव्य आहे. मला 'ज्ञानप्रकाश'चें संपादकत्व सोडावें लागलें हा माझ्यावर आणि 'ज्ञानप्रकाशा'वर 'भारत सेवक समाजानें' एक मोठा अन्याय केला, असें कांहीं वक्त्यांनीं जें सूचित केलें तें बरोबर नाहीं. 'भारत–सेवक–समाजा'नें मजवर कोणत्याहि प्रकारचा अन्याय केलेला नाहीं.

"'ज्ञानप्रकाश' पत्र हें 'भारत सेवक समाजा'च्या वृत्तपत्रीय कार्याचें माध्यम या नात्यानें अधिक सुधारावें व त्याजकडून अधिक व्यापक कामगिरी व्हावी, असाच माझी कार्यनिवृत्ति घडवून आणण्यांत 'भारत सेवक समाजा'चा उद्देश आहे आणि ता योग्यहि आहे. त्या बाबतींत मी दोषी आहें.

"माझ्या नम्र बुद्धीप्रमाणें साहित्य आणि सामाजिक जीवन ह्यांचा निकट संबंध असतो. राजकारण आणि समाजसुधारणा ह्या कार्यांना साहित्याची जोड दिली पाहिजे, या मताचा मी आहें. या निर्धन महाराष्ट्राचें वाङ्मय हेंच मूल्यवान् धन आहे. तो ठेवा महाराष्ट्रानें रक्षिला पाहिजे. श्री ज्ञानेश्वरांच्या ओव्या आणि श्री तुकोबारायांची अभंगवाणी ह्यांनीं महाराष्ट्रांत जी वैचारिक क्रांति घडवून आणली, तिचें महत्त्व विसरतां कामा नये. मराठी वृत्तपत्रांनीं आधुनिक काळांत साहित्याचें साधन उपयोगांत आणलें पाहिजे.

"माझी राजकीय भूमिका न सोडतांहि मी माझ्या राजकीय प्रतिपक्षीयांना सहाय्य

करूं शकलों असें जें आतां सांगण्यांत आलें, त्याचें खरें श्रेय माझ्यापेक्षां इतर पक्षांतील मंडळींच्या मजवरील श्रद्धेला आणि खिलाडू वृत्तीलाच दिलें पाहिजे. वृत्तपत्रांशीं माझा असलेला संबंध आतां सुटला आहे. म्हणून माझ्या व्यवसायबंधूंचा निरोप घेतांना माझी त्यांना अशी नम्र प्रार्थना आहे, कीं महाराष्ट्रांतील वृत्तसंस्था पवित्र आणि प्रभावशाली करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा.

" माझ्या संपादकीय कामगिरीची प्रशंसा करणारांनीं टिळक, आगरकर, गोखले इत्यादि महनीय विभूतींच्या नांवांबरोबर माझ्या नांवाचा निर्देश केला. पण माझी कामगिरी त्यांच्या मानानें अत्यल्प आहे. तथापि, माझ्या पत्रकार-बंधूंना मी असें अवश्य सांगेन कीं, तुम्ही आपल्या कार्यांत टिळक-आगरकर आणि गोखले ह्यांचे आदर्श सदैव दृष्टीपुढें ठेवा. ते तुम्हांला नेहमीं मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक होतील. "

काकांच्या जीवनांतील एका कारुण्यपूर्ण प्रसंगाच्या वेळचें त्यांचें हें अत्यंत हृदयस्पर्शी भाषण मीं मुद्दाम येथें दिलें आहे. एवढ्यासाठीं कीं त्यामुळें काकांच्या विशाल आणि पराकाष्ठेच्या नम्र स्वभावाची वाचकांना कल्पना यावी.

काकासाहेबांचे पुणें आणि मुंबई येथें हे जे दोन गौरव-समारंभ झाले, त्यांतून एक अनिष्ट वादंग निर्माण झालें. मुंबईच्या ' विविधवृत्ता 'ची काका लिमयांशीं जशी मैत्री होती, तशीच काकांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या जागीं ज्या एस्. जी. वझे या ' भारत समाजसेवका 'ची नेमणूक करण्यात आली त्यांच्याशींहि होती. काकांची सद्दी संपली होती. आणि वझ्यांची सद्दी सुरू झाली होती. म्हणून वझ्यांची बाजू घेऊन ' विविधवृत्ता 'नें काकांच्या गौरवसमारंभाचा सूत्रचालक म्हणून व्यक्तिशः माझ्यावर नि त्या गौरवसमारंभांत भाग घेणाऱ्या वक्त्यांवर ' स्तुतिपाठक ', ' फाजील उत्साही भाट ', ' धंदेवाईक ऊरबडवे ', ' विघ्नसंतोषी उठावगीर ' ' मतलबी चाहते ', ' वावदूक वक्ते ' अशा शिव्याशापांची मुक्तहस्तांनीं खैर केली. आणि " काका लिमयांचा गौरव करण्यापेक्षा वझ्यांची नि ' भारत सेवक समाजा 'ची बदनामी करण्याची पर्वणी आम्ही सर्वांनीं मिळून साधून घेतली " अशी आमच्यावर त्यांनीं राळ उधळली.

माझ्यावर किंवा इतर वक्त्यांवर ' विविधवृत्ता 'नें अर्वाच्य टीका केली ह्याचें मला एवढें वाईट वाटलें नाहीं. पण काकांना ' भारत सेवक समाजा 'नें सेवानिवृत्त कां केलें ह्याची कारणमीमांसा करतांना ' विविधवृत्ता 'नें काकां वर जी गलिच्छ चिखलफेक केली त्याची मला अतिशय चीड आली. ती दुष्ट मीमांसा ' विविधवृत्ता 'नें पुढीलप्रमाणें केली होती :

" ज्ञानप्रकाश हें जबाबदार संस्थेचें मतपत्र आहे. तें पत्र चालविण्याच्या मागें सवंग लोकप्रियता प्राप्त करून घेण्याचा व्यापारी हेतु नाहीं. काकासाहेबांची संपादकीय परंपरा चालवणें समाजाला इष्ट वाटत नाहीं. काकासाहेबांचें व्यक्तित्व जसें ' ज्ञान-

बारीकसारीक खबर आपल्या ' ज्ञानप्रकाशां 'त यावी ह्याची त्यांना प्रचंड हौस !

" ज्या काकासाहेबांनीं ' ज्ञानप्रकाश 'ला एवढी मानमान्यता मिळवून दिली, त्याला लोकप्रियता आणि भरभराट प्राप्त करून दिली, त्यांना त्याच ' ज्ञानप्रकाश 'च्या खुर्चीवरून एकदम निवृत्त केलें जातें ह्याचा अर्थ काय ? अजून काकांची पन्नाशी देखील उलटलेली नाहीं. ह्या पन्नास वर्षांपैकीं निम्मीं वर्षें त्यांनीं आपली काया ' ज्ञानप्रकाश 'च्या सेवेंत झिजवली. ह्या त्यांच्या सेवेचें पारितोषिक काय तर त्यांच्यावर सक्तीनें लादलेली ही संपादकीय निवृत्ति ! काका वृत्तीनें शांत आहेत–शांतिब्रह्माचा अवतारच ते आहेत म्हणानात ! ' उतरा खुर्चीवरून ' असें म्हटल्यानंतर ते उतरले बिचारे ! त्यांच्या जागीं मी असतों तर-! पण नाहींच मी तें बोलत. पुनश्च ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकपदावर त्यांना अधिष्ठित करण्याची सुबुद्धि ' भारत सेवक समाजा 'ला लौकरच प्राप्त होवो ! "

उत्तराच्या भाषणांत काकासाहेबांच्या सौजन्याचा आणि संयमाचा श्रोत्यांना जो उज्ज्वल साक्षात्कार घडला तो पाहून त्यांचे अक्षरशः डोळे दिपले. ते म्हणाले, " आजचा सत्कार हा वस्तुतः माझा सन्मान नसून ज्या वृत्तपत्रव्यवसायांत ' भारत सेवक समाजा 'चा सदस्य या नात्यानें गेलीं बावीस तेवीस वर्षें कार्य करण्याची संधि मला मिळाली त्या वृत्तपत्रव्यवसायाचा हा बहुमान आहे. कांहीं वक्त्यांनीं माझ्या ' कार्य-निवृत्ती 'ला अनुलक्षून ' भारत-सेवक-समाजा 'संबंधानें जी टीका केली तिचा इन्कार करणें हें माझें कर्तव्य आहे. मला ' ज्ञानप्रकाश 'चें संपादकत्व सोडावें लागलें हा माझ्यावर आणि ' ज्ञानप्रकाशा 'वर ' भारत सेवक समाजानें ' एक मोठा अन्याय केला, असें कांहीं वक्त्यांनीं जें सूचित केलें तें बरोबर नाहीं. ' भारत–सेवक–समाजा 'नें मजवर कोणत्याहि प्रकारचा अन्याय केलेला नाहीं.

" ' ज्ञानप्रकाश ' पत्र हें ' भारत सेवक समाजा 'च्या वृत्तपत्रीय कार्याचें माध्यम या नात्यानें अधिक सुधारावें व त्याजकडून अधिक व्यापक कामगिरी व्हावी, असाच माझी कार्यनिवृत्ति घडवून आणण्यांत ' भारत सेवक समाजा 'चा उद्देश आहे आणि तो योग्यहि आहे. त्या बाबतींत मी दोषी आहें.

" माझ्या नम्र बुद्धीप्रमाणें साहित्य आणि सामाजिक जीवन ह्यांचा निकट संबंध असतो. राजकारण आणि समाजसुधारणा ह्या कार्यांना साहित्याची जोड दिली पाहिजे, या मताचा मी आहें. या निर्धन महाराष्ट्राचें वाङ्मय हेंच मूल्यवान् धन आहे. तो ठेवा महाराष्ट्रानें रक्षिला पाहिजे. श्री ज्ञानेश्वरांच्या ओव्या आणि श्री तुकोबारायांची अभंगवाणी ह्यांनीं महाराष्ट्रांत जी वैचारिक क्रांति घडवून आणली, तिचें महत्त्व विसरतां कामा नये. मराठी वृत्तपत्रांनीं आधुनिक काळांत साहित्याचें साधन उपयोगांत आणलें पाहिजे.

" माझी राजकीय भूमिका न सोडतांहि मी माझ्या राजकीय प्रतिपक्षीयांना सहाय्य

करूं शकलों असें जें आतां सांगण्यांत आलें, त्याचें खरें श्रेय माझ्यापेक्षां इतर पक्षांतील मंडळींच्या मजवरील श्रद्धेला आणि खिलाडू वृत्तीलाच दिलें पाहिजे. वृत्तपत्रांशीं माझा असलेला संबंध आतां सुटला आहे. म्हणून माझ्या व्यवसायबंधूंचा निरोप घेतांना माझी त्यांना अशी नम्र प्रार्थना आहे, कीं महाराष्ट्रांतील वृत्तसंस्था पवित्र आणि प्रभावशाली करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा.

" माझ्या संपादकीय कामगिरीची प्रशंसा करणारांनीं टिळक, आगरकर, गोखले इत्यादि महनीय विभूतींच्या नांवांबरोबर माझ्या नांवाचा निर्देश केला. पण माझी कामगिरी त्यांच्या मानानें अत्यल्प आहे. तथापि, माझ्या पत्रकार-बंधूंना मी असें अवश्य सांगेन कीं, तुम्ही आपल्या कार्यांत टिळक-आगरकर आणि गोखले ह्यांचे आदर्श सदैव दृष्टीपुढें ठेवा. ते तुम्हांला नेहमीं मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक होतील. "

काकांच्या जीवनांतील एका कारुण्यपूर्ण प्रसंगाच्या वेळचें त्यांचें हें अत्यंत हृदयस्पर्शी भाषण मीं मुद्दाम येथें दिलें आहे. एवढ्यासाठीं कीं त्यामुळें काकांच्या विशाल आणि पराकाष्ठेच्या नम्र स्वभावाची वाचकांना कल्पना यावी.

काकासाहेबांचे पुणें आणि मुंबई येथें हे जे दोन गौरव-समारंभ झाले, त्यांतून एक अनिष्ट वादंग निर्माण झालें. मुंबईच्या ' विविधवृत्ता 'ची काका लिमयांशीं जशी मैत्री होती, तशीच काकांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या जागीं ज्या एस्. जी. वझे या ' भारत समाजसेवका 'ची नेमणूक करण्यात आली त्यांच्याशींहि होती. काकांची सद्दी संपली होती. आणि वझ्यांची सद्दी सुरू झाली होती. म्हणून वझ्यांची बाजू घेऊन ' विविधवृत्ता 'नें काकांच्या गौरवसमारंभाचा सूत्रचालक म्हणून व्यक्तिशः माझ्यावर नि त्या गौरवसमारंभांत भाग घेणाऱ्या वक्त्यांवर ' स्तुतिपाठक ', ' फाजील उत्साही भाट ', ' धंदेवाईक ऊरबडवे ', ' विघ्नसंतोषी उठावगीर ' ' मतलबी चाहते ', ' वावदूक वक्ते ' अशा शिव्याशापांची मुक्तहस्तांनीं खैर केली. आणि " काका लिमयांचा गौरव करण्यापेक्षा वझ्यांची नि ' भारत सेवक समाजा 'ची बदनामी करण्याची पर्वणी आम्हीं सर्वांनीं मिळून साधून घेतली " अशी आमच्यावर त्यांनीं राळ उधळली.

माझ्यावर किंवा इतर वक्त्यांवर ' विविधवृत्ता 'नें अर्वाच्य टीका केली ह्याचें मला एवढें वाईट वाटलें नाहीं. पण काकांना ' भारत सेवक समाजा 'नें सेवानिवृत्त कां केलें ह्याची कारणमीमांसा करतांना ' विविधवृत्ता 'नें काकां वर जी गलिच्छ चिखलफेक केली त्याची मला अतिशय चीड आली. ती दुष्ट मीमांसा ' विविधवृत्ता 'नें पुढीलप्रमाणें केली होती :

" ज्ञानप्रकाश हें जबाबदार संस्थेचें मतपत्र आहे. तें पत्र चालविण्याच्या मागें सवंग लोकप्रियता प्राप्त करून घेण्याचा व्यापारी हेतु नाहीं. काकासाहेबांची संपादकीय परंपरा चालवणें समाजाला इष्ट वाटत नाहीं. काकासाहेबांचें व्यक्तित्व जसें ' ज्ञान-

प्रकाशां 'तून व्यक्त झालें तसें श्री. वझे ह्यांचें व्यक्तित्व व्यक्त व्हावें, कारण, त्यांचेंच महत्त्व व उपयुक्तता आज 'समाजा 'ला वाटत आहे ! "

'विविधवृत्ता 'च्या ह्या नतद्रष्ट लेखाला 'नवयुग 'मधून 'सांबाच्या पिंडीवरचे विंचू ' या मथळ्याखालीं मीं झणझणीत उत्तर दिलें. त्यांत शेवटीं मीं असें लिहिलें कीं, " ना. गोखले ह्यांच्या 'भारत सेवक समाजा 'बद्दल आम्हांला अत्यंत आदर आहे. ह्या समाजाची उज्ज्वल परंपरा चिरकालीन चालावी असें आम्हांस वाटतें. पण 'समाजा 'बद्दल आदर बाळगणें म्हणजे ह्या 'समाजा 'च्या पवित्र पिंडीवर दबा धरून बसलेल्या विषारी विंचवाबद्दलहि आम्हीं आदर बाळगावा असें म्हणणें हा निव्वळ जुलूम आहे. काकासाहेबांची कार्यनिवृत्ति हा ह्या समाजपिंडीवरच्या विंचवांचा विषारी उद्योग आहे हें आम्ही ओळखून आहोंत. प्रसंग पडल्यास ह्या पिंडीवरच्या विंचवांना पुढेंमागें आम्ही पायताणांनीं झोडपून काढल्यावांचून रहाणार नाहीं. एवढेंच आतां सांगून ठेवतों. "

'ज्ञानप्रकाश 'च्या संपादकीय स्थानावरून काकासाहेबांना दुष्टपणानें भ्रष्ट करणारे 'भारत सेवक समाजां 'तले ते तीन विषारी 'विंचू ' म्हणजे—पण कशाला त्यांचीं नांवें सांगून आतां तोंड विटाळा ? झालें गेलें, गंगेला मिळालें !

# १३

# नारायण महाराज पळाले

पुष्कळांना वाटतें कीं, मीं केडगांवच्या नारायण महाराजांविरुद्ध चौसष्ट सालामध्येंच प्रथम लिहिलेलें आहे. पण त्यांना हें माहीत नाहीं कीं, मीं नारायण महाराजांच्या ढोंगीपणावर पहिला हल्ला २१ आणि २८ सप्टेंबर १९४१ रोजीं म्हणजे तेवीस वर्षांपूर्वीं माझ्या साप्ताहिक 'नवयुग'-मध्यें 'नारायण महाराज पळाले!' आणि 'नारायण महाराज – बुवा का सावकार!' असे दोन चांगले झणझणीत लेखांक लिहून चढविला.

पहिल्यापासूनच मी सार्वजनिक जीवनांतील राजकीय वा सामाजिक ढोंगाचा कट्टर शत्रु होतों. माझा 'धर्मवीर' हा पहिला चित्रपट त्याच भूमिकेमधून मीं लिहिला होता. 'नवयुग' साप्ताहिकामधूनहि प्रा. नारायण सीताराम फडके ह्यांच्या साहित्यिक बुवाबाजीवर मीं किती निकराचा हल्ला चढविला, ह्याचें इत्थंभूत वर्णन मागेंच केलेलें आहे. मला बुवाबाजीची पहिल्यापासून चीड होती. म्हणून मी आयुष्यांत चुकूनसुद्धां कोणाहि ढोंगी बुवाच्या दर्शनाला गेलों नाहीं.

'नारायण महाराज पळाले' हा मीं जो

लेख पहिल्या प्रथम लिहिला त्याला कारण असें झालें कीं, कोणा ' काळे ' नांवाच्या त्यांच्या धनिक भक्तानें आपले दोन तीन लाखांचे दागिने नारायण महाराजांकडे ठेव म्हणून ठेवले. पुष्कळ वर्षे झालीं तरी नारायण महाराज त्या दागिन्यांचा थांगपत्ता लागूं देईनात. शेवटीं त्या काळ्यांच्या चिरंजीवानें नारायण बुवांवर विश्वासघाताच्या गुन्ह्याचें पकड वारंट काढलें. तेव्हां नारायणबुवा आपल्या केडगांवच्या आश्रमांतून एकाएकीं जे बेपत्ता झाले, ते मुंबईच्या उपनगरांत एका लक्षाधीशाच्या बंगल्यावर जाऊन दडून राहिले. त्यामुळें सर्वत्र एकच बोंबाबोंब उठली कीं, ' नारायण महाराज पळाले ! ' त्याच घटनेला अनुलक्षून मीं २१ सप्टेंबर १९४१ च्या अंकांत ' नारायण महाराज पळाले ! ' हा अग्रलेख लिहिला.

हा माझा अग्रलेख ज्या वेळीं प्रसिद्ध झाला त्याच सुमारास पंडित नांवाच्या पुण्यांतील एका सेवानिवृत्त न्यायाधीशांनीं नारायणबुवांना पूर्वी कर्जाऊ दिलेले पांच हजार रुपये ठरलेल्या मुदतींत सव्याज परत दिले नाहींत म्हणून त्यांच्यावर पुण्याच्या कोर्टांत मुकद्मा दाखल केला. वस्तुतः श्री. पंडित हे नारायणबुवांचे एक निस्सीम भक्त होते. म्हणजे नारायणबुवा नि पंडित ह्यांचें गुरुशिष्याचे नात्याचे संबंध होते. असें असतां पंडित ह्यांनीं आपल्या गुरूंना पाच हजार रुपये कर्जाऊ देऊन आपल्या गुरु-शिष्याच्या नात्याचें रूपांतर धनको आणि ऋणको ह्या नात्यामध्यें करावें, एवढेंच नव्हे तर गुरुमहाराजांनीं कर्जाची फेड ठरलेल्या मुदतींत केली नाहीं म्हणून त्यांच्यावर फिर्याद करून त्यांना कोर्टामध्यें खेचावें, हें गुरु-शिष्य भक्तीच्या पारमार्थिक स्वरूपाचें अत्यंत बाजारी आणि व्यापारी विडंबन होतें, असें मला वाटून मीं २८ सप्टेंबर १९४१ च्या ' नवयुगां 'त ' नारायण महाराज — बुवा का सावकार ' हा दुसरा जळजळीत लेखांक लिहिला.

मला हें समजेना कीं, नारायण बुवाच्या दैवी सामर्थ्यावर विश्वास असलेल्या त्यांच्या एका शिष्यानें त्यांच्यावर कोर्टांत फिर्याद काय म्हणून करावी ? ह्याचा अर्थ आपल्या गुरूच्या अंगीं असलेल्या त्या दैवी सामर्थ्याबद्दल शिष्याचा संपूर्ण भ्रमनिरास झाला असला पाहिजे, ह्याखेरीज दुसरा काय समजावयाचा ?

त्याचप्रमाणें नारायण महाराज हे जर खरोखरच कोणी अत्यंत लोकोत्तर वा अद्भुत पुरुष असते किंवा श्री दत्तात्रेयाचे पृथ्वीवरील अवतार असते अथवा परमेश्वराचे ह्या जगामधील अधिकृत एजंट असतें, तर त्यांना पांच हजार रुपयांची गरज कदापिहि लागली नसती आणि त्यांचे शिष्य पंडित ह्यांनीं त्यांना पांच हजार रुपये कर्ज म्हणून न देतां दक्षिणा म्हणून ती रकम त्यांच्या झोळींत घातली असती. म्हणजे मग पांच हजार रुपये नारायणबुवांनीं परत केले नाहींत म्हणून त्यांच्यावर फिर्याद करण्याची शिष्याला आयुष्यांत कधींहि पाळी आली नसती.

ह्या सर्व घटनेला अनुलक्षून त्या वेळीं ' नवयुग 'मध्ये मीं जे दोन लेख लिहिले

आणि नारायणबुवाचें बेंड फोडलें त्यांतील कांहीं उतारे येथें देण्यासारखे आहेत :

" श्री. पंडित हे नारायण महाराजांचे शिष्य म्हणून केडगांवला वाऱ्या करीत असले आणि बाह्यात्कारी जरी नारायण बुवांच्या शिष्यत्वाचीं बिरुदें ते मिरवीत असले, तरी नारायण बुवांच्या माहात्म्याबद्दल त्यांचा गैरसमज केव्हांहि झालेला नव्हता. नारायण बुवांच्या सत्यस्वरूपाची त्यांना प्रारंभापासून अगदीं पुरेपूर कल्पना आलेली होती. कारण मोक्षाची वाट पुसण्यासाठीं श्री. पंडित हे नारायण महाराजांकडे गेलेले नसून सरकारी नोकरींत मिळवलेला पैसा अत्यंत सुरक्षितपणें – आणि परमेश्वरभक्ति करतां करतां व्याजानें गुंतविण्यासाठीं त्यांना केडगांवची पेढी फारच सोयीस्कर वाटली असावी म्हणूनच ते तेथें ' गुरुमाउलीं 'च्या चरणापाशीं गेलेले असावेत.

" केडगांवला नारायणबुवांकडे जाणारे बहुतेक सर्व भक्त पंडित ह्यांच्याच मालिकेंत बसण्यासारखे आहेत. आपल्या बुवाबाजीच्या बुरख्याआड दडून आपल्या भक्तभक्तिणींशीं व्याजबट्टा मिळवण्यासाठीं सावकारी करण्याचा त्यांना विलक्षण नाद आहे ही गोष्ट आम्हांला पुष्कळ वर्षांपासून माहिती आहे.

" नारायणमहाराजांच्या परमेश्वरी सामर्थ्याच्या मसालेदार गोष्टी ऐकून शेंकडों मूर्ख लोक केडगांवला जमा होतात. कोणाला मूल पाहिजे असतें कोणाला नोकरी पाहिजे असते. कोणाला आरोग्य पाहिजे असतें. कोणाला सांसारिक समाधान पाहिजे असतें, अशा अनेक कारणांसाठीं गरजू भाविकांची गर्दी केडगांवास एकसारखी जमत असते. कांहीं कांहीं भाविक दोन दोन तीन तीन दिवसांचे ' टेंपरवारी ' रहिवासी असतात. तर कांहीं कांहीं भाविक दर आठवड्याला वा दर महिन्याला नियमानें तेथें येणारे असतात.

" ह्या भाविकांमधील डबोलेवाले किंवा दागिनेवाले अथवा जमीनजुमलेवाले भक्त कोणते हें नारायणबुवा आणि त्यांची साथीदार मंडळी ह्यांना हेरून ठेवण्यास फारसा वेळ लागत नाहीं. आणि अशी मंडळी एकदां टेहेळून ठेवली कीं त्यांच्याशीं विशेष सलगी करणें, त्यांना ' सेवे 'साठीं आपल्या ' चरणा 'पाशीं वारंवार बोलावणें, त्यांना आपल्या ' खास ' शिष्यवर्तुळांत समाविष्ट करणें, आणि अशा तऱ्हेनें त्या त्या लोकांशीं उत्तम तऱ्हेनें ' घसट ' जमल्यानंतर मग त्यांच्याबरोबर हलके हलके आर्थिक व्यवहार सुरू करणें, ही नारायणबुवाच्या बुवाबाजीधील ' म्यानबाची मेख ' होय.

" केडगांवला प्रत्यहीं जमणाऱ्या शेकडों देवभोळ्या अडाणी भाविकांना नारायण-महाराजांच्या बुवाबाजीचें हें भांडवलशाही स्वरूप सहजासहजीं लक्षांत येत नाहीं. श्री दत्तात्रेयाच्या मंदिराचें तें श्रीमंती वैभव, तो भव्य मंडप, त्या आजूबाजूच्या सुंदर इमारती, रहाण्याची आणि भोजनाची त्या ठिकाणची उत्तम व्यवस्था, या भपक्यानें आणि थाटामाटानें भाबडे भाविक लोक भांबावून जातात. नारायण महाराजांच्या ' ईश्वरी ' अलौकिकत्वावर त्यांचा खरोखरीच विश्वास बसतो.

" हिऱ्याच्या गुंड्या असलेला त्यांचा तो रेशमी शर्ट आणि त्यांचें तें राजविलासी सोंग बघून नाटकांतील ' राजा ' पाहिल्यावर प्रेक्षकांचे डोळे जसे दिपतात, तशा भाविकांच्या चित्तवृत्ति विस्मयानें दिपून जात असतील ह्यांत काय नवल ? बाह्यात्कारी डोळे मिटून जप करीत बसलेले नारायणमहाराज मनांतल्या मनांत गेल्या महिन्यांत मिळालेल्या व्याजाचा हिशेब करीत असतील किंवा पुढील महिन्यांत कोणाकडून किती येणें आहे, ह्याची बेरीज स्वतःच्या मनामध्यें ते करीत असतील असा चुकून देखील संशय एकाद्या भक्ताच्या मनांत येत असेल काय ?

" एवंच, नारायणबुवांचें केडगांवचें पीठ ही भावभक्तीची पेठ नसून ती व्याज-बट्ट्याची एक सावकारी पेढी आहे. ह्या पेढीमध्यें वैकुंठाला जाण्याचे पारमार्थिक व्यवहार होत नसून घराच्या किंवा दागिन्यांच्या तारणावर घेतलेल्या कर्जांच्या देण्या-घेण्याचे ऐहिक व्यवहार होत असतात. म्हणून श्री नारायण बुवा हे ' महाराज ' नाहींत किंवा ' बुवा 'हि नाहींत. ते सर्वसामान्य सावकाराप्रमाणें, मारवाड्याप्रमाणें किंवा पठाणाप्रमाणें सावकारी करणारे एक इसम आहेत.

" वास्तविक त्यांनीं आपल्या दत्तमंदिरावर ' नारायण बुवा बँकर्स, केडगांव ' अशी पाटी लावावयाला पाहिजे. मारवाड्याच्या दुकानांत ज्याप्रमाणें बालाजीची तसबीर असते, किंवा सावकाराच्या पेढीवर जसें एकादें रामपंचायतनाचें चित्र लावलेलें असतें, त्याप्रमाणें नारायण बुवांनीं आपल्या पेढीवर दत्तात्रेयाचें चित्र न लावतां दत्तात्रेयाच्या मंदिरांतच आपली पेढी उघडलेली आहे.

" त्यामध्यें अर्थात् दुहेरी फायदा आहे. दत्तात्रेयाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविक लोकांकडून दक्षिणाहि मिळते. आणि त्यांना दिलेल्या कर्जावर व्याजहि मिळतें. शिवाय, आपल्या दैवी सामर्थ्याची पकड भाविक ऋणकोंच्या मनावर घट्टपणें बसली असल्यामुळें त्यांच्याकडून कर्ज बुडण्याचें भयहि नसतें. त्यामुळें नारायणमहाराजांच्या सावकारीचें बस्तान इतर सावकारांपेक्षां उत्तम बसलेलें आहे. आणि त्या धंद्यांत त्यांची किफायतहि फार मोठ्या प्रमाणावर होत असली पाहिजे.

" आमच्या माहितीप्रमाणें दोन दोन तीन तीन लाख रुपयांची रक्कम एका वेळीं नारायणबुवांकडे नेहमीं पडून असते. सारांश, नारायण महाराजांची सांपत्तिक स्थिति अतिशय उत्तम असतां पैशाचे कांहीं व्यवहार चुकवण्यासाठीं त्यांना मुंबईला पळून कां जावें लागतें नि आपल्या भक्तांकडून केवळ पांच हजारांच्या रकमेसाठीं आपल्यावर फिर्याद कां ओढवून घ्यावी लागते हें आम्हांला कळत नाहीं.

" नारायणबुवांवर आम्हीं टीका केल्यामुळें चिडून जाऊन किराणा व्यापार करणाऱ्या त्यांच्या एका सच्छिष्याकडून अचकट विचकट शिव्यांनीं भरलेलें एक पत्र आम्हांला आलेलें आहे. सदर शिष्योत्तमाच्या पत्रांतला शिव्यांचा भाग वजा केला तर त्यांचें म्हणणें असें कीं, ' नारायण महाराज हे एक तुमच्या आमच्या सारखेच

प्रापंचिक मनुष्यप्राणी आहेत. तेव्हां सर्वसामान्य माणसांतले दोष बुवामहाराजांच्या अंगांत असल्यास नवल नाहीं. तेव्हां त्यांनीं कांहीं पैशाचे व्यवहार केलेले असले किंवा कांहीं पैशांच्या अडचणींत ते आले असले तर त्याबद्दल त्यांच्यावर आम्हीं तुटून पडण्याचें कारण नाहीं. ''

" ' नारायण महाराज तुमच्या आमच्यासारखे सामान्य मनुष्यप्राणी आहेत ' हें महाराजांच्या सच्छिष्यानें केलेलें समर्थन म्हणजे ढोंगीपणाची पराकाष्ठा होय. आज हजारों मूर्ख, अडाणी लोक नारायण महाराजांच्या पायावर टाळकीं आपटण्यासाठीं केडगांवला जातात आणि महाराजहि आपले पाय भरपूर लांब पसरून हे भक्तांचे आघात आपल्या चरणकमलांवर सहन करतात, ते कांहीं सामान्य प्रापंचिक मनुष्य प्राणी म्हणून नव्हेत. ' नारायण ' नांवाचा हा इसम स्वतःच्या नांवामागें ' महाराज ' ही उपाधि लावून आज इतकीं वर्षे भोळ्या अज्ञानी लोकांचा पै-पैसा नागवीत केडगांवीं मुक्काम मांडून जो बसलेला आहे, तो कांहीं ' सामान्य माणूस ' म्हणून नव्हे.

" आपल्यांत कांहीं तरी अलौकिक दैवी सामर्थ्य आहे, असें आधीं जगाला डांगोरा पिटून सांगावयाचें आणि तें दैविक सामर्थ्य जगाला पटवतां आलें नाहीं किंवा आपलें कांहीं तरी बेंड बाहेर फुटलें म्हणजे ' आम्ही काय, आम्ही अगदीं सामान्य मनुष्य आहोंत. आम्हीं कधीं तुम्हांला सांगितलें होतें कीं, आमच्या जवळ दैविक सामर्थ्य आहे म्हणून ' अशी वर साळसूद बतावणी करावयाची, ही ह्या ढोंगी बुवांची नि त्यांच्या भोंदू शिष्यांची नेहमींचीच युक्ति आहे.

" ' कावळा बसणें आणि ढाळी मोडणें ' ह्या न्यायानें हातून कांहीं चमत्कार घडला तर ' हें पहा आपचें दैवी सामर्थ्य ! ' म्हणून जगापुढें पांचजन्य फुंकावयाचा; नाहींच कांहीं साधलें तर म्हणावयाचें कीं आम्ही आपलीं सामान्य माणसें, तुम्हीच विनाकारण कां आमच्यामागें लागतां ? असें हें बुवाबाजीच्या फसवणुकीचें दुतोंडी स्वरूप आहे. नारायणबुवांनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं आतां कितीहि लटपटपंची केली तरी केड-गांवचा हा नारायण बुवा हा केवळ बुवाबाजीचें ढोंग करून व्याजबट्टा करणारा एक सामान्य धनलोभी सावकार आहे, ही गोष्ट आतां जगजाहीर झालेली आहे.

" नारायणबुवांनीं जनतेच्या डोळ्यांत आजपर्यंत धूळ टाकून जनतेला फस-विलेलें आहे. हजारों गरीब बायाबापड्यांना नागवून अन्नान्न करावयाला लावलेलें आहे. शेंकडों विचारी आणि कर्तृत्ववान माणसांना प्रज्ञाहत करून त्यांना आयुष्यांतून अजिबात उठवलेलें आहे. समाजांतील दुष्ट, घातकी आणि लबाड लोकांना साळसूदपणें एकत्र जमवून समाजाला फसवण्याचें त्यांच्या हातांत ऐसपैस साधन मिळवून दिलें आहे. म्हणून नारायणबुवा हा एक समाजाचा भयंकर शत्रु आहे, असें आम्हीं समजतों.

" सदर नारायणबुवा हा महाराज नाहींच नाहीं. पण सामान्य माणुसकी देखील त्याच्या अंगांत नाहीं. आजपर्यंत त्यानें लाखों रुपये लोकांकडून लुबाडले. पण त्यांतील

एक पै देखील त्यानें एखाद्या राष्ट्रीय, शैक्षणिक किंवा सामाजिक संस्थेला दिलेली नाहीं. मेहेरबाबांनीं ज्याप्रमाणें वेड्या लोकांसाठीं इस्पितळ उघडलेलें आहे, त्याप्रमाणें या नारायणबुवानें गरिबांसाठीं एकादें टोलेजंग इस्पितळ उघडलें असतें, तर त्याच्या सार्वजनिक पापाचें कांहीं तरी परिमार्जन झालें असतें; पण तेवढें देखील सत्कृत्य त्याच्या हातून घडलें नाहीं.

"एकाद्या व्यक्तीला दुसऱ्यानें फसविलें तर तो इंडियन पीनल कोडाखालीं गुन्हा होतो. पण एखादा बुवा समाजांतील शेंकडों लोकांना रोजरोसपणें वर्षांनुवर्षे जरी फसवीत असला, तरी त्याला ठेंचून काढणारा एकादा 'इंडिअन पीनल कोड' समाजाजवळ नसावा हें निव्वळ आमचें दुर्दैव होय! सुदैवानें नाराणबुवांचें सावकारी बिंग त्यांच्याच कर्मानें आज बाहेर आलें आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन त्यांच्या आतांपर्यंतच्या चरित्रांतील एकूण एक बेंड फोडून बाहेर काढावयाला सध्यांची वेळ अतिशय उत्तम आहे!"

बुवाबाजी हा इंडियन पीनल कोडान्वयें एक फौजदारी गुन्हा ठरवण्यांत आला पाहिजे, हा विचार १९४१ सालीं आमच्या 'नवयुग साप्ताहिका'मधून मीं छातीठोकपणें व्यक्त केलेला आहे, हे सांगण्यासाठींच मीं हें प्रकरण मुद्दाम लिहिलेलें आहे.

# १४

# परशुरामभाऊ कॉलेजांतला हल्ला

८ ऑगस्ट १९४१ च्या ' केसरी 'च्या अंकांत तात्यासाहेब केळकरांनीं गांधीजी आणि सावरकर ह्यांची तुलना करणारा एक पांचस्तंभी अग्रलेख लिहिला. गांधीजींची निंदा आणि सावरकरांची प्रशंसा ह्यांनीं तो लेख भरलेला होता. त्या लेखाला उत्तर देण्यासाठीं मीं ७ सप्टेंबर आणि १४ सप्टेंबर १९४१ च्या ' नवयुग 'च्या अंकांत ' मूठभर ब्राह्मणांचे पुढारी—सावरकर ' आणि ' स्वातंत्र्यवीर का स्वातंत्र्याचे शत्रु ' या मथळ्याखालीं दोन अग्रलेख लिहिले. ह्या दोन्ही लेखांमध्यें अर्थात्च सावरकरांच्या राजकारणावर मीं अत्यंत कडक शब्दांमध्यें जळजळीत टीका केलेली होती.

माझ्या त्या दोन्ही लेखांतला सर्वच सारांश आतां सांगण्याची आवश्यकता नाहीं. पण त्यांतला मुख्य युक्तिवाद पुढील-प्रमाणें होता :

" ब्रिटिशांना कॉंग्रेसचें आज जेवढें भय वाटतें, तेवढें सावरकरांचें भय वाटत नाहीं. १९०८ च्या सावरकरांची ब्रिटिशांना खरो-खरच भीति वाटत होती. कारण त्या वेळीं ते ब्रिटिश साम्राज्यशाहीचे शत्रु होते. निव्वळ हिंदूंसाठीं स्वातंत्र्य पाहिजे असल्याची

भाषा त्या वेळीं ते बोलत नव्हते. " माझा सबंध देश स्वतंत्र झाला पाहिजे; माझी मातृभूमि स्वतंत्र झाली पाहिजे, माझा अखिल भारतवर्ष स्वतंत्र झाला पाहिजे ! " अशा तेजस्वी घोषणा त्या वेळीं सावरकरांच्या तोंडून निघत होत्या. त्या वेळीं सावरकर हे खरोखरच स्वातंत्र्यवीर सावरकर होते.

" १९०८ चे सावरकर जर पुन्हां देशाला दिसतील तर ' स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयजयकारा 'नें हा देश आसेतुहिमाचल दुमदुमून जाईल. पण आजचे सावरकर हे आतां स्वातंत्र्यवीर राहिलेले नाहींत. त्यांना काँग्रेसचा जितका मनापासून द्वेष वाटतो, काँग्रेस हें नांव निघाल्याबरोबर त्यांच्या तळपायाची आग जितकी झपाट्यानें त्यांच्या मस्तकांत जाऊन पोहोंचते, तितका द्वेष, तितका संताप त्यांना परकीय साम्राज्यशाही सत्तेबद्दल आज वाटत नाहीं.

" ब्रिटिश सरकारशीं सहकार्य करण्याची भाषा आज ते उघड उघड बोलताहेत आणि तें सरकार देशांत अनंत काळ राहील असलें राजकारण लढविण्यांत आज ते गुंतले आहेत. म्हणून आम्हांला ते आज ' स्वातंत्र्यवीर ' वाटत नाहींत. किंबहुना आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे ते शत्रु आहेत असेंच मोठ्या दुःखानें आम्हांला म्हणावें लागतें. "

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं देशाच्या स्वातंत्र्याचा लढा त्या वेळीं पराकाष्ठेचा निकराला आला होता. आणि तो बेचाळीसच्या ' चले जाव ' आंदोलनाकडे झपाट्यानें घोडदौड करीत चालला होता. काँग्रेसच्या त्या लढाऊ राजकारणाची धुंदी माझ्या डोक्यांत शिरली असल्याकारणानें काँग्रेसला विरोध करणारें कोणतेंहि किंवा कोणाचेंहि राजकारण हें देशहिताचें नाहीं अशी त्या वेळीं माझी ठाम आणि प्रामाणिक समजूत होती. कोणताहि विचार अत्यंत तल्लीन आणि तन्मय होऊन कमालीच्या आवेगानें मांडावयाचा हा माझा पहिल्यापासून देहस्वभाव असल्यानें ह्या दोन लेखांमध्यें मीं हिंदुमहासभेच्या राजकारणावर जी कडाडून टीका केली ती सावरकरांच्या त्या वेळच्या भक्तांना चांगलीच बोचली असली पाहिजे ह्यांत मुळींच शंका नाहीं.

' साप्ताहिक नवयुग 'च्या पहिल्या अंकांतील माझे सहकारी संपादक रमाकांत वेलदे ह्यांनीं सावरकरांवर लिहिलेल्या विरोधी लेखाचा ' मोबदला ' ज्याप्रमाणें नागपूरच्या सभेमध्यें मला द्यावा लागला, त्याच प्रकारची अधिक गंभीर नि भीषण पुनरावृत्ति ह्या माझ्या दोन लेखांमुळें पुण्याला त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांच्या आंत घडून आली.

एक दिवस पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमधील रामदास ह्या आडनांवाचा एक विद्यार्थी मुंबईला माझ्या बिऱ्हाडीं आला नि कॉलेजच्या नियतकालिकाच्या रौप्यमहोत्सवी समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची त्यानें मला विनंती केली. त्या आमंत्रणाच्या मागचें राजकारण काय असावें ह्याची मला यत्किंचितहि कल्पना येण्याचें

# परशुरामभाऊ कॉलेजांतला हल्ला

कांहीं नवीन, सर्वसाधारणपणें व्याख्यानाचीं जशीं आमंत्रणें येत, तसल्याचपैकीं तें एक मामुली आमंत्रण होतें. म्हणून मीं कोणत्याहि प्रकारें आढेवेढे न घेतां तें तत्काळ मान्य केलें.

२७ सप्टेंबर १९४१ ला संध्याकाळीं मी पुण्याला गेलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुण्याच्या प्रभात टॉकीजमध्यें माधवराव पटवर्धनांच्या स्मारकाच्या मदतीसाठीं कांहीं कवींचें काव्यगायन होतें. त्यांमध्यें मीहि एक होतों.

काव्यगायन संपल्यानंतर बाहेरच्या बाजूला मला गणपतराव नलावडे भेटले. ते म्हणाले, "बाबूराव, आज दुपारीं सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें तुमचें जें व्याख्यान होणार आहे, त्या वेळीं तुम्हांला मारण्याचा प्रयत्न होणार आहे असें मी ऐकतों. म्हणून तुम्ही आपले सावध रहा!"

तारुण्याची आणि यशाची मस्ती त्या वेळीं माझ्या रोमरोमांत तुडुंब भरलेली होती. माझ्या पुणें शहरांत आणि माझ्या व्याख्यानाच्या वेळीं माझ्यावर कोणी हल्ला करील, ही कल्पनासुद्धां माझ्या मनाला त्या वेळीं स्पर्श करणें अशक्य होतें. गणपतरावांनीं स्नेहभावानें मला दिलेला तो इशारा मीं उन्मत्तपणें धुडकावून लावला.

"माझ्यावर हल्ला करणाराची माय व्याली पाहिजे!" मी त्यांच्या अंगावर गुरगुरून म्हणालों.

तुळशीबागेच्या बोळांत एक परांजप्यांचा वाडा आहे. माझे आफ्रिकेचे बालमित्र डॉ. दिनकर पुरंदरे हे त्या वेळीं रजेवर आले होते आणि ते तेथें रहात होते. त्यांच्याकडेच मी त्या दिवशीं उतरलों होतों. माझे दुसरे जिवलग मित्र शामराव भोळे हे सुद्धां त्या दिवशीं तेथेंच भोजनाला होते. मी, पुरंदरे आणि भोळे असे आम्ही तिघेजण सहा फूट उंचीचे आणि सव्वादोनशें पौंड वजनाचे 'राक्षस'च होतों. आम्हीं तिघेजण रस्त्यांतून बरोबर चालूं लागलों कीं, रस्ता जवळजवळ अडल्यासारखाच होई. सारे लोक आमच्याकडे टकाटका पाहूं लागत.

प्रा. फडक्यांच्या 'झंकार' साप्ताहिकाचे व्यवस्थापक श्री. पु. रा. भिडे (आतां स्वामी विज्ञानानंद) हे पहिल्यापासून माझे भक्त होते. इंग्रजी सहावींत असतांना त्यांनीं 'हायस्कूल' नांवाची एक कादंबरी लिहिली होती. तिला मीं प्रस्तावना लिहिली होती आणि त्या प्रस्तावनेंत लेखकाला बजावलें होतें कीं, "बाळ, लहान वयांत जर तूं कादंबरीलेखनाच्या नादीं लागशील तर तुझा आयुष्यांत 'विठ्ठल वामन हडप' होईल." तेव्हांपासून पु. रा. भिडे माझ्यावर 'आषक' होते.

परशुरामभाऊ कॉलेजमधलीं कांहीं मुलें माझ्यावर हल्ला करणार आहेत हें पु. रा. भिड्यांना कसें समजलें कोणास ठाऊक? त्यांनीं ती बातमी डॉ. दिनकर पुरंदरे ह्यांना त्यांचे घरमालक परांजपे ह्यांच्यामार्फत कळविली. भोजनाच्या वेळीं दिनकरनें मला ती सांगितली. आणि त्या वेळीं आमच्यांत असें ठरलें कीं, व्याख्यानाला जातांना

दिनकर पुरंदरे नि शामराव भोळे ह्या दोघांना बरोबर घेऊन मीं कॉलेजांत जावयाचें.

जेवण झाल्यावर आम्ही बाहेरच्या खोलींतील सतरंजीवर आडवे झालों. चार वाजावयाला दहा मिनिटें कमी असतांना मी जागा झालों. दिनकर आणि शामराव दोघेहि गाढ झोपेंत होते. त्यांना उठवणें मला प्रशस्त वाटलें नाहीं. शिवाय, दोन शरीररक्षक घेऊन व्याख्यानाला जाणें ही गोष्ट माझ्या पौरुषाला नि स्वाभिमानाला कमीपणा आणणारी होती. म्हणून मी गुपचुप उठलों, पोषाख केला आणि त्या दोघांना झुकांडी देऊन तसाच रस्त्यावर सटकलों. आणि टॅक्सी करून सरळ सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें आलों.

कॉलेजच्या विस्तीर्ण परिसरांत सर्वत्र सामसूम होतें. माझी गाडी आली तशी त्या समारंभाचे संचालक आणि कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक सत्तेगिरी हे घाई-घाईनें मला सामोरे आले.

" अगदीं वेळेवर आलांत !" ते हंसून मला म्हणाले.

" काय, आज मुलें म्हणे माझ्यावर हल्ला करणार आहेत ?" मीं पहिल्या छूटच त्यांना हटकलें.

" छे, छे, तसें कांहीं नाहीं; अन् शिवाय मी आहें ना !" प्रा. सत्तेगिरी आपल्या नेहमींच्या बावळट बेफिकीरीनें म्हणाले.

आम्ही लेडी रमाबाई हॉलमध्यें गेलों. सभागृह तुडुंब भरलें होतें. वरच्या मजल्यावर फक्त विद्यार्थिनी बसलेल्या होत्या आणि खालचा मजला सर्व विद्यार्थ्यांनीं व्यापलेला होता. ती विभागणी पाहून मला जरा आश्चर्यच वाटलें. पण मी कांहीं बोललों नाहीं. आमच्या आगमनाचा सत्कार अगदीं निःशब्द स्तब्धतेनें झाला. कुठें टाळ्या नाहींत, हश नाहीं कीं हुश नाहीं. त्याचेंहि कांहीं मला विशेष वाटलें नाहीं.

सभागृहाचें लांबलचक व्यासपीठ ओकेंबोकें होतें. मागल्या नि डाव्या बाजूच्या खिडक्या बंद होत्या. दोन आय. टी. एफ्. चे विद्यार्थी लष्करी गणवेशांत आमच्या मागें अंतराअंतरावर उभे होते.

प्रा. सत्तेगिरींनीं चारदोन वाक्यांतच प्रास्ताविक भाषण केलें. दोन तीन विद्यार्थ्यांना माझ्या हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं आणि नंतर माझ्या भाषणाला मीं सुरुवात केली. " प्रा. सत्तेगिरी आणि विद्यार्थी मित्रहो—"

त्याबरोबर सभागृहांतील माझ्या उजव्या बाजूकडून 'स्वातंत्र्यवीर सावरकर की जय !' अशा एकदम आरोळ्या उठल्या. मीं त्यांच्याकडे हंसून पाहिलें नि म्हणालों, " तुमच्या गर्जना संपूंद्यात, मग मी माझ्या व्याख्यानाला प्रारंभ करतों !"

असें म्हणून जों मी खालीं बसणार तोंच सभागृहाच्या दोन्ही बाजूंकडून शेंदीडशें विद्यार्थ्यांची झुंड एकदम व्यासपीठावर चढली नि त्यांनीं मला गराडा घातला. त्याबरोबर माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसलेले प्रा. सत्तेगिरी ह्यांनीं व्यास-

पीठावरून एकदम सभागृहांत अशी कांहीं जोरानें उडी मारली आणि धूम ठोकली म्हणतां! वाहवा रे वाहवा! त्यानंतर गेल्या तेवीस वर्षांत मला हे सद्गृहस्थ अद्याप एकदांहि कधीं भेटले नाहींत.

खून करतांना खुनी माणसाला जसा खून चढतो असें म्हणतात ना, त्याप्रमाणें ज्याच्यावर अकस्मात् खुनी हल्ला होतो, त्यालाहि अशाच प्रकारची वेहोषी चढते, असें मी त्या वेळच्या माझ्या अनुभवावरून सांगतों. माझें सर्वांग एकदम बधिर झालें. काय करावें हें कळेना. पण मी घाबरलों नाहीं. ओरडलों नाहीं. कोणालाहि मदतीला हांक मारली नाहीं. छातीवर हात बांधून एकाद्या वृक्षासारखा शांत नि ताठ उभा राहून त्या हल्ल्याला वेडरपणें तोंड देऊं लागलों.

माझ्या भोंवतीं मुलांची अतोनात गर्दी झाल्यामुळें एक प्रकारें माझें संरक्षणच झालें. कारण लांब हात करून ते मला मारूं शकत नव्हते. शिवाय माझ्या उंचीमुळें त्यांचे हातहि माझ्या तोंडापर्यंत आणि डोक्यापर्यंत पोहोंचूं शकत नव्हते. त्यामुळें त्या दाटीवाटींत माझ्या सर्वांगावर बुकलाबुकली करण्यापलीकडे त्यांना अधिक जोरदार असा हल्ला माझ्यावर चढवतां आला नाहीं. त्यांचा सारा भर होता रेटारेटी करून मला खालीं पाडायचा. मी खालीं पडलों असतों तर माझ्या अंगावर पडून त्यांनीं माझा खालच्या खालींच निकाल लावला असता.

म्हणून मीं मनाशींच चंग बांधला होता, कीं काय वाटेल तें झालें तरी स्वतःला खालीं पडूं द्यावयाचें नाहीं. खालीं वाकून कोणी तरी माझे दोन्ही बाजूंकडून पाय ओढत होतें. पण मीं त्याला दाद दिली नाहीं.

त्या मारामारींत केवळ हातांचा नि मुठींचाच उपयोग करण्यांत आला असें नाहीं. कोणी दाभणाचे टोचे आणले होते. पण त्यांच्या टोचणीची आग त्या वेहोषींत मला जाणवली नाहीं. कोणी माझ्या डोक्यावर टोमॅटो मारले. कोणी मिरचीची पूड अंगावर उधळली. त्या दंगलींत माझ्या डोक्यावरची गांधी टोपी आणि डोळ्यांवरचा चष्मा केव्हां उडाला तें मला समजलेंच नाहीं. माझ्या अंगांतला खादीचा कोट मागल्या बाजूनें फाडून त्याचे दोन तुकडे दोन्ही बाह्यांमधून परस्पर काढून पळवण्यांत आले. कोटाच्या खिशांत चारपांचशें रुपये होते ते गेले.

माझ्यावर हल्ला करणाऱ्या त्या शेंदीडशें पोरांत दहाबारा विद्यार्थी असे होते, कीं जे माझ्या भोंवतीं कडें करून मला त्या गर्दीमधून सुरक्षितपणें बाहेर काढण्याच्या प्रयत्नांत होते. पण कोण आपला मित्र आणि कोण शत्रु हें जाणण्याच्या अवस्थेंत त्या वेळीं मी नव्हतों. कोणी मला इकडे ओढी, तर कोणी तिकडे ओढी. अशा त्या ओढाताणींत मी एकाद्या खडकाप्रमाणें खंबीर आणि गंभीर वृत्तीनें उभा होतों. मी तोंडानें हूं का चूं केलें नाहीं. सभागृहांतले इतर सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी रस्सीखेचीचा हा सर्व 'खेळ' अगदीं शांतपणें पहात होत्या.

व्यासपीठावरून बाहेर जावयाला उजव्या बाजूकडचा एकच दरवाजा खुला होता. व्याख्यानाच्या जागेपासून त्याची लांबी कमींत कमी पंचवीस फूट तरी असावी. रेटारेटीला नि झोंबाझोंबीला तोंड देऊन हें अंतर तोडावयाला मला कमींत कमी वीस मिनिटें तरी लागलीं असावींत.

एकदां मीं त्या दरवाजाकडे पाहिलें तों मला कॉलेजचे व्हाइस-प्रिन्सिपल ह. भ. प. सोनोपंत ऊर्फ मामासाहेब दांडेकर त्या दरवाजांत उभे असलेले दिसले. त्यांचा तो गोरापान हिरवा दाढीचा बोडखा चेहेरा मीं बरोबर निरखला. आपला पांढरा रुमाल त्यांनीं आपल्या हातांत घेतला होता. एक क्षणभरच त्यांना मीं पाहिलें. तेवढ्यांत ते मागल्या मागें कुठें नाहींसे झाले.

सोनोपंत दांडेकर हे त्या कॉलेजचे व्हाइस-प्रिन्सिपल होते. ते हरिभक्त-परायण आणि संतांचे दासानुदास होते. आपल्या कॉलेजांतील कांहीं विद्यार्थ्यांनीं माझ्यावर प्राणांतिक हल्ला चढवलेला ते डोळ्यांनीं पहात होते. असे असून ते कांहीं माझ्या मदतीला धांवले नाहींत. ते जर नुसते ओरडले असते कीं, " तुम्ही माझा प्राण घ्या, पण अत्र्यांच्या केसालाहि मी तुम्हांला धक्का लावूं देणार नाहीं ! " तर एका क्षणांत माझ्यावर हल्ला करणारे ते सारे दंगलखोर विद्यार्थी बारा वाटा पसार झाले असते.

पण सोनोपंतांनीं मला त्या संकटांतून वांचवण्यासाठीं आपल्या गोऱ्यापान हाताची करंगळीसुद्धां वर केली नाहीं. संतांच्या प्रेममय वाङ्मयांत आजन्म आणि आकंठ डुंबणाऱ्या ह्या माणसानें त्या प्रसंगीं असें अमानुष आणि भावनाशून्य वर्तन कां करावें ह्याचा उलगडा आजतागायत मला झालेला नाहीं. तेव्हांपासून ह्या माणसाबद्दल माझ्या मनांत कवडीचाहि आदर राहिलेला नाहीं.

'हरिभक्तपरायण' म्हणून ह्याला कोणी कितीहि डोक्यावर घेऊन नाचलें आणि वारकरी संप्रदायांतल्या भोळ्याभाबड्या लोकांनीं ह्याच्या पायावर कितीहि लोटांगणें घातलीं, तरी बाहेरून गोरापान दिसणारा हा ढोंगी माणूस अंतःकरणानें काळाठिक्कर आहे अशी त्या वेळेपासून माझ्या मनाशीं मीं खूणगांठ बांधून ठेवली आहे.

माझ्या साहाय्यासाठीं तळमळून जर कोणी प्राध्यापक त्या वेळीं धांवून आला असेल, तर तो म्हणजे माझे वर्गबंधु प्रा. रा. वि. ओतूरकर ! एखाद्या तीरासारखे ते माझ्या रोखानें धांवत येत होते. तेवढ्यांत कोणी तरी थप्पड मारून त्यांच्या डोळ्यां-वरचा चष्माच उडवला ! त्यामुळें त्यांचा बिचाऱ्यांचा नाइलाज झाला. पण राजा-भाऊंचे तें दैवी कृत्य आजतागायत मीं माझ्या हृदयामध्यें कृतज्ञतेनें जपून ठेवलें आहे. कुठें तो हरिभक्तपरायण 'सोन्या' नि कुठें तो मित्रपरायण 'राजा' ?

अखेरशेवटीं मी दरवाजापर्यंत कसाबसा पोहोंचलों नि पायऱ्या खालीं उतरूं लागलों. दुसऱ्या का तिसऱ्या पायरीवर मी उतरलों असेन तोंच वरून माझ्या डोक्यावर सोड्याच्या बाटलीचे दोन तडाखे कोणी तरी मारले. माझ्या डोक्यावर

केंसाचें दाट आवरण होतें म्हणूनच मी वांचलों, नाहीं तर माझ्या कवटीचे दोन तुकडे झाले असते.

लेडी रमाबाई हॉलमधून मी बाहेरच्या परिसरांत आलों. पण आतां जायचें कुठें ? कांहीं मुलें म्हणालीं कीं, मुख्य इमारतीमधल्या प्रोफेसरांच्या खोलींत चला. मला त्यांचा कावा समजला नाहीं. मी त्यांच्या घोळक्यांत पोर्चमधून आंत घाईघाईनें जिना चढून पहिल्या मजल्यावर गेलों आणि पुन्हां नेमका त्यांच्या तडाख्यांत सांपडलों. तो रविवार होता. प्रोफेसरांची खोली बंद होती. उजव्या बाजूला लॅबोरेटरी होती. तेथें माझ्या मारेकऱ्यांनीं पुन्हां माझ्यावर जोराचा हल्ला चढवला. मी हल्ल्याला तोंड देऊं लागलों.

माझें संरक्षण करणारीं मुलें तेथें कोणीच नव्हतीं.

मुलें ओरडलीं, " सावरकरांची माफी मागा ! "

त्यांच्यापेक्षांहि जोरानें मी किंचाळलों, " प्राण गेला तरी नाहीं–नाहीं–नाहीं ! "

कांहीं मुलांचा विचार लॅबोरेटरीचें दार फोडून आंत जायचें नि माझ्या तोंडावर ॲसिड फेंकावयाचें असा होता. पण लॅबोरेटरीचा दरवाजा खंबीर होता आणि त्याला भलेंमक्म कुलूप होतें.

माझ्या पाठीमागें दगडी भिंत असल्यानें मला तिचा फार मोठा आधार मिळाला, त्यामुळें मागून हल्ला होण्याचें मुळीं भयच नव्हतें. समोर मुलांची इतकी दाटीवाटी होती कीं त्यांना माझ्यावर हात उगारण्याइतकी सवलत नव्हती. त्यामुळें आव्हानाच्या पवित्र्यांत उभा राहून मी त्यांच्याकडे तुच्छतेनें बघूं लागलों.

मला सर वॉल्टर स्कॉटच्या ' लेडी ऑफ द लेक 'मधील कवितेची एक ओळ आठवली :

Come one come all,
The rock shall fly
From its firm base
As soon as I !

एवढ्यांत प्रिन्सिपल करमरकर आल्याची मागल्या बाजूनें आरोळी उठली. तशी वाऱ्याच्या झुळुकेनें जशीं चिलटें उडावींत त्याप्रमाणें तीं पोरटीं एका निमिषार्धांत कोठल्या कोठें परागंदा झालीं. समोरून माझे वर्गबंधु प्रा॰ डॉ. के. ना. वाटवे आणि मित्र प्रा. ज. नी. कर्वे धांवत आले. त्यांच्या मागून प्रि. करमरकर आले. त्यांनीं प्रोफेसरांची खोली उघडून मला आंत नेलें. वाटवे-कर्वे ह्यांना इतकें दुःख झालें कीं, त्यांना माझ्याशीं काय बोलावें हेंच कळेना.

माझ्या अंगांत अर्ध्या बाह्यांचा नुसता सदरा आणि विजार होती. केस विसकटलेले होते. डाव्या गालावर रक्ताचा लहानसा ओघळ वहात होता. प्रा. कर्वेनीं

मला सोडा मागवला.

प्रि. करमरकर म्हणाले, "फार लागलें नाहीं ना?"

मी हंसून म्हणालों, "छे, बोलून चालून पोरांचा मार–तो काय लागणार?"

प्रि. करमरकरांनीं विचारलें, "मग आतां?"

मी एकदम उठून म्हणालों, "आतां काय? आतां लेडी रमाबाई हॉलमध्यें सरळ जाऊन राहिलेलं व्याख्यान पुरें करून टाकावयाचें!"

प्रि. करमरकर माझ्या तोंडाकडे पहात राहिले. ते म्हणाले, "आतां मी आहें. तुम्हांला काळजी करण्याचें कारण नाहीं!"

मी त्यांना हंसून म्हणालों, "मघांशी तुम्ही नव्हतां, तेव्हां मीं कुठें काळजी केली होती ती आतां करावयाची?"

असें म्हणून मी चालूं लागलों. माझ्यावर झालेल्या हल्ल्याची बातमी वणव्यासारखी गांवांत पसरली. त्यामुळें शेंकडों लोक बोलबोल म्हणतां कॉलेजच्या परिसरांत जमले. लेडी रमाबाई हॉलमध्यें सर्व श्रोते, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आपापल्या जागेवर निपचित बसून होते. रणांगणावर लढून जखमी झालेल्या वीराप्रमाणें जेव्हां मी वेडर रुबाबानें सभागृहांत प्रविष्ट झालों तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला मला मारणारे विद्यार्थी आपापल्या जागेवर मुडद्यासारखे बसून होते!

प्रि. करमरकर प्रास्ताविक भाषणांत म्हणाले, "ह्या कॉलेजमधल्या कांहीं विद्यार्थ्यांनीं अत्र्यांवर अशा रीतीनें हल्ला करावा ही फार वाईट गोष्ट झाली. त्यांना मारण्याचीच त्यांची इच्छा होती तर बाहेर रस्त्यावर त्यांनीं त्यांना मारायचें होतें.—"

मी जेव्हां कमरेवर हात ठेवून भाषणाला उभा राहिलों तेव्हां पांच मिनिटें एकसारखा टाळ्यांचा कडकडाट झाला. मी म्हणालों, "मला कळवण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं मी अद्याप जिवंत आहें. ठणठणीत जिवंत आहें (प्रचंड हंशा नि टाळ्या) अन् मला कळवण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं मला मारण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला ते मात्र मेले–ठार झाले–(पुन्हा प्रचंड हंशा नि टाळ्या.) प्रि. करमरकर आतां म्हणाले कीं, ज्या मुलांना मला मारायचें होतें त्यांनीं मला रस्त्यावर मारावयाचें होतें. माझें त्या मुलांना आव्हान आहे कीं, आतां मी रस्त्यावर जातों–माझ्या अंगाला हात लावण्याची काय माय व्याली आहे त्यांची तें मी पाहतों–त्यांच्या हाडाचा एक तुकडा शिल्लक उरणार नाहीं! (प्रचंड टाळ्या) ह्या कॉलेजच्या खिडींत गांठून माझा खून करतां काय? (प्रिं. करमरकरांकडे पाहून) हेंच शिक्षण तुम्हीं ह्यांच्यापासून घेतलेंत वाटतें? (प्रचंड हंशा) तुम्हांला मारामारी करायची होय माझ्याशीं? मग उद्यां सायंकाळीं शनिवारवाड्यासमोर या! आणि तिथें तुम्हांला काय शौर्य दाखवायचें तें दाखवा! आजच्या मारामारीची हकीगत उद्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर शूर कोण–मर्द कोण हें साऱ्या जगाला कळून येईल.

दीडशें मुलांनीं मला ठार मारण्याचा ह्या ठिकाणीं प्रयत्न केला पण मी जिवंत राहिलों हें जन्मभर मी अभिमानानें साऱ्या जगाला सांगत राहीन. पण अन्यांना आम्हीं मारण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट तुम्हांला उभ्या आयुष्यांत मान वर करून सांगण्याची हिंमत होणार नाहीं!" (प्रचंड टाळ्या).

एवढें प्रास्ताविक झाल्यानंतर जसें कांहीं घडलेंच नाहीं अशा आविर्भावानें मीं 'मराठी वाङ्मय' या विषयावर तास दीड तास व्याख्यान दिलें. शरीराचा नि बुद्धीचा तो एक अविस्मरणीय विक्रम होता. तो माझ्या हांतून कसा घडला, ह्याचेंच राहून राहून मला आश्चर्य वाटतें.

त्या रात्रीं मीं ससून इस्पितळांत औषधोपचार करून घेतला. माझ्या अंगावर लहान सहान स्वरूपाच्या एकंदर चौऱ्यांशीं जखमा होत्या. आणि डोक्यावर दोन भलीं मोठीं टेंगळें होतीं.

दुसऱ्या दिवशीं दसरा होता. आणि मुंबईला 'चित्रमंदिर'मध्यें माझ्या 'वसंतसेना' चित्रपटाचा मुहूर्त होता. तो मुहूर्त कसाबसा पार पाडून मीं अंथरूण धरलें. तब्बल सात का आठ दिवस मला हालतां येत नव्हतें कीं उठतां येत नव्हतें.

१५

## महात्मा गांधींचें मला पत्र !

पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेज-मध्यें माझ्यावर जो खुनी हल्ला झाला त्याचे पडसाद केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर साऱ्या भारतांत उमटले. यामध्यें एका अक्षराचीहि अतिशयोक्ति नव्हे. कारण या घटनेनंतर दोन का तीन दिवसांनीं म. गांधींचें सेवाग्रामहून मला तांतडीचें पत्र आलें. तें पत्र त्यांचे त्या वेळचे चिटणीस किशोरीलाल मश्रूवाला ह्यांनीं माझ्या चिट-णिसाला लिहिलें होतें.

त्या पत्रांत महात्माजींनीं असें लिहिलें होतें कीं, "दीडशें गुंडांना अहिंसा वृत्तीनें तोंड देऊन आचार्य अत्रे सही-सलामत बाहेर पडले ह्याचा अर्थ, हा अहिंसेचा विजय आहे." प्राणघातक हल्ल्यामधून मी सहीसलामत बांचलों म्हणून माझें अभिनंदन करणारीं, आणि माझ्यावर हल्ला करणाऱ्या भ्याड विद्यार्थी गुंडांचा निषेध करणारीं शेकडों पत्रें म. गांधींच्या प्रमाणेंच हिंदुस्थानांतून आणि विशेषतः महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून त्यानंतर सतत दोन तीन आठवडे येत होतीं.

महाराष्ट्रांतील अनेक संस्थांनीं, अनेक शहरांमध्यें जाहीर सभा भरवून माझ्यावर

झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. दि. ५ ऑक्टोबर १९४१ च्या ‘ नवयुग ’मध्यें ‘ मला मारणारे मेले; मी जिवंत आहें ! ’ हा मीं जो अग्रलेख लिहिला, तो महाराष्ट्रांतले माझे वाचक अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचले. हल्ल्यानंतर कॉलेजमध्यें व्याख्यानाच्या प्रारंभीं मी जें बोललों होतों त्याच लढाऊ स्वरानें हा अग्रलेख मीं लिहिला होता.

ज्या लुच्च्या ‘ रामदासी ’ नांवाच्या विद्यार्थ्यानें मला परशुरामभाऊ कॉलेजमध्यें व्याख्यानाला बोलावलें होतें, त्यानें स्वतःची चामडी बचाविण्यासाठीं मला एक खुलाशाचें पत्र पाठविलें. त्यांत त्यानें असें म्हटलें आहे कीं, “ आपल्यावर झालेल्या भेकड, रानटी, क्रूर आणि मानव जातीस कलंक लावणाऱ्या हल्ल्याचा निषेध आज महाराष्ट्रांतून होतोच आहे. ज्या गुंडांनीं अनपेक्षितरीत्या आपल्यावर हल्ला केला त्यांचा निषेध करण्यास एकहि शब्द मला वाङ्मयांत सांपडत नाहीं. आपण, इतकें झाल्यानंतर सुद्धां जी सहनशीलता, संयम व अभिजात विनोदवृत्ति आपल्या प्रभावी भाषणामधून व्यक्त केली ती पाहून तरुण पिढीनें खरोखरीच एक आदर्श धडा घेतला पाहिजे. आपली प्रकृति कशी आहे ? खरोखर, तुमच्या शब्दांत सांगायचें म्हणजे तुम्हांला मारणारे मेले, पण तुम्ही जिवंत आहांत ! ही गोष्ट अभिमानानें आणि आनंदानें बृहन्महाराष्ट्राला आम्ही जाहीर करतों. ”

सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें माझ्यावर जो हल्ला झाला तो त्या कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांनीं केला नसून बाहेरच्या गुंडांनीं कॉलेजमध्यें घुसून केला, अशी सारवासारवी केवळ ह्या ‘ रामदासी ’ नांवाच्या विद्यार्थ्यानेंच केली असें नाहीं, तर सर परशु-रामभाऊ कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपल श्री. रघुनाथ दामोदर करमरकर ह्यांनीं या हल्ल्याबाबत एक पत्रक काढून तीच भूमिका घेतली. त्या पत्रकांत त्यांनीं असें म्हटलें कीं, “ अत्रे ह्यांच्या व्याख्यानाच्या वेळीं सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें जो दंगा झाला तो दंगा बाहेरच्या लोकांनीं आंत घुसून केला. ” त्याला मीं ‘ नवयुग ’ च्या अंकामध्यें सणसणीत उत्तर दिलें. तें पुढीलप्रमाणें :

“ पुणें येथील ‘ शिक्षण प्रसारक मंडळी ’च्या नूतन मराठी विद्यालय आणि सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जबरदस्त प्रसार झालेला आहे. रा. स्व. संघाला पूर्वी राजकीय दृष्टिकोन नव्हता. अलीकडे ह्या संघामध्यें हिंदुत्व-निष्ठतेचा प्रसार जाहीर रीत्या केला जातो. त्यामुळें ‘ शिक्षण प्रसारक मंडळी ’च्या ह्या दोन्ही संस्थांचें स्वरूप जातीयतेचें झालेलें आहे. जातीय प्रवृत्तीच्या अतिरेकाला शेवटीं गुंडगिरीचें स्वरूप येतें. तशाच प्रकारची अवस्था आज स. प. कॉलेजची झालेली आहे. ह्या कॉलेजमध्यें अलीकडे विद्यार्थ्यांच्या गुंडगिरीला अतिशयच ऊत आलेला आहे. प्रो. वा. म. जोशी, भाई मानवेंन्द्र रॉय, मेनका ह्यांचीं व्याख्यानें ह्या कॉलेजांतल्या मुलांनीं दंगा करून बंद पडलीं हें सर्वांना माहीत आहे.

"कॉलेजचे प्रिं. करमरकर ह्यांच्या विद्वत्तेबद्दल आम्हांला आदर आहे. तथापि स. प. कॉलेजसारख्या जबाबदार कॉलेजचे प्रिन्सिपल होण्यास हे गृहस्थ सर्वस्वी नालायक आहेत, असें आम्हांला दुःखानें म्हणावें लागत आहे. प्रिं. करमरकर हे एक लष्करी अधिकारी असून लष्करी शिस्तीचे धडे स्वतःच गिरवीत आहेत. असें असतां ह्यांच्या कॉलेजमध्यें येणाऱ्या विद्वान् आणि सभ्य वक्त्यांचे गेलीं कांहीं वर्षें जे धिंडवडे उडत आहेत, त्यावरून ह्या लढाऊ प्रिन्सिपलची शिस्त किती तकलुपी स्वरूपाची आहे हें दिसून येतें. माझ्यावर झालेला हल्ला हा करमरकरी शिस्तीचा किळसवाणा कळस आहे. आतां यापुढें ह्या कॉलेजमध्यें एखाद्याचा दिवसाढवळ्या खूनच पडायचा बाकी राहिला आहे. कोणाहि सभ्य माणसानें ह्या कॉलेजांत पाऊल टाकणें कसें धोक्याचें आहे हें आतां जगजाहीर झालें आहे.

"माझ्यावर हल्ला झाल्यानंतर व्याख्यान देण्यासाठीं जेव्हां मी विद्यार्थ्यांसमोर आलों तेव्हां प्रिं. करमरकर विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, 'तुम्हीं अत्र्यांना रस्त्यावर मारलें असतें तर मी कांहीं म्हणालों नसतों; उलट ती गंमत पहावयाला मी आलों असतों.'

"प्रिं. करमरकरांचीं हीं त्या वेळचीं 'मुक्ताफळें' ऐकून विद्यालयीन शिस्ती-बद्दलच्या त्यांच्या काय कल्पना आहेत त्याचा मला चांगलाच बोध झाला. आतां ह्या हल्ला प्रकरणामध्यें प्रिं. करमरकर ह्यांनीं जें पत्रक काढलें, तें सर्वस्वी कांगावखोरपणाचें आहे. माझ्यावर ज्यांनीं हल्ला केला तीं सर्व मुलें स. प. कॉलेजचीं आहेत, हें प्रिं. करमरकर ह्यांना माहीत आहे. त्या मुलांचीं नांवें देखील त्यांना ठाऊक आहेत. तीं नांवें त्याच वेळीं त्यांना सांगण्यासाठीं शेंकडों विद्यार्थी पुढें येण्यास तयार होते. पण प्रिं. करमरकर ह्यांनीं त्यांना तसेंच धुडकावून लावलें. आणि हल्ला करणारे लोक बाहेरचे होते असा त्यांनीं निष्कारण ओरडा केला.

प्रिं. करमरकर आणि त्यांचे कांहीं प्राध्यापक साथीदार ह्यांचा प्रयत्न, हा दंगा बाहेरच्या लोकांनीं आंत घुसून केला, असें सिद्ध करण्याचा आहे. पण असें जर सिद्ध झालें तर प्रि. करमरकर ह्यांची नालायकी सिद्ध केली जाते. वाटेल ते गुंड दिवसाढवळ्या कॉलेजमध्यें शिरून गुंडगिरी करण्याइतकी जर कॉलेजच्या शिस्तीची अवस्था झालेली असेल, तर प्रिं. करमरकर ह्यांनीं कॉलेज सोडून देऊन मंडईच्या मागें एखादें बुरुडाचें दुकान थाटून बसलेलें बरें!"

पुणें पत्रकार संघानें माझ्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध खास पत्रक काढून प्रकट केला. त्या पत्रकावर पुढील पत्रकारांच्या सह्या होत्या. (ह्या पत्राची मूळ प्रत अद्यापहि माझ्याजवळ आहे.) श्री. काकासाहेब लिमये, श्री ह. म. जोशी, श्री. रा. ब. घोरपडे, गो. पां. खरे, दा. न. शिखरे, सी. ता. पुराणिक, रा. प्र. कानेटकर, दा. सी. कोकजे, गो. रा. वाळ, भा. मो. भट, अ. शं. अग्निहोत्री, ह. रा. महाजनी आणि

वि. स. बापट. तें पत्र पुढीलप्रमाणें :

" महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक, लेखक, वृत्तपत्रकार आणि मुंबई मराठी वृत्तपत्र संघाचे सदस्य आचार्य अत्रे ह्यांच्यावर जो हिंसात्मक हल्ला करण्यांत आला त्याचा पुणें पत्रकार संघाचे सभासद व वृत्तपत्रव्यवसायी या नात्यानें आम्ही तीव्र निषेध करतों. वृत्तपत्रीय टीकेची न्यायान्याय्यता ठरविण्याचा हा अविवेकी नि अत्याचारी मार्ग कॉलेजांतील सुशिक्षित श्रोतृसमुदायांतील कांहीं अविचारी मंडळींनीं अवलंबावा ही शोचनीय गोष्ट आहे. अशा प्रकरणांत पाठबळ देणाऱ्या व्यक्तींकडून विचारस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य या नागरिकत्वाच्या मूलभूत हक्कांवर हें एक अत्यंत हीन स्वरूपाचें असमर्थनीय आक्रमण केलें जात आहे, असें आम्हांस प्रामाणिकपणें वाटतें, आणि म्हणून आम्ही ह्या अत्यंत गैरशिस्त प्रकाराबद्दल प्रकटरीत्या नापसंति व्यक्त करीत आहोंत.

" आचार्य अत्रे ह्यांचें लिखाण वादग्रस्त होतें, हें क्षणभर मान्य केलें, तरीहि त्या संबंधांत लेखकास मारहाण करणें, हा प्रकार शुद्ध गुंडगिरीचा म्हटला पाहिजे. मुद्रणस्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीनें सर्व सुज्ञ आणि विचारी नागरिकांनीं आणि स्वातंत्र्येच्छु तरुणांनीं अशा अनुचित प्रकाराला त्वरित आळा घालणें आवश्यक आहे. ज्यांच्या नांवानें हा अत्याचार करण्यांत आला, ते स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरहि अशा भ्याड प्रकरणाला लवमात्रहि पाठिंबा देणार नाहींत. तसेंच एका शिक्षण संस्थेचें पवित्र वातावरण दूषित केलें जावें आणि त्या शिक्षण संस्थेचा लौकिक कलंकित केला जावा ही एक प्रकारें खेदजनक गोष्ट होय ! "

ज्या 'श्री महाराष्ट्र शारदा मंदिरा'चा मी एक संस्थापक होतों त्या शारदा मंदिरानें प्रा. वामन मल्हार जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पुढीलप्रमाणें ठराव पास केला :

" श्री महाराष्ट्र शारदा मंदिराचे कार्याध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक, नाटककार, चित्रपट-कथालेखक आणि 'नवयुग' साप्ताहिकाचे संपादक आचार्य अत्रे ह्यांना सन्माननीय पाहुणे आणि व्याख्याते म्हणून बोलाविलें असतां 'अत्रे उवाच' ह्या शीर्षकाखालीं स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्यावरील टीकेच्या निमित्तानें जो भ्याडपणाचा हिंसात्मक हल्ला झाला, त्याचा 'श्री महाराष्ट्र शारदा मंदिरा'चें कार्यकारी मंडळ तीव्र निषेध करीत आहे. असे हल्ले करणें हें लेखनस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य ह्या मूलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखें आहे, हें सदर हल्ला करणाऱ्या आणि त्यांना उत्तेजन देणाऱ्या लोकांना समजूं नये, हें समाजाचें दुर्भाग्य होय ! ह्या प्राणघातक हल्ल्यांतून आचार्य अत्रे सुखरूप निभावले ह्याबद्दल ही सभा त्यांचें अभिनंदन करीत आहे. "

हा ठराव प्रा. दबडघाव ह्यांनीं सुचविला आणि श्री. दिनकर विनायक देव

ह्यांनीं त्याला अनुमोदन दिलें.

तथापि, सगळ्यांत गंमतीची आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझे परममित्र प्रा. बापूराव माटे ह्यांनीं त्या टरावाला आपला विरोध आहे असें कळविलें. कारण त्या काळामध्यें अत्रे–माटे वादामुळें त्यांचे आणि माझे संबंध दुरावलेले होते. सभेला बोलवावयास गेलेल्या माणसाला त्यांनीं असें सांगितलें, " अत्रे ह्यांच्या वाङ्मयाचा आधीं निषेध कराल आणि मग त्यांच्यावरील हल्ल्याचा निषेध कराल तरच मी येतों. प्रो. फडके ह्यांच्या कोणी तोंडांत मारलें तर त्या निषेधाच्या सभेला मी हजर राहणार नाहीं. अहो, एखादा माणूस सांगूनहि ऐकत नाहीं तर दुसऱ्यानें करावयाचें तरी काय ? हाच एक मार्ग मोकळा आहे."

प्रा. माटे ह्यांच्या या उद्गारांवर 'नवयुगच्या' अग्रलेखांत मीं पुढील टीका केली :

" गुंडगिरीची मग्रूर भाषा वापरण्यांत माटे हे चांगलेच पारंगत आहेत. मागें एकदां राजकवि यशवंत ह्यांना 'कानशिलांत भडकावीन' अशा प्रकारची भाषा त्यांनीं वापरली होती. माझ्या जुन्या वादांत 'तुमचीं हाडें मोडीन' अशी त्यांनीं मला धमकी दिली होती. शिवाय 'माझें कूंसहि वांकडें होणार नाहीं' हे गुंडांचे ठराविक शब्दप्रयोग अंगविक्षेपांसह करण्यास देखील ते कचरत नाहींत. गेल्या 'वसंत व्याख्यानमाले'मध्यें महाराष्ट्रांत 'चिरडमंडळें' काढण्याबद्दलची आपली कल्पना प्रा. माटे ह्यांनीं बोलून दाखविली होती.

"आपल्याला मान्य नसलेल्या मतांचें प्रदर्शन वक्ता व्याख्यानांत करूं लागला तर आपल्याला त्याबद्दल चिरड आली पाहिजे आणि ती चिरड आपण तें व्याख्यान बंद पाडून व्यक्त केली पाहिजे,' असें त्या व्याख्यानांत प्रा. माटे म्हणाले. पूर्वी पुण्यांत माधवराव जोशी ह्यांचें कोठलें तरी एक नाटक प्रा. माटे आणि त्यांचे हस्तक ह्यांनीं 'किर्लोस्कर' नाटकगृहांत आरडाओरड करून बंद पाडलें होतें.

" गुंडगिरीच्या मर्यादा कांहीं ठरलेल्याच असतात. व्याख्यानांत आरडाओरड करून तें बंद पाडण्यासाठीं जर एखादें 'चिरडमंडळ' स्थापन झालें, तर ह्या मंडळाच्या कांहीं सभासदांच्या उत्साहाची मजल तो वक्ता चिरडण्यापर्यंत जाणार नाहीं, असा निर्वाळा खुद्द प्रा. माटे ह्यांना तरी देतां येईल काय ? साहित्यांत वैयक्तिक टीका झालेली पाहून नाकें मुरडणारे हे साहित्यिक एखाद्यावर वैयक्तिक हल्ला झाला तर मात्र त्याचें समर्थन करतात, हें मात्र अजब नव्हे काय ?

" विरोधी मतांच्या माणसांवर असें आक्रमण करून त्यांचें तोंड बंद पाडणें, हा उपाय प्रा. माटे ह्यांच्यासारख्या साहित्यिकांना जर मान्य असेल तर त्यांच्या कॉलेजांत माझ्यावर अशी गुंडगिरी व्हावी यांत मला मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. 'गुरूची विद्या' ही शिष्यामध्यें चांगलीच फैलावलेली दिसते आहे. मात्र ही 'विद्या'

पुढेंमागें प्रा. माटे ह्यांच्यावर जर उलटली तर मात्र त्यांनीं खेद मानून घेण्याचें कारण नाहीं. ”

आणि खरोखरच सहासात वर्षांनीं तसेंच झालें. १९४७ का १९४८ सालीं प्रा. माटे ह्यांनीं ग्वाल्हेरमध्यें खाजगी बैठकींत रा. स्व. संघाचे गुरुजी गोळवलकर ह्यांच्यावर कांहीं टीका केली. त्याचा वचपा त्या संघाच्या कांहीं विद्यार्थ्यांनीं प्रा. माटे मथुरेला सपत्नीक टांग्यामधून जात असतांना त्या दोघांवर सायकलीवरून मागून येऊन काठ्यांनीं हल्ला करून घेतला. त्या वेळीं माटे पतिपत्नी अक्षरशः मरतां भरतां वाचलीं. त्या हल्ल्याचा निषेध मीं ‘ नवयुग ’च्या पहिल्या पानावर केला. तेव्हां प्रा. माटे मुद्दाम मुंबईला माझ्याकडे आले आणि माझ्या गळ्याला मिठी मारून ढसढसा रडले. ती हकीकत पुढें ह्या चरित्राच्या ओघांत मी सांगेनच.

माझ्यावर केलेल्या हल्ल्याचा ज्यांनीं निषेध केला त्यांचीं कांहीं नांवें मी येथें देतों. श्री. हरिभाऊ पाटसकर ( सध्यांचे राज्यपाल म. प्र. ), लोकमान्य टिळकांचे चिरंजीव रामभाऊ टिळक, खानदेश साहित्य संमेलनाचे त्या वेळचे अध्यक्ष गोपीनाथ तळवलकर, सुप्रसिद्ध नर्तिका रोहिणी वागळे इत्यादि.

महाराष्ट्रांत त्या काळांत वाढीस लागलेल्या हिंसात्मक प्रवृत्तीचा निषेध करणारे अनेक लेख त्या काळांत मीं माझ्या ‘ नवयुग ’मध्यें छापले. तो सर्व इतिहास ह्या ठिकाणीं देण्याचा मला मोह होतो आहे. पण त्यासाठीं ह्या आत्मचरित्राचीं निदान दहा प्रकरणें तरी खर्ची टाकावीं लागतील. त्यानंतर थोड्याच दिवसांनंतर मीं आणि लालजी पेंडसे ह्यांनीं राष्ट्रवादी स्वयंसेवकांची ‘ लोकसेना ’ नांवाची संघटना काढली. या वेळीं लालजी पेंडसे हे ‘ नवयुग ’चे सहकारी संपादक होते. मीं आणि त्यांनीं ह्या ‘ लोकसेने ’च्या प्रचारासाठीं सर्व महाराष्ट्रभर दौरा काढला.

# १६

# नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं

बत्तिसावें महाराष्ट्र नाट्यसंमेलन मुंबई येथें २८ डिसेंबर १९४१ रोजीं भरलें. त्याच्या अध्यक्षपदीं माझी निवड करण्यांत आली. स्वागताध्यक्ष होते ' आंधळ्यांची शाळा ' या सुप्रसिद्ध नाटकाचे कर्ते श्री. श्री. वि. वर्तक. ह्या नाट्यसंमेलनासाठीं ' विल्सन हायस्कूल 'च्या आवारामध्यें एक भव्य मंडप उभारण्यांत आला. हें नाट्यसंमेलन एकंदर चार दिवस चाललें होतें. अनेक नाटककारांनीं, नटनटींनीं, गायकांनीं आणि तमासगिरांनीं त्यांत भाग घेतला. माझ्या माहितीप्रमाणें इतके दिवस चाललेलें नि इतकें गाजलेलें नाट्यसंमेलन त्यापूर्वीं किंवा त्यानंतर दुसरें झालेंच नाहीं.

माझें अध्यक्षीय भाषण एकंदर चव्वेचाळीस पानांचें होतें. प्रदीर्घ अध्यक्षीय भाषण करण्याचा तो देखील एक पराक्रमच होता. तें सर्व भाषण ह्या ठिकाणीं देतां येण्यासारखें नाहीं. पण त्यामधील कांहीं निवडक उतारे देतों :

" रंगभूमीचें सामर्थ्य आणि यश हें सर्वस्वी उत्तम नाटककार आणि नट ह्यांच्यावर अवलंबून असतें. उत्कृष्ट नाटककार किंवा नट हे ' जन्मावे ' लागतात. शतका-

मध्यें एकादा दुसराच प्रतिभाशाली नाटककार वा नट जन्माला येतो. खुद्द इंग्रजी वाङ्मयांत शेक्सपीअरपासून तों बर्नार्ड शॉपर्यंतच्या चारपांचशें वर्षांपर्यंतच्या काळांत उत्तम नाटककार आणि नट कितीसे निर्माण झाले आहेत ? शेक्सपीअरनंतर बेन जॉन्सन, गोल्डस्मिथ, शेरिडन, जोन्स, ऑस्कर वाईल्ड, पिन्हेरो, बर्नार्ड शॉ, मॉम आणि नोएल कावर्ड एवढ्या दहा नाटककारांचीं नांवें घेतलीं कीं तीनशें वर्षांचा इंग्रजी नाट्यवाङ्मयाचा सबंध इतिहास त्यामध्यें समाविष्ट झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

"त्या मानानें इंग्लंड हा देश अधिक भाग्यशाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. इतर देशांच्या वांट्याला त्या मानानें कितीसे नट आणि नाटककार आले आहेत ? फ्रान्स म्हटला कीं मोलिअर आणि ब्रियो ह्यांच्याच युगप्रवर्तक मूर्ति डोळ्यांपुढें उभ्या रहातात. यूरोप म्हटला कीं इब्सेन, ब्यर्नसन, पिरॅन्डेला आणि चेकोव्ह अन् अमेरिका म्हटली कीं यूजीन ओनेल, हा एकच नाटककार प्रामुख्यानें आठवतो.

"आणि खुद्द हिंदुस्थानाकडे नजर वळविली तर ? कालिदास, भवभूति, भास आणि शूद्रक ह्यांच्यासाठीं चार बोटें खर्च केलीं तरी 'आंगठा' रहातोच. संस्कृत साहित्याची ही दशा तर मग देशी भाषेबद्दल तर बोलायलाच नको. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास गेल्या एका शतकाच्या रंगभूमीच्या इतिहासांत स्वतंत्र बुद्धीचे नट किंवा नाटककार कितीसे होऊन गेले ? किर्लोस्करांचें 'सौभद्र' हें एकच स्वतंत्र आणि पूर्ण नाटक तर देवलांचें 'शारदा' हें एकुलतें एकच स्वतंत्र असें नाटक ! खाडिलकर, कोल्हटकर, गडकरी आणि वरेरकर ह्यांनींच काय ती पुष्कळशा स्वतंत्र प्रतिभेनें विपुल अशी नाट्यरचना केली ! आणि त्यांच्याच कृतीमुळें मराठी भाषेंत नाट्यवाङ्मय निर्माण झालें.

"नाटक हा करमणुकीचा प्रकार सुसंस्कृत, बुद्धिमान् आणि सुशिक्षित वर्गामध्यें आजपर्यंत प्रचलित होता. कोणत्याहि समाजांत बुद्धिजीवि आणि विद्यावान् वर्ग हा मर्यादितच असतो. त्यामुळें नाटकांचें वर्चस्व हें केवळ ह्याच मर्यादित क्षेत्रापुरतें होतें. रंगभूमीची हांक अडाणी आणि असंस्कृत जनतेच्या हृदयापर्यंत कधींच पोहोंचूं शकली नाहीं. बहुजनसमाजामध्यें वावरणाऱ्या निरनिराळ्या सामान्य व्यक्तींचीं चित्रें, त्यांच्या धडपडी नि चळवळी, त्यांचे स्वभाव, त्यांच्या आशा नि आकांक्षा ह्यांचीं चित्रें मराठी रंगभूमीमध्यें होणाऱ्या नाट्यप्रयोगांतून कधींच उमटूं शकलीं नाहींत.

"राजे लोकांचे पराक्रम, त्यांच्या लढाया, त्यांचे सद्गुण, राजपुत्र आणि राजकन्या ह्यांचे विलास आणि प्रणयप्रसंग, श्रीमंत नि धनिक अशा वर्गामधील व्यक्तींचे कनक आणि कांता ह्यांच्या लाभासाठीं चाललेले प्रयत्न, तीं न मिळाल्यामुळें प्रक्षुब्ध झालेल्या त्यांच्या भावनांचे उद्रेक, त्यांच्या हातून घडलेले अत्याचार आणि प्राणघात हे सामान्यतः पूर्वींच्या नाटकाचे विषय असत.

" भरतमुनींच्या नाट्यशास्त्राप्रमाणें तर नायक आणि नायिका ह्या ब्राह्मण वा क्षत्रिय कुलोत्पन्न असाव्या लागत. केवळ मदन आणि रति ह्यांच्याशीं सौंदर्यानें चढाओढ करण्याजोगें त्यांना स्वरूप असावें लागे. वर्णानें तर ही मंडळी एकदम 'गोरीपान' दिसावयाला हवीत. नाटकांतला गडी देखील जेथें 'गौरवर्ण' असे, तेथें नायक-नायिकेबद्दल तर विचारावयालाच नको. काळ्या लोकांच्या नाटकांची ही स्थिति मग गोऱ्या लोकांच्या नाटकांविषयीं काय बोलावें ?

" ऑथेल्लो हा एकच काळा कुळकुळीत अपवाद केवळ अपघातानें निर्माण झाला असें समजावयाला पाहिजे. पूर्वीच्या काळीं नायकनायिका हीं चौदा विद्या आणि चौसष्ट कला ह्यांमध्यें पारंगत असावयाला लागत. रंगभूमि म्हणजे सर्वगुणालंकार, श्रीमंत आणि सुस्वरूप माणसांची मिरासदारी म्हणून मानण्यांत येत होती. त्यामुळें सामान्य, गरीब, अनेक शारीरिक नि मानसिक दुर्गुण असलेल्या, पदोपदीं चुकणाऱ्या, सत्ताधाऱ्यांकडून नाडल्या गेलेल्या अशा अडाणी बहुजनसमाजाला नाटकाविषयीं आणि रंगभूमीविषयीं आपलेपणा वाटणें शक्य नव्हतें.

" पूर्वी करमणुकीची सर्व मिरासदारी एकट्या नाटकाकडेच होती. त्यामध्यें रेडिओ, ग्रामोफोन आणि बोलपट हे आतां नवीन हक्कदार निर्माण झाले आहेत. अर्थात् बोलपटांनीं इतर सर्वच करमणुकीच्या प्रकारांवर मात केली. सर्व समाजाच्या जीवितावर जबरदस्त परिणाम करणारा बोलपटाएवढा 'प्रचंड शोध' गेल्या शतकांत दुसरा कोणताहि निघालेला नसेल. ह्याचें कारण बोलपटाची कला ही नाट्य, चित्र, लेखन, संगीत, शिल्प, छायाचित्रण, ध्वनिमुद्रण इत्यादि सर्व नव्याजुन्या कलांच्या संमिश्रणावर उभारलेली असल्यानें, त्या सर्व कलांमधील आनंद एकाच वेळीं आणि एकाच ठिकाणीं अनुभवावयाला प्रेक्षकांना मिळत असल्यानें, ही कला इतर सर्व कलांपेक्षां जास्त प्रभावी आणि आकर्षक झालेली आहे आणि एवढें असून या कलेच्या आनंदाचा आस्वाद गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत, अडाण्यांपासून पंडितांपर्यंत आणि मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना अत्यंत थोड्या अशा खर्चात मिळूं शकतो म्हणून बोलपटाचा पगडा बहुजनसमाजाच्या मनावर ताबडतोब बसला.

" जोंपर्यंत चित्रपट 'मुके' होते, तोंपर्यंत नाटकांशीं ते स्पर्धा करूं शकले नाहींत. पण त्यांना 'वाचा' फुटून पुरतीं बारा वर्षं झालीं नाहींत, तोंच दोन हजार वर्षांचें आयुष्य असलेल्या रंगभूमीचें व्यासपीठ या बोलक्या बाळानें डळमळावयाला लावलें. रंगभूमि आणि नाट्यकला आतां सर्वस्वीं नाहींशा होतात किंवा काय, अशा तऱ्हेचें संशयग्रस्त आणि भीतिग्रस्त वातावरण बोलपटांनीं खचित निर्माण केलेलें आहे. रंगभूमीला स्वाहा करण्याचें सामर्थ्य किंवा आकांक्षा रुपेरी पडद्याची नाहीं. पण रुपेरी पडद्याच्या प्रचंड लोकप्रियतेमुळें आणि त्याच्या झगझगाटामुळें डोळे दिपून जाऊन रंगभूमीला क्षणैक मूर्च्छा मात्र सध्यां खास आलेली आहे, ह्यांत शंका नाहीं.

" मराठी रंगभूमीला पुढील वर्षी शंभर वर्षें पूर्ण होण्याआधींच दहापांच वर्षें तिचीं ' शंभर वर्षें ' भरल्यासारखीं व्हावींत ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. मराठी रंगभूमीची तेजस्वी सेवा करणाऱ्या शाहूनगरवासी, महाराष्ट्र, चित्ताकर्षक, भारत ह्या गद्य नाटक मंडळ्या आतां कोठें आहेत बरें ? संगीताचें ' नवयुग ' निर्माण करणाऱ्या किर्लोस्कर, ललितकला आणि गंधर्व नाटक मंडळ्यांचें आतां काय झालें असेल बरें ?

" तुम्हीं आम्हीं गणपतराव जोशांचीं तीं ' हॅम्लेट ' आणि ' तुकाराम ' नाटकें पाहिलेलीं आहेत. ' हें चित्र पहा आणि तें चित्र पहा ' असें आपल्या आईला रुद्र कंठानें म्हणणाऱ्या हॅम्लेटचा तो गणपतरावांचा आवाज अद्यापहि तुमच्या आमच्या शरीरावरील रोमन् रोम जागा करीत आहे. गणपतराव भागवतांची ती कीचकाची क्रूर आणि भेसूर भूमिका अद्याप तुमच्या आमच्या डोळ्यांसमोरून नाहींशी झालेली नाहीं. ' देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्तच नाहीं ! ' ही त्र्यंबकराव प्रधानांची ' भाऊबंदकी 'मधील घनगंभीर गर्जना अद्याप आमच्या अंतःकरणांमध्यें निनादत आहे. ' बाईसाहेब, हा नाना इतका कृतघ्न आहे असें तुम्हांला वाटतें तरी कसें ? ' हें ' तोतयाच्या बंडा 'तील पार्वतीबाईला उद्देशून केलेलें नानवा गोखल्यांचें भाषण आठवतांच अजूनहि डोळ्यांत अश्रु उभे रहातात.

" ' मी त्यांना पाहिलं ! मी पाहिलं ! ' अशा नाजुक आणि लाजऱ्या शृंगारानें रंगभूमीवर नाचत प्रवेश करणारी बालगंधर्वांची ती लाडकी लावण्यमूर्ति अजूनहि आम्हीं मनाच्या महिरपीमध्यें टांगून ठेवलेली आहे. ' ही श्रावण शेटची चिठ्ठी माझ्या बायकोकडे कां ? ' हें फाल्गुनरावांचें स्वगत भाषण करतांना गणपतराव बोडसांच्या आवाजांतला तो विशिष्ट ठसका नि अभिनय आम्ही अजूनहि विसरूं शकत नाहीं. महाराष्ट्र नाटक मंडळीमधील टिपणीस बंधू, केशवराव दाते, ' बळवंत ' मंडळीचे चिंतामणराव कोल्हटकर आणि ' कामण्णा ' ढेरे ह्यांनीं मराठी रंगभूमीवर अमर करून ठेवलेल्या भूमिका अद्यापहि आमच्या स्मृतिपटलामधून नाहींशा झालेल्या नाहींत.

" मराठी रंगभूमीचें हें बादशाही वैभव तुम्हीं आम्हीं डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीचा तो संस्थानी रुबाब, शंकरराव मुजुमदारांचा तो व्यवस्थापकीय दरारा, गंधर्व मंडळीचा तो भव्य पडदा, त्या सारंग्या, बालगंधर्वांच्या अंगाला फासलेल्या अत्तराचा पहिल्या दोन रांगांमधून दरवळणारा तो घमघमाट, खाडिलकरांच्या नाटकांचे ते वैभवशाली पहिले प्रयोग, विद्युल्लतेच्या लोळाप्रमाणें प्रेक्षकांना क्षणांत दिपवून टाकणारा केशवराव भोसल्यांच्या संगीताचा तो विलक्षण झराटा, महाराष्ट्र नाटक मंडळीच्या नटांच्या त्या विचित्र आवाजांतल्या वीरश्रीयुक्त गर्जना, किंबहुना तीन-चार तपेंपर्यंत अखिल महाराष्ट्राला रंगभूमीवरील ज्या ज्या व्यक्तींनीं आणि ज्या ज्या गोष्टींनीं वेड लावलेलें होतें, त्या त्या सर्व व्यक्ति आणि सर्व गोष्टी तुमच्या स्मरणांत अगदीं ताज्या आहेत.

" मराठी रंगभूमीच्या जन्मापासून तिची एकसारखी झालेली वाढ आणि प्रगति लक्षांत घेतली असतां ह्या तात्कालिक संकटानें वास्तविक निराश होण्याचें किंवा भिऊन जाण्याचें मुळींच कारण नाहीं. मराठी नाटकाला प्रत्यक्ष अशी सुरुवात सन १८४३ सालीं सांगली येथें विष्णुदास भावे ह्यांनीं केली. सांगलीकरांच्या आज्ञेवरून एका कानडी नाटकाच्या धर्तीवर ' सीतास्वयंवर ' हें आख्यान भावे ह्यांनीं नाटकाच्या स्वरूपांत लिहून तें प्रयोगरूपानें करून दाखविलें. म्हणून विष्णुदास भावे हे मराठी नाटकाचे नि रंगभूमीचे आद्य जनक, सांगली ही महाराष्ट्रीय नाट्यकलेची गंगोत्री आणि १८४३ हें वर्ष मराठी रंगभूमीच्या प्राणप्रतिष्ठेचें वर्ष म्हणून समजावयाला आपणांस हरकत नाहीं.

" भावे ह्यांच्या मागोमाग पौराणिक नाटकें आणि आख्यानें करून दाखविणाऱ्या कितीतरी नाटक मंडळ्या स्थापन झाल्या. १८५६ सालीं मुंबई विश्वविद्यालय स्थापन झाल्यानंतर संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचा कॉलेजांतून अभ्यास सुरू झाला. त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणूनच कीं काय सन १८६० ते १८७५ पर्यंत वेणीसंहार, उत्तररामचरित्रादि सुप्रसिद्ध संस्कृत नाटकांचीं आणि शेक्सपीअरच्या कांहीं उत्तमोत्तम नाटकांचीं त्या वेळच्या विद्वान् पंडितांनीं मराठींत भाषांतरें केलीं. एवढेंच नव्हे तर कॉलेजमधील प्रौढ विद्यार्थ्यांनीं ह्या नाटकांचे प्रयोगहि करून दाखविण्यास सुरुवात केली. विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं आणि प्राध्यापकांनीं मराठी रंगभूमीची प्रतिष्ठापना करण्याच्या कामीं त्या वेळीं प्रामुख्यानें भाग घेतला होता.

" तथापि, मराठी रंगभूमीला स्वतंत्र, पण स्पष्ट आणि लोकप्रिय स्वरूप प्राप्त करून देणारी विभूति १८८० मध्यें अवतीर्ण झाली. ती विभूति म्हणजे सुप्रसिद्ध नट आणि नाटककार कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ही होय. ' शाकुंतल ' आणि ' सौभद्र ' हीं नाटकें लिहून सदतीस वर्षें असहायपणें रांगणाऱ्या मराठी रंगभूमीला अण्णासाहेबांनीं तिच्या पायांवर उभें केलें व तिला चालावयास शिकविलें. ' सौभद्र ' हें त्यांचें पहिलें स्वतंत्र नाटक किती प्रभावशाली आहे, हें सांगावयास नको. वाटेल त्या नटांनीं आणि नाटक मंडळ्यांनीं गेलीं पन्नास वर्षें ह्या नाटकाच्या ' हालअपेष्टा ' केल्या असल्या, तरी ह्या नाटकाची गोडी अद्याप यत्किंचित्‌हि कमी झालेली नाहीं. ' सौभद्र ' नाटकानें केवळ संगीत नाटकांचाच नव्हे तर सर्व मराठी नाटकांचा पाया घातला.

" अण्णासाहेबांची परंपरा त्यांचे शिष्य गोविंदरावजी देवल यांनीं पुढें चालविली. देवल ह्यांचीं बहुतेक सर्व नाटकें रूपांतरित असलीं तरी त्यांच्या बाळबोध भाषेमुळें आणि रसाळ पद्यरचनेमुळें मराठी रंगभूमीला फारच सोज्ज्वळ असें स्वरूप प्राप्त झालें. ' शारदा ' हें एकच स्वतंत्र सामाजिक नाटक लिहून देवल ह्यांनीं वास्तववादी नाटकांची मराठी रंगभूमीवर मुहूर्तमेढ रोवली. ' सौभद्रा 'प्रमाणें ' शारदा '

हें नाटकहि मराठी रंगभूमीवरील एक अमर नाटक आहे. ‘ शारदा ’ नाटकाइतकीं गोड आणि सोपीं पदें अद्यापपर्यंत एकाहि नाटककारानें रचिलेलीं नाहींत. ‘ फाल्गुनराव ’ किंवा ‘ संशयकल्लोळ ’ हें त्यांचें नाटक भाषांतरित असलें तरी तें लिहून देवल ह्यांनीं हास्यप्रधान नाटकांचें नवें दालन खुलें केलें.

“ १८८० ते १९०० हें किर्लोस्कर–देवलांचें युग असें मानलें, तर १९०० ते १९२० हें खाडिलकर–कोल्हटकरांचें युग होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. विश्वविद्यालयांत घडलेल्या शेक्सपीअरच्या अभ्यासाचा परिणाम या दोन्हीहि तरुण नाटककारांवर झाला. तथापि, खाडिलकर आणि कोल्हटकर ह्यांच्या सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनांत स्वभावपरत्वें आणि परिस्थितिपरत्वें फारच मोठा भेद होता. खाडिलकर हे चिपळूणकर आणि टिळक ह्यांच्या राजकीय विचारांच्या आखाड्यांत तयार झालेले, तर कोल्हटकर हे लोकहितवादी आणि आगरकर ह्यांच्या भूतदयावादी विचारांवर वाढलेले.

“ स्वभावानें खाडिलकर जितके गंभीर व रुक्ष तितके कोल्हटकर हे विनोदी आणि रंगेल. म्हणून एकाच शेक्सपीअरचा ह्या दोन नाटककारांच्या मनांवर सकृद्दर्शनीं अगदीं विरोधी भासणारा असा परिणाम झाला. शेक्सपीअरच्या गंभीर, शोकान्त आणि ऐतिहासिक नाटकांचा आणि त्या नाटकांतील विशिष्ट स्वभावाच्या पात्रांचा नि नाट्यपूर्ण घटनेचा खाडिलकरांच्या नाट्यलेखनावर परिणाम झाला, तर चमत्कृतिप्रधान नि गुंतागुंतीचीं कथानकें असलेल्या शेक्सपीअरच्या विनोदी आणि आनंदपर्यवसायी नाटकांना आदर्श मानून कोल्हटकरांनीं आपली नाट्यरचना केली. पात्रांच्या स्वभावपरिपोषाकडे खाडिलकरांनीं जितकें लक्ष दिलें, तितकें कोल्हटकरांनीं संविधानकरचना कौशल्यपूर्ण करण्याकडे दिलें. कोल्हटकर–खाडिलकरांचा काल हा मराठी रंगभूमीच्या आणि नाट्याच्या विकासाचा आणि वैभवाचा काळ म्हटला पाहिजे.

“ कोल्हटकरांना दोन बुद्धिमान शिष्य मिळाले. एक गडकरी आणि दुसरे वरेरकर. ह्या दोघांनीं गुरूंची परंपरा कांकणभर अधिकच उज्ज्वलतेनें आणि जास्त धडाडीनें चालवून ती गुरूंच्यापेक्षांहि समाजांत अधिक लोकप्रिय केली. गडकऱ्यांची लोकप्रियता त्यांच्या मरणोत्तरच वाढली. म्हणून १९२० ते १९३० हें गडकरी–वरेरकरांचें युग असें म्हणावयाला हरकत नाहीं. कोल्हटकरांच्या काव्याचें नि विनोदाचें वरदान गडकऱ्यांना मिळालें, तर सामाजिक अन्यायाबद्दल त्यांना वाटणारी चीड आणि तळमळ वरेरकरांच्या वांट्याला आली. सामाजिक परिस्थितीचें विश्लेषण सूक्ष्म दृष्टीनें करून आणि त्यांतील निष्कर्ष नेमका शोधून काढण्याइतका समाजशास्त्राचा गडकऱ्यांनीं अभ्यास केलेला नव्हता. गडकऱ्यांची प्रतिभा ही केवळ कवीची आणि विनोदपंडिताची प्रतिभा होती.

"कोल्हटकरांचें अवघड आणि अलंकारिक गद्य गडकऱ्यांनीं अधिक काव्यमय आणि प्रासादिक केलें. कोल्हटकरांच्या क्लिष्ट आणि कल्पतिपूर्ण कोटिबाजपणाला माणसाळवून त्याला जास्त भावनापूर्ण आणि विनोदी बनविलें. कोल्हटकरांपेक्षा रसनिष्पत्तींच्या दृष्टीनें गडकऱ्यांचे नाट्यप्रसंग अधिक सामर्थ्यवान् आहेत. किंबहुना नाट्यदृष्ट्या परिणामकारक भाषा आणि संवाद लिहून प्रेक्षकांच्या भावना क्षणांत पिळवटून प्रक्षुब्ध करणारा गडकऱ्यांसारखा एकहि नाटककार मराठी भाषेमध्यें होऊन गेलेला नाहीं. कारुण्य आणि हास्य हे रस गडकऱ्यांच्यापुढें हात जोडून सेवकाप्रमाणें सिद्ध असत. 'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या नाटकानें महाराष्ट्रांत अश्रूंचा जेवढा पूर वाहवला असेल, तेवढे हास्यांचे धबधबे त्यांच्या 'भावबंधना'नें महाराष्ट्रांत निर्माण केले.

"खाडिलकर, कोल्हटकर आणि गडकरी ह्या नाटककारांना जें एक अवघड कार्य साधतां आलें नाहीं, तें वरेरकरांनीं यशस्वितेनें साधलें. आणि तें म्हणजे मराठी रंगभूमीला अद्भुतरम्यतेच्या कृत्रिम वातावरणांतून खेंचून काढून तिला रक्तामांसाच्या माणसांच्या खऱ्याखुऱ्या आणि जिवंत जगांत आणून सोडलें. ह्या दृष्टीनें वरेरकर हे पूर्वींच्या सर्व नाटककारांपेक्षां अधिक यथार्थत्वानें मराठीचे युगप्रवर्तक नाटककार म्हणून संबोधितां येतील. 'शारदा' नाटक लिहून वास्तववादी सामाजिक नाटकांची जी तेजस्वी सुरुवात देवलांनीं केली होती, ती परंपरा कोल्हटकर-गडकरी ह्यांच्यापेक्षां अधिक तत्त्वनिष्ठेनें वरेरकर ह्यांनींच पुढें चालविली.

"मध्यम आणि मजूर वर्गापुढचे बहुतेक सर्व प्रश्न ह्या नाहीं त्या नाटकांत वरेरकरांनीं चितारण्याचा यत्न केला. हुंडा, धर्मांतर नि शुद्धिकरण, गिरणीमालक, मजूर नि संप, असहकार आणि कोर्टबहिष्कार, आंकडे आणि सट्टे खेळण्याचें नवें व्यसन, जुगार, अस्पृश्योद्धार, खादी-प्रसार, करमणुकीवरील क.र, मद्यपानबंदी, किंबहुना त्या काळीं ज्या ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय चळवळीं महाराष्ट्रांत झाल्या त्यांची नाट्यात्मक नोंद वरेरकरांनीं केली. टिळकांच्या राजकारणाचे पडसाद जसे खाडिलकरांच्या नाटकांत उमटले तसे गांधीजींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसचें प्रतिबिंब वरेरकरांच्या नाटकांत चित्रित झालें.

"आधुनिक नाट्यतंत्र हेतुपुरःसर उपयोगांत आणून रंगभूमि जास्त वास्तववादी आणि सजीव करावयाची हें ध्येय वरेरकरांच्या इतक्या निष्ठेनें पूर्वींच्या कोणत्याहि नाटककारानें समोर ठेवलें नाहीं. म्हणून मराठी नाटकांच्या इतिहासांत 'आधुनिक रंगभूमीचे सुधारक' असा वरेरकरांचा उल्लेख केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

"एवंच १८८० ते १९३० पर्यंतचा पन्नास वर्षांचा काळ हा मराठी रंगभूमीच्या वृद्धीचा, विकासाचा, वैभवाचा आणि सुधारणेचा काळ आहे असें मी समजतों. मराठी रंगभूमीचा हा भाग्यशाली भूतकाल लक्षांत घेतला म्हणजे वर्तमानकाळांतील तिची दैन्यावस्था बघूनहि तिच्या तेजस्वी भविष्यकाळाबद्दल मन निराश

होण्याचें यत्किंचित्‌हि कारण उरत नाहीं. मराठी रंगभूमीचें भवितव्य अत्यंत उज्ज्वल आहे ह्याविषयीं व्यक्तिशः माझी पूर्ण खात्री आहे. महाराष्ट्रांत नाट्य केव्हांहि मरणार नाहीं यावर माझा दृढ विश्वास आहे.

" कारण महाराष्ट्रीयांच्या स्वभावांत जन्मतःच मुळीं नाट्य भरलेलें आहे. जो मनुष्य परिस्थितीला शरण जातो, त्याच्या आयुष्यांत नाट्य असूं शकत नाहीं. महाराष्ट्रीय माणूस हा आपल्या परिस्थितीला आजपर्यंत केव्हांहि शरण गेला नाहीं असा पूर्वीच्या इतिहासाचा दाखला आहे. प्रतिकूल परिस्थितीशीं महाराष्ट्रीय माणसें शेवटपर्यंत झगडत राहतात म्हणून त्यांच्या जीवनांत नाट्याला स्थान आहे. कारण, नाट्य म्हणजे झगडा, खटका, झोंबाझोंबी अन् युद्ध ! कादंबरींतील पात्रें प्रवाहपतिताप्रमाणें परिस्थितीच्या ओघांत वाहत जातात. नाटकांतलीं पात्रें आपल्या परिस्थितीशीं झगडत राहतात. हा नाटक आणि कादंबरींतील फरक आहे. जोंपर्यंत महाराष्ट्राची झगडण्याची वृत्ति शाबूत आहे, तोंपर्यंत महाराष्ट्रांत नाट्यकला अमर आहे.

" मात्र रंगभूमीला आणि नाटकांना राष्ट्रीय आणि सामाजिक महत्त्व येईल, तेव्हांच नाट्यकलेचा उत्कर्ष होईल. आज आपल्या समाजाला स्वतःच्या संस्कृतीचा, साहित्याचा, कलांचा आपल्या आवडीप्रमाणें पुरस्कार करण्याला मोकळीक नाहीं. कारण, आज आपला देश पारतंत्र्यांत आहे. राष्ट्र स्वतंत्र होईल तेव्हांच न्यायाच्या, माणुसकीच्या नि समानतेच्या पायावर उद्यांच्या भारतवर्षांतील समाजाची पुनर्घटना होईल. प्रत्येक समाजाला आणि प्रांताला आपल्या भाषेचा, साहित्याचा, संस्कृतीचा नि कलेचा आपापल्या इच्छेप्रमाणें विकास आणि उत्कर्ष करून घेण्यास त्याच वेळीं खरा वाव मिळेल.

" म्हणून, आजच्या घटकेला मराठी रंगभूमीच्या भक्तांनीं त्याच भाग्यशाली ' उद्यां 'ला खेचून जवळ आणण्यासाठीं आपलें सर्वस्व खर्च करावयाला पाहिजे. यापेक्षां शेवटीं मी आपल्याला दुसरें काय सांगणार ? "

## १७

## वसंतसेना – १

'पायाची दासी' (हिंदी : चरणोंकी दासी) हा माझा पहिला चित्रपट अत्यंत यशस्वी झाला. त्या चित्रपटावर मला एकंदर पांच लाख छपन्न हजार रुपये फायदा झाला. त्यामुळें माझें डोकेंच फिरलें. आपण कोण आहोंत, आपलें सामर्थ्य काय आहे, आपण कोठपर्यंत उडी मारायची ह्याचा सारासार विवेक माझ्यांत मुळीं राहिलाच नाहीं. आणि मी एकदम गगनाला गवसणी घालण्याचा निर्धार करून दहा लाख रुपयांचा 'वसंतसेना' हा बोलपट दोन भाषांमध्यें काढावयाची जाहीर घोषणा केली.

आजकाल पन्नास पन्नास लाखांचे नि कोट कोट रुपयांचे हिंदी बोलपट निर्माण होऊं लागले आहेत. पण वीस पंचवीस वर्षांपूर्वी दहा लाख रुपयांचा बोलपट निर्माण करावयाला निर्मात्याच्या अंगीं असामान्य धैर्य असावें लागत होतें. तें धैर्य 'न्यू थिएटर्स', 'प्रभात' किंवा 'प्रकाश' ह्या त्यावेळच्या श्रेष्ठ चित्रपट निर्मात्या कंपन्यांनीं दाखवलें असतें, तर तें त्यांना शोभून दिसलें असतें. पण माझ्यासारख्या केवळ एकाच चित्रपटाच्या यशावर स्वर्ग दोन बोटें उरलेल्या उपटसुंभ माणसानें एकदम दहा लाख रुपये

किमतीचा चित्रपट निर्माण करण्याची प्रतिज्ञा करणें, म्हणजे शिंपल्यामध्यें बसून महासागर ओलांडावयाला निघण्यासारखें तें हास्यास्पद नि आत्मघातकी होतें.

'वसंतसेना' हाच चित्रपट घेण्याचा विचार माझ्या मनामध्यें कसा आला? त्याचें कारण असें कीं त्यापूर्वी कांहीं वर्षें आधीं मीं 'बालमोहन नाटक मंडळी' साठीं शूद्रकाच्या 'मृच्छकटिका' वर आधारलेलें 'सोन्याचा गाडा' हें नाटक लिहावयाला घेतलें होतें. तीन चार अंक लिहून झाले होते. त्या नाटकाचें हस्तलिखित त्यानंतर पुढें कुठें गहाळ झालें तें आजतागायत मला माहीत नाहीं.

तें नाटक लिहितां लिहितां माझ्या डोक्यांत अकस्मात् एक कल्पना आली. ती अशी कीं त्या कथानकावर नाटक लिहिण्यापेक्षां एकादी चित्रकथा कां लिहूं नये? तो विचार डोक्यांत एकसारखा वाढत गेला. तेवढ्यांत माझे मित्र बाबूराव पेंढारकर मला भेटले. ते म्हणाले, 'ही चित्रकथा तुम्हीं शांतारामबापूंना द्या. ते तुमच्या या कथानकाचें खरें चीज करतील.' त्या वेळीं मी स्वतः कांहीं चित्रनिर्माता नव्हतों. म्हणून बाबूरावांनीं केलेली सूचना मला एकदम पसंत पडली.

नुसती सूचना करून बाबूराव थांबले नाहींत, तर मला घेऊन ते तडक शांताराम-बापूंकडे गेले. आणि त्या चित्रपटाच्या निर्मितीचा दहा हजार रुपयांचा करार 'प्रभात' कंपनीशीं त्यांनीं माझा करविला. पण तो करार तसाच कांहीं वर्षें दप्तरीं पडून राहिला. एवढ्यांत मीच स्वतः चित्रनिर्माता झालों. म्हणून 'पायाच्या दासी'च्या असामान्य यशानंतर आपण स्वतःच 'वसंतसेना' चित्रपट निर्माण करावा, अशी साहजिकच माझ्या मनांत इच्छा निर्माण झाली.

'वसंतसेने'चा मुहूर्त आम्हीं १९४१ च्या दसऱ्याला केला. त्याच्या आदल्या दिवशींच पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें माझ्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. ह्या चित्रपटाला आणखी दुसरा जर मोठा अपशकुन झाला असेल तर तो म्हणजे आमचे वितरक (Distributor) भाई भालचंद्र सामंत ह्यांचा आकस्मिक मृत्यु हा होय.

भालचंद्र सामंत हे एक अत्यंत गरिबींतून वर आलेले तरुण धाडसी नि कर्तबगार सिने-डिस्ट्रिब्यूटर होते. मूळचा त्यांचा धंदा चित्रपटाच्या जाहिराती देण्याचा होता. त्यांत त्यांना अपेक्षेबाहेर यश आल्यानें ते पुढें चित्रपटाच्या वितरणाच्या व्यवसायांत शिरले.

आमच्या 'नवयुग चित्रपटा'चें वितरण प्रथमच त्यांनीं हातीं घेतलें. 'पायाची दासी' हा चित्रपट यशस्वी झाल्यानंतर माझ्या चित्रपट निर्मितीक्षेत्रांतील धडाडीबद्दल त्यांच्या मनांत विश्वास निर्माण झाला. आणि 'तुम्हीं कोणताहि चित्रपट हातीं घ्या, मी डोंगरासारखा तुमच्या मागें उभा आहें!' असा त्यांनीं मला पाठच्या भावाप्रमाणें धीर दिला.

पण दुर्दैवाची घटना अशी कीं, 'वसंतसेने'चा मुहूर्त झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं भाई सामंत रक्तदाबाच्या विकारानें ऐन तिशीपस्तिशीच्या वयांत कालवश झाले. चित्रपटव्यवसायांतील एक विलक्षण कर्तबगार मराठी माणूस अकालीं निधन पावल्याबद्दल मुंबई शहरांतील सर्व चित्रपटव्यावसायिकांना अपरंपार दुःख झालें. कारण भाई सामंत हे स्वभावानें अतिशय गोड आणि मनमिळाऊ होते. त्यामुळें ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांचा संबंध येई तो तो माणूस त्यांच्या प्रेमळपणावर एकदम लुब्ध होऊन जाई.

भाई सामंत गेल्यानंतर 'वसंतसेने'ला आर्थिक सहाय्य कोण करणार, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न माझ्या डोळ्यांसमोर आ वासून उभा राहिला. 'वसंतसेना' सुरू करण्याच्या काळांत मी एकत्र कुटुंबपद्धतीवर आधारलेलें 'राजारानी' हें हिंदी चित्र सुरू केलें होतें. त्याचें दिग्दर्शन नझम नखवी या 'बॉंबे टॉकीज'च्या एका यशस्वी दिग्दर्शकाकडे मीं सोपविलें होतें. त्या चित्रपटासाठीं वनमाला, मझरखान, ईश्वरलाल, सुनालिनीदेवी, नवीन याज्ञिक वगैरे नामांकित नटनटींची मीं निवड केलेली होती. सारांश, आर्थिक दृष्ट्या मी माझ्या डोक्यावर भलताच मोठा बोजा घेतला होता.

आणि तो जणुं कांहीं कमी होता, म्हणूनच कीं काय माझी स्वतची स्वतंत्र वितरण संस्था काढावयाचें मी ठरविलें. सामंत कंपनीचें ऑफीस ११६ चर्नी रोड येथें मिठाबाई बिल्डिंगमध्यें होतें. त्याच इमारतीमधला तिसरा प्रशस्त मजला मी भाड्यानें घेतला आणि तेथें 'अत्रे पिक्चर्स डिस्ट्रिब्यूशन'ची ऐसपैस आणि रुबाबदार कचेरी मीं उघडली.

त्या वेळीं मुंबईमध्यें 'एम्. बी. बिलिमोरिया अ‍ॅण्ड सन' नांवाचे एक सुप्रसिद्ध आणि श्रीमंत फिल्म डिस्ट्रिब्यूटर्स होते. माझ्या स्वतःच्या मालकीचा मुंबईत फिल्म स्टुडिओ असून माझें पहिलेंच चित्र 'पायाची दासी' हें आर्थिक दृष्ट्या कमालीचें यशस्वी झालें होतें, ही गोष्ट साहजिकच त्यांच्या कानांवर गेल्यामुळें माझ्या 'वसंतसेना' चित्रपटास आर्थिक सहाय्य देण्याची आपली तयारी असल्याचें त्यांनीं आपण होऊन मला कळविलें. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. अर्थात्, स्वतःची वितरण संस्था मी काढलेली असल्यानें त्या संस्थेच्या मार्फत मी त्यांच्याकडून कर्ज घेईन असें मीं त्यांना कळविलें. आणि त्याप्रमाणें त्यांचा नि माझा करार ठरला.

एक दिवस त्या कराराच्या पोटीं बिलिमोरियांनीं देऊं केलेल्या पैशांपैकीं अडीच लाखांचा पहिला हप्ता वसूल करण्यासाठीं म्हणून मी त्यांच्या कचेरींत गेलों. 'ज्ञानप्रकाश'चे संपादक काकासाहेब लिमये माझ्याबरोबर होते.

बिलिमोरियांनीं अगदीं शांतपणें एका लहानशा पाकिटांत अडीच लाखांचा चेक माझ्या स्वाधीन केला. तो खिशांत घालून आणि त्यांना नमस्कार करून मी उठलों. अन् बाहेर पडलों. बाहेर आल्यावर मीं काकासाहेबांना विचारलें, "काका, माझ्या

खिशांत केवढ्याचा चेक असेल असें तुम्हांला वाटतें ? ”

काकासाहेब आपलें नेहमीचें सौम्य हास्य करून मला म्हणाले, “ असेल चारपांच हजाराचा ! ”

मी गंभीर चेहेरा करून त्यांना म्हणालों, “ तुमच्या कल्पनाशक्तीला आणखीन जरा ताण द्या ! ”

काकांनीं भीत भीत विचारलें, “ दहा हजार ? ”

मी हंसून म्हणालों, “ आणखी चढवा तुमच्या कल्पनेचा पतंग वर — ”

काकासाहेब थोडेसे थांबले. आणि किंचित् विचार करून ते म्हणाले, “ अगदीं डोक्यावर पाणी गेलें, तरी पंचवीस हजार रुपयांपेक्षां जास्त रक्कम असणें शक्य नाहीं ! ”

तेव्हां मीं खिशांतून चेक काढून काकासाहेबांच्या पुढें धरला. दोन लाख पन्नास हजार रुपये ! काका डोळे वासून त्या चेककडे नुसते पहातच राहिले. त्यांच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वासच बसेना.

कांहीं वेळानें माझा हात जोराजोरानें हालवीत ते सद्गदित कंठानें मला म्हणाले, “ पुण्यांत दरमहा शंभर रुपये पगार मिळवणाऱ्या तुमच्यासारख्या माणसानें वर्ष-सहा महिन्यांच्या आंत मुंबईच्या बाजारांत येऊन लाखों रुपयांची पत मिळवावी, हें पाहून माझ्यासारख्या तुमच्या मित्राला जो आनंद वाटतो आहे, तो व्यक्त करा-वयाला माझ्यापाशीं खरोखरच शब्द नाहींत. ”

खरोखरच, त्या काळांत काकांचा मला केवढा धीर होता !

आतां मूळच्या ‘ मृच्छकटिक ’ नाटकांत मीं जो फेरफार केला, त्याचें थोडेंसें दिग्दर्शन मी येथें करतों.

‘ मृच्छकटिक ’ नाटकाचा जन्म दोन हजार वर्षांपूर्वी झाला. मोठमोठ्या पंडितांनीं या नाटकाचीं अनेक पारायणें केलेलीं आहेत. परंतु मूळ नाटकास ‘ मृच्छकटिक ’ म्हणजे ‘ मातीचा गाडा ’ असें नाव शूद्रकानें कां दिलें ह्याचा नीटसा उलगडा कोणास झालेला आढळत नाहीं. नाटकाची मध्यवर्ति कल्पना ‘ मातीच्या गाड्या ’ ची असतांना ह्या नाटकाची सर्व उभारणी चारुदत्त नि वसंतसेना ह्यांच्या प्रेमावर आणि शृंगारावर झालेली आहे. आणि सर्वसामान्य प्रेक्षक ह्याच भावनेनें आजपर्यंत ‘ मृच्छकटिक ’ नाटक पहात आलेले आहेत. शृंगार हा या नाटकाचा स्थायी भाव असला तरी त्या-मधील मध्यवर्ति कल्पना निराळी असावी असा हें नाटक वाचतां वाचतां सहज माझ्या मनांत विचार आला. ‘ मातीचा गाडा ’ या शब्दाचा खराखुरा अर्थ ‘ Struggle for soil ’ जन्मभूमीच्या स्वातंत्र्याचा झगडा आहे, ह्या दृष्टीनें जर आपण त्या नाटकाकडे पाहिलें तर एक निराळाच बोध आणि आनंद या नाटकामधून प्राप्त होतो.

उज्जैनी नगरी पालक राजाच्या जुलमी सत्तेखालीं आपलें स्वातंत्र्य गमावून बसली होती. या पालक राजाच्या जुलमी झोटिंगशाहीचा प्रतिकार करून आणि

त्याची सत्ता उलथून टाकून उज्जैनीला स्वातंत्र्याचा लाभ करून देणें नि लोकशाही बंडाचा विजय झालेला दर्शविणें हीच 'मृच्छकटिक' नाटकाची कल्पना असावी. हा स्वातंत्र्यवादी दृष्टिकोन 'वसंतसेना' बोलपटांत विशद करण्याचें मीं ठरविलें.

चारुदत्त हा अत्यंत श्रीमंत गृहस्थ होता. गजान्तलक्ष्मी जणुं कांहीं त्याच्या पायापाशीं लोळण घेईल असें त्याचें एकंदर ऐश्वर्य होतें. या वैभवाच्या छायेंत राहून चारुदत्त विलासी न बनतां खराखुरा कर्मयोगी बनला. त्याची ही निर्धनता ऐतखाऊ कंगालांना वृथा अन्नदान करण्यानें आलेली नव्हती. तर एका महान् राष्ट्रीय क्रांतीचा झेंडा यशस्वी करण्यासाठीं त्यानें आपली संपत्ति खर्च केलेली होती. त्यागामधून निर्माण झालेली त्याची निर्धनता कुबेराला लाजवील अशी होती. चारुदत्ताचा त्याग हा कर्तव्यपूर्तीचा त्याग होता. आणि तें कर्तव्य म्हणजे एकच उज्जैनीचें स्वातंत्र्य.

म्हणून चारुदत्त हा प्रेमवेडा होता ही जी सर्वसामान्य प्रेक्षकांची त्याच्याबद्दलची कल्पना होते ती बरोबर नाहीं. चारुदत्त हा स्वातंत्र्यवीर होता. देश, लोकसत्ता आणि लोककल्याण या त्रयींची तळमळ त्याला अहोरात्र लागली होती. या तळमळींतच त्याची नि वसंतसेनेची पहिली भेट झाली.

महान् योगी स्त्रीच्या सहवासांत कर्तव्यच्युत होतात असा पौराणिक दाखला आहे. वसंतसेनेच्या विलोभनीय संगतींत चारुदत्त स्वातंत्र्याचा झगडा अर्धवटच सोडून देणार कीं काय अशी शंका त्याच्या मित्रमंडळींना आल्यावांचून राहिली नाहीं. अनेकांनीं चारुदत्ताला त्याची जाणीवहि करून दिली. परंतु 'प्रेम' हे एक विसाव्याचें खेळणें आहे अशी चारुदत्ताची ठाम समजूत असल्यानें, त्याच्या स्वातंत्र्यपूर्तीच्या कल्पनेपासून तो पराङ्मुख झाला नाहीं. उलट वधस्तंभावर चढेपर्यंत त्यानें आपल्या क्रांतिकारक कटाचा सुगावा कुणास लागूं दिलेला नाहीं.

चारुदत्ताची धीरोदात्त कर्तव्यबुद्धि आणि वसंतसेनेबद्दल त्याला वाटणारें आकर्षण ह्यांच्या संघर्षावर ही कथा आधारलेली आहे. चारुदत्ताला सर्वस्व अर्पण करण्याचा वसंतसेनेचा निर्धार हा स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या प्रकृतीचा निर्धार आहे. या निर्धारांत तिला निर्धनता कःपदार्थ वाटली. स्वातंत्र्याचा लाभ झाल्यावर धनसंपत्ति वाटेल तितकी मिळेल. संपत्तीवाचूनचें स्वातंत्र्य म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्य मिळवणें हेंच तिला अभिप्रेत होतें.

सारांश, 'मातीचा गाडा' म्हणजे 'मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा झगडा' हाच ह्या नाटकाचा खरा अर्थ आहे. चारुदत्त हा तरुण वर्गाचा प्रतीकात्मा आहे. क्रांतीसाठीं तो घरादारावर नांगर फिरवायला तयार झाला. क्रांतीच्या यशस्वितेसाठीं तो वधस्तंभावर चढण्यास सिद्ध झाला. प्राण पणास लावणारा चारुदत्त चंगीभंगी किंवा प्रेमरंगी असा नसून तो अत्यंत धडाडीचा स्वातंत्र्योत्सुक होता. त्याचें दारिद्र्य दानानें आलेलें नव्हतें. तर त्यागानें आलेलें होतें.

मूळ नाटकांत चारुदत्त हा निराशावादी बनलेला आहे. निराशावाद हा चारुदत्ताचा खरा गुणधर्म नाहीं.

'दारिद्र्य मरण यांतुनि
मरण बरें वा दरिद्रता खोटी !'

असा करुण सूर काढून चारुदत्तानें अनेक ठिकाणीं निराशावाद प्रकट केलेला आहे. हा सूर त्याच्या व्यक्तिगत दुःखाचा नाहीं. तर सारा देश, सारी जनता दरिद्री बनली, जुलमामुळें निर्धन बनली अन् म्हणून या '**राष्ट्रीय दारिद्र्यापेक्षां मरण बरें!**' असा या निराशावादाचा खराखुरा अर्थ आहे.

अशा रीतीनें 'वसंतसेना' ह्या माझ्या बोलपटांतील प्रत्येक पात्राचें रूपदर्शन मीं राष्ट्रीय स्वरूपाच्या दृष्टीनें केलें. हें एवढें सांगितल्यानंतर हा चित्रपट यशस्वी करण्याच्या दृष्टीनें तो जास्तींत जास्त नृत्य—संगीत-प्रधान कसा करतां येईल ह्याचा विचार करून मीं त्या क्षेत्रामधल्या उत्तमोत्तम अधिकारी कलावंतांची निवड करावयाचें ठरविलें.

त्या काळांत महाराष्ट्रामध्यें सर्वश्रेष्ठ संगीतज्ञ कोण होता? अर्थात्, संगीत-कलानिधि मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर. त्या वेळीं ते 'प्रभात' कंपनीमध्यें महिना सहाशें रुपये पगारावर काम करीत होते. मी त्यांच्याकडे गेलों नि म्हणालों, "मास्तर, मी तुम्हांला महिना बाराशें रुपये पगार देतों, येतां का?" मास्तरांनीं माझ्या हातावर टाळी दिली. आणि त्यांनीं माझी विनंती मोठ्या आनंदानें मान्य केली. नृत्यासाठीं मी मणिपुरी नृत्याचे आचार्य पंडित नवकुमार ह्यांची नेमणूक केली. त्यांच्या मदतीला मीं दुसरे एक कुशल नृत्यकार प्रवीणकुमार ह्यांना दिलें.

कला—दिग्दर्शक म्हणून सुप्रसिद्ध भारतीय चित्रकार कनु देसाई ह्यांना मीं मुद्दाम आग्रहानें बोलावलें. आज हे कनु देसाई शांतारामबापूंचे कला—दिग्दर्शक आहेत. पण चित्रपट—क्षेत्रांत कनु देसाई ह्यांना मीं प्रथम आणलें.

आणि चित्रपटांतील अभूतपूर्व दृश्यांच्या निर्मितीसाठीं मीं प्रल्हाद दत्त ह्यांना नेमलें. तंत्राच्या दृष्टीनें माझ्या बोलपटांत कोणत्याहि रीतीनें यत्किंचितहि कमीपणा येऊं नये म्हणून मीं अक्षरशः आकाशपाताळ एक केलें.

# १८

## वसंतसेना — २

संस्कृत वाङ्मयांत ' शाकुंतला ' इतकेंच ' मृच्छकटिका 'चें महत्त्व आहे ' मृच्छकटिक ' ह्याचा अर्थ प्रा. फडक्यांसारखे जे दिव्य संस्कृत भाषापंडित आहेत त्यांच्या माहितीसाठीं फोड करून सांगावयाला हवा मृत् ( म्हणजे, माती ) + शकटिक (गाडा)=मातीचा गाडा. म्हणूनच इंग्रजींत त्याचीं Toycart आणि Claycart अशीं भाषांतरें झालेलीं आहेत.

गोविंदराव देवलांनीं मराठींत त्याचें केलेलें 'मृच्छकटिक' हें भाषांतर म्हणा किंवा रूपांतर म्हणा एक वेळ आपल्या मराठी रंगभूमीचें प्राण होऊन बसलें होतें. ह्या कथाभागावर पूर्वीं दोन चित्रपट तयार झाल्याचें मीं ऐकलें होतें. पण त्यांची कांहीं त्या काळीं फारशी कुणाला आठवण राहिलेली नव्हती. कारण, ते चित्रपट बहुधा मुळास धरून आणि वाङ्मयात्मक दृष्टीनें घेण्यांत आलेले नसले पाहिजेत. अर्थात्, मीं कांहीं ते पाहिले नव्हते.

राजा शूद्रकाच्या मूळ मृच्छकटिक नाटकाचे सहा अंक आहेत. माझ्या ' वसंतसेना ' बोलपटाची लांबी पंधरा हजार फूट झाली. मूळ नाटकांतील संवाद, कल्पना,

विचार, विनोद, काव्य, प्रसंग यांमधील मौलिक सौंदर्य आहे तसेंच मीं कायम ठेवलें.

एखाद्या सुप्रसिद्ध वाङ्मयकृतीच्या आधारावर निर्माण केलेल्या बोलपटांत पुष्कळदां तिच्या मूळ कथाभागांत मोठमोठे फेरबदल करण्यांत येतात. त्यामुळें ती वाङ्मयकृति अत्यंत विकृत आणि विपर्यस्त स्वरूपांत रुपेरी पडद्यावर प्रकट होते. आणि मग ती पाहतांना जाणत्या वाङ्मयभक्तांना परमावधीचें दुःख होतें. हा अनुभव पूर्वी कांहीं चित्रपटांच्या बाबतींत मला आलेला असल्यानें, तो आक्षेप माझ्या ' वसंतसेना ' चित्रपटावर येऊं नये, म्हणून काय वाटेल तें झालें तरी ' मृच्छकटिका 'च्या मूळच्या वाङ्मयीन स्वरूपाची आणि कलात्मक सौंदर्याची यत्किंचित्‌हि हानि होऊं नये यासंबंधीं मी पहिल्यापासून जागरूक होतों.

मूळच्या कथानकाला राजकीय पार्श्वभूमि देऊन चारुदत्ताची भूमिका अधिक तात्त्विक आणि तेजस्वी दाखवण्याचा मीं कसा प्रयत्न केला, तें पूर्वीच्या प्रकरणांत सांगितलें. मूळ नाटकामध्यें चारुदत्ताची प्रथम पत्नी ' धूता ' दाखविलेली आहे. नाट्यवस्तूंत हिचें स्थान अत्यंत गौण आहे. किंबहुना तें पात्र नाट्याच्या आणि कथा-विकासाच्या दृष्टीनें विषयान्तरच आहे. म्हणून माझ्या बोलपटांत चारुदत्त हा मीं विधुर दाखविलेला आहे. त्यामुळें त्याच्या प्रणयातुरतेमध्यें कोणत्याहि तऱ्हेचें वैगुण्य उत्पन्न न होतां ती प्रेमकथा जास्तच उदात्त होते.

ह्याखेरीज कथाविकासाच्या दृष्टीनें मूळ कथेमधील पुष्कळसें विषयांतर आणि विस्तार बोलपटामधून मीं अजिबात गाळून टाकला. सारांश, कथासूत्र रुपेरी पडद्यावर जास्त गतिमान, सुसंगत आणि सुसंघटित व्हावें म्हणून किरकोळ पण आवश्यक असे कित्येक बदल मीं केले.

रंगभूमि आणि रुपेरी पडदा ह्यांमध्यें मूलभूत तफावत किती असतें, हें ज्याला ताडून पाहावयाचें असेल त्याला ' वसंतसेना ' ही एक उत्कृष्ट कसोटी ठरेल. रंग-भूमीच्या मर्यादित सामर्थ्यामुळें नाटकामधलीं कित्येक दृश्यें वास्तववादी आणि परि-णामकारक स्वरूपांत दर्शविणें सर्वस्वी अशक्य असतें ह्याचा प्रत्यय हा बोलपट पाहत असतांना पावलोपावलीं येईल.

उदाहरणार्थ, ह्या बोलपटांतलें पहिलेंच दृश्य कामदेव मंदिरामधील वसंतोत्सवाचें दाखविलेलें आहे. ह्या उत्सवांतच चारुदत्त वसंतसेनेवर मोहित झाला. मूळ नाटकांत हें नुसतें शब्दांनीं सांगितलेलें आहे. पण माझ्या बोलपटाचा हा देखावा मीं केवढ्या भव्य आणि अद्‌भुत रीतीनें रंगविलेला आहे, त्याचें माझ्या चित्रकथेमधील निदान वर्णन तरी येथें देण्यासारखें आहे :

उज्जैनी नगराबाहेरील भगवान् कामदेवाचें मंदिर. कामदेवाच्या प्रतिवर्षी भरणाऱ्या उत्सवाचा तो दिवस आहे. भगवान् कामदेव म्हणजे विलासी तरुण स्त्रीपुरुषांचें अधिदैवत. त्यामुळें मंदिराच्या सभामंडपांत आणि आवारांतील उद्यानांत

तरुण भक्तजनांची गर्दी उसळलेली आहे. सर्वांनीं गळ्यांत, अंगावर, डोक्यांवर फुलांचा शृंगार केलेला आहे. कपाळावर, तळहातावर आणि पायावर केशराच्या आणि चंदनाच्या उट्या लावलेल्या आहेत. मंदिरांतील कामदेवाची मूर्ति फुलांनीं आणि सुवर्णालंकारांनीं शृंगारलेली असून बाजूला मोठमोठे नंदादीप तेवत आहेत. भगवान् कामदेवाच्या पराक्रमाचीं आणि सामर्थ्याचीं स्तवनें म्हणत स्त्रीपुरुष इतस्ततः आनंदानें नाचत आहेत. कोणी लताकुंजामधून एकमेकांचा पाठलाग करीत आहेत. तर कोणी कमलपुष्पांनीं विभूषित असलेल्या पुष्करणींत पाय सोडून बसलेले आहेत. एवंच, चहूंकडे गायनाचा आनंदी जयघोष आणि पैंजणांचा मंजुळ झंकार यावांचून कांहींच ऐकूं येत नाहीं. कांहीं तरुण–तरुणी प्रत्यक्ष उत्सवामध्यें वा नृत्यामध्यें भाग न घेतां, मंदिराच्या निरनिराळ्या भागांत निवांतपणें बसून तो सारा नृत्यसोहळा पाहत आहेत.

**एक पूजक :** भगवान् कामदेवा, आपल्या कुसुमबाणांनीं अखिल जगाला जिंकणाऱ्या हे मदना, चराचर सृष्टीला मोहित करणाऱ्या हे प्रीतीच्या परमेश्वरा, आज सारी उज्जैनी नगरी तुझ्या जयजयकारांनीं धुंद झालेली आहे. या तुझ्या तरुण भक्तजनांना तुझ्या आशीर्वादानें सदैव धन्य कर.

कामदेवाचें जयगीत सुरू होतें.

**जय मदना, रतिरमणा**
**तरुण जनांचा तूंच राणा।**
**फुलविसि झुलविसि तूं जिवांना !**
**सोड फुलांचे**
**गोड गोड बाण**
**छेड छेड प्राण,**
**जिंक जिवांना !**
**नव रमणींच्या तूं नयनीं, कां लपसी ?**
**प्रिय रमणांच्या करपाशीं, कां दडसी ?**
**युवयुवतींच्या तूं अधरीं, थरथरसी ?**
**चुंबनप्याले रसरसले**
**पिऊनि तुझे हें जग जगलें !**
**मरणाचें भय नच तरुणा !**

नृत्य चालू असतां गोपालपुत्र आर्यक आणि शर्विलक गुप्त वेषांत येऊन उभे राहतात.

**दुसरा पूजक :** वसंतसेना, वसंतसेना, या उज्जैनीची नर्तकी, लावण्यलतिका वसंतसेना, आज भगवान् कामदेवाच्या उत्सवांत नाचून आपल्या नृत्यकलेची पताका प्रथमच फडकावणार आहे.

मंदिरांतील सर्व लोक ' वसंतसेना – वसंतसेना ' म्हणत सभा–मंडपांत धांवतात. वाद्यांचे सूर पुन्हां उसळतात. पैंजणांचा झंकार निनादूं लागतो. आणि वसंतसेना कामदेवाच्या मूर्तीपुढें नृत्य करीत आहे असें दृश्य दिसतें. नृत्य सुरू झाल्याबरोबर आर्य चारुदत्त मंदिरांतील एका कोरीव खांबाजवळ येऊन उभा राहतो. त्याच्या कमरेला–मंत्रिपदाचें चिन्ह म्हणून खड्ग व डोक्याला सोन्याचा अर्धकिरीट आहे.

वसंतसेनेच्या सौंदर्याची ख्याति सबंध उज्जैनी नगरामध्यें आधींच पसरलेली असते. आजपर्यंत तिला प्रत्यक्ष अशी कोणींच पाहिलेली नसते. कामदेवाच्या या उत्सवांत नृत्य करण्यासाठीं प्रथमच ती आलेली असते. म्हणून तिचें नृत्य बघण्यास तरुण स्त्री-पुरुषांची गर्दी उसळलेली असते. जो तो तिचें नृत्य अपक्ष्य लोच नांनीं पहात असतो.

आर्य चारुदत्त तर रसिकतेचा मूर्तिमान सागरच. नृत्य, संगीत अन् सौंदर्य यांचा तो वेडा. वसंतसेनेचें सौंदर्य नि चेतोहर हास्य बघून प्रथमदर्शनीच तो तिच्यावर मोहित होतो. वसंतसेना कामदेवासमोर नृत्याच्या निरनिराळ्या मुद्रा करीत आणि गिरक्या घेत अन् नाचत नाचत मंडपाच्या मध्यभागीं येते, तों अचानक चारुदत्ताची मूर्ति तिच्या दृष्टीस पडते. तिला तर तो साक्षात् भगवान कामदेवच वाटतो. ' हा कामदेव का तो कामदेव ? ' असा तिला क्षणैक संभ्रम पडतो. तत्क्षणीं ती भान विसरते आणि चारुदत्ताला ' कामदेव ' समजून ती त्याच्यापुढें नाचूं लागते.

चारुदत्त तिच्याकडे मोहित दृष्टीनें पाहूं लागतो. सभामंडपांतील तरुण स्त्रीपुरुष एकमेकांकडे पाहून नुसतें स्मित करतात. वसंतसेनेची आई रंभा मोठ्या अभिमानानें तिचा नाच पहात असते. लोक वसंतसेनेवर खूष आहेत हें बघून तिला स्वर्ग दोन बोटें रहातो. वसंतसेना क्षणमात्रानें भानावर येते. तशी ती एकदम गिरक्या मारून कामदेवाच्या मूर्तीकडे वळते. नृत्य संपत येतें. वाद्यांचे स्वर चढूं लागतात. शेवटची गिरकी घेऊन धुंद स्थितींत वसंतसेना कामदेवाच्या मूर्तीसमोर अवनत होते.

तोंच रस्त्यावर दवंडीची झांजट वाजते.

**राजदूत :** पौरजनहो, ऐका हो ऐका, पालक राजाचा शत्रू जो गोपालपुत्र आर्यक त्याला गुप्त साहाय्य करीत असल्याच्या संशयावरून पालक महाराजांनीं आर्य चारुदत्त यांना मंत्रिपदावरून दूर केलें असून, त्यांचें घरदार, संपत्ति सर्व कांहीं हिरावून घेण्याची महाराजांनीं आज्ञा केली आहे हो !

हा सर्व प्रसंग वाचतांना जितका नाट्यपूर्ण आणि रोमहर्षक वाटतो, त्यापेक्षांहि अधिक प्रभावी रीतीनें तो रुपेरी पडद्यावर चित्रित केला आहे. ह्या चित्रणासाठीं शिवडीच्या ' मिनर्व्हा स्टुडिओ ' मध्यें कामदेव मंदिराचा एक प्रचंड देखावा उभारण्यांत आला होता. जवळजवळ तीनशें नृत्यकुशल स्त्री–पुरुषांनीं त्या दृश्यांत भाग घेतला होता. रुपेरी पडद्यावर अवघ्या पंधरा मिनिटें चालणाऱ्या ह्या दृश्याचें चित्रण

सतत चार आठवडे चाललें होतें. तें चित्रण पहाण्यासाठीं रोजच्या रोज शेंकडों लोक 'मिनर्व्हा स्टुडिओ'त येत असत. हें सर्व सांगायचें कारण हें कीं अशा तऱ्हेचें दृश्य रंगभूमीवर दिसणें सर्वस्वी अशक्य आहे.

ह्या नाटकांतलीं माझीं सारीं गाणीं म्हणजे काव्यमय शब्दांचीं नि भावनेचीं जिवंत कारंजींच जणुं होत. चारुदत्त आणि वसंतसेना ह्यांनीं एकमेकांना पाहिल्यानंतर त्यांच्या मनाची जी व्याकुळ स्थिति झाली ती पुढील गाण्यांत व्यक्त केलेली आहे :

**चारुदत्त :**

रुमझुम नाचे बाला,
लावण्याची लीला !
जसा फुलांचा मेळा, डोले फुललेला
नील नभीं कीं नक्षत्रांचा हाले हिंदोळा !
सौंदर्याचा झुलतो झेला
थयथय नाचे कीं स्वरमाला !

**वसंतसेना :**

हांसत हांसत हा मुरलीवाला
अवचित आला कुठून अलबेला !
शृंगाराचा छेलछबेला,
भुलवी भोळी राधाबाला !
श्यामल बन्सीवाला !

**चारुदत्त :**

चंद्र सखीसह गगनीं आला,
कुठें शोधुं माझी, शीतल चंद्रकला ?

**वसंतसेना :**

रूपसुधेचा भरला प्याला
अहा, बहरली यौवनमाला !
जीव भेटिला वेडा झाला,
प्रेम एक आधार जिवाला !

आकाशांत पूर्णचंद्र उगवलेला असताना, चारुदत्त वसंतसेनेला पोहोंचविण्यासाठीं तिच्या घराकडे चाललेला आहे. चारुदत्ताचें हृदय वसंतसेनेवरील प्रेमामुळें उचंबळतें आहे. वसंतसेनाहि आनंदाच्या सागरांत पोहत आहे. हें या चित्रपटांतील शृंगाराचें जणुं कांहीं पताकास्थानच होय. चंद्रोदयाच्या या सुरम्यप्रसंगीं कोणत्या जातिवंत कवीची प्रतिभा स्फुरण पावणार नाहीं बरें ? चंद्रोदयाच्या या सुरम्य प्रसंगाचें 'मृच्छकटिक' नाटकांत शूद्रकानें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :

उदयति हि शशाङ्कः कामिनीगण्ड-पाण्डु-
ग्रहगण परिवारो राजमार्ग-प्रदीपः
तिमिर-निकरमध्ये रश्मयो यस्य गौराः
स्रुतजल इव पङ्के क्षीरधारा पतन्ति ॥

शूद्रकाच्या या काव्याचा श्लोकबद्ध अनुवाद परशुरामपंत गोडबोल्यांनीं पुढील प्रमाणें केलेला आहे.

हा चंद्रमा उगवला गगनप्रदीप
आहेत शुक्र गुरु मंगळ ज्यासमीप,
ज्याचा करव्रज पडे तिमिरांत सारा
पंकांत जेवि पडती शुचि दुग्धधारा !

शूद्रकाच्या मूळ श्लोकाचा पंतांनीं हा जवळ जवळ शब्दशः अनुवाद केला आहे. गोविंदराव देवलांनीं आपल्या ‘ संगीत मृच्छकटिक ’ नाटकांत तोच प्रयत्न पद्यरूपानें केलेला आहे.

रजनिनाथ हा नभीं उगवला,
राजपथीं जणुं दीपचि गमला !
नवयुवतींच्या निटिलासम किति,
विमल दिसे हा ग्रहगण भोंवतिं;
शुभ्रकिरण घन तिमिरीं पडती,
पंकीं जेवि पयाच्या धारा !

शूद्रकानें आपल्या मूळ श्लोकांत जी एकच कल्पना मांडली आहे, तिचाच कमी अधिक शब्दांत अनुवाद करण्यापलीकडे गोडबोले आणि देवल ह्यांच्या प्रतिभेची मजल गेलेली नाहीं. चंद्रोदयाच्या आल्हादकारक प्रसंगाचें रोमांचकारी वर्णन करण्यासाठीं आपल्या प्रतिभेचें जास्तींत जास्त सामर्थ्य त्या दोघांनीं खर्च करावयाला हवें होतें. पण ‘ वसंतसेना ’ बोलपटांत जेव्हां हाच चंद्रोदयाचा प्रसंग वर्णन करण्याचा प्रश्न माझ्यापुढें आला, तेव्हां चंद्रोदयाचें सौंदर्य, वैभव, आल्हाद आणि उन्माद ह्या साऱ्या अनुभवांचा प्रत्यक्ष प्रत्यय प्रेक्षकांना मिळावा म्हणून काव्यमय कल्पनांचें आणि उत्प्रेक्षांचें सारें भांडारच मला त्या काव्यांत ओतावें लागलें.

**चारुदत्त :**
हा उदयाला नभिं चंद्रमा आला !
कुणि हा रजतरसाचा प्याला ओतला !
शुभ्र उधळला चुरा फुलांचा,
तुषार पाऊस झरे दुधाचा

**वसंतसेना :**
मोत्यांचा हा उडे हजारा,
दिशादिशांतुन अमृतधारा,
नाथ निशेचा, नक्षत्रांचा
हांसत हा आला !

**चारुदत्त :**
प्रणयि जनांचा त्राता पातला !
महापूर हा पहा लोटला
प्रेमसागराला !

**वसंतसेना :**
जळांत फुलला
चंद्रविकासी
कमळांचा मेळा !

**चारुदत्त :**
प्रीतिरसानें जो तो रंगला !
चकोर नाचति पहा प्रेमवेडे

**वसंतसेना :**
चंद्रकांत मणि
पाझरती तिकडे

**चारुदत्त :**
नाचति तारा--

**वसंतसेना :**
सैरावैरा-

**चारुदत्त :**
नाचतसे वारा--

**दोघे :**
जीव जिवाला-आतां भेटला !

प्रत्येक ओळींत नवा नवा कल्पनेचें सुंदर लेणें चढवून चंद्रोदयाच्या चढत्या वैभवाचें बहारदार वर्णन करण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे ह्या काव्याची प्रशंसा त्या वेळच्या एका समीक्षकानें करतांना असें म्हटलें होतें कीं, "चढत्या उपमांच्या मनोहर मांडणीमुळें आचार्य अत्र्यांचें हें चंद्रोदय-गीत केवळ 'वसंतसेना' बोलपटांतच नव्हे, तर मराठी काव्यप्रांगणांतहि आपल्या सतेज सौंदर्यानें तळपत राहील यांत तिळमात्र शंका नाहीं !"

पर्जन्याच्या सरीवर सरी डोक्यावर कोसळत असतांना आणि झंझावाती वादळानें आजूबाजूचे वृक्ष उन्मळत असतांना चारुदत्त आणि वसंतसेना ह्यांची भेट होते, हा चित्रपटांतील देखावा म्हणजे कथाबिंदूचा परमोच्च कळस होय. चारुदत्त–वसंतसेना ह्यांच्या प्रणयाची ती परमावधि आहे. 'वसंतसेनें'त हा देखावा किती विलक्षण परिणामकारकतेनें आणि वास्तवतेनें घेतलेला आहे हें प्रत्यक्षच पाहिलें म्हणजे कळेल.

मूळ 'मृच्छकटिक' नाटकांतील हा अद्भुतरम्य नि काव्यमय प्रसंग रंगभूमी-पेक्षां रुपेरी पडद्यावरच जास्त परिणामकारक वठतो. नाटकांत चार दोन मिनिटें वरून पाण्याच्या धारा सोडल्या नि वसंतसेनेचें वस्त्र थोडेंसें ओलें झालें म्हणजे तेवढ्या तुटपुंज्या दर्शनावर पूर्वीचे आंबटशोकी रसिक बेहद्द खूष होत असत.

चारुदत्ताच्या वधयात्रेचा आणि वधस्तंभाशेजारचा प्रचंड देखावा पाहून प्रेक्षक थक्क होतील. त्यामध्यें कमींत कमी दोन ते तीन हजार लोकांनीं भाग घेतला. तेवढ्या-साठीं आम्हीं कोल्हापूरजवळच्या पीरवाडी या गांवीं गेलों. चारुदत्ताच्या वध-यात्रेचें स्वरूप जास्तींत जास्त भीषण दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उज्जैनीचे हजारों नागरिक कसे प्रक्षुब्ध झाले आहेत, राजाचे दूत त्यांच्या अंगावर घोडे घालून त्यांच्या त्वेषाच्या लाटा कशा थोपवितात, एवढ्या गर्दीतून बुद्धभिक्षु वसंतसेनेला आंतपर्यंत कसें आणतात, शिरच्छेदाच्या ऐनवेळीं चारुदत्त आणि वसंतसेनेची भेट कशी होते, यांचीं रोमहर्षक आणि प्रक्षोभक दृश्यें पडद्यावर पहातांना प्रेक्षकांच्या वृत्ति स्तंभित झाल्याविना रहाणार नाहींत.

क्रौर्य आणि विनोद ह्यांचें चमत्कारिक मिश्रण करून हास्यकारक खलपुरुष म्हणून शकार हा जगाच्या वाङ्मयांतील एक अद्वितीय नमुना शूद्रकानें या नाटकांत निर्माण केलेला आहे. चारुदत्त आणि वसंतसेना यांच्या नाट्यकथेंत शकाराचा भागहि तितकाच मोठा आहे ही गोष्ट नाटक पहात असतां कळून येत नाहीं. पण तो शोध मला बोलपटाचें चित्रण घेत असतांना लागला.

शकाराच्या विनोदाची एकंदर जातच निराळी आहे. कुत्र्याचे पाय मांजराला जोडण्यांत आणि उपमा नि उपमेय ह्यांची वाटेल तशी गल्लत करण्यांत त्याचा हात कोणी धरणार नाहीं. 'रावणाला पाहून कुंती जशी घाबरली किंवा रामाला पाहून द्रौपदी जशी पळाली', 'अथवा कोंबड्याला पाहून लांडोर जशी पळून जाते' किंवा 'उंदराला बघून मांजर जसें पळून जातें', हे शकाराच्या विनोदाचे वैशिष्ट्यपूर्ण नमुने होत.

जो ज्याचा गुण आहे तो त्याचा दोष मानणें हें शकारी विनोदाचें वैशिष्ट्य आहे. त्या दृष्टीनें त्याच्या तोंडीं घातलेलीं पुढील वाक्यें मासलेवाईक वाटतील. बागेच्या सौंदर्याचें वर्णन करतांना शकार म्हणतो, "किती सुंदर आहे बाग ही! फुलांची घाण किती छान सुटली आहे! चिडलेल्या माकडाशारखा सूर्य किती तांबडालाल दिसतो आहे.

अरे, या कारंजाला भोंक पडून पाणी बघ कशं शांडतं आहे! झाडांवरचीं पांखरं बघून माझ्या तोंडाला पाणी शुटलं आहे कशं! अहाहा, आतां मला गाणं म्हणावंशं वाटं लागलं आहे—"

मूळच्या ' मृच्छकटिकां 'त शकाराला गाणें नाहीं. पण तें मीं त्याला शोभेल अशा भाषेंत रचून घातलें आहे :

**वशंतशेना शाशी माझी —**
**शौंदर्याची गोणी !**
**कामाची ती कुंची—माझ्या**
**प्रेमाची ती चंची !**
**लावण्याची लोटी—माझ्या**
**शृंगाराची पेटी,**
**नाकाची ती चपटी झाळी —**
**माशे खाऊन कपटी !**

राजा शूद्रकाचें ' मृच्छकटिक ' नाटक हा संस्कृत वाङ्मयांतील कोहिनूर आहे. त्याचें देदीप्यमान सौंदर्य चिरंतन आहे. त्या नाटकावर कोणी कितीहि उत्कृष्ट बोलपट निर्माण केला, म्हणून त्यामुळें मूळ वाङ्मयकृतीचें सौंदर्य कांहीं वाढणार नाहीं हें खचित. पण मूळ नाटकाचें सौंदर्य किती दिव्य आणि भव्य आहे ही गोष्ट चित्रपटाच्या माध्यमांतून जगापुढें प्रदर्शित करतांना मला जो त्या वेळीं आनंद आणि समाधान झालें, त्याचें वर्णन मी शब्दांनीं काय करूं?

## १९

## वसंतसेना — ३

त्या वेळीं मी लेखक असून साहित्यांत नव्हतों. नाटककार असून मी रंगभूमीवर नव्हतों. साप्ताहिकाचा संपादक असून मी वृत्तपत्रांत नव्हतों. त्या वेळीं चित्रपटांच्या जगांत मी आकंठ बुडून गेलों होतों. 'वसंतसेना' ह्या चित्रपटावर मी सावकाराकडून काढलेलें आठ लाख रुपये कर्ज पणाला लावलें होतें. माझ्या जीवन-मरणाचा तो प्रश्न होता. 'मिळालें तर राज्य, बुडालों तर स्वर्ग!' 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्। जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' अशी त्या वेळीं माझी प्रतिज्ञा होती.

'वसंतसेना' चित्रपट भारतांत पराकाष्ठेचा यशस्वी व्हावा म्हणून माझ्या अंगांत जेवढें सामर्थ्य होतें, तेवढें सारें मीं पणाला लावलें. 'पायाची दासी' ह्या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानें महाराष्ट्राच्या चित्रपटव्यवसायांत नि चित्रपटप्रेमी जनतेंत मी यशस्वी चित्रपटनिर्माता नि चित्रकथा-लेखक म्हणून सुप्रतिष्ठित झालों होतों. त्या 'पायाच्या दासी'च्या यशावर मी बारा लाखांचे तीन चित्रपट सुरू केले होते. दोन लाखांचा 'राजाराणी' हा चित्रपट;

आठ लाखांचा ‘ वसंतसेना ’ नि दोन लाखांचा ‘ तसवीर ’ हा चित्रपट.

‘ तसवीर ’ हा चित्रपट गोविंद बल्लाळ देवलांच्या ‘ संशयकल्लोळ ’ नाटकावर आधारलेला होता. त्याचें दिग्दर्शन नझम लकवी ह्यांच्याकडे मीं पुन्हां सोंपविलें होतें. त्यामध्यें ‘ फाल्गुनरावा ’ च्या कामासाठीं डेव्हिड, कृत्तिकेच्या भूमिकेसाठीं दुर्गा खोटे आणि अश्विनशेटच्या भूमिकेसाठीं मोतीलाल ह्यांची मीं निवड केली. ‘ चित्रमंदिरां ’ त ‘ वसंतसेने ’ चें काम चालूं होतें. तेव्हां ‘ तसवीर ’ साठीं मला ताडदेवच्या ‘ सेंट्रल स्टुडिओ ’ मधलें एक कलागृह भाड्यानें घ्यावें लागलें.

‘ वसंतसेनें ’ चें चित्रण मीं २९ सप्टेंबर १९४१ पासून सुरू केलें होतें. केवळ सहा महिन्यांच्या आंत ह्या बोलपटाचें चित्रण पूर्ण करण्याची आमची योजना होती. पण चित्रपटनिर्मिति म्हणजे मारुतीचें शेपूट होय. तें एकसारखें लांबतच जातें. निर्मात्यानें कितीहि निश्चयानें नि निर्धारानें आपला चित्रपट एका ठराविक मुदतींत आणि मर्यादेंत पूर्ण करण्याची भीष्मप्रतिज्ञा केली, तरी ती कधींहि शेवटास जाऊं शकत नाहीं.

कारण, निर्मात्याच्या भोंवतीं दिग्दर्शक, छायालेखक, ध्वनिमुद्रक आणि कला-दिग्दर्शक ह्या पापग्रहांचें विषारी वेटोळें पडलेलें असतें. कोणतीहि गोष्ट ठराविक मुदतींत मुळीं पूर्ण करावयाचीच नाहीं, अशी ह्या चार चांडाळांनीं नेहेमीच प्रतिज्ञा केलेली असते.

थोडक्या मुदतींत चित्रपट पूर्ण करण्यांत ह्या चांडाळचौकडीचा तोटा असतो. म्हणून जास्तींत जास्त चित्रपट लांबवण्यांतच ह्यांचा खरा फायदा असतो. तेवढ्यासाठीं चित्रपट-निर्मितीच्या कार्यांत जास्तींत जास्त अडथळे कसे निर्माण करतां येतील, ह्या एकाच गोष्टीची ह्या बदमाषांना रात्रंदिवस विवंचना लागून राहिलेली असते. मग त्यामध्यें बिचारा चित्रपट-निर्माता सपशेल गारद झाला तरी त्याचें ह्या लोकांना सोयरसुतक नसतें.

दिग्दर्शक, छायालेखक नि ध्वनिमुद्रक ही एक टोळीच असते. एका चार किंवा पांच मिनिटांच्या दृश्याची ‘ दिवेलागण ’ ( Lighting ) करण्यासाठीं दिग्दर्शक नि छायालेखक सारा दिवस खर्ची टाकतात. अशा वेळी निर्मात्यानें काय शंख करावयाचा ? त्यानंतर मग ध्वनिमुद्रकाची चावट दिरंगाई सुरू होते. तिला कांहीं अंतच नसतो. एकादे वेळीं ह्या त्रिकुटाला वाटलें कीं ‘ आज चित्रण करावयाचेंच नाहीं, बसूं द्या शंख करीत त्या निर्मात्याला ’ तर कॅमेऱ्यांत एकादा भाग बिघडला असल्याचें छायालेखक किंवा ध्वनिमुद्रणांतला एकादा ‘ दिवा ’ (Bulb) ‘ फ्यूज ’ झाला असल्याचें ध्वनिलेखक बेधडक निर्मात्याला सांगतात.

त्याला स्वतःला त्या यंत्रांतली एक ‘ चूक ’ देखील समजत नाहीं. तो चित्रण तहकूब करून तथाकथित बिघडलेलीं हीं यंत्रें तीं दुरुस्त करणाऱ्या कंपन्यांकडे

पाठवून देतो. दिग्दर्शक, छायालेखक नि ध्वनिमुद्रक ह्यांचा नि त्या कंपन्यांचे मॅनेजर ह्यांचा आधींपासूनच गुप्त समझौता झालेला असतो. त्यामुळें तीं यंत्रें बिघडलेलीं जरी नसलीं तरी तीं दुरुस्त करण्याचें नाटक करून ह्या कंपन्या हजारों रुपयांचें बिल निर्मात्यावर आकारतात. त्यांतला कांहीं हिस्सा अर्थातच, दिग्दर्शक, छायालेखक अन् ध्वनिमुद्रक ह्यांना मिळतो हें सांगावयाला नकोच.

चित्रणाचें काम दिवसच्या दिवस तहकूब रहातें. चित्रपट-निर्मितीचा ठरलेला कार्यक्रम एकसारखा पुढें पुढें ढकलत जातो. आणि निर्मात्याचा गळा ह्या काना-पासून त्या कानापर्यंत सपशेल कापला जातो. त्याला सगळें कळतें, आणि सगळें समजतें. उघड्या डोळ्यांनीं आपला प्राण जातो आहे हें त्याला दिसतें. पण झाडावर चढणारा साप पाहून फांद्यावरच्या पांखरांची जी स्थिति होते, तशी त्याची स्थिति होते. सर्वांगाला अर्धांगवायू झाल्यासारखी त्याची अवस्था होते. येणाऱ्या संकटाच्या जबड्यांत असहायपणें तो खालीं ओढला जातो.

'वसंतसेना' चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळीं अक्षरशः माझी अशी स्थिति झाली. मूळ चित्रपट सहा महिन्यांच्या आंत पूर्ण व्हावयाची योजना होती. पण तो चित्रपट पूर्ण व्हावयाला तब्बल चौदा महिने लागले. आमच्या स्टुडिओचा दरमहा खर्च होता तीस हजार रुपये. म्हणजे सहा महिन्यांत हा चित्रपट पूर्ण झाला असता तर एकंदर निर्मितीचा खर्च एक लक्ष ऐंशी हजार रुपये झाला असता.

पण सदर चित्रपट पूर्ण व्हावयास ज्या अर्थी त्याला एकंदर चौदा महिने लागले, त्याअर्थी त्याच्या केवळ निर्मितीसाठीं एकंदर चार लक्ष वीस हजार रुपये खर्च झाले. त्याखेरीज नटनटींचे पगार, त्यांचे कपडे, दागदागिने, सेटिंग्ज नि प्रवास ह्यांच्यासाठीं जे पांचसहा लाख रुपये लागले ते निराळेच.

'वसंतसेना' चित्रपटाच्या नुसत्या कपड्यांसाठीं आम्ही दीड ते दोन लाख रुपये खर्च केले. मुख्य पात्रांसाठीं जे कपडे केले ते सारे रेशमाचे नि भरजरीचे. त्याखेरीज कामदेवाच्या महोत्सवामध्यें ज्या दोनशें तरुण स्त्री-पुरुषांनीं नृत्य केलें त्यांच्यासाठीं भारी भारी कापडाचे निरनिराळ्या नमुन्यांचे नि शिवणीचे कपडे शिवावे लागले.

त्यानंतर चारुदत्ताला वधस्तंभाकडे जेव्हां नेण्यांत येतें, तेव्हां उज्जैनी नग-राच्या राजमार्गावर कमींत कमी दोन ते तीन हजार लोकांचा जनसमुदाय आम्ही दाखविला होता. त्यांच्यासाठीं त्या काळांतल्या पद्धतीप्रमाणें आम्हांला कपड्यांचा जो डोंगर शिवावा लागला त्याला तर अंतच नव्हता!

प्राचीन काळामधील कथानकावर चित्र काढावयाचें म्हणजे नुसते चित्रविचित्र कपडे शिवून थोडेंच भागतें? कपड्यांबरोबर दागदागिने आलेच. त्या काळांत स्त्रियां-प्रमाणें पुरुषहि कंकणें, कंठे नि कर्णभूषणें घालीत होते. हे सर्व दागदागिने आम्ही

चांदीचे बनवून घेतले आणि शक्य तेथें त्यावर सोन्याचा मुलामा चढविला.

त्यानंतर खोट्या का होईना पण पाचूं, मोतीं, माणकें यांचाहि त्या जडजवाहिरांत समावेश करणें भाग होतें. ह्या सर्व भानगडींत कमींत कमी आमचे पन्नास हजार रुपये तरी खर्ची पडले. हें सर्व बारदान मुद्दाम तयार करण्यासाठीं मला शिंपी, सोनार, पटवेकरी ह्यांचें एक सैन्यचें सैन्य नेमावें लागलें. ह्या सर्व कामाचें नियंत्रण देखरेख श्रीमती वनमाला ह्यांच्याकडे होतें.

त्याप्रमाणें चित्रपटांतील निरनिराळ्या दृश्यांचीं 'सेटिंग्ज' उभारण्यासाठीं सुतार, रंगारी, चित्रकार, शिल्पकार, मूर्तिकार, ह्यांचेंहि सैन्य महिनेच्या महिने रात्रं-दिवस आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून राहिलें होतें. चित्रपटाच्या निर्मितीसाठीं जसे एकामागून एक महिने जाऊं लागले, तसतसा खर्चाचा डोंगर एकसारखा झपाट्यानें वाढूं लागला. आणि त्याच्या भयानक भाराखालीं माझा चक्काचूर होतो आहे किंवा काय असें मला एकसारखें भय वाटूं लागलें.

ह्याच सुमारास दुसऱ्या महायुद्धांत दोस्तांची पीछेहाट होऊं लागली होती. आणि हिटलरनें जवळ जवळ निम्मा युरोप घशाखालीं घातला होता. ब्रिटिश सरकार प्राणांतिक संकटांत सांपडलेलें आहे हें ओळखून मुंबईच्या गोवालिया टँकवर भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत महात्मा गांधींनीं 'छोडो भारत'चें रणशिंग फुंकलें होतें.

त्याबरोबर वारुळांतून खवळून उठलेल्या एखाद्या नागाप्रमाणें भारतांतलें ब्रिटिश सरकार काँग्रेस नेत्यांवर तुटून पडलें आणि ९ ऑगस्ट १९४२ रोजीं सकाळीं मुंबईमध्यें महात्मा गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य कृपलानी, सरोजिनीदेवी नायडू, बाळा-साहेब खेर, मोरारजी देसाई इत्यादि चौपन्न काँग्रेस नेत्यांना अटक झाली.

त्यामुळें मुंबईतली परिस्थिति एकदम तंग झाली. भारत संरक्षण कायद्यान्वयें सार्वजनिक सभा-मिरवणुकी नि जमाव ह्यांजवर बंदी घालण्यांत आली. मुंबईमधल्य प्रक्षुब्ध जमावावर झालेल्या गोळीबारांत पहिल्याच दिवशीं दहा लोक मरण पावले. आणि शेंकडों लोक जखमी झाले. सर्व शहरभर हरताळ पडला.

शाळा-कॉलेजांतून विद्यार्थी बाहेर पडले. ट्रॅम, बसेस नि रेल्वे ह्यांची वाहतूक बंद पडली. शिवाजी पार्कवर महात्मा गांधी नि कस्तुरबा गांधी यांचीं भाषणें होणार होतीं. पण त्याआधींच त्यांना अटक करण्यांत आली. त्यामुळें शिवाजी पार्कला त्या दिवशीं एका रणमैदानाचें स्वरूप प्राप्त झालें होतें.

हें सगळें विस्तारानें सांगण्याचें कारण हें कीं, मुंबईमधल्या ह्या प्रक्षुब्ध वाता-वरणामुळें 'वसंतसेने'चें चित्रण कांहीं काळ स्थगित करावें लागलें. त्यामुळें नुकसानींत अधिकच भर पडली. एवढ्यांत जर्मन विमानांचा हल्ला मुंबई शहरावर होणार

असल्याच्या अफवा एकाएकीं उठल्या. त्या कशा उठल्या, कुणीं उठवल्या हें कांहीं आज सांगतां येणार नाहीं. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, मुंबईतले शेंकडों लोक विशेषतः गुजराती आणि मारवाडी आपलीं घरेंदारें मोडून आपल्या ' देशा 'कडे धांवत सुटले.

' वसंतसेने 'ला ज्यांनीं लाखों रुपयांचें आर्थिक साहाय्य केलें होतें, ते आमचे पार्शी सावकार मंचरजी बिलिमोरिया हे देखील घाबरले. ते मला म्हणाले, " मुंबई-तल्या तुमच्या स्टुडिओवर जर उद्यां बॉंब पडले, तर तुम्हीं आतांपर्यंत चित्रित केलेली सारी फिल्म नष्ट होईल आणि त्यामुळें माझें लाखों रुपयांचें नुकसान होईल! तेव्हां, तुम्ही मुंबईपासून लांब कुठें तरी पळा, आणि तिकडे तुमची ' वसंतसेना ' पुरी करा. "

सावकारानेंच हुकूम सोडल्यानंतर माझ्यासारख्या कर्जदार निर्मात्याला मुंबई सोडण्याखेरीज दुसरें काय गत्यंतर होतें? पुण्याला या वेळीं भाड्यानें स्टूडिओ मिळण्याची सोय नव्हती म्हणून मला कोल्हापूरला जावें लागलें. तेथें महिना दीड हजार रुपये भाड्यानें ' शालिनी स्टूडिओ ' मिळाला.

स्टूडिओ गांवाबाहेर होता. भोंवतालीं ऐसपैस परिसर होता. आमच्या कलावंतांना आणि नोकरांना राहण्यासाठीं सोयीस्कर जागाहि होती. तथापि, त्या स्टुडिओजवळ यंत्रसामग्री कांहींच नव्हती. विजेचे दिवेहि भरपूर नव्हते. म्हणून मुंबईहून कॅमेरे, ध्वनिमुद्रणयंत्र, दिवे, वल्व्स, इत्यादि आमची सर्व यंत्रसामग्री मोटरींतून भरभरून दोन सव्वादोनशें माणसांसहवर्तमान आम्हीं मुंबईहून स्थलान्तर केलें. त्यासाठीं आम्हांला किती खर्च आला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी.

सगळ्यांत मोठी अडचण त्या दिवसांत म्हणजे पेट्रोलची. दक्षिण महाराष्ट्रांत तर पेट्रोलचा सपशेल दुष्काळ होता. मुंबईत पेट्रोल भरपूर होतें. पण दर दसपटीनें भडकले होते. तरीहि तें महागडें पेट्रोल डबेच्या डबे भरून आम्हीं मुंबईहून मोटरीमधून कोल्हा-पूरला आणलें. तेथें घासलेटचे डबे खरेदी केले. तीन पेट्रोलच्या डब्यांत एक घासलेटचा डबा मिसळून पेट्रोलची अडचण कशीबशी निभावून नेली.

कोल्हापूरमध्यें आम्ही चारपांच महिने मोठ्या कष्टानें कसेबसे काढले. मुंबईच्या मानानें तेथें त्या वेळीं पुष्कळच स्वस्ताई होती. तेवढाच काय तो आम्हांला विरंगुळा होता. सकाळ-संध्याकाळ दोनशें माणसांच्या पंगती उठत. आठवड्यांतून दोन का तीन वेळां मांसाहारी भोजन असे. स्वयंपाकाचा तो एक निराळा कारखानाच होऊन बसला होता. माणसें जेवत होतीं. मोटरी पळत होत्या. स्टुडिओमध्यें डोळे दिपवणारीं सेटिंग्ज उभारलीं जात होतीं. सारांश, आमचा एकंदर साराच खाक्या संस्थानी स्वरूपाचा होता.

त्यामुळें कित्येकांचे तर डोळेच फिरले. त्यांना मोठा प्रश्न पडला कीं, ह्या अत्र्यानें कुठें दरवडे घालून इतके लाखों रुपये आणले आहेत कोणास ठाऊक?

खर्चाचा तर पुढें पुढें मला अदमासच राहिला नाहीं. जणु कांहीं त्या खर्चाचा मला खूनच चढला होता. त्यामुळें मीं माझ्या आणि चित्रपटाच्या भवितव्याचा विचार करावयाचें मुळीं सोडूनच दिलें. म्हटलें, काय व्हायचें असेल तें होऊं द्या.

चित्रपट–निर्माता आणि जुगारी ह्यांच्या मानसिक अवस्थेंत फारसा फरक नसतो. धर्मासारख्यानें जुगाराच्या धुंदींत तर आपली बायको अन् राज्य पणाला लावलें. तेवढ्या थरापर्यंत जाऊन मी पोहोंचलों नाहीं, एवढेंच मला समाधान होतें !

' वसंतसेने 'त कमळाच्या पाकळ्यांवरचें एक नृत्य मीं योजलेलें होतें. त्यांतील प्रत्येक पाकळी ही एकेका रागाची प्रतिनिधि होती. संगीत आणि नृत्य ह्यांचा तो एक अपूर्व मनोहर संगम होता. हें प्रचंड कमळ तयार करून घ्यावयास मला एक महिना लागला. त्यासाठीं वीस सुतार रात्रंदिवस कष्टत होते. त्यानंतर निरनिराळ्या रागांच्या मुद्रानृत्यांचीं चित्रें प्रत्येक पाकळीच्या मागें ठसेवाल्यांकडून आम्हीं बनवून घेतलीं.

हें कमलनृत्य पंधरा मिनिटें चालतें. त्याचें नृत्य मणिपुरी नृत्याचे महान प्रणेते पंडित नवकुमार ह्यांनीं दिग्दर्शित केलें होतें. आणि विविध रागांचें संगीत मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर ह्यांनीं दिलेलें होतें. नृत्य–संगीताची अशी मोहक नि मादक मेजवानी भारतीय रुपेरी सृष्टींत तोंपर्यंत तरी कोणी दिलेली नव्हती.

आठवड्यांतून मी तीन दिवस कोल्हापुरांत असे आणि चार दिवस मुंबईंत असे. अर्धा जीव उलटसुलट प्रवास करण्यांतच खर्च होई.

एकदां कंपनींतील नोकरांचा पगार करण्यासाठीं मी मुंबईहून कोल्हापुराला चाललों होतों. माझ्या कोटाच्या आंतल्या खिशांत एकेक हजाराच्या पंधरा नोटांचें एक बंडल होतें. पुणें ते कोल्हापूर प्रवासांत आगगाडीच्या फर्स्ट क्लासमध्यें मला वरचें ' बर्थ ' मिळालें होतें.

त्या दिवशीं संध्याकाळीं मुंबईहून निघतांना मी दुपारीं चर्चगेटवरील पुरोहिताच्या होटेलमध्यें जेवतांना दोन वाट्या बासुंदी खाल्ली. बासुंदी म्हणा किंवा दुधाचे कोणतेहि पदार्थ म्हणा–ते माझे दुष्मन् ! त्या संध्याकाळीं ' डेक्कन क्वीन 'मधून मी निघालों. पण ' फर्स्ट क्लास 'मध्यें न बसतां संडासांतच जाऊन जो बसलों, तें बोरीबंदरपासून ते तहत पुण्याच्या स्टेशनापर्यंत. यावरून बासुंदीने माझ्या शरीरांत काय हालकल्लोळ उडवला असेल याची कल्पना येईल.

पुण्याच्या स्टेशनावर उतरतांना माझ्या पायांत त्राण नव्हतें. तसाच कसाबसा मी उतरलों नि वर ' ब्रॅण्डन 'मध्यें गेलों अन् तीन चार पेग्ज ब्रॅण्डी सोडा घातल्यावांचून तशीच गटागटा प्यालों. आणि अवघ्या दहा मिनिटांत माझ्या अंगांत हत्तीचें बळ आलें.

रात्रौ गाडींत वरच्या बर्थवर जेव्हां मी अगदीं मुडद्यासारखा झोपलों, तेव्हां माझ्या खिशांतलें पंधरा हजारांचें बंडल केव्हां खालीं पडलें त्याची मला

शुद्धच नव्हती.

पण खालीं मला जाणणारे माझे एक मित्र श्री. आगटे झोपलेले होते. त्यांनीं तें बंडल उचलून सकाळीं मला परत दिलें.

आगटे म्हणाले, "काय अत्रे, पैसे फार झालेत वाटतें तुमच्याजवळ ?"

मी म्हणालों, "माझे पैसे नाहींत ते–सावकाराचे आहेत. माझे पैसे असते तर त्याबाबत मी असा निष्काळजी राहिलों नसतों. सावकाराचे पैसे आहेत म्हणून मी ह्याबद्दल एवढा बेपर्वा राहिलों !"

अशा नाना तऱ्हेच्या एकाहीपेक्षां एक भयंकर आपदांना नि संकटांना तोंड देऊन बेचाळीस सालच्या दसऱ्याला माझें 'वसंतसेना' हें चित्र मीं एकदांचें पुरें केलें.

## २०

# अखेर माझा चारुदत्त झाला

सतत चौदा महिन्यांच्या जगड्व्याळ परिश्रमांनीं आणि आठ लाख रुपये खर्चून मी निर्माण केलेलें 'वसंतसेना' हें चित्र अखेर शुक्रवार ३० ऑक्टोबर १९४२ रोजीं म्हणजे ऐन दिवाळीच्या दिवसांत नॉव्हेल्टी आणि एक्सेलसिअर अशा एका वेळीं मुंबईच्या दोन चित्रगृहांत झळकलें. त्याच दिवशीं तें नाशिक, पुणें, कोल्हापूर आणि सोलापूर येथेंहि प्रकाशित झालें. 'वसंतसेना'सारखा भारतीय संस्कृतीचें नि साहित्याचें उदात्तसुंदर चित्र दर्शवणारा चित्रपट 'नॉव्हेल्टी'सारख्या बकाल नि मवाली चित्रगृहांत दाखवण्याची मजवर पाळी यावी हें त्या चित्रपटाचें आणि त्याच्या निर्मात्याचें सर्वांत मोठें दुर्दैव होय. पण काय करणार?

त्या काळांत माझ्यासारख्या एका नव्या निर्मात्यानें एवढें देदीप्यमान चित्र काढावें, हें पाहून मुंबई शहरांतील अनेक निर्मात्यांच्या नि वितरकांच्या पोटांत असूयेचा भयंकर शूळ उपटला आणि त्यांनीं माझ्या विरुद्ध कारस्थान रचून मला मुंबईतलें चांगलें चित्रगृह मुळीं मिळूंच दिलें नाहीं. शेवटीं मला नाक मुठींत धरून नॉव्हेल्टीच्याच

दारीं जावें लागलें.

हिंदु-मुसलमानांच्या दंग्यामध्यें ग्रँट रोडचा तो भाग सर्वांत धोकेबाज समजला जाई. म्हणून रात्रीच्या वेळीं कोणीहि सभ्य स्त्रीपुरुष त्या मोहल्ल्यांत ढुंकून फिरकत नसत. त्यामुळें 'वसंतसेने'चे दुपारचे नि संध्याकाळचे खेळ जरी चांगले जात असत, तरी रात्रीचा खेळ सपशेल पडत असे. 'एक्सेलसिअर थिएटरां'त हिंदी आवृत्ति फक्त एकच आठवडा दाखविण्यांत आली.

सदर बोलपटाची लांबी पंधरा हजार फूट होती. हा चित्रपट रवींद्रनाथ टागोर ह्यांना अर्पण केलेला होता. रुपेरी पडद्यावर त्यांचें नांव झळकतांच प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करीत असत. आरंभापासून अखेरपर्यंत हा चित्रपट प्रेक्षकांचें अवधान एक-सारखें खेचून घेत असे. कारण 'वसंतसेना' म्हणजे नृत्य, संगीत, काव्य, नाट्य आणि विनोद या पंचपक्वान्नांची भरगच मेजवानीच होती.

वसंतसेनेमधील डोळे दिपवून टाकणारे एकापेक्षांहि एक प्रचंड नि भव्य देखावे पाहून प्रेक्षक बेहद्द खूष होत. त्या वेळच्या एका प्रख्यात वृत्तपत्रानें आपल्या अभि-प्रायांत म्हटलें कीं, "वसंतसेना हा बोलपट नसून तें रुपेरी पडद्यावरील एक स्वर्गीय स्वप्न आहे. हिमालयाची भव्यता, काश्मीरचें सौंदर्य नि ताजमहालची कलात्मकता यांचा त्रिवेणी सगम म्हणजे वसंतसेना." हिंदी चित्रपटाच्या धंद्याचा जणुं कांहीं उच्चांकच 'वसंतसेने'नें गांठला होता.

ह्या चित्रपटाच्या जाहिरातीसाठीं मी पाऊण लाख रुपये खर्चले. पहिल्या दिवशीं 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्यें संपूर्ण पानभर जाहिरात होती. आणि त्या पत्राच्या 'सचित्र साप्ताहिकां'त पहिल्या पानावर 'वसंतसेने'चें रंगीत चित्र आणि मागल्या सबंध पानावर त्या चित्रपटाची जाहिरात मीं दिलेली होती. कोणत्याहि बाबतींत कोठल्याहि दृष्टीनें मीं कशाचीहि कमतरता ठेवली नाहीं. मोठमोठ्या विद्वानांनीं आणि रसिकांनीं माझें मनसोक्त अभिनंदन केलें. अनेकांनीं आपले अभिप्राय लिहून कळविले.

माझे ज्येष्ठ बंधुतुल्य मित्र म. म. दत्तोपंत पोतदार ह्यांनीं पुण्याला चित्रपट पाहून लागलेंच मला पत्र धाडलें. "...बोलपट जाऊन पाहिला व ऐकला. पाहून आणि ऐकून चित्त संतुष्ट आणि प्रसन्न झालें. उत्तम नयनमनोहर आणि भव्य देखावे, 'त्रय-संगीतमुच्यते' म्हणून म्हणतात त्या गान-नृत्य-वाद्य या त्रिविभागात्मक संगीताचा उठावदार आविष्कार, शूद्रक कवीच्या अविस्मरणीय नाट्यकथेचें संस्मरणीय वेषांतर, मोहक प्रारंभ आणि उद्दीपक विराम यामुळें हा बोलपट म्हणजे आपल्या कला-कौशल्याचा एक परमोच्च परिपाकच उतरला आहे यांत मला संशय नाहीं. शूद्रक अमर होताच. परंतु तुमच्या बोलपटानें तुम्हीं त्याला त्रिवार अमर केला आहे.

"चित्रपटामुळें शूद्रकाच्या अमर कृतीचा नवीन आस्वाद घेण्याची संधि तुम्हीं आणून दिली आहे. हा तुमचा चित्रपट दीर्घकाळ लोकांना रंजवीत राहील आणि या

पटाची पकडहि बहुतकाळ रसिकांच्या मनावर दृढ बसून राहील यांत मला संदेह नाहीं. मी जात्या कांही कलाकोविद नाहीं. पण या वेळचा तुमचा कलाविष्कार विशेष प्रकारचा वाटला म्हणून भेटींत बोलावयाचें तें जरा आतुरतेनें पत्रानें कळविलें आहे. केव्हांतरी मूळ शूद्रक हातीं घेऊन आणि तुमची पटकथा सूक्ष्म रीतीनें व तुलनात्मक दृष्टीनें पाहून कांहीं सूक्ष्म फळ मिळवितां येईल. ”

या चित्रपटामधल्या निरनिराळ्या प्रसंगांना अनुरूप निरनिराळीं प्रतीकें वापरण्यांत आलीं होतीं. उदाहरणार्थ, शकाराच्या कपाळावर नागाचें जें चिन्ह रंगविलें होतें, तें त्याच्या विषारी स्वभावाचें द्योतक होतें. वसंतसेना जेव्हां नृत्य करते, त्याच वेळेस फक्त तिच्या भालप्रदेशावर दोन मयूर रंगविलेले होते. कारण नृत्य हा मोरांचा विशेष असल्यामुळें तें दर्शक चिन्हांत त्या ठिकाणीं व्यक्त होत होतें. वसंतसेना नि चारुदत्त जेव्हां प्रेमानुनय करतात, त्या वेळेस एकमेकांच्या चोंचीला चोंच भिडवणारे पांढरे हंस दाखविण्यांत आले होते.

चारुदत्तावरील वधाचा अभियोग ज्या न्यायाधीशाच्यासमोर चालतो त्याच्या कपाळावर त्रिशूळाचें चिन्ह रंगविलें होतें, तेंहि अर्थपूर्णच होतें. विकसित कमळाच्या सप्तरागरूप पाकळ्यांवर जेव्हां वसंतसेना चारुदत्ताला नृत्य करून दाखविते, तेव्हां त्या त्या रागांचीं जीं कोरीव चित्रें दाखविण्यांत आलीं होतीं, त्यांत शिल्पकलाकौशल्याची पराकाष्ठा झाली होती. अशा तऱ्हेचें विविधकलासौंदर्य ह्या चित्रपटाच्या अंगप्रत्यंगांत आकंठ भरलेलें होतें.

पुण्याचे त्या वेळचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि टीकाकार प्रा. श्रीकृष्ण क्षीरसागर ह्यांनीं आपल्या प्रदीर्घ अभिप्रायांत असें म्हटलें होतें कीं, “ त्या वेळीं समजदार समजल्या जाणाऱ्या कांहीं सुशिक्षित मंडळींतून या चित्रपटासंबंधीं कांहीं मासलेवाईक मतें ऐकू आलीं. एवढ्यांत माझ्या एका साधारण सुशिक्षित अशा व्यापारी स्नेह्यानें ह्या चित्रपटाविषयीं मला आपण होऊन आपलें मत सांगितलें, ‘ जे सुशिक्षित तुम्हांला कांहीं वेगळेच अभिप्राय सांगत आहेत, ते मूर्ख आहेत. वसंतसेना चित्रपट म्हणजे एका असामान्य बुद्धिमत्तेच्या माणसानें आपली सर्व करामत पणाला लावून तयार केलेली कृति आहे. ’

“ चित्रपट पाहिल्यानंतर सदरहू मित्राचें मत अक्षरशः खरें आहे असें माझ्या प्रत्ययाला आलें. चित्रपटाचें कथानक समकालीन नसून आणि प्राचीन वातावरण अत्यंत दक्षतेनें कायम ठेवलेलें असूनहि सर्व दर्जाचे प्रेक्षक कथानकांत आरंभापासून अखेरपर्यंत समरस होतात हें त्या भरगच्च भरलेल्या पण निस्तब्ध असलेल्या चित्रगृहांत कोणाच्याहि प्रत्ययाला आलें असतें. शेवटच्या दृश्यांत भव्यता, भीषणता व कारुण्य परिसीमेला पोहोंचलीं आहेत. प्रेक्षकांच्या भावना त्या वेळीं स्तब्धता सोडून श्राव्य होतात.

" चित्रपट हें माध्यम नाट्याच्या माध्यमाहून कित्येक बाबतींत अधिक प्रभावी आहे, हें माझ्या नास्तिक मनाला पटविणारा हा पहिलाच महाराष्ट्रीय चित्रपट आहे. ज्या चित्रपटांत' सेटिंग्ज 'कडे मी अभिनयाइतक्याच अथवा संगीताइतक्याच तन्मयतेनें पहात होतों, असाहि हा पहिलाच महाराष्ट्रीय चित्रपट होय असें सांगण्यास मला आनंद वाटतो. कारण त्याबाबतींत माझा पूर्वीचा अनुभव अगदीं विरुद्ध होता. या चित्रपटांतील अगदीं क्षुल्लक भूमिका करणारे नटनटी देखील वैशिष्ट्यपूर्ण व कर्तबगार आहेत. मुख्य नटी वनमाला यांचें काम अत्यंत उच्च दर्जाचें वठलें आहे.

" कथानकाच्या नवसंस्करणाचे बाबतींत प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. त्यांत लेखकानें कल्पकतेइतकाच संयमहि दाखविला आहे. त्यानें जेवढी कल्पकता दाखवली आहे त्याच्या चतुर्थांश कल्पकता असणारानेंहि मूळचीं सौंदर्यस्थळें गुंडाळून ठेवण्याचा मोह टाळला नसता. एक प्राचीन व प्रख्यात नाट्यकथा कलात्मकतेनें हाताळण्यांत व संस्कारण्यांत असामान्य प्रतिभा दाखविली गेली आहे. तिजबद्दल निर्मात्याचा सर्वत्र गौरव होईल यांत मला शंका नाहीं. "

आपल्या रसिक, मार्मिक आणि निर्भीड वक्तृत्वानें ज्यांनीं त्या काळांत सारा महाराष्ट्र दणाणून टाकला होता ते महाराष्ट्रांतले ख्यातनाम टीकाकार प्रा. माधव दामोदर अळतेकर हे तर माझ्या ज्येष्ठ बंधूसमान माझे सुहृद् होते, ' वसंतसेना ' चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळीं मी ज्या अग्निदिव्यांतून गेलों त्याची त्यांना प्रत्यक्षच माहिती होती. तेव्हां त्यांनीं ह्या चित्रपटाच्या निर्मितीची व्यावहारिक नि वास्तववादी पार्श्वभूमि ध्यानांत घेऊन त्याचें अत्यंत हृदयंगम समीक्षण करण्यासाठीं जो एक हृदयद्रावक लेख लिहिला, त्यांतला थोडासा भाग विस्तारानें येथें देतों.

या त्यांच्या लेखाचें नांव होतें ' शृंगाररसाचें विशुद्ध आणि नितांत सुंदर स्वरूप दाखवणारा बोलपट — वसंतसेना '. आणि त्याच्या शीर्षकावर त्यांनीं पुढील संस्कृत सुभाषित दिलेलें होतें.

मदुक्तिश्चेदंतर्मदयति सुधीभूय सुधियः
किमस्यानामस्यादरस पुरुषा नादरभरैः ।
यथा यूनस्तद्वत्परमरमणीयापि रमणी
कुमाराणामंतःकरणहरणं नैव कुरुते ॥

त्या लेखांत त्यांनीं पुढील उद्गार काढले :

" चित्रपट-निर्मिति हा भांडवलवाल्यांचा अर्थ निर्माण करण्याचा धंदा झाल्यामुळें त्यांत कथानिर्माता किंवा नटनटी यांजपेक्षां भांडवल पुरवणारा व त्याचे साथीदार यांचें प्रस्थ साहजिकपणें फार माजलेलें आहे. एकादा गरीब कथालेखक स्वतःच्या जोरावर हा धंदा करूं शकेल ही गोष्ट अशक्यतेच्या कोटींतली होती. पण अत्रे यांच्या अंगांत रग व धडाडी विशेष असल्यामुळें त्यांनीं शिक्षणाच्या क्षेत्रांतून सवड

मिळेल तेव्हा करमणूक म्हणून चालविलेल्या या क्षेत्रांत मालकी हक्कानें प्रविष्ट होण्याचें ठरविलें. वास्तविक, महाराष्ट्रीयांनीं या धडाडीचें कौतुक करावयास पाहिजे होतें. त्यातल्या त्यांत ज्यांचा लेखन हा व्यवसाय आहे, त्यांनीं तर अत्र्यांच्या साहसाचें अभिनंदन करावयास कांहींच हरकत नव्हती. परंतु ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांना दरिद्री-मग ते कितीहि गुणवान् असेनात-माणसांना पैसे मिळविण्याच्या क्षेत्रांत—म्हणजे जेथें हे श्रीमान् लोक पैसे मिळवितात तेथें येणें आवडत नाहीं.

"पायाची दासी बोलपटाच्या यशानें आपल्या व्यावसायिक प्रतिस्पर्ध्यांच्या डोळ्यांत अत्रे सलूं लागले. त्यानंतर राजा शूद्रकाचें 'मृच्छकटिक' हें विख्यात नाटक पटकथेंत ग्रथित करावयाचें त्यांनीं जेव्हा ठरविलें, तेव्हां तर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचा त्यांच्याबद्दलचा द्वेष हळुहळूं बळावत गेला, आणि प्रेक्षकांना उत्कृष्ट कलेचा नमुना दाखविण्याच्या त्यांच्या या उच्च महत्त्वाकांक्षेबद्दल त्यांचें वास्तविक अभिनंदन करण्याचें तर दूरच राहिलें, पण त्यांचें जास्तींत जास्त आर्थिक नुकसान कसें होईल याचाच विचार त्यांच्या शत्रूंच्या डोक्यांत घोळूं लागला.

"वसंतसेना चित्रपट तयार झाल्यापासून ते सोईस्कर असें चित्रपटगृह मिळेपर्यंत अत्रे यांच्या मार्गांत कसकशा अडचणी आल्या व भांडवलाच्या गंजीवर बसलेल्या कुत्र्यांच्या कारवायांमुळें त्यांना किती संकटांशीं टक्कर द्यावी लागली याचा इतिहास कधीं प्रसिद्ध होईल तर तें एक कथानकच होईल. जवळ कपर्दिका नसलेल्या लेखकानें एवढें मोठें धाडस करून लाखों रुपये खर्चिले व शूद्रकाचें सुंदर नाटक चित्रपटांकित केलें, हीच गोष्ट महाराष्ट्राच्या इतिहासांत अपूर्व आहे.

"मृच्छकटिक हा संस्कृतमधला प्रथितयश नाट्यग्रंथ आहे. ज्या काळची कथा आहे, त्या काळची कल्पना चित्रपटांत पूर्णपणें आली पाहिजे व म्हणून त्या वेळची पोषाखाची, अलंकरणाची, वागण्याची वगैरे पद्धति त्यांत प्रत्ययाला आली पाहिजे. ज्यांना त्या काळची ही कल्पना आहे त्यांनाच ती चित्रपटांत कितपत उतरली आहे हें अजमावतां येईल. केवळ गंमत म्हणून चित्रपट पहाणाऱ्यांना तें फारसें कळण्याचाहि संभव नाहीं. मृच्छकटिक नाटकांतील 'वातावरण' चित्रकलेच्या सहाय्यानें या बोलपटांत फारच उत्कृष्टपणें आणून सोडलेलें आहे, हा त्यांतील पहिला मोठा गुण आहे. तसें व्हावें, म्हणून या बोलपटांत नेपथ्यरचनेला आणि देखाव्यांच्या मांडणीला अग्रस्थान द्यावें लागलें व तें देण्यासाठीं पैसा खर्च करतांना अत्रे ह्यांनीं मागेंपुढें पाहिलेलें नाहीं, हें उघड आहे.

"देखाव्यांची रचना करण्याच्या बाबतींत जशी कालशुद्धता या चित्रपटांत निर्मात्यानें प्रकट केलेली आहे, त्याचप्रमाणें त्याची भव्यता विलक्षण आश्चर्यकारक आहे. किंबहुना देखाव्यांच्या भव्यतेच्या दृष्टीनें या चित्रपटानें आजपर्यंतच्या या विशिष्ट बाबतींत विख्यात झालेल्या सर्व चित्रपटांवर स्वामित्व मिळविलेलें आहे, असें

म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. वसंतसेनेचें निवासमंदिर, कामदेवाचें मंदिर, जीर्ण पुष्पोद्यान, वर्षाकालसमय, न्यायसभा, शूलारोपण प्रसंग या सर्व देखाव्यांची भव्यता नुसती अपूर्व नाहीं, तर अत्यंत कौस्तुकास्पद आहे. हे देखावे निर्माण करणारा मनुष्य धंद्याचा दास नसून कलेचा मार्मिक रसिक आहे, हें लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं.

" देखाव्यांची कालशुद्धता आणि यथातथ्यता इतकी योग्य असल्यामुळें रागांचीं भिंतीवरील सुंदर व भावपूर्ण चित्रें आणि अशा चित्रांच्या समोर त्या रागांना प्रकट करणारें अत्युत्कृष्ट नृत्य हा देखावा म्हणजे चित्रपटकलेंतील एक अत्यंत कलापूर्ण असें दृश्य आहे. कित्येक चित्रपटांत कसलें नृत्य व कसलें गायन असतें याची आठवण झाली व नकली मालाचा खप अधिक होतो हें लक्षांत ठेवलें म्हणजे वसंतसेनेमध्यें प्रकट केलेल्या या आश्चर्यकारक गुणाचें चीज होईल कीं नाहीं यासंबधीं साशंकता उत्पन्न होते. पण अत्रे यांनीं केलेला प्रयत्न अत्यंत भव्य आहे याबद्दल मात्र विमत्य होण्याचें कारण नाहीं.

"या चित्रपटांतली आणखी अभिनंदनीय गोष्ट म्हणजे त्यांतील उच्च शृंगार होय. फाजीलपणा आणि वाष्कळपणा हे दोन ' गुण ' त्यांत यत्किंचितहि नाहींत. कदाचित् या सर्वोत्कृष्ट घटनेमुळें हा बोलपट फाजीलपणा व बाष्कळपणा पाहावयास सवकलेल्यांना आवडणार नाहीं व त्याचा भूर्दंड अत्र्यांना भरावा लागेल. पण शृंगाररसाचें सोज्वळ स्वरूप प्रेक्षकांपुढें ठेवून अत्रे यांनीं मोठी लोकसेवा केली आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

"शृंगाररसाची कित्येक नामवंत व प्रथितयश लेखकांनीं इतकी दाणादाण करून सोडलेली आहे कीं, त्याचें शुद्ध स्वरूप भव्य प्रकारें दाखवण्याचें अवघड व लोकांना चटदिशीं न पटणारें कार्य कोणी तरी करावयास पाहिजे होतें, तें या बोलपटाच्या द्वारें अत्रे यांनीं केलें आहे. बोलपटाच्या धंद्यांत शिरण्याचें त्यांचें धाडस जसें कौतुकास्पद आहे, तसेंच सध्यांच्या काळीं शृंगाराचें खरें उच्च स्वरूप दाखविण्याचें त्यांचें धाडसहि कौतुकास्पद आहे व यामुळें त्यांचा हा बोलपट निःसंशय उत्कृष्ट बोलपटांत बसतो हें स्पष्ट आहे.

" चारुदत्त व वसंतसेना यांचा शृंगार हें संस्कृत नाट्यवाङ्मयांतील एक अत्यंत रमणीय व उन्नत स्थान आहे व तें बिलकुल धक्का न लावतां अत्र्यांनीं आपल्या चित्रपटांत प्रकट केलेलें आहे. त्यामुळें बोलपटाची भूमिका पहिल्यापासून उच्च अशा भूमिकेवर आहे. अत्रे मराठी फार चांगलें लिहितात. त्यांची कविता प्रसन्न व मधुर असते हें सुप्रसिद्धच आहे. तेव्हां हे त्यांचे गुण या बोलपटांत प्रचीतीला येतात यांत नवल नाहीं. या बोलपटांतील संवाद गाण्याप्रमाणें उत्तम वठलेले आहेत. किती तरी सुंदर सुंदर वाक्यें अत्र्यांच्या कलावंत लेखनसरणीची सारखी आठवण करून देतात. नृत्य हा तर या बोलपटाचा एक मुख्य भाग आहे. त्याची आवड नसेल त्याला या

बोलपटाचें संपूर्ण सौंदर्य कळणें कठीण आहे.

" असें असूनहि या बोलपटाकडे लोकांचें जावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. याचीं कारणें दोन असण्याचा संभव आहे. हा बोलपट केवळ मजेदार नसून कलात्मक आहे व मजेची चटक जितकी अधिक तितका कलेचा उमज कमी अशी पुष्कळ वेळां स्थिति होते. दुसरें कारण या बोलपटांत कामुकता उत्पन्न करण्याच्या तंत्राचें बिलकुल स्तोम तर नाहींच, पण अस्तित्वहि नाहीं. अत्र्यांनीं उच्च व उदात्त शृंगाराचा हा मासला प्रेक्षकांपुढें ठेवला. पण स्थूल मजेच्या चवीची चटक आजकालच्या चित्रपटाच्या धंद्यानें प्रेक्षकांना इतकी लावलेली दिसते कीं, कलेचें सूक्ष्म सौंदर्य पटण्याची शक्ति सुद्धां कधीं कधीं त्यामुळें कमी होत जाते अशी भीति वाटते.

" शिवाय, आजचे सामाजिक नांवाखालीं खपणारे चित्रपट सामान्य जनांना विशेष आवडतात. कारण त्यांतलें वातावरण आपल्या भोंवतालचें आहे अशी त्यांना जाणीव असते. 'मृच्छकटिक' किंवा 'शाकुंतल' यांजसारख्या विद्वज्जनांत व रसिकांत शतकानुशतकें गाजलेल्या कथा सामान्य जनतेच्या गळीं उतरण्याला तिचें कलात्मक शिक्षण बरेंच व्हावें लागेल. पण उत्कृष्ट वाङ्मयाप्रमाणेंच कलात्मक चित्रपट अभिमत होण्याला जरा वेळ लागला तरी त्याची योग्यता सामान्य जनालाहि कळल्याशिवाय राहात नाहीं. रसिकता हा गुण कांहीं रस्त्यावर वाटेल तेथें पडलेला नसतो म्हणूनच 'अरसिकेषु कवित्वनिवेदनम्। शिरसि मा लिख मा लिख मा लिख,' असे उद्गार एका थोर कवीनें काढलेले आहेत.

" वसंतसेना हा चित्रपट अर्थशास्त्रदृष्ट्या अत्र्यांना कितपत हितकारक होईल हें कालांतरानें कळेल पण या चित्रपटाचा दर्जा फार वरचा आहे व त्याची भव्यता निर्विवाद आहे ही गोष्ट अत्रे यांना फार अभिमानास्पद वाटली पाहिजे. असा चित्रपट काढण्याचें धाडस अत्रे यांनीं केलें हें त्यांच्या बुद्धिमत्तेच्या रसिकतेला, सुविद्यतेला, मानसिक सुहृदतेला अनुरूप असेंच त्यांनीं केलें. सुशिक्षित व रसिक माणसें कलेच्या प्रांतांत शिरलीं म्हणजे त्यांच्याबद्दल धंदेवाल्या–म्हणजे धंद्याच्या आहारीं गेलेल्या कलावंताबद्दल ज्या आकांक्षा कोणाच्या ध्यानींमनीं येणें शक्य नसतें त्या रसिकांच्या मनांत असतात व अशा आकांक्षांची हेळसांड अत्रे यांनीं केली नाहीं. ही गोष्ट सामान्य नव्हे.

" कलेचा काय किंवा वर्तमानपत्रादिक लेखनकर्तृत्वाचा कामधंदा कुणालाहि करतां येतो. पण त्यांत ध्येयात्मकता म्हणजे कलात्मकता आणणें ही गोष्ट मात्र केवळ धंदेवाल्यांना जमणारी नव्हे. या ध्येयात्मक व कलात्मक आकांक्षेबद्दल अत्रे यांचें करावें तितकें अभिनंदन थोडेंच होईल. हा चित्रपट तयार करून त्यांनीं चित्रपटाच्या व्यवसायापुढें उत्कृष्ट ध्येय उभें केलें आहे. त्यांच्या प्रयत्नांचें चीज रसिकांनीं केलें पाहिजे व त्यांनीं सर्वसामान्य जनतेंत आपल्या उदाहरणानें कलात्मक दृष्टि आणली

पाहिजे. तरच चित्रपट हा केवळ मजेचें नव्हे तर लोकशिक्षणाचें व लोकांचा बौद्धिक दर्जा वाढविण्याचें साधन होईल हें उघड आहे. ”

प्रा. माधवराव आळतेकर ह्यांनीं ‘ वसंतसेना ’ चित्रपटाच्या उदात्त भव्यतेची, अभिजात कलात्मकतेची नि सोज्ज्वळ गुणांची यथार्थ प्रशंसा केलेली आहे, त्याप्रमाणें भांडवलवाल्यांनीं चित्रपटाच्या व्यवसायाला जें बाजारू वळण लावलें होतें, त्यामुळें ‘ वसंतसेना ’ आर्थिकदृष्ट्या यशस्वी होणें कां शक्य नाहीं त्याचीहि मार्मिक मीमांसा आपल्या अभिप्रायांत सूचित करून ठेवलेली आहे. आणि त्यांनीं भाकीत केल्याप्रमाणेंच घडलें.

वेचाळीसच्या नोव्हेंबरअखेर ‘ वसंतसेना ’ दिल्लीच्या ‘ मोती चित्रगृहां ’ त लागला. डिसेंबर अखेर तो बंगलोर येथें लागला. दोन्ही शहरीं मी स्वतः गेलों होतों. ‘ वसंतसेना ’ जेथें जेथें प्रकाशित झाला तेथें तेथें त्याचें अभूतपूर्व स्वागत झालें. कलावंतांनीं, पत्रकारांनीं, विद्वानांनीं आणि प्राध्यापकांनीं ह्या चित्रपटावर स्तुतिसुमनांचा अपरंपार वर्षाव केला. आणि त्या स्तुतींत अवास्तव आणि अतिशयोक्त असें अक्षरहि नव्हतें.

अशा तऱ्हेचा उच्च दर्जाचा सोज्ज्वळ आणि अभिजात चित्रपट भारतीय चित्रपटाच्या इतिहासांत क्वचित्‌च पूर्वीं निर्माण झाला असेल. आणि सर्वसामान्य प्रेक्षकांचीहि प्रतिक्रिया उत्तेजनपूर्ण होती. पहिल्या महिन्यांतच एकंदर दीड लाख रुपये उत्पन्न झालें होतें. पण तेवढ्यांतच माझ्या गळ्याभोंवतीं माझ्या सावकारांनीं आणि प्रतिस्पर्ध्यांनीं जो फांस टाकला होता तो एकदम आवळण्यास सुरुवात केली. चांगलीं चित्रगृहें मिळून देणें त्यांनीं मला अशक्य करून सोडलें.

ज्या चित्रगृहांत ‘ वसंतसेना ’ चित्रपट धूमधडाक्यानें चालू होता तेथून तो मला न सांगतां एकदम काढून घेण्यांत आला आणि ह्या सर्वांच्या जोडीला ‘ वसंतसेना ’ चित्रपट पडल्याची आवई माझ्या प्रतिस्पर्धांनीं चित्रव्यवसायांत उठवली. ह्या सर्व गोष्टी इतक्या झपाट्यानें घडल्या कीं, आपल्याभोंवतीं काय घडामोडी चालल्या आहेत त्याचें सामान्य आकलनहि मला होऊं शकलें नाहीं.

‘ बाहेर ’च्यांनीं जसा मला दगा दिला, तसा ‘ घरच्यां ’नींहि माझा त्याच वेळीं केंसानं गळा कापला. फुलांची माळ विश्वासानें गळ्यांत घालावी आणि तिनें एकाद्या विषारी नागिणीचें स्वरूप धारण करून गळ्याचा कडकडून चावा घ्यावा तशी माझी त्या वेळीं गत झाली. ‘ वसंतसेना ’ चित्रपटांतून निर्माण झालेलें माझ्या जीवनांतलें तें भयानक नाट्य मी या चरित्राच्या ओघांत पुढें यथाकाल सांगेनच.

ह्या सर्व गोष्टींचा सारांश हा कीं, एकादा प्रचंड मनोरा कोलमडून पडावा तसा ‘ वसंतसेना ’ चित्रपट तीन महिन्यांच्या आंत कोलमडून पडला आणि त्याच्या खालीं माझ्या सर्वस्वाचा चुराडा झाला.

‘ वसंतसेना ’ चित्रपट काढायला गेलों नि स्वतः कंगाल ‘ चारुदत्त ’ झालों !

# २१

## साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदीं

माझें आयुष्य म्हणजे संकटें आणि सन्मान ह्यांचें एक रहाटगाडगें आहे. माझें दैव असें चमत्कारिक आहे कीं ज्या वेळीं तें माझ्या डोक्यावर आकाशाची कुऱ्हाड मारीत असतें, त्याच वेळीं तें आकाशांतून माझ्यावर फुलांची वृष्टि करीत असतें. हें विधान उलटें करून वाचलें तरी चालेल. ' वसंतसेना ' चित्रपटाच्या खर्चाचा डोंगर माझ्या डोक्यावर एकसारखा चढत चालल्यानें, त्याच्या ओझ्याखालीं माझे प्राण अगदीं कंठाशीं आले होते. सावकारांच्या कर्जाचीं दोरखंडें माझ्या नरड्याभोंवतीं आवळूं लागल्यानें जगतों आहे का मरतों आहे, अशी माझी स्थिति झाली होती. अशा रीतीनें आयुष्यांतील एका प्राणांतिक संकटांत मी सांपडलों असत नाशिक येथें भरणाऱ्या सव्वीसाव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड करण्यांत आली.

१९४० ला रत्नागिरीला भरलेल्या साहित्यसंमेलनापासूनच माझें नांव संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं सुचविण्यांत येऊं लागलें होतें. वस्तुतः, त्याच संमेलनाचा मी अध्यक्ष होणार होतों. कारण माझ्याशीं

स्पर्धा करून स्वतःची फजिती व्हायला नको म्हणून प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं आपलें नांव मागें घेतलें होतें. पण त्यानंतर रत्नागिरीच्या कांहीं मंडळींनीं त्यांना अध्यक्ष करण्याचें निश्चित आश्वासन दिल्यानंतर त्यांनीं मागें घेतलेलें आपलें नांव पुन्हां परत यादींत घातलें. अर्थात्, ही गोष्ट साहित्यपरिषदेच्या मान्यतेवांचून झाल्यानें ती नियमबाह्य होती.

वास्तविक त्या प्रकाराला मला हरकत घेतां आली असती. पण मीं स्वतः मनाशीं विचार केला कीं प्रा. फडके हे माझ्यापेक्षां वयानें ज्येष्ठ आहेत. तेव्हां माझ्याआधीं ते साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष होणें ही गोष्ट यथायोग्यच होती. केव्हां ना केव्हां तरी मी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होणार हें मला माहीतच होतें. मग त्या गोष्टीला एवढी घाई कशाला असा मी माझ्या मनाशीं विचार करून गप्प बसलों.

हा चांगुलपणा मीं दाखवला म्हणून चाळीस सालीं रत्नागिरी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. ना. सी. फडके हे झाले. पण त्याची अद्दल त्यांनीं मला चांगलीच घडविली. आपल्या अध्यक्षीय भाषणांतून त्यांनीं माझ्यावर आणि माझ्या 'साप्ताहिक नवयुग'वर हल्ला चढवला. तेथून अत्रे-फडके वाद सुरू झाला. तो १९४१ च्या सोलापूरच्या साहित्यसंमेलनाच्या वेळेला इतका हमरीतुमरीला आला होता कीं कांहीं विचारूं नका. त्या वादामुळें प्रा. वामन मल्हार जोशींसारखीं सज्जन माणसें जशीं प्रा फडक्यांवर बिघडलीं तशीं माझ्यावरहि बिघडलीं आणि म्हणून त्यांनीं सोलापूरच्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं सुचविण्यांत आलेल्या माझ्या नांवाला विरोध केला.

त्या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं श्री. वि. स. खांडेकर ह्यांची निवड झाली. १९४१ च्या ऑगस्ट महिन्यांत आचार्य जावडेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई नि उपनगर साहित्यसंमेलन भरणार होतें. त्या वेळीं कांहीं साहित्यिक स्नेह्यांच्या आग्रहावरून मीं प्रा. फडक्यांना 'शेवटची शिवी' देऊन पुष्कळांना अप्रिय वाटणाऱ्या या वादावर अखेरचा पडदा टाकला, हें मीं मागेंच एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. हा वाद मिटल्यानें वर्ष-दीड वर्ष गढूळ झालेलें महाराष्ट्रांतलें साहित्यिक वातावरण एकदम निवळलें आणि साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची माझी वाट आपोआपच मोकळी झाली.

नाशिक साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाल्याबद्दल पुणें आणि मुंबई येथें माझे टोलेजंग जाहीर सत्कार झाले. 'महाराष्ट्र साहित्यपरिषदे'च्या वतीनें 'पटवर्धन स्मारक मंदिरा'च्या सौधतलावर साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार झाला. प्रारंभींच बोलतांना तात्यासाहेब म्हणाले, "आचार्य अत्रे यांनीं गेलीं पंचवीसांहून अधिक वर्षें साहित्यसेवा करून स्वतःचा व मराठी साहित्याचा उत्कर्ष केला आहे. तेव्हां ते आतां साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष

निवडले गेले हें उचित होय ! ”

प्रा. वामन मल्हार जोशी म्हणाले, “ गतवर्षी मीं अत्रे ह्यांच्या नांवाला कांहीं कारणास्तव विरोध केला असला, तरी या वर्षी त्यांना अध्यक्षपद लाभल्यानें मला आनंद होत आहे. आचार्य अत्रे हे मोठे साहित्यभक्त आणि साहित्यपरिषदेचे अभिमानी आहेत. संमेलनाचें कर्णधारत्व त्यांच्याकडे असल्यामुळें समेलनाचें तारूं सध्यांच्या वादळी भोंवऱ्याच्या वातावरणांत देखील सुखरूपपणें इष्ट स्थळीं जाईल, इतकें समयज्ञत्व व नौकानयनचातुर्य त्यांच्यामध्यें आहे अशी माझी आणि अनेकांची समजूत आहे, ती संमेलनानंतर यथार्थ ठरेल यांत शंका नाहीं. ”

माझे मित्र के. नारायण काळे म्हणाले कीं, “ आचार्य अत्रे हे मित्रांशीं व शत्रूंशीं सारख्याच खिलाडू वृत्तीनें वागूं शकतात. अगदींच सहेतुक शत्रूशिवाय त्यांचे विरोधकहि त्यांच्या दिलदारपणाची प्रशंसा करतात. लोकांना खूष करण्यासाठीं त्यांनीं लेखन केलें नसून लिहिल्याशिवाय रहावतच नाहीं म्हणून त्यांनीं लिहिलें आहे. आणि म्हणून आचार्य अत्रे हे जातिवंत साहित्यिक आहेत आणि त्यांचें वाङ्मयहि जिवंत साहित्य झालें आहे ! ”

‘ अश्लीलता-विध्वंसक मंडळी ’चे चिटणीस श्री. कृष्णराव मराठे म्हणाले, “ अत्रे यांचे कांहीं लेख व व्याख्यानें फारच सोज्ज्वळ अशीं आहेत. यापुढें त्यांनीं तसें सोज्ज्वळ लिहावें आणि सोज्ज्वळ बोलावें अशी त्यांना माझी विनंति आहे. ”

प्रा. दत्तो वामन पोतदार म्हणाले, “ बाबूराव अत्रे ह्यांनीं आपल्या खंद्या लेखनानें व कणखर साहित्यनिर्मितीनें आपल्या कर्तृत्वाचा पुरावा जनतेला सुपूर्त केला आहे. अत्रे ह्यांची लेखणी निःसंशय प्रासादिक आहे. त्यांनीं मराठीमध्यें विशेष प्रकारचें विनोदी लेखन करून मराठींत विनोद नाहीं असें म्हणणारांचीं तोंडें गप्प केलीं आहेत. आपल्या लेखनानें अत्रे ह्यांनीं मराठी वाङ्मयाविषयीं अभिमान, प्रीति व विश्वास निर्माण केला आहे. ”

सत्काराला उत्तर देतांना मी म्हणालों, “ आज माझ्यावर फुलांचा नि स्तुतीचा वर्षाव झाल्यामुळें मी थोडासा असहाय्य झालों आहें. येत्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर येऊन पडल्यामुळें या प्रसंगीं माझें अभिनंदन करण्याऐवजीं आपण मजविषयीं सहानुभूति व्यक्त केली असती तर बरें झालें असतें ! ( हंशा ). माझी साहित्यसेवा अद्याप पूर्ण झाली नाहीं. अजून मला पुष्कळ लेखन करावयाचें आहे. म्हणून मला इतक्यांतच अध्यक्ष व्हावयाला नको होतें. पण माझ्याविषयीं आस्था आणि आपुलकी बाळगणारांनीं एवढ्यांतच मला निवडून दिलें आहे. त्यांना तोंडघशीं पाडावयाचें नाहीं म्हणून मला ही जबाबदारी स्वीकारावी लागत आहे. ( हंशा ).

“ बरोबर गेल्या वर्षी याच वेळीं या टिळक रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला मला

प्रत्यक्ष मार बसला होता. ( हंशा ) आणि योगायोग असा कीं एका वर्षानंतर त्याच दिवशीं या ठिकाणीं आज आपण स्तुतीचा नि फुलांचा मार देत आहांत. ( टाळ्या ) पण त्या माराच्या वेळीं जितका मी घायाळ झालों नव्हतों तितका आज झालों आहें ! ( हंशा ).

"माझ्या साहित्यसेवेंत ज्यांचा ज्यांचा मी आजपर्यंत ऋणाईत झालों आहें, त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें हें मी माझें कर्तव्य समजतों. काव्याची स्फूर्ति मी 'बालकवि' ठोमरे ह्यांच्यापासून घेतली आहे. विनोदाची प्रेरणा मला गडकऱ्यांपासून मिळालेली आहे. नाट्यलेखनाचे माझे गुरु श्री. तात्यासाहेब केळकर हे तर आजच्या समारंभाचे अध्यक्षच आहेत. महाराष्ट्राच्या समोर मला आणण्याचें सर्व श्रेय माझे मित्र 'ज्ञानप्रकाश'चे संपादक श्री. काकासाहेब लिमये यांनाच मी देतों. माझा सत्कार हा सर्वस्वी श्री महाराष्ट्र शारदा मंदिराचा सत्कार आहे असें मी समजतों. ( टाळ्या ).

"युरोपांत आणि अतिपूर्वेकडे दुसऱ्या महायुद्धाच्या राक्षसी ज्वाला पराकाष्ठेच्या भडकल्या आहेत. भारतीय स्वातंत्र्याचे महान् नेते आज स्थानबद्ध असल्यानें देशांतील सारी जनता चिंताक्रांत आहे. अशा वातावरणांत यंदाचें साहित्य-संमेलन भरत असल्यानें तें आतांपर्यंतच्या सर्व साहित्यसंमेलनांपेक्षां वेगळें होणार ह्यांत कांहीं शंका नाहीं. पण त्याबद्दल आज अधिक ऊहापोह न करतां माझ्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत माझी भूमिका मी स्पष्ट करीनच. समाजांत प्रत्यक्ष वावरून, मिसळून आणि काम करून समाजाच्या प्रगतीचा गाडा पुढें रेटण्याच्या दृष्टीनें लेखकानें साहित्यनिर्मिति केली पाहिजे. समाजाच्या प्रचलित परिस्थितीशीं समरस झाल्याखेरीज साहित्यिकाला लेखन करतां येणार नाहीं हा माझा अनुभवहि आहे. ही माझी श्रद्धा आहे. हें माझें ध्येय आहे."

दुसऱ्या दिवशीं प्रा. गं. भा. निरंतर ह्यांच्या दिवाणखान्यांत 'महाराष्ट्र शारदा मंदिर' तर्फे माझा गौरव करण्यांत आला. त्या प्रसंगीं तात्यासाहेब केळकर, दत्तोपंत पोतदार, काकासाहेब लिमये, वामन मल्हार जोशी, रावसाहेब र. लु. जोशी हजर होते. दुपारीं सुप्रसिद्ध लघुकथालेखक यशवंत गोपाळ जोशी ह्यांनीं आपल्या घरीं बोलावून माझा सत्कार केला. आणि पुण्याच्या 'इंटरनॅशनल बुकसर्व्हिस'चे मालक श्री. विठ्ठलराव आणि सौ. मुक्ताबाई दीक्षित ह्यांनीं मला अनेक साहित्यिकांसह थाटाची मेजवानी दिली. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड झाल्याबद्दल पुण्याच्या साहित्यिकांना आणि वाङ्मयप्रेमी जनतेला खरोखरच मनापासून आनंद झाला.

मुंबई शहरांतहि मुंबई साहित्य संघातर्फे प्रा. अश्वत्थामाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं 'वागळे हॉल'मध्यें माझा सत्कार झाला. अध्यक्ष प्रा. गजेंद्रगडकर म्हणाले, "आचार्य अत्रे ह्यांची साहित्यसेवा चतुरस्र असून ती पहिल्या

प्रतीची आहे. आणि अत्यंत प्रशंसनीय आहे. ज्याप्रमाणें ' यत्र यत्र धूमः, तत्र तत्र वन्हिः ' त्याप्रमाणें ' जेथें जेथें अत्रे, तेथें तेथें विनोद ' असें विनोद आणि अत्रे ह्यांचें समीकरण आहे. जीवनांत विनोदाचें जें स्थान आहे, तें आचार्य अत्र्यांनींच हिंदुसमाजाला प्रथम पटवून दिलें. ' बी ' कवींच्या काव्यसंग्रहाला आचार्य अत्रे यांनीं लिहिलेली प्रस्तावना हा सखोल अभ्यासाचा एक नमुना आहे. ते प्रभावशाली वक्ते आहेत. आणि वृत्तीनें निर्भय आहेत. "

प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणाले, " ललितलेखक हे विसंवादी घटनांनीं आकर्षिले जातात. या विसंवादी घटनांमधून आचार्य अत्रे यांना स्फूर्ति मिळते हा त्यांच्या प्रतिभेचा विशेष होय. त्यांच्या वाङ्मयाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां, जेथें तेथें विसंगति आहे, त्याचें निरीक्षण करून त्यांनीं आपल्या वाङ्मयांत त्याचें प्रतिबिंब पाडलें आहे, असें दिसून येतें. परंतु, अशा लेखकांच्या लेखनांत जो कडवटपणा दिसून येतो, तो अत्रे यांच्या वाङ्मयांत दिसत नाहीं. आचार्य अत्रे यांच्या सर्व भूमिकांचें निरीक्षण केल्यास त्यामध्यें प्रसन्नता आहे असें दिसून येईल. जीविताकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन प्रसन्न, उदार, खेळकर आहे. यापुढें आचार्य अत्रे यांनीं वाङ्मयांत – विशेषतः नाट्य-वाङ्मयांत बहुमोल भर टाकावी अशी त्यांना माझी विनंती आहे. "

अनंतराव गद्रे म्हणाले, " आचार्य अत्रे यांनीं नाट्यक्षेत्रांत पाऊल टाकून ' साष्टांग नमस्कार ' घातला तेव्हांपासून ते ' घराबाहेर ' पडेपर्यंतच्या काळांत त्यांचा नि माझा दाट परिचय होता. आचार्य अत्रे ह्यांनीं अनेकांबरोबर वाद केले. त्यामध्यें ठोसे, चिमटे, चपराका होत्या. पण जोडा-जोडी नव्हती. ( हंशा ) चित्रपटाच्या व्यवसायामुळें कांहीं काळ त्यांचें साहित्यनिर्मितीकडे दुर्लक्ष झालें आहे. पण यापुढें त्यांनीं आपली कणखर साहित्यसेवा पुन्हां सुरू करावी अशी मी त्यांना प्रार्थना करतों. "

प्रा. द. के. केळकर म्हणाले, " नाशिकच्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष निवडून वैयक्तिक टीकेच्या धुरळयामुळें दृष्टि विचलित न होऊं देतां आपण त्यांच्या साहित्यनिर्मितीचें मूल्यमापन करूं शकतों हें जनतेनें दाखवून दिलें आहे. आचार्य अत्रे यांचें वाङ्मय हें निव्वळ हंसविणारें नसून दोष दाखवणारें आहे. नाट्यसृष्टींत आचार्य अत्रे ह्यांनीं विलक्षण यश मिळविलें. ' घराबाहेर ' किंवा ' उद्यांचा संसार ' या नाटकांत विशिष्ट तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याचा त्यांचा हेतु स्पष्टपणें दिसून येतो. "

' लोकमान्य 'चे संपादक पां. वा. गाडगीळ ह्यांनीं माझ्यावर प्रतिकूल टीका केली. ते म्हणाले, " वाङ्मयांत आचार्य अत्रे ह्यांनीं कलात्मक गुंडगिरी केली आहे असें माझें स्पष्ट मत आहे. समाजाला संयम घालण्यासाठीं त्यांनीं स्वतः आपल्याला संयम घातला पाहिजे व तसा तो साहित्य संमेलनांत घालतील अशी मी आशा करतों. "

सुप्रसिद्ध लघुकथाकार ॲ. खंडेराव दौंडकर म्हणाले, " लेखक जगाच्या रंगणांत

दंड थोपटून उभा राहतो, तेव्हांच लोकप्रियता त्याच्या पाठीस लागते. आणि म्हणूनच आचार्य अत्रे यांना लोकप्रियता मिळाली आहे."

माझे परममित्र प्रा. कृष्णाजी पांडुरंग ऊर्फ नानासाहेब कुळकर्णी म्हणाले, "मी अत्रे यांचा मित्र आहें. आणि निवडणुकींत त्यांचा प्रतिस्पर्धी होतों. ह्या पंचामुळें मला झालेला आनंद कदाचित् कोणाला खरा वाटणार नाहीं. श्री. वि. स. खांडेकरांच्या लिखाणांत प्रतीकवाद आहे. तर आचार्य अत्रे ह्यांच्या लिखाणांत प्रातिनिधिक वास्तववाद आहे. त्यांच्या लिखाणांत विनोद जसा दृष्टीला पडतो, तसा त्यांतील कारुण्याचा आक्रोशहि चिरंतन स्वरूपाचा आहे. जुन्याला सोडून फारसें पुढें जाऊं नये, असें त्यांचें मत असल्याचें त्यांच्या वाङ्मयावरून दिसतें. शिक्षणशास्त्रासारख्या गंभीर विषयावर ते अत्यंत गंभीरपणें गंभीर विचारहि सांगू शकतात. त्यांचें शरीर, मन, स्वभाव व वाङ्मय उमदें आहे आणि त्यामुळेंच साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थानहि ते अत्यंत उमदेपणानें भूषवतील ह्याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं."

सत्काराला उत्तर देतांना मी म्हणालों, "एवढी स्तुति करण्यासारखें मी अजून कांहीं केलें नाहीं. कदाचित् पुढें करूं शकेन! (हंशा). आजपर्यंत जें कांहीं साध्य झालें आहे, त्यापेक्षां साध्य करण्यासारखें पुष्कळच आहे. माझ्याजवळ जर कशाचें भांडवल असेल तर तें हौसेचें. आणि तें जबरदस्त आहे! (हंशा). लहानपणीं मला जशी हौस वाटे, तशीच आतांहि वाटते. प्रत्येक गोष्ट आपल्याला आली पाहिजे. प्रत्येक गोष्ट आपल्याला समजली पाहिजे. प्रत्येक गोष्ट आपल्याला दिसलीच पाहिजे (हंशा) असें मला मनापासून वाटतें. साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद ही मानाची जागा नसून कामाची जागा आहे अशी माझी समजूत आहे.

"सध्या महायुद्ध चालू आहे. देशांतील परिस्थिति भयंकर आहे. म्हणून साहित्यसंमेलन पुढें ढकलावें असा कांहीं मंडळींनीं बूट काढला आहे. परंतु, युद्धामुळें किंवा देशांतील परिस्थितीमुळें आम्ही आमचे इतर धंदे थोडेच तहकूब केले आहेत, तर हा साहित्याचा धंदा आम्हीं तहकूब करावा? साहित्यिकांनीं काय नुसता साहित्याचाच विचार करावयाचा असतो. जागतिक परिस्थितीबद्दल किंवा देशाच्या राजकीय परिस्थितीबद्दल आम्हां साहित्यिकांना काय वाटतें हें एकत्र बसून आम्हीं ठरवायला नको काय? आणि विचारविनिमय करून तें ठरविल्यानंतर साऱ्या देशाला तें सांगायला नको का? एवढ्यासाठींच साहित्यसंमेलन पाहिजे आहे. देशांतील सर्व पक्ष आपापलीं मतें व्यक्त करीत असतांना साहित्यिकांनीं तेवढें स्वस्थ बसावें ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. चालू परिस्थितीशीं साहित्यिक समरस होत नाहीं, म्हणून देशाची स्थिति आणि साहित्यिक यांची एवढी फारकत झाली आहे. (टाळ्या).

"मी एक ललित लेखक आहें. ललितवाङ्मयाबद्दल अनेकांचे अनेक गैरसमज आहेत. ललितवाङ्मय हें टिकाऊ वाङ्मय नाहीं अशी कित्येक त्यावर टीका करतात.

पण ललितवाङ्मय हेंच खरें राष्ट्रीय स्वरूपाचें वाङ्मय आहे. कारण सर्व लोक तें वाचतात. सर्वांना तें आवडतें. सर्वांच्या जीवनांत तें आनंद निर्माण करतें. अमर ललितवाङ्मय हें सामान्य बुद्धिमत्तेच्या माणसाला मुळीं निर्माण करतां येणार नाहीं. 'शाकुंतल' लिहिणारा कालिदास, 'उत्तरराम चरित' लिहिणारा भवभूति, 'हॅम्लेट' लिहिणारा शेक्सपीअर, 'उषःकाल' लिहिणारे हरिभाऊ आपटे, 'गीतांजलि' लिहिणारे टागोर आणि 'एकच प्याला' लिहिणारे गडकरी ह्यांची बुद्धिमत्ता जगांतल्या कोणत्या महान् पंडितापेक्षां किंवा शास्त्रज्ञापेक्षां कमी होती तें सांगा! (टाळ्या).

"ललितवाङ्मयामधली करुण रसाइतकीच विनोद ही एक महान् शक्ति आहे. पृथ्वीवरील मानवाला प्राप्त झालेली ती एक मौल्यवान् देणगी आहे. ती आपल्या या महाराष्ट्राला साध्य झालेली आहे ही परमेश्वराची कृपा! (टाळ्या) विनोदाचा हेतु केवळ हंसविणें हा नसून, त्या हंसण्याच्या प्रवाहांत समाजांतील अनिष्ट गोष्टी नष्ट व्हाव्यात हा आहे.

"मराठी साहित्यांतील दोषदर्शनाचें काम अध्यक्षानें साहित्यसंमेलनांत करावें असें मघांशीं कोणी तरी मला सुचवलें. पण माझें स्वतःचें मत असें आहे कीं साहित्यांतील दोषदर्शन करणें हें अध्यक्षाचें काम नसून, मराठी भाषेंत उत्तमोत्तम वाङ्मय कसें निर्माण होईल त्याबाबत प्रेरणा देणें नि मार्गदर्शन करणें हेंच साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाचें कर्तव्य आहे, आणि तेंच मी नाशिक संमेलनांत करणार आहें!" (प्रचंड टाळ्या).

हा सत्कारसमारंभ एवढ्या उत्साहाच्या नि आनंदाच्या वातावरणांत पूर्ण झाला. पण त्याला एकच गालबोट लागलें. तिसऱ्या मजल्यावरच्या 'वागळे हॉल'मधून श्रोतेमंडळी खालीं उतरली, त्यांत 'लोकमान्य'कार पां. वा. गाडगीळ हे होते. ते तळमजल्यावर आले आणि कोणाशीं तरी बोलत होते, तोंच एका तरुण इसमानें 'सावरकरांना बैल म्हणतोस काय रे?' असें म्हणून गाडगीळांच्या डाव्या डोळ्यावर जोरानें गुद्दा मारून त्यांचा चष्मा खालीं पाडला आणि पाहतां पाहतां गर्दींत नाहींसा झाला. त्याच्या हातांत कांहीं तरी शस्त्र होतें असें त्या गर्दींतल्या चारपांच स्त्रीपुरुषांनीं सांगितलें. मी गाडगीळांचें सांत्वन करावयाला त्यांच्या जवळ गेलों. पण सांत्वन करून घेण्याच्या मनस्थितींत ते नव्हते.

नाशिक साहित्यसंमेलनाच्या तारखा शुक्रवार २९, शनिवार ३० आणि रविवार ३१ ऑक्टोबर १९४२ अशा होत्या. आणि योगायोग हा कीं माझा आठदहा लाखांचा 'वसंतसेना' हा चित्रपट त्याच दि. ३० रोजीं मुंबईंत लागणार होता. माझें सारें जीवनमरण त्यावर अवलंबून होतें. पण चित्रपटापेक्षां साहित्यावर माझें शतपटीनें अधिक प्रेम होतें म्हणून 'रायाजीचें लग्न बाजूला सारून तानाजी जसा कोंडाण्याकडे

धांवला '. त्याप्रमाणें ' वसंतसेने 'ची पर्वा न करतां मी नाशिकच्या साहित्यसंमेलनाकडे धांव घेतली !

दि. ३० ऑक्टोबर १९४२ रोजीं नाशिक येथें साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून ज्या वेळीं मी भाषण करीत होतों, त्या वेळीं मुंबईला माझा ' वसंतसेना ' हा चित्रपट प्रकाशित होत होता.

# २२

# ललितवाङ्मय हेंच लोकवाङ्मय !

" साहित्यिक हे स्वातंत्र्याचे भाट आहेत. जगाच्या आरंभापासून स्वातंत्र्याचीं जयगीतें गाऊन मानवी स्वातंत्र्याच्या ध्येयाची ज्योत त्यांनींच जिवंत ठेवलेली आहे. तथापि, भांडवलशाही राष्ट्रांत आज साहित्यिक स्वतंत्र नाहींत. जुलमी कायद्याखालीं त्यांची प्रतिभा चिरडली गेली आहे. भाषणस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य हा नागरिक स्वातंत्र्याचा पाया आहे. या पायावरच राजकीय स्वातंत्र्याचें जीवन उभारलेलें असतें. तें भाषण आणि लेखनस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लेखकांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें पाहिजे.

स्वार्थ, सत्तालोभ, वर्णवर्चस्व, जुलूम, दास्य या मानवजातीच्या शत्रूंचा या युद्धांत निःपात झाला तर समतेच्या, शांततेच्या आणि स्वातंत्र्याच्या भूमिकेवर उद्यांच्या जगाची पुनर्घटना करतांना जी 'मानवतेची सनद' लिहावी लागेल ती लिहिण्यासाठीं मुत्सद्दी, सेनापति किंवा व्यापारी ह्यांना न बोलावतां जगांतील साहित्यिक महात्म्यांनाच पाचारण करावें लागेल. बंदुकीनें युद्धें होत असलीं, तरी तीं लेखणीनेंच निस्तरावीं लागतात.

"आज महाराष्ट्राचे प्रमुख साहित्यिक येथें जमलेले आहेत. उद्यां लिहिल्या जाणाऱ्या या मानवतेच्या सनदेचा पुरस्कार करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. हिंदी जनतेच्या वतीनें गर्जना करून त्यांनीं जगाला सांगितलें पाहिजे कीं, 'चाळीस कोटि लोकांचा हा प्रचंड देश यापुढें एक क्षणभरहि पारतंत्र्यांत राहण्यास तयार नाहीं. आमचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आणि राखण्यासाठीं आम्ही आमचें सर्वस्व धुळीला मिळवूं. आणि आम्ही स्वतंत्र झालों तरच बाकीचें जग स्वतंत्र होईल!' अशा जळजळीत शब्दांत नाशिकच्या सव्वीसाव्या साहित्य संमेलनाचें माझें अध्यक्षीय भाषण मीं जेव्हां संपविलें, तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

"दुसऱ्या महायुद्धाचा तो मध्यान्ह काळ होता. भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचे महान् नेते त्या वेळीं कारागृहांत पडले होते. तेव्हां विश्वयुद्धानें मानवतेवर आलेल्या संकटाची चिंता आणि भारतीय स्वातंत्र्याबद्दल जनतेला वाटणारी तळमळ ह्यांची धग साहजिकच माझ्या अध्यक्षीय भाषणांत अगदीं प्रारंभापासून तों अखेरपर्यंत उफाळत होती.

"तीन वर्षांपूर्वीं सुरू झालेल्या राक्षसी महायुद्धाचा वणवा आतां सबंध जगभर पसरला आहे. एवढेंच नव्हे तर, त्याच्या दाहक आणि विध्वंसक शक्तीला आतां सीमाच उरलेली नाहीं. या वणव्याच्या ज्वाला हिंदुस्थानच्या सीमेवर येऊन थडकल्या असून, त्या आगीचा डोंब कधीं आणि कोणत्या वेळीं तुमच्याआमच्या घरादारांत उठेल, याचा आतां कांहीं नेम राहिलेला नाहीं. अखिल मानवजातीवर आपलें पाशवी प्रभुत्व प्रस्थापित करणाऱ्या चंगीझखानाचा आधुनिक अवतार आज जगांत अवतीर्ण झाला आहे. त्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या खाईत लाखों निरपराधी जिवांच्या आहुति प्रत्यहीं पडून भस्मसात् होत आहेत. मानवजातीच्या स्वातंत्र्यावर, शांततेवर आणि भवितव्यावर आज भीषण गंडांतर आलेलें आहे.

"जीविताचीं जीं अत्युच्च मूल्यें आम्ही आजपर्यंत पूजीत आलों, तीं धुळीला मिळून हजारों वर्षांची मानवजातीची बौद्धिक प्रगति आणि संस्कृति रसातळाला पोहोंचते आहे कीं काय आणि अश्मयुगीन अवस्थेमधील पशुकोटीपर्यंत फिरून मानवजात मागें रेटली जाते कीं काय, अशी चिंता जगांतील प्रत्येक जाणत्याला आज पडलेली आहे. मरणापेक्षाहि भीषण अशा पारतंत्र्याच्या आणि दास्याच्या धूसर ढगांत भविष्यकाळाचीं क्षितिजें झांकळून गेल्यामुळें समोर कांहीं दिसेनासें झालें आहे. या काळरात्रीच्या अंधारांतून जर भाग्यशाली भवितव्याचा अरुणोदय होणार असेल, तर तो डॉन आणि व्होल्गा नदीच्या प्रवाहाशीं स्पर्धा करणाऱ्या पराक्रमी रशियन वीरांच्या रक्तामधूनच होणार आहे, एवढ्याच धुगधुगत्या आशेवर जगांतील लोकशाही अजून जिवंत राहिलेली आहे.

"गेलीं दीडशें वर्षें आम्ही परकी सत्तेचे दास आहोंत. आज अखिल मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं म्हणे जगांत भीषण संहार चाललेला आहे. या स्वातंत्र्याच्या

संग्रामांत पारतंत्र्याच्या बेड्या हातांत अडकल्या असतांनाहि आमचे कांहीं वीर तसेच लढत आहेत. या युद्धांत शेवटीं लोकशाही राष्ट्रांचा विजय झाला, तरी देखील आपल्याला स्वातंत्र्य मिळेल किंवा काय याची खात्री नसतांनाहि, दुसऱ्याच्या स्वातंत्र्या-साठीं गुलाम हिंदुस्थानाला आज लढावें लागत आहे, हें करुण दृश्य बघून कोणत्या सहृदय माणसाच्या भावनांची कालवाकालव झाल्यावांचून राहील ?

" हिंदुस्थानसारखें प्रचंड राष्ट्र जोंपर्यंत परतंत्र आहे, तोंपर्यंत जगाला स्वातंत्र्य मिळणार नाहीं, असें संयुक्त राष्ट्रांना निक्षून सांगणारे जनतेचे पूज्य पुढारी आज कारागृहांत अडकून पडलेले आहेत. स्वातंत्र्यासाठीं तळमळणारी देशांतील बहुसंख्य जनता राज्यकर्त्यांच्या हट्टी आणि अडेल धोरणामुळें अधिक असंतुष्ट आणि अस्वस्थ झाली आहे. देशांत चोहींकडे विचारांची वेदिली माजली आहे, कोणाचा लगाम कोणाच्या हातांत राहिलेला नाहीं. कोणालाहि आपल्या भवितव्याबद्दल सुरक्षितता वाटेनाशी झालेली आहे."

" एका बाजूला महागाईचा दैत्य व दुसऱ्या बाजूला उपासमारीचा राक्षस आपले जबडे वासून गरीब जनतेला भेडसावीत आहेत. पोट जाळायला अन्न मिळेनासें झालें आहे. दिवे जाळायला तेल मिळेनासें झालें आहे देशाच्या अशा दारुण दैन्यावस्थेंत जर अचानकपणें परचक्र आलें तर आपली काय दाणादाण उडेल या चिंतेंत सारी जनता आज चूर असतांना आपण आपलें हें साहित्यसंमेलन भरवीत आहोंत, ही गोष्ट कदाचित् कोणाला हास्यास्पद वाटण्याचा संभव आहे."

माझ्या अध्यक्षीय भाषणाचा प्रारंभ मीं ज्या स्वरांत केला त्याच स्वरांत मीं त्याचा शेवट केला. तो करण्यापूर्वी मी म्हणालों,

" गेलें महायुद्ध हें आधुनिक जगांतील शेवटचें युद्ध समजलें जात होतें. तथापि, युद्धानें युद्ध थांबत नाहीं, हेंच सिद्ध झालें. गेल्या महायुद्धापेक्षांहि घातक असें हें रुद्रयुद्ध पुन्हां सुरू झालें आहे. किंबहुना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, त्याप्रमाणें १९१४ सालीं जगांत युद्ध सुरू झालें आहे, तें अद्यापि थांबलेंच नाहीं. ह्या युद्धामधून अखिल मानव जातीच्या शाश्वत सुखाची कांहीं योजना प्रकट होईल, अशीं चिन्हें अद्याप तरी कांहीं दिसून येत नाहींत. सध्यांचें युद्ध हें मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं आणि जगांतील लोकशाहीच्या संरक्षणासाठीं आहे असें म्हणतात. तसें ह्या युद्धाचें पर्यवसान अखेर तरी व्हावें, असेंच आम्हां स्वातंत्र्यप्रेमी मंडळींचें म्हणणें आहे.

" युद्धाचा आरंभ ज्या स्वरूपांत झाला, तो कांहीं भिन्न विचारसरणीमधील झगडा नव्हता. जित जगावर कोणी राज्य करावें ह्या महत्त्वाकांक्षेच्या पोटीं दोन प्रबळ जेत्यांमध्यें सुरू झालेलें हें भांडण आहे. हुकूमशाही आणि साम्राज्यशाही ह्यांमधील हा प्राणघातक तंटा आहे. दोघांचीं नांवें भिन्न असलीं तरी आमच्या

दृष्टीनें त्यांची विचारसरणी एकच आहे. चालू युद्ध हें भिन्न सैन्यांमधलें युद्ध आहे. भिन्न विचारसरणींमधील ह्याहिपेक्षां भीषण युद्ध अद्यापि जगामध्यें व्हावयाचें आहे.

"मानवतेच्या स्वातंत्र्यासाठीं जर हें युद्ध खरोखरच असेल तर अटलांटिक महासागराच्या मध्यभागीं मानवजातीच्या स्वातंत्र्याची जी सनद लिहिली गेली, तिच्यामध्यें दीडशें वर्षें गुलामगिरींत पिचत पडलेल्या ह्या अभागी देशाचा उल्लेख कां करण्यांत आला नाहीं ? जोंपर्यंत एक राष्ट्र ह्या पृथ्वीतलावर गुलाम म्हणून राहील, तोंपर्यंत जगांत खरी लोकशाही प्रस्थापित होणें शक्य नाहीं. चाळीस कोटि लोकांचें हें बलाढ्य राष्ट्र निःशस्त्र करून शेळ्यामेंढ्यांप्रमाणें ठेवणाऱ्या साम्राज्यशाहीला एक दिवस भयंकर पश्चात्तापाची पाळी आल्यावांचून राहणार नाहीं, असें फिरोजशहा मेथा ह्यांनीं मागें तळमळून सांगितलेलें आहे.

"साम्राज्यशाहीची आज जी धूळधाण उडालेली दिसत आहे, तो हा चाळीस कोटि जीवांचा तळतळाट तिला भोंवतो आहे, हें तिनें लक्षांत ठेवावें. चाळीस कोटि जीव आज स्वतंत्र झाले तर शूरवीर रशियन लोकांप्रमाणेंच ते देशाच्याच काय पण जगाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या छातीचे 'स्टॅलिनग्राड' केल्यावांचून राहणार नाहींत. जगांत खरी लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय देश स्वतंत्र होणार नाहीं आणि देश स्वतंत्र झाल्याशिवाय शास्त्रें, कला, भाषा, साहित्य इत्यादि मानवी जीवनाच्या सुखसाधनांचा उत्कर्ष होणार नाहीं."

जागतिक भारतीय नि राजकारणासंबंधींच्या तत्कालीन विवेचनाच्या मध्यभागामध्यें साहित्याच्या विवेचनाचें ज्वलंत सारण मीं भरलें. त्यांतले कांहीं नमुने पहा :

"आजच्या सुधारलेल्या जगांत राजसत्तेप्रमाणें साहित्यहि आज बहुशः लोकाधीन झालेलें आहे. आजच्या युगांत मानवी जीवनाला अवश्य असणारें साहित्य हें सहावें महाभूत आहे. कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्राला सैन्यापेक्षां नि आरमारापेक्षां साहित्याची आज जास्त जरुरी आहे. कारण सैन्य आणि आरमार फार झालें तर जिवंत राष्ट्राचें रक्षण करूं शकेल. पण राष्ट्राला जिवंत ठेवण्याचें काम केवळ साहित्यच करूं शकतें. राष्ट्राच्या पौरुषाच्या नि पराक्रमाच्या परंपरा जिवंत राखून त्याग, धैर्य आणि शौर्य हे गुण जनतेच्या अंगीं येण्यास बंदुका आणि तोफांपेक्षां साहित्याचाच उपयोग जास्त होतो.

"ब्रिटिश राष्ट्राचें आजपर्यंत जें संरक्षण झालेलें आहे, तें नेल्सनच्या आणि वेलिंग्टनच्या लढाऊ परंपरेमुळें झालेलें नसून, तें बेकन, शेक्सपियर, शेले, गिबन, बर्क, डिकन्स आणि शॉ ह्या साहित्यप्रभूंच्या अजस्र सामर्थ्यामुळें झालेलें आहे. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार जगभर पसरविण्याचें श्रेय जरी इंग्रज शिपायांना असलें, तरी हा साम्राज्याचा डोलारा इतकीं वर्षें टिकविण्याचें श्रेय सर्वस्वी इंग्रजी भाषेला आणि साहित्याला आहे. समुद्रावरच्या प्रभुत्वापेक्षां साहित्याचें प्रभुत्व

इंग्रजांना जास्त हितकारक झालेलें आहे.

" 'हिंदुस्थान आम्हीं गमाविला तरी हरकत नाहीं पण आमचा शेक्सपीअर गमावण्याला आम्ही केव्हांहि तयार होणार नाहीं!' हे कार्लाईलचे उद्गार साम्राज्यापेक्षां साहित्यच श्रेष्ठ आहे ह्या सत्याची कबुली देतात. जर्मनांच्या राक्षसी टोळधाडीच्या चिंधड्या उडवण्याऐवजीं अभूतपूर्व वीरश्री रशियन जनतेच्या अंगीं जर आज कोणी निर्माण केली असेल तर ती टॉलस्टाय, डॉस्टायव्हस्की, मार्क्स अन् लेनिन ह्यांच्याच स्फूर्तिदायक साहित्याच्या शिकवणुकीनेंच होय हें कोणीहि सांगूं शकेल.

" हिंदी राष्ट्राचा स्वाभिमान आणि स्वातंत्र्यप्रेम जर आज कशामुळें जिवंत राहिलें असेल तर तें व्यास, वाल्मीकि, कालिदास, भवभूति, ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर आणि गांधी ह्यांच्या अमर साहित्यामुळें आणि सामर्थ्यवान शिकवणुकीमुळें होय, ही गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे. आमच्या पराक्रमाची आणि कर्तृत्वाची ग्वाही देण्यासाठीं रामायण–महाभारत हे ग्रंथ जोंपर्यंत डोंगरासारखे आमच्या पाठीमागें उभे आहेत, तोंपर्यंत भविष्यकाळाबद्दल निराश होण्याचें आम्हांला किमपिहि कारण नाहीं. ज्या समाजाजवळ साहित्याचें सामर्थ्य नाहीं, तो समाज पारतंत्र्यांतून बाहेर येणें अशक्य आहे. नीग्रो लोकांच्या गुलामगिरीचें हेंच एक कारण आहे.

" कोणत्याहि देशाच्या विजयाच्या वा स्वातंत्र्याच्या झगड्यांत शस्त्रापेक्षां साहित्याचा उपयोग अधिक झालेला आढळून येईल. एलिझाबेथ राणीच्या काळीं स्पॅनिश आरमाराचा पराभव करून ब्रिटिशांनीं समुद्रावरील स्वामित्वाचा जो पाया घालून ठेवला, त्या वेळीं इंग्रजी साहित्याचें वैभव पराकाष्ठेला पोहोंचलें होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

" शिवरायांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन करण्याची जी मोहीम काढली, त्या वेळीं मराठी संतांची अभंगवाणी अलम मराठी जनतेला एकाच समान विचारसरणीच्या भूमिकेवर आणण्याचा प्रयत्न करीत होती. संतांच्या साहित्यानें साधलेल्या सहकार्याच्या सामर्थ्यावरच मराठी स्वराज्याची संस्थापना झाली."

त्यानंतर मराठी वाङ्मयाबद्दल बहुजनसमाजाला आजच्या काळांत जो जिव्हाळा वाटूं लागला होता, त्यांतच मराठी भाषेच्या परंपरेचा विजय आहे, ह्याची मीमांसा करतांना मी म्हणालों, " संस्कृताच्या आणि पांडित्याच्या दंभाविरुद्ध बंड पुकारण्यासाठींच मराठी भाषेची स्वतंत्र प्राणप्रतिष्ठा झाली. 'मराठीचा पक्ष हा सामान्यांचा, बाया–बापड्यांचा स्त्री-शूद्रादिकांचा, अतएव सकल जनांचा पक्ष' म्हणूनच स्थापन झालेला आहे. म्हणून समाजाच्या खालच्या थरापर्यंत भाषेचें नि साहित्याचें लोण पोहोंचवून बहुजनसमाजाची वैचारिक क्रांति घडवून आणणें हेंच आजच्या साहित्यिकांचें कर्तव्य आहे."

त्यानंतर ललित वाङ्मयाबद्दल बोलतांना मी म्हणालों, " बहुजनांना कळेल

अशा सुगम भाषेंत नि सुलभ पद्धतीनें हें साहित्य निर्माण व्हावयाला पाहिजे. लोकांना तें वाचतां आलें पाहिजे. आणि समजलें पाहिजे एवढेंच माझें म्हणणें आहे. लोकांसाठीं तयार झालेलें साहित्य वाचण्याची आवड जनतेमध्यें निर्माण होण्यासाठीं जर कोणत्या वाङ्मयाची आधीं जरुरी असेल तर ती ललित वाङ्मयाची. ललित वाङ्मय हें असें वाङ्मय आहे, कीं जनतेपर्यंत तें विनासायासानें पोहोंचूं शकतें. लोक तें आवडीनें आणि आनंदानें वाचूं शकतात. गाऊं शकतात. रंगभूमीवर आणि रुपेरी पडद्यावर पाहूं आणि ऐकूं शकतात. म्हणून ललित वाङ्मय हें लोकवाङ्मय आहे. तेंच खरें राष्ट्रीय वाङ्मय आहे असें मी म्हणतों.

"ललित वाङ्मय हें खरें लोकवाङ्मय आहे, ही भूमिका एकदां कायम केल्यानंतर हें ललित वाङ्मय अधिक तेजस्वी आणि सामर्थ्यशाली कसें होईल, लोकरंजनाचें, लोकशिक्षणाचें आणि लोकजागृतीचें त्याचें कार्य अधिक प्रभावशाली कसें होईल, याचा विचार करणें अवश्य आहे. कलात्मक मनोरंजन हें तर ललित वाङ्मयाचें स्वरूपच आहे. तथापि, केवळ मनोरंजन करणें एवढेंच ललित वाङ्मयाचें उद्दिष्ट नव्हे. समाजाच्या विविध जीवनावर प्रकाश पाडून त्या जीवनांतील प्रागतिक प्रवृत्तींचा पुरस्कार करावयाचा हा ललित वाङ्मयाचा प्रधान हेतु आहे.

"शेतकऱ्यांच्या आयुष्यांतले, खेडेगांवांतील लोकांच्या जीवनाचे कितीतरी प्रश्न अजून ललितवाङ्मयांत यावयाचे राहिले आहेत. सामाजिक जीवनांतील पुरस्सर प्रवृत्तीचें निदान करण्यासाठीं लेखकाला त्या त्या विषयाचें अचूक ज्ञान असावें लागतें. तरच तो वस्तुस्थितीचें यथायोग्य चित्रण करूं शकेल. समाजपरिस्थितीचें निदान करणारें वाङ्मय हेंच खरें वास्तववादी वाङ्मय म्हणतां येईल. वस्तुस्थितीचें निदान करावयाला इत्थंभूत वर्णनाची आवश्यकता नसते. रोग्याची नाडी, जीभ आणि छाती बघूनच वैद्याला त्याच्या रोगाची पूर्ण कल्पना होऊं शकते. त्याच्या शरीराचा भाग न् भाग तपासण्याची तज्ज्ञाला आवश्यकता वाटत नाहीं.

"झाडावरून पडणाऱ्या एकाच फळामध्यें गुरुत्वाकर्षणाच्या विश्वव्यापी कायद्याचें प्रतिबिंब न्यूटनला दिसून आलें. बागेंतील साऱ्या फळांचीं झाडें गदगदा हलवून बघण्याचा उपद्व्याप त्याला करावा लागला नाहीं. वर्णनाचा निष्कारण विस्तार न करतां समाजाच्या प्रातिनिधिक प्रवृत्तीवर एकदम बोट ठेवतां येणें यांतच खरी वास्तववादी कला आहे.

"वाङ्मयांतील समाजजीवन हें सत्यसृष्टींतील समाजजीवनामधून निवडून निराळें केलेलें जीवन आहे. जीवनांतील वास्तववाद आणि वाङ्मयांतील वास्तववाद ह्या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. पुष्कळांना जसा नकाशा वाचतां येत नाहीं, तसें पुष्कळांना वाङ्मयांतील वास्तव जीवन कळत नाहीं. नकाशा हें जसें जमिनीचें चित्र नव्हे, तसें वाङ्मयातील जीवन हें समाजाच्या दैनंदिन जीवनाचें चित्र नव्हे. नकाशांत जसा

प्रमाणाचा आणि सांकेतिक खुणांचा उपयोग केला जातो, तसें वाङ्मयीन चित्रणांतहि प्रमाण आणि संकेत गृहीत धरावे लागतात. वाङ्मयांतील पुष्कळशा घटना ह्या वाच्यार्थानें घ्यावयाच्या नसून लक्षणार्थानें घ्यावयाच्या असतात.

" वास्तववादी वाङ्मय समाजाच्या गतिमान जीवनाचें निदान करतें म्हणून त्याला पुरोगामी वाङ्मय असें म्हटलें जातें. मानवतेच्या अंतिम ध्येयाच्या दिशेनें मानवसमाजाची प्रगति घडवून आणणें हेंच वास्तववादी किंवा पुरोगामी वाङ्मयाचें प्रमुख लक्षण आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून त्याला जिंकावें, त्याचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें आणि त्याला शेंकडों वर्षें गुलामगिरींत ठेवावें हें मानवतेच्या विरुद्ध पाप आहे. स्वातंत्र्य हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. कोणत्याहि राष्ट्राला दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिसकावून घेण्याचा अधिकार नाहीं. ही विचारसरणी पुरोगामी लेखकांनीं निर्भीडपणें प्रसृत केली पाहिजे.

" समाजाच्या प्रगतीला चालना देणारें वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकाला समाजाच्या विविध स्वरूपांचें आणि लेखनकलेचें ज्ञान असून केवळ भागत नाहीं.तर त्याच्या लेखनामागें तत्त्वज्ञानाची स्पष्ट भूमिका असावी लागते. त्याच्या जीवनाला आणि लेखनाला सुसंगत विचारसरणी असणें जरूर असतें. अशी विचारसरणी असेल तरच त्याला आपल्या लेखनाबद्दल आत्मविश्वास वाटूं लागेल आणि त्याच्या हातून प्रभावी लेखन होत जाईल.

"साहित्याचा पक्ष हा जनतेचा पक्ष असल्यानें सर्व जनतेला सुखी करण्याचें तत्त्वज्ञान हेंच त्याच्या जीविताचें तत्त्वज्ञान असावें. जनतेच्या आकांक्षा ह्या त्याच्या आकांक्षा असाव्यात. जनतेच्या चळवळी आणि धडपडी ह्या त्याच्या चळवळी आणि धडपडी असाव्यात. जीवनाचें रहस्य समजून घ्यावयाचें असेल तर त्यानें त्या जीवनाच्या प्रवाहांत उडी घ्यावयाला पाहिजे.

" जनतेच्या जीवनाशीं आजपर्यंत लेखकवर्ग समरस होऊं शकला नाहीं. कारण मध्यम वर्गाचें प्रतिनिधित्व त्यांनीं पत्करलें. त्यामुळें त्यांच्या लेखनाबद्दल जनतेला जिव्हाळा वाटूं शकला नाहीं. आणि जनतेच्या भावनेच्या ताराहि त्याच्या लिखाणानें कधीं कंपित होऊं शकल्या नाहींत. लेखकांनीं ही वर्गीय दृष्टि सोडून जीवनकलहांत प्रत्यक्ष झगडणाऱ्या जनतेच्या निशाणाखालीं सामील व्हावें आणि क्रांतिकारक नेतृत्वाचीं सूत्रें हातीं घ्यावींत. "

माझ्या अध्यक्षीय भाषणांत साहित्यापेक्षां राजकारणच अधिक होतें आणि ह्या भाषणाचा कळस म्हणजे भाषिक महाराष्ट्राचा विचार मीं माझ्या भाषणामध्यें मराठी साहित्य संमेलनामध्यें प्रथमच मांडला. ते नेमके शब्दच सांगतों :

**" महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास महाराष्ट्राच्या आजच्या भौगोलिक सीमा भाषेच्या दृष्टीनें आंखलेल्या नाहींत. या सीमेपलीकडे राहणारी यच्चयावत् महाराष्ट्रीय जनता मराठी भाषेच्या छत्राखालीं एकत्रित झाली तरच मराठी भाषेचें सामर्थ्य आणि**

वैभव वाढणार आहे. आजच्या जगांतील सर्व आधुनिक ज्ञान, विज्ञान, विद्या, संशोधन ह्यांचा लाभ आणि प्रसार शुद्ध मराठी भाषेमधून यच्चयावत् समाजाला मिळेल अशी व्यवस्था व्हावयाला पाहिजे. ”

‘संयुक्त महाराष्ट्रा’ची पहिली घोषणा माझे वृत्तपत्रीय गुरु काकासाहेब लिमये ह्यांनीं १९४१ च्या पहिल्या पत्रकार संमेलनांत केली. आणि तीच घोषणा ‘महाराष्ट्र साहित्य संमेलना’च्या नाशिक अधिवेशनांत मीं पहिल्या प्रथम केली.

ह्या एकाच गोष्टीचा सर्व आयुष्यभर मला अभिमान वाटतो !

# २३

## ‘ चित्रमंदिर ’ विकलें !

स्त्रियांना व्यवहारांत कधीं भागीदार घेऊं आणि चित्रपटाच्या व्यवसायांत तर मुळींच नाहीं. कारण, त्यामुळें भावनात्मक संबंध निर्माण होतात आणि त्यांची गुंतागुंत व्यवहारामध्यें पुढें इतकी वाढत जाते कीं त्यामुळें सारा धंदाच कोलमडून पडतो. आणि चांगल्या कार्याचा सत्यानाश होतो. कोणी म्हणेल ही प्रतिगामी भूमिका आहे. हा केवळ दुराग्रह आहे. नाहीं; हा अनुभव आहे. लाखों रुपयांचें मोल देऊन आयुष्यांत विकत घेतलेला हा एक बहुमोल अनुभव आहे.

मुंबईत पाऊल टाकल्यानंतर महिना दोन महिन्यांच्या आंत मीं ‘ अत्रे पिक्चर्स ’ ची स्थापना केली आणि ‘ चित्रमंदिर ’ स्टुडिओ विकत घेतला. माझ्यासारख्या एका दरिद्री मराठी माणसानें मुंबईसारख्या औद्योगिक आणि व्यापारी केंद्रांत लाखों रुपयांचा प्रपंच उभा केला, हा खरोखरच केवढा चमत्कार ? तोंपर्यंत मुंबई शहरांत मराठी माणसाचा एकहि सिनेमा स्टुडिओ नव्हता. माझें ‘ चित्रमंदिर ’ हाच पहिला मराठी मालकीचा स्टुडिओ. माझें तें वैभव पाहून सारे लोक चकित झाले. आणि

माझा पहिला चित्रपट 'पायाची दासी' हा कमालीचा यशस्वी झाल्यानंतर ह्या माझ्या भाग्याला मुळीं सीमाच राहिली नाहीं. पण अवघ्या दोन वर्षांत माझें हें वैभव धुळीला मिळालें आणि 'चित्रमंदिर' सावकाराला विकून मला रस्त्यावर यावें लागलें!

त्याचीं कारणें अनेक आहेत. पण त्यांतलें एक प्रमुख कारण म्हणजे 'अत्रे पिक्चर्स'मध्यें वनमालेला भागीदार घेण्यांत मी जी फार मोठी चूक केली तें होय. उत्कृष्ट अभिनेत्रीला लागणारे सर्व गुण तिच्या अंगीं प्रकर्षानें वास्तव्य करीत होते. ती तरुण होती. सुंदर होती. सुशिक्षित आणि विद्यासंपन्न होती. मनाची अत्यंत कोमल आणि भावनाशील होती. कलेची, काव्याची नि वाङ्मयाची तिला उपजत आवड होती. वेषभूषेंत आणि वस्त्रभूषेंत ती पारंगत होती. नृत्यनिपुण होती. राजकन्येच्या सहवासांत जन्म गेल्यानें अश्वारोहण, शिकार, पोहणें, यांत कमालीची तरबेज होती. पराकाष्ठेची कष्टाळू आणि मेहनती होती. जीवनामध्यें तिचीं कांहीं श्रद्धास्थानें आणि मूल्यें होतीं. आणि हिंदी तर तिची मातृभाषाच होती.

सारांश, चित्रपटांत यशस्वी नायिका होण्यास लागणारी सर्व साधनसामग्री तिच्याजवळ सिद्धच होती. म्हणूनच 'पायाची दासी', 'शिकंदर' आणि 'वसंतसेना' ह्या तीन चित्रपटांत तिनें एवढी लोकप्रियता मिळविली कीं त्यानंतर भारतीय चित्रसृष्टींतली एक अग्रेसर तारका म्हणून तिची गणना होऊं लागली.

पण चित्रपटाचें जग असें भयंकर आहे कीं साक्षात् हरिश्चंद्र किंवा तारामती जरी ह्या वातावरणांत उतरलीं, तरी बोल बोल म्हणतां त्यांच्या अंगांतल्या सद्गुणांचें मातेरें झाल्यावांचून राहणार नाहीं. भारतीय चित्रपटसृष्टीमध्यें तर अशीं कैक उदाहरणें दाखवून देतां येतील. कोणीहि निर्माता यशस्वी झाला आणि त्याच्या चित्रपटाचा सर्वत्र बोलबाला झाला कीं त्याचें वाटोळें कसें होईल ह्याचीं कारस्थानें त्याच्याच आजूबाजूचे आणि त्याच्याच विश्वासांतले लोक अत्यंत धूर्तपणानें आणि कौशल्यानें रचावयास प्रारंभ करतात.

कोळ्याच्या जाळ्याइतका सूक्ष्म आणि तरल—पण त्यापेक्षांहि शतपटीनें घातकी आणि जहरी गळफांस आपल्याभोंवतीं हळूंहळू विणला जात आहे, ह्याची त्या बिचाऱ्या निर्मात्याला सुतराम् कल्पनाहि नसते. तो स्वतःच्या यशामध्यें धुंद आणि निर्धास्त असतो. वर स्वर्गाचें आढें ज्या वेळीं त्याच्या डोक्याला लागलेलें असतें, त्याच वेळीं त्याच्या पायांखालीं खड्डा खणला जात असतो.

'पायाची दासी' कमालीची यशस्वी झाल्यानंतर माझी स्थिति तशीच झाली. सारी चित्रसृष्टि जणुं कांहीं आपल्या मुठींत आली असा विलक्षण भ्रम माझ्या मस्तकांत शिरला आणि स्वतःच्या पात्रतेचा, मर्यादेचा आणि सामर्थ्याचा मला संपूर्ण विसर पडून आठ लाखांच्या हिंदी आणि मराठी भाषेंतल्या 'वसंतसेना' चित्रपटाचें शिव-

धनुष्य मीं रावणाप्रमाणें उचलण्याचा मूर्खपणा केला. त्याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला.

धारिष्टवान् माणसें कर्जाला किंवा अपयशाला भीत नाहींत. पण जिवाला जीव देणारीं माणसें साथ द्यावयास सोबत लागतात. मग वरून आभाळ तुटून पडलें तरी त्याची कांहीं पर्वा वाटत नाहीं. कर्जाचा एवढा मोठा डोंगर जो मीं अंगावर घेतला होता, तो मीं छातीठोकपणें वरच्यावर पेलला असता, झेलला असता. चित्रपट व्यवसायांतल्या माझ्या प्रतिस्पर्ध्यांच्या कारस्थानांची मीं बंभेरी वाजवली असती. पण खांद्याला खांदा देणाऱ्या माझ्या धंद्यांतल्या भागीदारानेंच जेथें कच खाल्ली तेथें भीमाची ताकद अंगांत असून तरी मी काय करणार?

'वसंतसेना' चित्रपटाचें सारें यश वनमालेच्या अभिनयावर आणि नृत्यावर अवलंबून होतें. खेरीज त्या चित्रपटांतील कलात्मक वेषभूषेची नि सजावटीची सर्व जबाबदारी तिच्यावरच होती. त्यासाठीं चौदा महिने ती अहोरात्र झगडली. रक्त ओकेपर्यंत तिनें काम केलें. हाडाचीं काडें केलीं. त्यांत कांहीं शंका नाहीं. पण त्यामुळें तिच्याहि डोक्यांत एक भ्रम शिरला, कीं केवळ आपल्या एकटीमुळेंच हा चित्रपट यशस्वी होणार आहे. आपण नसतों तर हा चित्रपट मुळीं निघूंच शकला नसता. ह्या तिच्या भ्रामक समजुतीमध्यें भर टाकणारे 'हितचिंतक' तिच्या आजूबाजूला बुरखे घेऊन वावरत होतेच.

अंगावरून जाणाऱ्या–येणाऱ्यानें हळूंच कुजबुजायचें, "'बाई' म्हणजे कंपनीचा प्राण आहे—सगळें हें जें चाललें आहे तें 'बाई'च्यामुळें!"

दुसऱ्यानें तिसऱ्याला सांगायचें, "बाईंना बाहेरच्या काय एकेक 'ऑफर्स' येताहेत!"

चौथ्यानें पांचव्याला म्हणायचें, "दुसरा कोणी असता तर बाईंना डोक्यावर घेऊन नाचला असता. इथें त्यांच्या गुणांची कोणाला कांहीं किंमत आहे काय?"

असले लहान मोठे 'आयागो' प्रत्येक चित्रपट कंपनींतल्या 'नायिके'भोंवतीं सदैव वावरत असतात. आणि त्यांच्या तोंडांतून प्रतिक्षणीं बाहेर पडणाऱ्या कावेबाज आणि मतलबी स्तुतीचें जहर तिच्या कानांतून एकदांका तिच्या मनांत शिरलें कीं मग तिचें मस्तक निरनिराळ्या विकारांनीं फणफणूं लागतें. तिचीं बुबुळें फिरतात. माणसांची आणि कर्तव्याची ती ओळखच विसरून जाते. वनमालेचें अगदीं तसेंच झालें.

मुंबईत असतांना मी दिवसभर हुंड्या काढण्यासाठीं मुलतान्यांचे नि त्या भरण्यासाठीं बँकांचे उंबरठे झिजवीत होतों. त्यामुळें चित्रमंदिरांत काय कारवाया चालल्या होत्या ह्याची मला सुतराम् जाणीव नव्हती. पुढें कंपनी कोल्हापूरला गेली. तिथें तिचा सहा महिने मुक्काम होता. मी मुंबईत अडकून पडलों होतों. पगार वांटण्यासाठीं महिन्यांतून काय दोन वेळां मी कोल्हापूरला जावयाचा तेवढाच. आणि

गेलों म्हणजे फार झालें तर चार दोन दिवस तिथें रहावयाचा, इतकेंच काय तें. त्यामुळें कोल्हापुरांतील माझ्या दीर्घकालीन गैरहजेरीचा फायदा कंपनीमधल्या आमच्या 'आयागो' मंडळींना साहजिकच मिळून त्यांनीं एकदम उचल खाल्ली आणि आपल्या काळ्या हालचाली जोरांत सुरू केल्या.

वनमालेची एक 'मावशी' होती. चांगली सुशिक्षित होती. तिचा नवरा दिल्लीला सचिवालयांत बडा अधिकारी होता. ही मावशी जितकी मूर्ख तितकीच पाताळयंत्री होती. कंपनीचा मुक्काम कोल्हापूरला असतांना हवा बदलण्याचें निमित्त करून या बयेनें आमच्याच कंपनींत येऊन तंबू ठोकला. माझ्याविरुद्ध चाललेल्या गुप्त कारस्थानाचा सुगावा लागावयाला तिला कांहीं फारसा वेळ लागला नाहीं. त्याबरोबर तिनें मोठ्या चलाखीनें त्या कारस्थानाचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं.

कोल्हापूरच्या मुक्कामांत आमच्या कंपनीचा रुबाब एखाद्या धनाढ्य संस्थानिकासारखा होता. शेंकडों माणसें जेवत होतीं. मोटरी पळत होत्या. पाण्यासारखा पैसा खर्च होत होता, हें मागेंच सांगितलें. हें सगळें वैभव दिखाऊ नि पोकळ असून तें सावकारांकडून भारी व्याजाच्या दरानें मीं काढलेल्या भरमसाट कर्जावर आधारलेलें होतें, हें तिन्हाइतांना कसें कळावें ?

तें वैभव बघून मावशीचे तर डोळेच फाटले. तिला वाटलें ही सारी गजांतलक्ष्मी केवळ आपल्या भाचीच्याच म्हणजे वनमालेच्या--नांवानें आणि पायगुणानें 'अत्रे पिक्चर्स'च्या गळ्यांत येऊन पडलेली असावी. त्याबरोबर तिचा मेंदू झपाट्यानें काम करूं लागला. आपण जर वनमालेला 'अत्रे पिक्चर्स'मधून बाहेर काढली आणि तिच्या नांवावर जर एक निराळी कंपनी काढली तर आपण सोन्यामोत्याच्या पलंगावर लोळूं असा तिच्या कल्पनेनें पेट घेतला.

कंपनींतल्या आयागोंनीं त्या आगींत आपल्या सहकार्याच्या आश्वासनाचें घासलेट ओतलें. मग काय विचारतां ! एकच भडका उडाला. आणि त्यांचे सारे बेत त्यावर एकदम शिजून पक्के झाले.

३० ऑक्टोबर १९४२ ला 'वसंतसेना' मुंबई शहरांत आणि इतरत्र दाखल झाली. त्याच सुमारास माझ्या अध्यक्षतेखालीं नाशिक येथील सव्विसाव्या साहित्यसंमेलनाला प्रारंभ झाला होता. समेलन आटोपून मी २ नोव्हेंबरला परत मुंबईला आलों. माझी तीन दिवसांची गैरहजेरी पुतनामावशीच्या पथ्यावर पडली. तिनें आपल्या थोरल्या भावाला म्हणजे 'कंसमामा'ला ग्वाल्हेर संस्थानांतून मुद्दाम मुंबईला बोलावून घेतलें होतें.

हा 'कंसमामा' त्या संस्थानांतल्या गंजबसोडा या गांवीं रहात होता. तेथून कांहीं अंतरावर असलेल्या देसाईखेड्यांत त्याची मोठी शेतीवाडी होती. त्यामुळें खाऊनपिऊन तो चांगलाच सुखी होता. कांहीं महिने तरी वनमालेला मुंबईतून काढून

कंसमामाच्या गांवीं तिकडे नेऊन ठेवावयाचें असा पुतनामावशीनें आणि तिच्या साथीदारांनीं बेत रचला. आतां पुन्हां मुंबईतून मी केव्हां बाहेर जातों आहें, त्या क्षणाची ही कटवाली मंडळी डोळ्यांत तेल घालून वाट पाहूं लागली.

आणि तो क्षण त्यांच्या सुदैवानें लौकरच चालून आला. १५ नोव्हेंबर हा माझी थोरली मुलगी शिरीष हिचा वाढदिवस. ती त्या वेळीं नाशिक येथें होती. माझी पत्नी तेथें कन्याशाळेची लेडी सुपरिंटेंडेंट होती. म्हणून मी १४ नोव्हेंबर रोजीं मुंबईहून नाशिक येथें गेलों. मला कल्पना नव्हती कीं आतां आपल्या मागें कोणतें भयानक नाटक घडणार आहे तें.

१६ नोव्हेंबर रोजीं निर्धास्त आणि बेफिकीर मनानें मी मुंबईला परत आलों आणि पहातों तों काय ? घर पार धुऊन नेलें होतें. घराची अक्षरशः धर्मशाळा झाली होती. साऱ्या भिंती विधवेच्या कपाळासारख्या ओक्याबोक्या झालेल्या होत्या. कांहीं कांहीं शिल्लक राहिलें नव्हतें.

माझ्या गड्यानें माझ्या हातांत एक पत्र दिलें. तें वनमालेचें होतें. त्यांत तिनें लिहिलें होतें कीं, " चित्रपटांतील कामाच्या श्रमानें मी थकलें आहें. माझें मानसिक स्वास्थ्यहि ठीक नाहीं. म्हणून कांहीं दिवसांसाठीं मी दूर कुठें तरी जातें आहे. माझा शोध करूं नये. आणि माझी काळजीहि करूं नये. परमेश्वर तुम्हांला सुखी ठेवो ! "

चांदण्यांत फिरणाऱ्या माणसाच्या डोक्यावर वीज तुटून पडावी आणि त्याच्या सर्वांगाच्या चिंधड्या उडाव्यात तशी माझी स्थिति झाली. ज्या गोष्टीची स्वप्नांत सुद्धां कधीं मीं कल्पना केली नव्हती, जी गोष्ट घडेल असें चुकून सुद्धां मला कधीं वाटलें नव्हतें, ती अकस्मात् घडून आल्यामुळें काय झालें ह्याचा कांहीं काळ मला बोधच होईना. माझा मेंदू मस्तकाच्या आंत भिरभिरूं लागला. सर्वांगांतून बर्फाचें पाणी झिरपावें अशी माझी स्थिति झाली आणि माझ्या हातापायांत कांहीं त्राणच उरला नाहीं.

असें कांहीं होईल ह्याची कणमात्र जरी मला आधीं कल्पना असती, तरी माझी अशी स्थिति झाली नसती. पण निर्धास्त मनानें आपण खात्रीच्या जागेवर पाय टाकावा आणि तेथूनच खालीं खड्ड्यांत कोलमडून उरफाटें तिरफाटें पडावें तशी माझी स्थिति झाली.

थोड्या वेळानें मी शुद्धीवर आलों. चित्त स्थिर केलें. कच खाण्याचा हा प्रसंग नव्हे, अशी मनाशीं खूणगांठ बांधली. आणि इतस्ततः सांडलेल्या भावना आणि ओघळलेले विचार गोळा करून पुन्हां मनाचें गाठोडें घट्ट बांधून टाकलें आणि आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यास निर्धारानें सिद्ध झालों.

घरांत फक्त बाबू ड्रायव्हर होता. मोटर नव्हती. कारण, ' वसंतसेना ' चित्र प्रकट होण्याच्या आधीं एका हुंडीच्या पोटीं मीं तिचा निकाल लावून टाकलेला होता. त्यामुळें मी अक्षरशः बे ' कार ' झालों होतों. वनमाला कुठें गेली, कधीं गेली हें बाबू

ड्रायव्हरला देखील सांगतां आलें नाहीं. कारण बाबू हा माझा इमानी सेवक असल्यानें त्याला देखील ह्या गोष्टीचा सुगावा न लागूं देण्याची काळजी घेण्यांत आली. आजूबाजूला चौकशी केल्यानंतर 'बाई' बडोद्याला गेल्याचें समजलें. त्यावर मीं बडोद्याला माझे मित्र प्रा. वि. पां. दांडेकर ह्यांना तार करून शोध घेण्यास सांगितलें. त्यांची दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं नकारार्थी तार आली.

'पुतनामावशी 'चा मुक्काम त्या वेळीं मुंबईला होता. तिचा हात या प्रकरणांत असेल असें मला स्वप्नांत सुद्धां कधीं वाटलें नाहीं. पण चार ठिकाणीं विचारावयाचें म्हणून मी सहज तिच्याकडे गेलों. आज ना उद्यां मी तिच्याकडे येणार ह्याची तिला खात्रीच होती. ती जणूं कांहीं माझी वाटच पहात होती.

तिनें तोंडावर असा कांहीं आव आणला होता कीं जसें कांहीं आपण त्या गांवचेच नाहींत. बोलून चालून नटीचीच मावशी ती. मी कशासाठीं आलों आहे, हें सांगितल्यानंतर बऱ्याच वेळानें अगदीं निर्विकारपणें ती म्हणाली, "कदाचित् ती आपल्या मामाकडे गेली असेल गंजबसोड्याला! मला कांहीं ती म्हणाली नाहीं तसें!"

"कुठें आहे हें गंजबसोडा?" मीं क्षीण स्वरांत चांचपडत चांचपडत विचारलें.

"तें लाब आहे तिकडे भोपाळच्या पुढें ग्वाल्हेरच्या रस्त्यावर!" मावशी हात वर फेकून म्हणाली, "पण तुम्ही तरी कशाला तिची एवढी परवा करतां आहांत? गेली तर गेली ती! येईल नाहीं तर नाहीं येईल! तुम्हांला छप्पन्न नट्या मिळतील तिच्यापेक्षां चांगल्या—"

"तसें नाहीं मावशी!" मी अजीजीनें म्हणालों, "ती अत्रे पिक्चर्सची भागीदार आहे. पुढच्या चित्रासाठीं आम्हांला करार करायचा आहे एका सावकाराशीं. त्याच्यासाठीं तिची सही लागेल. फार मोठी 'ऑफर' आली आहे मला. शिवाय आणखी दहा दिवसांनीं म्हणजे सत्तावीस नोव्हेंबरला 'वसंतसेना' दिल्लीला लागणार आहे. तिथें आम्हां दोघांच्या सत्काराचे मोठमोठे कार्यक्रम जाहीर झालेले आहेत! ती जर तिथें आली नाहीं तर आमच्या कंपनीच्या प्रतिष्ठेला धक्का बसेल!"

त्यावर मावशी काय बोलणार? थोड्या वेळानें मीं तिचा निरोप घेतला. जातां जातां मावशी मुरका मारून म्हणाली, "तुम्हांला माहीत नाहीं. वनमाला काय ॲक्टिंग करते अशी मी करून दाखवीन! तुम्ही माझ्यावर एकादें पिक्चर काढून तर बघा—"

तशाहि मनःस्थितींत हास्याची उबळ आवरून इतक्या गडबडीनें मी बाहेर पळालों, कीं जिना उतरतांना हातानें कठडा धरला नसता तर मी खालीं कोलमडलोंच असतों.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं बोरीबंदरवरून पेशावर एक्सप्रेसनें मी फर्स्टक्लासमधून दिल्लीच्या रोखानें निघालों. मावशीला ती कल्पना होतीच. माझ्या ओळखीचीं दोन

माणसें तिनें स्टेशनावर मला भिवविण्यासाठीं मुद्दाम पाठवून दिलीं. त्यांनीं मला सांगितलें कीं, " तुम्ही गंजबसोड्याला जाल तर कंसमामा तुम्हांला गोळी घालून ठार मारतील ! फार दुष्ट माणूस आहे तो ! '

मी त्यांना हंसून म्हणालों, " असल्या भुक्कड माणसाच्या हातून गोळी खाऊन मरायला मी जन्माला आलों नाहीं ! जा– "

तब्बल वीस तासांच्या कंटाळवाण्या प्रवासानंतर दुसऱ्या दिवशीं पांच वाजतां मी गंजबसोड्याला पोहोंचलों. अगदींच बुद्रुक स्टेशन आहे तें. दिवसांतून फक्त दोनदांच येणाऱ्या जाणाऱ्या मेलगाड्या तेथें थांबतात. आणि त्याहि केवळ मिनिट–दीड मिनिट. माझ्याजवळ फक्त एकच बॅग होती. ती मीं प्लॅटफॉर्मवर फेंकून दिली आणि खालीं उतरलों. स्टेशनवर कुत्रें देखील नव्हतें. इथून तिथून सारा फलाट लांबचे लांब उजाड. मला पाहतांच स्टेशनाच्या दारांतून एक माणूस पाठ फिरवून लांब लांब टांगा टाकीत बाहेर निघून गेल्याचा मला भास झाला. पण मी कांहीं फारसें लक्ष दिलें नाहीं.

मीं गंजबसोड्याला येणार असल्याचें वनमालेला आधींच तारेनें कळविलें होतें. त्यामुळें मला घेऊन जाण्यासाठीं स्टेशनावर कोणी तरी येईल अशा अपेक्षेनें बाहेरच्या बाकावर सामान घेऊन मी तसाच बसून राहिलों. एक तास झाला. दोन तास झाले. कोणीच येईना. अंधार पडूं लागला तेव्हां माझा धीर सुटला.

हळूंच मी उठलों, स्टेशनमास्तरच्या खोलींत गेलों. मला पाहतांच त्यांनीं हंसून नमस्कार केला. " अत्रे ना आपण ? " त्यांनीं आपण होऊन विचारलें.

" हो, " मी म्हणालों, " तुम्ही मला कसें ओळखलेंत ? "

" मी पूर्वीं पुण्याला भांबुर्डा स्टेशनवर होतों " ते म्हणाले, " तेथें तुम्हांला पुष्कळदां पाहिलें आहे. केव्हां आलांत ? "

" मला येऊन दोन तास झाले. मी बाहेर बाकावर वाट पहात बसलों होतों आलों तेव्हांपासून—"

" वनमालाबाईचीच ना—" मास्तर हलकेच पुटपुटले. आणि माझ्या आश्चर्यचकित मुद्रेकडे पहात म्हणाले, " अहो, इथला स्टेशनमास्तर मीच अन् तारमास्तरहि मीच ! तुमची तार मींच घेतली दुपारीं नि त्यांच्याकडे पाठवली ! "

तेव्हां मला उलगडा झाला. मी म्हणालों, " मास्तरसाहेब, कृपा करून माझा निरोप कळवतां का त्यांना ? त्या आपल्या मामांच्या घरीं रहातात—"

" मला माहीत आहे तें. " मास्तर म्हणाले, " मघाशीं पेशावर मेल आली त्या वेळीं त्यांचे मामा इथं स्टेशनावर आले होते. गाडी आली तसे ते गडबडीनें निघून गेले— "

मी स्टेशनावर उतरतांच एकदम पाठ फिरवून घाईघाईनें स्टेशनाबाहेर गेलेला तो माणूस कोण होता त्याचा मग मला बोध झाला.

मास्तरनीं माझी चिठ्ठी आपल्या नोकरामार्फत गांवांत पाठवली. पण दहा मिनिटां-तच त्यांनीं मामांकडून निरोप आणला कीं, "वनमालाबाई देसाईखेड्यावर गेल्या आहेत. त्या कांहीं इथें नाहींत!" तो निरोप ऐकून मी हतबुद्ध झालों. मास्तर कांहीं बोलले नाहींत.

मनाशीं कांहींतरी निश्चय करून मीं विचारलें, "मास्तर, आतां दिल्लीला जाणारी गाडी कधीं?"

मास्तर म्हणाले, "रात्रीं दीड वाजतां!"

कांहीं न बोलतां मान खालीं घालून मी बाहेर अंधारांत बाकावर येऊन बसलों. साडेसहा तास स्टेशनावर करायचें काय?

स्टेशनावर एकच घासलेटचा दिवा मिणमिणत होता. पाण्याचा नळ देखील कुठेंच नव्हता. दोन पैशांचे डाळ–चुरमुरे विकत घेईन म्हटलें तर तशी देखील कुठें सोय नव्हती. बसलों झालें तसाच अंधारांत. डोकें कामच करीत नव्हतें. तेव्हां विचाराचा प्रश्नच नव्हता.

थोड्या वेळानें स्टेशनमास्तर हळूच माझ्या शेजारीं येऊन उभे राहिले आणि प्रेमळ स्वरांत म्हणाले, "चला अत्रेसाहेब, जेवायचें वाढलें–!"

मी दचकून उठलों, "म्हणजे काय?"

"म्हणजे कांहीं नाहीं," मास्तर जिव्हाळ्यानें म्हणाले. "आज तुमच्या पंगतीचा लाभ तुम्हीं आम्हांला द्यायचा. पुण्यांत जो योग आला नाहीं तो इथें आला—"

"पण मला भूक नाहीं—" क्षीण स्वरांत मी म्हणालों.

"तुमची मनःस्थिति मला कळते" मास्तर म्हणाले, "पण दोन घांस तरी तुम्ही खाल्लेच पाहिजेत. मी ब्राह्मण आहें. तुम्हांला इथें बाहेर उपाशी ठेवून मी जेवणार नाहीं."

मी मुकाट्यानें उठलों नि त्यांच्यामागून गेलों. स्टेशनला लागूनच त्यांचें बिऱ्हाड होतें. हातपाय धुऊन मी जेवायला बसलों. जेवतांना मास्तर म्हणाले, "तुमच्या खाजगी गोष्टींत तोंड घालायचें मला कारण नाहीं. पण तुमच्याबद्दल आपलेपणा वाटतो म्हणून मी सांगतों. वनमालाबाई इथेंच आहेत. त्या देसाईखेड्याला गेल्या नाहींत. रोज सकाळीं स्टेशनावर फिरावयास येतात. त्या आजहि आल्या होत्या. त्यांच्या मावशीच्या कालपासून चारदोन तारा आल्या आहेत इथें. त्यावरून तुमच्याबद्दल त्यांचा कांहीं तरी विपरीत डाव दिसतो आहे. तेव्हां तुम्ही सावध असलेलें बरें, एवढेंच मी तुम्हांला बजावतों."

जेवण झाल्यानंतर मास्तरांचा निरोप घेऊन मी बाहेर स्टेशनावरच्या अंधारांत येऊन बसलों. त्यावेळीं मात्र माझा धीर सुटला. आणि हॅम्लेटसारखी माझी मनःस्थिति

झाली. स्त्री जातीच्या चांगुलपणावरचा माझा विश्वासच उडाला. मनुष्य आत्महत्या करण्यास कां प्रवृत्त होतो ह्याचा थोडासा प्रत्यय मला त्या रात्रीं आला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी दिल्लीला येऊन पोचलों. ' वसंतसेना ' चित्रपटाच्या प्रकाशनाची प्राथमिक तयारी करण्याच्या गडबडींत स्वतःला मी विसरून गेलों. ठिकठिकाणीं माझा सत्कार होत होता. मेजवान्या मिळत होत्या. पण त्यांत माझें मन नव्हतें. ' वसंतसेना ' चित्रपटाचें दिल्लीमध्यें प्रचंड स्वागत झालें. त्याच्या स्तुतीनें तेथील वर्तमानपत्रांचे स्तंभ दुथडी भरून वाहूं लागले.

दिल्लीला ' मावशी 'चे यजमान सचिवालयांत बडे अधिकारी होते. त्यांनीं मला आपल्या ऑफिसांत बोलावून वनमालेची ' अत्रे पिक्चर्स 'मधील आपल्या हिस्स्याच्या मागणीची कायदेशीर नोटीस माझ्यावर बजावली. तिचे तुकडे त्यांच्याच टेबलावर फेकून मी परत आलों. कशाचेंच कांहीं मला त्या वेळीं वाटेनासें झालें होतें.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत मी मुंबईला परत आलों. आतां पुढें काय हा प्रश्न माझ्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. ' वसंतसेना ' हा चित्रपट आर्थिक दृष्ट्या अयशस्वी ठरवून माझा ' चित्रमंदिर ' स्टुडिओ नि पूर्वींचे चित्रपट गिळंकृत करण्याच्या तयारीला माझे वितरक मंचरजी बिलिमोरिया लागले होते. माझी भागीदार नि नायिका वनमाला निघून गेल्याचें त्यांना समजल्यामुळें नव्या चित्रपटाचा करार माझ्याशीं करण्यास त्यांनीं साफ नकार दिला.

एवढ्यांत गंजबसोड्यावरून वनमालेची मला तांतडीची तार आली. " मला पश्चात्ताप झालेला आहे, आहे तशी मला घेऊन जा. " पुन्हां गंजबसोड्यापर्यंत प्रवास करण्याची मला हिंमतच नव्हती. तिला आणण्यासाठीं मीं माझे मित्र शामराव भोळे ह्यांना पाठविलें. त्यांनीं मामांच्या नि मावशीच्या ( ती त्या वेळीं तिथें गेली होती. ) हातावर तुरी देऊन मोठ्या शिताफीनें एका वस्त्रानिशीं तिला परत मुंबईंत आणलें. तिचे दागदागिने, कपडे सर्व मामाजवळ तसेच तिकडे राहिले. ( ते पुढें चार वर्षांनीं ग्वाल्हेरच्या महाराजांनीं परत मिळवून दिले. )

झालेल्या सर्व प्रकारामुळें वनमालेला चांगलीच अद्दल घडली. त्यामुळें तिची मानसिक स्थिति इतकी बिघडली, कीं ती पूर्वपदावर यावयाला एक महिना लागला. पण एवढें होऊन उपयोग काय ? तिच्या अविचारी वर्तनामुळें ' अत्रे पिक्चर्स 'चा सत्यानाश झाला. माझी असहाय स्थिति पाहून बिलिमोरियांनीं मला खिंडींतच गांठलें. ' वसंतसेना ' चित्रपटासाठीं दिलेल्या सर्व कर्जाची त्यांनीं एका रकमेनें तांतडीची मागणी केली. आम्ही सुशिक्षित माणसें. धंद्याचा आम्हांला अनुभव नाहीं. घरच्या नि बाहेरच्या परिस्थितीनें आम्हीं आधींच भेदरून गेलेलों. त्यामुळें कर्जफेडीच्या मागणीनें मी एकदम गर्भगळित झालों.

२८ फेब्रुवारी १९४२ रोजीं ‘ चित्रमंदिर ’ स्टुडिओ, ‘ पायाची दासी ’ आणि ‘ वसंतसेना ’ या दोन्ही चित्रपटांसह साडेचार लाखाला बिलिमोरियाला विकून आणि साडेतीन लाख रुपये कर्ज स्वतःच्या डोक्यावर घेऊन मी, वनमाला आणि हरिभाऊ मोटे त्यांच्या ऑफिसांतून बाहेर पडलों.

स्मशानांत मेलेल्या माणसाला जाळून आणि खांद्यावर ओले पिळे टाकून घरीं येतांना जसें वाटतें, तसें आम्हांला त्या वेळीं वाटलें. घरीं येऊन आम्हीं ढसढसा रडलों!

दोन वर्षांचें स्वप्न समाप्त झालें !

## २४

## मी लक्षाधीश झालों असतों !

'चित्रमंदिर' मीं फक्त तीस हजाराला विकत घेतलें होतें. पण तें मीं बिलिमोरियाला एक लक्ष चाळीस हजाराला विकलें. कारण, दोन वर्षांच्या माझ्या मालकीच्या काळांत मी हजारों रुपयांची यंत्रसामग्री आणि मालमत्ता 'चित्रमंदिरा'साठीं खरेदी केलेली होती. त्या दृष्टीनें मीं तें कमीच किंमतीला विकलें असें म्हणावयाला पाहिजे. पण सावकारानें मला अडचणींत पकडलें होतें. म्हणून मला हवी ती किंमत मिळूं शकली नाहीं.

वस्तुतः, त्या काळांत नवा स्टुडिओ बांधणें किंवा विकत घेणें ह्या गोष्टी सर्वस्वी दुरापास्त होत्या. ती धंद्याची परिस्थिति आम्हांला माहीत नव्हती असें नाहीं. पण व्यवहारांत मनुष्याची घसरगुंडी एकदां का सुरू झाली म्हणजे तो इतका असहाय होतो कीं त्याला सगळें कळत असूनहि कांहीं करतां येत नाहीं. उघड्या डोळ्यांनीं त्याला आपला अधःपात पहावा लागतो. तसें माझें त्या वेळीं झालें.

तरी मी त्या वेळीं बिलिमोरियांना म्हणालों कीं, "तुम्ही मला हा स्टुडिओ विकावयाला सांगतां आहांत खरें, पण

स्टुडिओ गेल्यानंतर माझ्या चित्रपटाची निर्मिती मी कुठें करूं ?" तेव्हां त्यांनीं स्टुडिओ विक्रीच्या करारांत वर्षांतून माझे दोन चित्रपट काढून देण्याची लेखी हमी मला दिली.

पण तो नुसता माझ्या तोंडाला पानें पुसण्याचा एक प्रकार होता. कारण बिलिमोरियाला पुढें करून माझा 'चित्रमंदिर' स्टुडिओ सुप्रसिद्ध निर्माते आणि दिग्दर्शक जयंत देसाई आणि त्यांचे थोरले बंधु छोटूभाई देसाई यांनीं खरोखर विकत घेतलेला होता. ती गोष्ट स्टुडिओचें खरेदीखत झाल्यानंतर मी जेव्हां माझ्या नवीन चित्रपटाची व्यवस्था करावयाला त्या स्टुडिओमध्यें गेलों, तेव्हां मला समजली. मनांतल्या मनांत मी खूपच चरफडलों. पण आतां त्याचा काय उपयोग होता ?

'वसंतसेना' चित्रपटानें माझी सर्वस्वी वाताहत लागल्याकारणानें खरोखर नवीन चित्रपट काढण्याची माझी मुळीं ताकदच नव्हती. पण लाखों रुपयांचें वाटोळें होऊन जणुं कांहीं माझ्या अंगावरून त्याचें वारें सुद्धां गेलें नाहीं, असें जगाला दाखवण्यासाठीं मीं उसनें अवसान आणून तांतडीनें मार्च १९४३ मध्यें माझ्या 'बाईलवेडा' या नवीन मराठी चित्रपटाचा मुहूर्त केला.

'संत सखू'च्या लोकप्रिय नि कौटुंबिक कथाभागावर ज्याप्रमाणें 'पायाची दासी' हा चित्रपट मीं काढला, आणि म्हणूनच तो यशस्वी झाला, त्याप्रमाणें 'बाईलवेडा' ह्या कथानकाची उभारणी मीं 'पुंडलीका'च्या आख्यानावर केली. एका महिन्याच्या आंत मी ती कथा लिहून पुरी केली.

खरें पाहतां या चित्रपटाचें दिग्दर्शन मला स्वतःलाच करावयाची इच्छा होती. पण त्या वेळीं माझ्या इतर सावकारांनीं माझ्यावर कोर्टांत भराभर दावे गुदरल्यामुळें मला रोजच्या रोज कोर्टाचे उंबरठे झिजवणें भाग होतें. म्हणून निदान त्या मनःस्थितींत तरी आयुष्यांतील माझें पहिलेंच दिग्दर्शन त्या वेळीं पुरें करावें असें मला वाटत नव्हतें. एवढ्यासाठीं माझ्या 'लपंडाव' चित्रपटाचें दिग्दर्शन ज्या के. नारायण काळ्यांनीं पूर्वी केलें होतें, त्यांना मुद्दाम पाचारण करून त्यांच्याकडे 'बाईलवेड्या'चें दिग्दर्शन मीं सुपूर्द केलें.

त्या वेळच्या माझ्या चमत्कारिक मनस्थितीची पुष्कळांना कल्पनाहि होणार नाहीं. हुंडीवाल्यांनीं माझ्यावर हजारों रुपयांच्या फिर्यादी कोर्टांत दाखल केल्या. त्यांचें देणें द्यावयाला माझ्याजवळ होतें काय तीन चव्वल ? जें होतें तें बिलिमोरियांनीं गिळंकृत करून टाकलें. मग ह्या फिर्यादींच्या चक्रव्यूहांतून बाहेर वाट कशी काढावयाची ? तो मार्ग मला 'मेसर्स खंडेराव, लाड, कंपनी'चे सॉलिसिटर के. एस्. रेळे ह्यांनीं दाखवला.

कोणाहि सावकारानें 'स्मॉल कॉज'मध्यें माझ्यावर फिर्याद केली रे केली कीं, तिला 'लॉंग कॉज'मध्यें ढकलून द्यायचें. म्हणजे पुढें चार वर्षें तिची आपल्याला

कटकट नको. हा एकच सरधोपट खाक्या के. एस. रेळे सॉलिसिटर ह्यांनीं पत्करला आणि त्या कर्जांच्या जंजाळामधून माझी कांहीं काळ तरी सुटका केली. हे के. एस्. रेळ्यांनीं माझ्यावर खरोखर फार मोठे उपकार केले, यांत कांहीं शंका नाहीं.

त्या काळांत के. एस्. रेळे हे माझा फार मोठा आधार होते. त्यांनीं मला धीर देऊन चित्रपट व्यवसायांत पुन्हां पायावर उभें केलें. आणि मला नवीन जीवन दिलें. (पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, पुढें कांहीं वर्षांनीं कांहीं आर्थिक अडचणींत सांपडल्यामुळें एके दिवशीं पहांटे स्वतःच्या छातीवर पिस्तूल झाडून स्वतःच के. एस्. रेळे ह्यांनीं आत्महत्या केली.)

'बाईलवेडा' चित्रपटाची नायिका अर्थात् वनमालाच होती. बाकीच्या भूमिकांसाठीं अगदींच सर्वसामान्य नटनटींची निवड करण्यांत आली होती. कारण, त्यांना द्यावयाला आमच्याजवळ पैसे होतेच कुठें मुळीं ? पण त्यांतल्या त्यांत विनोदी भूमिकेसाठी आम्हीं हिंदी चित्रपटक्षेत्रामध्यें पराकाष्ठेचा लोकप्रिय झालेला नट 'दीक्षित' ह्याला घेतलें.

पाश्चात्त्य चित्रपटांत एक वेळ जशी लॉरेल आणि हार्डी ह्या 'जाड्या-रड्यां'ची जोडी गाजली, त्याप्रमाणें हिंदी चित्रपटसृष्टींत 'रणजित फिल्म कंपनी'च्या 'दीक्षित-घोरी' ह्या जोडीनें सारा हास्यरस निर्माण करण्याचा जणुं कांहीं मक्ताच त्या वेळीं घेतला होता. 'बाईलवेडा' हें दीक्षित यांचें मराठी चित्रपटांतील पहिलें आणि शेवटचें काम !

मनोहर दीक्षित यांचा जन्म कायस्थ प्रभु जातींत झालेला होता. त्यांचे वडील जनार्दनपंत दीक्षित हे तरुणपणीं कोर्टामध्यें एक बेलीफ होते. पण ते अतिशय महत्त्वाकांक्षी असल्यानें बेलिफाचे वकील झाले. वकिलाचे 'डिस्ट्रिक्ट जज्ज' झाले. आणि ज्या दिवशीं मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाली, त्याच दिवशीं ते मरण पावले. आणि योगायोगाची गोष्ट अशी, कीं त्याच दिवशीं उच्च शिक्षणासाठीं मनोहर दीक्षित विलायतेला प्रयाण करणार होता. पण वडिलांच्या आकस्मिक मृत्युमुळें त्याच्या सर्व आकांक्षा रसातळाला गेल्या आणि निराश मन:स्थितींत कशांत तरी लक्ष गुंतवायचें म्हणून त्यानें एका मित्राच्या नादानें रणजित कंपनींत प्रवेश केला.

मनोहर हा शरीरानें जरी कमालीचा स्थूल असला, तरी वृत्तीनें तो अत्यंत कोमल आणि भावनाप्रधान होता. त्याची बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्ति विलक्षण तल्लख होती. संस्कृत आणि इंग्रजी ग्रंथांमधील कित्येक वाङ्मयीन उताऱ्यांचें त्याचें पाठांतर विस्मयजनक होतें. स्वभावतःच तो गमत्या आणि नकलाखोर असल्यानें, चार मंडळीमध्यें बसला कीं तो निरनिराळ्या हास्यकारक गोष्टी सांगून आणि विशेषतः पारशांच्या

नकला करून श्रोत्यांना पोट धरधरून हंसवीत असे.

त्यामुळें चित्रपटसृष्टींत शिरतांच विनोदी भूमिका आपोआपच त्याच्याकडे जणुं वाट चालतच आल्या. त्या काळांत त्यांनीं एवढें यश मिळविलें कीं चार पांच वर्षांच्या आंत हिंदी चित्रपटसृष्टीमधील अग्रेसर विनोदी नट म्हणून अखिल भारतांत त्यांनीं कीर्ति मिळविली. असा अखिल भारतीय कीर्तीचा नट मराठी चित्रपटासाठीं मला मिळावा हा खरोखरच एक योगायोग होता.

वनमालेला पैशाच्या आणि दागिन्यांच्या लोभानें गंजबसोडा येथील तिच्या 'मामा' नें कांहीं काळ कसें डांबून ठेवलें होतें त्याचा इतिहास मागील प्रकरणांत आलेलाच आहे. 'बाईलवेड्यां'त त्याच मामाचें चित्र 'नारूमामा' या भूमिकेंत मीं रेखाटलें आणि ती भूमिका दीक्षित ह्यांना दिली शकारासारखीच ती बाह्यतः विनोदी पण अंतःकरणांतून दुष्ट माणसाची भूमिका होती. दीक्षितांनीं ती भूमिका बहारीची वठविली.

हास्य आणि करुण रसानें हा चित्रपट आमूलाग्र ओथंबलेला होता. त्यांतील माझीं कांहीं काव्यें सुंदर होतीं. हळदीकुंकवाच्या समारंभाच्या निमित्तानें झोपाळ्यावर बसून कांहीं सासुरवाशिणी मुली जें गाणें म्हणत आहेत तें येथें देण्यासारखें आहे :

आंब्याच्या राईंत गाई
    गाई कोकिळा
माझ्या ग दारांत हाले,
    हाले झोपाळा ! १

माझ्या झोपाळ्याला
    रेशमाचे गोंडे,
हालती मागें पुढें
    या ग या आतां पुढें,
झोके चला उंच घेऊं
    जाऊं आभाळा ! २

गोड गोड बाळपण
    गेलें माहेरीं,
सोसवेना ताबेदारी
    परक्याचे घरीं,
लेकीच्या जन्मा नको
    घालुं हरी !
कुंकवाच्या चिरी जन्मभरी
    राहो कपाळा ! ३

अताराच्या सुखासाठीं
आम्ही भुकेल्या,
नको नको चंद्रहार
बिंदी–पाटल्या,
मोत्याची शोभा ग
पोतीला काळ्या
ओटींत बाळ माझ्या खेळो,
देवा दयाळा ! ४

ह्या चित्रपटांत एक नायकिणीची भूमिका होती. ती सुप्रसिद्ध गायिका वत्सला कुमठेकर हिला दिलेली होती. हिंदी चित्रपटसृष्टींत अनेक मधुर आवाजाच्या गायिका होऊन गेल्या असतील. पण वत्सला कुमठेकरसारखा मधुर आणि मादक आवाज आम्हीं तरी आमच्या आयुष्यांत कधीं ऐकला नाहीं.

' बाईलवेडया 'त मीं तिच्या तोंडी एकच लावणी टाकली होती, पण ती त्या वेळीं कमालीची लोकप्रिय झाली.

बोलाफुलाची गांठ राया पडली,
नुसतं पाहिलन्
प्रीत माझी जडली ! १
दारावरून
जातांना तुला दुरून
पाहिलं मी चोरून
तिनिसांजा हो,
नुसतं पाहिलन्
प्रीत माझी जडली ! २
तुझा गोरागोरा पान
सख्या चेहरा,
जसा पुनवेचा चांद
नभीं हांसरा
तुझ्या डोळ्यांत राया
शुक्रतारा,
फुले मुखांत तुझ्या
जाई मोगरा,
टांच मारून
गेला हो घोड्यावरून

टाकला जीव भारून
तिनिसांजा हो,
नुसते हंसलान्
झोप माझी मोडली ! ३

‘ब्राईलवेडा’ चित्रपटाचे संवाद अतिशय प्रभावी होते. अनेक रोमहर्षक नाट्य-प्रसंग त्यामध्यें होते. पण एवढें असूनहि हा चित्रपट आर्थिक दृष्ट्या कांहीं यशस्वी होऊं शकला नाहीं. कारण, वनमाला आणि दीक्षित या दोघांखेरीज त्या बोलपटाला दुसरें कसलेंच आकर्षण नव्हतें आणि त्याचें दिग्दर्शन अगदींच सामान्य होतें. पुण्यांत आणि मुंबईत हा बोलपट सातआठ आठवड्यांपेक्षा कांहीं जास्त काळ टिकूं शकला नाहीं.

त्यानंतर फारसा वेळ न घालवितां ‘दिल की बात’ ही चित्रकथा मीं लिहिली. ‘प्रेम कीं पैसा’ या नेहमींच्याच विषयावर ही कथा आधारलेली होती. हें जरी खरें असलें, तरी ही कथा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेच्या आणि प्रभावी नाट्यप्रसंगाच्या भोंवतीं गुंफलेली असल्यानें तिच्या भोवतीं एक निराळेंच नावीन्य निर्माण झालेलें होतें. हा चित्रपट हिंदीमध्यें घेण्याचें मीं ठरविलें. आणि त्याचें दिग्दर्शन मीं स्वतःच करावयाचें मुक्रर केलें. माझ्या आयुष्यांतलें चित्रपटाचें हें माझें पहिलेंच दिग्दर्शन होय.

चित्रपटाच्या व्यवसायामध्यें दिग्दर्शन ही सर्वांत अवघड गोष्ट होय ह्याची मला पहिल्यापासून जाणीव असल्यानें, मी दिग्दर्शनाच्या भानगडींत तोंपर्यंत कधींच पडलों नाहीं. तथापि, आपण स्वतः दिग्दर्शक झाल्याखेरीज आपल्या लेखनांतला आशय आणि भावना आपल्याला पाहिजे तशा स्वरूपांत रुपेरी पडद्यावर प्रकट करतां येणार नाहींत, हें शल्य अनेक वर्षांपासून माझ्या हृदयांत सलत होतें. मास्टर विनायकांनीं माझ्या अनेक चित्रपटांचें उत्कृष्ट दिग्दर्शन करून स्वतः फार मोठी कीर्ति मिळवली आणि मलाहि मिळवून दिली हें खरें. तथापि माझ्या कथेमधलीं अनेक स्थळें मला पाहिजे होतीं त्या स्वरूपांत आणि त्या उत्कटतेंत ते चित्रपटामध्यें रंगवूं शकले नाहींत, ही माझी पहिल्यापासून तक्रार होती.

मला स्वतःला तर नेहमीं वाटत असे कीं, चित्रकथा या साहित्यिकांनींच लिहाव्यात आणि त्यांनींच त्याचें दिग्दर्शन करावें. त्याखेरीज साहित्यकाराला वाङ्मयांत जो रसपरिपोष करतां येतो, त्याचा परिणामकारक उठाव रुपेरी पडद्यावर होऊं शकणार नाहीं. केवळ तंत्राच्या आहारीं गेलेले अशिक्षित आणि धंदेवाईक दिग्दर्शक हे चित्रकथेंतलें वाङ्मय आणि रस सपशेल मारून टाकतात असा माझा अनुभव आहे.

चित्रपटाचें तंत्र निर्माता या नात्यानें मीं केवळ लांबूनच पाहिलें होतें. त्याच्या

दिग्दर्शनाचा प्रत्यक्ष अनुभव असा मला मुळींच नव्हता. तथापि, मला माहीत नव्हतें असें त्यामध्यें कांहींच नव्हतें. माझ्या दृष्टीनें, माझ्या बुद्धीनें आणि माझ्या कल्पनेनें मीं दिग्दर्शनाचें वर्षानुवर्षं अवलोकन केलें असल्यानें, एकादा सराईत पोहोणारा पाण्यांत उडी मारल्यावर जसा सपासप हात मारूं लागतो, तितक्या सफाईनें आणि आत्मविश्वासानें कोणाचीहि मदत न घेतां मी माझ्या चित्रपटाचें दिग्दर्शन झपाट्यानें करूं लागलों. तें पाहून चित्रपट व्यवसायांतल्या कांहीं मुरब्बी दिग्दर्शकांनीं अक्षरशः तोंडांत बोटें घातलीं.

ह्या चित्रपटामध्यें मी उत्तमोत्तम नटनटींचा संच जमा करण्याचा प्रयत्न केला होता. वनमाला, दुर्गा खोटे, ईश्वरलाल आणि दीक्षित ह्या त्या वेळच्या अत्यंत लोकप्रिय नटनटींना ह्या चित्रपटांतल्या महत्त्वाच्या भूमिका देण्यांत आलेल्या होत्या. आज भारतांतले सर्वश्रेष्ठ संगीत दिग्दर्शक म्हणून समजले जाणारे सी. रामचंद्र हे ह्या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक होते. किंबहुना त्यांचें 'सी. रामचंद्र' हें नांव प्रथम ह्याच माझ्या बोलपटांत झळकलें. आज एका चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनासाठीं लाख लाख रुपये घेणाऱ्या ह्या थोर संगीत दिग्दर्शकाला त्या वेळीं मी किती 'बिदागी' दिली होती, तिचा आंकडा जर सांगितला तर तो कोणाला खराहि वाटणार नाहीं.

ह्या चित्रपटांतल्या नृत्याचें दिग्दर्शन सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यकार लच्छुमहाराज ह्यांनीं केलें होतें. 'बाईलवेड्या'मध्यें ज्याप्रमाणें वनमालेच्या 'मामा'ला मी चितारलें होतें, त्याप्रमाणें 'दिल की बात'मध्यें मी तिच्या 'पुतनामावशी'ला चितारून तिची चांगलीच बंभेरी उडवली होती. ती भूमिका दुर्गा खोटे ह्यांनीं अतिशय परिणामकारक रीतीनें वठवली होती. काव्य, नाट्य आणि विनोद ह्यांचा अत्यंत प्रभावी समन्वय मी या चित्रपटांत साधला होता.

ह्या चित्रपटाचें वितरण 'पिअरलेस पिक्चर्स'नें केलें होतें. मुंबईच्या लॅमिंग्टन रोडवरील 'मिनर्व्हा' टॉकीजमध्यें हा चित्रपट १९४४ च्या मे महिन्यांत लागला. तो तेथें पुष्कळ आठवडे चालला होता. मीं दिग्दर्शित केलेल्या या पहिल्या हिंदी चित्र-पटाची 'फिल्म इंडिया'चे संपादक बाबूराव पटेल आणि दे. भ. कन्हय्यालाल मुनशी ह्यांनीं मुक्तकंठानें प्रशंसा केली, एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या गुणासंबंधीं अधिक सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. आर्थिक दृष्ट्या हा चित्रपट फारसा फायदेशीर झाला नसला तरी त्यापासून तोटा मुळींच झाला नाहीं यालाच मी विशेष महत्त्व देतों.

ही सर्व हकीगत सांगण्यापूर्वीच एक विलक्षण आश्चर्यकारक आणि चमत्कारिक घटना माझ्या चित्रपटीय जीवनांत घडून आली ती सांगावयाला पाहिजे होती. ती आतां सांगतों. २८ फेब्रुवारी १९४३ रोजीं मीं माझा स्टुडिओ विकला. त्यानंतर बरोबर एक महिन्यानें भारत सरकारनें चित्रपट व्यवसायावर नियंत्रण घातलें. त्यामुळें

चित्रपटाच्या सृष्टींत भयंकर क्रांति घडून आली.

एक रुपयाला वीस रुपयांची किंमत आली. जो माझा स्टुडिओ मी सव्वा लाखाला विकला, त्याची किंमत एकदम वीस लाख झाली आणि जो स्टुडिओ आम्हीं अडीचशें रुपये रोजानें भाड्यानें देत होतों, त्याला रोजचें अडीच हजार रुपये भाडें येऊं लागलें.

१९४५ पासून 'लायसेन्स' असल्याखेरीज चित्रपट काढतां येणार नाहीं असें सरकारी फर्मान निघालें. तेव्हां चित्रपट निर्मितीच्या लायसेन्ससाठीं मीं दिल्लीला अर्ज केला. एका महिन्याच्या आंत मला तीन चित्रपटांचीं लायसेन्स आलीं. त्यांतला एक चित्रपट सरकारी प्रचारपट काढावयाचा असा निर्मात्यावर निर्बंध होता.

चित्रपटांचीं तीन 'लायसेन्स' मला मिळालीं खरीं. पण माझ्या खिशांत चित्रपट निर्मितीसाठीं एक दमडादेखील नव्हता. तेवढ्यांत दुसऱ्या युद्धामुळें गबर झालेले भांडवलवाले चित्रपटाचा लायसेन्स विकत घेण्यासाठीं सैरावैरा हिंडूं लागले. त्याचा एक निराळा बाजारच तयार झाला. एका लायसेन्सचा भाव पांच हजारांपासून वाढत वाढत दीड लाखापर्यंत जाऊन पोहोंचला.

मीं माझ्या नशिबाची परीक्षाच पहावयाचें ठरविलें आणि म्हणून शेवटपर्यंत मी दम धरला. एका एका लायसेन्सचा भाव जेव्हां दीड लाखापर्यंत जाऊन पोहोंचला, तेव्हां दोन लायसेन्स मीं शेट चुनीभाई देसाई ह्यांना एकदम तीन लाखांना विकून टाकलीं.

भाड्याच्या टॅक्सींत मी एक भली मोठी 'सूट केस' घेऊन देवकरण नानजी बँकेंत गेलों. आणि तेथें तीन लाख रुपयांचे चेक वटवून त्या साऱ्या हजाराहजारांच्या नि शंभराशंभरांच्या नोटा त्या केसमध्यें भरल्या आणि माझ्या निरनिराळ्या हुंडीवाल्यांच्या घरीं जाऊन अन् तीं नोटांचीं पुडकीं त्यांच्या तोंडावर मारून एका दिवसांत मी संपूर्ण कर्जमुक्त झालों.

संध्याकाळीं घरीं परत आलों. त्या वेळीं तीन लाखांतून माझ्याजवळ अवघे बावीस रुपये दहा आणे उरले होते. तेव्हां आजूबाजूचे दोन चार मित्र जमविले आणि आम्ही सगळ्यांनीं 'ऑम्लेट' खाऊन जिवाची मुंबई केली. त्या रात्रीं मला जशी झोंप आली तशी आजपर्यंत माझ्या आयुष्यांत कधीं आली नसेल.

—खरोखरच. २८ फेब्रुवारी १९४३ ला माझा स्टुडिओ न विकतां मी जर १ एप्रिल १९४३ पर्यंत थांबलों असतों, तर मी अक्षरशः लक्षाधीश झालों असतों. हुकला तो चान्स ! आयुष्यांत मी अनेक चुका केल्या. पण त्या सर्वांमध्यें ही चूक अक्षम्य होती.

## २५

## अत्रे प्रिंटिंग प्रेस

'चित्रमंदिर' स्टुडिओ विकल्यानंतर माझ्या चित्रपट निर्मितीचा पायाच मुळीं ढासळला. बिलिमोरियांनीं मला फसवून तो स्टुडिओ जयंत देसाईंच्या घशांत घातला. हें मागल्या प्रकरणांत सांगितलें. जयंत देसाईंनीं त्या स्टुडिओचें 'चित्रमंदिर' हें नांव बदलून त्याला 'जुपिटर स्टुडिओ' हें नांव दिलें. कारण स्टुडिओच्या विक्रीचा व्यवहार 'गुरुवारीं' झालेला होता. त्या स्टुडिओंत 'बाईलवेडा' अन् 'दिल की बात' हे दोन चित्रपट मीं किती कष्टानें अन् अडचणीनें काढले असतील तें माझें मलाच ठाऊक.

स्वतःच्या मालकीचें घर विकल्यानंतर त्यांत भाडोत्री म्हणून रहाण्यांत काय यातना असतात, त्याचा अत्यंत भयानक अनुभव मीं दुसऱ्याला विकलेल्या माझ्या स्टुडिओंत मला आला. उभ्या आयुष्यांत मीं दुसऱ्याची तावेदारी कधीं पत्करली नव्हती. जें केलें तें स्वतःच्या मर्जीनें आणि मालकीनें केलें. म्हणून दुसऱ्याला विचारून आणि दुसऱ्याच्या परवानगीनें काम करण्याची मला मुळीं संवयच नव्हती. 'जुपिटर स्टुडिओ'ची व्यवस्था

जयंत देसाईंचे थोरले बंधु छोटूभाई देसाई ह्यांच्याकडे होती.

छोटूभाई हा अत्यंत वक्रबुद्धीचा आणि दुराग्रही वृत्तीचा एक इसम होता. तो एका पायानें लंगडा असल्यानें 'छोटू लंगडा' या नांवानें मुंबईच्या चित्रव्यवसायांत तो ओळखला जात असे. ह्या छोटूभाईनें 'बाईलवेड्या'च्या आणि 'दिल की बात'च्या चित्रणाच्या वेळीं बारीक-सारीक गोष्टीवरून आमच्या कंपनींतल्या मंडळींना नाहीं नाहीं तो त्रास दिला.

तथापि व्यक्तिशः माझ्याशीं छोटूभाई अतिशय लघळपणानें वागत असे. गरजवंताला अक्कल नसते या न्यायानें माझेंहि त्याच्याशीं वागणें गोडीगुलाबीचें असे. छोटूभाईला घोड्यांच्या शर्यतींचा फार नाद होता. तो घोड्यावर फारसे पैसे लावत नसे. पण कोणतीहि शर्यंत तो सहसा चुकवीत नसे. त्याच्या नादानें मीहि रेसला जाऊं लागलों. तोंपर्यंत मी आयुष्यांत रेसग्राउंडवर कधीं गेलों नाहीं. त्याचें आकर्षणच मुळीं मला कधीं वाटलें नाहीं.

पण डोक्यावर कर्जाचा बोजा झाला म्हणजे मग असले भलभलते नाद माणसाला लागतात. ज्योतिषी आणि जुगारी हे कर्जबाजारी माणसाचे हमखास दोन मित्र असतात. असा त्या वेळच्या माझ्या जीवनावरून जो मीं निष्कर्ष काढलेला आहे, तो पुष्कळांना मान्य होईल अशी माझी खात्री आहे.

अर्थात् 'रेस'चें मला काडीमात्र ज्ञान नव्हतें. 'मोती वधारो' विकत घ्यावयाचा आणि चार ओळखीचीं माणसें ज्या 'टिप्स' देतील त्यांपैकीं एकाद्या खात्रीच्या घोड्यावर पैसे लावावयाचे. पण, तो घोडा हमखास मागें राहायचा आणि आपण लावलेले पैसे आपल्या डोळ्यांदेखत पाण्यांत जावयाचे हा नेहमींचा माझा अनुभव होता.

ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव शिंदे हे माझे मित्र होते. त्यांचे प्रत्येक शर्यतीमध्यें घोडे असत. त्यांच्या घोड्यांचे ट्रेनर मेजर के. पी. जाधव हेहि माझे चांगले दोस्त होते. पण त्यांच्यापैकीं कोणाच्याहिकडून खात्रीच्या 'टिप्स' अशा मला कधींच मिळाल्या नाहींत. किंबहुना एकदां ग्वाल्हेरच्या महाराजांनीं मला कोठल्या तरी एका शर्यतींतला पाचवा घोडा सांगितला होता. पण प्रत्यक्ष शर्यतींत त्याचा अनुक्रम पडला होता चौथा. मला कांहीं तें माहीत नव्हतें. मी पांचव्यावरच पैसे लावले आणि मागून जेव्हां माझ्या लक्षांत ती चूक आली तेव्हां मी खूपच हळहळलों.

पण गंमत ही कीं शेवटीं त्या शर्यतींत मीं ज्या पांचव्या नंबरवर चुकून पैसे लावले होते, त्या पांचव्या नंबरनें शर्यत जिंकली आणि मला चांगले सवाशें का दीडशें रुपये मिळाले. आणि ग्वाल्हेरच्या महाराजांनीं मला जो घोडा सांगितला होता, तो चौथ्या नंबरचा घोडा कोठल्या कोठें मागें राहिला.

मी कांहीं प्रत्येक शर्यतीला जात नव्हतों. कारण मजजवळ तेवढे पैसेच नव्हते

वर्षांतून मी फार झालें तर आठदहा वेळां गेलों असेन. पण तेवढ्या अनुभवावरून माझें असें निश्चित मत झालें आहे कीं घोड्यांच्या शर्यतीचा जुगार हा एक शुद्ध गाढवपणा आहे. ‘अमक्या अमक्या माणसानें रेसमध्यें तीस हजार रुपये मिळविले, चाळीस हजार रुपये मिळविले’ असें आपल्याला कोणीतरी सांगतें आणि त्यामुळें आपलें डोकें पिसाळतें. पण असें बक्षीस मिळविणाऱ्या माणसानें पूर्वी रेसमध्यें किती पैसे घालविले आहेत, हें मात्र आपल्याला कोणी सांगत नाहीं.

रेसमध्यें कधींहि कोणाला पैसे मिळणार नाहींत. आज मिळाले तर उद्यां किंवा परवां ते नक्की जाणार ही अगदीं काळ्या दगडावरची रेघ आहे. वर्षानुवर्षें रेसला नियमानें जाणाऱ्या लोकांना ही गोष्ट स्वानुभवानें ठाऊक असते. पण असें असूनहि त्यांचे डोळे शेवटपर्यंत उघडत नाहींत. ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

आधल्या रेसमध्यें मार खाल्लेला माणूस पुन्हां रेसचा दिवस उगवेपर्यंत एखाद्या मुडद्यासारखा पडून असतो. पण रेसचा दिवस उगवला रे उगवला कीं त्याच्या अंगांत भलतेंच अवसान संचारतें. सकाळीं त्याच्या खिशांत एक दमडा जरी नसला, तरी रेसच्या वेळेपर्यंत चार ठिकाणीं उसनवारी करून त्यानें पन्नास पाऊणशें रुपये इकडून तिकडून नाहीं जमविले असें कदापि व्हावयाचें नाहीं.

मग हे पैसे खिशांत खुळखुळवीत रेससाठीं खास वापरण्याच्या ऐटबाज पोशाखांत स्वारी हातांत ‘टिप्स’चें एखादें पुस्तक घेऊन पहिल्या रेसच्या आधीं, जणुं कांहीं आपल्या घरचेंच एकादें मंगल कार्य आहे अशा उत्साहानें आणि लगबगीनें तेथें जाऊन हजर राहावयाची आणि संध्याकाळीं पुन्हां मार खाऊन बाप मेल्यासारखा चेहेरा करून घरीं परत यावयाची. येतांना टॅक्सीला तर राहूं द्याच पण बससाठीं किंवा ट्रॅमसाठीं सुद्धां त्याच्या खिशांत पैसा नसावयाचा !

कांहीं कांहीं रेसवाले तर रेसकोर्सवर जातांना त्या दिवशीं पळणाऱ्या निरनिराळ्या घोड्यांची वंशावळ, त्यांनीं पूर्वी कोणती शर्यत किती वजनानें आणि कोणत्या जॉकीसह कुठें जिंकली त्यांच्या याद्याच्या याद्या तोंडपाठ करून येतात. ह्या लोकांनीं शाळेंत किंवा कॉलेजांत एवढा अभ्यास केला असता तर आयुष्यांत ते कोठल्या कोठें वर चढले असते ह्याची कल्पनासुद्धां खरोखरच कोणाला करतां येणार नाहीं. पण एवढी बौद्धिक कसरत करून ह्यांनीं स्वतःच्या अक्कलहुशारीनें निवडलेल्या घोड्यांपैकीं एखाद्या घोड्यानें शर्यत जिंकली तरी त्याची मोठी शहामतच म्हणावयाची सारांश, रेसकोर्सवर हमखास पैसे मिळविण्याचें नक्की असें एकहि शास्त्र नाहीं. कांहीं ‘जॉकी’ माझ्या ओळखीचे होते. कोणत्या शर्यतींत कोणता घोडा पहिला येईल हें त्यांना हमखास ठाऊक असतें. पण ही गोष्ट पांचदहा हजारांचा फायदा मिळाल्याखेरीज ते कधींच कोणाला सांगणार नाहींत.

कोल्हापूरचा पांडू खाडे हा एक अत्यंत नाणावलेला जॉकी होता. पण स्वभावानें

तो पक्का इरसाल आणि बेरकी. माझी त्याची चांगली ओळख होती. माझ्या 'नवयुग'च्या एका दिवाळी अंकांत चांगला दोन चारशें रुपयांचा खर्च करून मीं त्याचें चरित्र छापलें होतें. पण त्यानें मला एकदांहि कोणत्या शर्यतींत कधीं 'टिप' देऊन मीं त्याला दाखविलेल्या स्नेहभावाची परतफेड करण्याचा प्रयत्न केला नाहीं. अशीं कृतघ्न असतात रेसकोर्सवरील माणसें. त्यांच्यावर भरंवसा ठेवायचा म्हणजे स्वतःचा गळा कापून घ्यायचा.

रेसमध्यें पैसे मिळवण्याची कांहीं मंडळींची अशी युक्ति असते. प्रत्येक शर्यत संपली कीं तिच्यांत जिंकलेलीं माणसें पैसे घेण्यासाठीं ज्या खिडक्यांसमोर जातात, तेथें आपण लांबून टेहेळणी करीत उभें राहावयाचें आणि एकादा माणूस पुन्हां पुन्हां पैसे घ्यावयाला तेथें आलेला दिसला कीं, मग त्याच्या मागोमाग आपण हळूच जायचें. आणि तो ज्या घोड्याचें तिकीट काढत असेल, तेंच नेमकें आपण काढायचें. हें तंत्र नेहमींच यशस्वी होतें असें नाहीं. पण कित्येकदां अचानक एकादा घोडा लागून जातो.

तथापि, माझ्या बाबतींत रेसकोर्सवर मला चार दोन वेळां जे पैसे मिळाले, ते केवळ माझ्या नशिबाच्या जोरावर. कर्जबाजाऱ्याचे मित्र जुगारी आणि ज्योतिषी असें मीं मघांशीं सांगितलें, त्या न्यायानें माझी कुंडली तरी निदान मला समजावी म्हणून मीं थोडासा ज्योतिषाचा अभ्यास केला. आणि त्यावरून मीं माझ्या ग्रहांचे कांहीं ठोकताळे मनाशीं बांधले. माझ्या तुटपुंज्या ज्योतिषाच्या आधारावर मीं स्वतःच्या कुंडलीबाबत एक असा निष्कर्ष काढला, कीं ज्या दिवशीं चंद्र हा वृषभ राशींत असेल, त्या दिवशीं कोणताहि आर्थिक व्यवहार मीं केला तर तो हमखास फायदेशीर झालाच पाहिजे. चारदोन वेळां त्याचा मला प्रत्यय आला आणि तेव्हांपासून 'वृषभेचा चंद्र' असेल त्याच दिवशीं रेसकोर्सवर जायचें असें मीं मनाशीं ठरविलें.

त्याप्रमाणें एके दिवशीं मी पंचांग पाहून रेसग्राऊंडवर गेलों. माझे ट्रेनर मित्र मेजर जाधव ह्यांनीं मला पहिल्याच शर्यतीमधला 'फेअरीना' हा घोडा खूपच भाव देईल असें सांगितल्यामुळें, माझ्याजवळ होते नव्हते तेवढे सगळे पैसे–म्हणजे दोनशें रुपये–मीं 'फेअरीना'वरच एकदम लावून टाकले. म्हटलें, पन्नासचा भाव आला तर एकदम हजार रुपये खिशांत टाकून आपल्याला घरीं परततां येईल.

पण कसचें काय अन् कसचें काय? शंभर शंभर रुपयांचीं त्या घोड्यावरचीं दोन तिकिटें खिशांत घालून मी प्रत्यक्ष मैदानाजवळ जातों आहे तों काय? रेस संपली होती आणि 'फेअरीना' शेवटून पहिला आला होता.

माझ्या तोंडाला एकदम कोरड पडली. सोडा घ्यायला सुद्धां माझ्या खिशांत पैसा उरला नव्हता. वृषभेच्या चंद्रानें मला असा दगा द्यावा याचें मला सर्वांत आश्चर्य वाटलें. आतां काय करावें हें मला कळेना. मी आजूबाजूला पाहूं लागलों तों एक

म्हातारा मारवाडी एका झाडाखालीं उभा असलेला मीं पाहिला. त्याचा माझा पूर्वी देण्याघेण्याचा कांहीं व्यवहार झालेला होता.

मी त्याच्याजवळ गेलों नि म्हणालों, " शेटजी, मला दोनशें रुपये देतां का ? मी उद्यां परत करीन ! "

' शेटजी ' म्हणाले, " तुम्हांला घोड्यावरच लावायचेत ना ? मग माझ्याकडे लावा. बाहेर जो भाव पडेल, तोच मी तुम्हांला देईन ! "

शर्यतीच्या मैदानावर स्वतंत्रपणें ' बेटिंग ' घेणारे अशा तऱ्हेचे पुष्कळ लोक गुप्तपणें वावरत असतात, ही गोष्ट त्याच वेळीं मला प्रथम समजून आली.

त्यानंतर मीं रेसचें पुस्तक घेतलें आणि कसलाहि विचार न करतां त्यांतील मनाला वाटतील तीं घोड्यांचीं नांवें निवडून त्यांच्यावर शंभर शंभर, दीडशें दीडशें रुपये मीं त्या शेटजीजवळ उधारीनें लावले आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं त्या दिवशींची शेवटची शर्यत संपली, तेव्हां मीं एकूण साडेसोळाशें रुपये जिंकले होते.

' बिनभांडवला 'वर एवढा यशस्वी धंदा आयुष्यांत मीं कधीं केलेला नव्हता. मारवाडी शेटजींकडून सोळाशें रुपयांच्या नोटा जेव्हां मीं मोजून घेतल्या तेव्हां त्यांचा चेहरा खरोखरच पाहण्यासारखा झाला होता. अशा रीतीनें वृषभेच्या चंद्रानें त्या दिवशीं कल्पनेपेक्षां हात दिला.

तथापि त्यानंतर मी पुन्हां रेसकोर्सवर क्वचित्च गेलों असेन. सहा-सात महिन्यांच्या कालावधींत मला शर्यतीच्या जुगारीचा जो अनुभव आला, त्यावरून मला त्या गोष्टीची उबगच आली. मनाशीं म्हणालों, झाला एवढा मूर्खपणा पुरे झाला !

अत्रे पिक्चर्सचा ' दिल की बात ' हा मीं दिग्दर्शित केलेला हिंदी चित्रपट मार्च १९४४ च्या अखेर पूर्ण झाला. त्यानंतर ज्या तीन चित्रपटांचे सरकारी परवाने मला मिळालेले होते, त्यांपैकीं दोन परवाने मीं चुनीभाई देसाईंना विकून टाकले हें मागील प्रकरणांत सांगितलें. त्यामुळें चित्रव्यवसायांत मला मुळीं कामच उरलें नाहीं.

साहजिकच, माझें लक्ष माझ्या साप्ताहिक ' नवयुग 'कडे पुन्हां अधिक जोरानें वळलें. ' वसंतसेना ' निर्मितीच्या काळांत ' नवयुग 'कडे माझें बिलकुल लक्ष नव्हतें, असें म्हटलें तरी चालेल. त्या काळांत संपादकीय सूत्रें मीं श्री. र. गो. सरदेसाई ह्यांच्याकडे सोंपविलीं होतीं. आठवड्याच्या आठवड्याला नियमितपणें मला स्वतःला लिहायाला क्वचित्च वेळ मिळे. ' अत्रे पिक्चर्सच्या डिस्ट्रिब्यूशन 'चें ऑफिस ज्या ११६ चर्नीरोडमध्यें होतें तेथेंच साप्ताहिक ' नवयुग 'चें कार्यालय होतें. त्याची सर्व व्यवस्था श्री. रमाकांत वेलदे ह्यांच्याकडे होती. पण जेव्हां ' अत्रे डिस्ट्रिब्यूशन 'चें ' चित्र-मंदिर 'बरोबरच विसर्जन झालें, तेव्हां साप्ताहिक ' नवयुग ' निर्वासित झालें.

त्यानंतर ' नवयुग 'च्या ऑफिससाठीं एकादी जागा आणि जमलें तर तेथेंच एकादा छापखाना विकत घेतां येईल किंवा काय याचा आम्ही विचार करूं लागलों.

चित्रपटाच्या धंद्यांत माझें दिवाळें वाजावयाचेंच काय तें बाकी उरलें होतें. तरीहि त्यांतून कसाबसा निभावून, पूर्वीच्या सावकारांचें कर्ज फेडून आणि पुन्हां आणखी दोन चित्रपट काढून आपण अजून जिवंत आहोंत असें जगाला दाखविण्याची मी पोकळ धडपड करीत होतों.

अशा परिस्थितींत मुंबईसारख्या शहरांत स्वतःच्या मालकीचा एक स्वतंत्र छापखाना उभारण्याचा मीं विचारसुद्धां करणें मूर्खपणाचें होतें. पण आयुष्यांतली कोणती गोष्ट कधी मीं विचार करून आजपर्यंत केलेली आहे, म्हणून त्या वेळीं छापखाना काढण्याच्या शक्याशक्यतेचा मीं विचार करावा ? प्रत्येक गोष्ट अविचारी धाडसानें करावयाची हेंच मुळीं माझ्या यशाचें वैशिष्ट्य आहे. त्याची प्रचीति फिरून त्या वेळीं एकदां आली.

लॅमिंग्टन रोडवरून ' कॉंग्रेस हाऊस 'कडे जाण्याचा रस्ता जेथें फुटतो, त्याच कोपऱ्यावर '३६२ विठ्ठलभाई पटेल रोड' या ठिकाणीं पेंढारकर ह्यांचा सुप्रसिद्ध ' ट्यूटोरियल प्रेस ' होता. उत्कृष्ट इंग्रजी छपाई करण्याबाबत हा प्रेस त्या काळीं फार नांवाजलेला असे. पुढें पेंढारकर वारले. त्यांच्या मागें त्यांची वृद्ध पत्नी आणि एक कन्या होती. त्यांनीं तो प्रेस विकावयाला काढला. चांगलीं चांगलीं मुद्रण-यंत्रें त्यांनीं आधींच फुटकळपणें विकून टाकलीं होतीं. त्यामुळें छापखान्यांत फारशी महत्त्वाची यंत्रसामग्री उरली नव्हती. पण आम्हांला तेवढीच पुरेशी होती. शिवाय, छापखान्यासाठीं अशी मोक्याची जागा आणि विजेचें भरपूर कनेक्शन दुसऱ्या ठिकाणीं आम्हांला मिळणें सर्वस्वी अशक्य होतें.

जागा फारच मोठी होती. तिचें भाडें होतें महिना तेराशें रुपये. दहा पधरा हजारांपेक्षां अधिक किंमतीचा छापखाना विकत घेण्याएवढी माझी उडी नव्हती. पण तो छापखाना जेव्हां आम्हीं विकत घेतला आणि त्यांत नव्हती ती यंत्रसामग्री आम्हीं जेव्हां बाहेरून खरेदी करून भरली, तेव्हां आमचें एकंदर बजेट पंच्याऐंशी हजारांपर्यंत गेलें. हे सारे पैसे, हा माझा प्रेस एका बँकेकडे गहाण टाकून आणि कित्येक सावकारांना तीस चाळीस हजारांच्या हुंड्या पुन्हां लिहून देऊन मीं उभा केला. जित्याची खोड मेल्याखेरीज कांहीं जात नाहीं हेंच खरें. तरी एक शहाणपणा मीं केला. साडेतीनशें रुपये भाड्याची जागा माझ्या स्वतःकडे ठेवून बाकीची साडेनऊशें रुपयांची जागा मीं एका कारखान्याला पोटभाड्यानें देऊन टाकली.

अशा रीतीनें मार्च १९४४ च्या अखेर ' कॉंग्रेस हाऊस 'कडे जाणाऱ्या रस्त्यावर ' अत्रे प्रिंटिंग प्रेस 'ची पाटी झळकूं लागली आणि आंतमधून मुद्रणयंत्राचा धडधडाट सकाळपासून संध्याकाळपर्यंत अगदीं बाहेर रस्त्यावर ऐकूं येईपर्यंत निनादूं लागला.

त्याबरोबर चित्रव्यवसायांतल्या पराभवानें माझ्या व्यक्तिमत्त्वांत निर्माण झालेला

नैकृष्टयगंड कुठल्या कुठें नाहींसा झाला. अभिमानानें माझी छाती फुगून वर आली ! 'चित्रमंदिर' गेलें तर गेलें, 'अत्रे प्रिंटिंग प्रेस' तर मुंबईत मोठ्या दिमाखानें उभा राहिला नां !

तोंपर्यंत 'साप्ताहिक नवयुग' त्रिभुवन रोडवरील 'रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस' मध्यें छापलें जात होतें. पण ७ मे १९४४ रोजीं जेव्हां 'नवयुग'चा पांचव्या वर्षाचा एकोणिसावा अंक माझ्या स्वतःच्या मालकीच्या 'अत्रे प्रिंटिंग प्रेस'मध्यें छापून प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हां माझ्या आनंदाला पारावारच उरला नाहीं !

# २६

## नसत्या कटकटी

कोणताहि व्यवहार करतांना माणसानें तो अगदीं उघडे डोळे ठेवून आणि मागचा–पुढला विचार करून केला पाहिजे. त्याबाबत जरा कांहीं गाफिलगिरी आपल्या हातून घडली, तर आर्थिक दृष्टीनें आणि कायद्याच्या दृष्टीनें आपलें अनन्वित नुकसान होतें. आणि आपण निष्कारण भलत्या अडचणींत सांपडतों. ह्याचा मुंबईच्या व्यावसायिक जीवनांत मला अनेकदां अनुभव आला.

विशेषतः कसलीहि लिखापढी करतांना, किंवा बोटभर चिठ्ठी लिहितांना आणि त्यावर आपण सही करतांना, आपण कशावर सही करतो आहोंत त्याचा कायदेशीर दृष्ट्या आपण प्रथम विचार करावयाला हवा. अशा एका लहानशा चिठ्ठीवर लिहिलेल्या ‘ माझ्या स्वदस्तुरच्या ’ मजकुरामधून फौजदारी आणि दिवाणी फिर्यादींचें भूत निर्माण होऊन माझ्या मानगुटीवर कसें बसलें ती हकीकत या ठिकाणीं सांगितलीच पाहिजे.

माझें नशिब एवढें कीं ह्या लफड्यांतून किंवा अशा तऱ्हेच्या वेळोवेळीं उद्भवलेल्या अनेक लफड्यांतून मी सहीसलामत बाहेर

नैकृष्ट्यगंड कुठल्या कुठें नाहींसा झाला. अभिमानानें माझी छाती फुगून वर आली ! ‘ चित्रमंदिर ’ गेलें तर गेलें, ‘ अत्रे प्रिंटिंग प्रेस ’ तर मुंबईत मोठ्या दिमाखानें उभा राहिला नां !

तोंपर्यंत ‘ साप्ताहिक नवयुग ’ त्रिभुवन रोडवरील ‘ रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस मध्यें छापलें जात होतें. पण ७ मे १९४४ रोजीं जेव्हां ‘ नवयुग ’चा पांचव्य वर्षाचा एकोणिसावा अंक माझ्या स्वतःच्या मालकीच्या ‘ अत्रे प्रिंटिंग प्रेस ’मध्यें छापून प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हां माझ्या आनंदाला पारावारच उरला नाहीं !

# २६

# नसत्या कटकटी

कोणताहि व्यवहार करतांना माणसानें तो अगदीं उघडे डोळे ठेवून आणि मागचा–पुढला विचार करून केला पाहिजे. त्याबाबत जरा कांहीं गाफिलगिरी आपल्या हातून घडली, तर आर्थिक दृष्टीनें आणि कायद्याच्या दृष्टीनें आपलें अनन्वित नुकसान होतें. आणि आपण निष्कारण भलत्या अडचणींत सांपडतों. ह्याचा मुंबईच्या व्याव-सायिक जीवनांत मला अनेकदां अनुभव आला.

विशेषतः कसलीहि लिखापढी कर-तांना, किंवा बोटभर चिठ्ठी लिहितांना आणि त्यावर आपण सही करतांना, आपण कशावर सही करतों आहोंत त्याचा कायदे-शीर दृष्ट्या आपण प्रथम विचार कराव-याला हवा. अशा एका लहानशा चिठ्ठीवर लिहिलेल्या ' माझ्या स्वदस्तुरच्या ' मज-कुरामधून फौजदारी आणि दिवाणी फिर्यादींचें भुत निर्माण होऊन माझ्या मानगुटीवर कसें बसलें ती हकीकत या ठिकाणीं सांगितलीच पाहिजे.

माझें नशिब एवढें कीं ह्या लफड्यांतून किंवा अशा तऱ्हेच्या वेळोवेळीं उद्भवलेल्या अनेक लफड्यांतून मी सहीसलामत बाहेर

पडलेलों आहें.

'वसंतसेना' चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळीं माझें साप्ताहिक 'नवयुग'कडे मुळींच लक्ष नव्हतें हें मागेंच सांगितलें. 'अत्रे उवाच' हें 'नवयुग'मधील माझें सदर हें त्या साप्ताहिकाचें सर्वांत मोठें आकर्षण. पण त्या काळांत कित्येक महिनेच्या महिने मला हें सदर लिहितां आलें नव्हतें. साप्ताहिकाच्या अंतर्गत व्यवस्थेकडे आणि व्यवहाराकडे तर मीं महिनेच्या महिने ढुंकून पाहिलें नव्हतें. त्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. 'साप्ताहिक नवयुग'चा खप झपाट्यानें कमी होऊं लागला.

ह्या काळांत 'नवयुग'च्या जाहिरातीचें कॉंट्रॅक्ट आम्ही मे. डी. एस्. काटदरे आणि कंपनीला दिलेलें होतें. 'नवयुग'चा खप जसा कमी होऊं लागला तसे जाहिरातदार जाहिराती देईनासे झाले. साहजिकच आमचे जाहिरात एजंट काटदरे आणि कंपनीला त्याची झळ लागूं लागली.

तेव्हां ती तक्रार माझ्या कानांवर घालावयाला त्या कंपनीचे मालक दत्तप्रसन्न काटदरे एक दिवस माझ्याकडे आले. मी गडबडींत होतों दुसऱ्या कसल्या तरी कामाच्या.

काटदरे म्हणाले, "तुम्हांला आठवड्याच्या आठवड्याला लिहावयाला मिळत नाहीं, हें मला समजतें. पण तुमचे सहसंपादक तिकडे ऑफिसांत कामें करीत नाहींत. मनोरंजक आणि वाचनीय मजकूर लिहिण्यासाठीं जी मेहनत आणि खटपट करावी लागते, ती ते करीत नाहींत. नुसते चहा पीत, बिड्या फुंकीत आणि चकाट्या पिटीत ते ऑफिसांत बसलेले असतात. मी तें रोजच्या रोज डोळ्यांनीं पहातों. आणि स्वस्थ बसतों."

"मग तुम्ही त्यांना बोलत कां नाहीं?" मी म्हणालों, "तुम्हीं खुशाल त्यांचे कान पिरगाळीत जा. माझी तुम्हांला पूर्ण परवानगी आहे!"

"तुमचें म्हणणें ठीक आहे." काटदरे म्हणाले, "पण तसें करायला मला ऑथॉरिटी काय आहे? मी बोलून चालून पडलों तुमचा ॲडव्हर्टायझिंग एजंट! तुमच्या सहसंपादकांना कांहींहि बोलण्याचा मला अधिकार काय आहे? अन् ते थोडेच माझें बोलणें ऐकून घेतील?"

काटदऱ्यांचें बोलणें मला पटलें. त्यांची अडचण बरोबर होती. मी समोरच पडलेला एक चतकोर कागदाचा तुकडा चटकन् समोर ओढला आणि त्यावर D. S. Katdare is the Managing Partner of Navayug Weekly and he is authorized to give instructions to the editorial and other staff (डी. एस. काटदरे हे नवयुग साप्ताहिकाचे व्यवस्थापकीय भागीदार आहेत आणि संपादकीय आणि इतर मंडळींचे मार्गदर्शन करण्याचा त्यांना अधिकार दिलेला आहे) असें घाईघाईनें लिहून त्याच्याखालीं 'मालक नवयुग' म्हणून मी

जोरानें माझी फर्डी सही ठोकली. तो कागद खिशांत घालून काटदरे निघून गेले. आपण त्यांना काय लिहून दिलें आहे, ह्याची त्या क्षणीं मला सुतराम् कल्पना आली नाहीं, काटदरे निघून गेल्यानंतर त्या गोष्टीची आठवण सुद्धां मी विसरून गेलों आणि माझ्या कामाला लागलों.

त्या वेळीं 'साप्ताहिक नवयुग 'चें दप्तर ११२ चर्नी रोड येथें चौथ्या मजल्यावर 'अत्रे पिक्चर्स डिस्ट्रिब्यूशन 'च्या कार्यालयांत होतें. मीं दिलेल्या अधिकारपत्राच्या जोरावर काटदरे त्या ठिकाणीं नियमितपणें जाऊन बसूं लागले. पुढें 'चित्रमंदिर' स्टुडिओबरोबरच 'अत्रे पिक्चर्स डिस्ट्रिब्यूशन' हेंहि आम्ही बिलिमोरियाला विकून मोकळे झालों. तेव्हां ११२ चर्नी रोडच्या प्रशस्त जागेंत फक्त 'नवयुग कार्यालय' तेवढें उरलें.

मधले एक दोन महिने असेच गेले. तेवढ्यांत '३६२ विठ्ठलभाई पटेल रोड' येथें मी माझ्या स्वतःच्या मालकीचा 'अत्रे प्रिंटिंग प्रेस' उभा केला. या छापखान्यांत आणि साप्ताहिक नवयुगमध्यें मी वनमालेला भागीदार म्हणून घेतलें. कारण 'चित्रमंदिर'मध्यें ती भागीदार नव्हती. फक्त 'अत्रे पिक्चर्स'मध्यें होती. पण 'अत्रे पिक्चर्स' जवळ जवळ संपुष्टांतच आल्यामुळें, आपल्याला कशांत तरी मालकी हिस्सा असावा ही तिनें अनेकदां व्यक्त करून दाखविलेली इच्छा पूर्ण करण्यासाठीं मीं तिला या व्यवहारांत भागीदार म्हणून घेतलें.

११२ चर्नी रोडची भाड्याची जागा त्यापुढें स्वतःकडे ठेवण्याचें मला कांहींच कारण नव्हतें. म्हणून तेथलें सर्व सामान, हिशेबाचीं, वर्गणीदारांचीं पुस्तकें, कपाटें, खुर्च्या, टेबलें आणि नं. ४३४२२ चा 'नवयुग'चा टेलिफोन ३६२ विठ्ठलभाई पटेल रोडवर हलवण्याच्या व्यवस्थेला मी लागलों. त्याप्रमाणें माझे व्यवस्थापक श्री. रमाकांत वेलदे आणि कांहीं नोकर ह्यांना ११२ चर्नी रोडच्या ऑफिसांत तेथलें सामान घेऊन यावयाला मीं पाठवलें. तेव्हां काटदरे ह्यांनीं त्यांना 'नवयुग'चें सामान घेऊन जावयाला प्रतिबंध केला. ते त्यांना म्हणाले, "मी 'नवयुग'चा भागीदार मालक आहें. मी येथलें एक चिटोरें हलवूं देणार नाहीं."

त्यावर व्यवस्थापक वेलदे काय बोलणार ? ते मुकाट्यानें हात हलवीत परत आले. संध्याकाळीं घरीं येऊन त्यांनीं मला ही सारी हकीगत सांगितली. तें ऐकून माझ्या संतापाला पारावार राहिला नाहीं. माझ्या सर्वांगाचा भडका उडाला. मी उलट वेलद्यांच्याच अंगावर ओरडलों, "आपण मालक. काटदरे जाहिरात एजंट. त्यांनीं तुम्हांला कांहींहि सांगितलें, तरी तुम्हीं त्या गोष्टीवर विश्वास ठेवलात कसा ? तुम्ही 'नवयुग'च्या जन्मापासून माझ्याकडे आहांत. आपण 'नवयुग' कसा काढला आणि गेलीं चार पांच वर्षें त्यासाठीं कसे कष्ट उपसले, हें तुम्हीं डोळ्यांनीं पाहिलें आहे. तुमचाहि त्या कष्टांत वांटा आहे. तुम्हींहि माझ्याबरोबर घाम गाळला आहे

त्यासाठीं. तेव्हां 'नवयुग'चा मालक कोण आहे, हें तुम्हांला काय मीं सांगायला पाहिजे आहे? कोणी वाटेल तो नागोबा या आपल्या आयत्या बिळावर येऊन बसायला लागेल, तर तुम्ही हातांत दांडकें घेऊन त्याचा प्रतिकार केला पाहिजे!"

"मला मनांतून कांहींहि वाटत असलें तरी तें प्रत्यक्ष कृतींत करण्याची ताकद माझ्यांत नाहीं!" वेलदे विषण्ण स्वरांत म्हणाले. ते जन्मतःच कुबडे असल्यानें पंगू आणि दुबळे होते.

"ठीक आहे, मीच स्वतः उद्यां तेथें येतों!" मी रागानें पुटपुटलों.

दुसऱ्या दिवशीं मी आणि वनमाला आमच्या मोटरीमधून ११२ चर्नी रोडवरील आमच्या जुन्या ऑफिसांत गेलों. ऑफिसांत काटदरे नव्हते. त्यांचा कोणी गडी का कारकून होता. मी आणि वनमाला या दोघांनीं सर्व हिशेबाचीं महत्त्वाचीं पुस्तकें आणि वर्गणीदारांचीं रजिस्टरें, पावत्या, व्हाउचरें कपाटांतून भराभर बाहेर काढलीं. तेव्हां तो गडी का कारकून तोंडांतल्या तोंडांत कांहींतरी तक्रारीच्या स्वरांत कुरकुरला.

तेव्हां मी त्याच्याकडे डोळे वटारून जोरानें ओरडलों, "जास्त बोलशील तर फोडीन थोबाड!" तेव्हां त्याची बोबडीच वळली. अशा रीतीनें अर्ध्या तासाच्या आंत आम्हीं सारे कागदपत्र उचलून माझ्या ड्रायव्हरच्या नि एका नोकराच्या करवीं खालीं असलेल्या मोटरींत घातले आणि ते घेऊन नव्या ऑफिसांत आणून टाकले.

त्यानंतर एकादादुसरा दिवस मध्यें काय गेला असेल तो असेल. गिरगांवच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत काटदऱ्यांनीं माझ्यावर आणि वनमालेवर 'नवयुग कार्यालयांतून हिशोबाचीं पुस्तकें चोरून नेल्याच्या' आरोपावरून फौजदारी फिर्याद गुदरली. काय दुनिया आहे पहा? माझ्याच मालकीच्या कार्यालयांतील माझ्या स्वतःच्या व्यवहाराचीं पुस्तकें मी माझ्या अखत्यारांत घेऊन गेल्याबद्दल तीं चोरल्याचा आरोप एका तिऱ्हाईत उपऱ्यानें माझ्यावर फौजदारी कोर्टांत करावा यापेक्षां जगांत कृतघ्नतेचें अधिक भयानक उदाहरण कोणाला सांपडूं शकेल काय?

काटदरे हे केवळ माझे जाहिरात एजंट. त्यांचे माझे त्यापूर्वीचे संबंधहि स्नेहाचे. कधीं वाद नाहीं. भांडण नाहीं. हेवा नाहीं. दावा नाहीं. व्यवस्थेच्या कांहीं सोयीसाठीं अधिकाराची यांना बाह्यात्कारी बतावणी करतां यावी म्हणून घाईघाईनें त्यांना एका चिठोऱ्यावर ते 'वर्किंग पार्टनर' आहेत, असें मीं बळेंच लिहून दिलें. तर तेवढ्या आधारावर माझ्या स्वतःच्या साप्ताहिकाच्या मालकी हक्कांतला अर्धा वांटा फुकटाफुकट बळकावण्याची दुर्बुद्धि त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावी, हें पाहून माझा माणुसकीवरचा विश्वासच त्या वेळीं उडाला. ज्याला मी उदार मनानें महत्त्व द्यावयाला गेलों, त्यानेंच मला चोर ठरवावें हा खासा न्याय! 'चोरावर मोर' म्हणतात ना तो हा असा!

वस्तुतः 'नवयुग'च्या मालकीचा मोह सुटण्यासारखें असें कांहींच मौल्यवान् त्या साप्ताहिकाजवळ नव्हतें. न जागा न मालमत्ता. माझ्या इतर व्यवसायांप्रमाणें केवळ

माझें नांव आणि माझी कीर्ति एवढेंच काय तें त्याचें सर्वस्व होतें. मी त्यांतून बाहेर पडल्यावर मग मागें काय उरणार टरफल ? म्हणून मला दुखवून तें पत्र हस्तगत करण्यामध्यें कोणाचा तसा कांहींच फायदा नव्हता. मग या फंदांत काटदऱ्यांनीं कां पडावें ?

नाहीं म्हणावयाला तत्पूर्वी दीड दोन वर्षांआधीं सरकारी 'इडेंट' भरून एकोणतीस हजारांचा कागद मीं परदेशाहून 'नवयुग'साठीं मागवला होता. तो त्याच सुमारास मुंबई बंदरांत येऊन पोहोंचल्याची खबर आमच्या मुंबईतल्या वाहतूक एजंटानें मला दिलेली होती. अर्थात् हा कागद कोठल्या तरी बॅंकेकडे गहाण टाकून त्यावर पैसे उभे करावयाचे आणि गोदींतून तो माल सोडवावयाचा असा नेहमींचा शिरस्ता असतो. नाहीं तर त्या कठीण सांपत्तिक परिस्थितींत माझ्याजवळ एकोणतीस हजार रुपये कोठून असणार ?

दरम्यान युद्धकाळामध्यें कागदाचा भाव दुपटीतिपटीनें वाढलेला होता. मुंबईतल्या कागदाच्या व्यापाऱ्यांनीं कागदाचा काळाबाजार करून त्या काळांत कोट्यवधि रुपये मिळविले. मुंबईमध्यें नॉर्वे देशाची वकिलात होती. नॉर्वे देश ही तर कागदाच्या निर्मितीची खाण. त्या देशांतून लाखों रुपयांचा कागद भारतांत येतो. युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन त्या चार पांच वर्षांत नॉर्वेच्या गोऱ्या वकिलानें आणि त्याच्या एका हिंदी हेडक्लार्कनें कागदाचा काळाबाजार करून अक्षरशः कोट्यवधि रुपये कसे केले, ती रोमहर्षक कथा मुंबईतल्या अनेकांच्या अद्याप आठवणींत आहे. सदर 'हेडक्लार्क' त्या लाखो रुपयांच्या प्राप्तीच्या आधारावर आज मुंबईमधला अग्रेसर संपादक आणि नागरिक होऊन बसला आहे.

मीं परदेशाहून मागवलेल्या मूळ कागदाची किंमत जरी एकोणतीस हजार होती तरी माल या देशांत पोहोंचल्यानंतर त्याची किंमत अगदीं बाजार भावानें पासष्ट हजार रुपयांची झालेली होती. काळ्या बाजारांत हा माल एक लाखापर्यंत विकतां आला असता. ही सर्व बातमी आमच्या कार्यालयांतील मंडळींना आणि स्थानिक वृत्त-व्यावसायिकांना कळावयाला कांहीं फार वेळ लागला नाहीं. हें कागदाचें मौल्यवान् घबाड अचानक या वेळीं उपस्थित झाल्यानें 'नवयुग'च्या मालकीला एकदम फार मोठें मोल आलें. ही गोष्ट काटदरे आणि माझ्यांत निर्माण झालेल्या या वादामध्यें दुर्लक्ष करतां येण्यासारखी नाहीं.

केवळ गिरगांवच्या कोर्टांत माझ्यावर फौजदारी फिर्याद करून काटदरे थांबले नाहींत. तर आपली मालकी भागीदारी सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं माझ्यावर हायकोर्टांत दिवाणी दावा गुदरला. तेव्हां त्यांच्याविरुद्ध मलाहि निराळा दिवाणी दावा करणें भागच पडलें. अशा रीतीनें एका चतकोर कागदावर घाईघाईनें मीं खरडलेल्या मजकुराच्या 'कांस्याचा नायटा' होऊन तो भलताच विकोपाला जाऊन पोहोंचला.

मध्यंतरीं काटदरे आणि माझें एक छोटेंसें 'द्वंद्वयुद्ध' झालें. 'नवयुग'चा ४३४२२ नंबरचा टेलिफोन ११२ चर्नी रोड येथें होता. तो मला ३६२ विठ्ठलभाई रोडवर हलवावयाचा होता. तेव्हां मीं टेलिफोन कंपनीला कळविलें आणि त्याप्रमाणें टेलिफोन कंपनीचा माणूस टेलिफोनचें यंत्र काढण्यासाठीं ११२ चर्नी रोडवर गेला असतां काटदऱ्यांनीं पुन्हां तोच बांधा निर्माण केला आणि त्याला तें यंत्र त्या ठिकाणावरून हलवण्यास विरोध केला.

टेलिफोनचा माणूस हा चांगला सुशिक्षित होता. माझ्याबद्दल त्याच्या मनांत आदरभाव होता. त्यानें येऊन झालेला प्रकार मला व्यथित अंतःकरणानें सांगितला. पुन्हां माझें डोकें भडकलें. मी तसाच माझे मित्र प्रा. स. बा. हुदलीकर ह्यांना बरोबर घेऊन तावातावानें ११२ चर्नी रोडवर गेलों. आणि जिने ताडताड चढून ऑफिसांत प्रवेश केला. माझा तो आवेश नि अवतार पाहून काटदरे सर्दच झाले. वाद सुरू झाल्यानंतर त्यांची नि माझी समोरासमोर अशी ही पहिलीच भेट होती. टेलिफोनचा माणूस माझ्या मागें होताच.

मी ओरडून त्याला म्हणालों, "घ्या काढून या यंत्राचा कनेक्शन". त्या-बरोबर काटदरे टेलिफोनकडे धांवले आणि त्यांनीं दोन्ही हातांनीं तें यंत्र दाबून धरलें. तेव्हां मी त्यांच्या अंगावर धांवून गेलों. आणि त्यांच्या हातून तो टेलिफोन जोराजोरानें हिसकावून घेऊं लागलों. एक मिनिट दीड मिनिट आमची ही झोंबाझोंबी इकडे चालली होती. तोंच तिकडे टेलिफोनवाल्यानें 'कनेक्शन'चे स्क्रू भराभर काढून घेऊन टेलि-फोनची वायर भिंतीपासून एकदम वेगळी केली. तेव्हां काटदऱ्यांच्या शिडांतली एकदम हवाच गेली. आणि टेलिफोनवरची त्यांची पकड आपोआपच गळून पडली. आणि तेवढ्यांत जलदी करून टेलिफोनवाल्यानें तें यंत्र एकदम ताब्यांत घेतलें आणि खोलीबाहेर धूम ठोकली.

अशा रीतीनें टेलिफोनसाठीं झालेल्या त्या द्वंद्वयुद्धांत माझा विजय होऊन मोठ्या आनंदानें आणि दिमाखानें मी माझ्या लवाजम्यासहवर्तमान गर्जत गर्जत नव्या ऑफिसांत परत आलों. त्यानंतर मग मी आणि काटदरे ह्यांच्या मधला वाद उतरणीला लागला. निष्कारण निर्माण झालेल्या या भांडणांतून फारसें कांहीं निष्पन्न होणार नाहीं असा जेव्हां काटदरे ह्यांना त्यांच्या मित्रांनीं आणि वकिलांनीं सल्ला दिला, तेव्हां त्यांनीं तो मान्य करून माझ्यावर त्यांनीं केलेले दोन्ही दावे मागें घेतले. मींहि त्यांच्यावर केलेला दावा परत घेतला. 'नवयुग'ची माझी मालकी अबाधित राहिली. आणि अशा रीतीनें चतकोर चिठोऱ्यावरील माझ्या अविचारी लिखाणांतून निर्माण झालेल्या या नसत्या कटकटींना कायमची मूठमाती मिळाली.

७ मे १९४४ च्या 'नवयुग'च्या अंकांत 'अत्रे उवाच'च्या पृष्ठावर 'साप्ताहिक नवयुग'चें नवें कार्यालय १ मे १९४४ पासून 'अत्रे प्रिंटिंग प्रेस' ३६२ विठ्ठलभाई

पटेल रोड, मुंबई ४ ( टे. नं. ४३४२२ ) येथें आलें आहे ' अशी एक जाहीर खबर आणि दुसरी ' गोड शेवट ' या मथळ्यानें पुढीलप्रमाणें छापलेली आहे. " साप्ताहिक नवयुगच्या भागीदारीबाबत आचार्य अत्रे आणि मे. डी. एस्. काटदरे आणि कंपनीचे श्री. काटदरे ह्यांच्यामध्यें जे कोर्ट खटले चालले होते, ते सन्माननीय सलोख्यानें मिटले जाऊन सर्व वादाचा आतां गोड शेवट झालेला आहे. आणि परस्परांनीं एकमेकांविरुद्ध चालवलेले खटले मागें घेतले आहेत. यापुढें ' साप्ताहिक नवयुग 'चे एकमेव मालक आणि चालक आचार्य अत्रे हेच आहेत. "

' गोड शेवट ' झाला खरा. पण त्या भानगडींत कोर्टकचेऱ्या करतां करतां मला चांगला पांच हजारांचा चट्टा बसला. त्याचा झणझणीत चटका त्या वेळीं जिभेला जो बसला किनई त्यामुळें ' गोड शेवटा 'ची गोडी जिभेला मुळीं जाणवलीच नाहीं !

परदेशाहून माझा आलेला कागद गिरगांवांतल्या ' डेक्कन मर्चंटस् बँके 'कडे गहाण ठेवून मीं तो बोटीवरून सोडवला. आणि दर आठवड्याच्या आठवड्याला तो मला जसा लागेल, तसा तिच्याकडून बँकेला रोख पैसे देऊन मी विकत घेऊं लागलों.

पण बँकेकडून हा सारा व्यवहार घाईघाईनें घडवून आणण्याच्या भानगडींत मधल्यामध्यें आणखी दोन तीन हजारांचा चट्टा मला बसला. त्याची कर्मकटकट मी इथें सांगत नाहीं !

स्वतःच्या मालकीचा प्रेस काढून तेथें स्वतःच्या साप्ताहिकाचें कार्यालय आणून थाटतांना मला त्या वेळीं काय काय आपदांना तोंड द्यावें लागलें, त्याचा हा नुसता वानगीदाखल नमुना आहे. ह्याच्या पुढचें ' रामायण ' यथाकाल सांगेन !

२७

# गडकऱ्यांचा पंचविसावा स्मृतिदिन

माझे गुरु राम गणेश गडकरी यांच्या मृत्यूला २३ जानेवारी १९४४ रोजीं पंचवीस वर्षें पूर्ण झालीं म्हणून त्यांची ती रौप्यमहोत्सवी पुण्यतिथि मुंबईला टोलेजंग प्रमाणावर साजरी करावी असा विचार करून कांहीं गडकरीभक्तांनीं माझ्या नेतृत्वाखालीं 'गडकरी-स्मृतिदिन-महोत्सव मंडळ' स्थापन केलें. गडकरी पुण्यतिथीच्या आधीं एक आडवडाभर गडकरी-सप्ताह दादर आणि गिरगांव येथें भरविण्याचें आम्हीं ठरविलें.

या सप्ताहांत महाराष्ट्रांतील विद्वान् साहित्यिकांचीं गडकरी वाङ्मयावर अत्यंत विचारप्रवर्तक व्याख्यानें आम्हीं घडवून आणलीं. त्याचप्रमाणें गडकऱ्यांच्या साहित्यामधून निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांवर विद्यार्थी आणि प्रौढ यांच्या वक्तृत्वाच्या चढाओढी आम्हीं ठेवल्या. त्यावर त्यांचे निबंध मागवले. गडकऱ्यांच्या नाटकांतील कांहीं निवडक प्रवेश हौशी नटांकडून आणि कांहीं नाट्यसंस्थांकडून करवून घेतले. गडकऱ्यांच्या काव्याचें गायनहि निवडक गायकांकरवीं करविण्यांत आलें.

माझ्या 'समीक्षक' मासिकाचा मीं खास अंकहि प्रकाशित केला. पण ह्या सर्व कार्यक्रमांत जर कोणता एक कार्यक्रम गाजला असेल, तर तो म्हणजे सर चिंतामणराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सुंदराबाई हॉलमध्यें गडकरी स्मृतिदिनाची जी प्रचंड सभा झाली तो !

चिंतामणराव देशमुख हे १९१२ सालीं जेव्हां मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक परीक्षेंत पहिले आले, त्या वेळीं त्यांच्या त्या सुयशाबद्दल अभिनंदन करण्यासाठीं गडकऱ्यांनीं 'अभिनंदनपर वर्धापन' या नांवाची एक कविता लिहिली होती आणि तिच्यांत—

**वंश, जात हा समाज त्यापरि महाराष्ट्र भाषा**
**या सर्वांना आजपासुनी तुझी फार आशा !**

असें त्यांच्यासंबंधीं भविष्य वर्तविलें होतें. तें त्यांनीं आपल्या भाग्यशाली आणि पराक्रमी जीवनानें अक्षरशः खरें करून दाखविलें होतें.

त्या वेळीं ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. त्यांच्यासारख्या थोर महाराष्ट्रीयाच्या अध्यक्षतेखालीं गडकऱ्यांच्या स्मृतिदिनाचा महोत्सव साजरा करण्याची ही कल्पना जेव्हां आमच्या डोक्यांत आली, तेव्हां ती खरोखरच फलद्रूप होईल किंवा काय याची आम्हांला शंका होती. पण चिंतामणरावांनीं आमचें तें आमंत्रण मोठ्या आनंदानें मान्य केलें.

रविवार दि. २३ जानेवारी १९४४ रोजीं सायंकाळीं सुंदराबाई हॉलमध्यें हा कार्यक्रम झाला. सभेला फार थोर थोर लोक आणि साहित्यिक उपस्थित होते. सभागृह तुडुंब भरून गेलें होतें. सभागृहाच्या बाहेर रस्त्यावरहि खूपच गर्दी जमली होती. महाराष्ट्रीय साहित्यिकाच्या पुण्यतिथीसाठीं एवढा जनसंमर्द मुंबईत जमलेला माझ्या स्मरणांत नाहीं. प्रा. माधवराव अळतेकर, प्रा. कृ. पां. कुळकर्णी आणि नरहर गणेश कमतनूरकर ह्यांच्या भाषणानंतर माझें भाषण झालें.

मी म्हणालों, "आज गडकऱ्यांच्या स्मृतिदिनाच्या प्रसंगीं भरलेल्या या प्रचंड सभेला 'रिझर्व्ह बँके'चे गव्हर्नर सर चिंतामणराव देशमुख हे आम्हांला अध्यक्ष म्हणून लाभावेत, हें पाहून आपणा सर्वांना इतका आनंद झालेला आहे, कीं जणुं कांहीं 'रिझर्व्ह बँक'च आमच्या ताब्यांत आली आहे असें आम्हांला वाटतें (प्रचंड हंशा).

"माझे मित्र प्रा. माधवराव अळतेकर मघाशीं म्हणाले कीं, गडकरी हे 'तरुणांचे लेखक' आहेत असें जें म्हटलें जातें तें त्यांना मान्य नाहीं. 'तरुणांचे लेखक' ही काय भानगड आहे हें आपल्याला कळत नाहीं, असें ते म्हणाले. म्हणून मी त्यांना सांगतों कीं, 'तरुणांच्या भानगडीं'त तुम्हीं न पडलेलें बरें. हंशा) गडकरी हे तरुणांचे कवि आहेत. गडकरी हे तरुणांचे नाटककार आहेत, अर्थात्,

तरुणांमध्यें तरुणींचाहि अंतर्भाव होतो, हें निराळें सांगावयाची जरुरी नाहीं. (हंशा)

" आजच्या सभेंत मला समोर शेंकडों तरुण बसलेले दिसत आहेत. त्यांच्या डोक्यावरचे केस पांढरे झालेले मला दिसत नाहींत. त्यांच्या माथ्यावर टकलें चमकत असलेलीं मी पहात नाहीं. यावरून गडकऱ्यांचे भक्त कोण आहेत हें प्रत्यक्ष प्रमाणानेंच सिद्ध होण्यासारखें आहे. समाजांतील तरुण पिढीला गडकऱ्यांच्या साहित्याबद्दल जें प्रेम व जो आदर वाटतो आहे त्याचें आजची सभा म्हणजे जणुं कांहीं एक प्रदर्शनच आहे. (टाळ्या)

" गडकरी हे तरुणांना आवडणारे महाराष्ट्रांतले पहिलेच लेखक होत. त्यांच्यापूर्वीं मराठी भाषेंत जें वाङ्मय निर्माण होत होतें तें केवळ प्रौढांसाठीं आणि म्हाताऱ्यांसाठीं निर्माण होत होतें असें म्हटलें तरी चालेल. त्या वेळचें सर्वच वाङ्मय अत्यंत गंभीर स्वरूपाचें होतें. किंबहुना गांभीर्याला त्या वेळीं भलताच ऊत आला होता. गंभीर वृत्तीचे लोक फाजील गंभीर चेहरे करून त्या वेळचें साहित्य वाचीत असत. (हंशा) जणुं कांहीं ते कोणाचा–किंवा स्वतःचा गृह्य-संस्कारच वाचीत आहेत! (प्रचंड हंशा) तरुणांच्या मनांतील भावनांना आणि आकांक्षांना गडकऱ्यांनीं प्रथम बोलावयाला लावलें. त्यामुळें त्यांचीं अंतःकरणें गडकऱ्यांनीं एकदमच जिंकलीं.

" काव्य आणि विनोद तरुणांना अतिशय आवडतो ही गोष्ट गडकऱ्यांनीं प्रथम ओळखली. आणि त्या दोन मसाल्यांचा गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयांत भरपूर परिपोष केला. म्हणून वाङ्मय क्षेत्रांत गडकऱ्यांनीं पाऊल टाकतांच, महाराष्ट्रांतील तरुणवर्ग एकदम खडबडून जागा झाला. महाराष्ट्रांतील कोणत्याहि लेखकाला गडकऱ्यांच्या एवढें तरुणांचें प्रचंड अनुयायित्व लाभलें नाहीं. गेलीं पंचवीस वर्षें गडकऱ्यांची आठवण महाराष्ट्रांतील तरुणांनींच जागी ठेवली आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं गडकरी तरुणांचे लेखक आहेत. (प्रचंड टाळ्या)

" गडकरी हे तरुणाचे कवि असले तरी ते स्वैर वृत्तीच्या प्रेमाचे वा शृंगाराचे पुरस्कर्ते नव्हते. 'प्रेमाचे शाहीर' म्हणून त्यांचा पुष्कळ वेळां उल्लेख केला जातो. त्यांत एकाच शब्दाची भर घालून मी म्हणतों कीं गडकरी हे 'कौटुंबिक प्रेमाचे शाहीर' होते. त्यांच्या तारुण्याचा रसिक उन्माद 'मरण सोसावें परि पहिलें चुंबन घ्यावें' या सीमेपर्यंत जरी पोहोंचू शकला, तरी त्यांचें प्रेम भोगवासनामय नव्हतें. त्यांचें प्रेम त्यागावर अधिष्ठित झालेलें होतें. 'क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणाचा' या त्यांच्या कवितेंत प्रेमिकाला आपल्या प्रेमासाठीं सर्वस्वाच्या नाशालाहि सिद्ध व्हावें लागतें, हाच तेजस्वी संदेश त्यांनीं दिलेला आहे. 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव' आणि 'एकच प्याला' हीं त्यांचीं नाटकें म्हणजे त्यागयुक्त प्रेमानें रसरसलेलीं महाकाव्येंच होतीं! (टाळ्या)

" हिंदु समाजांतील विचाराच्या आणि आचाराच्या ज्या उज्ज्वल आणि निर्मळ

परंपरा आहेत, त्यांचा गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयांत पुरस्कार केला आहे. कुटुंबांतील ममतेचीं आणि जिव्हाळ्याचीं जीं नातीं आहेत, जे लागेबांधे आहेत, त्यांचें हृदयस्पर्शी चित्रण गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयांत जागोजाग केलेलें आहे. म्हाताऱ्या धनेश्वराशीं लग्न लावण्यापूर्वी आपल्या मुलीला ' जा, आतां प्रेताशीं लग्न लावलेंस तरी तुझें सौभाग्य कायम राहील ! ' असा आशीर्वाद देणाऱ्या कन्यावत्सल धुंडिराजाचें कारुण्यपूर्ण कन्यावात्सल्य केवळ हिंदुसमाजांतच आढळून येईल.

गडकऱ्यांनीं हिंदु मातेच्या अंतःकरणांतली व्यथा जशी जाणली होती तसें हिंदु पित्याच्या हृदयांतलें दर्दहि उत्तम तऱ्हेनें ओळखलें होतें. गडकऱ्यांच्या विनोदामध्येंहि हीच सामाजिक आणि कौटुंबिक जिव्हाळ्याची दृष्टि आढळून येते. गडकऱ्यांच्या विनोदानें लोक हंसतात हें खरें, तथापि, लोकांना नुसतें हंसविण्यासाठीं कांहीं त्यांनीं विनोदनिर्मिति केलेली नाहीं. समाजांतील विविध अन्याय आणि विसंगती यांवरच गडकऱ्यांचा विनोद उभारलेला आहे. फक्त कर्तव्याची जाणीव व्यक्तीमध्यें उत्पन्न करून कुटुंब आणि समाज सामर्थ्यवान् व्हावा या एकाच उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन गडकऱ्यांनीं आपलें साहित्य निर्माण केलेलें आहे. ( टाळ्या ).

" गडकऱ्यांची राजकीय दृष्टि किती सर्वगामी आणि दूरदर्शी होती याचा पुरावा ' एकच प्याल्यां 'तील रामलालच्या भाषणांत आढळून येतो. निर्भेळ राजकीय किंवा निर्भेळ सामाजिक दृष्टीनें देशाच्या परिस्थितीचा विचार करून भागायचें नाहीं. देशांतील सर्व प्रश्नांवर एकच प्रभावी उपाय शोधून काढणारा द्रष्टा महात्मा उद्यांच्या आर्यावर्तांत अवतरणार आहे अशी १९१८ सालीं गडकऱ्यांनीं घोषणा केली होती. या महात्म्याचा मार्ग झाडून साफ ठेवणें हीच खरी राष्ट्रसेवा होय असें त्यांचें मत होतें. गडकऱ्यांनीं घोषणा केल्यानंतर अवघ्या दोनच वर्षांनीं असा द्रष्टा महात्मा आर्यावर्तामध्यें अवतीर्ण व्हावा, हा केवळ योगायोग कीं त्यांचें दिक्कालांतून आरपार पहाण्याचें प्रभावी सामर्थ्य याचा विचार तुम्हींच करावा ( प्रचंड टाळ्या ). "

अध्यक्षीय भाषण करतांना सर चिंतामणराव देशमुख म्हणाले, " आचार्य अत्रे आणि इतर कांहीं कार्यकारी मंडळी जेव्हां माझ्याकडे आजचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची सूचना घेऊन आले, तेव्हां मी म्हणालों, ' मला गडकऱ्यांच्या लिखाणाचें असावें तसें परिशीलन नाहीं. नोकरशाहीच्या वाळवंटांत माझी सरस्वती कुठें तरी गडप झालेली आहे. तेव्हां या समारंभाला अध्यक्ष होण्याची पात्रता माझ्या अंगीं नाहीं. ' "

" तेव्हां ' अत्रे उवाच ' ( हंशा ) कीं ' मीं येथें उभा आहें. भ्यायचें कारण नाहीं. ( हंशा ) गेल्या पंचवीस वर्षांत गडकऱ्यांचें सर्व वाङ्मय लोकांनीं वाचलें आहे. म्हणून आपण त्यावर थोडें बोललांत तरी चालेल ! ( हंशा ) कांहीं कमी पडलें तर

आम्ही आहोंतच!' (प्रचंड हंशा). त्यांच्या आकृतीला पाहून मला धीर आला व म्हणून मी येथें उभा आहें. (हंशा).

"गडकरी विनोदप्रधान कीं करुणरसप्रधान, त्यांची नाट्यकला सहजसुंदर कीं नटलेली, भावना नागरिक कीं नैसर्गिक, भाषा अव्याजमनोहर कीं विलासी, कलेचा उद्देश मनोरंजन कीं रूढिभंजन, गडकरी तांब्यांच्या तोडीचे कीं मुक्तेश्वरांच्या बरोबरीचे, युगप्रवर्तक कीं निव्वळ संप्रदायसंवर्धक या कांटेरी मार्गांत मी पडूं इच्छीत नाहीं. सुशिक्षित महाराष्ट्र समाजाचा एक प्रतिनिधि म्हणून मी आज आपल्यापुढें उभा आहें. त्यांच्याच दृष्टीनें बोलेन.

"पण ओघाओघानें वाहवलोंच तर दोन चर्चात्मक शब्द बोलेनहि! परंतु, साहित्यिकांनीं, अभ्यासकांनीं, समीक्षकांनीं व इतर '—कांनीं' त्याजकडे दुर्लक्ष करावें अशी माझी आग्रहाची विनंति आहे. नाहीं तर समीक्षकांच्या संग्रामांत न उतरतांहि माझे हाल व्हायचे! आणि आज तर इथें महाराष्ट्र सारस्वतांतील केवढे रथी, अतिरथी, महारथी जमलेले आहेत!

**आचार्य, आळतेकर, कुळकर्णी, कमतनूर, ज्या कटकीं!**

**त्यांत मरेनचि शिरतां कांब्यावरि घालितां चिरे पट कीं!** (हंशा)

"बरें, चिकित्सेची बिकट किचकट वाट सोडून वैयक्तिक आठवणींच्या कुरणांत शिरून बागडूं म्हणेन, तर कवीच्या जीवनाशीं माझ्या जीवनाचा जुळलेला धागा अक्षय्य व रेशमी पण एकेरी; त्यावर कोणती कसरत करून दाखवूं? गोकुळचें पात्र श्रीयुत 'अ' वरूनच निर्माण केलें कीं बालमित्र 'ब' वरून या प्रश्नावर मला उजेड पाडतां येणार नाहीं! गडकऱ्यांविषयीं चटकदार किंवा हृदयस्पर्शी आठवणी मला सांगतां येणार नाहींत. 'परिचय नसतां करित अतिक्रम कविमानस माझें' हें गडकऱ्यांचें वचन आतां आपण ऐकलेंच आहे.

"खरोखरीच, त्यांचा माझा परिचय नव्हता. कविवर श्री. रवींद्रनाथ टागोरां-प्रमाणें त्यांची माझी एकदांच भेट! तीसुद्धां फुरसदीनें किंवा परिचय घडविण्यासाठीं नाहीं. कवितारूपी आशीर्वाद बहाल केल्यानंतर माझ्या छायाचित्राची मागणी करण्या-साठीं ते आले होते. परंतु समजुतीचा घोटाळा होऊन ती नाकारली गेली, त्याची आतां मला हळहळ वाटते. त्यांचें चित्र त्या वेळींच हृदयावर रेखाटलें गेलें पण अगदीं पुसट!

"गडकऱ्यांनीं महाराष्ट्र सारस्वताच्या चंदेरी दर्यावर उदार अंतःकरणानें माणिकमोत्यांची खैरात केली. रुचेल तें कोणीहि घ्यावें. आपल्या महाराष्ट्रीय संस्कृतींत मुरलेले ते कंद! त्यांचें लिखाण म्हणजे पूर्वीच्या सर्व कवींच्या, शाहिरांच्या, संतांच्या वचनांचा, बुद्धीच्या रज्जूनें आणि शरीराची काठी करून काढलेला असा नवनीत भेला! जो ज्याच्या जिभेला जसा लागेल तसा त्यानें चाखावा! जसें कठोपनिषदांत

आत्म्याविषयीं म्हटलें आहे तसें त्यांच्या लिखाणाच्या अंतरंगाविषयीं म्हणतां येईल.

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो,**
**न मेधया न बहुता श्रुतेन,**
**यमवैष वृणुते तेन लभ्य—**
**स्तस्यैष आत्मा निवृणुते तनु स्वाम**

" मला वाटतें, गडकरी युगप्रवर्तक नाहींत—पण युगावधिसूचक होते. १९१९ मध्यें नवें युग सुरू झालें. पारतंत्र्याचें दडपण हलकें होऊन जिवाला निराळा हुरूप, निराळा जोम वाटूं लागला. तरुण महाराष्ट्राचीं पावलें उत्क्रांतिपथावर आशेनें भरभर पडूं लागलीं. जीवन जास्त कलामय होऊं लागलें आहे. याची जणुं पूर्वतयारीच म्हणून कीं काय त्यांना जीवनाची कला जरी साध्य झाली नाहीं तरी कलेच्या जीवनांत जीवापाड मेहनत करून त्यांनीं अमूल्य भर घातली. अशा कविवराचें साहित्यतंत्रा-प्रमाणें पौर्वापर्य ठरवण्याची कशाला उठाठेव? आपल्याला हंसक्षीरन्यायाची विहंगम-दृष्टि नको किंवा छिद्रान्वेषी गृध्र दृष्टि नको! ज्यांना या वादांत शिरावयाचें असेल त्यांनीं आचार्य अत्रे यांच्या 'समीक्षका'चा सर्वांगसुंदर असा जो 'गडकरी विशेषांक' आज निघालेला आहे तो वाचावा.

" कोणी कांहीं मानो. कवीचा अमका संदेश व अमकी शिकवण आहे यासंबंधीं कितीहि वाद माजोत. सर्व जगांत मला त्यांनीं अलग गुरुमंत्र दिला आहे. माझ्या कुंडलींत जसा गुरूचा 'पुण्यप्रभाव' तसा 'पुण्यप्रभावा'चा गुरुहि असावा. माझे गुरु श्री. रामचंद्र कृष्ण लागू यांनीं माझ्या जीवनाची रेषा आंखली व 'अलब्ध शाणोत्कषणा नृपाणां। न जातु मौली मणयो वसन्ति' हें लक्षांत ठेवून मला शिकविण्याचे कष्ट उठविले. तर जीवनपथावर अचानक गांठ पडलेल्या गडकरी मास्तरांनीं त्यांच्या गुरुकुलांतील मी नसतांना सुद्धां मला गुरुमंत्र दिला! केवढें हें माझें भाग्य!

**वंश, जाति, तव समाज, त्यापरि महाराष्ट्रभाषा**
**आजपासुनी सर्वांनाही तुझी फार आशा!**

" हे त्यांचे शब्द माझ्या कानांत सदैव घुंगत असतात. येथें त्यांना जात्याभिमान होता अशी गैरसमजूत होण्याचा संभव आहे. त्यासंबंधीं त्यांचे विचार अत्यंत उदार होते. मला वाटतें, आपण जातीचा विनाकारण बागुलबुवा करतों. कुळ, जाति, प्रांत वगैरेविषयीं आपलेपणा स्वाभाविक आहे. अयोग्यहि नाहीं. तो विस्तारशील आत्मीयतेंत समाविष्ट असला म्हणजे झालें. दुरभिमान नसून सदभिमान असावा. सर्व जातींत गुण आहेत. सर्व जाति आपल्याच आहेत. सर्व एकाच शरीराचे घटक आहेत. परस्परविरोध नसावा म्हणजे झालें. पायांना हातांचा हेवा, पोटाला मस्तकाचा मत्सर हें कसें चालेल? सर्व एकाच रक्तानें पोसलेले, एकाच प्राणावर भिस्त व एकाच

ध्येयासाठीं सर्व निर्माण केलेलें. तीच गोष्ट, कुळ, जाति, प्रांत, देश यांची. आपले कवि म्हणतात :

> दिव्य अलौकिक जें जें दिधलें ईशें मनुजाला,
> ईश्वरांश तें सदा लावणें ईश्वर-कार्याला !
> प्रतिक्षणीं वर जातां दृष्टी व्यापकतर होई,
> क्षितिज वर्तुळासह वाढूं दे स्वार्थ वर्तुळाहि !
> मी माझें कुळ माझी जाती समाज माझा हा,
> श्रीमानवता देवी माझी ईश्वर मीच अहा !
> अशा भावना मनिं ठेवुनिया जा वरतीं वरतीं–

" लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं हे उदात्त विचार ३१ वर्षांपूर्वी उद्गारलेले आहेत. त्या वेळीं राष्ट्रान्तर्गत सामाजिक उत्क्रांतीहि झाली नव्हती. व आंतरराष्ट्रीय मंडळाची कल्पनाहि जगांत मिरवूं इच्छिणाऱ्या देशांत नव्हती ! त्यानंतर दोनच वर्षांनीं मानवता देवीची विटंबना करण्याकरितांच कीं काय पाश्चात्य राष्ट्रांनीं मनुष्यहोम आरंभिला. आज या उपदेशाचें आपल्या देशाला केवढें महत्त्व आहे. आज ' हा माझा देश ' असें म्हणण्याची सुद्धां सोय नाहीं. म्हटलें तर देश–दुफळीची चर्चा सुरू होते.

" गडकऱ्यांच्या मेंदूला अजिबात विश्रांति नसे. त्यांनीं अलंकाराचे बत्तासे उधळले. कल्पनांच्या फुलझडी झडविल्या आणि त्यांत रात्रीचे दिवस केले. कशाकरितां ? आपल्या पैतृक संस्कृतीकरितां. आपल्या महाराष्ट्र शारदेला लडिवाळपणें सजविण्याकरितां ! माझ्या मराठीला काय झेपत नाहीं–मायवाणीला अवर्ज्य काय आहे, असें ते म्हणत. भावनांचें गूढ, कल्पनांचें वैचित्र्य व नवलाई, कोल्हटकरांचा विनोद कांकणभर सरसच, होनाजीची शाहीरशाही, संवेदनांचा हळुवारपणा, सर्व कांहीं आपल्या मराठीला साधतें हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. कोटियुक्त शब्दांनीं अज्ञान व विषाद यांचें कारंजें बनवून त्यांतून आनंदाच्या चिळकांड्या उडविल्या. त्यांची प्रतिभा म्हणजे मधमाशांचें पोळें. सर्व साहित्योपवनांतील मधुरस लुटून, अव्याहत परिश्रमानें अमृताचा सांठा करून दिला. तुमच्या आमच्या करितां चंदनासारखी आपली तनु झिजविली.

" गडकरी हे भावनाप्रधान नाहींत किंवा ध्येयप्रवण नाहींत पण ते जातिवंत कलावंत होते. कलाकुसरीची कमाल करून काया काव्याला कुरबान केली. त्या ह्या महाराष्ट्र शारदेच्या परमभक्ताच्या स्मरणार्थ हा महोत्सव जितक्या सढळ हातानें, प्राणावर उदार होऊन गडकऱ्यांनीं तिच्या भांडारांत भर घातली व तिला सुवर्णानें सजविलें, तितक्याच औदार्यानें तुम्ही त्या ऋणाची फेड करा हें मीं का तुम्हांला सांगावयास पाहिजे ?

" माझ्याजवळ शब्द-पुष्पहाराकरितां वाक्संपत्ति नाहीं व प्रतिभाहि नाहीं ! आणि फूलही नाहीं. फुलाची पाकळी स्मृतिवेदिकेवर वाहण्याची सुसंधि मला दिलीत म्हणून मंडळाचे व आपण माझे वेडेवाकडे चार शब्द शांत चित्तानें ऐकून घेतलेत म्हणून आपले अत्यंत नम्रपणें आभार मानतों. मला मंडळातर्फे जी ही देणगी देण्यांत आली आहे त्याविषयीं मी काय बोलूं ? हें ' अभिनंदनपर वर्षापना 'च्या खुद्द गडकऱ्यांचें स्वयंलिखित मथळ्याचें-आचार्य अत्रे यांनीं जुन्या कागदांच्या गुप्त मंजूषेमधील शोधून काढलेलें रत्न आहे ! एका मित्राचे शब्द थोडे फिरवून बोलावयाचें म्हणजे—

**प्राणप्राय प्रिय मज दिली भेट ही जी अमोल**
**आभाराचे कितिक वदलों बोल होतील फोल ! "**

सर चिंतामणरावांनी साहित्यविषयावर केलेलें हें त्यांचें पहिलें आणि शेवटचेंच भाषण असावें असें वाटतें.

# २८

# ललित वाङ्मयाची कैफियत !

१९३६ सालीं बडोद्याच्या चौथ्या वाङ्मय-संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं पहिल्यानें माझी निवड झालेली होती. माझ्या अध्यक्षीय भाषणानें तें संमेलन गाजलें म्हणा किंवा त्या संमेलनामुळें माझें अध्यक्षीय भाषण गाजलें म्हणा. पण कोणामुळें कांहीं तरी गाजलें. पुन्हां त्याच संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड होईल असें मला स्वप्नांत सुद्धां कधीं वाटलें नव्हतें.

पण १९४४ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्या संमेलनाच्या नवव्या अधिवेशनाचे नियुक्त झालेले अध्यक्ष सुप्रसिद्ध कथा–कादंबरीकार विष्णु सखाराम ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर हे ऐन वेळीं नेहमींप्रमाणें आजारी पडले. खांडेकर अन् मी जवळ जवळ एकाच वयाचे आहोंत. पण उभ्या आयुष्यांत आपली प्रकृति चांगली आहे असें सांगण्याचा एकदांहि त्या बिचाऱ्यावर कधीं प्रसंग आल्याचें निदान मला तरी आठवत नाहीं. इतकी तोळामासा प्रकृति अंगावर बाळगून वर्षानुवर्षें जगतांना त्यांना किती त्रास होत असेल ह्याची मला तर कल्पनाच करवत नाहीं. असो.

वस्तुतः माझीहि प्रकृति त्यावेळीं

बरी नव्हती. कारण 'दिल-की-बात' या चित्रपटाच्या दिग्दर्शनांत मी त्या वेळीं गळ्यापर्यंत गुंतलों होतों. सतत सात दिवसांच्या अहोरात्र चित्रणाच्या अतिरिक्त परिश्रमामुळें मी अगदीं हैराण होऊन गेलों होतों. एवढ्यांत एका भल्या सकाळीं माझे मित्र नि बडोद्याच्या नवव्या वाङ्मयपरिषदेचे स्वागताध्यक्ष प्रा. सदुभाऊ देशपांडे हे मुंबईला माझ्या बिऱ्हाडीं अकस्मात् प्रकट झाले आणि त्यांनीं माझ्यावर परिषदेच्या अध्यक्षपदाचें पकडवॉरंट बजावलें. मी सर्दच झालों. मला त्यांनीं अक्षरहि बोलूं दिलें नाहीं.

ते म्हणाले, "परिस्थिति फारच गंभीर आहे. संमेलन चार दिवसांवर राहिलें आहे. ऐन वेळीं खांडेकरांची तार आली कीं, प्रकृति बिघडली आहे आणि डॉक्टरांनीं दोन महिने तब्बल विश्रांति घेण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यांची तार वाचून आम्हां बडोदेकरांच्या कमराच मोडल्या आहेत. कार्यकर्ते हवाल दिल होऊन कपाळाला हात लावून बसले आहेत. तेव्हां मीं त्यांना धीर दिला.

"दोस्त हो, डरो मत्, खांडेकरांच्या प्रकृतीमुळें आसन्नमरण झालेल्या परिषदेला खांद्यावर घेऊन पैलतीराला पोहोंचवील असा दणदणीत प्रकृतीचा एकच साहित्यिक महाराष्ट्रांत आहे. आणि तो म्हणजे आचार्य अत्रे. त्यांना मी घेऊन येतों. अशी तुम्हांला घेऊन जाण्याची भीष्मप्रतिज्ञा करून मी इथें आलों आहे. तुम्हीं नाहीं म्हणणार नाहीं, याची मला खात्री आहे. तुम्हांला न घेतां हात हालवत जर मी बडोद्याला गेलों तर मला आमचे लोक जिवंत ठेवणार नाहींत!" तेव्हां पुढचें माझें सगळें बोलणेंच खुंटलें. बडोद्याची वाङ्मयपरिषद् 'वांचविण्यापेक्षां' माझे मित्र प्रा. सदुभाऊ देशपांडे यांचे प्राण वांचवणें हें माझें आद्य कर्तव्य होतें. नाहीं का ?

शनिवारीं १२ फेब्रुवारी १९४४ ला पहांटे मी बडोद्याला पोहोंचलों. परिषद् होती दुसऱ्या दिवशीं. म्हटलें, एक दिवस आधीं तरी विश्रांति मिळेल. पण कसचें काय न् कसचें काय ? शनिवारीं सायंकाळीं जुम्मा दादा व्यायामशाळेच्या विस्तीर्ण पटांगणांत गडकरी स्मृतिदिनानिमित्त माझ्या अध्यक्षतेखालीं एक टोलेजंग जाहीर सभा भरली. बडोद्यांतील सर्व ज्येष्ठ साहित्यिक नि अधिकारी मंडळी या सभेला उपस्थित होती. महाराष्ट्रीयांची एवढी मोठी सभा तत्पूर्वी बडोद्यांत कधींहि भरली नव्हती असें मला सांगण्यांत आलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बडोद्याच्या राजविलासी 'न्यायमंदिर सभागृहां'त अधिवेशनाला प्रारंभ झाला. एवढें मोठें सभागृह मुंबई शहरांत देखील आढळणार नाहीं. स्वागतपद्यांत 'येथ उदात्ताचिये धरा। विनोद येता पाहुणेरा। संमेलनीं स्निग्धोद्गारा' आतुरले जन!' असा उल्लेख मोठ्या मार्मिक समुचिततेनें केलेला होता.

स्वागताध्यक्षांनींहि आपल्या स्वागतपर भाषणांत अत्यंत रसिकतेनें गौरव केला.

ते म्हणाले, " एका संस्कृत नाटकांतील पंक्तींत भेद करून असें म्हणतां येईल कीं, ' प्रल्हादो निपुणः कविः ' कवीचा व्यावहारिक अर्थ प्रासबद्ध रचना करणारा असा असला तरी त्याचा मूलार्थ शहाणा असा आहे. अत्रे यांचे ठिकाणीं कवित्व व निपुणता हीं दोन्हीहि वास करतात. म्हणूनच त्यांचें गुणवर्णन करतांना ' पाहिलेंचि पहावें । पुनः पुनः ' या न्यायानें आनंदाची वृद्धि होते. वरील चरणार्थ आपण मान्य केलात म्हणजे उरलेला ' परिषदज्येष्ठा गुणग्राहिणी ' हा ओघानेंच आला. "

अवघ्या चार दिवसांच्या सूचनेनें मी संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारलें होतें. त्यामुळें भाषण लिहून आणि तें छापून आणण्याचा मुळीं प्रश्नच नव्हता. मीं स्वागताध्यक्षांना सांगून ठेवलें होतें कीं मी प्रसंगस्फूर्त भाषण करीन. तीन महिन्यांपूर्वीच मुंबईला साहित्यसंमेलन भरलें होतें, त्या वेळीं त्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. श्री. जोग ह्यांनीं ललित लेखकांवर कडकडून हल्ला चढविलेला होता.

प्रा. जोगांचें म्हणणें असें कीं " आजकाल ललित लेखकांनीं स्वतःच्या धंद्याविषयीं आणि स्वतःविषयीं भलत्याच कांही तरी कल्पना करून घेतल्या आहेत. त्या अगोदर त्यांनीं आपल्या डोक्यांतून काढून टाकल्या पाहिजेत. केशवसुत म्हणतात कीं ' दिक्कालांतुन आरपार अमुची दृष्टि पहाया शके. ' रे. टिळक म्हणतात, ' हीं निःश्वसितें, कोण सोडितें ? विचारुनी भिऊनी त्याला, पुढें करा मग कर आपुला ! ' कवींच्या आणि ललित लेखकांच्या या सर्व घमेंडखोर वल्गना हास्यास्पद आहेत. म्हणे देशाला आग लागली आहे. समाजांत वणवा पेटला आहे. जनता झोपलेली आहे. तेव्हां म्हणे आम्ही ही आग किंवा हा वणवा विझवणार आहोंत. झोपलेल्या जनतेला आम्ही खडबडून जागें करणार आहोंत. ह्या नाटकी वल्गना वेळीं अवेळीं करून कवि नि लेखक स्वतःचें नुसतें हंसें करून घेत आहेत.

" आभाळाला ठिगळ लावण्याच्या या वारेमाप गप्पा ललित लेखकांनीं बंद केल्या पाहिजेत. ललित लेखकांनीं प्रथम आपण कोण आहोंत, हें ओळखलें पाहिजे. एकादा पेटीवाला, पखवाज्या, सतारवाला, सारंगीवाला, गवई किंवा कथ्थक नृत्यकार आपल्या कलेनें श्रोत्यांची आणि प्रेक्षकांची करमणूक करून त्यांच्या मनाला जसा आनंद देतो, त्याप्रमाणें आपल्या लेखनानें वाचकांची करमणूक करून त्यांना आनंद देणें यापेक्षां ललित लेखकाला अधिक महत्त्व नाहीं. समाजाचें मार्गदर्शन करण्याचें काम तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, निबंधकार, इतिहासकार यांच्यासारख्या विद्वान् पंडितांचें आहे. त्यांच्या रांगेमध्यें त्यांच्या मांडीला मांडी लावून स्वतःचा भाव निष्कारण वाढवून घेण्याच्या किंवा स्वतःच्या ध्येयाबद्दल नि पुरोगामित्वाबद्दल बाष्कळ बडबड करण्याच्या भानगडींत ललित लेखकांनीं पडूं नये. "

अशा रीतीनें ललितवाङ्मयाच्या मुळावरच प्रा. जोग यांनीं कुऱ्हाड घातली होती. तेव्हां त्यांच्या सर्व युक्तिवादाचें खंडन करून ' ललितवाङ्मयाची कैफियत '

वाङ्मयीन टीकाकारांच्या पुढें झडझडून मांडण्याची बडोद्याची वाङ्मय परिषद् ही एक उत्तम संधि आहे अशी मी बडोद्याला जातांजातांच मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली होती. त्याप्रमाणें प्रा. जोगांना माझ्या भाषणांत मीं जें उत्तर दिलें, त्याचा सारांश असा :

" आजपर्यंत ध्येयवादाच्या आणि पुरोगामित्वाच्या ज्या ' टिळे–टोप्या–माळा ' आम्ही ललितलेखकांनीं अंगावर धारण करून स्वतःचा बडिवार वाढवून घेतला होता; त्या साऱ्या आमच्या अंगावरून हिसकावून घेऊन प्रा. जोग ह्यांनीं आमच्या गळ्यांत सतारी, सारंग्या आणि बाजाच्या पेट्या अडकवण्याचा मुंबईमध्यें थोड्या दिवसांपूर्वी प्रयत्न केलेला आहे. दुःशासनानें ज्याप्रमाणें द्रौपदीचें वस्त्रहरण केलें, त्याप्रमाणें प्रा. जोगांनीं आमचें ' वस्त्रहरण ' करून आमचें खरें स्वरूप आम्हांला आणि जगाला दाखवण्याची कामगिरी केलेली आहे.

" अशा तऱ्हेची टीका आम्हां ललित लेखकांना कांहीं नवीन नाहीं. आजपर्यंत पंडित मंडळी किंवा अलीकडे वाङ्मयक्षेत्रांत घुसलेली संस्कृतिसंरक्षक नांवाचीं उंटाचीं पिलेंहि ललित वाङ्मयाकडे अशाच हेटाळणीच्या दृष्टीनें पहातात. शास्त्रीय वाङ्मयाची महति गावयाची, ज्ञानाचे पवाडे म्हणावयाचे नि सोप्या अन् मनोरंजक लेखनाला हीन लेखावयाचें हा शिष्ट नि अहंमन्य लोकांचा फार जुना धंदा आहे.

" पंडित मंडळींनीं ज्ञानाबद्दल सर्वसामान्य समाजाच्या मनांत भलभलत्या कल्पना निर्माण करून ठेवलेल्या आहेत. म्हणे ज्ञान हें गहन असतें. तें रुक्ष असतें. त्यासाठीं तपश्चर्या करावी लागते. रात्रीचे दिवस करावे लागतात. त्यासाठीं हाडाचीं काडें करावीं लागतात. या गोष्टी समाजाच्या कानीकपाळीं आजपर्यंत पडत आलेल्या आहेत. त्यामुळें जें गहन नाहीं, जें कठीण नाहीं, जें कर्कश नाहीं, किंबहुना जें मनोरंजक आहे, जें आल्हादकारक आहे, ज्यानें मनोविनोदन होतें, ज्यानें करमणूक होते, त्याबद्दल साहजिकच गैरसमज वाढत गेला. निदान पंडिती परंपरेनें एकसारखा तो वाढवीत नेला.

" मोठी गंमतीची गोष्ट आहे, नाहीं ! कीं ज्या गोष्टी सामान्य समाजाला कळूं शकत नव्हत्या, त्याबद्दल समाजाला आदर वाटावा. आणि ज्या गोष्टीमुळें समाजाचें मनोरंजन होतें आणि समाजाला आपले श्रम हलके झाल्यासारखे वाटतात, त्या गोष्टीबद्दल समाजाला अनादर वाटावा ? त्यामुळें जें कळत नाहीं तें उच्च, आणि जें सहज कळतें तें नीच अशी साहित्याची आपोआपच फारकत झाली. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानीं बहुधा ललित लेखकच निवडला जातो म्हणून संतापलेल्या या पारंपरिक ज्ञानाच्या पुजाऱ्यांनीं अलीकडे ' उच्च वाङ्मय परिषदा ' भरवण्यास सुरुवात केलेली आहे. पण मौज ही कीं ललित वाङ्मयाला शिव्या देण्यापलीकडे अधिक उच्च दर्जाचें कार्य या ' उच्च वाङ्मय परिषदां 'मधून होत नाहीं.

" ललित वाङ्मयाकडे केवळ वरवरच्या दृष्टीनें पहाणाऱ्याला त्यांच्यांतील रंजकतेचें प्राधान्य वाटावें हें साहजिकच आहे. प्रा. जोगांचें तसें झालें आहे. त्यांनीं ' रंजन ' आणि ' आल्हाद ' हे शब्द केवळ लौकिक आणि सामान्य दृष्टीनें वापरले आहेत. गाण्यानें मनोरंजन होतें. नाचण्यानें होतें. चित्र पाहिल्यानें होतें तसें ललित वाङ्मय वाचल्यानें होतें. म्हणून गाणें, नाचणें, चित्रकला आणि ललित वाङ्मय यांचा हेतु एकच म्हणजे मनोरंजन करणें किंवा मनाला आल्हाद देणें हाच आहे, असा जोगांनीं तावडतोब सिद्धान्तच बांधून टाकला.

" रंजकता हें ललित वाङ्मयाचें साध्य नसून साधन आहे. आनंद देणें हें वाङ्मयाचें कार्य नसून ती त्याची क्रिया आहे. तसें पाहिलें तर शास्त्रीय वाङ्मयानें शास्त्रज्ञांना काय कमी आनंद होतो ? झाडावरून पडलेल्या फळांत न्यूटनच्या दिव्य दृष्टीपुढें जो गुरुत्वाकर्षणाचा प्रभावी नियम चकाकला त्यामुळें त्याला काय कमी आनंद झाला असेल ? आंघोळीच्या भांड्यांत शिरतांच पाणी बाहेर सांडलें हें बघून ' युरेका-युरेका ' ( मला दिसलें ! मला दिसलें ! ) असें ओरडत नागव्यानें आर्किमिडीस बाहेर पडला, त्याला काय कमी आनंद झाला होता ? वाङ्मय कोणतेंहि असो, शास्त्रीय वा ललित, त्यानें आनंद हा होणारच ! पण शास्त्रीय वाङ्मयांतील आनंद बुद्धिगम्य असल्यानें तो थोड्यांनाच प्राप्त होतो. तर ललित वाङ्मयांतील आनंद हा भावनानिष्ठ असल्यानें तो कोणत्याहि सामान्य मानवी मनाला सहज मिळण्यासारखा असतो.

" लोकांचें केवळ मनोरंजन करणें, हा ललित वाङ्मयाचा हेतु नसून संसारांतील अनेक प्रश्नांची हंसत खेळत लोकांना जाणीव करून देणें आणि जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक वैचारिक करणें हा होय. ललित वाङ्मय हें केवळ अज्ञान अशा बहुजन समाजावरच परिणाम करतें असें नाहीं. प्रगल्भ मनावरहि त्याचा प्रभाव पडतोच पडतो. कोणत्याहि नीतिशास्त्राच्या विद्वत्तापूर्ण ग्रंथापेक्षां ' इसापनीति ', ' पंचतंत्र ', ' हितोपदेश ' यांची शिकवणूक काय कमी परिणामकारक आहे ? खिस्तानेंहि आपलें तत्त्वज्ञान सांगतांना दृष्टान्त कथांचाच नाही का उपयोग केला ? व्यासांनीं एवढ्या मोठ्या ' महाभारताची रचना केली. त्यांत धर्मशास्त्र, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानापेक्षां ललित वाङ्मयच अधिक आहे कीं नाहीं ? आणि ' महाभारतां'-तील हें ललित वाङ्मय केवळ वाचकांचें मनोरंजन करून त्यांना आनंद देण्यासाठीं व्यासांनीं रचलें असें प्रा. जोग म्हणूं शकतील काय ?

" ललित वाङ्मयाचें आरंभींचें स्वरूप केवळ मनोरंजक होतें हें मला मान्य. पण वाङ्मयाची जशी जशी उत्क्रान्ति होत गेली तसा त्याच्या तंत्रांत आणि हेतूंतहि बदल होत गेला. कोणतेंहि शास्त्र हें तीन अवस्थेंतून जातें. कौतुक ( Wonders ) उपयोग ( Utilities ) आणि शास्त्र ( System ). विजेचें शास्त्र जें आज बनलेलें

आपण पहातों आहोंत, त्याचा प्रारंभ ‘ ठिणग्यांच्या खेळां ’तूनच झाला. ललित वाङ्मयहि अशा तीन अवस्थांमधून गेलेलें आहे. ‘ अरबी भाषेंतील सुरस नि चमत्कारिक गोष्टी ’ हें ललित वाङ्मयाच्या कौतुकावस्थेंतील अत्यंत तेजस्वी आणि प्रचंड असें स्मारकच होय ! कालांतरानें देवादिकांच्या, अप्सरांच्या, पऱ्यांच्या आणि यक्ष-गंधर्वांच्या, काल्पनिक वातावरणामधून ललितवाङ्मय पृथ्वीवर उतरलें आणि माणसांमधून फिरूं लागलें.

“ तथापि,त्याचें लक्ष सुरुवातीला राजेमहाराजे, श्रीमंत-सरदार,लक्ष्मीपुत्र यांच्याकडेच गेलें. हळूहळू त्यांना वाङ्मयाला कंटाळा येऊं लागला आणि मग समाजाच्या निरनिराळ्या विभागांतून तें फेरफटका मारूं लागलें. तसें त्याला समाजाचें व्यापक जीवन समजून येऊं लागलें. त्यामुळें त्याच्या स्वरूपांत अंतर्बाह्य बदल झाला. ललितवाङ्मयाचा दृष्टिकोन जसा जसा अधिक विस्तृत आणि व्यापक होऊं लागला, तसतसें सामाजिक जीवनांत त्याला अधिक महत्त्व आणि सामर्थ्य प्राप्त होऊं लागलें. त्यामुळें आजच्या घटकेस ललितवाङ्मयाचें एक निराळें ‘ शास्त्र ’च होऊन बसलें त्याचे प्रकार, त्याच्या पद्धति, त्यांचें तंत्र, त्याचे नियम, त्याची वैचारिका, त्याची चर्चा आणि त्याची टीका या सगळ्यांना आज एक शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे.

“ ललित वाङ्मय ही आतां समाजांतील एक मनोरंजनाची आणि केवळ आनंद देणारी अशी बाब राहिली नसून, समाजाच्या जीवन-कलहांतलें एक प्रभावी शस्त्र म्हणून आज आपण त्याच्याकडे पहावयाला शिकलों आहोंत. याचा असा अर्थ मात्र नव्हे कीं, त्यामुळें ललित वाङ्मयाची मनोरंजकता कोणत्याहि तऱ्हेनें कमी झालेली आहे. तथापि नुसती मनोरंजकता हें कांहीं ललित वाङ्मयाचें ध्येय नव्हे. ललित वाङ्मयाच्या प्राथमिक अवस्थेंत तें त्याचें ध्येय होतें हें मात्र खरें ! ”

माझें भाषण पावणेदोन तासपर्यंत चाललें होतें. दुसऱ्या दिवशीं गांवांत अनेक ठिकाणीं माझे कार्यक्रम झाले. रात्रौ श्री. पांडुभय्या गुप्ते ह्यांनीं मला एक टोलेजंग खाना दिला. अशा रीतीनें दोन तीन दिवस बडोदें गाजवून मी परत मुंबईला आलों.

# २९

## मुंबईचा पहिला नाट्यमहोत्सव

१९४१ सालीं माझ्या अध्यक्षतेखालीं मुंबईला भरलेल्या नाट्यसंमेलनांत साहित्य-सम्राट् नरसिंह चिंतामण केळकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं ' महाराष्ट्र शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सव मंडळ ' स्थापन झालें. या मंडळाच्या तर्फे १९४३ सालीं स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सांगली येथें मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव प्रचंड प्रमाणावर साजरा झाला. त्यानंतर ग्वाल्हेरपासून तों गोव्यापर्यंत महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं नाट्यमहोत्सव मोठ्या उत्साहानें साजरे करण्याची जणुं कांहीं एक लाटच आली.

पुण्यामध्यें हा महोत्सव तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखालीं मार्च १९४४ मध्यें साजरा झाला, तर मुंबईमध्यें हा नाट्यमहोत्सव विराट् स्वरूपांत १४ एप्रिल ते २७ एप्रिलपर्यंत अखंड तेरा रात्रीं साजरा करण्यांत आला. श्री. पु. रा. लेले ह्यांच्या सूचनेवरून नटश्रेष्ठ बालगंधर्व ह्यांची ह्या महोत्सवाच्या अध्यक्षपदीं निवड करण्यांत आली. स्वागताध्यक्षाचें पद माझ्याकडे सोपविण्यांत आलें.

ह्या महोत्सवाची सर्व रचना आणि

सिद्धता 'मुंबई साहित्य संघा'चे प्रमुख डॉ. अ. ना. भालेराव यांनीं केली. त्या कामीं ते आणि त्यांचे सहकारी सतत तीन चार महिने आधींपासून रात्रंदिवस झटत होते. चर्नी रोड स्टेशनाजवळील समुद्राकडच्या भव्य पटांगणांत पांच हजार प्रेक्षक आरामांत बसूं शकतील, एवढें प्रचंड रंगमंदिर उभारण्यांत आलें.

त्या विशाल रंगमंदिराचें वर्णन 'चांदवा नभाचा केला। रविचंद्र लटकले त्याला। मग अंथरली धरणी' असें त्या वेळीं मीं केलें होतें. तिकिटांचे दर एक हजार रुपयांपासून पांच रुपयांपर्यंत होते. दूरध्वनि यंत्रांची आणि विजेच्या दिव्यांची व्यवस्था अत्यंत उत्कृष्ट होती. पहिल्या दिवसापासून तों शेवटच्या दिवसापर्यंत प्रेक्षकांची संख्या रंगमंदिरांत एकसारखी तुडुंब भरून होती. 'सौभद्र', 'शारदा' आणि 'स्वयंवर' या तीन नाटकांच्या रात्रीं तर प्रेक्षकांची संख्या सात हजारांवर जाऊन पोहोंचली. तेवढ्या साठीं शेकडों जादा खुर्च्या टाकाव्या लागल्या. मुंबईच्या रसिक धनिकांनीं एकेका खुर्चीसाठीं शंभर शंभर दोन दोनशें रुपये दिले.

साधारणतः प्रत्येक कार्यक्रम पहांटे अडीचपर्यंत चाले. पुष्कळदां तीन साडेतीन वाजत. पण 'सौभद्रा'नें सर्वांवर कडी करून पहांटेचे पांच वाजविले. एकाच तिकिटावर कुटुंबांतली अनेक मंडळी निरनिराळ्या दिवशीं येऊन जात. त्या हिशेबानें चाळीस ते पन्नास हजार प्रेक्षकांनीं ह्या नाट्यमहोत्सवाचा आनंद मनसोक्त लुटला असें म्हणावें लागेल.

दादर विभागांतून हजार दीड हजार प्रेक्षक रोज रात्रीं चर्नी रोडवर येत. कार्यक्रम संपल्यानंतर ट्रॅम, बस किंवा आगगाडीची मुळींच सोय नसे. पण त्याबद्दल कोणी एकानें तक्रार केली नाहीं. पहांटे पावणेपांचाची गाडी असे. तोंपर्यंत प्रेक्षक आपापल्या जागेवर शांतपणें बसून रहात. ह्या नाट्यमहोत्सवांत बालगंधर्व, चिंतुबुवा गुरव, केशवराव दाते, गंगाधर लोंढे, सदुभाऊ रानडे, विनायकबुवा पटवर्धन, नानासाहेब फाटक, पार्श्वनाथ आळतेकर, वालावलकर, सौ. हिराबाई बडोदेकर, शाहू मोडक, सौ. नलिनी जयवंत, कु. लता मंगेशकर, बेबी आचरेकर, दामुअण्णा मालवणकर इत्यादि ख्यातनाम नटनटी आणि गायिकांनीं भाग घेतला.

वृद्ध नटश्रेष्ठ चिंतुबुवा गुरव ह्यांचा ऐनवेळीं सत्कार करावयाचें ठरलें. 'शारदा' नाटक संपल्यानंतर मी स्वतः महाद्वारावर टोपी घेऊन उभा राहिलों. अर्ध्या तासांत चौदाशें रुपये गोळा झाले. त्या नाट्यमहोत्सवाच्या किती किती म्हणून गंमती सांगाव्यात! 'न मिळे अशी मौज पुन्हां पाहण्या नरा!' मुंबईकर महाराष्ट्रीयांच्या आयुष्यांत एवढा मोठा नाट्यमहोत्सव मागें तर झाला नाहींच नाहीं. पण पुढेंहि पुन्हां होणार नाहीं.

या महोत्सवाच्या प्रारंभीं मुंबई शहरांत जी एक भयानक घटना घडली ती येथें सांगण्यासारखी आहे. महोत्सवाचा प्रारंभ शुक्रवार दि. १४ एप्रिल १९४४ रोजीं

रात्रौ होणार होता. पहिल्या रात्रीं मामा वरेरकरांच्या एका नाटकाचा प्रयोग होणार होता. तत्पूर्वी दोन दिवस आधीं मी आणि डॉ. भालेराव असे आम्ही दोघे रंग-मंदिराची पहाणी करीत होतों. तेव्हां मी सहज डॉक्टरांना म्हणालों कीं, "या महोत्सवाचा प्रारंभ तुम्ही मामा वरेरकरांच्या नाटकानें करूं नका. नक्की कांहीं तरी भानगड होईल आणि महोत्सवावर संकट येईल!"

तेव्हां डॉ. भालेराव जरा चिडूनच म्हणाले, "तुम्हीं लोकांनीं मामा वरेरकरांच्या विरुद्ध हा निष्कारण खोटा प्रचार चालवलेला आहे. म्हणूनच मीं मामांचें नाटक सुरुवातीला ठेवलें आहे, असेंच समजानात. तें व्यवस्थितपणें पार पडलें म्हणजे मग तुम्हां लोकांचीं तोंडें बंद पडतील!"

मी गुळमुळीत स्वरांत म्हणालों, "ठीक आहे. जशी तुमची इच्छा. पण विषाची परीक्षा पाहूं नका, एवढाच सध्यां मी तुम्हांला इशारा देतों."

त्यावर डॉ. भालेराव कांहीं बोलले नाहींत. कोणतीहि एकादी गोष्ट डॉक्टरांनीं करावयाची म्हणून ठरविलें कीं मग ते कोणाचेंहि ऐकणार नाहींत हा त्यांचा स्वभाव मला माहीत होता.

पण मामांच्या नांवाचा योगच असा कांहीं विचित्र, कीं मीं केलेलें भाकित अपेक्षे-पेक्षांहि अधिक भयानक स्वरूपांत शंभर टक्के खरें ठरलें. १४ एप्रिलला दुपारीं एकच्या सुमारास मी आणि कांहीं मंडळी गिरगांव बॅक रोडवरील डॉक्टरांच्या घरांत तिसऱ्या मजल्यावर त्यांच्याशीं बोलत बसलों असतां एकाएकीं प्रचंड स्फोट झाला. आमच्या कानठळ्या तर बसल्याच, पण सारी इमारत हादरली. आम्ही बाहेर गच्चीवर आलों आणि आकाशांत पाहूं लागलों तर पांखरें भयभीत होऊन आभाळांत भिरभिरत होतीं. डाव्या बाजूला लांबून कोठूनतरी पांढऱ्या धुराचे लोट आभाळांत उसळत होते. तेवढ्यावरून स्फोटाच्या कारणाची आणि स्थळाची कल्पना येणें शक्य नव्हतें.

भालेरावांच्या घरून ताबडतोब मी उठलों नि कॉंग्रेस लेन वरील माझ्या 'अत्रे प्रिंटिंग प्रेस'मध्यें गेलों. रस्त्यांतून लोक चिंताक्रांत होऊन सैरावैरा धांवत सुटले होते. प्रेसमध्यें येऊन मी माझ्या खुर्चीवर बसलों, तोंच दुसरा महास्फोट झाला. तो पहिल्या-पेक्षांहि रौद्र होता. अर्ध्या तासानें समजलें कीं, हे दोन्ही स्फोट तिकडे गोदीमध्यें झालेले असून त्या स्फोटानें तिकडचा सारा भाग उद्ध्वस्त होऊन गेला होता. त्या स्फोटांत मुंबई शहराचें 'न भूतो न भविष्यति' असें नुकसान झालें. त्या स्फोटामुळें समुद्रालगतचा भाग कित्येक दिवसपर्यंत जळत होता. त्या ज्वाळांचा लाल प्रकाश रात्रींच्या वेळीं आकाशांत प्रतिबिंबित झालेला अनेक रात्रीं मुंबईकरांना पहावयाला मिळत होता.

ह्या महास्फोटामध्यें तीनशें लोक प्राणाला मुकले आणि हजारों लोक निराधार झाले. त्यांच्याबद्दल दुःख नि सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं दि. १४ एप्रिलचा रात्रीचा नाट्यमहोत्सवाचा कार्यक्रम अर्थातच स्थगित करणें भाग पडलें. त्या रात्रीं डॉ. भाले-

रावांच्या कित्येक मित्रांनीं त्यांच्याभोंवतीं जमून 'आतां आला ना अनुभवाला मामांचा पायगुण ?' असा गिल्ला केला. तेव्हां बिचारे डॉ. भालेराव मान खालीं घालून स्तब्ध राहिले.

दि. १५ एप्रिल १९६५ रोजीं रात्रौ नाट्यमहोत्सवाची सुरुवात मोठ्या थाटामाटानें झाली. माझ्या स्वागताध्यक्षीय भाषणांत मी म्हणालों, "मराठी रंगभूमीचा हा शंभरावा वाढदिवस ज्या अर्थी अलोट उत्साहानें अखिल महाराष्ट्र गेले चार महिने साजरा करीत आहे, त्या अर्थी मराठी रंगभूमि जिवंत आहे का मेली आहे, हा अमंगळ प्रश्न आतां यापुढें उत्पन्नच होत नाहीं. आमची मराठी रंगभूमि ही नुसतीच जिवंत नसून, चांगली ठणठणीत जिवंत आहे. एवढेंच नव्हे, तर तिला आतां शंभरावें वर्ष लागलेलें आहे, ही गोष्ट तमाम महाराष्ट्रानें आतां मान्य केलेली आहे. मराठी रंगभूमीचा हा वाढदिवस आहे, श्राद्ध नाहीं; हें कोणी आतां आम्हांला सांगायला नको.

"पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं मराठी रंगभूमि मेली आहे का जिवंत आहे, या प्रश्नामुळें महाराष्ट्रांतील कांहीं 'विद्वान्' मंडळी गेलीं कित्येक वर्षें घोटाळ्यांत पडून राहिलेली आहेत. विशेषतः बोलपटांचा जमाना जसा वाढत गेला आणि वर्षानुवर्षें त्याच त्या नाटकांचीं दळणें ऐकून कंटाळलेले प्रेक्षक नाइलाजानें जेव्हां बोलपटांकडे वळले, तेव्हां महाराष्ट्रांतल्या अनेक 'जुन्या आणि जाणित्या' नाटक मंडळ्या ताबूताप्रमाणें एकामागून एक बुडूं लागल्या. नटवर्ग बेकार झाला, त्याला पुढें काय करावें आणि कोठें जावें हेंच कळेना. 'मराठी रंगभूमि वारली !' म्हणून पहिल्यांदा किंकाळी ठोकली ती याच मंडळींनीं.

"सारे नट रडूं लागले. नाटककार रडूं लागले. फुकट नाटकें पहाण्यास सोकावलेले नाटक मंडळ्यांचे हितचिंतक रडूं लागले. विद्वान् लोकांना रडायला कांहींच लागत नाहीं. तेहि रडूं लागले. सारे ओक्साबोक्सी रडून म्हणूं लागले कीं 'आमची रंगभूमि वारली !' पण मराठी रंगभूमीवर निःसीम प्रेम करणाऱ्या असंख्य मराठी जनतेनें मात्र ही गोष्ट कधींच मान्य केली नाहीं. रंगभूमि प्रेक्षकांना जेव्हां जेव्हां हांक मारीत असे, तेव्हां तेव्हां त्या हांकेला त्यांनीं हजारों आवाजांनीं साद दिली नाहीं, असें कधींच झालें नाहीं. रंगभूमीनें त्यांना हांकच मारली नाहीं, हा कांहीं त्यांचा दोष नाहीं.

"मराठी जनता ही स्वभावतःच नाटकाची वेडी आहे. रंगभूमीवर तिचें अलोट प्रेम आहे. प्रेक्षकांची वाण आहे अशी निदान या महाराष्ट्राची तरी कोणालाहि बदनामी करतां यावयाची नाहीं. म्हणून अशा या महाराष्ट्रांत रंगभूमि मेली आहे असें रडत सुटणें ही मराठी प्रेक्षकांच्या नाट्यप्रेमाची आणि रसिकतेची निव्वळ विटंबनाच होय. नाटकें करावयास आज नाटकगृहें नाहींत. नाटकमंडळ्या

आज बंद पडल्या आहेत. धंदेवाईक नटांची आज अन्नान्नदशा झाली आहे, हें अगदीं–अगदीं खरें आहे. पण याचा अर्थ रंगभूमि मेली आहे असा मात्र मुळींच नाहीं. रंगभूमीवरील जनतेचें प्रेम जोंपर्यंत जिवंत आहे. तोंपर्यंत रंगभूमि जिवंतच रहाणार, हें वज्रलेप आहे. रंगभूमीचा हा शतसांवत्सरिक महोत्सव म्हणजे मराठी रंगभूमि जिवंत असल्याची आम मराठी जनतेची सामर्थ्यवान् घोषणाच होय !

" मराठी रंगभूमि आज जिवंत असली तरी तिच्या पूर्वीच्या स्वरूपांत अंतर्बाह्य क्रांति झाल्यांवाचून सामाजिक जीवनांत तिला मानाचें आणि महत्त्वाचें स्थान मिळणार नाहीं. कोणत्याहि जिवंत राष्ट्राच्या जीवनांत रंगभूमीला महत्त्वाचें स्थान असतें. किंबहुना राष्ट्राच्या भावना आणि ध्येयें जिवंत ठेवून समाजाला एकसारखें उद्दीपित करण्याचें कार्य रंगभूमीच करते. या दृष्टीनें मराठी रंगभूमीनें यापुढें अधिक जागरूक रहावयाला पाहिजे. मराठी नाटकांमधून राष्ट्राच्या दडपलेल्या आकांक्षा आणि झगडे यांना अधिक जोमानें वाव मिळावयाला पाहिजे. यापुढें मराठी रंगभूमीवर बहुजन-समाजाचें विविध जीवन अधिक आपुलकीनें आणि अगत्यानें चित्रित व्हायला पाहिजे.

" उत्तम नाटककार आणि उत्तम नट 'जन्मावा' लागतो असें म्हणण्याचा एक शिरस्ता आहे. तथापि, या समजुतीवर अवलंबून बसणें हें धोक्याचें आहे. चांगलीं माणसें जन्माला येण्याची वाटच पहात बसलें, तर इतर समाजाला आपलीं सारीं कामें तहकूब करून आभाळाकडेच पहात बसावें लागेल. उत्तम माणसें प्रयत्नानें आणि शिक्षणानें तयार होऊं शकतात, या गोष्टीवर समाजाचा विश्वास पाहिजे. आज-पर्यंत महाराष्ट्रांत जे श्रेष्ठ नट आणि नाटककार झाले, ते खरोखरच महाराष्ट्राच्या नशिबानें आभाळांतून पडले असेंच म्हणावें लागतें. कारण, नट–नाटककारांची महाराष्ट्रांतील ही थोर परंपरा आतां जवळ जवळ लुप्तच झाल्यासारखी दिसते.

" यांतून मार्ग काढण्याचा उपाय म्हणजे नाट्य या विषयाचा शाळांमधील आणि विश्वविद्यालयांमधील अभ्यासक्रमांत आतां अंतर्भाव व्हावयाला पाहिजे. प्रत्येक शाळेंत किंवा महाविद्यालयांत व्यायामशाळा, प्रयोगशाळा किंवा क्रीडांगण यांची जितकी आवश्यकता असते, तितकीच स्वतंत्र नाट्यमंदिराचीहि असते, ही गोष्ट मोठमोठ्या शिक्षणतज्ज्ञांनीं आतां मान्य केलेली आहे. शिक्षक, वकील, वैद्य, गवई, चित्रकार यांजपासून तों कांपाऊंडर, मोटर-ड्रायव्हर, तारमास्तर, टायपिस्ट-पर्यंत सर्व धंद्यांच्या आणि कलांच्या शिक्षणाची समाजांत सोय असतांना नाट्यकलेच्या अध्ययनाची तेवढी सोय असूं नये हा मोठा जुलूम आहे.

" मराठी जनता ही नाटकांवर नेहमींच किती आषक असते, ही गोष्ट महा-राष्ट्रामधील इतर गांवांपेक्षां मुंबई येथेंच अधिक प्रत्ययाला येते. सांगली हें मराठी रंगभूमीचें जरी जन्मस्थान समजण्यांत येत असलें, तरी जन्म झाल्यानंतर शंभर वर्षांत

मराठी रंगभूमि आपल्या जन्मग्रामीं क्वचितच मुक्कामाला गेली असेल! मराठी रंगभूमीला आजपर्यंत माहेरपणाचें सारें सुख जें मिळालें, तें मुंबई येथेंच मिळालें यांत संशय नाहीं. मराठी रंगभूमीचे जेवढे लाड मुंबईनें पुरविले असतील, तेवढे इतर ठिकाणीं क्वचितच पुरविले गेले असतील! अगदीं आईच्या ममतेनें आणि आपुलकीनें नाट्यकलेचें मनसोक्त कोडकौतुक या मुंबापुरीनें आजवर केलेलें आहे. म्हणून मराठी रंगभूमीचें मुंबई हेंच ' माहेर घर ' आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं.

" मुंबई हें माहेर तर पुणें हें मराठी रंगभूमीचें काय, असा कोणी प्रश्न विचारील. त्याला उत्तर हें कीं, पुणें हें मराठी रंगभूमीचें ' सासर ' आहे. मुलीच्या गुणांचें कौतुक माहेरीं होत असलें, तरी त्या गुणांची कसोटी सासरींच लागते. उत्तम नटांची, नाटकांची आणि नाटककारांची खरी परीक्षा पुण्यांतच होते, असें आजपर्यंत मानलें जात असे. कदाचित् याबद्दल कोणाचें दुमत असेल पण मराठी नटांना आणि नाटककारांना पुष्कळ वेळां पुण्याला जेवढा सासुरवास झाला, तेवढा दुसऱ्या ठिकाणीं क्वचित् झाला असेल याविषयीं मात्र पुष्कळांचें एकमत होईल. न आवडणाऱ्या नाट्यप्रयोगांवर किंवा नटांवर भजीं किंवा पाव मारण्याची ' संस्था ' प्रथम पुण्यांतच जन्माला आली असावी, असें कांहीं विद्वान् संशोधकांचें मत आहे. पुण्यांत ' भजीं ' खाऊन पसार झालेल्या पुष्कळशा नाटक मंडळ्या मुंबईकरांच्या आश्रयाला येत असत. यावरून मुंबई हेंच नाट्यकलेचें माहेर आहे हें माझें म्हणणें खरें ठरतें.

" या महोत्सवाचें खरें ऐतिहासिक महत्त्व जर कशानें अधिक प्रस्थापित होणार असेल, तर तें अध्यक्ष नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्याच उपस्थितीनें. बालगंधर्व म्हणजेच मराठी रंगभूमीचा जवळ जवळ पन्नास वर्षांचा चालता–बोलता आणि गाता इतिहासच होय. ' सौभद्रा 'पासून ' स्वयंवरा 'पर्यंत मराठी रंगभूमीवर जीं जीं नामांकित नाटकें गेल्या तीन चार तपांत अवतीर्ण झालीं, त्या त्या सर्व नाटकांमध्यें आपल्या संगीतानें आणि अभिनयानें बालगंधर्वांनीं चैतन्य निर्माण करून मराठी रंगभूमीला विलक्षण लोकप्रियता प्राप्त करून दिली आहे. ही गोष्ट महाराष्ट्र कधींहि विसरणें शक्य नाहीं.

" मराठी रंगभूमीवर बालगंधर्वांनीं बादशाही वैभवानें चार तपें राज्य केलें आहे. बालगंधर्वांच्या गळयांतून बाहेर पडणाऱ्या स्वर्गीय संगीतावर महाराष्ट्राच्या दोन पिढ्या पोसलेल्या आहेत. बालगंधर्वांच्या अभिनयाचें आणि वेषभूषेचें अनुकरण करून लाखों महाराष्ट्रीय महिलांनीं आपले संसार सुखाचे केले आहेत. मराठी मनावर बालगंधर्वांच्या स्वरमाधुर्याची आणि रूपसौंदर्याची जी एकदां नशा चढून बसली आहे ती नाहींशी होणें अशक्य आहे. बालगंधर्वांसारखा लोकोत्तर कलावंत शतकांतून एकच जन्माला येतो. अशी युगप्रवर्तक विभूति आज आपणांला पहावयाला मिळते आहे, ऐकायला लाभते आहे हें आपल्या पिढीचें केवढें महद्भाग्य! मराठी

रंगभूमीचा असा हा मूर्तिमंत इतिहास या ठिकाणीं साक्षी ठेवून आपण या महोत्सवाला प्रारंभ करूं या ! ”

या नाट्यमहोत्सवांत आम्हीं साहित्यिक मंडळींनीं गडकऱ्यांचा ‘ वेड्यांचा बाजार ’ हें नाटक केलें. त्यांत मी म्हाताऱ्या ‘ अण्णासाहेबां ’ची भूमिका केली. तेव्हांपासून पुढें मुंबईंत झालेल्या प्रत्येक नाट्य ’महोत्सवाचें ‘ साहित्यिकांचें नाटक ’ हें एक अविस्मरणीय वैशिष्ट्य होऊन बसलें. अशा प्रत्येक नाटकांत मी नायकाची भूमिका करीत असें. ‘ साष्टांग नमस्कारां ’त रावबहाद्दूर, ‘ त्राटिकें ’त प्रतापराव, ‘ संशयकल्लोळां ’त फाल्गुनराव, आणि ‘ कवडीचुंबकां ’त पंपूशेट ह्या माझ्या भूमिका विशेष गाजल्या.

# ३०

# मासिक समीक्षक

मुंबई साहित्य संघातर्फे डॉ. अ. ना. भालेराव हे 'समीक्षक' नांवाचें एक साहित्यविषयक मासिक चालवीत होते. त्याला तीन वर्षें होऊन गेलीं होतीं. तथापि, आर्थिक अडचणीमुळें तें मासिक नियमितपणें प्रसिद्ध होत नसे. १९४४ च्या नोव्हेंबरमध्यें मीं तें मासिक त्यांच्याकडून पांचशें रुपयांना विकत घेऊन त्याच महिन्यांत चौथ्या वर्षाचा पहिला अंक मीं माझ्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध केला.

मराठी भाषा, साहित्य नि समाज ह्यांची सेवा करणें हें 'समीक्षका'चें ध्येय राहील असें मीं त्या अंकीं जाहीर केलें. व्यासंगी विद्वान् आणि संशोधक साहित्यसेवकांकडून उत्तम दर्जाचें शास्त्रीय आणि ललित वाङ्मय मिळवून तें प्रसिद्ध करणें, निरनिराळ्या वाङ्मयकृतींवर निर्भीड आणि विधायक परीक्षणें प्रसिद्ध करून साहित्यामधील आणि समाजामधील नवनवीन प्रवाहांचें दिग्दर्शन करणें हीं 'समीक्षका'चीं उद्दिष्टें मीं निश्चित केलीं.

त्या काळीं महाराष्ट्रांत केवळ साहित्य विषयाला वाहिलेलें असें एकहि मासिक नव्हतें. त्यामुळें माझ्या संपादकत्वाखालीं

नव्या स्वरूपांत निघालेल्या या मासिकानें एक फार मोठी गरज भरून काढली, असें म्हणावयास पाहिजे. मीं हातीं घेतलेल्या या कामीं सर्वतोपरी सहाय्य करण्याचें माझ्या दोन साहित्यिक मित्रांनीं मान्य केलें. ते माझे दोन मित्र म्हणजे प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी, आणि प्रा. माधव दामोदर आळतेकर. दोघेहि मराठी भाषेचे खंदे लेखक आणि विद्वान् म्हणून साऱ्या महाराष्ट्रांत प्रसिद्धच होते. त्यामुळें त्या दोघांचें सहकार्य म्हणजे ' समीक्षका 'चें मोठें सामर्थ्यच होतें.

मामा वरेरकर ह्यांचे माझे पूर्वी अनेक वेळां खटके उडाले असतां, कसलीहि अढी मनांत न धरतां त्यांनीं मोठ्या खेळाडूपणानें ' तोंडमिळवणी ' ही आपली नवी कादंबरी ' समीक्षका 'मधून क्रमशः प्रसिद्ध करावयास देऊन माझ्याशीं जणुं कांहीं पुन्हा तोंडमिळवणीच केली. प्रा. कृ. पां. उर्फ नाना कुळकर्णी ह्यांनीं ' धन्वंतरी ' ह्या टोपण नांवानें ' वाङ्मयसमीक्षा ' हें सदर दर अंकीं लिहावयास सुरुवात केली. नानांच्या शैलीदार भाषेमुळें आणि मर्मभेदी दृष्टिकोनामुळें हें सदर म्हणजे ' समीक्षका 'चें एक महत्त्वाचें अंग होऊन बसलें.

त्यांच्या लेखनशैलीचा एक छोटासा नमुना येथें देतों, म्हणजे त्यांच्या ' वाङ्मय-समीक्षे 'च्या ढंगाची वाचकांना थोडीशी कल्पना येईल. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांचें त्यांच्या लेखणीमधून उतरलेलें हें टसकेदार शब्दचित्र पहा :

" राजवाडे म्हणजे चालता बोलता इतिहास. चालतें बोलतें व्याकरण. ती त्यांची उंचीपुरी देहयष्टि. तो सफेत रुमाल. तो एका गुंडीचा सफेत सदरा. तें पुढचा सोगा सोडलेलें आंखूड धोतर. ती हातांतली जाड काठी. तो पायांतील जाड ब्राह्मणी तळेगांवी जोडा. ती बेगुमानी व बेदरकारी मुद्रा. ह्या गोष्टी आज सतरा वर्षे होऊन गेलीं, तरी जशाच्या तशा दृष्टीपुढें उभ्या राहतात. चालतांना पाऊल टाकलें कीं, तें लांब व जोरांतच पडायचें. असें, कीं खालची धरित्री जणुं कांहीं नमलीच पाहिजे. जी चालण्याची गत तीच बोलण्याची. मी म्हणजे कोणी तरी विशेष. इतर सर्व माझ्या-पुढें तुच्छ अशी जाणीव क्षणोक्षणीं होत असे. हे पुढें वावरणारे सर्व लोक कारकुंडे, मरण्यासाठींच जन्माला आलेले. मीच तेवढा द्रष्टा. अशी बेपर्वाईची भावना असे. आदरयुक्त कोणासंबंधीं उल्लेख मिळावयाचा नाहीं. मोठ्या व्यक्तीबद्दल एकाद्या वेळेस मोठ्या कौतुकानें लाडाचा उल्लेख येई. नाहीं असें नाहीं. जी बोलण्याची गत तीच लिहिण्याची. एकाद्याच्या मागें लागले कीं त्याला पुरा केल्याशिवाय ते सोडत नसत. ' गोविंदपंत बुंदेले खतम् केला.' ' ब्रह्मेंद्रस्वामी खतम् केला !' अशी नानांची भाषा असे. त्या भाषेंत आणि त्या ढंगदार शैलीमध्यें नानांचें ' वाङ्मयसमीक्षण ' ' समीक्षका 'तून प्रसिद्ध झालेलें आढळेल.

प्रा. माधवराव आळतेकर ह्यांना भारताच्या निरनिराळ्या भागांतून प्रवास करण्याची फार हौस होती. त्यामुळें त्यांचीं चटकदार प्रवासवर्णनें ' समीक्षका 'मधून

प्रसिद्ध करण्याचें मीं ठरविलें. ' गंगोत्री दर्शना 'पासूनच त्यांच्या या प्रवासविषयक लेखनाचा प्रारंभ झाला. बनारस हिंदु विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदनमोहन मालवीय ह्यांची ' समीक्षका 'साठीं खास मुलाखत घेऊन येण्यासाटीं मीं त्यांना ' समीक्षका 'तर्फे मुद्दाम बनारसला पाठविलें. मालवीयजी त्या वेळीं ब्यांयशीं वर्षांचे होते. तरी प्रा. आळतेकर ह्यांना त्यांनीं मोठ्या आनंदानें मुलाखत दिली. ती साद्यंत मुलाखत ' समीक्षका 'च्या अंकांत छापून आली. त्या काळांतले बहुतेक सर्व नामवंत विद्वान्, लघुकथाकार आणि कवि ' समीक्षका 'च्या सहाय्याला धांवून आले. त्यामुळें दोन तीन अंकांतच त्याचा खप पांच हजारांपर्यंत वाढत गेला. आणि महाराष्ट्रांत त्याला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली.

मीं स्वतः ' समीक्षकां 'तून अनेक कविता आणि लघुकथा लिहिल्या. नमुन्यादाखल माझी एकच कविता देतों.

## ती मोहक बाला

ती मोहक बाला,  
हांसत आली,  
घेऊन फुललेली  
प्रीतीची माला !  
नील नभीं शोभतसे,  
शुक्राची तारा,  
अवतरली अवनितलीं,  
अमृताची धारा,  
स्वर्गीची चपला !  
स्फटिकाच्या लखलखती  
ओठांतुनि ओळी,  
अरुणाची नाचतसे,  
गालावर लाली !  
भासे वनमाला !  
नेत्र तिचे बघुनि निळे,  
झुरती मनिं मृगबाळें,  
हंसाचा गर्व पळे,  
बघुनि तिची लीला !

गिरीश, प्रा. अनंत काणेकर, के. ना. काळे, कुसुमाग्रज, कृ. ब. निकुम्ब, रा. अ. काळेले, सोपानदेव चौधरी या प्रथितयश आणि प्रा. वि. म. कुलकर्णी, शांता शेळके,

श्रीकृष्ण पोवळे नि मंगेश पाडगांवकर ह्या तेजस्वी उदयोन्मुख कवींच्या अनेक कविता 'समीक्षका'मधून त्या वेळीं नियमितपणें प्रसिद्ध झालेल्या आढळतील.

२३ जानेवारी १९४४ ला राम गणेश गडकरी ह्यांच्या मृत्यूला पंचवीस वर्षें पूर्ण झालीं. तो रौप्यमहोत्सव मुंबईत सर चिंतामणराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या प्रमाणांत आम्हीं साजरा केला. ती हकीगत मागें मीं सांगितलीच आहे. त्या निमित्तानें मीं 'समीक्षका'चा जो 'गडकरी विशेषांक' काढला त्यानें मराठी मासिकांच्या विशेषांकाचा जणुं कांहीं उच्चांकच गांठला, असें म्हणावयाला पाहिजे, ह्या अंकांत कोल्हटकर, गडकरी, गुर्जर, बालकवि, नागेश, रेंदाळकर, काशिनाथपंत मित्र ह्यांचा एक अत्यंत दुर्मिळ फोटो मिळवून मीं छापलेला आहे. त्याचप्रमाणें गडकऱ्यांच्या हस्ताक्षरांत त्यांच्या 'मुरली' या अमर काव्याचीं शेवटचीं चार कडवीं मीं प्रसिद्ध केलीं आहेत (गडकऱ्यांच्या हस्ताक्षरांत लिहिलेली ही संपूर्ण कविता अद्याप माझ्या संग्रहीं आहे.)

ह्या अंकाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांत गडकऱ्यांच्या पांच अप्रकाशित संपूर्ण कविता आणि आठ अपूर्ण कविता मीं प्रकाशित केल्या आहेत. त्याखेरीज माझ्या संग्रहीं असलेल्या कितीतरी गडकऱ्यांच्या अप्रकाशित त्रोटक लेखनाचे पूर्ण वा अपूर्ण उतारे मीं एकत्रित छापले आहेत. याशिवाय गोविंदराव टेंबे, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, विठ्ठल सीताराम गुर्जर, पु. रा. लेले, प्रा. कृ. पां. कुळकर्णी, न. ग. कमतनूरकर, वसंत शांताराम देसाई अशा गडकऱ्यांच्या निकटवर्ती मित्रांचे, भक्तांचे नि अभ्यासकांचे गडकऱ्यांच्या जीवनाच्या नि वाङ्मयाच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारे अत्यंत मौलिक आणि मार्मिक लेख या 'गडकरी विशेषांकां'त प्रसिद्ध झालेले आहेत.

महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि नियतकालिकानें राम गणेश गडकरी यांच्यावर असा खास अंक आजपर्यंत काढलेला नाहीं. त्यामुळें २३ जानेवारी १९४४ रोजीं 'सुंदराबाई हॉल' मध्यें सर चिंतामणराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गडकऱ्यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीची प्रचंड सभा भरली होती, त्या सभेंत या अंकाच्या तीन हजार प्रती—प्रत्येकीं किंमत एक रुपया—बोल बोल म्हणतां उडाल्या. एकंदर मीं दहा हजार अंक काढले होते. पण आज या मितीस त्यांपैकीं एकहि अंक माझ्या संग्रहीं नाहीं.

गडकरी विशेषांकानंतर लागलीच दोन महिन्यांनीं 'समीक्षका'नें लघुकथांची चढाओढ लावून एक खास 'लघुकथा अंक' काढला. या अंकासाठीं महाराष्ट्रांतल्या निरनिराळ्या लघुकथाकारांनीं एकंदर एकशेंनव्याण्णव लघुकथा पाठविल्या. त्यांतील पहिलें बक्षीस सुप्रसिद्ध लघुकथाकार चिं. य. मराठे अन् दुसरें बक्षीस डॉ. अ. वा. वर्टी यांच्या अनुक्रमें 'तिसरी पिढी' आणि 'मुमताज' या दोन गोष्टींना मिळालें. बक्षिसांची निवड करण्याचें काम विठ्ठल सीताराम गुर्जर, नरहर गणेश कमतनूरकर,

डॉ. जी. वाय. चिटणीस, प्रभाकर पाध्ये आणि प्रा. अनंत काणेकर या पांच नामवंत साहित्यिकांनीं केलें. प्रा. श्री. म. माटे, डॉ. के. ना. वाटवे, डॉ. ग. न. लवंदे आणि प्रा. रा. ब. आठवले यांनीं वाङ्मयाच्या निरनिराळ्या मूलभूत प्रश्नांवर मौलिक टीका-लेख लिहून महाराष्ट्रांतल्या विद्वानांच्या विचारांना फार मोठी चालना दिली.

आमचे मित्र 'ज्ञानप्रकाश'कार काकासाहेब लिमये हेहि अधून मधून महत्त्वाच्या विषयावर वाङ्मयीन लेख लिहून आम्हांला सहाय्य करीत असत. 'समीक्षका'च्या तिसऱ्या वर्षी आम्हीं पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या वाढदिवशीं एक खास अंक काढला. या वर्षी व्यंकटेश माडगूळकर आणि ग. दि. माडगूळकर या महाराष्ट्रांतल्या दोघां उदयोन्मुख प्रतिभाशाली कवींच्या कविता 'समीक्षकां'तून प्रसिद्ध होऊं लागल्या. बेचाळीसच्या क्रांतिकारकांवर 'आसरा' या ग. दि. माडगूळकरांच्या तेजस्वी कवितेमधल्या

**बेचाळीसच्या बलवंतांना,**
**असा लाभला दिव्य आसरा,**
**लोकशक्तिच्या सामर्थ्यावर**
**चिरंजीव हो मग सातारा.**

या ओळीं विशेष गाजल्या. सुप्रसिद्ध कवि पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा 'गीतिका' हा काव्यप्रकार प्रथम 'समीक्षकां'तच प्रसिद्ध झाला. पण 'समीक्षका'चें तिसऱ्या वर्षाचें सर्वांत अविस्मरणीय वैशिष्ट्य म्हणजे 'अॅमिल' या एकोणिसाव्या शतकांत यूरोपमध्यें होऊन गेलेल्या एका थोर विचारवंताच्या दैनंदिनीचा 'चिंतनिका' या नांवानें केलेला सानेगुरुजींचा उत्कृष्ट अनुवाद क्रमशः 'समीक्षकां'तून प्रसिद्ध होऊं लागला. सानेगुरुजींनीं हा आपला अनुवाद 'समीक्षका'ला कां दिला ह्याची एक लहानशी गोष्ट सांगण्यासारखी आहे.

कोठल्याशा एका जाहीर सभेंत सानेगुरुजी व्याख्यानाला गेले असतां कोणी तरी चोरट्यानें त्यांचा खिसा कापला. त्यांत एक हजार रुपयांची एकच नोट होती. ती त्यांची चोरीला गेली. तेव्हां सानेगुरुजींनीं मला तांतडीनें पत्र लिहिलें कीं, मला एक हजार रुपयांची जरुरी आहे. त्यावर मीं त्यांना ती रक्कम ताबडतोब पाठवून दिली. त्या उपकाराची फेड म्हणून त्यांनीं आपली 'चिंतनिका' 'समीक्षकां'तून प्रसिद्ध करावयाला माझ्याकडे पाठवून दिली. चार पांच महिन्यांनंतर गुरुजींनीं माझे हजार रुपये मला परत केले. 'चिंतनिके'बद्दल त्यांनीं माझ्याकडून पैसे घेतले नाहींत.

श्री. वसंत अ. शहाणे यांनीं उर्दू वाङ्मयांतील नामवंत कवि आणि विनोदकार यांच्या वाङ्मयाचें केलेलें रसग्रहणहि खूपच लोकप्रिय झालें. सारांश, त्या काळांत मराठी वाङ्मयामध्यें ज्या ज्या अभिजात आणि अभिनव विचारधारा होत्या. त्यांचें

जास्तींत जास्त प्रामाणिक प्रतिबिंब उमटविण्याचा आम्हीं ‘ समीक्षका ’मधून प्रयत्न केला.

सेहेचाळीस सालच्या ‘ दिवाळी अंक ’ काढून मीं हें मासिक बंद केलें. त्या वेळीं देशामध्यें स्वातंत्र्याचा लढा अधिकाधिक उग्र आणि तीव्र होत चालला होता. स्वातंत्र्याच्या लढ्याच्या आघाडीवर साप्ताहिक ‘ नवयुग ’ हा मोठ्या दिमाखानें गर्जत होता. आणि माझें सर्व सामर्थ्य मीं त्या वेळीं कॉंग्रेसच्या राजकारणांत पणाला लावल्याकारणानें ‘ समीक्षका ’कडे लक्ष द्यायला मला अवकाश नव्हता. म्हणून नाइलाजानें मला हें मासिक बंद करावें लागलें.

साहित्य विषयाला वाहिलेलें महाराष्ट्रांतलें एक अत्यंत विचारप्रवर्तक मासिक बंद झाल्यामुळें महाराष्ट्रांतल्या अनेक साहित्यिकांना फार वाईट वाटलें; पण त्याला कांहीं इलाज नव्हता; आणि आज तर ‘ समीक्षक ’ हें मासिक महाराष्ट्रांत एक वेळ मी चालवीत होतों, याची कोणाला आठवणहि नसेल.

# ३१

## छापखान्यामधल्या घडामोडी

अत्रे प्रिंटिंग प्रेस' हा १ मे १९४४ रोजीं ३६२ विठ्ठलभाई पटेल रोड येथें मीं सुरू केला, ही गोष्ट मागें मीं सांगितली आहेच. हा प्रेस काढण्यासाठीं दहापंधरा हजारांपेक्षां जास्त पैसे लागणार नाहींत अशी माझी मूळची कल्पना होती. पण प्रत्यक्ष प्रेस काढतांना पैशाचें सारेंच गणित अवाचें-सव्वा वाढत गेलें. आणि खर्चाचा आंकडा नाहीं नाहीं म्हणतां ऐंशी पंचाऐंशी हजारांच्या घरांत गेला. यांतली कांहीं रक्कम 'डेक्कन मर्चंट बँके'कडून आणि कांहीं रक्कम मीं हुंड्यांवर उभारली होती.

दरमहा छापखान्यांतून प्राप्ति किती होईल आणि व्याजासकट कर्जाचे हप्ते कसे कसे देतां येतील याचा हिशेब त्या वेळीं मीं केला नव्हता. तो करणें शक्यहि नव्हतें. कारण छापखान्याच्या धंद्याचा तोंपर्यंत मला कसलाहि अनुभव नव्हता. तथापि ज्या धंद्याचा आपल्याला अनुभव नाहीं, त्या धंद्यामध्यें बेधडक डोळे मिटून उडी मारण्याचा मूर्खपणा माझ्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें मीं केलेला होता.

छापखान्याच्या धंद्याची पुष्कळशी माहिती माझे ' नवयुग 'मधील सहकारी रमाकांत वेलदे ह्यांना होती. रमाकांत वेलदे ही वृत्तपत्र-व्यवसायांत आणि मुद्रण-व्यवसायांत वावरणारी एक विलक्षण वल्ली होती, हें मीं पूर्वींच सांगितलें आहे. १९३३ सालीं जेव्हां मीं माझें ' साष्टांग नमस्कार ' हें पहिलें नाटक लिहिलें, तेव्हां पुण्याच्या ' दैनिक सकाळ 'मधून माझ्या नाटकावर भयानक हल्ला याच व्यक्तीनें चढविला होता. त्याखेरीज ' सकाळ 'च्या स्तंभांतून वेळोवेळीं माझ्यावर वेडीवांकडी टीका करण्यास त्यांनीं कधींच मागेंपुढें पाहिलें नाहीं. हातांत लेखणी घेतली कीं वेलदे ह्यांचें डोकें अक्षरशः फिरत असे. लेखणी हें एखादें शस्त्र आहे, अशा भावनेनें ते आपल्या प्रतिस्पर्ध्यांचीं अनेक कुलंगडीं बाहेर काढून त्याचें बाभाडे काढण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असत. त्यांचें माझें पूर्वींचें वैर विसरून ' नवयुग 'मध्यें सहसंपादक म्हणून त्यांना मीं घेतल्यानंतर वीर सावरकरांवर एक अर्वाच्य टीकालेख लिहून त्यानें मला भलत्याच संकटांत कसें टाकलें याची हकीगत मागें मीं सांगितलीच आहे.

तथापि वेलद्यांच्या अंगीं एक गुण असे. ज्या वेळीं जो कुणी म्हणून त्याचा धनी असे, त्याच्यासाठीं ते तळहातावर शिर घेऊन लढायला मागेंपुढें पहात नसत. ' इमान ' हा वेलद्यांच्या अंगामधला सर्वांत मोठा गुण होता; म्हणून छापखाना मीं जेव्हां काढला तेव्हां त्याची जुळवाजुळव आणि व्यवस्था करण्याचें सर्व काम मीं वेलद्यांकडे पहिल्यापासून सोंपविलें होतें. छापखान्याला कोणतीं यंत्रें लागतात, कोणत्या यंत्रांची काय किंमत असते, अमुक अमुक आकाराच्या फॉर्मचा कंपोझिंगचा काय दर असतो, त्याच्या छपाईचा काय दर असतो, आणि त्याला कागद केवढयाचा लागतो हे सर्व आंकडे आणि हिशेब वेलद्यांच्या अगदीं लेखणीच्या टोंकावर जणुं कांहीं नाचत असत. वेलद्यांवर भरंवसा ठेवूनच जवळ जवळ मीं ह्या धंद्यामध्यें पाऊल टाकलें, असें म्हणायला हरकत नाहीं.

तथापि, प्रेसच्या प्रत्यक्ष मॅनेजमेंटसाठीं आपल्यापेक्षां जास्त अनुभवी आणि लायक माणूस कोणीतरी आणला पाहिजे, असा वेलदे यांचा आग्रह पडल्यावरून मीं त्यांनाच तशा तऱ्हेचा एकादा हुशार आणि कर्तबगार मॅनेजर हुडकून आणावयास सांगितलें. आणि वेलद्यांनीं अवघ्या दोन तासांच्या आंत अशा तऱ्हेचा एक ' भयंकर लायक ' माणूस आणून माझ्यासमोर उभा केला. त्या भयानक मॅनेजरचें नांव ' नरहर रामचंद्र जोशी ' असें होतें. तथापि, मुंबईच्या मुद्रण व्यवसायांत ' नऱ्या जोशी ' या एकेरी नांवानेंच तो लोकप्रिय झालेला होता.

माझी त्यांची कांहीं पूर्वींची ओळख नव्हती. तथापि, त्यांचा लौकिक लांबून मी ऐकून होतों. नाहीं असें नाहीं. ' मौज प्रिंटिंग प्रेस 'चे मालक जेव्हां पांडोबा भागवत हे होते, तेव्हां त्यांच्या कारकीर्दीत छापखान्याचें वाटोळें करण्याचें काम

अत्यंत बेमालूमपणें या नऱ्होबांनीं केलेलें होतें. पांडोबा–नऱ्होबा ह्यांच्या संबंधींची एक दंतकथा त्या वेळीं ऐकून मला ठाऊक होती. ती अशी :

पांडोबा हे गाईपेक्षां गरीब होते. त्यांच्या तोंडावरची कधीं माशी हलत नसे. नऱ्होबा हे तर बोलून चालून वाघच! त्यांच्यासमोर मान वर करून पहाण्याची पांडोबांची काय प्राज्ञा? तथापि एक दिवस काय झालें कोणास ठाऊक? पांडोबा नऱ्होबांवर खूप संतापले अन् त्यांनीं त्या संतापाच्या भरांत त्यांना दीडशें रुपये दंड केला. तेव्हां नऱ्होबा म्हणाले, "मला महिन्याला पगारच मुळीं दीडशें रुपये आहे. मग मी दीडशें रुपये दंड तुम्हांला देऊन घरीं खाऊं काय?"

तेव्हां पांडोबांना एकदम दया आली आणि त्यांनीं नऱ्होबांना उःशाप दिला कीं, "या महिन्यापुरती मी तुम्हांला दीडशें रुपयांची पगारवाढ करतों आणि त्या पगारवाढींतून तुमचा दंड कापून घेतों."

अशा रीतीनें नऱ्होबांचें एक पैचेंहि नुकसान न करतां पांडोबांनीं त्यांच्याकडून दीडशें रुपये दंड वसूल केला. पांडोबा–नऱ्होबांच्या पुष्कळ गंमती माझ्या संग्रहीं आहेत. पण त्या सांगण्याचें स्थळ कांहीं माझें चरित्र हें नव्हे.

नऱ्होबांना माझ्या टेबलासमोर आणून वेलदे ह्यांनीं उभे केलेले पाहून माझ्या छातींत धसकाच बसला. माझ्या तोंडाला एकदम कोरड पडली. मी वेलद्यांना म्हटलें, "आपल्यावर सध्यां संकटें काय कमी आहेत. म्हणून तुम्हीं या दोन पायांच्या संकटाला आमंत्रण देऊन मुद्दाम इथें बोलाविलेंत?"

तेव्हां नऱ्होबा विषण्णपणें हंसले आणि म्हणाले, "पूर्वीचा तो नऱ्होबा मेला. आज अन्नाला महाग असलेला हा नऱ्होबा तुमच्यापुढें नोकरीसाठीं पदर पसरून उभा आहे!"

ज्या स्वरांत नऱ्होबा बोलले त्यांतून प्रकट होणाऱ्या भावनेनें माझ्या हृदयाची तार किंचित् कंपित झाली आणि मला थोडेंसें गहिंवरून आल्यासारखें झालें.

मी म्हणालों, "नऱ्होबा, झालें गेलें गंगेला मिळालें. तुमच्याविषयीं पूर्वी मीं जें जें ऐकलें, तें विसरून गेलों असें समजा. पण इथें काम करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवा, कीं मी एका धंद्यांत आठ लाख रुपयांचा मार खाऊन आणि पुन्हां पाऊण लाख रुपयांचा बोजा डोक्यावर घेऊन या धंद्यांत पाऊल टाकलेलें आहे. याची इथें काम करतांना सतत आपल्या मनांत जाणीव राखा, एवढेंच मला सांगायचें आहे."

दुसऱ्या दिवसापासून अडीचशें रुपये पगारावर 'अत्रे प्रिंटिंग प्रेस'च्या मॅनेजरच्या खुर्चीवर नऱ्होबा स्थापन झाले. छापखान्याच्या धंद्यांत त्यांचा सारा जन्मच गेला असल्याकारणानें छापखान्यांतील निरनिराळ्या खात्यांना लागणारे सारे कामगार एका आठवड्याच्या आंत नऱ्होबांनीं कुठून ना कुठून तरी पकडून आणले. हां हां म्हणतां सारा छापखाना माणसांनीं गजबजून गेला. कामगार इकडून तिकडून धांवूं लागले. यंत्रें

धडाधडां वाजूं लागलीं. प्रेसच्या दरवाजांत गिऱ्हाइकांची रीघ लागून राहिली. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. नऱ्होबा मॅनेजर म्हणून प्रेसच्या तोंडाशीं ऐन बिनीला बसायचे आणि मी प्रेसचा मालक म्हणून आंतल्या खोलींत पिछाडीला निर्धास्त पणें ' नवयुग 'चे अग्रलेख खरडीत बसायचा.

सुरुवातीपासूनच आमच्याकडे छपाईला काम पुष्कळ यायचें खरें. पण त्यांत नफ्याचें प्रमाण फारच थोडें होतें. गुजराती, हिंदी आणि मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या चित्रपटविषयक मासिकांचें त्या वेळीं मुंबईमध्यें एक भरमसाट पीक आलें होतें. यांपैकीं पुष्कळशीं मासिकें नऱ्होबांच्या ओळखीनें आमच्या छापखान्यांत छापायला आलीं. पण प्रत्येक मासिकाचीं पानें किती, तर बारा किंवा सोळा! नि एकंदर प्रती किती ? तर दोनशेंपासून चारशेंच्या घरांत. असल्या छपाईच्या कामा-मधून फायदा तो काय होणार ? तथापि, कांहीं असलें तरी त्यामुळें आपला प्रेस एकसारखा वाजत राहतो आणि त्यामुळें रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या माणसांची ' ह्या प्रेसमध्यें काम भरपूर आहे. ' अशी कल्पना झाल्यावांचून रहात नाहीं, असा नऱ्होबांनीं मला ' गुरुमंत्र ' दिल्यामुळें ' जें होतें आहे तें आपल्या बऱ्यासाठींच होतें आहे ' असें मनाचें समाधान करून मी स्वस्थ बसून राहिलों.

नाहीं म्हणायला ' संग्राम ' नांवाचें एक दैनिक त्या वेळच्या मुंबईमधल्या ' रॉयिस्टां 'नीं काढलेलें होतें. त्याची छपाई सुदैवानें आमच्याकडेच आलेली होती. सध्यांच्या ' महाराष्ट्र टाईम्स 'चे संपादक द्वारकानाथ भगवंत कर्णिक हे त्या वेळीं त्या ' संग्राम 'चे संपादक होते. पोलीस खात्यांतून निवृत्त झालेले रावबहाद्दूर कर्णिक नांवाचे त्यांचे एक कोणी चुलते होते. त्यांच्याकडून पंचवीस तीस हजार रुपये कर्ज काढून द्वा. भ. कर्णिक या व्यवसायांत पडले होते. ' संग्राम 'चा रोजचा खप तीन हजारांच्या आंतबाहेर होता. सदर पत्र माझ्या छापखान्यांत छापलें जात असलें, तरी त्याचा एकहि अंक कधीं हातांत धरून मीं वाचला असल्याचें मला आज आठवत नाहीं. यावरून त्या पत्राचा दर्जा काय असेल याची वाचकांना कल्पना येऊं शकेल.

छापखाना काढल्यानंतर माझ्या आर्थिक अडचणी दिवसेंदिवस एकसारख्या वाढतच चालल्या. छापखान्यांत प्राप्तीपेक्षां खर्चच जास्ती होता. बोलबोल म्हणतां तीन महिने निघून गेले. आणि एक दिवस असा उगवला कीं, ज्या दिवशीं हुंड्यांवर काढलेले पंधरा हजार रुपये एका रकमेनें मला बँकेंत भरावयाचे होते! अवघ्या दोनतीन तासांचा अवकाश होता. हे पैसे आणायचे कोठून ? आणि भरायचे कसे ? सारें ब्रह्मांड माझ्याभोंवतीं फिरूं लागलें. पैसे भरले नाहींत तर एका आठवड्याच्या आंत प्रेसवर जप्ती आल्याखेरीज राहणार नाहीं. हें भीषण भवितव्य माझ्या डोळ्यां-समोर ' आ ' वासून मला भेडसावूं लागलें.

चित्रपट व्यवसायांत लाखों रुपयांचा मार खाल्ल्यामुळें पूर्वी ज्या ठिकाणीं मी

पैसे मागायला जात असें, त्या सावकारांचीं घरें मला आतां बंदच झालेलीं होतीं. अशा रीतीनें एका विलक्षण मानसिक विवंचनेंत व्यग्र होऊन मी माझ्या ऑफिसांत बसलों असतांना जणुं कांहीं माझें दैवच एका माणसाच्या रूपानें प्रविष्ट झालें. ह्या माणसाचें नांव नाना अभ्यंकर.

कोण हे नाना अभ्यंकर ? त्यांनीं माझ्यासाठीं काय केलें हें सांगण्यापूर्वीं ते कोण आणि त्यांची माझी ओळख कशी झाली, हें या ठिकाणीं आधीं सांगितलें पाहिजे. नाना अभ्यंकरांची आणि माझी तोंपर्यंत तशी कांहीं फारशी ओळख होती असें म्हणतां आलें नसतें. वीर वामनराव जोशी यांचे ते भाचे असून कांहीं काळ ते त्यांच्या खाजगी चिटणिसाचें काम करीत होते, हें मीं ऐकलें होतें. त्यानंतर माझे मित्र अनंतराव गद्रे यांच्या सर्व नाटिकांमधून ते नायकाचें काम करीत होते, हेंहि पण माझ्या कानावर आलें होतें.

त्या नाटिका कंपनींतून बाहेर पडून त्यांनीं स्वतःच्या मालकीची ' नूतन नाटिका संगीत मंडळी ' सुरू केली आणि ह्या कंपनीच्या पायीं स्वतःच्या वडिलोपार्जित शेतीवाडीचें नि पत्नीच्या अंगावरील दागदागिन्यांचें वाटोळें करून वर आणखी सात आठ हजार रुपये कर्जाची कमाईही पण त्यांनीं करून ठेवली होती. तथापि त्यांचा माझा जो कांहीं थोडासा संबंध आला, तो नट या नात्यानें नव्हे; लेखक या नात्यानें.

ते जसे उत्तम नट होते तसे यशस्वी कादंबरीकारहि होते. ' खरा वारकरी ' ही आपली पहिली कादंबरी त्यांनीं १९३१ सालीं प्रथम लिहिली. ती अच्युतराव कोल्हटकरांना इतकी आवडली कीं त्यांनीं आपल्या ' संदेश 'मध्यें त्या कादंबरीवर अग्रलेख लिहिला. १९३९ सालीं ' लग्नाचा फांस ' या नांवाची एक कादंबरी त्यांनीं लिहिली. त्या कादंबरीला मीं प्रस्तावना लिहावी अशी विनंती करण्यासाठीं ते प्रथम माझ्याकडे आले. हीच त्यांची आणि माझी पहिली ओळख.

मला ती कादंबरी अतिशय आवडली. आणि मीं मोठ्या आनंदानें तिला प्रस्तावना लिहून दिली. त्यानंतर त्यांनीं लिहिलेलें ' सवाई सूड ' या नांवाचें एक नाटक ' गंधर्व नाटक मंडळी 'नें घेतलेलें होतें. त्यासंबंधीं उभयतांमध्यें कायदेशीर करार-मदार झालेलेहि होते. कंपनीनें सदर नाटकाची जाहिरातहि केलेली होती. पण नाना अभ्यंकरांचें कर्तृत्व जसें थोर, तसें त्यांचें दुर्दैवहि पण थोरच ! त्यांचें तें नाटक ' गंधर्व नाटक मंडळी 'च्या रंगभूमीवर कधींहि येऊं शकलें नाहीं.

नाना अभ्यंकर हे माझ्याकडे फारसे कधीं येत नसत. म्हणून मी माझ्या स्वतःच्या विवंचनेमध्यें व्यथित होऊन बसलों असतांना ते अकस्मात् त्या ठिकाणीं उपस्थित झालेले पाहून मी मनांतून त्यांच्यावर जरा चिडलोंच. म्हटलें, ही कटकट ह्या वेळीं इथें कशाला उपटली ?

माझा खिन्न चेहेरा पाहून नानाहि मनांतल्या मनांत दचकले आणि म्हणाले,

" काय, आज एकटेच ? कोणाची वाटबीट पहातां आहांत काय ? "

" होय ! " मी कडवट स्वरांत म्हणालों, " चार खांदेकऱ्यांची वाट पहातों आहें. त्यांपैकीं तुम्ही एक आलांत हें फार छान झालें. आतां आणखी तिघेच पाहिजेत ! "

माझ्या तोंडून अशा तऱ्हेचीं अभद्र मुक्ताफळें ऐकण्याची नानांच्या मनाची तयारी नव्हती. ते एकदम कोलमडून माझ्या शेजारीं बसले आणि माझे दोन्ही दंड हातांत धरुन अत्यंत भावनाविव्हल स्वरांत त्यांनीं मला विचारलें, " आज कांहींतरी भलतेंच संकट तुमच्यावर आलेलें दिसतें आहे. कारण इतके खचलेले आजपर्यंत मीं तुम्हांला कधीं पाहिलेलें नाहीं. माझ्या हातून जर कांहीं मदत होण्यासारखी असेल तर मला सांगा ! "

' राजसंन्यास ' नाटकाच्या शेवटच्या अंकांत संभाजी ज्याप्रमाणें विकट हास्य करतो, त्याप्रमाणें मी एकदम मोठमोठ्यानें हंसूं लागलों.

" नाना ! ", त्यांच्या पाठीवर थाप मारून मी हंसत हंसत म्हणालों, " मेरू पर्वताला मुंगी ती काय मदत करणार ? "

तेव्हां गंभीर स्वरांत नाना म्हणाले, " मीं आज कफल्लक आहें आणि साध्या विडीकाडीला सुद्धां महाग आहें, हें जरी खरें असलें तरी ह्याच कंगाल नानानें मास्टर विनायक आणि अनंतराव गद्रे ह्यांच्यासारख्यांना आजपर्यंत हजारों रुपयांची मदत स्वतःचा एक पैचाहि फायदा करून न घेतां मिळवून दिलेली आहे. म्हणून तुमच्या अडचणींत मी तुम्हांला कांहीं मदत करूं शकणार नाहीं, असा माझ्याबद्दल उगाच गैरसमज करून घेऊं नका ! "

त्यावर आतां आपली अडचण नानांपासून लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून मी एकदम उद्गारलों, " दोन तासांच्या आंत पंधरा हजार रुपये मला बँकेंत भरायचे आहेत—आतां बोला. "

" आतां कांहीं बोलत नाहीं. देवाचें नांव घेऊन उठलोंच मी हा ! मात्र एवढेंच सांगतों कीं, मोकळ्या हातानें मी इथें परत येणार नाहीं ! "

असें म्हणून नानांची ती उंच आकृति लांब लांब टांगा टाकीत बाहेर निघून गेली.

हा ' नाना ' नांवाचा जादूगार आतां काय चमत्कार करून दाखवतो आहे याची वाट पहात घड्याळाकडे डोळे लावून मी बसून राहिलों. बरोबर दीड तासानें नाना आला. आणि त्यानें हजार रुपयांच्या पंधरा नोटा माझ्या हातांत ठेवल्या. मी नानाला कडकडून मिठी मारली नि म्हणालों, " आज मुंगीनें मेरूला केवळ वांचवलें नाहीं, तर त्याला अक्षरशः गिळून टाकलें आहे. "

नानांनीं ज्या गृहस्थाकडून हे पैसे आणलेले होते, त्याचे पैसे मीं योग्य वेळीं

परत करून टाकले हें सांगण्याची येथें जरुरी नाहीं. या सर्व व्यवहारांत नानांच्या पदरांत एक पैहि पडली नाहीं.

' एते सत्पुरुषा : परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये ' असें भर्तृहरीनें ज्या सत्पुरुषांचें वर्णन केलें आहे, त्या कोटीमध्यें नानाला त्या दिवशी मीं माझ्या कल्पनेनें नेऊन बसविलें. त्यापेक्षां त्यांनीं माझ्यावर केलेल्या अकारण उपकारांचें मी अधिक काय वर्णन करूं ?

त्यानंतर आणखी तीन महिने गेले. कर्जाचा बोजा आणखीच डोक्यावर वाढत गेला. त्याच्या काळजीनें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा, मी आजारी पडलों. एके दिवशीं मीं नऱ्होबांना निरोप पाठविला कीं, मागील सहा महिन्यांचे प्रेसचे जमाखर्च घेऊन घरीं या. त्याप्रमाणें हिशेबाचे सारे कागदपत्र घेऊन ते माझ्याकडे आले. त्यावरून ओझरती नजर टाकतांच गेल्या सहा महिन्यांत आपल्याला छापखान्याच्या व्यवहारांत एकंदर पंधरा हजारांचा तोटा आला असल्याचें मला आढळून आलें.

तें पाहून मला एकदम घेरीच आली. फायदा तर एक पैशाचा नाही. उलट दर महिन्याला अडीच हजारांचा तोटा ! या हिशेबानें आपण एका वर्षाच्या आंत तीस हजारांच्या खड्डयांत पडणार, हें भवितव्य त्याच वेळीं माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें.

मी नऱ्होबांना म्हणालों, " सहा महिन्यांत पंधरा हजार रुपये तोटा ? "

तेव्हां नऱ्होबा हंसून म्हणाले, " अहो, हें तर कांहींच नाहीं. सुरुवातीला वर्ष दोन वर्षें असा तोटा आपण सहन केला तरच आपण धंद्यामध्यें उभे राहूं शकूं. " नऱ्होबांचा हा व्यस्त युक्तिवाद ऐकून मी सर्दच झालों.

मी नऱ्होबांना म्हणालों, " पाऊण लाख रुपये कर्ज काढून आपण हा छापखाना काढला. आणि तुम्ही मला आणखी दोन वर्षें साठ हजार रुपये कर्जाचा बोजा डोक्यावर घ्यायला सांगतां ? मग घेतलेल्या कर्जाची फेड कशी करायची ? "

तेव्हां नऱ्होबा निर्विकार चेहेरा करून म्हणाले, " तें मी काय सांगूं ? तुम्ही मालक आहांत. ज्या वेळीं तुम्ही हा छापखाना काढला त्या वेळीं तुम्ही सर्व गोष्टींचा विचार केला असलाच पाहिजे. "

" त्या वेळीं मीं केला नसला तरी आतां मात्र करतों. आजपासून नऱ्होबा, मी तुम्हांला कामावरून दूर केलें आहे. नोटिशीचा एक महिन्याचा पगार घ्या आणि माझ्या छापखान्यांतून चालू लागा. " पुढें काय करायचें याचा एका क्षणांत मीं माझ्या मनाशीं निर्णय घेतला.

डोक्यावर आभाळ तुटून पडावें अशीच नऱ्होबाची स्थिति झाली " मला तुम्हीं काढून टाकणार ? " दीन स्वरांत ते पुटपुटले.

" होय ! मी उद्यांपासून छापखाना बंद करायचें ठरविलें आहे. महिना अडीच हजार रुपये तोटा सहन करून छापखाना चालविण्याची माझ्यासारख्या गरिबाची ताकद नाहीं. "

लटपटत्या पायांनीं नऱ्होबा निघून गेले. मी छापखाना बंद करणार किंवा कोणाला तरी विकणार ही बातमी बाहेर फुटायला कांहीं फारसा वेळ लागला नाहीं. त्याच दिवशीं संध्याकाळीं चारदोन गिऱ्हाइकें माझ्याकडे येऊन सुद्धां गेलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ' संग्राम ' चे संपादक द्वा. भ. कर्णिक माझ्याकडे आले आणि छापखाना भाड्यानें चालवायला घेण्याची आपली इच्छा असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. थोड्याशा ओढाताणीनंतर तीन हजार रुपये महिना भाड्यानें छापखाना त्यांना चालविण्यास देण्याचा अकरा महिने मुदतीचा उभयतांमध्यें करार झाला. तीन महिन्यांचें भाडें अनामत म्हणून त्यांनीं माझ्याकडे ठेवायचें आणि ' नवयुग 'च्या छपाईचें दरमहा जें कांहीं बिल होईल तें वेगळें मीं त्यांना द्यायचें, असा करार होऊन मी माझा ' अत्रे प्रिंटिंग प्रेस ' द्वा. भ. कर्णिक यांना चालवावयास दिला.

या करारामुळें दरमहा मला अडीच हजार रुपयांचा तोटा होत होता तो तर वांचलाच, पण उलट दरमहिना तीन हजार रुपये मला मिळण्याची व्यवस्था झाली. नऱ्होबांपेक्षां मलाच छापखान्याचा व्यवहार जास्त कळतो, असें वेलदे ह्यांनीं मला सर्टिफिकेट दिलें.

दहा महिने हा करार निर्वेधपणें चालला. त्या करारापोटीं मला कर्णिकांकडून एकंदर तीस हजार रुपये मिळाले. त्यानंतर एक दिवस कर्णिक माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, " महिना तीन हजार रुपये भाडें मला परवडत नाहीं. कांहीं तरी कमी करा. "

मी म्हणालों, " यापुढें अडीच हजार रुपये भाडें देत जा. "

पुन्हां महिन्यानें कर्णिक आले आणि म्हणाले कीं, " तेंहि भाडें मला परवडत नाहीं. "

मी म्हणालों, " मग दोन हजार देत जा. " तेव्हां कर्णिक म्हणाले, " तसें नको. त्यापेक्षां तुम्हीं जर मला प्रेस विकत द्याल तर बरें होईल. "

मी म्हणालों, " ठीक आहे. अगदीं योग्य आणि माफक किंमतीमध्यें मी तुम्हांला प्रेस विकत देतों. माझें मुद्दल पंचाऐंशी हजारांचें आहे. गेल्या अकरा महिन्यांत तुम्हीं मला रु. ३२,५०० भाडें म्हणून दिलेलें आहे. तें मी मुद्दलांतून वजा करतों. आणखी अडीच हजार रुपये कमी करतों. आणि पन्नास हजार रुपयांना हा प्रेस तुम्हांला देतों. मात्र ही किंमत एका रकमेनें तुम्ही मला द्यायला पाहिजे ! "

कर्णिकांना तें मान्य झालें नाहीं. ते हप्ते मागूं लागले. तेव्हां उभयतांमधला अकरा महिन्यांचा करार रद्द करून दुसऱ्या दिवसापासून माझा प्रेस मी पुन्हां आपल्या

ताब्यांत घेतला. कर्णिक त्या वेळीं माझ्यावर फार रुष्ट झाले. तो त्यांचा माझ्यावरचा राग अजूनहि त्यांच्या मनांत दबा धरून आहे.

१९४४ नोव्हेंबरपासून आगामी सार्वत्रिक निवडणुकीमुळें देशाच्या राजकारणाचें वातावरण एकदम बदललें. 'नवयुग'चा खप तिपटीनें वाढला आणि छापखान्याच्या माझ्या धंद्यांत मला अपेक्षेपेक्षां यश आलें!

# ३२

## मला भेटलेला बदमाष

पुण्याचे भामटे आणि दिल्लीचे सोदे हे इतिहासकालापासून प्रसिद्ध आहेत. दिल्लीला चारपांच वेळां मी जाऊन आलों आहें. पण तेथें कांहीं मला ' सोदे ' दिसले नाहींत. आणि पुण्यांत तर माझा सारा जन्मच गेला आहे. पण इतक्या वर्षांत एकहि भामटा तसा मला तिथें आढळला नाहीं. बाकी हल्लींच्या काळीं पुणें हें भामट्यांसाठींच प्रसिद्ध आहे, असें म्हणणें ही पुण्याची बदनामी आहे. मग इतिहासकाळीं काय असेल तें असो. इतिहास जसा बदलतो तशीं माणसेंहि बदलतात आणि गांवेंहि बदलतात. पुण्याचें आणि दिल्लीचें महत्त्व दुसऱ्या दृष्टीनें जरी आज कमी झालेलें नसलें तरी पैशाच्या आणि व्यापाराच्या दृष्टीनें त्यांना आज काय महत्त्व राहिलेलें आहे ? मग भामटे आणि सोदे त्या ठिकाणीं कशाला विनाकारण मुक्काम करून राहतील ?

तथापि, ह्या पुरातन व्यवसायांतला आणि घराण्यांतला एक वस्ताद वारसदार मुंबई शहरांत मला प्रत्यक्ष पाहावयाला मिळाला. एवढेंच नव्हे तर आपल्या बुद्धिकौशल्याचा एक मासलेवाईक प्रयोग त्यानें माझ्यावरच करून दाखविला. माझें नशीब एवढेंच कीं,

या प्रयोगांत मला फारसा चट्टा बसला नाहीं. अगदीं थोडक्या खर्चांतच मी त्याच्याकडून अक्कल शिकलों. व्यापाराच्या क्षेत्रांत वावरणाऱ्या मुंबईतल्या माणसांना असे बदमाष अन् भामटे पदोपदीं भेटत असतात. पण इतर धंद्यांपेक्षां चित्रपटांच्या व्यवसायांत अशा लोकांचा धोका जास्त असतो हें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. प्रत्येक व्यवहार करतांना अगदीं डोळ्यांत तेल घालून माणसाला जागे राहावें लागतें. नाहीं तर केव्हां कोणत्या भानगडींत आपण फटकन् सांपडूं हें कांहीं सांगतां यायचं नाहीं.

चाळीस सालीं मी मुंबईला परळ येथें ‘ चित्रमंदिर ’ नांवाचा एक स्टुडिओ विकत घेतला. अन् स्वतःचे चित्रपट निर्माण करावयास सुरुवात केली. त्या वेळची ही गोष्ट आहे. रोज हजारों रुपयांची हातून घडामोड होऊं लागली. कर्ज हेंच माझें भांडवल असल्यानें रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत पैसा कसा उभा करावयाचा हाच माझा मुख्य उद्योग होऊन बसला.

पैशाच्या व्यवहारांत रोज नाना तऱ्हेच्या भल्याबुऱ्या लोकांच्या गांठी पडूं लागल्या. चित्रपटाच्या व्यवसायांत लाखाशिवाय गोष्टी नाहींत. सामान्य सावकाराकडून कांहीं लाखों रुपयांचें कर्ज मिळण्याची शक्यता नसते. म्हणून मोठमोठे लक्षाधीश, भांडवलवाले आणि राजेमहाराजे ह्यांच्याकडून चित्रपटांचे निर्माते पैसे जमा करण्याच्या नेहमीं नादांत असतात. आणि त्या कामीं कित्येकांना कधीं कधीं यशहि पण मिळतें.

चित्रपट निर्मात्यांचें हें मानसशास्त्र सर्वसामान्यपणें जगजाहीरच असतें. आणि त्याचा फायदा जसा धंदेवाईक दलाल घेतात, त्याप्रमाणें कांहीं लफंगे-भामटेहि पण घेत असतात. माझी गरज दीडदोन लाखांच्या आंत होती. आणि ही गरज हुंडीबाजारांतून मी तशी भागवूं शकत होतों. राजेमहाराजांच्या स्वभावाची मला पूर्ण माहिती असल्यानें त्यांच्याकडे ढुंकून देखील बघायचें नाहीं, असें मीं मनाशीं ठरविलें होतें. माझे पैशाचे सारे व्यवहार मी अतिशय जपून आणि सावधगिरीनें करीत होतों.

एके दिवशीं सकाळीं दहा वाजायच्या सुमारास ‘ चित्रमंदिर ’मधील माझ्या ऑफिसांत बसलों असतां एक गृहस्थ माझ्या भेटीला आला. त्याचें वय पंचावन्न छप्पन वर्षांचे होतें. अगानें तो उंचापुरा आणि बांध्यानें मजबूत, पण थोडासा स्थूल होता. मुद्रेवरून तो गंभीर आणि प्रौढ असा दिसत होता. त्यानें इंग्रजी पद्धतीचा पोशाख केला होता.

त्यानें आपल्या नांवाचें इंग्रजी कार्ड जेव्हां आंत माझ्याकडे पाठविलें, तेव्हां तें वाचून कोणी तरी गोरा साहेबच मला भेटायला आला असावा असें मला वाटलें. त्याचें नांव ‘ कॅशर ’ असें होतें. पण त्यानें त्या नांवाचें स्पेलिंग ‘ Cassier ’ असें केलें होतें. तो ज्यू होता. आणि इंग्रजी भाषा एखाद्या साहेबाच्या ढसक्यानें आणि अस्खलितपणानें तो बोलत होता. त्याची चालण्याची आणि वागण्याची पद्धत

एखाद्या सुसंस्कृत आणि सुशिक्षित साहेबाप्रमाणें रुबाबदार होती.

माझ्या समोरच्या खुर्चीवर तो मोठ्या अदबीनें बसला आणि आपल्या कोऱ्या करकरीत अन् पिवळ्या रंगाच्या कातडी पिशवींतून त्यानें टाईप केलेलीं पांचसात जाड पत्रें बाहेर काढून माझ्या हातांत दिलीं. तीं पत्रें वाचून मी तर पहिल्या झटक्यासरशीं चीत झालों. मुंबईतल्या सुप्रसिद्ध लक्षाधीश व्यापाऱ्यांच्या नोटपेपरवर त्यांच्या सह्यांचीं तीं शिफारसपत्रें होतीं. तीं पत्रें बनावट होतीं, असा संशयहि कोणाच्या मनांत येणें शक्य नव्हतें आणि कदाचित् तीं पत्रें खरींहि पण असतील, नाहीं कोणी म्हणावें ?

सदर व्यापाऱ्यांनीं आपल्या स्वतःसाठीं चार-चार लाखांचें, पांच-पांच लाखांचें कर्ज उभें करण्याचीं अधिकारपत्रें कॅशर याला पूर्वीं केव्हां तरी दिलेलीं होतीं. तीं पत्रें वाचून झाल्यानंतर मी मोठ्या आदरानें आणि विस्मयानें कॅशरकडे पाहूं लागलों. कर्ज मिळवून देणारे अनेक दलाल तोंपर्यंत माझ्याकडे आले होते आणि रोज येतहि पण होते. पण लाखांचा व्यवहार करणारा एवढा मोठा दलाल मात्र त्या क्षणापर्यंत माझ्याकडे कधींच आला नव्हता.

" बोला काय म्हणणें आहे आपलें ? " कॅशरचीं पत्रें त्याला परत करीत मीं इंग्रजीमध्यें विचारलें. " आपली सेवा करण्याची आपण मला संधि द्यावी एवढीच विनंति आहे. " कॅशर सस्मित मुखानें म्हणाला.

त्या त्याच्या विनम्र उद्गारांनीं एका क्षणांत माझ्या काळजाला वेढा घातला. पण पैशाचे व्यवहार अतिशय काळजीपूर्वक करावयाचे आणि कोणाहि अनोळखी माणसावर त्याबाबत विश्वास ठेवायचा नाहीं, हा एक अलिखित नियम मीं माझ्या मनाशीं करून ठेवला होता, त्याची मला आठवण झाली. आणि अगदीं ओठांपर्यंत आलेले शब्द मागें घेऊन मी एकदम गप्प बसलों.

माझ्या मनांतली ती हालचाल कॅशरनें ताबडतोब ओळखली आणि तो मोठ्या ऐटीनें म्हणाला, " अत्रेसाहेब, मला आपण धंदेवाईक दलाल समजूं नका. मी लष्करी माणूस आहें. पहिल्या महायुद्धांत मी लढलों आहें. मला ' व्हिक्टोरिया क्रॉस ' मिळणार होता, पण थोडक्यांत चुकला. माझे वडील पोरबंदर संस्थानचे दिवाण होते. फार श्रीमंतींत आणि वैभवांत आम्हीं दिवस काढले आहेत. केवळ नाइलाज म्हणून मी हा धंदा करतों आहें. पण म्हणून वाटेल त्या अलबत्यागलबत्या माणसाचें काम मी हातीं घेतों असें आपण कृपा करून समजूं नका. चारदोन कुळें मी घेतों. पण अगदीं निवडक निवडक आणि मोठीं मोठीं. जास्त पंचायतींत मी पडत नाहीं. देवाच्या दयेनें मला एकच मुलगी आहे. तिची मला तरतूद करावयाची आहे. दुसरें कांहीं नाहीं. "

ऐकणाऱ्याच्या मनांत आदर आणि विश्वास निर्माण करील अशीच कॅशरची बोलण्याची पद्धत होती. त्याच्या शरीराच्या बांध्यावरून आणि हालचालीच्या रुबाबा-

वरून तर तो उघड लष्करी माणूस वाटत होता. आणि त्याच्या बोलण्यावरून मोठमोठ्या लोकांशीं त्याचा संबंध आला असावा, असा कोणाचाहि ग्रह झाला असता.

तरी देखील पहिल्याच भेटीला आपण त्या माणासाशीं आपल्या गरजेची झांकली मूठ कशाला मोकळी करा, असा विचार करून मी त्याला म्हणालें, "आपण इतक्या अगत्यानें येऊन मला भेटलांत ह्याबद्दल मी आभारी आहें. पण मी एक लहान माणूस आहें. लाखाचे व्यवहार जुळविणाऱ्या आपल्यासारख्या मोठ्या माणसाला मी कां म्हणून तसदी देऊं ?"

त्याबरोबर अगदीं मोकळेपणानें तो हंसला आणि शुद्ध मराठीमध्यें त्यानें माझ्याशीं बोलायला सुरुवात केली, "अत्रेसाहेब, अजून आपण मला परका मानतां. तुम्ही जरी आज मला प्रथम पाहत असलां तरी मी मात्र तुम्हांला पुष्कळ दिवसां-पासून ओळखतों. आपल्या नाटकाचा आणि चित्रपटाचा लौकिक किती दिवसांपासून तरी माझ्या कानांवर आहे."

"तो कसा काय ?" मीं आश्चर्यचकित होऊन विचारलें, "आणि मराठी भाषा तुम्ही इतक्या चांगल्या तऱ्हेनें कशी काय बोलूं शकतां ?"

"इंग्रजी, मराठी, गुजराती, हिंदी आणि उर्दू ह्या पांचहि भाषा मी चांगल्या तऱ्हेनें बोलूं शकतों." कॅशर हंसत म्हणाला. "मूळचे आम्हीं कोंकणांतले. पण पुढें गुजरातेंत स्थायिक झाल्यामुळें गुजराती ही आमची मातृभाषा झाली. लष्करांतल्या नोकरीमुळें पुढें तिचें स्थान इंग्रजीनें घेतलें. युरोपमध्यें कांहीं वर्षें मीं घालविल्यामुळें मला फ्रेंच आणि जर्मनहि पण चांगलें येतें—"

"पण माझीं नाटकें तुम्हीं कुठें वाचलींत ?" मीं मध्येंच विचारलें.

"मीं कबूल करतों कीं, मीं स्वतः कांहीं तुमचीं नाटकें वाचलेलीं नाहींत." कॅशर मिनतवारीच्या स्वरांत म्हणाला, "तितकें मराठी मला समजतहि नाहीं. पण माझी बायको ही तुमच्या वाङ्मयाची मोठी भक्त आहे. तिचें सारें शिक्षण पुण्यांतच झालें. तिच्या तोंडून ऐकून ऐकून मला तुमच्या नाटकांच्या आणि चित्रपटांच्या गोष्टी अगदीं पाठ झाल्या आहेत म्हणाना ! आणि आज देखील मी तुमच्याकडे जो आलों आहे त्याला कारण तीच आहे."

"तें कसें काय ?" मीं अचंब्यानें विचारलें.

"आपण मुंबईत येऊन हा चित्रमंदिर स्टुडिओ विकत घेतला आणि 'पायाची दासी' नांवाचा एक चित्रपट आपण सध्यां काढीत आहांत हें तिनेंच मला सांगितलें. कारण ती तुमचा 'नवयुग' नियमितपणें वाचते." कॅशर अगदीं माहितगाराप्रमाणें बोलूं लागला. "आणि तीच किती दिवसांपासून तरी मागें लागली आहे कीं दुसऱ्याच्या पैशाची जमवाजमव तुम्ही करीत फिरतां त्यापेक्षां अत्रेसाहेबांचें तुम्ही जर काम कराल तर एका सुशिक्षित आणि लायक माणसाला मदत करण्याचें श्रेय तरी तुम्हांला लाभेल.

वास्तविक पाहतां आज मी जो इथें आलों आहें तो केवळ तुमची ओळख करून घेण्यासाठीं. एकदां आपला परिचय झाला आणि मी कोणत्या प्रकारचा माणूस आहें हें आपल्या लक्षांत आलें, म्हणजे मग व्यवहाराच्या गोष्टी आपण सावकाश पुढें करूं. बरें आहे, येतों मी. ''

एवढें बोलल्यानंतर माझा स्टुडिओ दाखविल्यावांचून त्याला जाऊं देणें हें कांहीं मला बरें दिसलें नसतें. म्हणूनच मी त्याला विनंतिपूर्वक विचारलें, " आतां आपण इथें आलांच आहांत तर एकदां आपण माझा स्टुडिओ पाहून गेलांत, तर मी आपला फार आभारी होईन. "

' ओ, थँक्स, विथ प्लेझर ! ' कॅशर लष्करी ऑफिसरच्या ऐटबाज पवित्र्यांत चपलतेनें उठून म्हणाला.

कॅशरला मीं स्टुडिओ दाखविला. स्टुडिओंतील निरनिराळी यंत्रसामग्री आणि प्रत्येक खोलींत चाललेलीं कामें त्यानें मोठ्या उत्सुकतेनें समजावून घेतलीं आणि शेवटीं अंतःकरणपूर्वक आभार मानून त्यानें माझा निरोप घेतला. पहिल्याच भेटीला माझें त्याच्याबद्दल उत्तम मत झालें.

त्यानंतर महिना दीड महिना कधीं तरी अधूनमधून तो मला फोन करीत असे. एकदोनदां तो स्टुडिओंत आला. आणि एकदोनदां तो घरींहि आला. पण त्या काळांत व्यवहाराची त्यानें एकदांहि कधीं गोष्ट केली नाहीं. वक्तशीरपणा आणि चोखपणा हे दोन विशेष गुण त्याच्या वर्तणुकीमध्यें मला आढळले. सात वाजतां येतों म्हणून त्यानें सांगितलें कीं, बरोबर सात वाजतां तो यावयाचा. त्यांत एक मिनिट पुढेंमागें व्हायचें नाहीं. एखादे वेळीं पत्रासाठीं दोनचार आण्यांचीं तिकिटें त्यानें मागून घेतलीं, कीं त्याचे पैसे खिशांतून काढून तो ताबडतोब टेबलावर ठेवायचा.

असल्या बारक्यासारक्या गोष्टीचे पैसे कसले देतां, असें मी चिडून म्हटलें तर तो उलट माझ्यावरच रागवल्यासारखें दाखवून म्हणायचा, " ज्याला व्यापार करायचा आहे त्यानें असें करूं नये. पै-पैची तुम्ही काळजी घ्याल, तेव्हां लाखों रुपये कमवाल ! "

एकदोनदां माझ्या फोनवरून तो परगांवीं बोलला. त्याचेहि पैसे त्यानें मला त्याच वेळीं काढून दिले अशा रीतीनें महिन्या दोन महिन्यांत आमची चांगलीच ओळख झाली. माझ्या गरजा काय आहेत हें त्याला माहीत झालें. आणि त्याच्या ओळखी कोणाकोणाशीं आहेत हें मलाहि समजून आलें.

भावनगरच्या महाराजांचा बोलतांना तो पुष्कळदां उल्लेख करी. एकदोनदां माझ्या समक्ष फोनवरून त्यांच्याशीं तो बोलला. आणि एकदां भावनगरची लाल पाटी असलेल्या कोऱ्या करकरीत मोटारीमधूनहि तो माझ्या स्टुडिओंत आला. हळूहळू माझ्या मित्रमंडळीशीं त्याचा परिचय होत गेला. लढाई आणि राजकारण हे त्याच्या बोलण्याचे नेहमींचे विषय असत.

एकदां तो सहज मला म्हणाला, "अत्रेसाहेब, मी ही रोजची तुमची धांवपळ पाहतों आहे. त्यामुळें तुमच्या शक्तीचा निष्कारण व्यय होतों आहे असें मला वाटतें. माफ करा अं, स्पष्ट बोलतों म्हणून. वास्तविक तुम्ही शांतपणें बसून गोष्टी लिहाव्यात. तुमच्या सारख्यानें ही पैशाची दगदग करूं नये."

मनुष्याच्या कष्टाबद्दल सहानुभूति दाखविणें हा त्याचें अंतःकरण काबीज करण्याचा अगदीं रामबाण उपाय आहे.

मी कृतज्ञतेनें त्याला म्हणालों, "तुम्ही माझ्याबद्दल इतक्या आपुलकीनें बोलतां आहांत याबद्दल मी तुमचा आभारी आहें. मला देखील ही धांवपळ आवडत नाहीं. पण ह्यांतून सुटायचं कसं ?"

कॅशरनें क्षणभर विचार केला आणि एकदम तो उद्गारला, "तुम्हांला दोन लाख रुपये मिळाले तर तुमचं काम भागेल ?"

"दोन कशाला ? दीडांत सुद्धां होईल ?" मी म्हणालों.

"अस्सं ? ठीक आहे. एकदोन दिवसांत आपण पुन्हां त्याबद्दल बोलूं." असें अर्धवट ओठांतल्या ओठांत बोलून तो निघून गेला.

दोन दिवसांनीं त्यानें मला फोन केला आणि "उद्यां दहा वाजतां मी स्टुडिओंत येतों" असें मला तो म्हणाला. त्याप्रमाणें बरोबर दहाच्या ठोक्याला तो स्टुडिओंत आला.

आल्याबरोबरच चेहेऱ्यावर कोणतीहि भावना न दाखवितां तो शांत स्वरांत म्हणाला, "अत्रेसाहेब, तुमचें काम झालें." मी आनंदानें म्हणालों, "म्हणजे काय ?"

कॅशर अगदीं हलक्या आवाजांत म्हणाला, "कृपा करून ह्यांतलें एक अक्षर कुणाला सांगू नका. अगदीं 'कॉन्फिडेन्शल' ठेवा. काल रात्रीं जेवायच्या वेळीं मीं महाराजांच्या जवळ – म्हणजे आमच्या भावनगरच्या – तुमची गोष्ट काढली. आणि तुमचें नशीब असें कीं, त्यांनीं ती गोष्ट ताबडतोब मान्य केली. तुम्हीं दीड म्हणालांत. पण मी दोनाचेंच बोललों. एवढ्या धंद्यांत पन्नास हजार हातांत आणखी शिल्लक असले तरी कांहीं बिघडत नाहीं. काय ?"

माझ्या पोटांतून हर्षाच्या गोड गोड अन् गरम गरम उकळ्या उठायला लागल्या. आणि डोळे आनंदानें नाचूं लागले.

"महाराजांनीं मला विचारलें—" कॅशर पुढें म्हणाला कीं, "रकमेला तारण काय ? मीं म्हणालों, त्यांच्या मालकीचा चार—पांच लाखांचा स्टुडिओ आहे."

"एवढा कांहीं नाहीं. पण अडीच एक लाखांपर्यंत त्याची किंमत होईल!' मी मध्येंच म्हणालों.

" तें पाहूं आपण. मला आतां तुम्ही स्टुडिओंतल्या यंत्रांच्या आणि सामानाच्या तपशिलाची अन् त्यांच्या किंमतीची यादी चटकन् करून द्या—' कॅशर म्हणाला.

" रकमेला व्याज काय ? अन् ती परत केव्हां करायची ? " मीं विचारलें.

" व्याज जास्तींत जास्त आठ आणे आणि मुदत आपण घालूं पांच वर्षांची !" कॅशर निर्धास्तपणाच्या स्वरांत म्हणाला.

मी तीन तीन रुपये व्याज देऊन बाजारांतून हुंड्या काढीत होतों. अन् त्यांची जास्तींत जास्त मुदत तीन महिने असे. अन् हा माणूस तर आठ आणे मितीच्या व्याजानें आणि पांच वर्षांच्या मुदतीनें दोन लाख रुपये देण्याच्या गोष्टी करतो आहे.

मी कॅशरचा हात दोन्ही हातांत धरून अंतःकरणापासून म्हणालों, " कॅशर, तूं खरोखरच एक अद्भुत माणूस आहेस ! "

कॅशर थंडपणें म्हणाला, " साहेब, अजून तुम्हांला काय माझें ठाऊक आहे ? मीं तुमच्यासाठीं काय काय करणार आहें ह्याची तुम्हांला कल्पना नाहीं. अद्यापपर्यंत मी त्याबद्दल तुम्हांला बोललों नाहीं. असें आहे कीं, माणसानें केल्यावांचून बोलूं नये. मुंबई शहरांत तुमचा स्टुडिओ हा एक आदर्श स्टुडिओ व्हावा एवढीच माझी इच्छा आहे.

" पण त्याला वीस पंचवीस लाख रुपये लागतील ! " मी चिंतातुर चेहेरा करून म्हणालों.

" त्याची मला पूर्ण कल्पना आहे, " कॅशर हंसून म्हणाला, " मी इतके दिवस स्वस्थ बसलों होतों अशी तुमची समजूत आहे कीं काय ? मी अमेरिकेहून त्यासंबंधी वेगळें वाङ्मय मागविलें आहे. हें तुमचें काम झालें कीं, मी एक आठवडा कलकत्त्याला जाऊन येणार आहें. तिथें माझ्याजवळ एक फार मोठी पार्टी आहे— "

माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. मुंबईतल्या त्या माझ्या पंचवीस लाखांच्या आदर्श स्टुडिओचे सोनेरी कळस एकदम माझ्या कल्पनासृष्टींत झळकूं देखील लागले.

इतक्यांत मला आठवण होऊन मीं कॅशरला विचारलें, " पण कॅशर साहेब, ह्या तुमच्या दोन लाखांच्या व्यवहाराबद्दल तुम्हांला कमिशन काय द्यावयाचें ? "

" छे, छे, ह्या व्यवहाराबद्दल मी तुमच्याकडून कमिशन कांहींहि घेणार नाहीं ! " कॅशर मान जोरानें हलवून म्हणाला. " दोन लाखांबद्दल दलालाच्या नेहमींच्या दराप्रमाणें होणार किती कमिशन ! चार हजार रुपये. मी तुमच्याकडून काय चार हजार रुपये घेऊं ! अत्रेसाहेब, माझी भूक फार मोठी आहे. मी जेव्हां तुमचें तें पंचवीस लाखांचें काम करून देईन तेव्हां मग माझी खरी किंमत मी तुमच्याकडून वसूल करून घेईन. हा व्यवहार म्हणजे माझ्या कर्तबगारीची एक नववर्षाची तुम्हांला

नजरभेट आहे असेंच समजा ना तुम्ही !"

कॅशरचा तो युक्तिवाद इतका परिणामकारक होता कीं त्याला उत्तर देणें अशक्य होतें. तरी देखील मी माझ्याकडून म्हणायचें तें सारें म्हणालों आणि ह्या व्यवहारा-बद्दल जें कांहीं रीतसर कमिशन असेल तें त्यानें घेतलेंच पाहिजे असा त्याला आग्रह केला.

तेव्हां शेवटीं तो खांदे उडवीत नाइलाजाच्या स्वरानें मला म्हणाला, "याउप्पर तुमची मर्जी. तुमच्या मनाला येईल तें तुम्ही द्या."

स्टुडिओंतल्या मालमत्तेची तपशीलवार यादी करून मीं कॅशरला दिली. त्यानंतर एकदोन वेळां मी त्याच्याबरोबर त्याच्या सॉलिसिटरच्या कचेरींत गेलों. तो आंत जायचा. मी बाहेर मोटरींत बसून राहायचा.

दहापंधरा दिवसांनीं सॉलिसिटरनें तयार केलेल्या कर्जाच्या कराराचा तपशील-वार खर्डा त्यानें माझ्या हातांत ठेवला. त्यानें सांगितल्याप्रमाणें तो अगदीं व्यवस्थित होता. त्यांत कुठेंहि कोणत्याहि प्रकारचा उणेपणा नव्हता. फक्त 'भावनगरच्या महा-राजां'च्या नांवाच्या ठिकाणीं मात्र जागा मोकळी सोडलेली होती.

मीं त्याला विचारलें, "असें कां?"

कॅशर म्हणाला, "हा कर्जाचा व्यवहार महाराज आपल्या स्वतःच्या नांवावर कधींहि करीत नाहींत. कदाचित् ते आपल्या खाजगी कारभाऱ्याचें नांव ह्या करारांत घालतील. पाहूं या. एकदोन दिवसांत हा ड्राफ्ट त्यांच्याकडून मंजूर करून आणतों."

त्याप्रमाणें आणखी चारपांच दिवसांनीं तो ड्राफ्ट घेऊन माझ्याकडे आला. त्यावर लाल पेन्सिलीच्या एकदोन ठिकाणीं ठळक खुणा होत्या आणि तळाशीं 'अप्रूव्हड' अशीं ऐटदार अक्षरें आणि त्याच्या खालीं सहीचीं दोन झोंकदार आद्याक्षरें होतीं.

कॅशर हंसून माझ्या कानांत पुटपुटला. "महाराजांची सही आहे."

मी महाराजांच्या अक्षराचें कितीतरी वेळ मनांतल्या मनांत कौतुक करीत होतों. महाराजांतर्फे करारांत त्यांच्या खाजगी कारभाऱ्याचें नांव घालण्यांत आलें. तें एका गुजराती माणसाचें नांव होतें.

मी हर्षानें विचारलें, "आतां पुढें?"

कॅशर म्हणाला, "आतां फायनल ड्राफ्ट अन् त्यानंतर तुमच्या हातांत दोन लाखांचा चेक—"

दहा पंधरा दिवसांनीं पन्नास का शंभर रुपयांच्या स्टॅंप पेपरवर कॅशरनें तो करार अगदीं व्यवस्थित रीतीनें करून माझ्याकडे आणला. अशा व्यवहाराचे सॉलि-सिटर जसे करार करतात तसाच तो करार होता.

तो करार पाहून मी खूष झालों. मी खिशांतून चेकबुक काढीत त्याला विचारलें,

" ह्याचा निम्मा खर्च मलाच द्यायचा आहे ना ? "

कॅशर माझें चेकबुक माझ्या खिशांत कोंबून म्हणाला, " तो खर्चाचा हिशेब आपण मागाहून करूं हो, महाराज सध्यां पुण्याला गेले आहेत. तेव्हां मलाहि त्यांच्याबरोबर तिकडे गेलें पाहिजे. कारण एकसारखा त्यांच्या पाठीमागें लकडा लावल्याखेरीज अशीं कामें होत नाहींत. मोठीं माणसें आहेत तीं. त्यांना आठवण राहात नाहीं. "

मी विचारलें, " अजमासें किती दिवसांत काम होईल हें ? "

कॅशर म्हणाला, " तरी एक पंधरवडा लागेल. "

पुण्याला जाण्यासाठीं कॅशरनें माझी मोटर मागितली. मीहि त्याला मोठ्या आनंदानें ती दिली. मध्यंतरीं दोन वेळां मी पुण्याला जाऊन आलों. दर वेळेला मला भेटायला कॅशर स्टेशनवर येई. तो लढाईचा काळ होता. स्टेशनवर पुष्कळसे गोरे लष्करी अधिकारी नेहमीं इकडून तिकडून फिरत असत. त्यांच्याशीं कॅशर मोठ्या सलगीनें बोलतांनाहि आढळून येई. कोणाला तो ' हॅलो स्मिथ ' म्हणे, तर ' हॅलो जॉन ' म्हणून कोणाच्या पाठीवर तो थाप मारी.

स्टेशनवर कॅशरला मी एकदां दोनदा ' पेय ' देण्याचा प्रयत्न केला. पण त्यानें तें साफ नाकारलें. तो म्हणाला, " मी सिगरेट ओढीत नाहीं. दारूच्या थेंबालाहि स्पर्श करीत नाहीं. " कॅशरला कशाचेंहि व्यसन नाहीं हें बघून तर मी अगदीं चाट झालों.

' भावनगर 'च्याच मोटारींतून कॅशर पुण्यांत फिरत असे. पुण्यांतल्या माझ्या एकदोन मित्रांची मी कॅशरशीं ओळख करून दिली. त्यांच्याकडेहि तो कधीं कधीं गप्पा मारायला जात असे. अधूनमधून एकादे वेळीं माझ्या डोक्यांत विचार येत असे, नाहीं असें नाहीं, कीं ' हा माणूस आपल्याला फसवीत तर नाहीं ना ? '

पण त्याच्या वागणुकीचा जेव्हां मी बारकाईनें विचार करी तेव्हां तिच्यांत कुठेंहि मला फट आढळून येत नसे. त्याच्याबद्दल ज्या ज्या शंका माझ्या मनांत येत, त्यांचें यथाक्रम निरसन होत असे. अन् अशा माणसाबद्दल आपण संशय घेणें म्हणजे त्याला अन्याय करण्यासारखें आहे असें मागाहून मनाला वाटे.

पंधरावीस दिवसांनीं एके दिवशीं कॅशरचा पुण्याहून मला तांतडीचा फोन आला कीं, " आजच्या डेक्कन क्वीननें तुम्ही पुण्याला ताबडतोब या. "

त्यानें मला कशाला बोलाविलें असावें हें तत्काळ माझ्या लक्षांत आलें. त्याप्रमाणें मोठ्या आनंदानें नि उत्सुकतेनें मी त्या दिवशीं पुण्याला गेलों. स्टेशनावर मला घ्यावयाला कॅशर हजर होताच.

मी गाडींतून खालीं उतरतांच माझा हात त्यानें हातांत धरला आणि तो म्हणाला, " कुठल्या तरी शांत ठिकाणीं आपण जाऊं या. पुष्कळ बोलायचंय मला. "

मी कॅशरला घेऊन 'पूना हॉटेल' मध्यें गेलों. एका खोलींत आम्ही जाऊन बसलों.

कॅशर माझ्याशीं हस्तांदोलन करीत म्हणाला, "आपलें काम झालें. आज मला अतिशय आनंद झाला आहे. उद्यां अकरा वाजतां करारावर सही होऊन महाराज आपल्याला दोन लाखांचा चेक देतील. आतांच मी सगळें मुक्रर करून आलों आहें."

तो क्षण म्हणजे सुखाची मला पराकाष्ठा वाटली.

"मी कधीं पीत नाहीं, पण आज या आनंदाप्रीत्यर्थ मी एक छोटा पेग ब्रॅण्डीचा घेईन."

मी त्याप्रमाणें बॉयला बोलावून ब्रॅंडी आणायला सांगितली. डोक्यावर पंखा गरगर फिरत होता. बर्फाच्या खड्यांनीं थंडगार झालेल्या पेयाचा आस्वाद घेत निवांत-पणें आम्ही बोलूं लागलों.

मध्येंच कॅशर सहज कांहीं तरी बोलावें तसें बोलला, "आतां आपल्याला हजार बाराशें रुपये रोख मिळूं शकतील का इथें?"

मी म्हणालों, "कां?"

कॅशर म्हणाला, "नाहीं—उद्यां महाराज आपल्याला चेक देणार ही बातमी तिथल्या नोकरांना आतां माहीत झालेली आहे. तेव्हां त्यांना आपल्याला कांहीं ना कांहीं तरी द्यावें लागेल. नाहीं का? महाराजांचा पर्सनल सेक्रेटरी आहे तो जरा जास्त मागतो आहे. पण मी त्याला सात-आटशें रुपयांतच भागवणार आहें. उगाच जास्त कोण देतो आहे लेकाच्याला अन् बाकीच्या नोकर माणसांना चारशें रुपये पुरे होतील."

तोंपर्यंत कॅशरनें माझ्याकडून एक रुपया देखील घेतला नव्हता. उलट त्यानें आतांपर्यंत शंभर-दीडशें रुपयांचा खर्च केलेला मला दिसत होता. बरें, ज्या कामा-साठीं त्यानें ही पैशांची मागणी केली होती तें कामहि खोटें वाटण्यासारखें नव्हतें. असे पैसे द्यावे लागतातच. क्षणभर मला मनांतून वाटलें कीं माझ्याकडून पैसे उपट-ण्याचा कॅशरचा हा डाव तर नसावा ना? पण असें वाटून सुद्धां त्याच्या मागणी-प्रमाणें त्याला पैसे देण्यावांचून त्या वेळीं सुटका कुठें होती?

मी अगदीं कोंडींत सांपडलों होतों. नाहीं पैसे द्यावे, तर आपला कद्रूपणा दिसतो. एवढें दोन लाख रुपयांचें काम आपण जुळवीत आणलें असतां आणि उद्यां अकरा वाजतां ह्याच्या हातांत चेक पडणार असतां, हा माणूस एक हजारबाराशें रक्कम द्यावयाला कांकू करतो म्हणजे काय, असें साहजिकच कॅशर म्हटल्यावांचून राहणार नाहीं. आतां थोडक्यासाठीं हें दोनतीन महिन्यांचें काम मोडावयाला नको, जें काय व्हावयाचें असेल तें होऊं द्या, असा विचार करून मीं कॅशरला पैसे द्यावयाचें ठरविलें.

मी म्हणालों, "मजजवळ चारशें रुपये रोख आहेत. मी आठशें रुपयांचा तुम्हांला चेक देतों. इथें पुण्यांत माझें खातें नाहीं."

कॅशरनें क्षणमात्र विचार केला व ग्लासांतलें पेय एकदम संपवून तो म्हणाला, "ठीक आहे. मग उशीर नको. चारशें रुपये रोख द्या. आणि चेक मात्र 'बेअरर' द्या."

त्याप्रमाणें मी त्याला बाराशें रुपये दिले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेदहा वाजतां पुन्हां 'पूना हॉटेल' मध्येंच भेटावयाचें ठरलें नि तो निघून गेला. त्या रात्रीं मी मोठ्या आनंदानें झोपी गेलों.

दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं मी 'पूना हॉटेल'मध्यें जातों आहे तोंच 'टाइम्स ऑफ इंडिया'चा घडी केलेला अंक हातांत घेऊन अन् दुःखी चेहरा करून कॅशर आला !

"बॅड न्यूज, अत्रेसाब-!" कॅशर म्हणाला.

माझ्या छातींत धस्सच झालें. मीं विचारलें, "काय भानगड आहे?" मला 'टाइम्स'मधला मजकूर दाखवीत कॅशर म्हणाला, "काल रात्रीं ध्रांगध्राचे महाराज वारले. ते आमच्या भावनगरच्या महाराजांचे जवळचे नातेवाईक. काल रात्रींच महाराजांना फोन आला. ते आतां मोटारनें ध्रांगध्राला जावयाला निघाले आहेत."

कॅशर म्हणत होता तें अक्षरशः बरोबर होतें. ध्रांगध्राचे महाराज खरोखरच वारले होते अन् ते भावनगरच्या महाराजांचे नातेवाईक असणेंहि पण शक्य होतें. कां असूं नयेत?

मी हताश होऊन म्हणालों, "आतां?"

"निराश होण्याचें काय कारण आहे?" कॅशर उत्तेजक स्वरांत म्हणाला, "आज काम होणार होतें तें महिना पंधरा दिवस आणखी पुढें गेलें एवढेंच. दुसरें काय?"

"बरें आहे, मग आज दुपारीं मी परत मुंबईला जातों." मी म्हणालों.

"ठीक आहे. महाराज ध्रांगध्राहून परत आले म्हणजे मी तुम्हांला फोन करून इथें बोलावतोंच. कदाचित् एकादे वेळीं मुंबईलाच आपलें काम होईल. म्हणजे इथें तुम्हांला यावयाची जरूरहि पडणार नाहीं." कॅशर म्हणाला.

जातां जातां तो माझ्या हातावर टाळी देत म्हणाला, "काल रात्रीं तुम्हांला सांगितल्याप्रमाणें अवघ्या आठशें रुपयांत मी महाराजांच्या चिटणिसाला भागवला. गप्प बसला तो. मुकाट्यानें त्यानें ते पैसे घेतले. माझ्यापुढें त्याची काय मात्रा चालते आहे !"

कॅशरच्या अक्कलहुशारीचें मनांतल्या मनांत कौतुक करीत मीं त्याचा निरोप घेतला.

मुंबईस जाऊन मी कॅशरच्या फोनची वाट बघूं लागलों. पंधरा दिवस झाले. महिना झाला. दोन महिने झाले. तीन महिने देखील होऊन गेले. पण कॅशरचा फोन कांहीं आला नाहीं.

भावनगरचे महाराज खरोखरच ध्रांगध्रांला गेले का नाहीं गेले, गेले असल्यास ते पुण्या-मुंबईला परत आले कीं नाहीं, हें कळावयाला मला मार्ग नव्हता. कॅशरनें आपल्या बाराशें रुपयांना सफाईनें टांग मारली हें उमगायला कांहीं मला फार दिवस लागले नाहींत. मनांतल्या मनांत मी असा चरफडलों आणि स्वतःला अशा कांहीं शिव्या दिल्या कीं कांहीं विचारूं नका.

पैसे गेल्याबद्दल मला वाईट वाटलें नाहीं. पण एका सभ्य भामट्यानें खुशाल आपल्या डोळ्यांत धूळ टाकून आपल्याला फसवून जावें ह्याचा मला राग आला. पैशाचा तोटा माणूस सहन करतो. पण आपल्या बुद्धीचा अपमान झालेला मात्र कधींहि तो सहन करूं शकत नाहीं.

एके दिवशीं पुण्याच्या लष्करांतून जात असतांना कांहीं गोऱ्या सोल्जरांबरोबर फिरत असतांना मीं कॅशरला पाहिलें. बरा सांपडला हा आतां, ह्याला सोडतां कामा नये, असा विचार करून दोन तास त्याच्या मागें मी फिरलों अन् शेवटीं तो कुठें राहतो, त्याचा पत्ता तर मीं काढला! 'नेपियर रोड'वरील एका बंगल्याच्या 'आऊट हाऊस'मध्यें तो राहात होता.

आठ दिवस त्याच्या पाळतीवर मी माझा एक नोकर ठेवला. त्यामुळें तो जातो केव्हां, येतो केव्हां, करतो काय ह्याचा मला पुरता तलास लागला. गोऱ्या सोल्जर लोकांना बाया पुरविणें हा त्याचा एक धंदा होता. तें जेव्हां मला कळलें तेव्हां सोल्जर लोकांशीं त्याची एवढी ओळख कां तें माझ्या ताबडतोब लक्षांत आलें.

पुण्याच्या ॲडिशनल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत फसवणुकीच्या आरोपावरून मीं त्याच्यावर फौजदारी फिर्याद दाखल केली आणि एके दिवशीं तो घरीं आहे असें पाहून त्याच्यावर वॉरंट नेऊन बजावलें. मला पाहतांच त्याचा चेहरा खर्रकन् उतरला. त्याला मी अशा रीतीनें पकडीन ह्याची मुळींच कल्पना नव्हती. जामीन देतां देतां त्याची अगदीं तिरपीट उडाली.

फिर्याद सुरू झाल्यावर त्याची पहिली शान पार नाहींशी झाली. पुष्कळ वेळां दाढी न करतां फाटके कपडे घालूनच तो कोर्टांत येई. चारशें रुपयांची कांहीं भजजवळ पावती नव्हती. पण आठशें रुपयांच्या चेकच्या पाठीवर मात्र त्याची सही होती. तो चेक बँकेंतून आणून मीं कोर्टापुढें दाखल केला.

कॅशरनें वकील दिला नि खटला लढवण्याचें अवसान आणलें. पण फीच्या पोटीं वकिलाला त्यानें दिलेला चेक जेव्हां पास न होतां परत आला, तेव्हां त्याचा वकीलच माझी बाजू घेऊन त्याला शिव्या देऊं लागला. आणि मला म्हणाला कीं, "कांहीं

नाहीं. तुम्ही या बदमाषाला तुरुंगांत पाठवा. माझी तुम्हांला मदत आहे. ”

एक दोन तारखा तशाच गेल्यानंतर, एके दिवशीं कोर्टाच्या बाहेर कॅशरनें माझ्या पायांवर अक्षरशः डोकें ठेवलें. आणि ‘ कसेंहि करून मला वांचवा ’ अशी डोळ्यांत पाणी आणून माझी तो करुणा भाकूं लागला.

मी कठोरपणें म्हणालों, “ दयेबियेचें कांहीं बोलूं नकोस. माझे घेतलेले बाराशें रुपये आधी परत कर. ”

होय नाहीं म्हणतां म्हणतां कॅशर मला सातशें रुपये परत द्यायला कबूल झाला. मींहि मनांत म्हटलें, कीं आतां फार ओढून धरण्यांत अर्थ नाहीं. प्रकरण सातशें रुपयांवर मिटवून टाकावें. दर वेळेला पुण्याला येण्या-जाण्याचा आणि वकिलाचा खर्च होतो, तो तरी वांचवावा.

कॅशरनें ऐटीनें आपल्या खिशांतून चेकबुक काढलें नि तो सातशें रुपयांचा चेक लिहूं लागला. त्याचें चेकबुक त्याच्या खिशांत कोंबीत मी त्याला हंसून म्हणालों, “ मिस्टर कॅशर, नो चेक-कॅश प्लीज ! ” माझी ही सावधगिरी पाहून कॅशरहि मनापासून हंसला आणि त्यानें खिशांतून शंभर रुपयांच्या सात नोटा काढून माझ्या हातीं ठेवल्या.

खटला मीं काढून घेतला. जसें कांहीं कांहींच झालें नाहीं, अशा भावनेनें कॅशर माझ्या गळ्यांत हात घालून मला म्हणाला, “ आतां एके ठिकाणीं बसून चहा घ्यायला काय हरकत आहे ? ”

त्याचा तो निर्लज्जपणा बघून मी थक्कच झालों. मी म्हणालों, “ ठीक आहे. चहा घ्यायला कांहीं हरकत नाहीं पण त्यांत कसल्या तरी औषधाची चिमूट तर तूं टाकणार नाहींस ना ? कारण तूं दिलेले सातशें रुपये अजून माझ्या खिशांत आहेत. ”

“ ए गुड जोक ! ” असें म्हणून कॅशर पोट धरधरून खो-खो हंसला आणि त्यानें माझा टोला हंसण्यावारी उडवून नेला.

चहा घेतां घेतां कॅशर म्हणाला, “ यापुढें मराठी लोकांच्या वाटेला मला जातां कामा नये. तुम्ही लोक बडे पक्के असतां. त्यापेक्षां आमचे ते मुंबईचे गुजराती अन् बोहरीच बरे. त्यांना फसविलें तर गप्प बसतात. अशा फिर्यादी तरी करीत नाहींत. ”

कॅशरकडून शहाणपणा शिकण्यासाठीं आपल्याला फक्त पांचशें रुपयेच फी पडली याचें सर्वांत मला जास्त समाधान वाटलें. अशा भयंकर माणसाच्या हातून आपण थोडक्यांत बचावलों याबद्दल परमेश्वराचे मी मनांतल्या मनांत आभार मानले आणि त्याचा निरोप घेतला. पुन्हां कांहीं मीं कॅशरला पाहिला नाहीं.

एका माणसाला लाख रुपये कर्ज देतों, असें सांगून त्यानें त्याच्याकडून दहा हजार रुपये रोख घेतले आणि त्याला लाख रुपयांचा चेक दिला. तो बँकेंत अर्थात् वटला नाहीं. ह्या फसवणुकीच्या आरोपावरून कॅशरला नुकतीच दीड वर्षाची शिक्षा झाली, असें कोणी तरी मला परवाच सांगत होतें.

# ३३

## ‘ वासे ’ मंडळाचें ‘ बांबू ’ संमेलन

सत्ताविसावें ‘ महाराष्ट्र साहित्य संमेलन ’ सांगली येथें प्रा श्री. म. माटे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्या वेळीं अठ्ठाविसाव्या संमेलनाचें आमंत्रण देण्यासाठीं धुळ्याच्या ‘ वाङ्मय सेवा मंडळा ’ (वा. से. मंडळा ) च्या वतीनें श्री. केंडे नांवाचे एक गृहस्थ गेले होतें. त्यांचें आमंत्रण तेथें स्वीकारण्यांत आलें. पण सांगली संमेलनाच्या ज्या गॅलरींत श्री. केंडे बसले होते, ती गॅलरी ऐनवेळीं कोसळून फार मोठा अपघात झाला. त्यांत बिचारे केंडे नेमके सांपडले आणि ते जन्माचे आंधळे झाले. धुळें संमेलनाचे अध्यक्ष मामा वरेरकर होणार होते, त्याचें तो अपशकून म्हणजे जणुं कांहीं प्रसादचिन्हच होतें.

तथापि, धुळें संमेलनाचे अध्यक्ष मामा वरेरकर होतील असें, त्या वेळीं कोणाच्या स्वप्नांतहि नव्हतें. धुळ्याचे सुप्रसिद्ध वयोवृद्ध समर्थवाङ्मयभक्त शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव आणि त्यांचे मित्र भास्कर वामन भट नि अनंत विश्वनाथ टिळक ह्यांनीं सात वर्षांपूर्वी धुळ्याला डिस्ट्रिक्ट जज्ज असलेले रसिक नि साहित्यप्रेमी विद्वान् पुरुषोत्तम मंगेश लाड आय. सी. एस.

ह्यांनाच धुळ्याच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं नियुक्त करावयाचें आधींपासून आपल्या मनाशीं ठरवून ठेवलें होतें. पु. मं. लाड ह्यांच्या विद्वत्तेसंबंधीं कांहीं प्रश्नच नव्हता. पण त्यांची प्रत्यक्ष अशी साहित्यसेवा फारच अल्प होती. ‘मधुपर्क’ नांवाच्या एका लहानशा काव्यसंग्रहाव्यतिरिक्त त्यांच्या नांवावर दुसरें कसलेंहि प्रकाशन तोंपर्यंत प्रसिद्ध झालेलें नव्हतें.

साहित्य परिषदेचा अध्यक्ष नेमण्याची नेहमींची पद्धति अशी असते कीं, परिषदेच्या नियामक मंडळाकडून पांच नांवांची शिफारस ज्या गांवीं तें संमेलन भरणार असेल तेथल्या स्वागत मंडळाकडे करण्यांत येते. मग स्वागत मंडळाकडून त्यामधून एका नांवाची निवड करण्यांत येते. पण या परिषदेच्या रूढ संकेताला नानासाहेब देव, भास्करराव भट आणि अनंतराव टिळक ह्यांनीं पहिल्यापासून हरताळ फांसला. त्यांनी आपल्या सह्यांनीं पु. मं. लाड ह्यांच्या नांवाचा प्रचार करणारें एक खाजगी पत्रक काढून तें परिषदेच्या नियामक मंडळाच्या प्रत्येक सभासदाला पाठवून दिलें. त्यांत त्यांनीं असें स्पष्टपणें म्हटलें होतें कीं, “ आमची व येथील बहुतेकांची इच्छा पु. मं. लाड हेच अध्यक्ष व्हावेत अशी आहे.”

मी स्वतः नियामक मंडळाचा सभासद असल्यानें मला तें पत्र वाचून अतिशय वाईट वाटलें. त्यावर मीं ‘नवयुग’मध्यें अशा तऱ्हेच्या प्रचाराला माझा विरोध असल्याचें स्पष्टपणें जाहीर केलें. मीं त्यांत म्हटलें कीं, “ अमुक अमुक माणसालाच संमेलनाचे अध्यक्ष केलें पाहिजे, अशा तऱ्हेचा प्रचार स्थानिक मंडळींनीं आधींपासून करणें आणि मतदारसंघावर प्रचाराचें वजन आणणें, ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे. परिषदेच्या नियामक मंडळानें पांच नांवें निवडून देण्याचा जो आतांपर्यंतचा संकेत ठरलेला आहे, त्याची ही शुद्ध थट्टा असून नियामक मंडळाच्या मूलभूत हक्कावर हें आक्रमण आहे. पुरुषोत्तम मंगेश लाड हे आमचे व्यक्तिगत मित्र असून त्यांच्या विद्वत्तेबद्दल आणि व्यासंगाबद्दल आम्हांला अतिशय आदर आहे. तथापि त्यांच्यापेक्षां महाराष्ट्रांत किती तरी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक आहेत.

“ गोविंदराव सरदेसाई, भास्करराव जाधव, मामा वरेरकर, प्रा. कृ. पां. कुळकर्णी, प्रा. न. र. फाटक, शंकरराव जावडेकर, साने गुरुजी, चिं. वि. जोशी, विठ्ठल सीताराम गुर्जर, नारायण हरि आपटे, ग. त्र्यं. माडखोलकर, पुरुषोत्तम यशवंत देशपांडे, माधवराव बागल असे महाराष्ट्रांत कमींतकमी तीस तरी साहित्यिक दाखवून देतां येतील कीं, ज्यांचा साहित्य संमेलनावर पु. मं. लाडांपेक्षां जास्त हक्क पोहोंचतो. म्हणून ह्या सर्व थोर थोर मंडळींचे हक्क बाजूला सारून किंवा डावलून लाड ह्यांना अध्यक्ष करणें हा मराठी साहित्याचा आणि मराठी साहित्यसंमेलनाचा उपमर्द आहे!” अशा तऱ्हेनें मीं माझ्या लेखांत धुळ्याच्या नानासाहेब देवांना अन् त्यांच्या सहकाऱ्यांना खणखणून बजावलें.

पण त्या लिखाणाचा त्यांच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. ऐन वेळीं लाडांनीं नकार दिला तर आपली फजिती व्हायला नको म्हणून नानासाहेब देवांनीं आधींच त्यांचा लेखी रुकार घेऊन ठेवला आहे, अशा तऱ्हेची एक आवई आधीं-पासून त्यांनीं धुळ्यांत पसरवून ठेवली होती. धुळ्यांत संमेलनाच्या स्वागत मंडळाची रीतसर सभा भरून त्यांत समर्थभक्त नानासाहेब देव यांची स्वागताध्यक्षपदीं निवड करण्यांत आली. अर्थात्, ती गोष्ट यथायोग्यच झाली. कारण नानासाहेबांपेक्षां अधिक योग्यतेचा वाङ्मयसंशोधक आणि अभ्यासक महाराष्ट्रांत दुसरा कोणीच नव्हता. वस्तुतः, महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होण्याची त्यांची पात्रता होती. म्हणून धुळें संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष झाले, हें त्या संमेलनाचें सर्वांत मोठं भूषण आणि आकर्षण होतें.

पण नानासाहेबांच्या अंगांत एक मोठा दोष होता. त्यांना पाचपोंच असा फारसा नव्हता आणि सभासंमेलनाच्या नियमांची तर त्यांना जवळजवळ मुळींच माहिती नव्हती. ज्या सभेंत ते स्वागताध्यक्ष निवडले गेले, त्या सभेंत आभाराचें भाषण करतांना ते वेंधळेपणानें बोलून गेले कीं, "आपल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आधींच ठरून गेलेले आहेत." तेव्हां कोणी तरी त्यांना दाबलें. तेव्हां त्यांनीं जीभ चावली. एकट्या लाडांच्याच नांवावर जोर देणें योग्य नाहीं, असें स्वागत मंडळाच्या मागून लक्षांत आलें. तेव्हां त्यांच्या जोडीला त्यांनीं प्रा. कृ. पां. कुळकर्णी आणि साने गुरुजी ह्यांचीं नांवें घालून दिलीं. अर्थात् तें त्यांचें ढोंग होतें. त्यांना निवडावयाचें होतें लाडांनाच. शिवाय, अशीं तीन नांवें सुचवण्याचा स्वागत मंडळाला मुळींच अधिकार नव्हता ती गोष्ट निराळीच.

ह्याच सुमारास 'अस्सल धुळेंकर' ह्या नांवानें धुळ्यांतील नानासाहेब देव, भास्करराव भट वगैरे मंडळींच्या नि वा. से. मंडळाचेच दोन उपद्व्यापी चिटणीस बाळू भट आणि भालू रेगे ह्यांच्या कारवायांवर झणझणीत अग्रलेख 'नवयुग' मधून प्रसिद्ध होऊं लागले. ह्या 'अस्सल धुळेंकरा'च्या मर्मभेदी आणि वर्मछेदी लेखांनीं धुळ्यांत एवढी धमाल उडवून दिली कीं, हा 'अस्सल धुळेंकर' नांवाचा आपल्या हालचालीवर बहिर्जी नाईकगिरी करणारा इसम कोण आहे, ह्याचा तपास वा. से. मंडळांतली मंडळी दांतओठ खाऊन करूं लागली.

धुळ्याच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान पु. मं. लाड ह्यांना कां देण्यांत येऊं नये, याबद्दल 'अस्सल धुळेंकरा'नें केलेला एक युक्तिवाद अत्यंत समर्पक होता त्याचें म्हणणें असें होतें कीं, "लाड हे आय. सी. एस्. आणि सरकारी नोकर असल्यानें त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या संमेलनांत साम्राज्यशाहीच्या निषेधाचे, स्वातंत्र्य-लढ्याला पाठिंबा देण्याचे किंवा राजकीय पुढाऱ्यांना बंधमुक्त करण्याचे, किंवा राजकीय महत्त्वाचें वाङ्मय आक्षिप्त ठरविल्याबद्दल सरकारचा निषेध करण्याचे

ठराव आणतां येणार नाहींत. त्यामुळें साहित्य संमेलनांतील विचारस्वातंत्र्याची एक प्रकारें मुस्कटदाबीच होईल. ''

'अस्सल धुळेंकरा'चा हा लेख प्रसिद्ध झाला नाहीं तोंच पुरुषोत्तम मंगेश लाड ह्यानीं 'नवयुग'ला नि धुळ्याच्या स्वागत मंडळाला पत्र पाठवून 'धुळें साहित्य संमेलना'चें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण पूर्वीहि कधीं कोणाला संमति दिली नव्हती आणि आतांहि त्या संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची आपली मुळींच तयारी नाहीं, असें स्पष्टपणें जाहीर करून टाकलें. नानासाहेब देवांवर ह्या पत्रानें जणूं कांहीं बॉम्बगोळाच पडला. त्यांनींहि 'नवयुग'ला पत्र पाठवून 'अस्सल धुळेंकरा'नें धुळें संमेलनाबाबत जें भयानक वातावरण निर्माण करून ठेवलेलें आहे आणि ज्यामुळें लाड ह्यांनीं अध्यक्षीय निवडणुकींतून आपलें नांव काढून घेतलेलें आहे, त्यामुळें आपला जीव अत्यंत कासावीस झाला आहे, म्हणून आपणहि आपल्या स्वागताध्यक्ष-पदाचा राजिनामा देतों आहें, असें जाहीर करून टाकलें.

लाडांच्या मागोमाग स्वागताध्यक्ष नानासाहेब देव ह्यांचा राजिनामा आल्यानें महाराष्ट्रांत खूपच धमाल उडाली आणि आतां या धुळ्याच्या संमेलनाचें पुढें होणार काय या विचारानें अनेक साहित्यिक चिंताक्रांत झाले. मीं मात्र 'नवयुगां'त नाना-साहेब देवांनींच धुळें साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष झालें पाहिजे असा आग्रह धरला.

मीं लिहिलें, "नानासाहेब नाहींत तर मग धुळ्यांत काय राहिलें ? धूळ अन् माती ? विद्वत्ता, व्यासंग आणि वाङ्मयसेवा ह्यांचा उदात्त संगम म्हणजेच नानासाहेब देव ! धुळें संमेलनाला महाराष्ट्राच्या दूरदूरच्या ठिकाणांवरून जे साहित्यसेवक जाणार ते केवळ ह्या तपस्वी साहित्य–महर्षींच्या दर्शनाला ! ते जर ह्या संमेलनांत दिसणार नाहींत तर मग धुळ्याला जाण्याचा निष्कारण भाडेंखर्च कोण करणार ? नाना-साहेब देव जर स्वागताध्यक्ष होणार नसतील तर स्वतः मी देखील धुळ्याच्या या साहित्यसंमेलनाला जाण्याच्या भानगडींत पडणार नाहीं. "

ह्याच सुमारास महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियामक मंडळानें धुळें साहित्य संमेलनासाठीं पुढील पांच नांवें सुचविलीं. तीं येणेंप्रमाणें : ( १ ) प्रा. कृ. पां. कुळकर्णी ( २ ) शं. द. जावडेकर ( ३ ) राजरत्न वा. वि. जोशी, ( ४ ) ग. त्र्यं. माडखोलकर ( ५ ) भा. वि. वरेरकर.

त्याच सुमारास धुळ्याच्या खोल गल्लींत स्वागत मंडळानें नियुक्त केलेल्या कार्यकारी मंडळाची सभा भरली. त्यांत नानासाहेब देवांनीं आपल्या स्वागताध्यक्षपदाचा राजिनामा परत घ्यावा असा ठराव पास केला. त्याच वेळीं 'अस्सल धुळेंकरा'चा निषेध करण्याचा ठराव वा. से. मंडळाचे एक चिटणीस बाळू भट ह्यानें आणला. तेव्हां 'अस्सल धुळेंकरा' नें लिहिलेलें कांहीं एक खोटें नाहीं; कारण 'We had

already pledged our ward to Lad' असे अनेकांनीं उद्गार काढले. तेव्हां 'अस्सल धुळेंकरा'च्या निषेधाचा ठराव बाळू भटानें नाक मुठींत धरून परत घेतला.

पण 'अस्सल धुळेंकरा'चा स्पष्टपणें निषेध केल्यावांचून मी माझ्या स्वागताध्यक्षपदाचा राजिनामा परत घेणार नाहीं, असा नानासाहेब देव आग्रहच धरून बसले. तेव्हां धुळ्यांतील सुप्रसिद्ध साहित्यप्रेमी रावसाहेब रणसिंग ह्यांच्या माडीवर स्वागत मंडळाची तांतडीची सभा भरून 'अस्सल धुळेंकरां'च्या निषेधाचा ठराव बाळू भटाचे वडील भास्कर वामन भट यांनींच मांडला. आणि तो बहुमतानें पास झाला. कांहींनीं पोल मागितला, पण पोल नाकारण्यांत आला. तेव्हां मग नानासाहेब देव प्रसन्न होऊन त्यांनीं आपलें स्वागताध्यक्षपदाचें त्यागपत्र परत घेतलें.

त्यानंतर साहित्य परिषदेच्या नियामक मंडळानें सुचविलेल्या पांच नांवांपैकीं एक नांव कोणी निवडावयाचें? धुळें येथील संमेलनाच्या स्वागत मंडळानें का धुळ्याला संमेलनाचें आमंत्रण ज्यांनीं दिलें त्या वा. से. मंडळानें? हा वाद वा. से. मंडळाचे चिटणीस बाळू-भाळू यांनीं सुरू केला.

बापुराव टिळकांच्या अध्यक्षतेखालीं तेवढ्यासाठीं वा. से. मंडळाची खास सभा भरली. त्या सभेला स्वागताध्यक्ष नानासाहेब देवहि हजर राहिले. तेव्हां त्यांच्या उपस्थितीला त्यांचे मस्तवाल चिरंजीव गणोबा देव ह्यांनीं हरकत घेतली.

त्यांनीं बापाला विचारलें, "तुम्ही 'वासे' मंडळाचे अध्यक्ष-सभासद नसतांना इथें कां आलांत? तेव्हां तुम्ही पहिल्या प्रथम इथून चालते व्हा, तर सभेच्या कामाला सुरुवात होईल!"

आपल्या चिरंजीवांनींच भरसभेंत आपली षष्ठी उडवलेली बघून नानासाहेब देवांचा चेहेरा पाण्यांत विरघळलेल्या ढेकळासारखा झाला.

तेव्हां अध्यक्ष टिळक म्हणाले, "त्यांना मीं इथें बोलावलें. त्यांनीं या सभेचें मार्गदर्शन करावें अशी माझी त्यांना विनंति आहे."

तथापि सभेच्या कामाला सुरुवात होतांच देवांचे चिरंजीव 'गणोबा विक्राळ' पुन्हां उभे राहून ओरडले, "शंकर श्रीकृष्ण देव या मंडळाचे सभासद नाहींत. त्यांनीं येथून चालते व्हावें!"

तेव्हां अध्यक्ष टिळक म्हणाले, "मग मी माझ्या अध्यक्षपदाचा राजिनामा देतों."

गणोबा : खुशाल द्या!

टिळक : मला हांकलण्याचा तुमचा डाव असेल तर मात्र मी मुळींच राजिनामा देणार नाहीं!

अध्यक्ष टिळकांची आणि गणोबांची ती बाचाबाची पाहून नानासाहेब देव मुकाट्यानें त्या सभेंतून उठले आणि मान खालीं घालून चालते झाले. त्यानंतर

अध्यक्षांची निवड वासे मंडळानेंच करावी असा ठराव पास झाला. हा सर्व वृत्तांत 'अस्सल धुळेंकरा'नें तिखटमीठ लावून अत्यंत चटकदार रीतीनें 'नवयुग'मध्यें रंगवला आणि त्यावर आपला मासलेवाईक अभिप्राय दिला, कीं ज्या "खाल्ल्या-घरचे वासे मोजणाऱ्या वासे मंडळानें संमेलनाचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार स्वतःकडे बळकावला, त्या मंडळाचे जे दोन चिटणीस बाळू आणि भालू आहेत त्यांची लायकी साहित्य संमेलनाच्या मंडपाचे वासे-बांबू उचलण्याइतपत देखील नाहीं."

तेव्हांपासून 'नवयुग'मध्यें धुळें संमेलनाचा उल्लेख 'वासे' मंडळाचें 'बांबू' संमेलन अशा नांवानें येऊं लागला. त्यानंतर नानासाहेब देवांनीं दुसरी कारवाई सुरू केली. पु. मं. लाड ह्यांच्या नांवानें त्यांनीं जसा पूर्वीं खाजगी प्रचार चालविला होता त्याप्रमाणें आतां धुळें संमेलनाचे अध्यक्ष मामा वरेरकर हे निवडून द्यावेत म्हणून त्यांनीं नियामक मंडळानें सुचवलेल्या वरेरकरांखेरीज चार साहित्यकांना खाजगी पत्रें लिहून त्यांनीं निवडणुकींतून आपलीं नांवें मागें घ्यावींत आणि वरेरकरांची बिन-विरोध निवड होऊं द्यावी, अशी गळ घालण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांपैकीं एका साहित्यिकाला त्यांनीं लिहिलेल्या एका इरसाल नि मासलेवाईक पत्राचा सारांश येथें देतों :—

"व्यक्तिशः आपण पांचहि जण सारख्याच योग्यतेचे वाटतात. पण त्यांपैकीं वरेरकर ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक आहेत असें सर्वतोमुखीं ऐकू येतें. त्यांच्याचसाठीं येथें बहुमत असल्याचें ऐकू येतें. तेव्हां आपण आपलीं नांवें मागें घेतलीं तर आपण पांचांनींच आपल्यांतला एक जण निवडून दिला, असा आपला लौकिक होईल. धुळ्यांतलीं सर्व भांडणें मिटतील आणि अध्यक्ष निवडण्याबाबत जो कोर्टांत दावा करण्यांत आला आहे, तो आपोआपच निकालांत निघेल."

आमचे मित्र प्रा. नानासाहेब कुळकर्णी हे पडले भोळे सांबाचे अवतार. ते देवांच्या कारवाईला बळी पडले नि त्यांनीं आपलं नांव ताबडतोब मागें घेतलें. माड-खोलकरांनीं तेंच केलें. जावडेकरांनीं देवांच्या पत्राला उत्तरच पाठवलें नाहीं. पण राजरत्न वा. वि. जोशी पडले खमके. त्यांनीं नानासाहेब देवांच्या त्या पत्राबद्दल त्यांची अशी कांहीं हुर्रेवडी उडवली कीं कुठून त्यांना आपण तें पत्र लिहिलें असें देवांना वाटलें.

तरी पण त्यांनीं धीर सोडला नाहीं. त्यांनीं वासे मंडळाचे एक चिटणीस भालू रेगे ह्यांचे वडील दादासाहेब रेगे ह्यांना वा. वि. जोशींकडे 'भद्रेश्वरी' करावयाला थेट बडोद्याला पाठवलें. हे दादासाहेब रेगे म्हणजे खरोखरच 'भद्रेश्वर दीक्षित'च होते. ते शिक्षण खात्यांत दिपोटी होते. प्राथमिक मराठी शाळा तपासण्यासाठीं ते कोणत्याहि गांवीं गेले कीं, तेथल्या शिक्षकांनीं त्यांना श्रीखंड–बासुंदी–लाडू–जिलेबी यांपैकीं एक तरी पक्वान्न दिलें, म्हणजे ते प्रसन्न होऊन त्या शाळेला उत्कृष्ट अभिप्राय

देत असत. म्हणून शिक्षण खात्यांत 'श्री–बा–ला–जी' ह्या नांवानें ते सर्वत्र प्रसिद्ध होते. हे श्री बालाजी बडोद्याला जाऊन त्यांनीं राजरत्न जोशींना आपलें नांव परत घेण्याची खूप मनधरणी केली. पण राजरत्नांनीं ह्या श्री बालाजीच्या तोंडांत नकाराची 'कावली' कोंबली. ती चघळत चघळत आणि हात हलवीत हलवीत ते परत धुळ्याला आले.

नियामक मंडळानें सुचविलेल्या साहित्यिकांवर अशा तऱ्हेचें वजन आणून त्यांना आपलीं नांवें मागें घेण्याचा अश्लाघ्य, अनधिकृत आणि बेजबाबदार प्रयत्न केल्या-बद्दल मीं नानासाहेब देवांचा 'नवयुग'मधून जाहीर निषेध केला. मीं लिहिलें कीं, "लाडांच्या बाबतींत देवांनीं प्रचार करून 'वासरूं' मारलें तर नानासाहेब कुळ-कर्णींना त्यागपत्र द्यावयाला लावून त्यांनीं 'गायच' ठार मारली आहे."

'लोकमान्य' पत्राचे संपादक पांडोबा गाडगीळ यांनीं तर नोव्हेंबर १९४४ च्या अंकांत नानासाहेब देवांची खूपच हजेरी घेतली. त्यांनीं लिहिलें, "नानासाहेब देव स्वागताध्यक्ष झाल्यापासून अध्यक्षीय निवडणुकीच्या बाबतींत त्यांनीं जी खाजगी घालमेल चालवलेली आहे, ती त्रिंबकजी डेंगळ्याला साजेल अशी आहे. देवांसारख्या वयोवृद्धाकडून आम्हीं असल्या पोरकट चाळ्यांची अपेक्षा केली नव्हती. ज्ञानक्षेत्रांत विद्वान् आणि सज्जन ठरलेला माणूस सार्वजनिक क्षेत्रांत किती नालायक ठरतो, हें देवांनीं स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें. हत्ती कितीहि बलवान् असला तरी तो सिंहगर्जना करूं शकत नाहीं हेंच खरें!"

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्या वेळचे अध्यक्ष प्रा. द. वा. पोतदार ह्यांनीं धुळ्याच्या मंडळींनीं साहित्य संमेलनाचा जो खेळखंडोबा चालवला होता त्याची अशी कांहीं सडकून हजिरी घेतली की वासे मंडळाचे सभासद धुळ्याच्या बोळांतून आणि गल्लींतून जीव मुठींत घेऊन पळत सुटले. तथापि संमेलनाच्या अध्यक्षाची निवड स्वागत मंडळानें आणि वासे मंडळानें मिळून करावी. असा परिषदेच्या कार्यकारी मंडळानें निर्णय दिल्यामुळें वासे मंडळाचा जीव भांड्यांत पडला. शेवटीं निवडणूक झाली. वरेरकरांना ४४२, राजरत्न जोशींना १५१ आणि जावडेकरांना १५ मतें पडून अखेर वरेरकर हे धुळें साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बहुमतानें निवडून आले.

वरेरकरांची निवड झाली म्हणून नानासाहेब देवांचें घोडें गंगेंत न्हालें खरें. पण वरेरकरांच्या वाङ्मयाचें, नाटकाचें किंवा कथा–कादंबऱ्यांचें एक पान सुद्धां नाना-साहेबांनीं वाचलें नव्हतें. उलट १९२५ सालीं नानासाहेबांनीं पुण्यांत दिलेल्या एका व्याख्यानांत असे उद्‌गार काढले होते कीं, "स्वराज्यांत मी जर अधिकारी झालों, तर नाटककारांना फांशी देईन! कांहीं नाटककारांचीं तर नांवें उच्चारण्यास मी तयार नाहीं. कारण मग मला सचैल स्नान करावें लागेल."

१९२५ सालीं वरेरकर हेच महाराष्ट्रांतले अग्रगण्य नाटककार होते. तेव्हां

नानासाहेब देवांचा मुख्य रोख त्यांच्यावरच असला पाहिजे हें उघड आहे. म्हणून १९२५ सालीं ज्यांच्या नांवानें नानासाहेब देव सचैल आंघोळ करावयाला तयार होते नि स्वराज्यांत ज्यांना फांशी देण्याची त्यांची तयारी होती, त्याच मामा वरेरकरांचें १९४४ सालीं साष्टांग प्रणिपातपूर्वक स्वागत करण्याची नानासाहेब देवांवर पाळी यावी हा काळानें त्यांच्यावर घेतलेला केवढा भयानक सूड होता बरें ?

धुळ्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मामा झाले म्हणून त्यांच्या अभिनंदनाची सभा ठाण्यांत भरली. त्या सभेंत 'महाराष्ट्र साहित्य परिषदेंतला गोंधळ' ह्या विषयावर मामांनीं एक अत्यंत वाह्यात भाषण करून 'साहित्य परिषदेला आग लावा !' असा 'तेजस्वी' संदेश दिला. त्यानंतर 'अस्सल धुळेंकर' यांनीं 'नवयुग' मध्यें एक ज्वलज्जहाल लेख लिहून बेकायदेशीरपणें निवडून आलेल्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखालीं भरणारें साहित्यसंमेलन हें २८ वें कायदेशीर संमेलन नसून नानासाहेब देवांसारख्या ढोंगी बगळ्यांनीं, बाळू-भाळूसारख्या कारस्थानी कोल्ह्यांनीं आणि 'श्री-बा-ला-जी-' उर्फ दादासाहेब रेग्यांसारख्या भद्रेश्वरी खोकडांनीं भरविलेलें एक 'बांबू' संमेलन आहे, म्हणून अखिल महाराष्ट्रानें त्यावर बहिष्कार पुकारावा, असा अखिल महाराष्ट्राला आदेश दिला.

२४ डिसेंबर १९४४ रोजीं मामांच्या अध्यक्षतेखालीं धुळ्याचें 'बांबू' संमेलन भरलें. मामांचें भाषण अत्यंत रटाळ झालें. मुंबईच्या परेळ भागांतील गिरणी-कामगारांसमोर एखाद्या मजूर पुढाऱ्यानें जसा आक्रोश करावा तशा छापाचें तें मामांचें भाषण होतें.

मामा म्हणाले, "साहित्य क्षेत्रांतला मी एक नांगऱ्या शिपाई आहें !"

तेव्हां एक श्रोता ओरडला, "मग मुंबईहून धुळ्याला तुम्ही सेकंड क्लासांतून कां आलांत ?" तेव्हां सभागृहांत प्रचंड हंशा पिकला.

या संमेलनांत 'नवयुग'च्या नि 'आचार्य अत्रे' ह्यांच्या निषेधाचा ठराव येणें अपरिहार्यच होतें. तो ठराव सौ. इंदिरा बापट नांवाच्या एका गोगलगायीला पुढें करून तिच्या नथेंतून 'बाळू-भाळू'नीं आम्हांला तीर मारण्याचा प्रयत्न केला. मूळ निषेधाच्या ठरावांत 'नवयुग'चें नांव नव्हतें. सर्वसाधारण वृत्तपत्रांच्या बाष्कळ वृत्तीच्या निषेधाच्या धोरणाचा तो ठराव होता. पण 'बाळू-भाळू'नीं आमचें नांव त्यांत घुसडलें.

ह्या ठरावाला विरोध करतांना नांदेडकर नांवाचे एक गृहस्थ म्हणाले, "मग मामा वरेरकरांनीं आपल्या नाटकांतून अश्लील विनोद केला आहे, त्याचा या ठरावांत निषेध करा !"

पण सर्वांत कडाडून विरोध ह्या ठरावाला कोणी केला असेल तर तो आप्पा पेंडसे ह्यांनीं. ते म्हणाले, "नदीला पूर आला म्हणजे गढूळ पाणी येणारच. पण

'नवयुग'नें राष्ट्रीयत्वास पोषक असें आजपर्यंत जें तेजस्वी वाङ्मय महाराष्ट्राला दिलें आहे, तें तुम्हांला विसरतां येणार नाहीं!"

निषेधाचा ठराव नापास होणार होता. पण मुंबई साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव ह्यांनीं गैरलागू आणि अवसानघातकी भाषण करून सभेचें वातावरण बिघडवलें. मग सभागृहांत जो गोंधळ माजला त्या गोंधळांत निषेधाचा ठराव नुसत्या हाताच्या कवायतीनें पास झाला, असें मामा वरेरकरांनीं दडपून जाहीर करून टाकलें. तेव्हां वासे मंडळाचे 'पितर' एकदांचे स्वर्गांत जाऊन पडले.

'साहित्योपजीवि लेखकांना आत्महत्या करण्याची पाळी आज आली आहे!' असे उद्गार मामा वरेरकरांनीं आपल्या भाषणांत काढले. म्हणून त्यांनीं तरी निदान आत्महत्या करूं नये म्हणून त्यांना रु. १००१ ची थैली देण्याची जाहीर घोषणा नानासाहेब देवांनीं केली. तेव्हां लोकांनीं व्यासपीठावर पैसे फेकले. तेव्हां 'मामांनीं दौलतजादा' केला अशी सभागृहांत एकच आरोळी उठली. श्रोत्यांची हंसतां हंसतां पुरेवाट झाली.

'नवयुग'चा नि माझा निषेध केल्याबद्दल धुळें साहित्य संमेलनाचा महाराष्ट्रांतल्या अनेक वृत्तपत्रांनीं आणि साहित्यसंस्थांनीं निषेध केला.

आमच्या दत्तू बांदेकरांनीं तर या संमेलनावर फक्कडशी 'आरती' लिहिली.

**बांबू अठ्ठावीस, त्यावरती उभा,**
**वामांगी 'भद्रेश्वर' दिसे दिव्य शोभा!**
**लटपट करूनी झाले मामा अध्यक्ष**
**परंतु त्यांचें होतें थैलीवर लक्ष!**
**'नवयुग'चा निषेध बाईनें केला**
**सूर्याचा निषेध कोंबडीनें केला!**
**जयदेव, जयदेव, जय भार्गवरामा,**
**यावे धांवुनी वेगें, बांबूच्या कामा!**

अशा रीतीनें हें धुळ्याच्या 'वासे' मंडळानें भरवलेलें 'बांबू' संमेलन 'नवयुग'नें त्या वर्षी कमालीचें गाजविलें.

आणि आतांपर्यंत जें रहस्य मीं गुप्त ठेवलें होतें, तें आज जाहीर करतों कीं, धुळ्यांत प्रत्यक्ष न जातां मुंबईत बसल्या बसल्या धुळ्याच्या गल्लीबोळांतल्या बाळू-भाळूच्या नि वासे मंडळाच्या कारवाया इत्थंभूत नि यथांबुज रंगवून धुळ्यांत त्या वेळीं धमाल करून सोडणारा 'अस्सल धुळेंकर' हा दुसरातिसरा कोणी नसून तो मी स्वतःच होतों!

## ३४

# नाना फडनवीस जमीनदोस्त

१९४४ च्या पूर्वार्धांत मुंबईच्या गोदीमध्यें झालेल्या दोन महास्फोटांमुळें मुंबई शहराला जेवढा धक्का बसला नसेल त्याहिपेक्षां जबरदस्त धक्का अखिल महाराष्ट्राला देणारा एक महान् स्फोटक ग्रंथ त्या वर्षाच्या उत्तरार्धांत मराठी साहित्यामध्यें अवतीर्ण झाला. त्या ग्रंथाचें नांव 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या ?' असें होतें. आणि तो बेळगांव येथील श्री. पांडुरंग गोपाळ रानडे ह्या नांवाच्या तोंपर्यंत सर्वसामान्यपणें महाराष्ट्राला अपरिचित असलेल्या एका लेखकानें लिहिलेला होता.

प्रसिद्धीची फारशी हांव नसल्यानें तोपर्यंत लिहिण्याच्या विशेष भानगडींत न पडतां रानडे ह्यांनीं जवळ जवळ पंचवीस तीस वर्षें मराठी इतिहासाचें प्रदीर्घ संशोधन अन् मंथन करून आणि त्यांतून दोन खंडांचें आणि तेराशें पानांचें देदीप्यमान ग्रंथरत्न निर्माण करून महाराष्ट्रांतल्या मोठमोठ्या विद्वानांना आणि इतिहाससंशोधकांना न मिळणारी अशी महान कीर्ति एका दिवसांत मिळवून ठेवली होती.

ह्या ग्रंथाला त्यांनीं तब्बल दोनशें पानांची प्रस्तावना जोडलेली होती. इतिहासांत

म्हणा किंवा साहित्यांत म्हणा, रूढ कल्पनांना आणि प्रस्थापित समजुतींना हादरा देऊन विचारांची आमूलाग्र उलथापालथ करणारे असे क्रांतिकारक ग्रंथ क्वचित् प्रसिद्ध होत असतात. गुणांनीं आणि आकारानें अद्वितीय असलेल्या या ग्रंथाचें दोन्ही बाहू उभारून महाराष्ट्रांत जर कोणी पहिल्यानें स्वागत केलें असेल तर तें मीं! 'इतिहास-भास्कर' अशी रानडे यांना मीं स्वयंस्फूर्तीनें पदवी बहाल केली. एवढेंच नव्हे तर रानडे ह्यांच्यावर महाराष्ट्रांतील निरनिराळ्या इतिहाससंशोधकांच्या टीकांचा जो भडिमार झाला, त्याला धैर्यानें आणि पुराव्यानिशी तोंड देण्याचें काम त्यानंतर सतत एक वर्षभर मीं माझ्या 'नवयुगां'तूनच केलें. म्हणून माझ्या जीवनचरित्रांतील ह्या प्रकरणाची माहिती आजच्या वाचकांना करून देणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

ग्रंथाच्या मथळ्यावरून सर्वसामान्य वाचकांची अशी समजूत होईल कीं, या तेराशें पानांच्या ग्रंथांत लेखकानें फक्त नारायणराव पेशवे ह्यांच्या मृत्यूचाच विचार केलेला असावा. खरें पहातां 'खून का आत्महत्या' हें त्या ग्रंथाचें नांव पुष्कळशी दिशाभूल करणारें होतें. नारायणराव पेशव्यांनीं आत्महत्या केली कीं त्यांचा खून करण्यांत आला, याची ऐतिहासिक पुराव्यानिशी चिकित्सा करतांना ग्रंथकारानें तत्पूर्वीच्या पेशव्यांच्या कारकीर्दीच्या साठ वर्षांची विस्तीर्ण पार्श्वभूमि अतिशय वारकाईनें आणि कौशल्यानें चितारलेली होती. थोरल्या बाजीरावांच्या मृत्यूपासून तों शेवटचे बाजीराव अधिकारारूढ होईपर्यंत जवळ जवळ तीन पिढ्यांचा अत्यंत मार्मिक आणि मनोवेधक इतिहास रानडे ह्यांनीं आपल्या सुबोध आणि प्रासादिक भाषेंत एकाद्या कादंबरीप्रमाणें मनोरंजक आणि रसाळ शैलीनें सांगितला होता.

त्यामुळें कोणाहि वाचकानें एकदां हा ग्रंथ वाचावयास हातांत घेतला, कीं त्या ग्रंथाचीं तेराशें पानें वाचून संपेपर्यंत तो आपली तहानभूक अक्षरशः विसरून गेल्याखेरीज राहात नसे. एवढें आकर्षण आणि मनोरंजकता या ऐतिहासिक ग्रंथांत असूनहि, त्यामधील बहुतेक सर्व विधानांना ऐतिहासिक ग्रंथांचा आणि कागदपत्रांचा भरभक्कम आधार दिलेला होता. ग्रंथकाराची विचारसरणी अत्यंत तर्कशुद्ध आणि सुस्पष्ट अशी असून ऐतिहासिक पुराव्याची छाननी करण्याची त्याची पद्धति अपूर्व होती. त्यामुळें सबंध ग्रंथ वाचीत असतांना ग्रंथकाराच्या विधानाबद्दल अविश्वास किंवा संशय वाटेल असा भाग फारच क्वचित् आढळून येई.

किंबहुना ग्रंथकारानें आरंभापासून केलेल्या एकाहिपेक्षां एकेक रहस्यपूर्ण गोष्टींच्या परिस्फोटानें वाचकांच्या वृत्ति एकसारख्या स्तिमित होत जात. आणि शेवटीं शेवटीं त्या इतक्या प्रक्षुब्ध होत, कीं पुस्तक संपवून खालीं ठेवतांना वाचकाचें मस्तक कांहीं काळ तरी सुन्न आणि बधिर झाल्याखेरीज राहत नसे. वाचकाच्या भावना गद्‌गदून हलवणारा आणि त्याच्या पूर्वग्रहाच्या बैठकीचा चौथरा मुळापासून उखडून टाकणारा मराठी भाषेंतला तो पहिलाच ऐतिहासिक ग्रंथ आहे, या भावनेनें मीं तो

अक्षरशः डोक्यावर उचलून धरला.

रानड्यांच्या या ग्रंथाची एवढी भरमसाट स्तुति करून वाचकांच्या डोळ्यांत मी धूळ टाकीत आहें असा आरोप माझ्यावर करावयाला कांहीं टीकाकारांनीं कमी केलें नाहीं. पण खरें सांगायचें म्हणजे रानडे या गृहस्थाशीं तावत्काळपर्यंत माझी ओळखहि नव्हती. त्यांची नि माझी ओझरती भेटहि तोंपर्यंत कधीं झाली नव्हती. किंवा त्यांचें नांवहि तें पुस्तक माझ्या हातीं पडेपर्यंत मीं कधीं ऐकलें नव्हतें. शिवाय रानड्यांच्या पुस्तकाचीं विनाकारण स्तुतिस्तोत्रें गाऊन मला कसलाहि आर्थिक वा व्यावहारिक फायदा होण्याचा संभव नव्हता. कोणतीहि गोष्ट मला मनापासून आवडली कीं तिची तोंड फाटेपर्यंत प्रशंसा करावयाची हा माझा जन्मजात स्वभाव जगजाहीरच आहे.

इतिहास हा कांहीं माझा विषय नव्हता. तथापि रानड्यांच्या त्या ग्रंथानें मराठ्यांच्या किंवा पेशव्यांच्या इतिहासावर कांहीं तरी नवीन प्रकाश टाकला असल्या-मुळें मराठी इतिहासाची परिचित दुनिया उलटीची पालटी झाल्याखेरीज राहणार नाहीं, हा जो मीं सरळसरळ निष्कर्ष काढला तो काढण्यासाठीं मला इतिहासाचा तज्ज्ञच असणें आवश्यक होतें, असें कांहीं मला वाटत नाहीं. तो ग्रंथ वाचून माझी अशी खात्री झाली कीं, पेशवाईतील साठसत्तर वर्षांचा इतिहास फिरून नव्यानें लिहून काढावा लागेल. आणि पूर्वीच्या शालेय इतिहासाच्या अभ्यासानें तत्कालीन ऐतिहासिक विभूतींविषयीं जीं कांहीं आपण आपलीं मतें बनवून ठेवलीं असतील तीं आतां आपल्याला विसरून जावीं लागतील आणि रानड्यांनीं बदललेला हा इतिहास पुन्हां आपल्याला नव्यानें शिकावा लागेल. लंडन शहरावर दुसऱ्या महायुद्धांत जर्मनांनीं जेवढें 'बॉम्बिंग' केलें नसेल, तेवढें पेशव्यांच्या इतिहासावर रानड्यांनीं केलेलें होतें.

नारायणराव पेशवे यांचा मृत्यु कसा झाला ह्याचेंच केवळ विवेचन करणारा हा ग्रंथ नसून, पेशवाईच्या अधःपाताला आणि मराठी साम्राज्याच्या किंबहुना शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या स्वराज्याचें वाटोळें करून तें परकीयांच्या ताब्यांत देण्याला कोणती एक व्यक्ति कारणीभूत झाली होती, तिच्यावर आजपर्यंत इतिहास-कारांनीं घातलेलें गुणप्रशंसेचें अवगुंठन रानड्यांनीं मोठ्या धैर्यानें फाडून काढून तिचें सत्य स्वरूप पहिल्याप्रथम प्रकाशांत आणलें होतें.

तुम्हांला काय वाटतें कीं राघोबादादानें राज्यलोभाच्या महत्त्वाकांक्षेनें नारायण-रावांचा वध करून पेशवाईमध्यें दुहीचीं बीजें रोवलीं ? तुम्हांला काय वाटतें कीं आनंदीबाईनें 'ध'चा 'मा' करून लेडी मॅक्बेथप्रमाणें आपल्या नवऱ्याच्या महत्त्वाकांक्षेच्या आगींत तेल ओतलें ? तुम्हांला काय वाटतें कीं शेवटच्या बाजीरावानें पेशवाईचें दिवाळें फुंकून ती इंग्रजांच्या वशांत घालण्याची निमकहरामी केली ?

## ना ना फ ड न वी स ज मी न दो स्त

तुम्हांला काय वाटतें कीं साऱ्या पेशवाईमध्यें किंवा मराठी राजवटीमध्यें नाना फडनवीसाएवढा महान् मुत्सद्दी नि कर्तबगार पुरुष दुसरा कोणी होऊन गेला नाहीं ! नाना फडनवीस नसते तर मराठी साम्राज्याच्या स्वकीय आणि परकीय शत्रूंनीं तें राज्य १८१८च्या आधींच केव्हांच फस्त करून टाकलें असतें अशीच तुमची आमची समजूत आहे ना ! मग आजपर्यंत तुम्हीं आम्हीं आपल्या मनाशीं बांधून ठेवलेल्या या साऱ्या समजुती आणि कल्पना रानड्यांचा हा ग्रंथ वाचल्यानंतर 'समुद्रास्तृप्यन्तु' कराव्या लागतील.

मराठी साम्राज्याच्या गळ्याला नख लावणारी, पेशवाईच्या गादीवर घासलेट ओतून तिची राखरांगोळी करणारी, अशी जर कोणी एक राक्षसी विभूति पेशव्यांच्या राजवटींत होऊन गेली असेल तर ती म्हणजे नाना फडनवीस. हाच–हाच क्रांतिकारक रहस्यस्फोट रानड्यांनीं आपल्या ह्या तेराशें पानी ग्रंथमालेंत केला होता.

नारायणराव पेशवे गादीवर बसल्यापासून म्हणजे सन १७७२ पासून तों सन १८०० पर्यंतचा अठ्ठावीस वर्षांचा पेशवाईचा इतिहास नाना फडनवीसाच्या ज्या काळ्याकुट्ट कारस्थानांनीं आणि दुष्कृत्यांनीं झांकळून गेलेला होता, त्याचें खडान् खडा वर्णन रानड्यांनीं आपल्या ग्रंथामध्यें केलेलें होतें. तो वाचल्यानंतर शेक्सपीअरनें निर्माण केलेल्या खलनायकांचा मुकुटमणि जो आयागो त्याला शंभरनें गुणून, त्यामध्यें पांचपन्नास आयागो आणखी मिळवल्यानंतर जी बेरीज होईल त्या बेरजेचें थोडेंफार साम्य नाना फडनवीसाच्या तोंडवळ्याशीं जुळल्यासारखें वाटेल असाच पुष्कळांचा अभिप्राय पडेल.

नाना फडनवीसांच्या दुष्कृत्यांची जी यादी रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत दिलेली आहे, ती पाहिली म्हणजे आयुष्यांतला कोणताहि मानवी भयंकर गुन्हा नाना फडनवीसांनीं करावयाचा सोडला नाहीं हें दिसून येतें. नारायणराव पेशव्यांचा वध जरी प्रत्यक्ष नाना फडनवीसांनीं केला नसला, तरी त्यांच्या वधाचें कारस्थान राघोबादादा किंवा आनंदीबाई ह्यांनीं केलें नसून तें नाना फडनवीसांनीं अत्यंत धूर्तपणें रचलें. आणि त्या आरोपाच्या फांसांत त्या दोघांच्या माना कल्पान्तापर्यंत त्यांनीं अडकवून ठेवल्या.

सवाई माधवरावांची विधवा आई गंगाबाई हिच्याशीं अनैतिक संबंध ठेवून आणि शेवटीं गर्भपाताचें औषध देऊन तिची परलोकाला कायमची रवानगी नाना फडनवीसांनींच केली. आणि मानी सवाई माधवरावाला आत्महत्या करावयाला अखेर त्यांनींच भाग पाडलें.

पानपतच्या लढाईंत सदाशिवराव भाऊ मारले गेले ही गोष्ट खोटी असून, ते दक्षिणेंत जिवंत परत आले असतां त्यांना तोतया ठरवून नाना फडनवीसांनीं त्यांचे अनन्वित हाल केले आणि शेवटीं बंदिवासांत त्यांना तडफडून तडफडून मरावयाला

लावलें. घाशीराम कोतवालाची मुलगी नाना फडनवीसांनीं रखेली म्हणून जवळ बाळगली आणि त्याच घाशीरामाच्या मदतीनें परस्त्री आणि परद्रव्य ह्यांचा त्यांनीं पुणें शहरांत राजरोसपणें अपहार केला.

सखारामबापू, मोरोबा दादा, सखाराम हरि आणि परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांच्यासारख्या तेजस्वी मुत्सद्द्यांना आणि वीरांना अमानुषपणें छळून छळून नानांनीं निकालांत काढले. एवंच, पेशव्यांच्या गादीचें रक्षण परकीय शत्रूपासून तर नानांनीं केलें नाहींच नाहीं. पण आपल्या कपटी, जुलमी आणि दुराचारी वर्तनानें नानांनीं पेशव्यांच्या राज्याचें नि मराठेशाहीचें सपशेल वाटोळें केलें हा निष्कर्ष रानड्यांनीं आपल्या तेराशें पानी ग्रंथामधून काढला होता.

१० डिसेंबर १९४४ च्या ' नवयुग 'च्या अंकांत ' नाना फडनवीस जमीनदोस्त ' या मथळ्याचा जो अग्रलेख मीं ' इतिहासभास्कर ' रानडे ह्यांच्या ह्या ग्रंथावर लिहिला त्यामुळें महाराष्ट्रांतल्या सर्वसामान्य वाचकांमध्यें तर खळबळ उडालीच, पण कित्येक इतिहाससंशोधकांनीं आणि नाना फडनवीसाबद्दल आदर बाळगणाऱ्या कांहीं मंडळींनीं कांहीं ठिकाणीं सभा भरवून इतिहासभास्कर रानडे यांच्या ग्रंथाचा नि त्यांची प्रशंसा करणाऱ्या ' नवयुग 'कर्त्यांचा तीव्र निषेध केला.

मग सगळ्यांत गंमत ही कीं, आपला ग्रंथ पुण्यांतील सनातनमताभिमानी जे आहिताग्नि राजवाडे ह्यांना स्वहस्तें देण्यासाठीं जेव्हां स्वतः रानडे त्यांच्या अग्निहोत्र मंदिरांत गेले, तेव्हां आहिताग्नींनीं त्यांचें स्वागत केलें नि त्यांच्या संशोधनाचा सारांश मोठ्या उत्सुकतेनें ऐकून घेतला अन् त्यांना ते म्हणाले, " गड्या, तुझी ही विलक्षण संशोधन कथा ऐकली. आतां एक गोष्ट तुला मनमोकळेपणानें सांगतों. तूं जर का ब्राह्मण नसतास—फार काय नाना फडनवीसाच्या पोटशाखेचा नसतास, तर थोडा वेळ का होईना तुझ्या हेतूविषयीं मला शंका आली असती. पण तूं एक कोंकणस्थ आहेस ही एक नामी गोष्ट झाली. आतां तुझें संशोधन निर्हेतुक आहे, त्या अर्थी तुझीं तेराशें पानें उलटण्यांत वेळ घालवण्यांत हरकत नाहीं. आतां मी हा ग्रंथ जरूर वाचीन. आणि एक सांगतों, नानाच काय पण पेशवे वाईट ठरले, तरी त्याचें सुखदुःख मानणारा मी नाहीं. पेशव्यांच्या जागीं शिंद्यांनीं अथवा नागपूरकर भोसल्यांनीं शनिवारवाड्यांतून राज्य केलें असतें, तरी तें वाईट मानणाऱ्यांपैकीं मी नाहीं. संशोधकानें सत्याखेरीज अन्य गोष्टींची पर्वा करण्याचें कारण नाहीं. "

महाराष्ट्रांतले सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक आणि आमचे परममित्र प्रा. दत्तो वामन पोतदार ह्यांची आम्हीं ' नवयुग 'मध्यें रानड्यांच्या ग्रंथावरील एक मुलाखत प्रसिद्ध केली. प्रा. पोतदार ह्यांना अर्थातच रानड्यांचें संशोधन सुतराम् मान्य नव्हतें. पण त्यांची भूमिका इतर इतिहाससंशोधकांप्रमाणें पूर्वग्रहदूषित नव्हती. ती अत्यंत प्रामाणिकपणाची होती. म्हणून तिचा सारांश येथें देणें मला आवश्यक वाटतें.

ते म्हणाले, "हा ग्रंथ मला ऐतिहासिक वाटत नाहीं. त्यांत सनांच्या अनेक चुका आहेत. बखरींच्या आधारानें तो लिहिलेला आहे. गेल्या चाळीस वर्षांत इतिहासाचीं अनेक मूळ साधनें उपलब्ध झालीं असतांना जो 'त्याज्य ठरवलेला पुरावा' (Discarded evidence) म्हणून संशोधकांनीं बाजूस सारला, त्याच अविश्वसनीय साधनांवर ग्रंथ लिहिणें अगदीं चुकीचें आहे. बखरीची कादंबरी केल्यानें इतिहास तयार होत नाहीं.

"नानाच्या विषयलंपटतेबद्दल सुद्धां अगदीं चालू काळचें उदाहरण देतां येईल. महात्मा गांधींनीं आपल्या 'सत्याचे प्रयोग' ह्या आत्मचरित्रांत आपल्या तारुण्यांतील प्रबळ कामविकाराबद्दल जें वाटलें तें लिहून ठेवलें आहे. त्यानंतर ते नैष्ठिक ब्रह्मचर्यानें आजपर्यंत राहिले आहेत. त्यांच्या नीतिमत्तेबद्दल शंका नाहीं. पण उद्यांच्या इतिहासकारानें 'विविधवृत्ता'च्या फायली व 'सत्याचे प्रयोग' जवळ घेऊन जर 'रानडेपद्धती'नें गांधींचा 'नाना' केला तर त्याचे कोण हात धरील? नाना फडनवीसाचे त्याच्या आत्मचरित्रांतील उद्गार पश्चात्तापाचे आहेत. त्याला एकदम स्त्रीजातीचा वैरी रंगविण्यांत काय हांशील आहे? नानाच्या वर्तनांत तसा कांहीं भाग होता हें खरें. पण जें काय कठोर पुराव्यानें, शास्त्रीय पद्धतीनें आणि अस्सल कागदपत्रांच्या निकषानें खरें ठरेल, तेवढेंच मला मान्य होईल!"

सुप्रसिद्ध रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई ह्यांनींहि आपल्या रियासतींत नाना फडणवीसांना अनेक दूषणें दिलेलीं होतीं. तीं एका 'इतिहासप्रभू'कडून एकत्र करवून घेऊन मीं 'नवयुग'च्या पुढील अंकांत छापलीं. तीं येणेप्रमाणें:

(१) तत्कालिन प्रघातानुरूप नानांच्या रक्षाहि होत्या–पान ९८

(२) द्रव्यलोभ व अधिकारमोह शेवटच्या क्षणापर्यंत न सुटल्यामुळें नानांच्या कर्तबगारीस फारच कमीपणा आला.–पान १०४.

(३) मराठा मंडळाची विस्कटत चाललेली जूट दृढ करण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं त्यानें उत्तरोत्तर राज्याची सत्ता स्वतःचेच हातीं ठेवण्याचा उपक्रम केल्यामुळें पुष्कळांचीं मनें दुखावलीं जाऊन त्याचा परिणाम मराठी राज्यास बाधक झाला. अनेकांकडून राष्ट्रसेवा घेण्याचें थोर पुरुषाचें कसब नानांना विशेष साधलेलें दिसत नाहीं. –पान ११८.

(४) नाना मराठी राजकारणांत पुष्कळ दिवस अनुभवलेला मनुष्य असूनहि त्यास सखारामबापूंच्या अष्टपैलू व दमखाऊ राजकारणाची सर येत नाहीं. –पान ११९.

(५) राज्याची मालकी पेशव्याच्या तर्फेनें आपल्याकडे, आपण ठरवूं तें सर्वांनीं मान्य करावें, अशा प्रकारची नानाच्या कारभाराची भावना होती. ती अर्थात् पुष्कळांना पटली नाहीं नानास तेवढी राज्याची काळजी, इतर सर्व स्वार्थी

व मतलबी अशी जी नानाची समजूत पदोपदीं व्यक्त होई, तीच लोकांस दुःसह होई. मुख्यतः सवाई माधवरावांचे मृत्यूनंतर छत्रपतीस बाहेर आणून राज्याची नवीन घडी बसवण्याची उत्कृष्ट संधि होती, ती नानानें फुकट घालवली.–पान १२०–२१

( ६ ) जुन्या वळणाचीं भिक्षुकी माणसें नानांची स्तुति ओतप्रोत करीत. परंतु खरे पराक्रमी पुरुष त्याची हेटाळणी करीत. नानांच्या सहाय्यकांत बहुतेक ब्राह्मणच आढळतात. —पान १२२.

( ७ ) शेवटच्या बाजीरावाच्या नांवानें साताऱ्याच्या छत्रपतींकडून पेशवाईचीं वस्त्रें आणण्याच्या गडबडींत सरकारी खजिन्यामधून निदान वीस कोट रुपयांची रक्कम नानांनीं लांबविली...नानांना सर्वत्र भीतीचा संचार वाटे. म्हणून पुढें पुढें त्यानें अरबांची पलटण तयार केली. राजकीय व्यवहारांत नाना लांच घेत असे. इतरत्रहि मनस्वी वर्तन करून अनाचार करी. याबद्दल दुमत होईलसें वाटत नाहीं. —पान १२८-२९.

( ८ ) त्यानें लायक माणसें जवळ ठेवलीं नाहींत. पुष्कळांशी दीर्घद्वेष केला. स्वतःच्या हातीं सर्व सत्ता ठेवली. स्वतःच्या फायद्याकरितां दुसऱ्यांचा कितीहि तोटा झाला, तरी त्यास क्षीति नसे. खरे व भानू यांनीं नानांस अवास्तव महत्त्व दिलें —पान १२९.

( ९ ) गंध-रांगोळ्यांची, द्रोण-पत्रावळींची, चटण्याकोशिंबिरींची टापटीप नाना उत्कृष्ट ठेवी, पण राज्यकारभाराच्या किंवा युद्धनीतीच्या विषयांत मनुष्यस्वभावास टापटीप लावण्याचें कसब त्यास साधलें नाहीं. तेलातुपाचा हिशेब ठेवणारास दारूगोळ्याचा हिशेब काय होय ?

नानाचा समकालीन कवि देवनाथ यानें नानासंबंधीं अशाच मताचा अभिप्राय व्यक्त केला आहे.

‘ अनन्तफन्दीने नाना फडणीसके
अक्कलकी तारीफ किई,
क्या है उसकी अक्कल ? दौलत पेशवेकी डुबा दिई !
जो मैं करूंगा, सोहि होय गा,
ऐसी मनमें मगरूरी भई,
माल खजिना आपने हात, खावंदके
घर कुछ न रहीं ! इ० ’ —पान १३०

इतिहासभास्कर रानड्यांनीं आपल्या ग्रंथांत नाना फडनवीसाच्या जीवनाचें जें विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे, त्याचीं पुष्कळशीं बीजें खुद्द रियासतकारांच्या रियासतींत आढळतात, हें यावरून दिसून येईल.

त्यानंतर ‘ नवयुग ’च्या पुढील अंकांत ‘ महाराष्ट्रांतील इतिहास-संशोधकांना

आव्हान ' हा दुसरा अग्रलेख मीं लिहिला. त्यांत मीं मुख्य मुद्दा हा मांडला कीं, " कोणत्याहि इतिहासाचें लेखन करतांना त्यामध्यें ऐतिहासिक पुराव्याचें स्थान काय असावें, हा महत्त्वाचा प्रश्न रानड्यांच्या ग्रंथानें पुन्हां उपस्थित केला आहे. ऐतिहासिक पुरावा हा तर इतिहासलेखनाचा प्राणच होय; तथापि, नुसता ऐतिहासिक पुरावा जमविण्यापेक्षां त्याची नीट छाननी करणें, तो व्यवस्थित तऱ्हेनें अजमावणें आणि त्यामधून अचूक निर्णय काढणें यांतच इतिहासलेखनाचें खरें कौशल्य आहे. "

एका इतिहासकारानें ' नानाची मातृभक्ति, धर्मश्रद्धा, शिस्त जाज्वल्य होती ' असें लिहिलें आहे. त्याला उत्तर देतांना रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, " पानिपतच्या रणभूमीवर नानांच्या मातोश्रीचें शत्रूच्या हातून देहावसान झालें. त्या वेळीं तिची मुळींच वास्तपुस्त न करतां, तिचें प्रेत तसेंच कुजत ठेवून, आपण स्वप्राणत्राणार्थ अर्धनग्न स्थितींत माळव्यांत पलायन केलें व तेथें गेल्यावर मग त्यांना आपल्याबरोबर गेलेल्या वृद्ध मातोश्रींची आठवण झाली. मग तिकडून नुसता एक चिठोरा दिल्लींतून मराठ्यांच्या वकिलास तिच्या चौकशीकरतां म्हणून त्यांनीं पाठविला. आपल्या मातोश्रीस निराश्रित बिनवारशी रस्त्यावर पडून मरणाऱ्या इतर प्राण्याप्रमाणें जो वागवतो त्याची मातृभक्ति जाज्वल्य होती असें म्हणणाऱ्या ' कम अस्सल ' अवलादीच्या इतिहासकारांच्या शहाणपणाची जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच ! " रानड्यांच्या या सर्व विवेचनांत नानाच्या मातृद्रोहाबद्दल चीड आहे. संताप आहे. आवेग आहे. पण त्यांत इतिहासाचा विपर्यास कोठें आहे ?

नरसिंह चिंतामण केळकरांनीं ' तोतयाचें बंड ' हें नाटक ज्या कथावस्तूवर लिहिलें, ती घटना ऐतिहासिक दृष्ट्या किती निराधार होती, त्याची रानडे ह्यांनीं केलेली छाननी अगदीं बिनतोड होती. ते म्हणतात, " सदाशिवरावभाऊ पानपतच्या लढाईत मारले गेले याबद्दल काशीराय पंडित आणि एक दुराणी या दोघांचेच फक्त पुरावे उपलब्ध आहेत. हे दोन्हीहि पुरावे विश्वसनीय मानतां येणार नाहींत. त्याच्या उलट सदाशिवरावभाऊ हे तोतया नसून खरे होते, हें दाखवणारे कितीतरी विश्वसनीय पुरावे उपलब्ध आहेत. सन १७६५ पासून १७७६ पर्यंत जवळ जवळ बारा वर्षें सदाशिवराव भाऊ कैदेंत होते. ते जर खरेच तोतया होते, तर त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांना त्यांची भेट घेऊं देण्याचे कामीं त्या वेळचे पेशवे किंवा नाना फडनवीस ह्यांच्याकडून कां टाळाटाळ करण्यांत आली, याचें योग्य कारण आजपर्यंत कोणालाहि दाखवतां आलेलें नाहीं. शेवटीं पंचकमिटीपुढें ज्या तोतयाचा निर्णय करण्यांत आला, तो तोतया बाजी गोविंद नांवाचा सोनार जातीचा एक दुसराच तोतया सदाशिवरावभाऊंच्या ऐवजीं नाना फडनवीसांनीं उभा करून आपल्या कपटी कारस्थानाची शर्थ करून दाखविली. " रानड्यांनीं हा सर्व कथाभाग इतक्या स्वच्छ शब्दांत वाचकांपुढें मांडलेला आहे कीं, त्यावर विश्वास ठेवल्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं.

नानांची नीतिमत्ता कोणत्या दर्जाची होती याबद्दल अनेक इंग्रज इतिहासकारांचे पुरावे रानड्यांनीं दिले होते. मराठ्यांचा इतिहास लिहिणाऱ्या पोपनें तर स्वच्छ लिहिलें "Ganga Bai, the Mother of Peshwa, poisoned herself about this time (in A. D. 1777) under circumstances which are fatal to the good name of Nana Farnavis."

डफसाहेबांनीं आपल्या इतिहासांत ह्याच विषयाबद्दल पुढीलप्रमाणें लिहिलें होतें: "गंगाबाईचें मन नानांनीं स्वाधीन करून घेतलें होतें. ती तरुण विधवा नानांविषयीं फारच आतुर झाली होती. हें एक त्या वेळचें गूढ रहस्य होतें...गंगाबाईनें नाना फडनवीसांशीं जारकर्म केलें व त्याचा परिणाम (गर्भ) लपवावा म्हणून तिनें औषध घेतलें होतें. त्या औषधापासून तिला मृत्यु आला." मेजर मॅक्डोनल्डनें 'नानाच्या बखरीं'त लिहिलें आहे. "नाना गंगाबाईशीं आसक्त होते, असें जें लौकिकांत प्रसिद्ध आहे, त्यास सबळ कारण आहे."

मोठमोठ्या इतिहासकारांनीं आपल्या ग्रंथांत जे पुरावे दिले, त्यांच्याच आधारावर नाना फडनवीसांच्या छत्तीस वर्षांच्या कारकीर्दीचें सलंग आणि दोरेबंद चित्र एका टाकानें आणि एका ओघानें रानड्यांनीं अचूकपणें उभें केलें होतें. तें वाचल्यानंतर नाना फडनवीसांच्या आंधळ्या भक्तांनाहि त्या चित्राला दुसरी एकादी चांगली बाजू आहे, हें दाखविणें कठीण पडल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, इतिहासभास्कर रानड्यांचा नाना फडनवीसांवरील हा अद्वितीय ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रांतील हयात आणि दिवंगत इतिहाससंशोधकांना एक ठणठणीत आणि दणदणीत आव्हान आहे, असाच मीं माझ्या दुसऱ्या अग्रलेखांत निष्कर्ष काढला.

इतिहासभास्करांच्या या ग्रंथासंबंधींचा वाद जवळ जवळ एक वर्षभर 'नवयुग'-मध्यें मीं चालविलेला होता. या वादांत इतिहासभास्करांचा जोरदार पुरस्कार बडोद्याचे इतिहाससंशोधक वि. स. वाकसकर, 'प्रबोधन'कार केशवराव ठाकरे आणि बेळगांवचे सदाशिव रंगराव सुंठणकर ह्यांनीं एकाहिपेक्षां एक तेजस्वी लेख लिहून केला, हें येथें नमूद करणें मीं माझें कर्तव्य समजतों.

आतां एकच मौजेची गोष्ट सांगून हें प्रकरण आटोपतों. १९३४ सालीं पेशवे दप्तरांचें संशोधन करण्यासाठीं त्या वेळच्या मुंबई सरकारनें रियासतकार सरदेसाई ह्यांच्या नेतृत्वाखालीं एक इतिहासपारंगत विद्वानांचें मंडळ नेमलें होतें. रियासतकारांना सहाय्यक म्हणून आमचे परममित्र प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी ह्यांची नेमणूक केली होती. त्यांनीं स्वतः आम्हांला सांगितलेली ही गोष्ट त्यांच्या हयातींत आम्हीं प्रसिद्ध करूं शकलों नाहीं. कारण, तशी त्यांची आम्हांला आज्ञा होती. काय झालें कीं, एक दिवस या सर्व संशोधकांना पेशवे दप्तरांत नाना फडनवीसानें ठेवलेल्या रखेल्यांच्या यादीचा एक कागद अचानकपणें मिळाला. तो सर्वांनीं एकत्र मिळून

मिटक्या मारीत वाचला नि त्याची जाहीर नोंद करण्याचेंहि सर्वानुमतें ठरलें. तथापि कांहीं दिवसांनीं हा कागद जेव्हां सरदेसाई शोधायला गेले, तेव्हां तो बेपत्ता झाल्याचें त्यांना आढळलें. सरकारी दप्तरांतून बाहेर कागद तर नेणें अशक्य होतें. मग हा कागद नाहींसा कसा झाला, त्याची हकीगत आमचे मित्र नाना कुळकर्णी अत्यंत गंभीर चेहेरा करून सांगत कीं, " अहो, आमच्यापैकीं एकानें हा कागद बसल्या-बसल्या त्याचे बारीक बारीक तुकडे करून सरळ गिळून कीं हो टाकला ! " जणुं कांहीं नाना फडनवीसांच्या रखेल्यांची ती यादी प्रसिद्ध झाली असती तर सदर इसमाच्या बापजाद्यांची बेअब्रू झाली असती !

नाना फडनवीसांच्या ' रखेल्या ' गिळंकृत करणारा हा माणूस इतिहाससंशोधक म्हणून महाराष्ट्रांत आज विद्यमान आहे. आपल्याला अनुकूल असेल तेवढाच पुरावा ठेवावयाचा नि बाकीचा नष्ट करून टाकावयाचा ही महाराष्ट्रांतल्या कित्येक इतिहाससंशोधकांची इतिहासघातुक प्रवृत्ति इतिहासाचार्य राजवाड्यांपासून चालत आलेली आहे. हाच महाराष्ट्राच्या इतिहासांतील सत्यसंशोधनाला खरा शाप आहे !

३५

# कॉंग्रेसच्या स्वातंत्र्यआघाडीवर

१९४५ च्या प्रारंभीं मीं 'परिंदे' नांवाचा एक हिंदी चित्रपट काढला. 'परिंदे' म्हणजे 'पांखरें.' महायुद्धाच्या त्या काळांत प्रत्येक निर्मात्याला वर्षातून निदान एक चित्रपट तरी प्रचारात्मक स्वरूपाचा काढावा लागे. त्या निर्बंधानुसार भारतीय लष्करांतील 'हवाईदला'च्या पराक्रमावर मीं ही प्रेमकथा लिहिली होती. अर्थातच या चित्रपटांतला पुष्कळसा भाग तांत्रिक होता. आणि त्यासाठीं मला लष्करी वैमानिक खात्याचें सहकार्य घ्यावें लागलें.

ह्या चित्रपटांतील नायकाची भूमिका मीं 'सुरेंद्र' ह्या त्या वेळच्या प्रथितयश हिंदी नायकाला दिली होती. नायिकेची भूमिका वनमालेनें केली. आणि उप-नायिकेची भूमिका सितारा या सुप्रसिद्ध नृत्याप्सरेकडे मीं सोंपविली होती. त्या-खेरीज बाबुराव पेंढारकर आणि विनोदमूर्ति दीक्षित या नामांकित नटांची निवड मीं चित्रपटासाठीं केली होती. ह्या चित्रपटाचा निर्माता नि दिग्दर्शक मीच होतों.

नटनटींना 'काळा पैसा' देण्याची पद्धत चित्रसृष्टीमध्यें ह्याच वेळेपासून सुरू

झाली. मी सितारा या नटीला वीस हजार ' पांढरे ' आणि वीस हजार ' काळे ' असे एकंदर चाळीस हजार रुपये देण्याचा करार केला. अर्थात, काळे पैसे सगळेच्या सगळे आधी दिल्याखेरीज करारपत्रावर नटनटी सह्या करीत नसत. सितारानें वीस हजार रुपये माझ्याकडून घेऊन माझ्याशीं करार केला आणि त्यानंतर एका आठवड्याच्या आंत आपण पैशाच्या अत्यंत अडचणींत आहोंत अशी बतावणी करून तिनें आणखी दहा हजार रुपये उपटले.

त्यानंतर माझ्या चित्रपटांत तिनें दोन का तीन दिवसच काम केलें असेल नसेल, तोंच तिनें पुन्हा उरलेल्या दहा हजार रुपयांची मागणी केली. अर्थात् ते पैसे तिला द्यावयाचें मीं साफ नाकारलें. तेव्हां तिनें चित्रपटांत काम करण्याच्या बाबत टाळाटाळीचें धोरण सुरू केलें. ' कारदार स्टुडिओमध्यें मीं त्या वेळीं चित्रण करीत होतों. तेथें दिवसाचें भाडें दोन हजार रुपये असे. सिताराच्या या टाळाटाळीच्या धोरणामुळें माझे तीन दिवस वायां गेले आणि सहा हजारांचें भाडें माझ्या बोडख्यावर बसलें. शेवटीं सिताराच्या घशांत गेले तेवढे छत्तीस हजार रुपये शहाणपणा शिकण्याच्या दृष्टीनें पुरे झाले अशी मनाशीं खूणगांठ बांधून मीं तिचें काम चित्रपटांतून अजिबात ' कटाप ' करून टाकलें आणि तिला साष्टांग प्रणिपातपूर्वक निरोप दिला.

चित्रपटाचा धंदा मीं पुष्कळ वर्षें केला. भारतांतल्या अनेक नामांकित नटनटींनीं माझ्या चित्रपटांत माझ्या दिग्दर्शनाखालीं कामें केलीं. पण सितारा या नटीनें मला जितकें लुबाडलें आणि तोंडघशी पाडलें, तितकें कोणत्याहि नटानें किंवा नटीनें मला फसवलें नसेल किंवा छळलें नसेल. चित्रपटसृष्टींत कशा तऱ्हेचीं भयंकर माणसें वावरत असतात ह्याचा एक इरसाल नमुना म्हणून मीं हें उदाहरण मुद्दाम येथें सांगितलें.

' परिंदे 'हा चित्रपट दिल्लीला नेऊन तेथील वैमानिक अधिकाऱ्यांना मला दाखवावा लागला. त्यांनीं पसंत केल्यानंतर मग तो मीं प्रदर्शित केला. तथापि, पैशाच्या नि लोकप्रियतेच्या दृष्टीनें हा चित्रपट मुळींच यशस्वी ठरला नाहीं. किंबहुना त्यांत मला सुमारें दीड लाखाचा तोटा आला. मला स्वतःला न आवडणारा असा माझा हा पहिला नि शेवटचाच चित्रपट म्हणावा लागेल.

यानंतर पुढें जवळ जवळ तीन वर्षें मी चित्रपटाच्या किंवा नाटकाच्या भानगडींत पडलों नाहीं. ह्याचें कारण त्या काळांत देशामधील स्वातंत्र्यलढ्याचें राजकारण झपाट्यानें गंभीर होत गेलें. आणि त्या देशव्यापी प्रवाहापासून स्वतःला दूर ठेवणें हें कॉंग्रेसपक्षीय कार्यकर्ता आणि पत्रकार म्हणून मला सर्वस्वी अशक्यच होतें. जगाच्या नि भारताच्या दृष्टीनें पंचेचाळीस साल हें सर्वांत महत्त्वाचें वर्ष होतें. १ सप्टेंबर १९३९ रोजीं युरोपखंडांत सुरू झालेलें दुसरें महायुद्ध ७ मे १९४५ रोजीं संपलें. जगामधल्या लोकशाहीला आणि स्वातंत्र्याला ग्रासूं पाहणारे मुसोलिनी आणि हिटलर हे दोघेहि हुकूमशहा अक्षरशः जमीनदोस्त झाले. आणि दोस्त राष्ट्रें विजयी झालीं. पण

युरोपांतलें युद्ध संपलें म्हणून कांहीं भारतीय स्वातंत्र्याचा लढा संपला नाहीं.

दुसरें महायुद्ध हें अखिल जगांत स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही प्रस्थापित करण्याच्या पवित्र हेतूनें चालविलेलें एक धर्मयुद्ध होतें, अशी जरी दोस्त राष्ट्रांनीं पहिल्यापासून घोषणा केली असली, तरी तें त्यांचें केवळ ढोंग होतें, अशीच भारतानें पहिल्यापासून भूमिका घेतली होती.

कारण "ब्रिटिश साम्राज्याचा मुख्य प्रधान जो मी झालेलों आहें, तो कांहीं या साम्राज्याचें दिवाळें वाजवण्यासाठीं म्हणून नाहीं!" असें चर्चिलनें मुख्यप्रधान होतांच बेमुर्वतखोरपणें सांगून टाकलें होतें. म्हणून कॉंग्रेसलाहि युद्धाबाबत तेवढीच झणझणीत भूमिका घ्यावी लागली.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें त्या वेळीं आपल्या ठरावांत निःसंदिग्धपणें म्हटलें होतें कीं, "आधीं हिंदुस्थान हें स्वतंत्र राष्ट्र असल्याचें जाहीर करण्यांत यावें. जोंपर्यंत हा देश परतंत्र आहे, तोंपर्यंत तथाकथित लोकशाही स्वातंत्र्यासाठीं पुकारलेल्या या युद्धांत तो सामील होऊं शकत नाहीं. साम्राज्य-संरक्षणासाठीं जर हें युद्ध असेल, तर हिंदुस्थानला त्याच्याशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं. लोकशाहीच्या तत्त्वावर जगाची पुनर्घटना करण्याचा जर दोस्त राष्ट्रांचा हेतु असेल, तरच हिंदुस्थानला या युद्धाबद्दल प्रेम वाटेल. जर ब्रिटन लोकशाहीसाठीं लढत असेल, तर हिंदुस्थानांत आधीं संपूर्ण लोकशाही प्रस्थापित व्हावयाला पाहिजे आणि स्वतःच्या घटना परिषदेमार्फत देशाच्या नव्या राज्यव्यवस्थेची घटना तयार करण्याचा स्वयंनिर्णयाचा हक्क या देशाला मिळाला पाहिजे. तेव्हां, ब्रिटिश सरकारनें आपले युद्धहेतु काय आहेत हें निःसंदिग्ध भाषेंत जाहीर करावें."

कॉंग्रेसच्या या मागणीला व्हाईसरॉय साहेबांनीं वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

पुढें जर्मनीनें जवळ जवळ सारा यूरोपखंड जेव्हां व्यापून टाकला, तेव्हां देश-संरक्षणाच्या कामीं सरकारला सहाय्य करण्यासाठीं कॉंग्रेसनें पुन्हां सहकार्याचा हात पुढें केला. सरकारनें हिंदी स्वातंत्र्याची प्रथम निःसंदिग्ध घोषणा करावी, नंतर जनतेच्या विश्वासास पात्र होईल अशा तऱ्हेचें तात्पुरतें मध्यवर्ति राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत यावें, म्हणजे मग देशाचें रक्षण करण्याच्या कामीं जनता आपखुषीनें पुढें येईल अन् कॉंग्रेसहि त्या कामीं आपलें सर्व वजन खर्च करील, अशी ती कॉंग्रेसची सहकार्याची योजना होती.

तथापि, राष्ट्रीय सरकार बनविण्याच्या कॉंग्रेसच्या त्याहि मागणीला व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं हरताळ फांसला. त्यानंतर गांधीजींनीं वैयक्तिक कायदेभंगाची अभिनव चळवळ सुरू केली. या चळवळींत शेंकडों सत्याग्रही तुरुंगांत गेले. पण १९४१ च्या डिसेंबरमध्यें जपाननें 'पर्ल हार्बर'वर जेव्हां हल्ला केला, तेव्हां जपान-विरुद्ध अमेरिका–ब्रिटननें युद्ध पुकारलें. त्यानंतर कॉंग्रेसनें कायदेभंगाची आपली

मोहीम स्थगित केली आणि तडजोडीचे दरवाजे सरकारला पुन्हां मोकळे करून दिले.

त्यानंतर जपाननें एकामागून एक तेजस्वी विजय मिळवून तें ब्रह्मदेशापर्यंत येऊन थडकलें. तेव्हां मार्च १९४२ मध्यें 'ब्रिटिश युद्ध मंडळा'नें हिंदुस्थानविषयक एक योजना तयार करून ती सर स्टॅफर्ड क्रिप्सबरोबर पाठवून दिली. ही योजना बाह्यतः जरी 'डोमिनियन स्टेट्स्'ची होती, तरी तिच्यांत ब्रिटिश सरकारनें अनेक स्वातंत्र्यघातकी मेखा मारून ठेवलेल्या होत्या. काँग्रेस पुढाऱ्यांनीं क्रिप्सशीं वाटाघाटी केल्या. पण 'राष्ट्रीय सरकार'च्या प्रश्नावर एकंदर वाटाघाटींचें तारूं फुटलें. 'काँग्रेस म्हणते तसें राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आणणें म्हणजे देशांत काँग्रेसच्या बहुसंख्यांक सत्तेची हुकूमशाही प्रस्थापित करण्यासारखें आहे' असा अभिप्राय व्यक्त करून हात हालवीत हालवीत क्रिप्ससाहेब स्वदेशीं 'उडत' गेले.

ह्या राजकीय पेंचप्रसंगांतूनच महात्मा गांधींची '९ ऑगस्ट' ची 'चले जाव' ची क्रांतिकारक चळवळ निर्माण झाली. 'ब्रिटिश या देशांतून निघून गेले तरच देशांतील महत्त्वाच्या पक्षांचे जबाबदार प्रतिनिधि एकत्र येऊन घटना परिषदेची योजना करतील आणि त्यांतूनच सर्वांना मान्य होईल अशी स्वतंत्र हिंदी राष्ट्राची घटना निर्माण होईल. काँग्रेसची ही मागणी सरकारनें मान्य केली नाहीं, तर आपल्या स्वातंत्र्याच्या आणि राजकीय हक्काच्या संरक्षणार्थ आपलें सर्व अहिंसात्मक बळ एकत्रित करून गांधीजींच्या नेतृत्वाखालीं काँग्रेसला नाखुषीनें सरकाराशीं लढा करावा लागेल' असें ठणठणीत आव्हान काँग्रेस वर्किंग कमिटीनें ब्रिटिश सरकारला दिलें. ८ ऑगस्टच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या मुंबईच्या ऐतिहासिक बैठकीमध्यें या ठरावाला प्रचंड पाठिंबा मिळाला !

लागलेच दुसऱ्या दिवसापासून सरकारनें पुढाऱ्यांची धरपकड करावयाला सुरुवात केली. आणि एकजात सर्वांची अज्ञात स्थळीं रवानगी करून दिली. सरकारच्या या दडपशाहीच्या धोरणानें सारा देश हादरून गेला. स्वातंत्र्यप्रेमी जनतेचीं डोकीं भलतींच भडकून गेलीं आणि देशाच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत त्या प्रतिक्रियेचें आंदोलन सुरू झालें. ठिकठिकाणीं खवळलेल्या जनतासमूहावर लष्करी सैन्याकडून सरकारनें मशीन-बंदुकांचा मारा करविला.

अष्टी-चिमूर येथें या अत्याचारी दडपशाहीची तर परमावधीच झाली. कित्येक स्त्रियांवर राक्षसी बलात्कारहि करण्यांत आले. घरादारांची लुटालूट आणि राखरांगोळी करण्यांत आली. १९४२ च्या अखेरपर्यंत सरकारनें साठ हजार लोकांना तुरुंगांत घातलें. अठरा हजार लोक 'भारत संरक्षण कायद्या'न्वयें डांबून ठेवले. एक हजार लोक पोलिसांच्या गोळीबारांत ठार झाले. आणि सतराशें लोक या गोळीबारांत जायबंदी झाले.

ऑगस्ट आंदोलनाच्या बाबत जबाबदारी कोणावर पडते, याबाबत गांधीजींनीं

तुरुंगामधून सरकारशीं पुष्कळ पत्रव्यवहार केला. घडलेल्या अत्याचाराची सारी जबाबदारी त्यांनीं सरकारवर टाकली आणि कॉंग्रेसचा अहिंसेवर विश्वास आहे, असें त्यांनीं सरकारला ठासून सांगितलें. ह्या पत्रव्यवहाराचें पर्यवसान महात्माजींच्या एकवीस दिवसाच्या उपवासामध्यें झालें. ही उपवासाची घोषणा करून ११ फेब्रुवारी १९४३ रोजीं गांधीजींनीं साऱ्या जगाला धक्का दिला. या उपवासाबद्दल सरकारचा निषेध करण्यासाठीं व्हाइसरॉयच्या तीन कार्यकारी सभासदांनीं राजिनामे दिले. उपवासाच्या महान् दिव्यामधून महात्माजी सुरक्षितपणें बाहेर पडले. तथापि, ब्रिटिश सरकारच्या वृत्तींत त्यामुळें कांहीं बदल पडला नाहीं.

अशा परिस्थितींत सौ. कस्तुरबा गांधी ह्यांना पुणें तुरुंगांत असतां २२ फेब्रुवारी १९४४ रोजीं देवाज्ञा झाली. त्यानंतर ६ मे १९४४ रोजीं प्रकृतीच्या कारणास्तव महात्माजींची तुरुंगांतून सुटका करण्यांत आली. त्यानंतर मुस्लीम लीग आणि कॉंग्रेस ह्यांचें हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याबाबत ऐक्य घडवून आणण्यास डॉ राजाजी यांनीं गांधीजींशीं चर्चा करून एक योजना तयार केली. या योजनेनें मुसलमानांच्या पाकिस्तानच्या मागणीचें अंशतः समाधान केलेलें होतें. या ‘राजाजी योजने’ला केवळ देशांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांनींच विरोध केला नाहीं, तर स्वतः जीनांनीं त्याचे वाभाडे काढले. ते म्हणाले, “१९४२ ऑगस्टचा कॉंग्रेसचा ठराव मुस्लिम-विरोधी आहे. तो सपशेल कोलमडला पाहिजे. कॉंग्रेस-लीग ऐक्य होण्याच्या आधीं गांधीजींनीं पाकिस्तानला सपशेल मान्यता दिली पाहिजे.”

त्यानंतर ९ सप्टेंबर १९४४ रोजीं मुंबई येथें गांधी–जीना मुलाखतीला प्रारंभ झाला. ही मुलाखत २७ सप्टेंबरपर्यंत लांबली. मुलाखतीखेरीज उभयतांमध्यें पुष्कळसा पत्रव्यवहार झाला. तथापि, या ऐतिहासिक मुलाखतीमधून कांहीं एक निष्पन्न न होतां ती अमर्यादित कालपर्यंत स्थगित करण्यांत आली. ‘आम्हां दोघांमध्यें समुद्राएवढें अंतर आहे!’ असें गांधीजी म्हणाले तेंच शेवटीं खरें ठरलें.

दुसरें युद्ध चालू असतां देशांतील एकंदर राजकीय परिस्थिति कशी होती ह्याची नीट कल्पना यावी म्हणून हा इतिहास थोड्याशा विस्तारानें मीं येथें सांगितला. १९४५ च्या प्रारंभीं देशांतील राजकीय वातावरण अगदींच थंड होतें. महात्माजींनीं जवळ जवळ संन्यासच घेतला होता. मध्यवर्ति कायदे मंडळांतील कॉंग्रेस–लीग पुढारी भुलाभाई आणि लियाकत अल्ली यांच्यांत कांहीं तरी समझौता होऊन कॉंग्रेस ४०, मुस्लिम ४० आणि इतर २० अशा टक्केवारीनें मध्यवर्ति आणि प्रांतिक संमिश्र मंत्रि-मंडळें बनविण्याची ती योजना होती. पण तिच्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. स्वतः जीनांनींच तिचा इन्कार केला.

एवढ्यांत दुसरें महायुद्ध संपलें आणि सॅनफ्रान्सिस्को येथें ‘जागतिक शांतता परिषद्’ भरण्याचें जाहीर झालें. त्या परिषदेला महात्मा गांधींनीं संदेश पाठवून पुन्हां

साऱ्या जगाचें लक्ष आपल्याकडे वेधलें. तो संदेश असा : " सर्व राष्ट्रांच्या आणि वंशांच्या समानतेवर व स्वातंत्र्यावर खरी जागतिक शांतता अवलंबून आहे. लढाया आणि त्यानंतरचीं कारस्थानें आणि लबाड्या ह्यांवरचा विश्वास उडाल्याखेरीज दोस्त राष्ट्रांना किंवा जगाला शांतता मिळणार नाहीं. हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज जगाला शांतता मिळणार नाहीं. चिरशांततेसाठीं होणारा तह न्यायाला धरून व्हावयाला पाहिजे. त्यांत सूडाची किंवा शिक्षेची भावना नसावी. जर्मनीची किंवा जपानची मानखंडना करूं नका ! "

महात्माजींच्या या संदेशावर भाष्य करतांना मीं ' नवयुग 'मध्यें एक अकरास्तंभी अग्रलेख लिहून त्याचा समारोप पुढील शब्दांत केला होता. " महात्माजींच्या या संदेशामध्यें प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताची वाणी पाश्चात्य जगाला पुन्हां ऐकावयाला मिळेल. पण ख्रिस्ताच्या उदात्त धर्माला झिडकारून ज्या पाश्चात्य ख्रिस्ती राष्ट्रांनीं सर्व जगभर रक्तामांसाच्या नद्या वाहवल्या, त्यांना महात्माजींची ही दैवी वाणी कशी ऐकू येणार ? विजयोन्मादानें त्यांचीं डोकीं आज धुंद झालेलीं आहेत. हिंदी स्वातंत्र्याचा झगडा हा सत्याचा आहे, न्यायाचा आहे, जगाच्या कल्याणाचा आहे. ही गर्जना महात्माजींनीं साऱ्या जगाला आज ऐकविलेली आहे. दोस्त राष्ट्रांचें युरोपांतील युद्ध संपलें. त्यांत त्यांचा विजय झाला. ठीक झालें. पण त्या त्यांच्या विजयदिनाच्या प्रसंगीं प्रत्येक हिंदी माणसानें हें ध्यानांत धरावें कीं भारतीय स्वातंत्र्याचें युद्ध कांहीं अद्याप संपलेलें नाहीं. आपला विजयदिन यावयाला अजून पुष्कळ अवकाश असला तरी निराश होण्याचें कारण नाहीं. दोस्तांच्या विजय-दिनाचा मुहूर्त साधून आपणहि हिंदी स्वातंत्र्यासाठीं प्राणपणें लढण्याची प्रतिज्ञा करावी ! "

यूरोपमधलें युद्ध संपल्यानंतर ब्रिटनच्या संयुक्त राष्ट्रीय सरकारचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनीं आपल्या प्रधानपदाचा राजिनामा सादर केला. कारण मजूर पक्षाचे नेते मेजर ॲटली ह्यांनीं त्यांच्याबरोबर त्यापुढें सहकार्य करण्याचें साफ नाकारलें. जपान पराभूत होईपर्यंत ' राष्ट्रीय सरकार ' समाप्त होऊं नये, अशी चर्चिलची इच्छा होती. पण मजूर पक्षानें ती मान्य केली नाहीं. त्यानंतर हुजूरपक्षाचें तात्पुरतें सरकार चर्चिलच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालें आणि त्यानें युद्धाच्या विजयाचा फायदा आपल्याला मिळावा, या हेतूनें जुलै १९४५ मध्यें ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर करून टाकल्या.

मध्यंतरीं भारतांतील राजकीय परिस्थितीचा ताण कमी करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानचे त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल हे इंग्लंडला गेले आणि तेथून ते भारतीय स्वराज्याची एक नवीन योजना घेऊन आले. ही ' वेव्हेल योजना ' क्रिप्स योजनेचीच धाकटी बहीण होती, एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींत हिंदु आणि मुसलमान ह्यांना समसमानतेचें ( Parities ) प्रतिनिधित्व देण्याच्या

तुरुंगामधून सरकारशीं पुष्कळ पत्रव्यवहार केला. घडलेल्या अत्याचाराची सारी जबाबदारी त्यांनीं सरकारवर टाकली आणि कॉंग्रेसचा अहिंसेवर विश्वास आहे, असें त्यांनीं सरकारला ठासून सांगितलें. ह्या पत्रव्यवहाराचें पर्यवसान महात्माजींच्या एकवीस दिवसाच्या उपवासामध्यें झालें. ही उपवासाची घोषणा करून ११ फेब्रुवारी १९४३ रोजीं गांधीजींनीं सार्‍या जगाला धक्का दिला. या उपवासाबद्दल सरकारचा निषेध करण्यासाठीं व्हाइसरॉयच्या तीन कार्यकारी सभासदांनीं राजिनामे दिले. उपवासाच्या महान् दिव्यामधून महात्माजी सुरक्षितपणें बाहेर पडले. तथापि, ब्रिटिश सरकारच्या वृत्तींत त्यामुळें कांहीं बदल पडला नाहीं.

अशा परिस्थितींत सौ. कस्तुरबा गांधी ह्यांना पुणें तुरुंगांत असतां २२ फेब्रुवारी १९४४ रोजीं देवाज्ञा झाली. त्यानंतर ६ मे १९४४ रोजीं प्रकृतीच्या कारणास्तव महात्माजींची तुरुंगांतून सुटका करण्यांत आली. त्यानंतर मुस्लीम लीग आणि कॉंग्रेस ह्यांचें हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याबाबत ऐक्य घडवून आणण्यासाठीं राजाजी यांनीं गांधीजींशीं चर्चा करून एक योजना तयार केली. या योजनेनें मुसलमानांच्या पाकिस्तानच्या मागणीचें अंशतः समाधान केलेलें होतें. या 'राजाजी योजने'ला केवळ देशांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांनींच विरोध केला नाहीं. तर स्वतः जीनांनीं त्याचे वाभाडे काढले. ते म्हणाले, "१९४२ ऑगस्टचा कॉंग्रेसचा ठराव मुस्लिम-विरोधी आहे. तो सपशेल कोलमडला पाहिजे. कॉंग्रेस-लीग ऐक्य होण्याच्या आधीं गांधीजींनीं पाकिस्तानला सपशेल मान्यता दिली पाहिजे."

त्यानंतर ९ सप्टेंबर १९४४ रोजीं मुंबई येथें गांधी–जीना मुलाखतीला प्रारंभ झाला. ही मुलाखत २७ सप्टेंबरपर्यंत लांबली. मुलाखतीखेरीज उभयतांमध्यें पुष्कळसा पत्रव्यवहार झाला. तथापि, या ऐतिहासिक मुलाखतीमधून कांहीं एक निष्पन्न न होतां ती अमर्यादित कालपर्यंत स्थगित करण्यांत आली. 'आम्हां दोघांमध्यें समुद्राएवढें अंतर आहे!' असें गांधीजी म्हणाले तेंच शेवटीं खरें ठरलें.

दुसरें युद्ध चालू असतां देशांतील एकंदर राजकीय परिस्थिति कशी होती ह्याची नीट कल्पना यावी म्हणून हा इतिहास थोड्याशा विस्तारानें मीं येथें सांगितला. १९४५ च्या प्रारंभीं देशांतील राजकीय वातावरण अगदींच थंड होतें. महात्माजींनीं जवळ जवळ संन्यासच घेतला होता. मध्यवर्ति कायदे मंडळांतील कॉंग्रेस-लीग पुढारी भुलाभाई आणि लियाकत अली यांच्यांत कांहीं तरी समझौता होऊन कॉंग्रेस ४०, मुस्लिम ४० आणि इतर २० अशा टक्केवारीनें मध्यवर्ति आणि प्रांतिक संमिश्र मंत्रि-मंडळें बनविण्याची ती योजना होती. पण तिच्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. स्वतः जीनांनींच तिचा इन्कार केला.

एवढ्यांत दुसरें महायुद्ध संपलें आणि सॅनफ्रान्सिस्को येथें 'जागतिक शांतता परिषद्' भरण्याचें जाहीर झालें. त्या परिषदेला महात्मा गांधींनीं संदेश पाठवून पुन्हां

साऱ्या जगाचें लक्ष आपल्याकडे वेधलें. तो संदेश असा : " सर्व राष्ट्रांच्या आणि वंशांच्या समानतेवर व स्वातंत्र्यावर खरी जागतिक शांतता अवलंबून आहे. लढाया आणि त्यानंतरचीं कारस्थानें आणि लबाड्या ह्यांवरचा विश्वास उडाल्याखेरीज दोस्त राष्ट्रांना किंवा जगाला शांतता मिळणार नाहीं. हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्या-खेरीज जगाला शांतता मिळणार नाहीं. चिरशांततेसाठीं होणारा तह न्यायाला धरून व्हावयाला पाहिजे. त्यांत सूडाची किंवा शिक्षेची भावना नसावी. जर्मनीची किंवा जपानची मानखंडना करूं नका ! "

महात्माजींच्या या संदेशावर भाष्य करतांना मीं ' नवयुग 'मध्यें एक अकरास्तंभी अग्रलेख लिहून त्याचा समारोप पुढील शब्दांत केला होता. " महात्माजींच्या या संदेशामध्यें प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताची वाणी पाश्चात्य जगाला पुन्हां ऐकावयाला मिळेल. पण ख्रिस्ताच्या उदात्त धर्माला झिडकारून ज्या पाश्चात्य ख्रिस्ती राष्ट्रांनीं सर्व जगभर रक्तामांसाच्या नद्या वाहवल्या, त्यांना महात्माजींची ही दैवी वाणी कशी ऐकू येणार ? विजयोन्मादानें त्यांचीं डोकीं आज धुंद झालेलीं आहेत. हिंदी स्वातंत्र्याचा झगडा हा सत्याचा आहे, न्यायाचा आहे, जगाच्या कल्याणाचा आहे. ही गर्जना महात्माजींनीं साऱ्या जगाला आज ऐकविलेली आहे. दोस्त राष्ट्रांचें युरोपांतील युद्ध संपलें. त्यांत त्यांचा विजय झाला. ठीक झालें. पण त्या त्यांच्या विजयदिनाच्या प्रसंगीं प्रत्येक हिंदी माणसानें हें ध्यानांत धरावें कीं भारतीय स्वातंत्र्याचें युद्ध कांहीं अद्याप संपलेलें नाहीं. आपला विजयदिन यावयाला अजून पुष्कळ अवकाश असला तरी निराश होण्याचें कारण नाहीं. दोस्तांच्या विजय-दिनाचा मुहूर्त साधून आपणहि हिंदी स्वातंत्र्या-साठीं प्राणपणें लढण्याची प्रतिज्ञा करावी ! "

यूरोपमधलें युद्ध संपल्यानंतर ब्रिटनच्या संयुक्त राष्ट्रीय सरकारचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनीं आपल्या प्रधानपदाचा राजिनामा सादर केला. कारण मजूर पक्षाचे नेते मेजर ॲटली ह्यांनीं त्यांच्याबरोबर त्यापुढें सहकार्य करण्याचें साफ नाकारलें. जपान पराभूत होईपर्यंत ' राष्ट्रीय सरकार ' समाप्त होऊं नये, अशी चर्चिलची इच्छा होती. पण मजूर पक्षानें ती मान्य केली नाहीं. त्यानंतर हुजूरपक्षाचें तात्पुरतें सरकार चर्चिलच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालें आणि त्यानें युद्धाच्या विजयाचा फायदा आपल्याला मिळावा, या हेतूनें जुलै १९४५ मध्यें ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर करून टाकल्या.

मध्यंतरीं भारतांतील राजकीय परिस्थितीचा ताण कमी करण्याच्या हेतूनें हिंदु-स्थानचे त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल हे इंग्लंडला गेले आणि तेथून ते भारतीय स्वराज्याची एक नवीन योजना घेऊन आले. ही ' वेव्हेल योजना ' क्रिप्स योजनेचीच धाकटी बहीण होती, एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींत हिंदु आणि मुसलमान ह्यांना समसमानतेचें ( Parities ) प्रतिनिधित्व देण्याच्या

कारभार चालविण्यासाठीं एकादें तात्पुरतें सरकार बनवावें लागणारच. तें कोणत्या तत्त्वावर बनवलें जाणार हेंहि पण सरकारनें जाहीर केलें नाहीं.

निवडणुकीची सरकारी घोषणा होतांच त्या लढवण्याचें मुस्लिम लीगनें तावड-तोब शिंग फुंकलें. त्यावरून ह्या आगामी निवडणुका म्हणजे काँग्रेसला जातीय संस्था ठरवून बदनाम करण्याचा ब्रिटिशांचा नि मुस्लिम लीगचा एक भयंकर डाव आहे, अशी देशांतील सर्वसामान्य काँग्रेसवादी जनतेची समजूत झाली. नि म्हणून अशा निवड-णुकांवर काँग्रेसनें बहिष्कार टाकावा आणि आपलें लढाऊ सामर्थ्य स्वातंत्र्याच्या लढ्या-साठीं पुन्हां संघटित करावें असें जोराचें वारें देशांत वाहूं लागलें.

काँग्रेसनें निवडणुका लढवाव्यात काय ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्या-साठीं २१ सप्टेंबर १९४५ रोजीं काँग्रेसच्या अखिल भारतीय समितीची प्रचंड बैठक मुंबईमध्यें गोवालिया तलावाच्या प्रचंड आणि ऐतिहासिक रणक्षेत्रावर ८ ऑगस्ट १९४२ चा ‘ चले जाव ’चा ठराव घोषित झाल्यानंतर जवळ जवळ तीन वर्षांनंतर पुन्हां भरली.

भारताच्या स्वातंत्र्याचें क्रांतिकारक पर्व येथूनच सुरूं झालें. तेव्हांपासून पुढें सतत तीन वर्षें महाराष्ट्रांतील काँग्रेसच्या स्वातंत्र्य आघाडीवर मी आणि माझें ‘ नवयुग ’ पत्र एकसारखें कसें गर्जत राहिलें, त्याचा साद्यंत इतिहास ग्रेथून पुढें यथाक्रम येईलच.

३६

# कॉंग्रेसनें रणशिंग फुंकलें !

हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासांत ८ ऑगस्ट १९४२ रोजीं भरलेलें कॅंग्रेसच्या अखिल भारतीय समितीचें अधिवेशन जेवढें क्रांतिकारक ठरलें, तेवढेंच २१ सप्टेंबर १९४५ रोजीं मुंबईच्या गोवालिया टॅंकवर भरलेलें तिचें विराट् अधिवेशन क्रांतिदर्शक म्हणतां येईल. तीन वर्षांपूर्वीच्या त्या अधिवेशनाचें वातावरण या अधिवेशनापेक्षां अगदीं निराळें होतें.

त्या वेळीं महायुद्धाच्या भेसूर ज्वालांनीं सारें जग धूसर झालेलें होतें. कोण जिंकणार आणि कोण हरणार या संशयानें सारी मानवजात भयाकुल होऊन गेलेली होती. शत्रुराष्ट्राच्या जबरदस्त आघातांनीं ब्रिटिश साम्राज्यशाहीचे डोळे त्या वेळीं जवळ जवळ पांढरे पडण्याची वेळ आली होती. पण तशाहि परिस्थितींत चाळीस कोटि जनतेच्या छातीवर पाय ठेवून साम्राज्यलोभी ब्रिटन स्वतःला वांचविण्याची केविलवाणी धडपड धरीत होतें. त्यामुळें स्वातंत्र्यप्रेमी हिंदी राष्ट्र ब्रिटिश सरकारवर त्या वेळीं अगदीं चिडून गेलें होतें.

' चालते होता कीं नाहीं या देशांतून ? '

असें ब्रिटिशांना खडसावून सांगण्यापर्यंत देशांतील संतापाचा पारा वर चढलेला होता. ब्रिटिश सत्तेवर आतां निकराचा आघात केल्यावांचून देशाला दुसरा मार्गच नाहीं, असा क्रांतिकारक निर्णय देण्यासाठीं राष्ट्राचे पुढारी त्या वेळीं गोवालिया मैदानावर जमलेले होते.

पण पंचेचाळीस सालच्या अधिवेशनाचें वातावरण अगदीं निराळें होतें. महायुद्धाचा वणवा त्या वेळीं विझून गेलेला होता आणि मानवजातीनें समाधानाचा नि शांततेचा सहा वर्षांत प्रथमच निःश्वास टाकलेला होता. तीन वर्षे तुरुंगांत खितपत पडलेले जनतेचे आवडते नेते बंदिवासांतून नुकतेच बाहेर पडले होते. नुकत्याच अधिकारारूढ झालेल्या ब्रिटनच्या मजूर सरकारनें हिंदी स्वातंत्र्याच्या प्रश्नावर निदान शाब्दिक घोषणा तरी करावयाला प्रारंभ केल्यापासून देशांतील सर्वसामान्य निराशेचे काळेकुट्ट ढग हळूहळू वितळूं लागले होते.

त्यांत कायदेमंडळाच्या निवडणुकांचा पुकार झाल्यापासून देशांतील राजकीय निष्क्रियतेमध्यें नवीनच चैतन्य निर्माण झालें होतें. सरकारी दडपशाहीचे निर्बंध भराभर सैल होऊं लागले होते. बेचाळीसच्या बंडांतले शेंकडों बंदिवान् सैनिक कारागृहांतून बाहेर पडूं लागले होते. आणि तीन वर्षे वनवासांत गेलेली कॉंग्रेस पुन्हां आपल्या सिंहासनावर येऊन प्रतिष्ठित झालेली होती. त्यामुळें या अधिवेशनाच्या आधींपासून देशामध्यें एक प्रकारचें, नवीन आशेचें, हर्षाचें, उत्साहाचें आणि चैतन्याचें वातावरण पसरूं लागलें होतें.

तीन दिवसपर्यंत गोवालिया मैदानावर आनंदाचा आणि हर्षाचा एक प्रचंड राष्ट्रीय उरूसच भरला होता. त्या वेळीं राष्ट्रामध्यें कॉंग्रेस हें केवढें अमोघ सामर्थ्य होतें ह्याची मुंबईकरांना पुन्हां खात्री पटली. सारें मुंबई शहरच त्या वेळीं कॉंग्रेसमय होऊन गेलें होतें. डोक्यावर गांधी टोपी, अंगांत जवाहर सदरा आणि हृदयांत कॉंग्रेस-प्रेम धारण करून जो तो गोवालिया मैदानाकडे धांवत सुटला होता. तीस हजार प्रतिनिधि मंडपामध्यें बसलेले होते. तर दोन लक्ष लोक मंडपाबाहेर पावसामध्यें, चिखलामध्यें, झाडावर, भिंतीवर जेथें जेथें जागा सांपडेल तेथें तेथें मंत्रमुग्ध होऊन बसलेले होते.

या तीन दिवसांत पावसालाहि असा कांहीं जोर चढला होता म्हणतां कीं कांहीं विचारूं नका. वरून एकसारखा धो धो पाऊस पडतो आहे आणि खालीं इकडे नेत्यांच्या मुखांमधून स्वातंत्र्याची रसवंती गंगेच्या प्रवाहाप्रमाणें एकसारखी धो धो वाहते आहे. आणि लक्षावधि लोक या गंगेच्या महापुरांत बेहोष होऊन अवगाहन करीत आहेत. कोणाला कशाचीच शुद्ध नव्हती. तहान अन् भूक यांची आठवण देखील तीन दिवस लोक विसरून गेले होते. प्रत्येकाच्या डोक्यांत 'स्वातंत्र्य–स्वातंत्र्य' हाच एक निनाद घुमत होता.

एवढी अमर्याद गर्दी, एवढा असंख्य समुदाय आणि एवढी विराट् सभा मीं

माझ्या आयुष्यांत पूर्वी कधी पाहिली नव्हती. बैठक सुरू होण्यापूर्वी कित्येक तास आधीं-पासून लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोवालिया मैदानाकडे जाऊं लागत. जवळ जवळ पाव मैलाच्या परिघापासून आंत मंडपापर्यंत माणसांचे थवेच्या थवे एकसारखे उभे असत. पण एवढें असूनहि या तीन दिवसांत कोठें गडबड नाहीं, आरडाओरड नाहीं, धक्का-बुक्की नाहीं, दंगामस्ती नाहीं, कीं कांहीं नाहीं. प्रत्येक जण शिस्तींत वागत होता. शिस्तीनें चालत होता. शिस्तीनें हालत होता. दुसऱ्याला शांतपणें वाट करून देत होता. आपापल्या जागेवर व्यवस्थितपणें जाऊन बसत होता. किंवा जागा मिळेल तेथें शांत-पणें उभा राहात होता, जी शिस्त मंडपाबाहेरच्या अफाट जनसमुदायांत दिसून येत होती, तीच शिस्त मंडपामधल्या आसनस्थ सभाजनांमध्येंहि आढळून येत होती.

पहिल्या दिवशीं ध्वनियंत्राच्या तारा ठिकठिकाणीं कोणी तरी तोडलेल्या आढळल्या. त्यामुळें अधिवेशनाचें कांहींच काम होऊं शकलें नाहीं. तथापि, त्यामुळें तो विराट् श्रोतृसमुदाय व्यवस्थापकांवर चिडून गेला म्हणतां कीं काय ? छे, छे, मुळींच नाहीं. राष्ट्राचे परमपूज्य कर्णधार आणि नेते डोळे भरून सर्वांना पाहावयास मिळाले याचाच सर्वांना परमानंद झाला. सर्वांत राष्ट्रसभापति मौलाना अबुल कलम आझाद यांच्या आकर्षक आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वानें श्रोतृवृंदाला मंत्रमुग्ध करून टाकलें.

त्यांचा आरक्त गौरवर्ण आणि मोहक चेहरा, त्यांच्या शरीराचा सडपातळ, पिळदार आणि ऐटबाज बांधा, त्यांच्या बोलण्याचालण्यांतला सरदारी रुबाब अन् खानदानी कुर्रा, त्यांचें विलक्षण भाषाप्रभुत्व आणि जबरदस्त वक्तृत्व यामुळें हा माणूस लक्षावधि लोकांवर हुकमत चालविण्यासाठींच जणुं कांहीं जन्मला असावा, असें आम्हांला त्या वेळीं वाटलें. माझ्या शेजारीं त्या वेळीं नटश्रेष्ठ पृथ्वीराज कपूर बसले होते, त्यांना मी म्हणालों देखील, "दोनतीनशें वर्षांपूर्वी मौलाना आझाद जर जन्माला आले असते, तर ते कोठल्या तरी मुलखाचे किंवा रियासतीचे बादशहा किंवा वझीरच झाले असते !"

त्यावर पृथ्वीराजांनीं मला 'अबुल कलम आझाद' ह्या नांवाचा अर्थ समजावून सांगितला. तें नांव कांहीं त्यांचें जन्मनांव नव्हतें. त्या नांवापैकीं 'आझाद' हें नांव लेखनासाठीं त्यांनीं धारण केलेलें असून, 'अबुल कलम' म्हणजे 'भाषाप्रभु' ही त्यांना वयाच्या सतराव्या वर्षी मिळालेली एक पदवी होती. तें ऐकून आम्ही चकित झालों. कारण, किती जणांना ही गोष्ट माहीत होती ? पहिल्या महायुद्धाच्या काळांत त्यांना सरकारनें विनाचौकशी अटकेंत ठेवलेलें होतें. त्यावरून त्यांचा स्वातंत्र्यवाद तीस वर्षांपूर्वी देखील किती जळजळीत असला पाहिजे हें त्या वेळीं आम्हांला कळून आलें.

वर्किंग कमिटीच्या एका सभासदाला मीं विचारलें कीं, "काय हो, कॉंग्रेसमध्यें आज श्रेष्ठ वक्ता कोण आहे ?" त्याबरोबर त्यानें एका क्षणाचाहि विलंब न करतां 'आझाद' यांचें नांव उच्चारलें. आझाद यांना इंग्रजी येत नाहीं, कॉंग्रेसनें बनवलेले ते एक

'ग़ुळाचे गणपति' आहेत, हा मुस्लीम लीगनें त्यांच्याविरुद्ध चालविलेला प्रचार किती खोटा होता, हें त्या अधिवेशनांत अनेक वेळां आमच्या प्रत्ययाला आलें. आझाद यांना इंग्रजी भाषा उत्तम येत होती. पण डी व्हॅलेराप्रमाणें केवळ देशाभिमानामुळें ते परकीय भाषा बोलत नसत.

हें अधिवेशन चालू असतां कांहीं कांहीं वक्ते त्यांच्याशीं इंग्रजींत बोलत असूनहि ते त्यांना उर्दूमधून उत्तरें देत. मात्र एकदां 'Those who are in favour of this amendment, should raise up their hands.' असें अनवधानानें झटकन् ते इंग्रजीमधून बोलून गेले. तेव्हां, साऱ्या सभागृहांतून कौतुकयुक्त हास्याची एक सौम्य लकेर उठली.

गेल्या वर्षांतील मृत व्यक्तींविषयीं शोक व्यक्त करण्याचा जो ठराव आरंभीं सभेपुढें आला, त्याच्यामध्यें सुभाषबाबूंचें नांव कसें नाहीं असें एका श्रोत्यानें ओरडून विचारलें. त्याबरोबर 'ते जिवंत असावेत असें मला वाटतें!' असें आझाद ह्यांनीं ताडकन् उत्तर दिल्याबरोबर 'सुभाषबाबू झिंदाबाद'च्या प्रचंड आरोळ्या साऱ्या मंडपामधून उठल्या नि हजारों श्रोत्यांच्या अंगावर हर्षाचे रोमांच उभे राहिले!

सुभाषबाबूंचे थोरले बंधु शरद् बोस हे व्यासपीठावर आले तेव्हां पुन्हां साऱ्या मंडपामध्यें तोच जयनाद निनादला. आणि सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनीं धांवत जाऊन शरद्बाबूंना जी कडकडून मिठी मारली, त्या मिठींत तीस हजार काळजें चिरडून ठार झालीं. आणि तें दृश्य बघून साठ हजार डोळ्यांमध्यें सरसरून अश्रु उभे राहिले. गुजरातच्या सिंहाचें नि बंगालच्या वाघाचें तें आलिंगन पाहून ज्यांचे कंठ त्या दिवशीं गदगदून आले ते खरोखरीच धन्य होत. वल्लभभाईंनंतर शरद्बाबूंना दुसऱ्या अनेक नेत्यांनीं त्या वेळीं आलिंगनें दिलीं, पण छे, पहिल्याची ती अजब्र जादू पुन्हां कांहीं अनुभवावयाला मिळाली नाहीं.

दुसऱ्या दिवशींच्या प्रारंभीं पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या वक्तृत्वाची तेजस्वी गोलंदाजी जवळ जवळ एक तासभर केली आणि सारा मंडप दणाणून सोडला ते म्हणाले, "गेल्या तीन वर्षांमध्यें सरकारनें जनतेवर अनन्वित अत्याचार आणि जुलूम केले आणि जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षा चिरडून टाकण्याचा सरकारनें आटोकाट प्रयत्न केला. तथापि, सरकारच्या या दडपशाहीचा जनतेनें मोठ्या धैर्यानें प्रतिकार केला. हा प्रतिकार करतांना जनतेच्या हातून जर कोठें अहिंसात्मक वर्तन झालें असेल तर त्याची जबाबदारी केवळ सरकारवरच पडते. जनतेच्या पूज्य पुढाऱ्यांना अकस्मात् पकडून तिच्या शांततामय चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न जर सरकारनें केला नसता तर देशामध्यें एवढा प्रचंड लोकक्षोभ होण्याचें कांहींच कारण नव्हतें."

बेचाळीसच्या बंडांत सातारा, मिदनापूर, बिहार नि बालिया या ठिकाणीं पराक्रमाच्या ज्या तेजस्वी गोष्टी घडून आल्या, त्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत खरोखरच सुवर्णाक्षरांनीं

लिहिण्यासारख्या आहेत, अशी जवाहरलालनीं जेव्हां गर्जना केली, तेव्हां टाळ्यांच्या कडकडाटानें सारा मंडप खालीं कोसळतो आहे कीं काय, असें मला वाटलें. या वेळीं पंडितजींच्या अंगांत जो विलक्षण आवेश संचारला होता, तो मी कधींहि विसरणार नाहीं.

ते एकदम उसळून म्हणाले, "त्या वेळीं सारे पुढारी तुरुंगांत होते. जनतेला मार्ग दाखवावयाला कोणीहि बाहेर नव्हते. त्या वेळीं जनतेनें स्वयंस्फूर्तीनें जें जें कांहीं केलें तें तें योग्यच केलें. मी त्या वेळीं बाहेर असतों तर काय केलें असतें, हें मला देखील सांगतां येत नाहीं. आतां इथें शांतपणें बसून जनतेच्या नांवानें खडे फोडण्यांत काय अर्थ आहे? त्या वेळीं जनतेचें आत्मिक बळ एवढें प्रखर झालें होतें कीं, जवळ-जवळ सत्तावनी बंडाची ती पुनरावृत्ति होती असेंच म्हणावयाला हरकत नाहीं!"

"कोण म्हणतो देशावरील काँग्रेसचें वजन घटलें?" असा जेव्हां जवाहरलालनीं बुभुःकार केला तेव्हां सर्वांच्या अंगावर हर्षाचे रोमांच उभे राहिले. "जेथें जेथें मी जातों, तेथें तेथें काँग्रेसच्या झेंड्याखालीं लक्षावधि लोक जमा झालेले मला दिसतात. या ठिकाणीं हा जो प्रचंड जनसमुदाय एकत्र जमलेला आहे, तो काय काँग्रेसचें वजन कमी झालें आहे असें दाखवितो?" असा पुकार पंडितजींनीं करतांच पुन्हां टाळ्यांचा गगनभेदी निनाद चोहींकडून उठला.

"हीं चिन्हें काय दाखवितात? हेंच ना कीं सरकारी दडपशाहीनें जनता घाबरली नाहीं. उलट ती अधिक जोरानें काँग्रेसच्या मागून येऊं लागली आहे! परकी राजसत्ता झुगारून देऊन देश स्वतंत्र करण्याची तिची इच्छा अधिकच प्रबल झालेली आहे! लढाई संपली, तरी जगांतला साम्राज्यवाद अजून मेला नाहीं. पण लक्षांत ठेवा. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय, आशियांतील सारीं परतंत्र राष्ट्रें स्वतंत्र झाल्याशिवाय, जगांत स्वातंत्र्य आणि शांतता प्रस्थापित होणें अशक्य आहे!"

पंडितजींचें भाषण संपतांच त्यांच्या नांवाचा साऱ्या सभागृहामध्यें एवढा प्रचंड जयघोष झाला कीं तो अजूनहि माझ्या कानांत घुमतो आहे.

नायडूंच्या मागून देवधर बॅटिंगला यावेत, तसे पंडितजींच्या मागून जेव्हां वल्लभभाई व्यासपीठावर उभे राहिले, तेव्हां श्रोत्यांच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं. वल्लभभाईंच्या नांवाचा प्रचंड जयघोष चहूंकडे उठला. आणि एकदम सभा स्तब्ध झाली. काँग्रेसच्या आंदोलनाला सरकारनें 'काँग्रेसचें बंड' असें नांव दिलें होतें. त्याचा उल्लेख करून वल्लभभाई म्हणाले, "या नांवाचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार करतों. सत्तावन्न सालच्या बंडाप्रमाणें बेचाळीस सालचें देखील हें बंडच होतें. मला वाईट एवढेंच वाटतें कीं, या बेचाळीसच्या बंडाची आम्हीं तयारी केली नव्हती. तयारी करून जर का आम्हीं हें बंड केलें असतें, तर आमच्या स्वातंत्र्याचा प्रश्न या घटकेला आज शिल्लकच उरला नसता!"

हें वाक्य उच्चारतांच साऱ्या सभेनें वल्लभभाईंना जवळ जवळ वरच्या

वरच उचलून घेतलें. आंतल्या आंत जसें एकादें यज्ञकुंड धुमसावें, तशा आवेशाचा अंगार या वेळीं वल्लभभाईंच्या डोळ्यांमधून भडकूं लागला. ते गरजून म्हणाले, "जनावरें देखील स्वतःचें रक्षण करण्यासाठीं दुसऱ्याच्या अंगावर धांवून जातात, तर आम्ही बोलून चालून माणसेंच होतों. सरकारी दडपशाहीचा आम्हीं प्रतिकार केला. यांत बिघडलें कोठें ?" या वेळीं सभेच्या भावना इतक्या प्रक्षुब्ध झाल्या कीं, त्याला सुमारच नव्हता.

बंगालच्या दुष्काळांत लक्षावधि लोक मेले असून सुद्धां त्या दुष्काळग्रस्त भागाला साधी भेट देण्याची माणुसकी देखील व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं दाखवली नाहीं या गोष्टीचा उल्लेख करून एखाद्या विद्युल्लतेप्रमाणें वल्लभभाई कडाडले कीं, "अशा नालायक सरकारला या देशावर राज्य करण्याचा काय हक्क आहे ?" खलास ! खलास ! वल्लभभाईंच्या क्रोधाचें तें रौद्र स्वरूप पाहून जो तो त्या क्षणीं आपल्या खुर्चीवर अगदीं खलास झाला.

त्या मूर्च्छेनेमधून श्रोतृवृंद पुन्हां जरा कुठें शुद्धीवर येतो आहे तोंच वल्लभभाईंनीं खवळलेल्या सिंहाप्रमाणें पुन्हां विक्राळ गर्जना केली कीं, "लक्षांत ठेवा, आठ ऑगस्टच्या आमच्या 'चले जाव'च्या ठरावांतला एक स्वल्पविराम देखील मागें घ्यावयाला आम्ही तयार नाहीं. उलट हिंदुस्थानांतून चालते व्हा असें आमच्या राज्यकर्त्यांना सांगण्याऐवजीं आतां 'साऱ्या आशिया खंडांतून तुम्ही चालते व्हा!' असें आम्ही त्यांना बजावून सांगतों!"

वल्लभभाईंच्या त्या गर्जनेंत चाळीस कोटि लोकांच्या आवाजाचें सामर्थ्य एकत्रित झालेलें होतें, असेंच सर्वांना त्या वेळीं वाटलें.

प्रत्येक वाक्यावाक्याबरोबर वल्लभभाईंचा आवेश वाढत चालला होता. आणि त्यांच्या गर्जना अधिकाधिक रौद्र आणि क्रुद्ध होत चालल्या होत्या. श्रोत्यांकडे नीट न्याहळून पाहून त्यांनीं घनगंभीर आवाजांत विचारलें, "आठ ऑगस्टचा 'चले जाव'चा ठराव आम्हीं केला म्हणून सरकार आमच्यावर खटले भरून आम्हांला न्यायासनासमोर उभें करणार होतें. आम्हांला न्यायासनासमोर खेंचणारे कुठें आहेत ते लोक ? आम्ही त्यांच्या न्यायासनासमोर उभे राहण्याच्या ऐवजीं याच लोकांना आज जगाच्या न्यायासनासमोर उभें रहावें लागणार आहे ! पुष्कळ लोक म्हणाले कीं, हें 'लोकयुद्ध' होतें. मग मी विचारतों कीं, हे जर लोकयुद्ध होतें तर तें संपल्यानंतर आम्हांला स्वातंत्र्य मिळावयास नको होतें काय ? मग कुठें आहे तें आमचें स्वातंत्र्य ?"

बोलतां बोलतां वल्लभभाईंनीं आपला सूर एकदम चढवला आणि ते गरजले, "आमच्या स्वातंत्र्याच्या मार्गावर आतां आम्हांला कोणीहि अडवूं शकणार नाहीं ! स्वातंत्र्य मिळवण्याची आम्ही प्रतिज्ञा केलेली आहे, आणि आम्ही तें

मिळविणारच मिळवणार !" आभाळांत विद्युल्लतांचा कडकडाट व्हावा तसा त्या वेळीं साऱ्या सभागृहामधून टाळ्यांचा कडकडाट उठला. आणि सिंह गुरगुरत जसा आपल्या गुहेकडे वळावा तसे वल्लभभाई आपल्या जागेवर जाऊन बसले.

सबंध अधिवेशनांतलें अत्यंत तेजस्वी आणि सामर्थ्यवान् भाषण तिसऱ्या दिवशीं पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं केलें. सभागृहांतील वातावरण त्या दिवशीं खूपच तापलें होतें. अनेक वक्त्यांच्या एकाहिपेक्षां एक वीरश्रीयुक्त गर्जना ऐकून सभाजनांचीं डोकीं अक्षरशः ठणकावयाला लागलीं होतीं. श्रोत्यांच्या भावनांचा प्रक्षोभ आतां आणखी वाढवीत नेल्यानें त्यांच्या मनावर जो कांहीं परिणाम आपल्याला करावयाचा आहे, तो होणें शक्य नाहीं हें नेहरूंनीं तावडतोब ओळखलें आणि आपल्या शांत नि गोड आवाजांत अगदीं धिमेपणानें बोलावयास सुरुवात केली.

उन्हांतून खूप तापून आल्यानंतर थंडगार शहाळ्यामधलें पाणी प्याल्यानें आपला अंतरात्मा जसा संतृप्त होतो, तसें पंडितजींच्या वक्तृत्वाचें गुलाबपाणी अंगावर झिमझिम सांडत असतांना आम्हांला त्या वेळीं वाटत होतें. किती वेळ तरी त्याच एका शांतमधुर स्वरांत पंडितजी बोलत होते.

त्यानंतर आतां सभेची मनोभूमिका आपल्याला सर्वस्वी अनुकूल आहे असें दिसतांच पंडितजींनीं लागलीच आपला पवित्रा नि स्वर बदलला. त्यांच्या चेहेऱ्यावरचा आणि डोळ्यांतला तो सौम्यपणा नाहींसा झाला. त्यांच्या गळ्यावरच्या शिरा एकदम फुगून बाहेर आल्या. आपल्या पातळ सदऱ्याच्या बाह्या कोंपरापर्यंत चढवीत चढवीत वाटक टीपण मारण्यापूर्वी जसा दबून बसतो, तशी किंचित् पाठ झुकवून पंडितजींनीं बोलावयास सुरुवात केली. अन् 'मुस्लीम लीग' बद्दल बोलतां बोलतां एकादा ज्वालामुखी फुटावा तसा पंडितजींच्या क्रोधाचा एकदम स्फोट झाला.

ते कडाडून म्हणाले, "कॉंग्रेसच्या अध्यक्षाबद्दल मुस्लिम लीगनें जे अपमानास्पद शब्द उच्चारले, ते आम्ही कधीं विसरूं काय ? आमच्या अध्यक्षांची त्यांनीं सपशेल माफी मागितल्याखेरीज एक शब्द त्यांच्याशीं बोलायला यापुढें आम्ही तयार नाहीं ! नाहीं–नाहीं. मुस्लिम लीगशीं यापुढें आमचा 'समझौता' होणें कदापीहि शक्य नाहीं. मुस्लिम जनतेकडे आम्ही शंभर वेळां जाऊं. पण मुस्लिम लीगच्या दारांत आम्ही पाऊलहि टाकणार नाहीं. एकमेकांशीं सौदा नि ठराव करून स्वातंत्र्याचा लढा कुठें लढतां येतो होय ? आम्ही तुरुंगांत गेलों, तेव्हां आमच्या ठरावाची लोकांनीं काय वासलात लावली ? स्वतंत्र हिंदुस्थाननें काय करावयाचें, तें स्वतंत्र हिंदुस्थानच त्या वेळीं ठरवील !"

पांच मिनिटें एकसारखा ढगांचा नि विजांचा कडकडाट होत रहावा तसें त्या वेळीं झालें. पंडितजींच्या प्रत्येक वाक्यावाक्याला सभागृहामध्यें टाळ्यांचा कल्लोळ होत होता आणि भावनांच्या लाटा उचंबळत होत्या. मेजर नायडूंनीं एकामागून एक लागोपाठ दहा बारा ओव्हर बाऊंडऱ्या मारल्या तर प्रेक्षकांची जी स्थिति होईल,

तशीच निराळ्या दृष्टीनें श्रोत्यांची त्या वेळीं अवस्था झाली. पंडितजींच्या वक्तृत्वाचा हा विक्रम ज्यांनीं त्या दिवशीं पाहिला त्याला आपल्या आयुष्याचें सार्थक झालें असेंच वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

व्याख्यान संपल्यानंतर किती वेळपर्यंत तरी सभामंडपांत टाळ्यांचा अखंड कडकडाट होत राहिला. खरोखरच त्या दिवशीं प्रेक्षकांना जें पहावयाचें होतें, तें पहावयाला मिळालें. आणि श्रोत्यांना जें जें ऐकावयाचें होतें तें तें ऐकावयाला मिळालें.

जवाहरलाल नि वल्लभभाई यांनीं केलेल्या वक्तृत्वाच्या अद्वितीय विक्रमावर शेवटीं राष्ट्रसभापति मौलाना आझाद यांनीं खरोखरच सुवर्णकळस चढविला. उर्दू शब्द-सृष्टीचा जणुं कांहीं बादशहाच बोलतो आहे असा प्रत्येकाला भास झाला. वाहवा, काय तो उच्चाराचा ठसका, काय ती भाषेची मस्ती आणि मिजास, काय तो शब्दा-शब्दांमधून रसरसणारा आवेश ! माझ्या शेजारीं बसलेले नटश्रेष्ठ पृथ्वीराज हर्षभरानें बेहोश होऊन उद्‌गारले, " बस, जबानके मालिक है ! "

मौलाना म्हणाले, " देशप्रेमाचा प्रखर विस्तव या राष्ट्रांत पेटलेला आहे. या विस्तवाला जनतेचे नेते आपल्या पदरानें वारा घालून तो भडकवितात अशा कल्पनेनें सरकारनें साऱ्या नेत्यांना कारागृहांत कोंडून ठेवलें. त्यांना वाटलें कीं देशांतली ही आग आतां विझणार ! पण गेल्य तीन वर्षांत जनतेनें आपल्या अनंत हस्तांनीं ह्या आगीला वारा घालून ती भडकविलेली आहे. माझ्यासमोर त्या आगीनें धगधगणारे शेंकडों निखारे या ठिकाणीं मला दिसता आहेत. सरकारनें लक्षांत ठेवावें कीं देश-प्रेमाचा हा अंगार कालत्रयींहि विझणें शक्य नाहीं. मग समुद्राच्या सहस्रावधि लाटा उसळोत, वरून मोठमोठे पर्वत कोसळोत किंवा सारें आभाळ तुटून खालीं पडो ! "

तीन दिवसांच्या त्या अधिवेशनांत स्वातंत्र्यप्रेमाची जी आग एकसारखी भडकत होती, तिच्या देदीप्यमान ज्वाळांच्या ज्वलंत जिह्वा राष्ट्रपतींच्या भाषणांतून भडकून बाहेर पडल्या !

ते तीन दिवस गोवालिया मैदान ही स्वातंत्र्याच्या वारकऱ्यांची पंढरी झाली होती. राष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांत ज्यांनीं आपलें सर्वस्व बलिदान केलेलें होतें, अशा स्वातंत्र्यवीरांच्या मुखांतून वाहणारी चैतन्याची चंद्रभागा तीन दिवस तेथें दुथडी भरून वाहत होती. आणि त्या चंद्रभागेच्या वाळवंटावर स्वातंत्र्याच्या नामाचा गजर करीत लक्षावधि अंतःकरणें देहभान विसरून तीन दिवस एकसारखीं थयथय नाचत होतीं. चाळीस कोटि जनता ज्या वैकुंठासाठीं—ज्या मोक्षासाठीं गेलीं साठ वर्षें ब्रिटिश सरकारच्या दारांत धरणें धरून बसली होती, तें स्वातंत्र्याचें वैकुंठच, स्वातंत्र्याची मोक्षपेठच जणुं काय त्या ठिकाणीं प्रत्यक्ष उतरलेली होती असाच तीन दिवस सर्वांना साक्षात्कार झाला.

मागील तीन वर्षे स्वातंत्र्यासाठीं राष्ट्रानें आपल्या अश्रूंचें, घर्माचें नि रक्ताचें जें बलिदान केलें, त्या बलिदानानें प्रसन्न झालेल्या परमेश्वरानें त्या तीन दिवसांत आपलें दिव्य दर्शन लक्षावधि लोकांना देऊन त्यांच्या डोळ्यांचें जणुं काय पारणेंच फेडलें ! पारतंत्र्यांत रुतलेल्या भारताचा उद्धार करण्यासाठीं जनताजनार्दन लौकरच जो रुद्रावतार धारण करणार आहे, त्याचें प्रखर स्वरूप त्या तीन दिवसांत प्रकट झालें म्हणूनच कीं काय आकाशहि लक्षावधि पर्जन्यधारांनीं त्या रुद्रावर एकसारखा अभिषेक करीत होतें.

वल्लभभाई पटेल नि जवाहरलाल नेहरू ह्यांनीं हें अधिवेशन गाजवलें अन् जिंकलें असेंच म्हटलें पाहिजे. वल्लभभाईंचें व्यक्तिमत्त्व नि वक्तृत्व पाहून मला क्षणाक्षणाला लोकमान्य टिळकांची आठवण होत होती. तोच वर्ण, तीच आकृति, तीच मुद्रा, तीच गुर्मी अन् गुरगुर आणि बोलण्याची तीच शैली अन तेंच सामर्थ्य. त्यांच्या वयाला सत्तर वर्षे होऊन गेलीं हें कोणाला खरें वाटलें नाहीं. अंगावर उपरणें पांघरून अगदीं साध्या आणि शुभ्र पोषाखांत हळूहळू पावलें टाकीत ते जेव्हां व्यासपीठावर येत, तेव्हां आपलें प्रत्येक पाऊल जणुं कांहीं आपण ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या छातीवर टाकीत आहोंत असा आविर्भाव त्यांच्या मुद्रेवरून दिसून येत असे.

पंडित नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचें आणि वक्तृत्वाचें वैशिष्ट्य यापेक्षां अगदीं वेगळें होतें. त्यांच्या वयाला त्या वेळीं छप्पन्न वर्षे पूर्ण झालीं होतीं किंवा त्यांचे सारे केस रुप्यासारखे पांढरे झाले होते असें सांगणें म्हणजे त्यांची बदनामी करण्यासारखें होतें. पंडिजींची शरीरयष्टि त्या वेळीं पंचवीस तीस वर्षांच्या तरुणासारखी चपळ, लवचिक आणि तेजस्वी दिसत होती, लांबून तर ते अक्षरशः तीस वर्षांच्या तरुणासारखे दिसत.

पंडितजी एका ठिकाणीं कुठें स्थिर बसलेले दिसतील तर शपथ ! घटकेंत ते इथें बसतील, तर थोड्या वेळानें ते टुणकन् उडी मारून उठतील आणि कुठें तरी घाईघाईनें चालत जातील, क्षणांत ते गुडघ्यावर बसून कोणाशीं तरी बोलतील. क्षणांत ते कोणाचे दंड धरून त्याला हालवतील. तर क्षणांत ते रागारागानें हातवारे करून कोणाशीं तरी जोराजोरानें बोलताहेत असें लांबून दिसेल.

जातां जातां एखाद्या स्वयंसेवकाच्या अंगावर ते गुरकावतील तर एखाद्या तरुणाला हंसून ते स्वाक्षरीहि करून देतील. कधीं गळ्यांत सुताचा हार घालून ते येतील. तर कधीं हातांत झेंडूच्या फुलांच्या माळाहि मिरवीत येतील. त्यांच्या अस्तन्या तर एकसारख्या दंडापर्यंत सावरलेल्या आणि पाठ अर्धवट झुकलेली. जणुं काय हा माणूस कोणाशीं द्वंद्वयुद्ध खेळायलाच निघाला आहे कीं काय ?

पाऱ्याप्रमाणें अस्थिर, वाऱ्याप्रमाणें लहरी आणि ताऱ्याप्रमाणें दूरदूर म्हणजे पंडित जवाहरलाल ! छपन्न वर्षांच्या वयाचा आणि पंधरा वर्षांच्या कारावासाचा जवाहरलालांच्या तारुण्यावर आणि चैतन्यावर यत्किंचितहि परिणाम झालेला त्या

वेळीं मला दिसला नाहीं. एकाद्या रवरी चेंडूप्रमाणें ते उडत होते. कारंजाप्रमाणें उसळत होते आणि चित्याप्रमाणें ते पळत होते. पंडितजींचें असें ज्वलंत नि शोभिवंत दर्शन मला पुन्हां आयुष्यांत पहावयाला मिळालें नाहीं.

या तीन दिवसांच्या अधिवेशनांत माझ्या मनांत एकच शल्य एकसारखें डांचत होतें. तें म्हणजे त्या तीन दिवसांत एकहि महाराष्ट्रीय विभूति सभाजनांसमोर आलेली मला पहावयाला मिळाली नाहीं. त्या प्रचंड जनसमुदायासमोर इंग्रजी किंवा हिंदुस्थानी भाषेंत प्रभावी वक्तृत्व करण्याचें सामर्थ्य असलेली एकच महाराष्ट्रीय विभूति होती– पण ती त्या वेळीं भूमिगत होती–आणि आतां सांगायला हरकत नाहीं, ती त्या वेळीं शिवाजी पार्कवरील माझ्याच ‘ आमोद हाऊस ’ मध्यें रहात होती–तिचें नांव ‘ अच्युतराव पटवर्धन ! ’

# ३७

# साताऱ्या चें प्रतिसरकार

ब्रिटिश सरकारला उद्देशून ' छोडो भारत ' आणि ' चले जाव ' अशा गगनभेदी गर्जना जेव्हां महात्मा गांधीजींनीं ८ ऑगस्ट १९४२ रोजीं केल्या, तेव्हां नऊ ऑगस्ट-पासून देशांतील हजारों काँग्रेस-नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची धरपकड करावयास त्या वेळच्या हिंदुस्थान सरकारनें कशी सुरुवात केली, तें मागल्या प्रकरणांत मीं सांगितलें. त्याबरोबर देशाच्या अनेक भागांतून शेंकडों काँग्रेस कार्यकर्ते भूमिगत झाले आणि त्यांनीं सरकारच्या अत्याचारांचा जोरदार प्रतिकार करून, सरकारी राज्ययंत्रणेला ठिकठिकाणीं सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला.

या भूमिगत मंडळींत काँग्रेसमधल्या समाजवादी पक्षाच्या लोकांचा जास्त भरणा होता. या आंदोलनाला ' नऊ ऑगस्टचें आंदोलन ' आणि त्या आंदोलनांत भाग घेणाऱ्या वीरांना ' नऊ ऑगस्टचे स्वातंत्र्यवीर किंवा क्रांतिवीर,' ह्या नांवानीं संबोधण्यांत येऊं लागलें. सातारा, खानदेश, मिदनापूर, बिहार आणि बालिया या भागांत या भूमिगत चळवळीनें विशेष जोर धरला. त्या त्या

ठिकाणीं भूमिगत वीरांच्या हातून पराक्रमाच्या ज्या ज्या तेजस्वी गोष्टी घडून आल्या, त्या भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासांत खरोखरच सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारख्या आहेत.

इतर भागांत घडलेल्या पराक्रमाचा तपशील मला माहीत असण्याचें कारण नव्हतें. पण नऊ ऑगस्टच्या आंदोलनांत महाराष्ट्रामध्यें ज्या कांहीं त्यागाच्या नि पराक्रमाच्या गोष्टी त्या वेळीं घडल्या, त्यांचा वृत्तांत मात्र रोजच्या रोज माझ्या कानांवर येत असे. कारण माझें घर हें त्या वेळीं कांहीं अग्रेसर भूमिगत नेत्यांचें निवासस्थान झालेलें होतें. आणि त्यांना भेटावयाला इतर भूमिगत नेते अधून-मधून येत असत. त्यामुळें भूमिगत आंदोलनामधल्या कांहीं घटना सहजगत्या मला समजत असत.

सानेगुरुजी हेहि त्या वेळीं भूमिगतच होते. आणि 'बेचाळीसच्या आंदालनां'त महाराष्ट्रामधल्या जनतेनें सरकारी दडपशाहीच्या यज्ञांत जेथें जेथें बलिदान केलें होतें, तेथें तेथें प्रत्यक्ष जाऊन त्यांनीं त्या बलिदानाच्या देदीप्यमान कथा एकत्र जमविल्या होत्या. पश्चिम खानदेशमध्यें नंदुरबार येथें तर सरकारनें अत्याचाराचा उच्चांक गांठला होता. त्या ठिकाणीं पोलिसांनीं जो अमानुष गोळीबार केला, तो धनसुख वाणी, घनःश्याम शहा, शिरीष मेहेता आणि शशीधर केतकर या दहा दहा, बारा बारा वर्षांच्या मुलांनीं आपल्या चिमुकल्या छातींवर झेलला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या रक्ताचे सडे शिंपले. हा रोमहर्षक कथाभाग सानेगुरुजी पुढें जाहीर सभांमधून जेव्हां सांगत, तेव्हां स्त्रीपुरुष श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे एकसारखे पाझर वहात.

तथापि, बेचाळीसच्या लढ्यांत सातारा जिल्ह्यानें जी विधायक क्रांति करून दाखविली आणि ब्रिटिश सरकारची कांहीं काळ उचलबांगडी करून त्या ठिकाणीं जनतेचें जें 'प्रतिसरकार' स्थापन केलें, तो भारतीय स्वातंत्र्याच्या राजकारणामधला सर्वांत मोठा चमत्कार होता. बेचाळीस ऑगस्टपासून तों पंचेचाळीस ऑगस्टपर्यंत सातारा जिल्ह्यांतील ब्रिटिश सरकारचा अंमल जवळ जवळ नष्टच झाला होता असें म्हणावयाला हरकत नाहीं. ब्रिटिश सरकारला हें माहीत नव्हतें असें नाहीं; पण त्याचे हात त्या काळीं युद्धांत गुंतलेले होते. म्हणून मनांतल्या मनांत तें जरी किती चरफडत असलें, तरी साताऱ्यांतल्या क्रांतिकारकांविरुद्ध फारशी कारवाई करणें त्याला त्या वेळीं शक्य झालें नाहीं.

आणि दुसरी गोष्ट अशी कीं, युद्धकाळांत सातारा जिल्ह्याकडून सरकारला भरपूर रंगरूट पाहिजे होते. साताऱ्यासारखे निधड्या छातीचे शूर लढवय्ये शिपाई दुसऱ्या भागांतून मिळणें शक्य नाहीं हें तें पुरतेपणीं ओळखून होतें. तेव्हां सातारा जिल्ह्याविरुद्ध हात उगारून आपल्या युद्धप्रयत्नाच्या पायावर धोंडा पाडून घेण्याइतकें सरकार कांहीं मूर्ख नव्हतें. म्हणून कधीं आपण या युद्धाच्या जंजाळांतून मोकळें होतों

आहोंत आणि कधीं या बेचाळीसच्या बंडाची उठावणी करणाऱ्या सातारा जिल्ह्यांतील स्वातंत्र्यवीरांचीं आपण कंबरडीं मोडतों आहोंत असें सरकारला होऊन गेलें होतें.

म्हणून जपानचें युद्ध संपून दहा दिवस झाले नाहींत तोंच विजयाच्या धुंदीनें उन्मत्त झालेल्या सरकारनें आपल्या साऱ्या पाशवी बळाचा बडगा सातारा जिल्ह्याच्या कपाळावर हाणून तेथील कॉंग्रेसप्रेमी आणि स्वातंत्र्यवादी जनतेला रक्तबंबाळ करून सोडलें. युद्ध संपल्यानंतर साताऱ्यामधून रंगरूटभरती होण्याची जरुरी जशी नाहींशी झाली, तसा सरकारच्या अंतःकरणांत इतकीं वर्षें दडून बसलेल्या साताऱ्याबद्दलच्या सूडाच्या भावनांनीं एकदम पेट घेतला आणि त्यानें दडपशाहीचें भयानक सत्र पंचेचाळीस सालच्या ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सातारा जिल्ह्यांत सुरू केलें.

आपली जुलमी दडपशाही बाहेरच्या जगाच्या दृष्टीनें समर्थनीय आणि कायदेशीर वाटावी म्हणून सातारा जिल्ह्यांत अत्याचारांचा प्रचंड ज्वालामुखी पेटला असून सत्तावन्न सालच्या बंडापेक्षांहि भयानक परिस्थिति तेथें निर्माण झालेली आहे, अशा धादांत खोट्या, विपर्यस्त आणि अतिरिक्त वृत्तांतांचीं शेकडों सचित्र आणि छापील पत्रकें मुंबई सरकारनें सर्वत्र वाटावयाचा सपाटा सुरू केला.

सातारा जिल्ह्यांत दहशतवादी राक्षसांच्या म्हणे भयंकर टोळ्या हिंडत असून त्या गरीब प्रजेवर एकापेक्षांहि एक भयंकर अत्याचार करीत आहेत, कोणाचे खून करीत आहेत, कोणाचे हातपाय तोडीत आहेत. कोणाच्या पायाला पत्र्या ठोकीत आहेत, लोकांचीं घरेंदारें जाळीत आहेत, सरकारी खजिने लुटीत आहेत. आणि त्यामुळें सातारा जिल्ह्यांतील लोकांची म्हणे ‘ दे माय धरणी ठाय ’ अशी स्थिति होऊन गेली आहे. अशा अर्थाचीं तीं पत्रकें होतीं. गोबेल्स जर त्या वेळीं जिवंत असता तर तीं भयंकर पत्रकें वाचून तो देखील मुंबई सरकारच्या प्रसिद्धीखात्याला शरण गेला असता.

एवढाच छापील शंखध्वनि करून मुंबई सरकार थांबलें नाहीं. तर साताऱ्यांतील राष्ट्रसेवादल, दहशतवादी दल, कॉंग्रेस सरकार, प्रतिसरकार, पत्री सरकार, न्यायदान मंडळ इत्यादि अनेक खऱ्या किंवा काल्पनिक संघटना सरकारनें फटाफट बेकायदेशीर करून टाकल्या. शेंकडों लोकांना पकडून त्यांच्यावर खटले न भरतां त्यांना तसेंच तुरुंगांत फेकून दिलें. अनेक खेडेगांवांमधून सामुदायिक दंड जबरीनें वसूल केले. हजारों हत्यारी पोलिसांचा साऱ्या जिल्ह्यामधून जागता पहारा बसवला. एवढा बंदोबस्तहि जणुं कांहीं अपुराच वाटून ‘ उरवठ्याला पुरवठा ’ म्हणून तोफा बंदुकांसह एक गोरें लष्करहि सरकारनें नेऊन तें सातारा जिल्ह्याच्या उरावर बसविलें.

साताऱ्यांतील ‘ पत्रीसरकारच्या अत्याचारांचीं पाळेंमुळें खणून टाकण्याच्या

कामीं सरकारला अखेर यश आल्याबद्दल मुंबईच्या ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ आणि ‘ विविधवृत्त ’ ह्या दोन देशद्रोही पत्रांनीं मात्र सरकारचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. ज्या सातारा जिल्ह्यानें दुसऱ्या महायुद्धांत सरकारच्या संरक्षणासाठीं आपल्या तरुण रक्ताच्या परदेशांत नद्या वाहवल्या, त्या पराक्रमी सातारा जिल्ह्यावर सरकारनें असा अमानुष सूड घ्यावा, ही कृतघ्नतेची पराकाष्ठा होती.

सातारा जिल्ह्यांतील दहशतवादी चळवळीला त्रेचाळीस सालच्या अखेरीस सुरुवात झाली असें सरकारचें म्हणणें होतें. म्हणजे त्यानंतर जवळ जवळ दोनतीन वर्षें सातारा जिल्ह्यांत चोऱ्यामाऱ्या, डाके दरवडे, खून, तंगडीतोड आणि पत्रीमार यांना भयंकर ऊत आला होता. आणि पत्रीसरकारच्या अत्याचारांनीं जिल्ह्यांतील एकूण एक प्रजा अत्यंत संत्रस्त झालेली होती असा सरकारचा दावा होता.

ह्या सरकारच्या भूमिकेवर मीं माझ्या ‘ नवयुग ’मधून त्यावेळीं कडाडून हल्ला चढवला. माझ्या अग्रलेखांतून मीं सरकारला सरळ सवाल टाकला, कीं, ‘ तुम्ही म्हणतां तसे जर प्रकार सातारा जिल्ह्यांत चालले होते, तर मग या अनन्वित जुलुमा-विरुद्ध जिल्ह्यांतल्या जनतेपैकीं कोणी एकानें तरी चव्हाट्यावर येऊन बोंब कां मारली नाहीं ? सातारा जिल्ह्यामधले कितीतरी रहिवासी बाहेर येत होते आणि किती तरी बाहेरचे लोक साताऱ्यांत जात होते. पण त्यांपैकीं कोणीहि कशी या अत्याचाराविरुद्ध तक्रार केली नाहीं, किंवा या बंडाळीची बातमी बाहेर आणली नाहीं ? आजपर्यंत एकाद्या तरी वृत्तपत्रांत किंवा सभेंत सातारा जिल्ह्यांतील या यमयातनांना तोंड फुटायला नको होतें का ?

बरें, सातारा जिल्ह्यांत जर अत्याचाराचा एवढा भयंकर डोंब गेलीं दोन तीन वर्षं उसळलेला होता, तर सातारा जिल्हयांतील सरकारी आणि पोलीस अधिकारी इतकीं वर्षें आपल्या आरामखुर्च्यांमध्यें पाय तणावून झोपा काढीत होते का जागे असून साताऱ्या जिल्ह्यांतील म्हशी भादरण्याच्या कामांत गुंतलेले होते ? झोपेंतून दचकून जागे झालेल्या पोराप्रमाणें आतां तीन वर्षांनंतर एकदम ‘ बंड ! बंड ! ’ म्हणून सरकार का सैरावैरा किंचाळत सुटलेलें आहे ? ”

सारांश, सरकारची ती आरडाओरड निव्वळ कांगावखोरपणाची आणि जनतेची शुद्ध फसवणूक करणारी होती. सातारा जिल्ह्यांतील स्वातंत्र्यवादी जनतेवर सूड घेण्यासाठीं कल्पनेचा भरमसाट मसाला घालून मुंबई सरकारनें तें एक थोतांड उभें केलें होतें.

तीन वर्षांच्या काळांत सातारा जिल्ह्यांत आठ जणांचे खून झाले, चौघांचे हात पाय तोडण्यांत आले आणि सत्तर लोकांना पत्र्या मारण्यांत आल्या असें सरकारनें आपल्या पत्रकांत म्हटलें होतें. ती माहिती खरी आहे असें मानलें, तरी ते अत्याचार अमुक एका संघटनेनें, संघानें किंवा कार्यकर्त्यांनीं केले होतें असें सरकारला कायद्याच्या

१९

कोर्टांत सिद्ध करतां येणें शक्य नव्हतें. ही गोष्ट कांहीं पोलीस अधिकाऱ्यांनीं सुद्धां कबूल केली होती.

खरी वस्तुस्थिति अशी होती कीं सातारा जिल्हा हा गुन्हेगार जिल्हा म्हणून अनेक वर्षांपासून गाजलेला होता. ह्या जिल्ह्यांत रोज दरोडे पडत असत आणि दर दोन दिवसांआड एक खून होत असे. सरकारला त्या जिल्ह्यांतली ही गुन्हेगारी तोंपर्यंत कधींहि थांबवितां आली नव्हती. हे निर्ढावलेले बदमाष गुन्हे करतांना काँग्रेस कार्य-कर्त्यांप्रमाणें खादीचे कपडे अंगावर घालीत आणि तोंडानें काँग्रेसच्या घोषणांचा जय-जयकार करीत. ही गोष्ट जिल्ह्यांतील त्या वेळच्या सरकारी अधिकाऱ्यांना माहीत असून सुद्धां जिल्ह्यांतील साऱ्या अत्याचारांचें खापर 'प्रतिसरकार'च्या टाळक्यावर जाणूनबुजून फोडून ते खऱ्या बदमाषांना राजरोसपणें आपल्या पाठीशीं घालीत होते.

त्या तीन वर्षांच्या काळांत सातारा जिल्ह्यांतल्या दरोडेखोरीला आणि गुन्ह्यांना असा कांहीं ऊत आला होता कीं कांहीं विचारूं नका. दिवसाढवळ्या शेतांतलीं उभीं पिकें कापून नेलीं जात किंवा गंजींना आणि घरांना आगी लागत. दर दोन दिवसांआड वाळवे तालुक्यांत खून झाला नाहीं असें कधीं घडत नसे. संध्याकाळ झाली कीं घरा-बाहेर एकटे दुकटे पडण्याची मी मी म्हणणाऱ्याची प्राज्ञा नव्हती. बायका माणसांवर काय वाटेल ते अत्याचार होत असत. चोरट्या दारूच्या व्यापारानें तर जिल्ह्यामधल्या दारूबाजीला असा कांहीं महापूर आला होता कीं कांहीं विचारूं नका. फौजदारी आणि दिवाणी दाव्यांनीं सरकारी कोर्टें तुडुंब भरून एकसारखीं वहात होतीं. 'नको नको या जिल्ह्यांत रहाणें किंवा जगणें' असें साऱ्या रयतेला होऊन गेलें होतें. आणि त्या हालांत लढाईमुळें उत्पन्न झालेल्या धान्याच्या आणि कापडाच्या दुष्काळाची आणखी भर पडलेली!

अशा अनेक तऱ्हेच्या यमयातनांमधून सातारा जिल्ह्यामधील आम प्रजेची सुटका करून जिल्ह्यामध्यें कायदा आणि सुव्यवस्था जर कोणी खरी प्रस्थापित केलेली असेल तर ती त्या वेळच्या मुंबई सरकारनें नसून जिल्ह्यांतील भूमिगत कार्यकर्त्यांनीं होय. महात्माजींच्या आदेशाप्रमाणें त्या कार्यकर्त्यांनीं तीन वर्षांच्या काळांत त्या जिल्ह्यामध्यें विविध तऱ्हेच्या ग्रामसंघटनांचा विधायक कार्यक्रम अंमलांत आणून तेथील जनतेच्या जीवनामध्यें अपूर्व क्रांति घडवून आणली.

जिल्ह्यामधील मारामाऱ्या आणि तंटेबखेडे सपशेल संपुष्टांत आणले. गरीब रयतेला एका रुपयांत झटपट न्याय देणाऱ्या निःपक्षपाती न्यायसभा चहूंकडे प्रस्थापित केल्या. त्यामुळें सरकारच्या दिवाणी आणि फौजदारी कोर्टांना माशा मारीत बसण्यापलीकडे त्या वेळीं दुसरा उद्योगच राहिला नाहीं. सातारा जिल्ह्यांत सरकार म्हणत होतें त्याप्रमाणें 'रक्ताचें राज्य' तर नव्हतेंच नव्हतें, पण साऱ्या भारतवर्षाला आदर्श ठरेल अशा प्रकारचें एक आदर्श 'ग्रामराज्य' सातारा जिल्ह्यांत त्या वेळीं

अवतीर्ण झालें होतें.

ह्याच ग्रामराज्याला 'प्रतिसरकार' असें नांव पुढें प्राप्त झालें. सातारा जिल्ह्यांतील स्वातंत्र्यवादी प्रजेनें प्रस्थापित केलेलें हें अलौकिक शांततामय ग्रामराज्य उखडून टाकून तेथील जनतेची क्रांतिकारक संघटना कायमची जमीनदोस्त करून टाकण्यासाठीं मुंबई सरकारनें बंडाचें काल्पनिक भूत निर्माण केलें होतें.

खरें पहातां 'चोराच्या उलट्या बोंबा' या न्यायानें साताऱ्यांतील जनतेवर जर कोणी खरोखरच अत्याचार केले असतील आणि रयतेचा जर कोणी खरोखरच छळ केला असेल, तर तो मुंबई सरकारच्या पोलीस अधिकाऱ्यांनीं. बेचाळीस सालीं वडूज येथील जनतेच्या शांततामय मोर्चावर ज्या वेळीं सरकारनें गोळीबार केला आणि परशुराम पहेलवानाचा बळी घेतला, त्याच वेळीं त्यानें सातारा जिल्ह्यामधील पोलिसी राज्याची मुहूर्तमेढ रोवली.

बेचाळीस ते पंचेचाळीस सालपर्यंतच्या तीन वर्षांत पोलिसांनीं हजारांपेक्षांहि जास्त लोक तुरुंगांत पाठवले. सहा लोक तुरुंगांत कधीं मेले, त्याचा कोणाला पत्ता नव्हता. तेरा लोक पोलिसांच्या गोळीबारांत ठार झाले. चौतीस गांवांमधील गरीब लोकांकडून जवळ जवळ चाळीस हजार रुपयांच्या वर दंड सक्तीनें वसूल करण्यांत आला. जे लोक आपलें गांव सोडून वर्षानुवर्षें परठिकाणीं स्थायिक झालेले होते, त्यांच्याकडूनहि दंड वसूल करून सरकारनें अन्यायाचा उच्चांक मोडला. आणि भूमिगत कार्यकर्त्यांचा ठावठिकाणा मिळविण्यासाठीं त्यांच्या स्त्री पुरुष नातेवाईकांवर पोलिसांनीं जे कांहीं अनन्वित अत्याचार केले, त्याचीं भयानक वर्णनें ऐकून कोणाचेंहि रक्त गोठून गेल्यावांचून राहिलें नसतें.

भूमिगत काँग्रेस कार्यकर्त्यांनीं स्थापन केलेलें 'प्रतिसरकार' हें 'पत्री सरकार' आहे, कारण तें लोकांच्या पायांना पत्र्या मारतें, ह्या गोष्टीचा मुंबई सरकारनें विशेष गवगवा केला होता. पण स्वतः सरकारनें काय केलें होतें? संशयित माणसाला गुन्हा कबूल करावयास लावण्यासाठीं पोलीस 'सुंद्री' आणि 'भरमाप्प्या' या नांवाच्या मारहाणीच्या ज्या मध्ययुगीन अघोरी पद्धति उपयोगांत आणीत होते, त्या इतक्या भयंकर होत्या, कीं त्यांचीं वर्णनें जर लोकांना समजलीं असतीं, तर त्यांच्या आंतड्यांना पीळ पडला असता.

म्हणून तीन वर्षें सातारा जिल्ह्यांत दहशतवादी लोकांचें 'पत्री सरकार' राज्य करीत होतें हें म्हणणें खरें नसून त्या ठिकाणीं अत्याचारी पोलिसांचें 'सुंद्री सरकार' मात्र राज्य करीत होतें, हें म्हणणें सत्याला अधिक धरून झालें असतें. हातपाय तुटलेल्या एका माणसाचें चित्र दाखवून 'पत्री सरकार'च्या क्रौर्याची जाहिरात आपल्या पत्रकांतून मुंबई सरकार त्या वेळीं करीत होतें. तथापि पोलिसांच्या 'सुंद्री सरकार'च्या किंवा 'भरमाप्प्या सरकार'च्या दुर्दैवी बळींचीं भेसूर चित्रें वृत्तपत्रां-

मधून प्रसिद्ध करण्याची शक्यता नसल्यामुळें सरकारचीं दुष्कृत्यें त्या वेळीं चव्हाट्यावर येऊं शकलीं नाहींत.

सातारा जिल्ह्यांतील परिस्थितीबाबत सरकारनें त्या वेळीं जीं भरमसाट पत्रकें काढलीं होतीं, त्यांमध्यें वर्णन केलेल्या हकीगती कितपत सत्य आहेत हें प्रत्यक्ष पाहून येण्यासाठीं सुप्रसिद्ध समाज–कार्यकर्ते सोली बाटलीवाला ह्यांनीं सातारा जिल्ह्यांत बारा दिवसांचा पायीं दौरा काढला. ह्या दौऱ्यांत त्यांनीं प्रत्येक पोलिसठाण्याला भेट दिली आणि जिल्हाधिकाऱ्यापासून तों तहत खालच्या अधिकाऱ्यापर्यंत ते सर्व अधिकाऱ्यांना भेटले. अनेक खेडेगांवांमध्यें जाऊन त्यांनीं शेंकडों लोकांच्या गांठीभेटी घेतल्या.

त्यानंतर आपल्या दौऱ्याचा निष्कर्ष त्यांनीं एका प्रदीर्घ पत्रकांत प्रसिद्ध केला. तो मीं माझ्या ९ सप्टेंबर १९४५च्या 'नवयुगां'त प्रसिद्ध केला आहे. त्या पत्रकाच्या प्रारंभींच त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, " मी छातीवर हात ठेवून सांगतों कीं, सातारा जिल्ह्याबाबत सरकारनें काढलेलीं सर्व पत्रकें जनतेची दिशाभूल करणारीं आहेत. त्या पत्रकांमध्यें सत्याची जाणूनबुजून मुस्कटदाबी करण्यांत आलेली असून खोट्या गोष्टींवर खऱ्याचा मुलामा देण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करण्यांत आलेला आहे. "

सातारा जिल्ह्यांतले निर्ढावलेले दरवडेखोर खादीचे पांढरे कपडे घालतात, हातांत तिरंगी झेंडे घेतात आणि कॉंग्रेसच्या घोषणा तोंडानें म्हणतात. एवढेंच नव्हे तर आपण केलेल्या गुन्ह्याचा आरोप भूमिगत कॉंग्रेस नेत्यांवर यावा असा खोटा पुरावा बनवतात, ही गोष्ट अगदीं खरी असल्याचें बाटलीवाल्यांनीं आपल्या पत्रकांत मान्य केलें होतें. त्यासंबंधीं लिहितांना त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, " सातारा येथें सध्यां सुरू असलेल्या एका डाक्याच्या खटल्यांत सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते नाना पाटील यांची बनावट सही करून खऱ्या गुन्हेगारांनीं एक चिठ्ठी गुन्ह्याच्या जागीं ठेवून दिली होती. हेतु हा कीं, त्या गुन्ह्याचा संशय नाना पाटलांवर यावा. "

एका बड्या पोलीस अधिकाऱ्यानें बाटलीवाल्यांना सांगितलें कीं, ' भूमिगत असलेले नाना पाटील, पांडु मास्तर किंवा किसन वीर हे प्रकट होऊन जर आमच्या स्वाधीन झाले, तर त्यांच्या विरुद्ध एक देखील खटला आम्हांला भरतां यावयाचा नाहीं. कारण त्यांच्या हातून अत्याचारी कृत्य झालेलें आहे किंवा अत्याचारी चळवळीशीं त्यांचा संबंध आहे, हें सिद्ध करण्याजोगा कांहीं एक पुरावा आमच्या जवळ नाहीं म्हणून पकडलेल्या लोकांच्यावर खटले न भरतां त्यांना आम्हांला भारत रक्षण कायद्याच्या १२९ व्या कलमाखालीं अटकेमध्यें ठेवणें भाग पडलेलें आहे. "

साताऱ्यांतील भूमिगत कार्यकर्त्यांचा बाटलीवाल्यांनीं आपल्या पत्रकांत जो गौरव केला तो येथें देण्यासारखा आहे. " सातारा जिल्ह्याच्या अगदीं कानाकोपऱ्यामधून मी हिंडलों. पण जेथें जावें तेथें लोक भूमिगत कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या अमर्याद

देशभक्तीच्या, त्यागाच्या आणि प्रामाणिकपणाच्या एकापेक्षां एक विलक्षण गोष्टी सांगत. त्या ऐकून माझी खात्री झाली, कीं हे सारे भूमिगत कार्यकर्ते उत्तम चारित्र्याचे लोक आहेत. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी हेंच यांचें ब्रीद आहे. त्यांचें वर्तन अगदीं शुद्ध आहे. त्यामुळें शेंकडों लोक त्यांच्यावर प्राणापलीकडे प्रेम करतात आणि त्यांना मान देतात. हे भूमिगत कार्यकर्ते अगदीं उघडपणें जनतेमधून वावरतात. त्यांचीं व्याख्यानें ऐकावयाला हजारों लोक जमतात. पोलिसांच्या कचाट्यामधून त्यांना वाचविण्यासाठीं अगदीं म्हाताऱ्या कोताऱ्या बाया देखील 'हा माझा मुलगा आहे!' असें वेळाशक सांगतात."

भूमिगत कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं जो विधायक कार्यक्रम अंमलांत आणला, त्याचें तपशीलवार वर्णन बाटलीवाल्यांनीं आपल्या पत्रकांत केलें होतें. ह्या भूमिगतांनीं जिल्ह्यांतला दारूचा चोरटा व्यापार अजिबात थांबविला. त्यांनीं ग्रामपंचायती आणि लवादमंडळें स्थापन करून फौजदारी आणि दिवाणी खटले मपुष्टांत आणले. जिल्ह्यांतील गांवगुंडांना आणि चोर-डाकूंना दहशत बसविली. लग्नसमारंभांत जेवणावळीवर आणि ताशा-वाजंत्रीवर जो निष्कारण खर्च होई तो कटाप करून टाकला. दहा ते पंधरा रुपये खर्चांत होणाऱ्या 'गांधी विवाहा'ची पद्धति सुरू केली. सावकारावर बहिष्कार टाकण्यांत आला. काळ्या बाजारवाल्यांना जरब बसवण्यांत आली. त्याप्रमाणें 'तुफान सैनिकां'ची संघटना काढून तिच्यामार्फत सूत कातणें, खादी विकणें, कॉंग्रेसचे सभासद करणें, हरिजनांचा उद्धार करणें, हिंदी शिक्षणाचे वर्ग चालवणें, निरक्षरांत साक्षरतेचा प्रसार करणें, वृत्तपत्राचें सार्वजनिक वाचन करणें, असें राष्ट्रीय स्वरूपाचें विधायक कार्य ह्या भूमिगतांनीं अत्यंत निष्ठेनें नि कसोशीनें जिल्ह्यामध्यें सर्वत्र चालू ठेवलें होतें.

बेचाळीसच्या आंदोलनाशीं सर्वस्वी समरस झालेलें असें एकच पत्र त्या वेळीं महाराष्ट्रांत होतें. तें म्हणजे माझें 'साप्ताहिक नवयुग'. या आंदोलनाचें जोरदार समर्थन करणारें आणि त्या आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांचीं चरित्रें आणि त्यांचे पराक्रम ह्यांचें इत्थंभूत वर्णन करणारे शेंकडों लेख मीं त्या वेळीं माझ्या 'नवयुग'मध्यें प्रसिद्ध केले. कित्येक नेत्यांच्या नांवानें तर मीं खास अंक काढले. त्यामुळें महाराष्ट्रांत 'नवयुग' कमालीचा लोकप्रिय झाला. खेडेगांवांत 'नवयुग'चें जाहीर वाचन होऊं लागलें. कित्येकदां तर तीन तीन आण्यांचा अंक बारा बारा आण्याला विकला जाऊं लागला. 'नवयुगनेंच महाराष्ट्राला कॉंग्रेसभक्ति शिकविली' असें सानेगुरुजींनीं मला मुद्दाम पत्र लिहून त्या वेळीं कळविलें.

महाराष्ट्रांतल्या बेचाळीशी आंदोलनाचें नेतृत्व त्या वेळीं अच्युतराव पटवर्धनांकडे होतें. त्यांचें भूमिगत वास्तव्य त्यावेळीं मुंबईतच होतें. कांहीं ठराविक घरांतच ते दोन दोन तीन तीन दिवस रहात. त्यांपैकीं एक घर माझें होतें. तोंपर्यंत त्यांची नि माझी

तशी विशेष ओळख नव्हती. सध्यां कॉंग्रेसमध्यें प्रतिष्ठित झालेले श्री. ग. बा. ऊर्फ भाऊसाहेब नेवाळकर ह्यांनीं माझें घर त्यांना दाखविलें. त्या वेळीं नेवाळकर हेहि भूमिगत होते. आणि त्यांनीं ' नवरे ' हें नांव धारण केलें होतें.

अच्युतरावांनीं मात्र बेमालूम वेषांतर केलें होतें. ओठावर पडत्या मिशा, डोक्याला ब्राह्मणी पद्धतीचा रुमाल आणि गळ्याभोंवतीं आंखुड कोटावर उपरणें, यामुळें ते आपल्या जनक वडिलांसारखे म्हणजे नगरच्या हरिभाऊ पटवर्धन वकिलांसारखे दिसत. त्यांना शेंकडों वेळा पूर्वीं ज्यांनीं बघितलें होतें, त्यांना देखील ते ओळखूं आले नसते. मग पोलिसांची काय कथा !

त्याबद्दलची एक गंमतीदार गोष्टच सांगतों. पंचेचाळीस सालच्या फेब्रुवारी महिन्यांतली गोष्ट. त्या महिन्याच्या पांच का सहा तारखेला अच्युतरावांचा वाढदिवस येतो. त्या दिवशीं पहांटे अच्युतराव अकस्मात् माझ्या घरीं आले नि म्हणाले, " आज माझा वाढदिवस आहे. तेव्हां हा दिवस मी तुमच्या घरीं निवांतपणें आत्मचिंतनांत आणि माझ्या कांहीं प्रिय मित्रांना पत्रे लिहिण्यांत घालविणार आहें. त्याप्रमाणें माझ्या दिवाणखान्याबाहेरच्या पडदानशीन ग्यालरींत मी त्यांची बंदिस्त व्यवस्था केली.

पण कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं मीं प्रा. दत्तो वामन पोतदार, प्रा. माधवराव अळतेकर, प्रा. कृ. पां. कुळकर्णी ह्या साहित्यिकांना घरीं जेवायला बोलावलें होतें. हा कार्यक्रम आधींच ठरलेला असल्यानें तो अच्युतरावांसाठीं मला तहकूब करणें शक्य नव्हतें. भोजनाच्या वेळीं मीं अच्युतरावांना विचारलें, " तुम्ही आमच्यामध्यें येऊन जेवतां, का तुमची निराळी व्यवस्था करूं ? "

अच्युतराव म्हणाले. " तुमच्यामध्यें येऊन बसायला माझी कांहीं हरकत नाहीं ! "

त्याप्रमाणें अच्युतराव आमच्या टेबलावर येऊन बसले. ' विजापूरचे मोडक वकील ' म्हणून मीं त्यांची बाकीच्या मंडळींना ओळख करून दिली. ' आज त्यांचा वाढदिवस आहे ' असें सांगून मीं सर्वांसमक्ष त्यांच्या गळ्यांत हारहि घातला. जेवतांना गप्पा मारतां मारतां अच्युतरावांनीं आपल्या बुद्धिमत्तेचा प्रभाव सर्वांच्यावर पाडला. पण एकानेंहि त्यांना ओळखलें नाहीं. भोजन संपल्यावर बाकीची सर्व मंडळी निघून गेली आणि एकटे दत्तोपंत पोतदार काय ते मागें राहिले. त्यांची नि अच्युतरावांची आणि त्यांच्या वडिलांची चांगलीच ओळख होती. म्हणून आपलें रहस्य त्यांच्याजवळ प्रकट करावयाला हरकत नाहीं, असें अच्युतरावांनीं मला सांगितल्यावर मीं दत्तोपंतांची गंमत करावयाचें ठरविलें.

दिवाणखान्यांत आल्यानंतर मी दत्तोपंतांना म्हणालों, " दत्तोपंत, तुमची नि या मोडक वकिलांची चांगलीच जानपछान आहे. तुम्ही त्यांच्या वडलांना चांगले

ओळखत होतां. तुम्ही त्यांच्या घरीं अनेकदां उतरलां आहांत. त्यांच्या पंगतीला जेवलां आहांत. मग आज त्यांना कसे विसरलांत ? "

दत्तोपंतांनीं चांगलीं दहा मिनिटें अच्युतरावांना पायापासून डोक्यापर्यंत नीट न्याहाळलें. इकडून पाहिलें. तिकडून पाहिलें. खूप डोकें खाजविलें. पण 'मोडक वकिलां'ची त्यांना कांहीं ओळख पटेना.

शेवटीं नाइलाजानें ते म्हणाले, "आपण हरलों बुवा! आपण ह्यांना पूर्वीं कधीं पाहिल्याचें आठवत नाहीं!"

मग अच्युतरावांचें नांव जेव्हां मीं त्यांना सांगितलें, तेव्हां अच्युतरावांच्या दंडाला धरून ते मोठमोठ्यानें हंसूं लागले. आम्ही दोघेहि पोट धरधरून हंसलों. अशी ती गंमत.

अच्युतरावांप्रमाणें अरुणा असफअली ह्याहि आठवड्यांतून कांहीं दिवस आमच्या घरीं रहात असत. अच्युतरावांना भेटावयाला साने गुरुजी एका दुपारीं आमच्या घरीं आले. त्याच वेळीं त्यांची नि माझी पहिल्यानें भेट झाली ती हकीगत पुढें सांगेन. 'एसेम्' हे 'मियाँ'च्या वेषभूषेंत त्या वेळीं वावरत होते. ते एकदा आमच्या घरीं आले होते. त्या वेळीं मी बाहेरगांवीं गेलों होतों. आमच्या घरीं त्या वेळीं 'ज्ञानप्रकाश'चे काकासाहेब लिमये होते. त्यांनीं 'एसेम्' मियाँना कांहीं पहिल्या छूट ओळखलें नाहीं.

साताऱ्या 'प्रतिसरकार'च्या कार्याची आणि क्रांतिसिंह नाना पाटलांच्या कामगिरीची ओळख मला त्या वेळीं अच्युतराव पटवर्धनांनींच करून दिली आणि अच्युतराव पटवर्धनांमुळेंच मी समाजवादाकडे ओढला गेलों.

# ३८

## निवडणुकीची तुतारी मी फुंकली !

२१ सप्टेंबर १९४५ रोजीं मुंबईच्या गोवालिया टँकवर भरलेल्या काँग्रेसच्या विराट् अधिवेशनांत काँग्रेस नेत्यांनीं ज्या सिंहगर्जना केल्या त्यांचे पडसाद साऱ्या देशांत उमटले आणि साऱ्या देशांत एक निराळेंच चैतन्य निर्माण झालें. माझ्या व्यक्तिमत्त्वांत तर एक निराळाच संचार झाला. म्हणून आगामी निवडणुकांसाठीं काँग्रेसच्या वतीनें प्रचाराचा पहिला डंका पुण्यांत वाजवण्याचा मीं निर्धार केला. पुष्कळ वर्षांत माझें पुण्यांत जाहीर भाषण झालें नसल्यानें ८ नोव्हेंबर १९४५ रोजीं रात्रौ पुण्याच्या मंडईत माझें जाहीर भाषण जेव्हां झालें, तेव्हां हजारों श्रोत्यांचा महासागरच जणुं मंडईच्या आवारांत त्या रात्रीं उसळला. काँग्रेसच्या झेंड्याखालीं एवढी विराट् सभा पुण्यांत फार वर्षांमध्यें भरली नव्हती.

अध्यक्षस्थानीं केशवराव जेधे होते. माझी ओळख श्रोत्यांना करून देतांना ते म्हणाले, "आठ नऊ वर्षांपूर्वी आचार्य अत्रे आमच्या काँग्रेसमध्यें सामील झाले 'राजकारणाच्या पाण्यांत उडीच मारावयाची तर ती महासागराच्याच पाण्यांत मारलेली

धरी, डबक्याच्या चिखलांत मारून काय फायदा?' असे त्यांनीं त्या वेळीं उद्गार काढलेले होते. (टाळ्या). गेलीं आठ वर्षे ते कॉंग्रेसची सेवा वाणीनें आणि लेखणीनें मोठ्या आस्थेनें आणि निष्ठेनें करीत आहेत. कॉंग्रेसच्या विरोधकांच्या अंगावरचीं सालडीं सोलून काढून त्यांचें खरें स्वरूप जर कोणीं दाखविलें असेल, तर तें आचार्य अत्रे यांनीं! (प्रचंड टाळ्या). कॉंग्रेसच्या कार्याशीं त्यांनीं जें इमान राखलें आहे, तें अवर्णनीय आहे. बहुजन समाजाला समजेल अशाच भाषेंत बोलण्याचा अत्रे यांचा हातखंडा असल्यानें ते महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय वक्ते ठरले आहेत." (टाळ्या).

त्यानंतर 'महात्मा गांधी की जय'च्या गगनभेदी गर्जनांमध्यें आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत मी बोलावयाला उभा राहिलों, "चार वर्षांच्या दीर्घ कालानंतर आपली या तिरंगी झेंड्याखालीं भेट होत आहे. पुणें शहर हें नांवाप्रमाणें पुण्यपत्तन आहे. भारतीय राजकारणाचें तें तीर्थक्षेत्र आहे. (टाळ्या). 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही गर्जना लोकमान्य टिळकांनीं प्रथम याच पुणें शहरांत केली. (टाळ्या). आज या क्षणाला आपल्या 'भारताचा प्राण' या पुणें शहरामध्येंच राहात आहे. (दोन तीन मिनिटें टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट). राष्ट्रांतील थोर थोर नेत्यांनीं कारागृहवासाच्या निमित्तानें येथें राहून या पुणें शहराला जास्त पुण्यवान केलें आहे. (टाळ्या)

"सहा कोटि अस्पृश्य बंधु आपल्या हिंदु समाजामधून फुटून दूर जाऊं नयेत म्हणून महात्माजींनीं आपले प्राण याच पुण्यामध्यें पणाला लावले होते. (टाळ्या). राष्ट्रमाता कस्तुरबा यांनीं आपला देह स्वातंत्र्यासाठीं लढतां लढतां याच पुणें शहरामध्यें ठेवला! (टाळ्या). असें हें आपलें पुणें आहे. आणि ही मंडई आपल्या पुण्याचा प्राण आहे. (हंशा). मुळामुठेचें पाणी पिऊन आणि मंडईतली भाजी खाऊन हा देह पुष्ट झाला आहे! (हंशा). तुम्हीं रात्रीं कुठेंहि जा पण रोज सकाळीं तुम्हांला या मंडईत आलेंच पाहिजे. (प्रचंड हंशा). तुमचें देवाचें दर्शन एक वेळ चुकेल. पण मंडईचें दर्शन तुम्हांला रोज सकाळीं घेतलेंच पाहिजे, असें या मंडईचें महत्त्व आहे. म्हणूनच लोकमान्य टिळक हे या मंडईच्या नाक्यावर रात्रंदिवस पहारा करीत उभे आहेत. (प्रचंड टाळ्या).

"लोकमान्य टिळक हे कोठें आहेत? ते गायकवाड वाड्यांत नाहींत. ते 'केसरी'वर छापल्या जाणाऱ्या त्यांच्या फोटोंत नाहींत. ते जर कोठें असतील तर ते या मंडईच्या प्रवेशद्वारावर आहेत. म्हणून मंडई ही स्वातंत्र्याच्या प्रचाराचें क्षेत्र बनलेली आहे! लोकमान्य टिळक जेव्हां विलायतेला गेले तेव्हां त्यांना प्रेमाचा निरोप कोणी दिला? या मंडईनें! (टाळ्या). जेथें आपण आतां बसलों आहोंत ना, त्या ठिकाणीं! (टाळ्या). पंडित जवाहरलाल जेव्हां प्रथम पुण्यांत आले, तेव्हां त्यांचा सत्कार कोणी अन् कुठें केला? ह्या मंडईनें आणि ह्या-ह्याच

ठिकाणीं ! ( प्रचंड टाळ्या ).

" बंधूंनो, गेलीं सहा वर्षे चाललेली लढाई आतां संपलेली आहे. दोस्तांचा विजय झाला आहे. पण दोस्तांचा विजय म्हणजे कांहीं आपला विजय नव्हे. ( हंशा ). ह्या युद्धांत आपण कांहीं सरकारशीं सहकार्य केलेलें नाहीं. युद्ध सुरू झाल्यावर कॉंग्रेसनें सरकारला विचारलें कीं, ' तुम्ही काय म्हणून हें युद्ध करतां आहांत ? तुमचा हेतु काय ? ' सरकार म्हणालें, ' आम्हांला जगांत लोकशाही स्थापन करावयाची आहे. आम्हांला जग स्वतंत्र करावयाचें आहे. ' तेव्हां कॉंग्रेस म्हणाली, ' ठीक आहे. मग आधीं या देशाला स्वतंत्र करा. इथें लोकशाही स्थापन करा. ( हंशा नि टाळ्या ). मग हा देश तुमच्या खांद्याला खांदा लावून या युद्धांत लढेल. गुलाम हिंदुस्थान या युद्धांत भाग घेऊं शकणार नाहीं ! ' ( प्रचंड टाळ्या ).

" सरकार म्हणालें, ' लढाई संपूं द्या. मग बघूं. (हंशा). सध्यां तुम्ही आमच्या सैन्यांत दाखल व्हा. आम्ही तुम्हांला महिना सोळा रुपये पगार देऊं. ( हंशा ). लांडी खाकी विजार देऊं, खाकी शर्ट देऊं, डोक्यावर घालायला एक छोटेसें घमेलें देऊं !(हंशा) आणि लढाईत तुम्ही छानपैकीं मरण पावल्यानंतर तुमच्या नांवानें एक बारा फुटी स्तंभ उभारून तुम्हांला चिरंजीव करूं.' ' चिरंजीव त्याचें जगीं नाम राही ! ' ( प्रचंड हंशा नि टाळ्या ). सरकारचें हें रंगरूट भरतीचें काम अजून चाललेंच आहे.

" आजच सकाळीं मी ह्या मंडईसमोरून चाललों होतों. तेव्हां मला एक भला मोठ फलक दिसला. ह्या फलकावर शिवाजी महाराजांचें एक मोटें चित्र काढलेलें आहे सरकारनें. आणि त्यांच्या तोंडीं अशीं वाक्यें घातलेलीं आहेत, कीं, ' माझें अनुकरण करा. अन् फौजेंत दाखल व्हा ! ' मित्रहो, ब्रिटिशांच्या फौजेंत महिना सोळा रुपयांवर जा असा शिवाजीमहाराज उपदेश करताहेत बरें का !( हंशा ). जणुं कांहीं शिवाजीमहाराज हे त्या ब्रिटिशांचें रिक्रुटिंग ऑफिसर आहेत ! लोकहो, मी तुम्हांला सरळ विचारतों, कीं, स्वातंत्र्यसंस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज हे काय ब्रिटिशांच्या बापाचे नोकर आहेत ? (शेम–शेम ) शेम शेम काय ओरडतां ? शेम तुम्हांला वाटली पाहिजे ह्याची कीं, असले अपमानकारक फलक तुम्ही या क्षणापर्यंत पुण्यांत शिल्लक ठेवले आहेत. (सभा अत्यंत गंभीर होते. त्या रात्रीं पुण्यांतले ते सर्व फलक लोकांनीं फोडून तोडून टाकले. )

" लोकहो, ब्रिटिशांनीं जर्मनी–जपानचा पराभव केला. पण कॉंग्रेसचा केलेला नाहीं ! ( तीन मिनिटें कॉंग्रेसच्या नि आचार्य अत्रे ह्यांच्या नांवाचा जयजयकार ). ब्रिटिशांना वाटलें कीं, कॉंग्रेसच्या नेत्यांना तुरुंगांत डांबून ठेवलें म्हणजे त्यांचा निकाल लागेल. पिंजऱ्यांत सिंहांना जसें डांबून ठेवावें, तसें त्यांनीं आमच्या वृद्ध नेत्यांना तुरुंगांत जबरदस्तीनें कोंबलें, कुठें त्यांना नेलें, कुठें ठेवलें, त्याचा थांगपत्ता सुद्धां त्यांनीं जनतेला लागूं दिला नाहीं. तीन वर्षांनंतर त्यांच्या तुरुंगाचीं दारें उघडून सर-

कारनें आंत बघावयाला सुरुवात केली. सरकारला वाटलें कीं, आंतमध्यें ही मंडळी बहुतेक खलास झाली असतील. (हंशा).

"पहिल्यानें ह्यांनीं महात्मा गांधींना बाहेर काढलें. त्याबरोबर त्यांनीं पुन्हां पहिल्यासारखीच डरकाळी फोडली, 'चले जाव!' (हंशा नि टाळ्या). दुसऱ्या पिंजऱ्यांतून सरदार वल्लभभाई पटेल गुर-गुर करीत आले. ते गरजले, 'नुसत्या हिंदुस्थानांतून नव्हे तर साऱ्या आशियांतून!' (प्रचंड टाळ्या). तिसऱ्या पिंजऱ्यांतून जवाहरलाल डरकाळ्या फोडीत आले, 'संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय आमचें समाधान कदापि होणार नाहीं!' (टाळ्याच टाळ्या.)

"आज देशांतील सारी जनता कोणाच्या मागें आहे? अर्थात् कॉंग्रेसच्या! (टाळ्या). पण आमच्या हिंदु महासभेला वाटतें कीं, जनता त्यांच्या मागें आहे. (हंशा). त्यांच्या डोळ्यांत म्हातारपणामुळें बहुतेक मोतीबिंदु पडलेला असावा. (प्रचंड हंशा). म्हणून आगामी निवडणुकींत कॉंग्रेसशीं सामना द्यावयास हिंदुसभा उभी राहिली आहे. एकाच वाक्यांत त्यांना सांगायचें म्हणजे कॉंग्रेसशीं सामना देणें म्हणजे उघड्या डोळ्यांनीं आत्महत्या करण्यासारखें आहे. (प्रचंड टाळ्या). कॉंग्रेस म्हणजे चाळीस कोटि व्होल्टेज विद्युत्शक्तीचा एक प्रचंड साठा आहे. ह्याला जो स्पर्श करील तो तेथल्या तेथें खाक झाल्यावांचून रहाणार नाहीं. (प्रचंड टाळ्या).

"मी विचारतों, हिंदु महासभा हा काय पक्ष आहे? धर्माच्या नांवाखालीं भटाभिक्षुकांनीं चालवलेलें हें एक श्राद्ध आहे श्राद्ध! (प्रचंड हंशा नि टाळ्या). ह्या लोकांनीं आजपर्यंत एखाद्या गल्लींतली किंवा बोळांतली तरी निवडणूक जिंकली असल्याचें तुमच्या कानांवर कधीं आलें आहे काय? (हंशा). मी कांहीं ज्योतिषी नाहीं पण हिंदुमहासभेची कुंडली मात्र मला स्वच्छ डोळ्यांसमोर दिसते. (हंशा). त्यांच्या कुंडलींत सध्यां फार अनिष्ट ग्रह एकत्र आले आहेत. (हंशा). आणि सत्तीस नोव्हेंबर रोजीं तर ह्यांना मृत्युयोगच आहे. (प्रचंड हंशा).

"लोकहो, ज्या वेळीं महात्माजी ब्रिटिशांना या देशांतून 'चले जाव' असें फर्मावीत होते, त्याच वेळीं देशांतील तरुणांना सोळा रुपये महिना पगारावर सरकारच्या म्हणजे आपल्या शत्रूच्या सैन्यांत 'चले जाव' असें हे हिंदुसभावादी सांगत होते. सरकारच्या सैन्यांत भरती करून ह्यांनीं जनतेच्या स्वातंत्र्ययुद्धाशीं भयंकर द्रोह केला आहे. म्हणून हे हिंदुसभावादी, देशद्रोही, राष्ट्रद्रोही आणि स्वातंत्र्यद्रोही आहेत! ('शेम शेम'च्या प्रचंड गर्जना.) कॉंग्रेस 'चले जाव'च्या मुद्द्यावर तिकडे ब्रिटिश सरकारशीं सामना देण्यास दंड थोपटून उभी आहे. आणि इकडे हे मूर्ख लोक कॉंग्रेसशीं सामना देण्याच्या आरोळ्या ठोकीत आहेत! कॉंग्रेस ह्यांच्याकडे ढुंकून देखील पहावयास तयार नाहीं! अहो, सामना कोणी कोणाबरोबर करावयाचा असतो? मर्दांनीं मर्दांशीं आणि वीरांनीं वीरांशीं सामना द्यायचा असतो. (टाळ्या).

" हिंदुसभेचे कांहीं पुढारी तक्रार करतात कीं कॉँग्रेसवाले आम्हांला शिव्या देतात म्हणून! मी म्हणतों, कॉँग्रेसमधले सगळेच लोक कांहीं महात्मा गांधींचे नि पंडित नेहरूंचे अवतार नाहींत! त्यांचा संयम तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसांच्या अंगीं काढून असणार? देत असतील कांहीं कॉँग्रेसवाले ह्यांना शिव्या! अन् मी विचारतों, बंधूंना तुम्हीच सांगा, ह्या लोकांना शिव्या द्यायच्या नाहींत तर काय मतें द्यायचीं? (प्रचंड हंशा).

" अन् हिंदुसभेचे नेते डॉ. खरे नि नरसोपंत केळकर ह्यांनीं काय कॉँग्रेसला कमी शिव्या दिल्या आहेत? कॉँग्रेस मेली म्हणून डॉ. खरे ह्यांनीं आपल्या मिशाहि भादरून टाकल्या आहेत. मी म्हणतों डॉक्टर खऱ्यांनीं तोंडाचेंच काय पण आपल्या साऱ्या अंगाचें क्षौर केलें तरी त्यामुळें कॉँग्रेसचा एक केंसहि वांकडा होणार नाहीं! (प्रचंड टाळ्यांचा स्फोट). लोकहो, नरसोपंतांनीं तर तुम्हांलाच शिवी दिली आहे. त म्हणाले, सारे मतदार गाढव असतात. ('शेम-शेम'). मतदार बंधूंनो, लक्षांत ठेवा, नरसोपंत तुम्हांला गाढव म्हणाले आहेत, गाढव! ही शिवी तुम्ही कालत्रयीं तरी विसरूं शकाल काय? ('नाहीं—नाहीं'च्या गर्जना). मग ज्या हिंदुसभेच्या ज्या नेत्यांनीं तुम्हांला 'गाढव' म्हटलें त्या पक्षाचे सभासद जर उद्यांच्या निवडणुकींत तुमच्याकडे मतें मागावयाला आले तर तुम्ही त्यांना काय द्याल? (सभा गंभीर). अहो, असें काय करतां? गाढव काय देतें? ('लाथा लाथा अशा आरोळ्या). बरोबर तुम्हांला गाढव म्हणणाऱ्या या लोकांना मतें देण्याऐवजीं लाथा देऊन ह्यांना बराबाहेर काढा! (प्रचंड टाळ्या).

" अण्णासाहेब भोपटकर मागें म्हणाले होते कीं, कॉँग्रेसचें राजकारण हें कासोटाफेड्ड आहे! (प्रचंड 'शेम—शेम'). 'कासोटाफेड्ड' या शब्दाचा अर्थ जास्त फोड्डून किंवा फेड्डून—तुम्हांला सांगावयाला पाहिजे काय? (हंशा). 'कासोटाफेड्ड' हा शब्द उच्चारणाऱ्या माणसाला तुम्ही 'सभ्य' म्हणाल काय? ('नाहीं—नाहीं'च्या गर्जना). कॉँग्रेसच्या राजकारणाला हे कासोटाफेड्ड कां म्हणतात? तर म्हणे कॉँग्रेसनें देशसेविकांना गोल पातळें नेसावयाला लावून त्यांचे कासोटे फेडले आहेत. (शेम—शेम) बंधूंनो, गेल्या सहा वर्षांत कोणी आपले कासोटे फेड्डून नि सरकारची रंगरूट भरती करून कासोटेफेड्ड राजकारणाचा अवलंब केलेला आहे, हें साऱ्या जगापुढें आहे. (प्रचंड टाळ्या).

" आणि आतां हें लोक जनतेला म्हणताहेत कीं, 'आम्हांला चान्स द्या.' (हंशा) मी विचारतों, 'चान्स काय असा मागून मिळतो?' चान्स म्हणजे काय बुंदीचा लाडू आहे; कीं मागितला एकाद्या भिकाऱ्यानें कीं तो त्याच्या हातावर सहज कोणी दाता ठेवूं शकतो? 'चान्स' मागायचा नसतो. तो हिसकून घ्यायचा असतो! (टाळ्या). त्याच्यासाठीं मोठमोठे पराक्रम करावे लागतात. मोटमोठे त्याग

करावे लागतात. जनता ही एखाद्या स्त्रीसारखी आहे. जो पराक्रम करतो त्याच्यावरच तिचें प्रेम बसतें.

"या जनतारूपी राजकन्येसमोर आज देशांतले अनेक पक्षरूपी राजपुत्र उभे आहेत. कॉंग्रेसच्या राजपुत्रानें गेलीं पंचवीस वर्षें सतत ब्रिटिशांशीं टक्कर देऊन एकापेक्षांहि एक पराक्रम गाजवून दाखवले आहेत. तेव्हां जनता ही त्याच्याच गळ्यांत माळ घालील हें उघड आहे! (टाळ्या). पण कांहींहि न करतां नुसताच 'मला चान्स द्या हो' असा हंबरडा फोडणाऱ्या या हिंदुसभेच्या रडतराऊत पुत्राला ती माळ घालील हें संभवनीय तरी आहे काय? (प्रचंड हंशा).

"आजपर्यंत कॉंग्रेसच्या लाखों सैनिकांनीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या सर्वस्वाच्या आहुति दिलेल्या आहेत. हजारों वीर तुरुंगांत गेले आहेत. हजारों लोकांनीं आपलें सबंध आयुष्याचें आयुष्य राष्ट्रासाठीं बरबाद केलेलें आहे. (टाळ्या). हे आमचे केशवराव जेधे किंवा काकासाहेब गाडगीळ पहा. सरकारशीं लढायचें. तुरुंगांत जायचें. पुन्हां तुरुंगांतून बाहेर यायचें. पुन्हां लढायचे, फिरून तुरुंगांत जायचें. असा यांचा वर्षांच्या वर्षें अव्याहत क्रम चाललेला आहे. (प्रचंड टाळ्या).

"कांहीं लोक मला विचारतात कीं, 'काय हो अत्रे, तुम्हीं का तुरुंगांत गेलां नाहींत?' (प्रचंड हंशा). त्यांना माझें उत्तर असें आहे, कीं, 'मी आहें कॉंग्रेसचा पठाण—किंवा भय्या म्हणा हवें तर. घरमालक गांवाला गेले म्हणजे रखवालदाराला त्या घराचा जसा संभाळ करावा लागतो तसे काकासाहेब गाडगीळ किंवा केशवराव जेधे हे आमचे कॉंग्रेसपुढारी तुरुंगांत गेले कीं 'साप्ताहिक नवयुग'चा सोटा हातांत घेऊन मला या कॉंग्रेस हाऊसचें रक्षण करीत बसावें लागतें. जो कोणी या घरावर दगड फेकील त्याच्या 'लगाव पाठींत सोटा' हें माझें कार्य आहे. तेव्हां मला तुरुंगांत जाण्यास वेळ कोठून मिळणार? (प्रचंड हशा).

"हिंदुसभावाल्यांचें म्हणणें असें आहे कीं ब्रिटिश सरकारशीं लढण्याची वेळ अजून आली नाहीं. ती वेळ आली म्हणजे मग आम्ही आघाडीवर जाऊं आणि आमच्या छातीवर गोळ्या घेऊं. पण ती वेळ अजून आली नाहीं! (प्रचंड हंशा). बंधूंनो, ही ह्यांची वेळ आतां येणार तरी कधीं? (हंशा). वेळ म्हणजे काय एखादी लोकलगाडी आहे कीं तर दहापांच मिनिटांनीं येते? (हंशा). वेळ केव्हां येईल हें पहाण्यासाठीं सुभाषचंद्र बोस थांबले नाहींत. ते ह्यांच्या मागून येऊन आणि अजरामर होऊन पुढें गेले. (प्रचंड टाळ्या)

"अण्णासाहेब भोपटकर मागें म्हणाले कीं, मी लॉर्ड लिनलिथगोचें तख्त फोडीन! (हंशा). लिनलिथगोचें तख्त म्हणजे काय ह्यांना सोड्याची बाटली वाटली होय कीं ती अंगठ्यानें फट्दिशीं फोडतां येईल? (हंशा). बेचाळीसच्या लढ्यांत नंदुरबारच्या आठ आठ दहा दहा वर्षांच्या मुलांनीं बंदुकीच्या गोळ्यांपुढें आपल्या चिमुकल्या

छात्या पुढें केल्या आणि देशासाठीं आपल्या रक्ताचा सडा शिंपला! (प्रचंड टाळ्या). आणि हे लोक म्हणताहेत कीं आमची वेळ आली म्हणजे मग आम्ही बंदुकीच्या गोळ्या खाऊं! अहो, कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं जमा झालेल्या आठ आठ वर्षांच्या मुलांना जी अक्कल आहे, ती ह्यांच्यामधल्या साठसाठ वर्षांच्या थेरड्यांना नाहीं. (प्रचंड टाळ्या). आणि हे म्हणे गोळ्या खाताहेत गोळ्या! लिमलेटच्या गोळ्या खात बसा म्हणावें!' (हंशाचा भयंकर स्फोट, या वेळीं श्रोत्यांच्या भावना इतक्या प्रक्षुब्ध झाल्या होत्या कीं कांहीं वेळ मला आपलें बोलणें थांबवून स्वस्थ उभें रहावें लागलें).

"आणखी म्हणतात काय हे कीं बेचाळीसच्या आंदोलनापेक्षांहि प्रचंड असें आंदोलन आम्ही या देशांत करून दाखवूं! आंदोलन करायचें म्हणजे पंचपात्रांतल्या पळ्या वाजवायच्या कां कढीचे मोठमोठ्यानें भुरके घ्यायचे? (हंशा). राष्ट्रामध्यें आंदोलन करण्याची यांची छाती आहे काय? घरांत बसल्या बसल्या फार झालें तर हे आपल्या हातांनीं आंदोलन करूं शकतील! (प्रचंड हंशा).

"आजच सकाळीं मीं वाचलें कीं, सुप्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या शतसांवत्सरिक समारंभाच्या वेळीं भोपटकर असें म्हणाले कीं, 'वासुदेव बळवंतांचा आत्मा माझ्याकडे आला होता, आणि त्यानें मला सांगितलें कीं कॉंग्रेसची बेचाळीसची चळवळ ही स्वातंत्र्याची चळवळ नव्हती.' मित्रहो, वासुदेव बळवंतांचा आत्मा काल माझ्याहि स्वप्नांत आला होता. आणि त्यानें मला स्पष्ट सांगितलें कीं माझ्या नांवाचा उपयोग करून अण्णासाहेब भोपटकर कॉंग्रेसची बदनामी करण्याचा प्रयत्न करतील पण माझी त्याला मान्यता नाहीं! (हंशा व टाळ्या). पुढें वासुदेव बळवंतांचा आत्मा मला म्हणाला कीं, 'मी अपुरें ठेवलेलें क्रांतीचें कार्य जर देशांत धडाडीनें कुणी पुढें चालवलेलें असेल, तर तें कॉंग्रेसनें!' (प्रचंड टाळ्या) बोला, लोकहो, माझें म्हणणें तुम्हांला खरें वाटतें का अण्णासाहेबांचें? ('तुमचें–तुमचें–' अशा आरोळ्या)

"कॉंग्रेसच्या विरुद्ध ही हिंदुसभा आपले उमेदवार कां उभे करते? तर म्हणे ही त्यांची Symbolical Opposition आहे. ह्यांच्या या प्रतीकात्मक विरोधाचें मला हंसू येतें. त्याबाबत एक गोष्ट मला आठवते. एकदां एका गांवाहून एक भटजी आणि त्याची बायको रस्त्यानें चालली होती. दुपारची वेळ होती. उन्ह डोक्यावर पडलें होतें. वाटेंत त्यांना भेटला एक सोजीर. त्यानें धरला भटजीच्या बायकोचा हात अन् भटजीला दरडावून सांगितलें कीं, 'धर आमच्या डोक्यावर छत्री.' धरली भटजीनें छत्री. करतो काय बिचारा तो? कांहीं वेळानें तो सोजीर निघून गेला. तेव्हां भटजीची बायको आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'का हो, तुम्ही माझे लग्नाचे नवरे! तुम्हांला आपल्या बायकोची अशी अप्रतिष्ठा पाहवली तरी कशी?" तेव्हां भटजी म्हणाले, 'मी काय स्वस्थ बसलों होतों काय? मधून मधून छत्री हलवून मी त्या सोजराला

उन्हाचे चटके देऊन त्याला विरोध करीत होतों. माहीत आहे तुला ?' (प्रचंड हंशा).

"असा हा आमच्या हिंदुसभेचा' Symbolical विरोध आहे. हा मर्दांचा विरोध नाहीं. हा षंढाचा विरोध आहे. अशा लोकांना का कुणीं मतें द्यायचीं असतात ? म्हणून मी आपल्याला विनंती करतों कीं, तुम्ही कॉंग्रेसला मतें द्या आणि या लोकांना खांदा द्या ! (प्रचंड हंशा). जिवंत माणसांना मतें द्यायचीं असतात. आणि मेलेल्या माणसांना खांदा द्यायचा असतो, हें तुम्हांला माहीत आहे. (प्रचंड हंशा).

"शिवाजीमहाराजांच्या नि लोकमान्य टिळकांच्या नांवाची गर्जना करून हे लोक मतें मागतात. पण बंधूंनो, लोकमान्यांचें नांव देखील घेण्याची या लोकांची लायकी नाहीं. लोकमान्यांचे वारस नरसोपंत नसून महात्मा गांधी हे आहेत! (प्रचंड टाळ्या) लोकमान्य टिळकांपासून आमच्या नरसोपंत केळकरांनीं तीन 'प' घेतले आहेत. पैसा, पत्र आणि पगडी. (प्रचंड हंशा) लोकमान्यांचा चौथा 'प' म्हणजे 'पराक्रम' तो तेवढा कॉंग्रेसनें उचलला ! (प्रचंड टाळ्या)

"कॉंग्रेसला मत हें देशाच्या स्वातंत्र्याला मत आहे. हिंदुमहासभेला मत देणें म्हणजे गुलामगिरीला अन् रंगरूट भरतीला किंवा ब्रिटिश सरकारला मत देण्यासारखें आहे. (प्रचंड टाळ्या)"

त्यानंतर माझी 'चले जाव' ही कविता अत्यंत भावनापूर्ण स्वरांत मीं म्हणून दाखवली. त्या कवितेच्या पालुपदाला हजारों श्रोत्यांनीं साथ दिली. 'वंदे मातरम्' होऊन सभा समाप्त झाली. व्यासपीठावरून माझ्या मोटरीपर्यंत पोहोंचावयाला मला अर्धा तास लागला. एवढी लोकांची माझ्याभोंवतीं गर्दी होती. ह्या एका सभेनें पुण्यामध्यें मीं एवढी खळबळ उडवली कीं तिची प्रतिक्रिया पुढें माझ्यावर कशी उलटली हें ह्यानंतर सांगेन !

## ३९

## निवडणुकीची ' धुळवड '

दि. ८ नोव्हेंबर १९४५ रोजीं रात्रौ पुण्याच्या मंडईत पस्तीस हजार नागरिकांच्या विराट् सभेंत कॉंग्रेसच्या विरोधकांवर जो मीं बॉम्बगोळा टाकला, त्यामुळें माझ्यावर संतापलेल्या प्रतिगामी नि जातीयवादी ' गांधील माशां 'चें महाराष्ट्रांत एवढें प्रचंड मोहोळ उठलें कीं, त्यांनीं शिव्याशापांची भरमसाट आग आपापल्या बोटभर पत्रांतून माझ्यावर फेंकण्याची जणुं कांहीं मोहीमच सुरू केली! त्या वेळीं माझ्या नांवानें गलिच्छ, अश्लील, ओंगळ, बदनामीकारक, खोट्या आणि खोडसाळ शिव्यांच्या लाखोल्या वाहतां वाहतां आणि दोन्ही हातांनीं पांचजन्य करतां करतां मुंबईचे ' विविधवृत्त 'कार तटणीस आणि पुण्याचे ' काळ 'कर्ते शंकरराव दाते ह्यांचीं तोंडें नि मनगटें अक्षरशः सुजून किंवा सोलून निघालीं असतील. मराठी भाषेंतली अशी एक शिवी नसेल कीं जी ह्या आणि इतर कांहीं वृत्तपत्रकारांनीं माझ्या बद्दल त्या पंधरवड्यांत वापरली नसेल.

माझ्या अंगावर विष्ठाविसर्जन करण्यासाठीं ' विविधवृत्ता 'च्या तटणीसांनीं आपलें ठाकुरद्वारच जणुं कांहीं मोकळें केलें! मंडईमधल्या माझ्या भाषणांत मी ' नवयुग 'चा

सोटा हातांत घेऊन बसलेला एक कॉंग्रेसचा पठाण आहें असें म्हणालों होतों. त्या माझ्या विधानाची टवाळी करण्यासाठीं तटणीसांनीं ' विविधवृत्तां 'त एक गलिच्छ व्यंगचित्र काढलें. त्या चित्रांत पठाणाच्या पोषाखांत मी एका बाजेवर बसून ' हिंदुसभा ' नामक तरुणीचें प्रियाराधन करीत आहे आणि माझ्या उजव्या बाजूला ठेवलेल्या ' नवयुग 'च्या सोट्यावर एक कुत्रें तंगडी वर करून लघवी करीत आहे असें दाखवलें होतें. तटणीसांना वाटलें कीं, हें हास्यचित्र छापून आपण अत्र्यांवर भलतीच मात केली.

पण तो त्यांचा आत्मसंतोष एक आठवडाच टिकला. कारण, त्या पुढच्या नवयुगच्या अंकांत ' विविधवृत्ताला परत भेट ' या मथळ्याखालीं तेंच व्यंगचित्र मीं पुन्हां छापलें. मात्र ' नवयुग 'च्या सोट्यावर लघवी करणाऱ्या त्या तंगडीबाज कुत्र्याच्या पाठीवर ' तटणीस ' अशीं ठळठळीत अक्षरें लिहिलीं. एका व्यंगचित्रामध्यें थोडासा बदल करून तें व्यंगचित्र पुन्हां त्या चित्रकाराच्या वा प्रकाशकाच्या अंगावर शिताफीनें उलटवून त्याची फटफजिती करावयाची ह्या तंत्राचा महाराष्ट्रांत तरी तो पहिला नमुना होता. ' नवयुग 'मधलें तें चित्र पाहून वाचकांची हंसतां हंसतां अगदीं पुरेवाट झाली.

त्या सुमारास मुंबईच्या ' ढमढेरे ' नांवाच्या एका नागरिकाला हिंदुसभेनें मध्यवर्ति कायदेमंडळाच्या एका जागेसाठीं उभें केलें होतें. कॉंग्रसनें मुंबईमधून निवडल्या जाणाऱ्या मध्यवर्ति कायदेमंडळाच्या दोन जागांसाठीं विख्यात सर्जन डॉ. गोपाळराव देशमुख आणि मिनू मसानी ह्यांना उभें केलें होतें. देशमुख-मसानींच्या निवडणूक प्रचाराचीं सूत्रें श्री. स. का. पाटील ह्यांनीं माझ्याकडे सोंपवलीं होतीं. सदोबांना तें आतां आठवतें आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. कारण आतां ते फारच मोठ्या पदावर स्थानापन्न झाले आहेत. पण त्या वेळीं त्यांचा नि माझा चांगला स्नेह- अर्थात् राजकीय स्वरूपाचा होता. रोज सकाळीं कॉंग्रेस हाऊसकडे जातांना ते प्रथम माझ्या ' अत्रे प्रिंटिंग प्रेस 'मध्यें थांबत आणि मला जवळ जवळ हुकूमच देत कीं, " अत्रे, आज तुम्हांला दोन किंवा तीन व्याख्यानें आहेत. " मी व्याख्यानाची जागा नि वेळ टिपून घेई अन् मग ते जात.

हिंदुसभेनें उभे केलेले ढमढेरे ह्यांची मला कांहींएक माहिती नव्हती. वस्तुतः ते एक अत्यंत सभ्य आणि सज्जन गृहस्थ आहेत. पुढें त्यांची नि माझी चांगली ओळख झाली. पण राजकारण हें इतकें विषारी क्षेत्र आहे, कीं त्या ठिकाणीं कोणी कोणाचा मित्र नसतो. काय वाटेल त्या भल्याबुऱ्या उपायांचा अवलंब करून आपल्या प्रतिपक्षीयांना नेस्तनाबूद करावयाचें यापेक्षां दुसरा विचार तेथें डोक्यांत नसतो. इंग्लंडमध्यें असतांना निवडणुकीच्या प्रचारांत लॉईड जॉर्ज किंवा चर्चिल ह्यांनीं आणि त्यांच्या विरोधकांनीं परस्परांची ज्या तऱ्हेनें हुर्रेवडी उडवली होती, त्याचा मीं चांगलाच अभ्यास केला होता.

म्हणून कॉंग्रेसच्या वतीनें ढमढेऱ्यांच्या विरुद्ध प्रचार करतांना मीं त्याच

तंत्राचा अवलंब केला. ‘ ढमढेरे ’ ह्या नांवांत दोन ‘ ढ ’ आणि एक ‘ मढें ’ आहे ही माझी त्या वेळच्या प्रचार व्याख्यानांतली त्यांच्या नांवावरची अगदीं ठरलेली कोटी असे. ती ऐकून श्रोते हंसून हंसून गडबडा लोळत. त्या माझ्या कोटिक्रमाची टवाळी करण्यासाठीं तटणीसांनी आपल्या ‘ विविधवृत्तां ’त असें छापलें कीं, अत्रे ह्यांचें मूळ आडनांव ‘ गाढवे ’ असें होतें.

त्याला पुढल्या ‘ नवयुग ’च्या अंकांत मी पुढीलप्रमाणें उत्तर दिलें :

## गाढव आणि तटणीस

“ ‘ विविधवृत्ता ’चे संपादक श्री. रामभाऊ तटणीस ह्यांनी असा एक नवीन शोध लावला आहे कीं, आचार्य अत्रे ह्यांचें मूळ आडनांव ‘ गाढवे ’ असें होतें. ह्या संशोधनाच्या अनुषंगानें आम्हांला आणखी एक शोध लागला. तो असा कीं, कालांतरानें गाढवे वंशांतल्या एका गाढवाचा एका तट्टाणीशीं प्रेमसंबंध जडला. आणि त्यापासून त्यांना जी खेचर संतति निर्माण झाली ती पुढें ‘ तट्टाणीस-तट्टणीस ’— तटणीस ’ ह्या नांवानी ओळखली जाऊं लागली. त्या गाढववंशीय तटणीसांच्या एकापेक्षांहि एक खेचरलीला पाहून गाढवे वंशांतल्या लोकांना इतका पश्चात्ताप झाला कीं, त्यांनीं आपलें आडनांव बदलून टाकलें. ”

मला ‘ गाढवे ’ करणाऱ्या ‘ तटणीसां ’चा अशा रीतीनें जेव्हां मीं ‘ गाढवा ’शीं संबंध जोडला, तेव्हां साऱ्या महाराष्ट्रांत त्यांचें जें हंसूं झालें, तसें पूर्वी माझ्या कोणत्याहि विरोधकांचें झालें नसेल. त्यामुळें तटणीसांच्या संतापाचें ‘ ड्रेनेज ’ जोरानें फुटून तें ‘ विविधवृत्ता ’च्या स्तंभांच्या गटारांतून जोरजोरानें वहावयाला लागलें. कॉंग्रेसच्या, कॉंग्रेसनेत्यांच्या आणि कॉंग्रेसच्या राजकारणाच्या नांवानें अश्लील पांचजन्य करून आपलें पोट जाळणें हा रामभाऊ तटणीसांचा त्यापूर्वीचा एकवीस वर्षांचा धंदा होता. ह्या तटणीसाला पुण्याच्या कोर्टांत मीं माझी जाहीर माफी मागावयाला लावली, त्याचा इतिहास मागें एका प्रकरणांत मीं सांगितलेला आहे. तथापि, जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं असें जें म्हणतात, तें अक्षरशः खरें आहे.

‘ अत्रे ’ हे ‘ पी. के. ’ आहेत. ते ‘ विदूषक वक्ते ’ आहेत. ते राजकारणांत शिरण्यास नालायक आहेत अशी माझी सचित्र बदनामी करण्यास तटणीसांनीं आपल्या ‘ विविधवृत्तां ’त सुरुवात केली. तेव्हां मीं त्यांना २५ नोव्हेंबर १९४५ च्या ‘ नवयुग ’च्या अंकांत पान ११ वर उत्तर दिलें. तें पुढीलप्रमाणें :

“ ‘ पिण्याच्या ’ बाबतींत तटणीसांनीं तरी दुसऱ्यांना नांवें ठेवण्याच्या भानगडींत पडूं नये. ‘ अंदरकी बात ’ ‘ राम ’ किंवा ‘ रामभाऊच ’ जाणे. आचार्य अत्रे ह्यांनीं कॉंग्रेससाठीं काय केलें असा प्रश्न आम्हांला रामभाऊ विचारतात. कॉंग्रेस कधीं मरते

आहे याची गेलीं वीस वर्षें वाट पहात बसलेल्या तटणीसांसारख्या एका ठाकुरद्वारी कावळ्याला आचार्य अत्रे ह्यांना विचारण्याचा काय अधिकार आहे ? उभ्या जन्मांत सार्वजनिक व्यासपीठावर येऊन दोन शब्द बोलण्याची ज्यांची पात्रता नाहीं, स्वतःच्या सहीनिशी चार ओळी मजकूर स्वतःच्या पत्रामध्यें प्रसिद्ध करण्याची देखील ज्यांची योग्यता नाहीं, प्रसिद्ध लोकांची बदनामी करण्यासाठीं गलिच्छ साहित्य जमा करण्याकरितां सकाळपासून संध्याकाळपर्यंत धांवपळ करणें हीच ज्यांची राष्ट्रसेवा आणि हाच ज्यांचा देहदंड, त्यांनीं कोणत्या तोंडानें आचार्य अत्रे ह्यांना विचारावें कीं, 'तुम्ही देशासाठीं काय केलेंत किंवा तुमची राजकारणांत शिरण्याची काय लायकी ?' रामभाऊ तटणीस ह्यांची कोणत्या मुलुखांत आणि कोणत्या प्रांतांत शिरण्याची लायकी आहे बरें ? 'भंग्याच्या पोटचा विविधवृत्त' अशी जी सार्थ पदवी त्यांच्या पत्राला कै. अच्युतराव कोल्हटकर ह्यांनीं अनेक वर्षांपूर्वीं देऊन ठेवलेली आहे, ती ते स्वतः सोयीस्करपणानें विसरून गेले असले तरी इतर जनता कांहीं अद्याप विसरलेली नाहीं."

आज १९६५ सालांत तटणीसांचा लेकावळा 'आलमगीर' ते मेल्यानंतरही माझ्यावर शिव्यागाळीचा गलिच्छ वर्षाव करीत आहे, तोच १९४५ सालीं म्हणजे वीस वर्षांपूर्वीं मला काय शिव्याशाप देत होता, त्याचें विडंबन माझे त्या काळांतले सहकारी आणि महाराष्ट्राचे महान् विनोदपंडित दत्तू बांदेकर ह्यांनीं २५ नोव्हेंबर १९४५ च्या 'नवयुग'च्या अंकांत पान १० वर जें केलें तें येथें उद्धृत करतों :

**स्थळ :** मुंबई विविधवृत्त कचेरी. देशद्रोही मंडळींचा अड्डा जमला असून आलमगीर सर्व पाहुण्यांना शेव, चिवडा, चहा पुरवीत आहे. श्री. तटणीस हे सर विठ्ठलराव चंदावरकर ह्यांनीं दिवाळीनिमित्त 'पोस्त' म्हणून दिलेला एक जुना सूट चढवून पाहुण्यांची खुशामत करीत आहेत. **काळ :** निवडणुकींत आपटी खाण्याचा.

**तटणीस :** बेटा आलमगीर, आतां पाहुण्यांच्या करमणुकीसाटीं कांहीं तरी नकला कर पाहूं.

**आलमगीर :** पण मला दिवाळीची बक्षिसी मिळेल का ? गेल्या दिवाळीला फक्त खोटी पावलीच मिळाली म्हणून विचारतों.

**तटणीस :** ( आलमगिराचा कान पकडून ) मूर्खा, माझी बेअब्रू करूं नकोस. मी गांवांत मिशीला तूप लावून फिरतों. आणि तूं असें बडबडूं लागलास तर कसें होईल ? आणि गेल्या वर्षाप्रमाणें यंदा दिवाळी अंकांचे गठ्ठे एजंटांकडून परत आले नाहींत !

**देशद्रोही मंडळी :** आलमगीर, फिकीर करूं नको तुम्हांला मालकानें दिले नाहींत तर आम्ही काढून देऊं. पण अगोदर नकलांचा कार्यक्रम होऊं द्या.

**आलमगीर :** ( सर्वांना कुर्निसात करून ) बहोत आच्छा. मी आतां दारुड्याची नकल करून दाखवतों.

**देशद्रोही मंडळी :** होऊं द्या. अगदीं 'कंट्री' घेतल्याप्रमाणें होऊं द्या. आलमगीर, तुम्ही दर रविवारीं वसईला जात असतां म्हणे—

**आलमगीर :** छे, छे, गैरसमज करून घेऊं नका. मी वसईला केवळ ताक पिण्यासाठीं जात असतों. दुसरं कांहीं पीत नसतों.

**तटणीस :** होय, आमचे आलमगीर फक्त ताकच पीत असतात.

**देशद्रोही मंडळी :** मग 'विविधवृत्तां'तलें त्यांचें लिखाण दारू पिऊन लिहिल्यासारखें कसें वाटतें ? आमची तर अशी समजूत होती कीं—

**आलमगीर :** मी आतां खरें तें सांगतों. आमच्या कचेरीला लागून हें गटार वाहतें आहे ना ! त्याचे संस्कार माझ्या लिखाणावर होत असतात.

**तटणीस :** ( आलमगिराचा कान पकडून ) मी गांवांत मिशीला तूप लावून फिरतों. आणि तूं माझें बेंड बाहेर फोडतोस ? मी म्युनिसिपालिटीचा मेंबर असूनहि माझ्या कचेरीजवळची घाण मला दूर करतां येत नाहीं हें जर लोकांना कळलें तर माझी पत काय राहील ?

**आलमगीर :** कसूर माफ सरकार, यापुढें माझ्या लिखाणांतील इंगित कोणालाहि सांगणार नाहीं—

**देशद्रोही मंडळी :** आलमगीर, ही दारुड्याची नकल आतां पुरे. ही नकल चालू असतां तुम्ही आणि मालक दोघेहि दारू प्याल्याप्रमाणें भांडत आहांत. म्हणून आम्ही म्हणतों कीं, हा कार्यक्रम आतां बंद करा. आणि दुसरा एखादा कार्यक्रम सुरू करा.

**आलमगीर :** मी आतां शिमग्याच्या नकला सुरू करतों.

**तटणीस :** अगदीं बरोबर. आतां शिमगाच कर. त्या अत्र्यांच्या नावानें शिमगा कर, 'नवयुग'चा खप वाढत आहे आणि आमचा पडत आहे. हें माहीत आहे ना ?

**आलमगीर :** ( दोन्ही हातांनीं पांचजन्य करून ) ऐका ! मंडळी ऐका ! विविधवृत्ताच्या वाचकांनो, ऐका ! अत्रे हा लफंगा, लुच्चा, ड्यांबीस माणूस आहे !

**तटणीस :** शाब्बास, जरा ठांसून होऊं दे !

**आलमगीर :** अत्रे हा नरराक्षस, चांडाळ ( मध्येंच खोकल्याचा ठसका येतो. तटणीस त्याच्या तोंडांत आलेपाक कोंबतात. )

**देशद्रोही मंडळी :** एवढ्या शिमग्यानें आम्ही निवडणूक जिंकूं असें वाटत नाहीं. यापेक्षां जोरदार शिमगा करा. आलमगीर, महात्मा गांधींसारख्या थोर विभूतीलासुद्धां तुम्ही यापेक्षां कडक शिव्या देतां. आणि अत्र्यांना एवढ्या नरम शिव्या ! वाटल्यास वसईला जाऊन ताक पिऊन या.

**आलमगीर :** कॉंग्रेसचे आपण पठाण आहों असें अत्रे म्हणतात. या पठाणाच्या

लीला मी आतां तुम्हांला सांगतों. अत्रे हा बेइमान पठाण आहे.

**देशद्रोही मंडळी** : आलमगीर, काळजी करूं नका चिमणलाल सेटलवाडच्या दारांत पठाण होण्याचा मान आम्ही तुम्हांला देऊं. पण तुम्ही मात्र अत्र्यांप्रमाणें बेइमानी करूं नका—

**आलमगीर** : अत्रे हा एक लफडेबाज माणूस आहे. त्याचीं लफडीं फार आहेत. अनेकांचे मालक, चालक, पालक या नात्यानें त्यांच्या भानगडी खूप आहेत—

**देशद्रोही मंडळी** : अहो; तुमचीं आमचीं काय थोडीं आहेत? फरक एवढाच कीं आम्ही सर्व गुपचुपपणें करतों व अत्रे जाहीरपणें करतात. काय तटणीस? (तटणीस मनांतल्या मनांत लाजतात.)

**आलमगीर** : अत्रे ह्यांनीं पुणें शहरांत जें कांहीं भाषण केलें तें दारुड्याला शोभणारें होतें—

**देशद्रोही मंडळी** : आलमगीर, आम्ही तुम्हांला दहा बाटल्या देतों. असें जोरदार भाषण करून दाखवा पाहूं. अहो, अत्र्यांसारखें भाषण जर दारूबाजांना साधलें असतें तर आम्ही मवाळांनीं प्रत्येक निवडणूक जिंकली असती. मिस्टर तटणीस, आम्ही तुम्हांला एक डझन व्हिस्कीच्या बाटल्या देतों. या ठाकुरद्वारच्या गल्लींत एक तरी सभा गाजवून दाखवा पाहूं. अहो, वक्ता हा जन्मावा लागतो. दारुडे जर वक्ते झाले असते, तर निवडणुकींत आम्हीं आपटी कधींच खाल्ली नसती.

**आलमगीर** : अत्रे हा भ्याड, भित्रा व नामर्द आहे!

**देशद्रोही मंडळी** : आलमगीर, आतां मात्र तुमच्या बेअकलीपणाची कमाल झाली. अत्रे ह्यांना वाटेल ते दुर्गुण चिकटवा. पण ते भ्याड आहेत असें त्यांचा वैरी-सुद्धां म्हणणार नाहीं. विरोधकांना न जुमानतां छाती पुढें काढून जो मोठमोठ्या सभा जिंकतो तो भ्याड? आणि इथं दारं खिडक्या बंद करून शेव चिवडा खाणारे आम्ही वीर! हें पहा आलमगीर, आम्ही देशद्रोही असलों तरी अत्र्यांचे गुण ओळखून आहोंत. तुम्ही तुमचा पडेल पेपर खपविण्यासाठीं बाटल्यास खोटं नाटं लिहा. पण सत्य काय आहे तें जग ओळखून आहे.

सर्व देशद्रोही उठून बाहेर पडतात. आलमगीर आणि तटणीस परस्परांकडे भकास मुद्रेनें पाहात ऊर बडवून घेतात.

‘काळ’कर्ते शंकरराव दाते ह्यांनींहि आपल्या पत्रांतून माझ्यावर शिव्या-शापांचा कांहीं कमी वर्षाव केला नाहीं. “आचार्य अत्रे यांचें भाषण म्हणजे तमाशा होता. त्यांत पाचकळपणा, पांचटपणा, ग्राम्यता, अश्लीलपणा भरलेला होता.” एवढेंच लिहून ते थांबले नाहींत. तर पूर्वी सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें माझ्यावर शेंदीडशें हिंदुत्वनिष्ठ गुंडांनीं जसा हल्ला केला, तसा पुन्हां एकदां माझ्यावर हल्ला करून त्यांनीं मला ठार करून टाकावें, अशी आपल्या पत्रांतून चिथावणी देण्यास

त्यांनीं कमी केलें नाहीं. " हिंदुमहासभेचा कॉंग्रेसला विरोध म्हणजे मर्दांचा नसून षंढाचा विरोध आहे " हा मुद्दा माझ्या मंडईच्या भाषणांत विशद करतांना मीं जी एका भटजीची आणि त्याच्या बायकोची गोष्ट सांगितली होती तिच्यावर माझ्या ह्या टीकाकारांनीं सर्वांत जास्त काहूर उठवलें.

पण त्यांना हें माहीत नव्हतें कीं, ही गोष्ट मुळांत माझी नव्हती. महात्मा गांधींचा असहकार हा केवळ षंढाचा असहकार आहे हें दाखविण्यासाठीं नामदार दादासाहेब खापर्डे ह्यांनीं अशा तऱ्हेची एक गोष्ट हजारों स्त्रीपुरुषांसमोर एका जाहीर व्याख्यानांत सांगितली होती. त्या मूळ गोष्टींत एक मारवाडी, त्याची मारवाडीण बायको आणि पठाण अशीं तीन पात्रें होतीं. पठाणानें त्या मारवाड्याला डोक्यावर छत्री धरावयाला लावून त्या मारवाडणीचे शारीरिक हाल केले, त्या हालाचें दादासाहेब खापर्ड्यांनीं आपल्या इरसाल भाषेंत जें भयानक वर्णन केलें होतें त्याची पुनरावृत्ति करण्याची हिंमत कोणाहि वक्त्याला होणार नाहीं. मीं त्या गोष्टीला इतकें सौम्य नि सभ्य स्वरूप दिलें होतें कीं ती गोष्ट सांगून झाल्यावर श्रोत्यांमध्यें हास्यरसाचा प्रचंड कल्लोळ उसळला.

अशा रीतीनें माझ्यावर बीभत्स आणि अर्वाच्य टीका करून हिंसात्मक हल्ला करण्याची चिथावणी ' काळ ' आणि ' विविधवृत्त ' ह्या पत्रांनीं आपल्या वाचकांना देण्याची त्या वेळीं पराकाष्ठा केली. त्याचाच परिणाम होऊन कीं काय मुंबईच्या आंबेवाडींत एका रात्रीं माझी मसानी–देशमुखांच्या निवडणुकीसाठीं प्रचारसभा भरली होती, तिच्यांत मला दुखापत करण्याचा एक धाडसी प्रयत्न दोन इसमांनीं केला.

स्त्री-पुरुष श्रोत्यांनीं सारी आंबेवाडी त्यावेळीं चिक्कार भरून गेली होती. मॅजेस्टिक सिनेमासमोरच्या रस्त्यापर्यंत ही गर्दी पसरली होती. आंबेवाडींतल्या तिन्ही बाजूंच्या ग्यालऱ्या गच्च भरल्या होत्या. मी मधल्या पटांगणांत भाषण करीत होतों. माझ्या डोक्यावर एक ग्यासची बत्ती दोन्ही ग्यालऱ्यांना आडवी दोरी बांधून टांगली होती. मी जवळ जवळ तिच्या खालीं उभा राहून बोलत होतों.

एवढ्यांत ग्यालरीत बसलेल्या दोघां इसमांनीं त्या दोरीचें एक टोक एकदम कापलें. आणि बत्ती वरून एकदम खालीं आली. ती माझ्या डोक्यावरच पडली असती. पण मी झटकन् एकदम मागें सरलों. त्याबरोबर ती माझ्या पायांसमोर आदळून तिचें तेल माझ्या अंगावर उडालें. मला ' कांहीं ' अपाय झाला नाहीं. केवळ दैवयोगानें मी त्या संकटांतून बचावलों. लोकांनीं त्या दोघां इसमांवर ताबडतोब झडप घालून त्यांना असा बेदम ठोक दिला, कीं पोलिसांनीं त्यांना सरळ इस्पितळांत पोंचतें केलें. त्यानंतर सभेला विलक्षणच रंग चढला.

ह्याच सभेचें अत्यंत खोटें आणि खोडसाळ वृत्त ' आचार्य अत्र्यांना मार ' या मथळ्याखालीं पुण्याच्या ' ज्ञानप्रकाश 'मध्यें प्रसिद्ध झालें. तें असें : मुंबईच्या

एका सभेंत आचार्य अत्रे ह्यांनीं हिंदुसभेबद्दल खट्याळ उद्गार काढले म्हणून श्रोत्यांकडून त्यांना मारण्यांत आलें, आणि त्यामुळें त्यांना बरेंच लागलें.

त्या वेळीं 'ज्ञानप्रकाशां'तून संपादक काकासाहेब लिमये हे निवृत्त झाले होते. आणि माझा (नि काकासाहेबांचाहि) अकारण मत्सर आणि द्वेष करणाऱ्या एका माणसाच्या हातीं त्याचीं संपादकीय सूत्रें आलेलीं होतीं म्हणूनच त्यानें माझी बदनामी करण्याची ही संधि जातां जातां साधून घेतली.

# ४०

## मंडईतली 'ती' विराट् सभा

मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकी २६ नोव्हेंबर १९४५ रोजीं झाल्या. त्याच्या आधल्याच दिवशीं चित्रपटाच्या कामासाठीं मला दिल्लीला जावें लागलें. दिल्लीहून मी ३ डिसेंबर रोजीं दुपारीं चार वाजतां परत आलों. त्याच दिवशीं निवडणुकीचा निर्णय जाहीर होणार होता. प्रवासानें दमून गेल्यामुळें आंघोळ करून दिवाणखान्यांत विश्रांति घेत बसलों होतों, तोंच निवडणुकीचा निकाल नभोवाणीवरून ऐकावयाला मिळाला. कॉंग्रेसच्या सर्व उमेदवारांचा प्रचंड विजय होऊन साऱ्या विरोधकांची—पुण्याच्या अण्णासाहेब भोपटकरांखेरीज करून—डिपॉझिटें जप्त झालीं होतीं. माझ्या हर्षाला पारावर राहिला नाहीं. कारण त्या विजयांत महाराष्ट्रापुरता माझ्या प्रचाराचा मोठा भाग होता.

रात्रीं माझ्या छापखान्यांतून मॅनेजरांचा फोन आला कीं, "आतांच पुण्याहून फोन आला होता तुम्हांला, कीं उद्यां मंगळवारीं रात्रीं दहा वाजतां मंडईमध्यें हिरे-गाडगीळांच्या अभिनंदनाची सभा भरणार असून तिच्यांत तुमचें मुख्य व्याख्यान होणार असल्याचें आम्हीं जाहीर केलें आहे.

तेव्हां काय वाटेल तें करून तुम्हांला आलेंच पाहिजे!”

तो निरोप ऐकून मी बुचकळ्यांत पडलों. मनाशीं विचार केला, जावें कीं न जावें? कारण सात आठ दिवसांच्या दिल्लीच्या उलटसुलट प्रवासानें आणि तेथील कामाच्या दगदगीनें मी थकून गेलों होतों. शेवटीं, जाऊं नये असेंच मीं ठरविलें आणि तशी तांतडीची तार पुण्यांतील मंडळींना पाठवून द्यावयास मॅनेजरना सांगून मी झोपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं निजून उठतों न उठतों तोंच पुण्याहून माझे गांववाले ज्ञानोबा जाधव आणि सकपाळ-शेडगे नांवाचे मंडईंतले दोन व्यापारी माझ्या बिऱ्हाडीं हजर. त्यांना पाहून मी सर्दच झालों. म्हणालों, “आलें लक्ष्यांत तुम्ही कां आलांत तें! कमालच केलीत तुम्ही!”

“मग काय तर?” ज्ञानोबा हंसून म्हणाले, “तुम्हांला येथून पकडून घेऊन गेल्याखेरीज तुम्ही थोडेच येणार? आम्हांला ठाऊक आहे, कीं नुसत्या फोननें तुम्ही येणें शक्यच नाहीं!”

तेव्हां मी म्हणालों, “ज्ञानोबा, थोड्याच दिवसांपूर्वी मंडईत माझें एवढें मोठें भाषण झालें. आतां फिरून इतक्या लवकर माझें भाषण कशाला? लोक कंटाळतील!”

“छे, छे, उलट गेले तीन दिवसांपासून सारे लोकच आमच्या मागें लागले आहेत कीं कॉंग्रेसनें निवडणूक जिंकल्यानंतर मंडईत पुन्हां अत्र्यांचेंच व्याख्यान झालें पाहिजे!” सकपाळ-शेडगे म्हणाले, “आणि म्हणून काल संध्याकाळीं निवडणुकीचा निकाल जाहीर झाला त्या वेळीं हिरे-गाडगीळ सत्काराच्या वेळीं तुमचें व्याख्यान उद्यां मंडईत होणार असल्याचें आम्हीं तिथेंच ‍‍‍जाहीर करून टाकलेलें आहे. अशा आनंदाच्या वेळीं तुमचें व्याख्यान करायचें नाहीं तर मग करायचें केव्हां?”

तेव्हां अर्थात्‌च माझा नाइलाज झाला. पण एकदम कांहीं तरी आठवण होऊन मीं परत ज्ञानोबांना विचारलें, “काकासाहेब गाडगीळांना विचारूनच तुम्ही माझ्याकडे आलांत ना?”

त्यावर ज्ञानोबा म्हणाले, “अर्थात्‌च. त्यांना विचारून मीं हें सारें ठरविलेलें आहे. ते म्हणाले घेऊन या अत्र्यांना! उद्यां अमावास्या असल्यानें मंडई भरणार नाहीं. तेव्हां लोकांना बसवायची व्यवस्था दुपारपासूनच करतां येईल.”

“अध्यक्ष कोणाला करणार?” मीं विचारलें.

“आधीं आमचा विचार तुम्हांलाच अध्यक्ष करावयाचा होता!” ज्ञानोबा म्हणाले, “पण काकासाहेब गाडगीळ म्हणाले कीं तुम्हीं जेध्यांनाच अध्यक्ष करा. तेव्हां आम्हीं तें कबूल केलें.”

त्या दिवशीं संध्याकाळीं ‘डेक्कन क्वीन’नें पुण्याला जायचें ठरलें. ज्ञानोबांनीं

पुण्याला फोन करून मी येणार असल्याचें कळविलें. दुपारीं आम्ही माझ्या छापखान्यांत आलों. तेथें पुण्याचीं वर्तमानपत्रें पहावयाला मिळालीं. 'दैनिक समाचारां'त सत्कारसभा माझ्या अध्यक्षतेखालीं होणार असल्याचें जाहीर झालेलें होतें. 'लोकशक्तीं'त सत्कार समारंभाची नुसती बातमी होती. तिच्यांत माझ्या नांवाचा उल्लेख नव्हता. पण बाकीच्या वृत्तपत्रांमध्यें या सत्कारसभेची नुसती बातमी देखील कुठें नव्हती.

तेव्हां मी त्या मंडळींना पुन्हां म्हणालों कीं, "सभेची फारशी प्रसिद्धि झालेली नाहीं. तेव्हां मी आलेंच पाहिजे का?"

त्यावर ते म्हणाले, "आज तुमच्या व्याख्यानाची वार्ता चौघडा लावून साऱ्या गांवांत सांगण्याचें आमच्या मंडळींनीं ठरविलें आहे. तेव्हां सभा पूर्वीपेक्षां दुपटी-तिपटीनें मोठी होणार याची खात्री असू द्या!"

ठरल्याप्रमाणें आम्ही 'डेक्कन क्वीन'नें निघालों. रात्रीं सव्वाआठ वाजतां आम्हीं पुणें स्टेशनवर पोहोंचलों. माझ्याबरोबर मी प्रा. स. बा. हुदलीकर ह्यांना घेतलें होतें. स्टेशनवर माझे परममित्र काकासाहेब लिमये आणि हरिभाऊ वाघिरे मला भेटले. त्यांनीं बाजूला घेऊन हलक्या आवाजांत सांगितलें कीं, "आजच्या सभेबद्दल काकासाहेब एकंदरींत नाखूष दिसताहेत. म्हणून तुम्ही आलां नसतां तर बरें झालें असतें!"

"छे, छे, तुमचा कांहीं तरी गैरसमज झालेला दिसतो आहे!" मी म्हणालों, "काकासाहेबांच्या सल्ल्यानेंच तर हें सगळें ठरलेंय! त्यांना नाखूष होण्याचें काय कारण?"

काकासाहेब लिमये म्हणाले, "तुम्हीं कांहीं म्हणालांत तरी आंत कांहीं तरी तुमच्याबद्दल कुरबूर आहे अशी अगदीं खात्रीपूर्वक माहिती मला मिळाली आहे!"

त्यानंतर आम्ही सारे मोटरमधून प्रथम मंडईमध्यें गेलों. त्या वेळीं साडेआठ वाजण्याचा सुमार होता. मंडईच्या मागला चौक तर श्रोत्यांनीं अगदीं फुलून गेला होता. मधोमध वीस फुटांचें उच्चासन बांधण्यांत आलें होतें. चोहोंबाजूंनीं लोकांची सारखी रीघ लागून राहिली होती. मी मनांत म्हटलें कीं आजची सभा दणकेबाज होणार यांत कांहीं शंका नाहीं. त्यानंतर आम्ही स्टेशनासमोरच्या 'नॅशनल हॉटेल'-मध्यें जेवायला गेलों. जेवण करून पावणे दहा वाजतां तेथून निघालों आणि दहा वाजायला पांच मिनिटें कमी असतांना आम्ही व्याख्यानाच्या ठिकाणीं येऊन पोहोंचलों.

उच्चासनावर मी जातांक्षणींच श्रोत्यांनीं माझें सहर्ष स्वागत केलें. मीहि त्यांना चौफेर अभिवादन करून माझ्या जागेवर बसलों. फारच प्रचंड श्रोतृसमुदाय जमलेला होता त्या सभेंत. दहा हजारांच्या वर स्त्रियाच होत्या. व्यासपीठावर माझ्या

शेजारीं काकासाहेब लिमये, प्रा. हुदलीकर, पोपटलाल शहा, हरिभाऊ वाविरे, काशिनाथ टकूजी जाधव, काशिनाथबुवा पाषाणकर, कोंडे पाटील इत्यादि मंडळी बसली होती. त्यांच्याशीं गप्पा मारीत मी पंधरावीस मिनिटें तसाच बसलों. एवढ्या वेळांत श्रोत्यांची संख्या बेसुमार वाढली.

मंडईच्या आजूबाजूला असलेल्या घरांच्या कौलांवर नि झाडांच्या फांद्यांवर अनेक मंडळी अंधारांत बसलेली मला दिसली. वेळ जसजसा होऊं लागला, तसतसे श्रोते अधीर होऊन टाळ्यांच्या गजरानें आपली अधीरता व्यक्त करूं लागले. वीस मिनिटें होऊन गेलीं. तसें पोपटलाल मला म्हणाले, "काँग्रेस हाऊसवरची हिरे-गाडगीळांच्या सत्काराची सभा अद्याप संपलेली दिसत नाहीं. तेव्हां तुम्ही आतां आपल्या व्याख्यानाला सुरुवात करा. तुमचें व्याख्यान चालू असतां ते येतील!"

मी म्हणालों, "छे, छे, तसें कसें? सत्कारसमारंभ ज्यांचा आहे ती मंडळी येथें नसतांना मी व्याख्यान कसें सुरू करूं? तें बरें दिसणार नाहीं. खेरीज जेधे हे आजच्या सभेचे अध्यक्ष आहेत. ते देखील अजून आले नाहींत!"

इतक्यांत मंडईतल्या दोनचार कार्यकर्त्यांनीं हळकेंच माझ्याजवळ येऊन सांगितलें कीं, "जेध्यांकडून आतांच निरोप आला आहे कीं त्यांना यायला बराच उशीर होणार आहे. कदाचित् ते येणारहि नाहींत. तेव्हां आजची सभा तुमच्याच अध्यक्षतेखालीं करायचें आम्हीं ठरविलें आहे."

"ठीक आहे!" मी हंसून म्हणालों, "मी बसलोंच आहे इथें अध्यक्षस्थानीं, येऊं द्या हिरे-गाडगीळांना."

क्षणभरानें ज्ञानोबा जाधव घाईघाईनें पायऱ्या चढून वर आले. त्यांचे डोळे लाल झाले होते. चेहेरा अतिशय उतरलेला होता. ते मला म्हणाले, "काकासाहेब सभेच्या मागल्या बाजूला तुमच्या मोटारीशेजारीं उभे आहेत. त्यांनीं तुम्हांला दोन मिनिटें तिकडे बोलावलेलें आहे.

मी म्हणालों, "एवढी गर्दी ओलांडून मी त्यांच्याकडे जाण्याऐवजीं त्यांनाच इकडे घेऊन या कीं!"

तेव्हां ज्ञानोबा म्हणाले, "नाहीं–नाहीं–त्यांनीं तुम्हांलाच बाहेर बोलावलें आहे."

मीं ज्ञानोबांना विचारलें, "भानगड काय आहे?" तेव्हां ज्ञानोबा म्हणाले, "त्यांचें म्हणणें असें दिसतें आहे कीं आजच्या सभेंत विशेष टीका कोणावर होतां कामा नये!" मी हंसून म्हणालों, "एवढेंच ना? कांहीं हरकत नाहीं!"

असें म्हणून मी आणि काकासाहेब लिमये असे दोघे व्यासपीठावरून खालीं उतरलों आणि गर्दींतून मोठ्या मिनतवारीनें सभेच्या मागल्या बाजूला जेथें बुरुडाचीं दुकानें होतीं तेथें गेलों. माझ्याजवळ अंधारांत काकासाहेब गाडगीळ उभे होते. त्यांच्या

शेजारीं भाऊसाहेब हिरेहि होते.

मी जातांच माझा हात धरून काकासाहेब मला एकदम म्हणाले, "बाबूराव, आजचें हें तुमचें व्याख्यान रहित करावयाचें मीं ठरविलें आहे."

मी आश्चर्यचकितच झालों. म्हणालों, "कारण ?"

"कारण विस्तारानें इथें तुम्हाला सांगायला मला वेळ नाहीं!" काकासाहेब म्हणाले, "उद्यां सकाळीं मी तुम्हांला सांगेन. 'वरून' आमची चांगली (बोटानें अभिनय करून) षष्ठी झाली आहे. तुम्हांला काय सांगायचें? पण तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा!"

काकासाहेबांशीं काय बोलावें हेंच मला कळेना. मी म्हणालों, "काकासाहेब, आज खरोखरच मी येणार नव्हतों. ही सारी मंडळी मुंबईहून मला घेऊन आली म्हणूनच केवळ मी येथें आलों. एवढी प्रचंड सभा तिकडे माझें व्याख्यान ऐकायला जमलेली आहे. आणि तुम्हीं म्हणतां मीं व्याख्यान देऊं नये—भलत्याच पंचप्रसंगांत टाकलें आहेत तुम्ही मला आज!"

तेव्हां ज्ञानोबा आणि इतर दोघेतिघे मंडईतले व्यापारी काकुळतीनें म्हणाले, "अहो, असें काय बोलताहांत काकासाहेब? तुमच्या संमतीनेंच तर हें सारें आम्हीं ठरविलें! वर्तमानपत्रांमधून आणि गांवामधून प्रसिद्ध केलें आणि आतां आयत्या-वेळीं असें."

—पण काकासाहेबांनीं त्यांना पुढें बोलूंच दिलें नाहीं. ते माझ्याकडे पाहून म्हणाले, "माझी मुळींच संमति घेतलेली नाहीं ह्यांनीं. उलट माझ्याकडे हे जेव्हां आले, तेव्हां मीं यांना सांगितलें कीं, तुम्ही एवढी घाई करूं नका. पंधरा दिवस जाऊंद्यात. मग इथें माझ्या अध्यक्षतेखालीं अत्र्यांचें आपण व्याख्यान करूं—"

"हजारों लोकांची निराशा होईल काकासाहेब, असें करूं नका तुम्ही!" मंडईतले कार्यकर्ते अजीजीनें म्हणाले, "पाहिजे तर अत्र्यांचें पंधरा मिनिटें भाषण होऊं द्या—आम्ही आपल्या पायां पडतों!"

तेव्हां काकासाहेब करड्या आवाजांत म्हणाले, "छे, छे, तें होणें शक्य नाहीं. या बाबतींत जेधे, मी आणि हिरे ह्या आम्हां तिघांचें अगदीं एकमत आहे. अत्र्यांचें व्याख्यान आज येथें होणें शक्य नाहीं!"

हिरे शेजारीं शांतपणें उभे होते. ते कांहीं बोलले नाहींत. मी त्यांच्या चेहऱ्या-कडे पाहिलें. पण अंधारांत त्यांच्या चेहऱ्यावरची भावना मला दिसूं शकली नाहीं. पुन्हां मंडईतले कार्यकर्ते गळ घालूं लागले. तेव्हां काकासाहेब एकदम स्वर बदलून म्हणाले, "तुम्हांला अत्र्यांचेंच व्याख्यान व्हावयाला पाहिजे असेल तर खुशाल तें करा. आमची हरकत नाहीं. पण आम्ही कांहीं हजर राहणार नाहीं तिथें. आमचा सत्कार उद्यां इथें करतां येईल!"

'अत्र्यांचें व्याख्यान होणार असलें तर आमचा सत्कार होणार नाहीं. आणि आमचा सत्कार होणार असला तर अत्र्यांचें व्याख्यान होणार नाहीं' असा अटीतटीचा पेंचप्रसंगच जेव्हां काकासाहेबांनीं निर्माण केला, तेव्हां त्यांचें अंतरंग ताबडतोब माझ्या लक्षांत आलें. मग क्षणाचाहि विलंब न करतां मी ताडकन् म्हणालों, "मग काकासाहेब, आज मी व्याख्यान देत नाहीं. आजच्या सभेंतली ही प्रचंड गर्दी केवळ माझें व्याख्यान ऐकण्यासाठीं आली आहे, हें मला माहीत आहे. तथापि ही सभा तुमच्या सत्काराची आहे. म्हणून या सभेंत माझ्या व्याख्यानापेक्षां तुमचा सत्कार होणें हें अधिक महत्त्वाचें आहे. मला बोलायला अशा छप्पन्न सभा मिळतील! तेव्हां होऊं द्या तुमचा सत्कार, मी जातों!"

असें म्हणून मी आणि काकासाहेब लिमये माझ्या मोटरींत बसूं लागलों. तथापि मोटरीचा ड्रायव्हर कुठें गर्दीमध्यें बेपत्ता झाला होता. म्हणून आमच्या जाण्याला जसा विलंब होऊं लागला तशी भोंवतालीं गर्दी जमूं लागली. तेव्हां गाडगीळ शेजारीं उभ्या असलेल्या टांग्याकडे बोट दाखवून मला म्हणाले, "तुम्ही टांग्यामधून जातां का? कारण तुम्ही इथून गेल्याखेरीज मी हलणार नाहीं!"

तेव्हां मी आणि लिमये लागलेच टांग्यांत जाऊन बसलों. टांगा सुरू होण्यापूर्वी काकासाहेब गाडगीळ मला म्हणाले, "तुम्ही माझ्या घरीं जाऊन बसा. मी आतां दहा मिनिटांत सभा संपवून परत येतों अन् येत्या सहा महिन्यांचें राजकारण तुम्हांला समजावून सांगतों!"

तेव्हां टांग्यांतून मी मोठ्यानें ओरडलों, "तें सहा महिन्यांचें अन नऊ महिन्यांचें राजकारण तुम्ही आपल्या घरच्या मंडळींना शिकवा–मला नको—"

अंधारांत अदृश्य होणाऱ्या आमच्या टांग्याकडे गर्दींतले पुष्कळसे लोक पहातच राहिले. व्याख्यान न देतां घाईघाईनें टांग्यांत बसून मी चाललों कुठें हयाचा कांहीं त्यांना बोध झाला नाहीं.

यानंतर आम्ही थेट फर्ग्युसन कॉलेज रोडवरील आंबराई कॅम्पमधील काकासाहेब लिमयांच्या बिऱ्हाडीं गेलों तेथें तासाभरानें पुष्कळशी माझी मित्रमंडळी आणि सभा बोलावणारे मंडईतले दहाबारा व्यापारी मला येऊन भेटले. मी सभेंतून गेल्यानंतर पुढें सभेमध्यें काय झालें याची साद्यंत हकीकत त्यांनीं मला सांगितली.

व्यासपीठावर काकासाहेब गाडगीळ चढल्यानंतर माझें भाषण आजच्या सभेंत होणार नाहीं ही गोष्ट प्रारंभीं त्यांनीं श्रोत्यांना सांगितली नाहीं. त्याचें कारण उघडच होतें

सभेचें अध्यक्षस्थान 'शिवाजी मराठा हायस्कूल'चे हेडमास्तर केशवराव शिरोळे हयांना देण्यांत आलें. प्रारंभीं गाडगीळांच्या सांगण्यावरून भाऊसाहेब हिरे हयांनीं पंधरावीस मिनिटें भाषण केलें. त्यानंतर काकासाहेब गाडगीळ बोलावयास उठले ते म्हणाले, "आजच्या सत्कारसमारंभानिमित्त माझे मित्र बाबूराव अत्रे यांचें भाषण

व्हावयाचें होतें. परंतु, प्रांतांतील कॉंग्रेसच्या राजकारणाची जबाबदारी माझ्यावर असल्यानें मीं त्यांना आजचें भाषण तहकूब करण्यास सांगितलें व तें त्यांनीं शिस्तप्रिय सैनिकाप्रमाणें आणि उज्ज्वल कॉंग्रेसनिष्ठेनें ताबडतोब मान्य केलें. तसेंच सभेच्या नियोजकांना मीं विनंती केली त्यांनीं सुद्धां त्याच भावनेनें ती मान्य केली. या निर्णयानें कांहीं लोकांचा गैरसमज होईल. तथापि, हा क्षणाचा गैरसमज असून दीर्घकालीन दृष्टया तो उपयुक्त ठरेल. प्रांतांतील राजकारण येत्या सहा महिन्यांत कसें चालवायचें, याची कांहीं योजना आम्हीं ठरवली आहे. ती अत्रे ह्यांना मीं समजावून सांगितली नाहीं, अशा स्थितींत त्यांनीं भाषण केल्यास, माझी जबाबदारी मीं पार पाडली नाहीं, असें होईल. अत्रे हे सामान्य सैनिक नाहींत. त्यांच्या वक्तत्वाचा नि कर्तृत्वाचा उपयोग अधिक चांगल्या रीतीनें करण्याचें आमच्या योजनेंत आहे. ते एक अधिकारी सैनिक आहेत. सेनापतीचें कर्तव्य आपली सामग्री उत्कृष्ट रीतीनें वापरण्यांतच असतें. हीच दृष्टि ठेवून हा निर्णय घेतला आहे. लढा अटळ आहे म्हणून प्रयत्नांची गुंफण व गोठवण चातुर्यानें करावयाला पाहिजे.

"अत्रे यांचें व्याख्यान आज रहित केलें. याचा अर्थ त्यांचें मागील व्याख्यान वाईट झालें असें नाहीं. मी दौऱ्यावरून परत आल्यानंतर 'ज्ञानप्रकाश' चे संपादक काकासाहेब लिमये ह्यांना त्याबद्दल विचारलें. त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें कीं त्यांत अश्लील अगर असभ्य असें कांहीं नव्हतें. श्री. अत्रे ह्यांचें व्याख्यान येथें जरूर होईल आणि त्या वेळीं मी अध्यक्ष असेन. ती योग्य वेळ कोणती हेंहि योग्य वेळीं जनतेला कळेल. श्री. अत्रे व येथील नियोजक यांनीं माझा निर्णय ऐकण्यांत जी शिस्त दाखविली त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों."

माझें व्याख्यान होणार नाहीं असे शब्द गाडगीळांच्या तोंडून निघतांक्षणींच सभेमधून सहस्रशः खेदोद्गार निघाले आणि सारी सभा उठून उभी राहिली. सभेचा एकदम बेरंग झाला. हजारों लोक निराश होऊन मनांतल्या मनांत चरफडत पण योग्य तो संयम दाखवून अत्यंत शांतपणें आणि शिस्तीनें सभेमधून बाहेर पडले. गाडगीळांना पुढें बोलणेंच मुळीं अशक्य झालें.

निवडणुकीमधील कॉंग्रेसच्या यशाबद्दल, निवडणुकीनंतर कॉंग्रेसच्या पुढील कार्यक्रमाबद्दल, आगामी प्रांतिक निवडणुकीबद्दल किंवा त्या सत्कार समारंभाबद्दल काकासाहेबांसारख्या जुन्या आणि सुप्रतिष्ठित कॉंग्रेस नेत्यानें निदान अर्धापाऊण तास तरी त्या पाऊण लाखांच्या विराट सभेपुढें भाषण करणें उचित आणि आवश्यक नव्हतें काय ?

पण त्यानंतर काकासाहेबांनीं आपलें भाषण दोनचार मिनिटांतच आटोपलें. आणि निवडणुकीमध्यें कॉंग्रेसला मिळालेल्या महान् विजयाबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीं प्रचंड संख्येनें जमलेल्या पुण्यपत्तनस्थ नागरिक स्त्री-पुरुषांच्या उत्साहा-

वर एका क्षणांत विरजण घालून काकासाहेब खालीं बसले.

हिरे-गाडगीळ ह्यांना घालण्यासाठीं दीडशें हार, निरनिराळ्या संस्थांकडून आलेले, व्यासपीठाखालीं ठेवलेले होते. पण ज्यांनीं ते हार आणले होते, त्यांना पुढें येऊन ते हार हिरे-गाडगीळांच्या गळ्यांत घालण्याचें मुळीं धैर्यच झालें नाहीं. ते मागल्या मागें सभेबाहेर पडणाऱ्या गर्दींत कोठल्या कोठें बेपत्ता झाले कोणास ठाऊक! त्यामुळें ते सारे हार फुकट गेले.

'वंदे मातरम्' गीत कसेंबसें कुणीतरी म्हणून सभा समाप्त करण्याचा उपचार नांवापुरता पाळण्यांत आला. इतक्या आनंदानें, हर्षानें आणि उत्साहानें जमलेली एवढी मोठी प्रचंड सभा इतक्या निराशेमध्यें, विषादामध्यें आणि संतापामध्यें विसर्जित झालेली माझ्या तरी आठवणींत नाहीं.

माझ्याबरोबर मुंबईहून पुण्याला आलेले, माझ्यासमवेत त्या सभेच्या व्यासपीठावर बसलेले प्रा. हुदलीकर ह्यांना मी त्या सभेंतून परस्पर बाहेर निघून गेल्याचें माहीत नव्हतें. ते व्यासपीठावर तसेच बसून राहिले. नंतर काकासाहेबांनीं जेव्हां सभेंत येऊन माझें भाषण रहित केल्याचें जाहीर केलें तेव्हां प्रा. हुदलीकर संतापून त्यांना तेथल्या तेथें म्हणाले, "काकासाहेब, अत्र्यांवर तुम्ही हा अन्याय केला आहे!"

तेव्हां काकासाहेब त्यांच्या अंगावर खेकसून त्यांना म्हणाले, "Do you want him to be killed? आज अत्र्यांचें भाषण इथें झालें असतें तर त्यांचा इथें खून झाला असता. मीं त्यांचें भाषण रहित करून त्यांचे प्राण वांचवले आहेत!"

तेव्हां प्रा. हुदलीकर त्यांना म्हणाले, "काका, एवढे हजारों लोक अत्र्यांचें व्याख्यान ऐकायला येथें जमले असतांना त्यांच्या अंगाला हात लावण्याची कोणाची माय व्याली आहे! कशाला उगाच थापा मारताहांत!" असें म्हणून प्रा. हुदलीकर रागारागानें व्यासपीठावरून खालीं उतरले.

"अत्र्यांचें व्याख्यान त्या रात्रीं तुम्ही कां रहित केलें?" याबद्दल काकासाहेब गाडगीळांना त्यानंतर पुढें अनेकांनीं प्रश्न विचारले. त्यांना काकासाहेब हेंच उत्तर देत कीं, "अत्र्यांच्या आधल्या व्याख्यानानें संतापलेले हिंदुसभावादी त्या दिवशीं त्यांचा खून करणार असल्याचें मला खात्रीलायकरणें समजलें होतें. म्हणून त्यांचे प्राण वांचविण्यासाठीं मी त्यांचें व्याख्यान बंद केलें."

थापेबाजीबद्दल आणि भेपकपणाबद्दल काकांची त्या काळापासून प्रसिद्धि होती. एकाला एक बोलायचें, दुसऱ्याला दुसरें सांगायचें आणि आयत्या वेळीं सभेंत तिसरेंच सांगायचें हा त्यांचा नेहमींचाच खाक्या असे. एकादी गोष्ट त्यांना करावयाची नसली म्हणजे 'सरदार पटेलांचें मला खरमरीत पत्र आलें आहे.' 'नेहरूंनीं माझी षष्ठी केली आहे.' 'गांधींकडून मला दम आलेला आहे!' अशा थापा बेधडकपणें मारायला ते कधींहि मागेंपुढें पाहत नसत.

'मंडईतल्या लोकांनीं मला न विचारतां ही सभा भरवली आणि अन्यांना व्याख्यानाला बोलावलें ही तसलीच त्यांची धादांत थाप होती. 'माझा त्या सभेंत खून होणार आहे' ही गोष्ट काय आयत्या वेळीं त्या सभेंत एकाद्या कर्णपिशाच्चानें त्यांच्या कानांत येऊन सांगितली? बरें, जर ती गोष्ट आधीं त्यांना कळली होती, तर त्यांनीं त्या संध्याकाळीं पुण्याच्या स्टेशनवर आपला माणूस पाठवून मला सांगायचें कीं, आजच्या सभेला तुम्ही येऊं नका म्हणून. कारण असें असें तिथें होणार आहे.

सभास्थानीं येऊन मी दाखल झाल्यानंतर आणि लोकांनीं माझें प्रचंड स्वागत केल्यानंतर, मग मला सभेंतून बाहेर बोलावून माझा असा तेजोभंग आणि अपमान करण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. जाहीर सभेंत माझा खून झाला असता तर मी 'हुतात्मा' झालों असतों! तो मान मला मिळूं नये म्हणून कीं काय काकांनीं मला बाहेर अंधारांत बोलावून माझ्या पाठींत आपल्या मत्सराची कट्यार खुपसली!

मंडईमधल्या सोन्यासारख्या सभेचें काकासाहेब गाडगीळांनीं वाटोळें केलें हें पाहून पुणें शहरांत आणि साऱ्या महाराष्ट्रांत काकासाहेबांविरुद्ध संतापाची प्रचंड लाट उठली. मंडईतल्या व्यापाऱ्यांनीं त्यांच्या निषेधार्थ मंडईवरचें राष्ट्रीय निशाण चार तास खालीं घेतलें. काकासाहेबांच्या निषेधार्थी शेंकडों पत्रें 'साप्ताहिक नवयुग'-कडे आलीं त्यांपैकीं कित्येक मीं छापलीं. ह्या प्रकरणाचे पडसाद महाराष्ट्रांत पुढें कित्येक महिने हया ना त्या रीतीनें उमटत राहिले.

'नवयुग'च्या पुढच्या अंकांत मंडईच्या त्या सभेंत माझें व्याख्यान झालें असतें तर मी काय बोललों असतों त्याचें संपूर्ण प्रतिवृत्त लिहून मीं छापलें. तें वाचून काकासाहेबांच्या झोंडगिरीमुळें एका ओजस्वी व्याख्यानाला हजारों पुणेंकर त्या रात्रीं मुकले अशी हळहळ पुण्यांतल्या अनेक लोकांनीं व्यक्त केली.

मंडईमधलें माझें तें व्याख्यान काकासाहेबांनीं त्या रात्रीं जें होऊं दिलें नाहीं त्याचीं कारणें काय असावींत ह्याचा मीं पुष्कळ विचार करून पाहिला. पण कॉंग्रेसमधील त्या वेळच्या माझ्या वाढत्या लोकप्रियतेमुळें पोटांत मत्सराची जबरदस्त कळ उठल्यामुळेंच काकासाहेबांनीं कॉंग्रेसमधल्या आपल्या वडिलकीचा गैरफायदा घेऊन माझ्या व्याख्यानावर बिब्बा घातला, हयाखेरीज मला दुसरें कोणतेंहि समर्पक उत्तर मिळत नाहीं.

माझें व्याख्यान झालें नाहीं ह्याचें मला एवढें दुःख वाटलें नाहीं. पण स्वतःचा हेका आणि घमेंड पुरविण्यासाठीं काकासाहेबांनीं कॉंग्रेसच्या इभ्रतीचा आणि लोकांच्या उत्साहाचा असा जाहीरपणें पाणउतारा करावा याचें मला सर्वांत वाईट वाटलें.

मंडईच्या त्या सभेंतील काकासाहेबांचें अक्षम्य नि बेजबाबदार वर्तन हें त्यांच्या सार्वजनिक चारित्र्यावरील कधींहि न पुसतां येणारें एक लांच्छन आहे, असेंच या क्षणापर्यंत मला वाटतें.

# ४१

# मी न केलेलें भाषण

दिनांक ४ डिसेंबर १९४५ रोजीं रात्रौ पुण्यांतल्या मंडईमध्यें पाऊण लाख स्त्रीपुरुष श्रोत्यांची जी विराट् सभा माझ्या अध्यक्षतेखालीं भरलेली होती, तिच्यासमोर मी जें भाषण करणार होतों, पण काका गाडगीळांच्या मत्सरी आणि हीन स्वभावामुळें जें भाषण मला, त्या वेळीं करतां आलें नाहीं, तें मीं दि. १६ डिसेंबरच्या साप्ताहिक 'नवयुग'च्या अंकांत शब्दशः छापून प्रसिद्ध केलें. त्याचा सारांश या ठिकाणीं देणें मला आवश्यक वाटतें. त्या भाषणांतल्या 'हंशा नि टाळ्या' अर्थात्च काल्पनिक आहेत. पण माझ्या व्याख्यानाशीं परिचित असणाऱ्यांना कांहीं त्या असंभाव्य वाटण्याचें कारण नाहीं.

" बंधुभगिनींनो, निवडणुकीचा निकाल काल लागला आणि कॉंग्रेसच्या शत्रूंचाहि निकाल कालच लागला. (प्रचंड हंशा नि टाळ्या). २६ नोव्हेंबर हा दिवस हिंदुमहासभेच्या कुंडलीमधला अत्यंत वाईट दिवस असून त्या दिवशीं त्यांना मृत्युयोग आहे, हें भविष्य मीं मागेंच वर्तविलें होतें. (हंशा). स्वतःच्या कपाळीं काय लिहिलें आहे, हें स्वतःला वाचतां येऊं नये म्हणून कपाळाची

रचना परमेश्वरानें आपल्या डोळ्यांच्या वर केलेली आहे, असें जें गडकऱ्यांनीं मागें लिहून ठेवलेलें आहे, त्याचा अर्थ आतां आपल्याला विशेष स्पष्ट झाला आहे. गडकरी म्हणाले तें अगदीं बरोबर आहे. हें आपल्या कपाळावरचें लिखाण समोर आरसा धरून वाचावें, तर त्यांत तें उरफाटें दिसतें. म्हणूनच कपाळावर 'डिपॉझिट जप्त' अशीं अक्षरें लिहिलेलीं असतांना देखील त्या अक्षरांऐवजीं 'महासभेचा जय' अशींच उलटीं अक्षरें त्यांना त्या ठिकाणीं आतांपर्यंत दिसत होतीं.

"काल कॉंग्रेसच्या ज्या वीरांचा या इलाख्यांत जय झाला, त्यांपैकीं दोन विजयी वीर या ठिकाणीं आपल्यासमोर बसलेले आहेत. विजयश्रीनें तर ह्या वीरांच्या गळ्यांत माळ घातलेली आहेच. पण तेवढ्यानें तुमचें आमचें समाधान होणार नाहीं. अभिनंदनाचे सहस्रावधि हार त्यांच्या गळ्यांत घालण्याची तुमची इच्छा आहे. म्हणून एवढ्या प्रचंड संख्येनें तुम्ही या समारंभामध्यें दाखल झालेले आहांत. (प्रचंड टाळ्या).

"आजचा हा विजयसमारंभ मंडई विद्यापीठामार्फत या ठिकाणीं होत आहे. 'मंडई विद्यापीठ' हा शब्दप्रयोग मी मुद्दामच करीत आहें. कारण मंडईतल्या अशिक्षित आणि अडाणी मंडळींची थट्टा करण्यासाठीं पुण्यांतील एका हिंदुमहासभावादी वृत्तपत्रानें या मंडईचा नि येथें वरचेवर भरणाऱ्या कॉंग्रेसच्या सभांचा उल्लेख 'मंडई-विद्यापीठ' असा करण्याची अलीकडे सुरुवात केली आहे. या मंडईला नि येथील कार्याला 'मंडई विद्यापीठ' या नांवापेक्षां दुसरें अधिक सुंदर नांव देतां येणें शक्यच नाहीं. (टाळ्या). 'मंडई विद्यापीठ' ही मंडईची मस्करी नसून तो मंडईचा सन्मान आहे. (टाळ्या).

"आयुष्यामधली सर्वांत मोठ्यांतली मोठी आणि पवित्रामधील पवित्र अशी जी कोणती विद्या आहे, ती या मंडईमध्यें शिकण्याची व्यवस्था झाली आहे. कोणती बरें ती विद्या? ती विद्या म्हणजे स्वातंत्र्याची विद्या! (टाळ्या). सा विद्या या विमुक्तये! ही विद्या सरकारजमा विद्यापीठानें कधींच कोणाला शिकविलेली नाहीं. (हंशा). गुलामगिरींतून बाहेर पडावयाला जी विद्या सांगते, दास्याच्या शृंखला तोडण्याचें सामर्थ्य जी विद्या देते, चाळीस कोटी लोकांचें राष्ट्र स्वतंत्र करण्याचा मार्ग जी विद्या दाखवते, तीच खरी विद्या! (प्रचंड टाळ्या). बाकीची विद्या आणि ज्ञान ग्रंथालयाच्या कपाटांत कड्याकुलुपांच्या बंदोबस्तांत ठेवण्याच्या लायकीचें आहे. (हंशा).

"या मंडईच्या कळसावर जो तिरंगी झेंडा आज मोठ्या दिमाखानें फडकतो आहे, तो साऱ्या जगाला असें सांगतो आहे कीं, जी स्वातंत्र्याची विद्या गेलीं साठ वर्षें कॉंग्रेस या देशांतील चाळीस कोटि जनतेला शिकवण्याचा प्रयत्न करीत आहे, ती विद्या शिकण्याचें आणि शिकविण्याचें पुण्यामधलें हें एक प्रमुख विद्यापीठ आहे! (प्रचंड टाळ्या). 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी बजावणारच

बजावणार !' हा लोकमान्य टिळकांनीं राष्ट्राला शिकविलेला गुरुमंत्र आज कोणत्या विद्यापीठांत शिकविला जातो बरें ?

" लोकमान्य टिळकांनीं स्वतः बांधलेल्या विद्यामंदिरांत आज तो शिकविला जात नाहीं. किंवा त्यांनीं स्थापन केलेल्या वृत्तपत्राच्या द्विसाप्ताहिक गर्जनेमध्यें तो आवाज ऐकूं येत नाहीं. पण लोकमान्यांची ती स्वातंत्र्याची घोषणा या ' मंडई विद्यापीठां '-तल्या प्रत्येक अडाणी विद्यार्थ्याच्या अंतःकरणांत घुमत असलेली तुम्हांला आढळून येईल. याची साक्ष या मंडईच्या प्रवेशद्वारावर उभा असलेला तो लोकमान्यांचा पुतळाच तुम्हांला देईल ! ( प्रचंड टाळ्या ).

" या मंडई विद्यापीठामधल्या विद्यार्थ्यांना जगांतली दुसरी कोणतीहि विद्या किंवा ज्ञान नाहीं असें कोणीं म्हटलें तर तें मी एकादे वेळीं मान्य करीन. पण साम्राज्य-शाही युद्धाला मदत करून जनतेच्या स्वातंत्र्ययुद्धाशीं कशी निमकहरामी करावयाची ही राष्ट्रद्रोही विद्या जाणणारा एकहि बेइमान विद्यार्थी तुम्हांला या मंडई विद्यापीठांत आढळणार नाहीं, असें मी छातीवर हात मारून सांगतों. ( प्रचंड टाळ्या ).

" या ' मंडई विद्यापीठा 'च्या कुलगुरुपदावर काकासाहेब गाडगीळ ह्यांची नेमणूक सर्वानुमतें यापूर्वींच झालेली आहे. ( टाळ्या ). भाऊसाहेब हिरे यांनाहि या विद्यापीठाचे सन्माननीय सदस्य आजपासून करण्यांत आलेलें आहे. ( हंशा ). माझी नेमणूक तर या विद्यापीठाच्या आचार्यपदावर पूर्वींपासूनच झालेली आहे. ( हंशा ).

" कॉंग्रेस पक्ष हा लोकांचा पक्ष आहे, हें त्या निवडणुकीनें अगदीं स्पष्टपणें सिद्ध केलेलें आहे. कॉंग्रेसला विरोध करणें म्हणजे जनतेला विरोध करण्यासारखें आहे, हा धडा आणि ही अद्दल या निवडणुकीनें हिंदुमहासभेला काल रोजीं शिकवलेली आहे. ह्या गोष्टीची कल्पना पंजाबचे हिंदुसभावादी पुढारी डॉ. गोकुळचंद नारंग आणि नागपूरचे हिंदुत्वनिष्ठ नेते श्रीमंत घटाटे ह्यांना पूर्वींच आल्याकारणानें त्यांनीं आपापलीं नांवें निवडणुकींतून आधींच मागें घेतलीं आणि आपली अब्रू अन् डिपॉझिटें बचावलीं. पण हें शहाणपण आमच्या पुण्यामुंबईकडच्या ' हिंदुत्वनिष्ठ ' लोकांना कांहीं सुचलें नाहीं. म्हणजे गंमत पहा कीं, जी गोष्ट त्या पंजाबच्या नारिंगला कळली, ती आमच्या सदाशिव पेठेमधल्या संत्र्याला कळली नाहीं. जी गोष्ट त्या नागपूरच्या श्रीमंत घटाट्यांना कळून आली, ती गोष्ट बेळगांवच्या दिवाणबहाद्दूर बटाट्यांना कांहीं कळली नाहीं. ( प्रचंड हंशा ).

" मुंबई-मध्यप्रांतामधल्या हिंदुमहासभेच्या पांच उमेदवारांना ' हिंदुमहासभेचे पंच पांडव ' अशी ' केसरी 'नें एक नाटकी अन् लटकी पदवी देऊन उगाच हरबऱ्याच्या झाडावर चढवलेलें आहे. मध्यप्रांतांतला एक पांडव तर लढाई सुरू व्हायच्या आधींच पसार झाला. म्हणजे ' धर्मराज ' भोपटकर हे ज्येष्ठ पांडव सोडून दिले तर बाकीच्या एकूण एक पांडवांचीं डिपॉझिटें सुद्धां जप्त झालीं. ( हंशा ).

द्रौपदीचें वस्त्रहरण होण्याऐवजीं या पांची पांडवांचें पॅंटहरण झालें आणि त्यांना अन्न वांचविण्यासाठीं पळतां भुई थोडी झाली. ( प्रचंड हंशा ). महाभारतांतल्या पांडवांनीं तेरा वर्षें वनवास सहन केला, पण स्वतःची एवढी फजिती कधींच करून घेतली नसेल ! ( हंशा ).

" काँग्रेसच्या या विरोधकांचा काँग्रेसपेक्षांहि माझ्यावर अधिक रोष आहे. विशेषतः, याच ठिकाणीं तीन आठवड्यापूर्वी मीं जें भाषण केलें, त्या भाषणामुळें हे लोक माझ्यावर भयंकर भडकलेले आहेत. माझें हें भाषण अत्यंत अश्लील होतें, किंबहुना महासभेचा काँग्रेसशीं विरोध हा षंढाचा विरोध आहे–मर्दांचा विरोध नाहीं असें सांगतांना, मीं जी एका भटजीची गोष्ट तुम्हांला सांगितली होती, ती तर फारच गलिच्छ होती असा या लोकांनीं गिल्ला केलेला आहे. त्याबद्दल त्यांनीं मला अश्लीलाचार्य, गुंडाचार्य, होलिकाचार्य, तमासगीर पठ्ठे बाबूराव अशा एखाद्या शंकराचार्यांप्रमाणें अनेक पदव्या बहाल करून टाकलेल्या आहेत. ( हंशा ). आणि इतकी शिवीगाळ करून फिरून काँग्रेसचे गुंडच आम्हांला शिव्या देतात, अशी वर तक्रार करावयासहि त्यांनीं कमी केलेलें नाहीं ! ( टाळ्या–हंशा ).

" शिव्या खायची मला संवय आहे. ( हंशा ). शिव्या खाल्ल्यानें प्रकृति सुधारते असा माझा बऱ्याच वर्षांचा अनुभव आहे. ( जास्त हंशा ). मित्र हो, माझें पूर्वीचें येथलें भाषण माझे टीकाकार म्हणतात, तसें खरोखरच अश्लील असतें, तर इतक्या प्रचंड संख्येनें तुम्ही पुन्हां माझें भाषण ऐकायला आलां असतां काय ? ( 'नाहीं–नाहीं'-च्या प्रचंड घोषणा ). तुम्हां सभ्य स्त्री-पुरुष मंडळींना अश्लील भाषणें आणि गोष्टी ऐकावयाची चटक आहे असा जर कोणी तुमच्यावर आरोप केला, तर त्या इसमाची तुम्ही कशी संभावना करावयाला पाहिजे हें काय मीं तुम्हांला सांगायला पाहिजे ? ( हंशा ).

" मागल्या व्याख्यानांत एक भटजी आणि त्याची बायको ह्यांची जी गोष्ट मीं तुम्हांला सांगितली, त्यांत ' भट ' आणि ' भटीण ' असा अवमानार्थी शब्दप्रयोग चुकून देखील तोंडावाटें मीं काढला नाहीं. असें असतां, जे शब्द मी मुळीं बोललोंच नाहीं, ते शब्द माझ्या तोंडीं लबाडीनें घालून ज्या पत्राच्या बातमीदारानें माझ्या भाषणाचा गलिच्छ विपर्यास केला, त्याची संभावना तुम्ही कशानें कराल बरें ? ( ' अर्थात् जोड्यांनीं ' अशा घोषणा ! ).

" शिवाय, ही गोष्ट मीं जी तुम्हांला सांगितली, ती मूळची माझी नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी महात्मा गांधींना गलिच्छ आणि अश्लील शिव्या देणारे दादासाहेब खापर्डे नांवाचे एक थोर गृहस्थ होऊन गेले ! ( हंशा ). त्यांनीं एका जाहीर व्याख्यानांत, महात्माजींचा असहकार हा एक षंढाचा असहकार आहे हें वर्णन करतांना ' मारवाडी, मारवाडीण आणि एक पठाण ' यांजबद्दलची एक अत्यंत घाणेरडी गोष्ट शेंकडों सभ्य

स्त्री-पुरुषांपुढें मिटक्या मारीत आणि बीभत्स अंगविक्षेप करीत सांगितलेली मला ठाऊक आहे. त्याच गोष्टीचा एक अत्यंत सौम्य आणि साधा आहेर पंचवीस वर्षांनंतर त्या लोकांच्या पदरांत मीं आपल्यासमोर परत केला. त्या वेळीं 'कशी केली गांधींची खापर्ड्यांनीं' असें म्हणून जर ही मंडळी पोट धरधरून हंसली असतील तर आज 'कशी केली अत्र्यांनीं तुमची?' असें तुम्ही मोठमोठ्यानें हंसून म्हणालांत तर त्या मंडळींना वाईट वाटण्याचें कारण काय आहे हो?

"प्रतिपक्षीयाला गलिच्छ नि अश्लील शिव्या देण्याची परंपरा ह्यांची आहे, आमची नाहीं! ॲनी बेझंटसारखी एक महान् विदुषी ही तमाशांत नाचणारी एक 'साळूमैना' आहे, असे हातवारे करीत जेव्हां दादासाहेब खापर्ड्यांनीं एका व्याख्यानांत सांगितलें, तेव्हां या लोकांची सभ्यता कोठें गेली होती? एकोणीस वर्षांपूर्वी मालिनी-खान विवाहाचा निषेध करतांना पुण्याच्या एका जाहीर सभेंत 'केसरी'च्या सध्यांच्या वृद्ध संपादकांनीं 'पोटासाठीं ह्यांना हें लग्न करणें भाग पडतें आहे' अशी जेव्हां अधम कोटी केली, तेव्हां स्त्री-वर्गाबद्दलच्या ह्यांच्या भावना कुठें ओंकारेश्वरावर फिरायला गेल्या होत्या काय? नामदार गोखल्यांसारख्या श्रेष्ठ नि चारित्र्यवान् पुढाऱ्यांची बदनामी करण्याची जी मोहीम ह्या प्रतिगामी कंपूच्या टवाळ गुंडांनीं या पुणें शहरांत वर्षेंच्या वर्षे चालविलेली होती, तिला जगाच्या इतिहासांत तरी तोड सांपडेल काय? अत्र्यांच्या भाषणावर तोंडसुख घेण्यासाठीं आतां खवखवणाऱ्या थेरड्या जबड्यांची त्या वेळीं काय दांतखीळ बसली होती? (हंशा व टाळ्या).

"सगळ्यामध्यें माझ्या विरोधकांच्या वर्मी जर माझें अतिशय कांहीं लागत असेल तर तो म्हणजे माझा विनोद. (हंशा). आतां त्याला मी तरी काय करणार? विनोदाचें सामर्थ्यच मुळीं असें आहे, कीं तो जर समर्पक असेल तर विरोधकांच्या तोंडावर एकाद्या सिमिटाच्या गोळ्याप्रमाणें फटकन् जाऊन बसतो आणि विरोधकांना उत्तर देणें अगदीं अशक्य होतें. आणि मग चिडून आणि संतापून नुसती मारामारीची, धमकावणीची आणि शिवीगाळीची भाषा करण्यापलीकडे या विरोधकांना दुसरा मार्गच शिल्लक राहत नाहीं; किंवा तुमचा हा विनोद अश्लील आहे किवा गलिच्छ आहे असें विनोदकारावर बळेंच कुभांड रचणें एवढा एकच मार्ग यांना शिल्लक राहतो.

"विनोदावर अश्लीलतेचा आळ घेणें ही लबाड टीकाकारांची फार जुनी 'युगत' आहे. कांहीं लोक मला म्हणतात कीं, 'अत्रे, आम्हांला तुमच्या विनोदाची फार भीति वाटते. तेवढें तुम्ही बंद करा; मग बाकीचें तुमचें सारें आम्हांला मान्य आहे!' बंधूंनो, माझा विनोद माझ्यापासून काढून घेतल्यावर मग माझें काय शिल्लक राहतें? आणि तें जें कांहीं शिल्लक राहील तें घेऊन मला या जगांत एक क्षणभर तरी शिल्लक राहण्याचें काय कारण? एखाद्या सिंहाला म्हणावयाचें, कीं आम्हांला तुझ्या आयाळीची भीति वाटते. तेवढी भादरून तूं जंगलामध्यें हिंडत जा! (हंशा). किंवा

एखाद्या स्वर्गातील अप्सरेला म्हणावयाचें, कीं 'डोळे हे जुलमी गडे! डोळ्यांचें आम्हांला भय वाटतें! म्हणून काळा चष्मा घालून तूं आमच्या 'केसरी' कचेरीवरून हिंडत जा! तसल्यापैकीं हें या लोकांचें म्हणणें आहे. (हंशा).

"ज्या माणसाचें जें सामर्थ्य आहे तेंच त्याला म्हणायचें कीं तूं फेंकून दे! यामध्यें काय शहाणपणा आहे? आणि तें ऐकणार तरी कोण बरें? हें सांगणाऱ्या माणसाचा हेतु तरी शुद्ध आहे का? तर तोहि नाहीं. एखाद्या चोरानें घरमालकाला सांगावयाचें कीं रात्रीं तुमच्या दारावर जो राखणदार तुम्ही बसवितां कीं नाहीं तो तेवढा उद्यांपासून बंद करा; कारण तुमच्या घरावरून रात्रीं अपरात्रीं हिंडतांना आम्हांला भय वाटतें, तसल्यापैकीं हें म्हणणें आहे.

"विनोद हें प्रभावी प्रचाराचें एक अभेद्य असें चिलखत आहे, तें मीं आपल्या अंगावरून उतरून खालीं ठेवलें म्हणजे या हिंदुत्वनिष्ठांची चांगली चंगळच झाली! त्याना आणखी दुसरें काय पाहिजे आहे? आमचे जुने दोस्त प्रा. नारायणराव फडके यांनींहि आपल्या स्वभावाला अनुसरून माझ्याविरुद्ध गिल्ला करावयाला सुरुवात केलेली आहे. ते म्हणतात,–'कॉंग्रेसचें व्यासपीठ अत्रे यांनीं आपल्या विनोदानें विटाळलें आहे!' आतां महाविद्यालयाचें व्यासपीठ फडक्यानें विटाळलें का कॉंग्रेसचें व्यासपीठ अत्र्यानें बिटाळलें हा वाद तुम्हांला ऐकविण्याची माझी इच्छा नाहीं. (हंशा). पण कॉंग्रेसचें व्यासपीठ बिनोदानें विटाळूं शकतच नाहीं. किंबहुना कॉंग्रेसच्या अहिंसात्मक विचारसरणीच्या कोष्टकांत 'विनोदी' हा एकच टीकाप्रकार बसूं शकतो.

"शत्रूला नामोहरम करण्याचें विनोद हें जगांतलें एकच शस्त्र आहे, प्रतिपक्षाचा पाडाव करावयाचा हाच एक सभ्य आणि शिष्ट मार्ग आहे! 'विनोदावांचून क्षणभर सुद्धां मला जगतां यावयाचें नाहीं' असें महात्मा गांधींचें वचन प्रसिद्ध आहे. त्यावरून महात्माजींचें विनोदावर किती प्रेम आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. कॉंग्रेसचा झेंडा हा शोभेचा झेंडा नाहीं किंवा नुसत्या सभेचाहि झेंडा नाहीं. नऊ ऑगस्ट १९४२ सालापासून तो क्रांतीचा झेंडा झालेला आहे, तो बंडाचा झेंडा आहे. तो स्वातंत्र्याच्या युद्धाचा झेंडा आहे. गेल्या तीन वर्षांत या झेंड्याखालीं हजारों स्वातंत्र्यवादी तरुणांनीं आपल्या रक्ताचें अर्घ्य ओतलेलें आहे; त्यामुळें या झेंड्याला विलक्षण सामर्थ्य प्राप्त झालेलें आहे. (टाळ्या).

"सातारा जिल्ह्यांत जें प्रतिसरकार स्थापन झालेलें होतें तें याच झेंड्याखालीं स्थापन झालेलें होतें. सुभाषचंद्रांनीं जें 'आझाद हिंद सरकार' स्थापन केलें, तेंहि याच झेंड्याखालीं स्थापन केलें. त्यामुळें या झेंड्याची स्वातंत्र्याची तहान आतां अतिशय वाढलेली आहे. कारण त्यानें स्वातंत्र्याचें तें अमृत दोन ठिकाणीं प्रत्यक्ष प्राशन केलेलें आहे. आतां सारा भारतवर्ष स्वतंत्र झाल्यावाचून या झेंड्यांची स्वातंत्र्याची तहान पूर्णपणें भागणें अशक्य आहे!

"देशाच्या स्वातंत्र्यासाठीं पहिलें बंड जनतेनें सत्तावन्न सालीं उभारलें. दुसरें बंड या देशांत आणि या देशाबाहेर बेचाळीस सालीं लढविलें गेलें. दुर्दैवानें जनतेचे हे प्रयत्न दोन्हीहि वेळां यशस्वी होऊं शकले नाहींत. म्हणून आतां शेवटचा निकराचा तिसरा प्रयत्न केल्यावांचून जनतेला गत्यंतर नाहीं. एवढ्याचसाठीं तिरंगी झेंड्याखालीं देशांतील सर्व जनता एकत्र करण्याचा काँग्रेस–पुढाऱ्यांनीं प्रयत्न चालविलेला आहे. 'काँग्रेसमध्यें या! काँग्रेसमध्यें या!' असें हिंदुत्वनिष्ठ पुढाऱ्यांना जे सरदार पटेल इतके जीव तोडून आवाहन करीत आहेत ते एवढ्यासाठींच. गेल्या महायुद्धांत इंग्लंडच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं त्या देशातील यच्चयावत पक्ष जसे चर्चिलच्या नेतृत्वाखालीं एक झाले, तसे या देशांच्या अंतिम स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रसंगीं देशांतील सारे पक्ष आणि पुढारी काँग्रेसच्या निशाणाखालीं एकत्र होणें अत्यंत अवश्य आहे.

"हें आपलें शेवटचें स्वातंत्र्ययुद्ध वर्षा दोन वर्षांच्या आंत सुरू होणार याविषयीं कुणालाहि शंका नाहीं! तथापि, तें कोणत्या स्वरूपांत सुरू होणार आणि त्याचें कोणत्या स्वरूपांत पर्यवसान होणार, ते अहिंसात्मक असणार कीं हिंसात्मक असणार हें आतां सांगतां येणार नाहीं. कारण, तें सर्वस्वी ब्रिटिश सरकारच्या हातांत आहे. अहिंसा हें कांहीं काँग्रेसचें स्वतःचें धोरण नाहीं. महात्मा गांधींच्या नेतृत्वाबरोबर त्यांच्या अहिंसात्मक धोरणाचा काँग्रेसनें प्रयोगादाखल गेलीं पंचवीस वर्षें स्वीकार केलेला आहे. अद्यापिहि काँग्रेसचा अहिंसेवर विश्वास आहे. तथापि, ब्रिटिश सरकारचें राज्य या देशांत जन्मोजन्मीं टिकावें म्हणून कांहीं काँग्रेसनें अहिंसेचा स्वीकार केलेला नाहीं. काँग्रेसच्या अहिंसात्मकपणाचा सरकारनें आतां अधिक अंत पाहूं नये, असें सरकारला आमचें मित्रभावानें सांगणें आहे. काँग्रेसचें म्हणणें मान्य करून आणि जनतेच्या हातांत सत्तेचीं सूत्रें सोपवून इंग्रज सरकारनें या देशांतून सन्मानानें आणि शांतपणें स्वदेशीं गमन करावें. (टाळ्या).

"जनतेच्या पुढें महात्मा गांधींचा अहिंसेचा मार्ग आहे आणि सुभाषबाबूंचा सशस्त्र युद्धाचाहि मार्ग आहे. यांपैकीं कोणत्या मार्गानें जनतेला जावें लागेल, हें सरकारच्या धोरणावर अवलंबून आहे. साम्राज्यलोभाच्या आहारीं जाऊन जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा तुडवण्याचा जर आतां सरकार प्रयत्न करील तर जनतेचा क्षोभ कोणत्या स्वरूपांत प्रगट होईल हें कोणी सांगावें? सरकारनें जनतेचीं अंतःकरणें अद्यापपर्यंत ओळखलींच नाहींत! 'आझाद हिंद सैनिक' हीं जनतेच्या देवघरांमधलीं दैवतें होऊन बसलेलीं आहेत! 'धीलन, सैगल, शहानवाझ! आझादीके हैं जहांबाज!' असें या आझादवीरांच्या नांवाचें साऱ्या देशांत आज भजन चाललेलें आहे. या स्वातंत्र्यवीरांच्या एकाहि केंसाला जर सरकार धक्का लावील तर त्याच दिवशीं दिल्लीच्या लाल किल्ल्यावर जनतेचा तिरंगी झेंडा फडकलाच म्हणून समजा! (प्रचंड टाळ्या).

"म्हणून काँग्रेसच्या या विजयाच्या दिवशीं मला येथें जमलेल्या प्रचंड

जनसमूहाला असें बजावून सांगावयाचें आहे कीं, या निवडणुकींत कॉंग्रेसनें तुमच्याकडे मतें मागितलीं आणि तीं तुम्हीं खुषीनें दिलींत हें उत्तमच झालें; पण उद्यां कॉंग्रेस जेव्हां तुमचें रक्त मागील, तेव्हां तें कॉंग्रेसचें म्हणणें तुम्हांला आजच्याप्रमाणेंच मान्य करावें लागेल. कायदेमंडळासाठीं मतें देण्याचा हक्क सर्वांनाच नसतो, पण देशाच्या स्वातंत्र्यासाठीं रक्त सांडण्याचा आणि प्राण देण्याचा हक्क या देशामधील प्रत्येक पुरुषाला आणि प्रत्येक स्त्रीला आहे. स्वातंत्र्याच्या शेवटच्या संग्रामासाठीं प्रत्येक घराघरामधून किंवा कुटुंबाकुटुंबामधून एक एकत्र सैनिक जर कॉंग्रेसच्या सैन्यात सामील झाला; किंबहुना चाळीस कोटि लोकांच्या देशामधून जीवावर उदार झालेल्या अशा एक कोट वीरांची एक अभेद्य पल्टण जर आपल्याला उभी करतां आली तर त्याच क्षणीं हा देश स्वतंत्र झाला म्हणूनच समजा ! जय हिंद. ( प्रचंड टाळ्या )

# ४२

# स्वातंत्र्यसंग्रामाचें उपान्त्य वर्ष

१९४६ साल म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामाचें शेवटचें वर्ष. किंवा भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचें उपान्त्य वर्ष. त्या वर्षी नाना तऱ्हेच्या राजकीय चळवळींना आणि घडामोडींना देशामध्यें पराकाष्ठेचा वेग आला. कर्नल शहानवाझ, सैगल आणि धिल्लन ह्या नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या 'आझाद हिंद फौजें'तल्या तीन वीरांवर दिल्लीच्या लाल किल्ल्यांत ब्रिटिश सरकारनें खटला भरला. नेहरू हे नेताजींचा मनांतून अत्यंत द्वेष अन् मत्सर करणारे. पण या ऐतिहासिक खटल्यामुळें नेताजी सुभाषचंद्र आणि त्यांची आझाद हिंद फौज ह्यांनीं भारताच्या स्वातंत्र्यासाठीं अतिपूर्वेमध्यें जें हौतात्म्य पत्करलें आणि जे पराक्रम केले, त्यामुळें त्यांच्याबद्दल भारतीय जनतेला वाटणाऱ्या प्रेमाला देशभर एवढें विलक्षण उधाण आलें कीं त्या तीन वीरांच्या कायदे-शीर बचावासाठीं बॅरिस्टरकीचा आपला काळा विटका झगा खांद्यावर घालून कोर्टा-समोर चार दोन दिवस तरी उभें राहण्याचें नाटक नेहरूंना करावें लागलें.

ह्या खटल्यामुळें नेताजी आणि त्यांची 'आझाद हिंद फौज' ह्यांना साऱ्या देशांत

एवढी लोकप्रियता मिळाली कीं कॉंग्रेसच्या नांवाला कांहीं काळ जणू कांहीं खग्रास ग्रहण लागल्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. त्यासंबंधीं विवेचन आपल्या कॉंग्रेसच्या इतिहासांत ( भाग २ पान ७८४ ) डॉ. पट्टाभि सीतारामय्या ( ज्यांचा पराभव त्रिपुरा कॉंग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्यें सुभाषबाबूंनीं केला होता. ) ह्यांनीं किती खवचटपणें केलें आहे तें पहाण्यासारखें आहे; ते लिहितात, " आझाद हिंद फौजेच्या तीन सदस्यांवरील खटल्यामुळें देशांतील जनता इतकी प्रक्षुब्ध झाली कीं कांहीं काळ शहानवाझ, सैगल आणि धील्लन ह्यांच्या नांवाच्या छायेखालीं राष्ट्रीय नेत्यांचीं नांवें लुप्त झालीं. आझाद हिंद फौजेनें कॉंग्रेसच्या नांवाला ग्रहण लावलें आणि भारताबाहेरील युद्धाच्या आणि हिंसेच्या पराक्रमापुढें स्वदेशामध्यें अहिंसेनें मिळविलेले विजय मागें पडले. तथापि, ह्या तीन अधिकाऱ्यांना कोर्टानें दिलेली जन्मठेपेची शिक्षा व्हाईसरॉयांनीं ताबडतोब माफ केल्यामुळें आझाद हिंद फौजेबद्दल आणि त्यांच्या पथाबद्दल लोकांना वाटणाऱ्या उत्साहाचा पारा एकदम खालीं आला."

२६ जानेवारी १९४६ हा आझाद सेनेंतील वीरत्रयींच्या मुक्ततेनंतर आलेला पहिला स्वातंत्र्यदिन होय. म्हणून २३ जानेवारीला येणारा नेताजींचा पन्नासावा वाढदिवस देशभर प्रचंड उत्साहानें साजरा करावयाचें जनतेनें ठरविलें. हा सर्वच कालखंड भारतीय क्रांतिकारकांच्या जयजयकाराचा होता. साडेतीन वर्षांच्या ' भूमिगत ' अज्ञातवासामधून बंगालची वेडर वाघीण अरुणा असफअल्ली २९ जानेवारी १९४६ रोजीं कलकत्ता येथें प्रथम प्रकट झाली आणि दुसऱ्याच दिवशीं ' देशबंधु पार्क 'मध्यें विराट जनसमुदायासमोर तिनें आपली पहिली डरकाळी फोडली. तिला पकडण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें साडेतीन वर्षे जंग जंग पछाडले. शेवटीं नाक मुठींत धरून तिच्यावर घातलेले निर्बंध सरकारला परत घ्यावे लागले.

बेचाळीसी क्रांतीचे नेते अच्युतराव पटवर्धन हे त्या वेळीं भूमिगत होते. जयप्रकाश नारायण हे लाहोरच्या आणि डॉ. राममनोहर लोहिया हे आग्र्याच्या तुरुंगांत खितपत पडलेले होते. साताऱ्याचे क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे सहकारी क्रांतिवीर हेहि भूमिगत अवस्थेंत होते म्हणून या क्रांतिवीरांच्या महान् कार्याची जनतेला इत्थंभूत माहिती देण्यासाठीं मीं माझ्या ' साप्ताहिक नवयुग 'चे विशेषांक काढावयाचें ठरविलें.

२३ जानेवारी १९४६ रोजीं मीं सुभाषजयंती विशेषांक काढून त्यानंतर पुढील तीन चार महिन्यांत अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअल्ली, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, कॅप्टन लक्ष्मी, एसेम् जोशी आणि क्रांतिसिंह नाना पाटील ह्यांच्यावर एकामागून एक वैशिष्ट्यपूर्ण खास अंक काढून साऱ्या महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यांत समाजवादी क्रांतीचें लोण पोहोंचविलें. त्यामुळें महाराष्ट्रांत ' नवयुग 'चें राजकीय महत्त्व पराकाष्ठेचें वाढलें. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका मार्च-एप्रिल महिन्यांत झाल्या. त्यांत कॉंग्रेसच्या वतीनें साऱ्या महाराष्ट्रांत जर झंझावाती प्रचार

ठिकठिकाणीं व्याख्यानाचे दौरे काढून आणि 'नवयुग'मधून कॉंग्रेसच्या तत्त्वज्ञानाचा स्फूर्तिदायक प्रचार करून कोणी केला असेल तर तो मी! सानेगुरुजी त्या वेळीं अज्ञातवासांत होते. असें असतांहि त्यांनीं मला मुद्दाम पत्र लिहून कळविलें कीं, "जेथें मी जातों तेथें तेथें तुमच्या 'नवयुग'चें सामुदायिक वाचन चाललेलें मीं पहातों. 'नवयुग'नें महाराष्ट्राला कॉंग्रेसवर प्रेम करावयाला शिकविलें."

आतां २३ जानेवारी १९४६ ला मुंबईत काय प्रकार झाला तें सांगतों. त्या दिवशीं सुभाषबाबूंच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त एक प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. ही मिरवणूक सँढर्स्ट रोडनें बहुसंख्य मुसलमान वस्ती असलेल्या भागामधून नेण्याचा त्या मिरवणुकीच्या नेत्यांचा निर्धार होता. तथापि, पोलिसांनीं ती मिरवणूक 'प्रार्थना समाजा'पाशीं अडविली आणि तिच्यावर लाठीमार आणि गोळीबार केला. बंदोबस्तासाठीं लष्कर बोलावण्यांत आलें. ह्या अनपेक्षित घटनेमुळें मुंबईच्या जनतेमध्यें प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला. आणि शहराच्या निरनिराळ्या भागामध्यें लोकांचें आणि लष्कराचें उघड उघड युद्धच सुरू झालें. गोळीबारामध्यें तेवीस लोक ठार झाले आणि सहाशें लोक जखमी झाले.

गिरगांव रस्त्यावर ठाकुरद्वारपासून तो प्रार्थना समाजापर्यंत आणि विठ्ठलभाई पटेल रोडवर सिक्कानगरपासून प्रार्थना समाजापर्यंत होळ्या पेटविण्यांत आल्या. कांहीं ट्रॅम्स आणि लष्करी लॉरीजहि जाळण्यांत आल्या. सुप्रसिद्ध आझादवीर लेफ्टनंट धिल्लन हे त्या वेळीं मुंबईतच होते. त्यांनीं दंगलग्रस्त भागाला भेट देऊन आणि कित्येकदां आपला जीव धोक्यांत घालून शांतता प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. एका ठिकाणीं ते प्रक्षुब्ध जनतेला शांत करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतां एका गोऱ्या लष्करी अधिकाऱ्यानें त्यांच्या अंगावर सरळ गोळ्या झाडल्या. पण सुदैवानें त्या गोळ्या धिल्लन ह्यांना न लागतां त्यांच्या मोटारीला लागल्या म्हणून हा स्वातंत्र्यवीर थोडक्यांत बचावला. मुंबई शहरांतील ही दंगल आणि गोळीबार सतत तीन दिवस चालला होता.

दीडशें वर्षे इंग्रजांनीं या देशावर ज्या लष्करी सैन्याच्या सामर्थ्यावर आपलें राज्ययंत्र टिकवून धरलें आहे त्या लष्करी सैन्याच्या अभेद्य म्हणून समजल्या जाणाऱ्या राजनिष्ठेमध्यें जर देशप्रेमाचें पहिलें भगदाड कोणी पाडलें असेल तर सुभाषचंद्रानें. हिंदी सैन्याच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची आग जर पहिल्यानें कोणी भडकविली असेल तर ती सुभाषचंद्रानें! ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अगदीं वर्मावर नेताजींनीं घाव घातला. आतां ही आग सैन्यामध्यें कशी आणि किती भडकत जाईल याची सरकारला खात्री नव्हती. म्हणून सुभाषबाबूंवर सूड उगविण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें सुभाष जयंतीच्या तीन दिवसांच्या उत्सवांत मुंबई शहरांतील जनतेवर अमानुष गोळीबार आणि लाठीमार केला. कलकत्त्याला सरकारनें असाच प्रकार करून चाळीस लोक ठार मारले आणि

शेंकडों लोकांना जखमी केलें.

केवळ सूडभावनेनें ब्रिटिश सरकारनें देशामध्यें केलेले हे अत्याचार पाहून भुलाभाई देसाई इतके संतापले कीं, सरकारला उद्देशून ते म्हणाले, "मारा, मारा गोळ्या हव्या तितक्या आणि करा आम्हांला ठार! इथून निघून जाण्यापूर्वी आमच्यापैकीं किती लोकांना तुम्ही ठार मारताहांत तें तरी आम्हांला बघूं द्या!"

या तीन दिवसांच्या दंगलीमध्यें मुंबई शहरामध्यें जे जाळपोळीचे आणि दंगलीचे प्रकार झाले त्याचें खापर 'टाइम्स ऑफ इंडिया' या पत्रानें शहरांतील गुंड आणि मवाली लोकांच्या टाळक्यावर फोडून पोलिसांच्या गोळीबाराचें, लाठीमाराचें आणि अश्रुधुराचें समर्थन केलें. पण मुंबईच्या 'विविधवृत्ता'नें 'टाईम्स'वरहि मात करून त्या सर्वच दंगलीचें नि हुल्लडबाजीचें खापर मुंबई प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष 'झेंडेकाका' नगीनदास मास्तर आणि चिटणीस सदोबा पाटील ह्यांच्या डोक्यावर फोडलें.

त्या पत्रानें त्यांच्यावर ह्या बाबतींत उघड उघड आरोप केले ते असे, "ह्या हुल्लडबाजीला प्रोत्साहन देण्याची प्रत्यक्ष जबाबदारी नगीन-सदोबा या कॉंग्रेस कंपूवर पडते. कारण, हरताळ पाळण्याची चिथावणी कॉंग्रेसनें देऊन गुंडगिरीला तिनें प्रत्यक्ष आवाहनच दिलें. मुंबईच्या गिरगांव ठाकुरद्वार या दाट वस्तींत गुंडशाहीनें अपेक्षे-प्रमाणें थैमान सुरू केल्यानंतर दंगलीच्या या भागांत अभावानें तळपत राहून या सदोबाकंपूनें गुंडगिरीला स्वैराचार करण्याचा मुक्त परवानाहि त्यांना देऊन टाकला!"

एवढेंच नव्हे तर बेचाळीसची स्फूर्तिदेवता जी अरुणा असफअल्ली तिच्यावरचे निर्बंध ब्रिटिश सरकारनें कां मागें घेतले ह्यावर मखलाशी करतांना 'विविधवृत्ता'नें आपल्या देशद्रोही मेंदूमधून अशी एक गलिच्छ थाप बाहेर काढली कीं, "अरुणाबाईंचे पति बॅ. असफअल्ली ह्यांनीं व्हाइसरॉयची भेट घेऊन त्यांच्याशीं कांहींतरी सूत जमविलें आणि आपल्या बायकोची सुटका करून घेण्याचा मानहानीचा मार्ग पत्करला!"

त्याच्याहि पुढें जाऊन 'विविधवृत्ता'नें बॅ. असफअल्लींबरोबरच पंडित नेहरू आणि मौलाना आजाद ह्यांची बदनामी करणारी आणखी एक थाप पिकवली ती ही कीं, त्या वेळचे हिंदुस्थानचे सरसेनापति सर क्लॉड ऑकिनलेक ह्यांच्याकडे जाऊन बॅ. असफअल्ली म्हणे बोलले कीं, "हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतरहि ब्रिटिश सैनिक आणि अधिकारी यांची आवश्यकता हिंदुस्थानला राहील!" ह्याबद्दल कॉंग्रेस पक्षानें म्हणे बॅ. असफअल्लींना जाब विचारला, तेव्हां ते म्हणे असें म्हणाले कीं, "मी जें हें सेनापतिसाहेबांना माझें मत म्हणून सांगितलें, तसेंच मत मौलाना आजाद आणि पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनींहि त्यांच्यापाशीं व्यक्त केल्याचें मला खुद्द सेनापति-साहेबांनीं सांगितलें!"

स्वातंत्र्यपूर्व काळांतील राष्ट्रीय आंदोलन ज्या वेळीं अंतिम अवस्थेकडे झपाट्यानें

दौडत चाललें होतें, त्या काळांत राष्ट्रीय नेत्यांची अक्षम्य टवाळी आणि विटंबना करून स्वातंत्र्याला अपशकून करण्याचें देशद्रोही कार्य तटणीसांचा 'विविधवृत्त' अगदीं नियमानें दर अंकांतून करीत होता. म्हणून 'विविधवृत्ताला गंभीर इशारा' या मथळ्याखालीं मीं 'नवयुग'मधून दोन जळजळीत लेख लिहिले. त्यांतला कांहीं भाग येथें देतों :

"मुंबईमधलें 'विविधवृत्त' हें साप्ताहिक मराठी पत्र देशांतील राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यांना अत्यंत गलिच्छ आणि घाणेरडी शिवीगाळ करण्याचें कृत्य गेलीं वीस वर्षें अव्याहतपणें करीत आहे. ह्या पत्राला स्वतःची अशी कोणतीहि राजकीय विचारसरणी नाहीं. अलीकडे जरी तें हिंदुमहासभेच्या राजकारणाचा पुरस्कार करीत असलें तरी कांहीं वर्षांपूर्वी हिंदुमहासभेचे भूतपूर्व अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या नैतिक चारित्र्यावर शेणखळा फेकण्याचा घाणेरडा प्रयत्न यानें पूर्वी केला होता.

"महात्मा गांधींच्या खेटराजवळ बसण्याची लायकी या पत्राचे संपादक तटणीस ह्यांची नसतांना महात्मा गांधी हे झोटिंग आहेत, ढोंगी आहेत, कपटी आहेत, सैतान आहेत अशा वाटेल तशा शिव्या हा ठाकुरद्वारचा रामोशी महात्माजींना एकसारखा वर्षानुवर्षे देत आहे. एवढेंच नव्हे तर महात्माजी आणि डॉ. सुशीला नायर यांचा अनैतिक संबंध आहे अशा पाजी सूचना या ना त्या तऱ्हेनें जनतेला करण्याचा त्यांनीं कित्येक वर्षांपासून खटाटोप चालविला आहे.

"एवढी मोठी 'चलेजाव'ची देशव्यापी चळवळ होऊन गेली. आणि बेचाळीसी बंडानें सारा देश हादरून गेला. त्या स्वातंत्र्य-आंदोलनानें देशांतले दगड न् दगड पाझरले असतील पण या ठाकूरद्वारच्या 'काळ्या रामा'ला त्यामुळें एवढासासुद्धां पाझर फुटलेला नाहीं. सातारा जिल्ह्यांतील ज्या पत्री सरकारनें ब्रिटिश सरकारच्या छातीवर टिच्चून जनतेचें राज्य स्थापन केलें, त्या पत्री सरकारचीं पाळेंमुळें खणून टाकून त्याला नेस्तनाबूद करून टाकावें, म्हणून हा माणूस सरकारच्या विनवण्या करीत होता.

"महाराष्ट्रामधल्या सर्व भूमिगत स्वातंत्र्यवीरांचा तटणीस हा कट्टा दुष्मन असून ब्रिटिश सरकारचा हा जवळ जवळ एक हस्तकच आहे. कॉंग्रेसची अहिंसात्मक विचारसरणी जनतेच्या नखशिखांत पक्की भरलेली आहे म्हणून. नाहीं तर जनतेच्या देवघरामधल्या परमपूज्य आणि परमपवित्र अशा पुढाऱ्यांची अत्यंत हलकट बदनामी आणि निंदा करणाऱ्या या इसमाला जनतेनें आजपर्यंत कधींहि जिवंत राहूं दिलें नसतें.

"कोणत्याहि माणसाला उद्देशून तटणीस कधीं 'अहो-अहो' म्हणत नाहीं. 'तो' सर विठ्ठल चंदावरकर—'तो' डॉ. आंबेडकर,—'तो' डॉ. खरे.—'तो' महात्मा गांधी,—'तो' वल्लभभाई पटेल.—'तो' फडके अन् 'तो' अत्रे. गेल्या पंचवीस वर्षांमध्यें

या महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांत असा एकहि श्रेष्ठ किंवा बुद्धिमान माणूस होऊन गेला नाहीं कीं ज्याच्या नांवावर आणि चारित्र्यावर चिखल फेकण्याचा प्रयत्न या वेशरम माणसानें केलेला नाहीं. महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडित नेहरू, न. चिं. केळकर, डॉ. श्री. व्यं. केतकर, राम गणेश गडकरी, बॅ. सावरकर, डॉ. आंबेडकर, दे. भ. कन्हय्यालाल मुनशी, बाळासाहेब खेर, प्रा. श्री. म. माटे, दे. भ. शंकरराव देव, डॉ. सुशीला नायर, भालाकार भोपटकर, स. का. पाटील, ॲ. द. ग. दळवी, नगीनदास मास्तर, बॅ. असफअल्ली, दे. भ. काकासाहेब गाडगीळ, अरुणा असफअल्ली आणि अच्युतराव पटवर्धन ह्यांच्या कीर्तीला आणि नीतीला डांबर फांसण्याचा प्रयत्न ह्या माणसानें सतत गेलीं वीस पंचवीस वर्षे केलेला आहे.

"साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण केळकर यांनीं पुण्यांतल्या एका जाहीर व्याख्यानांत अगदीं कळवळून सांगितलें कीं, 'विविधवृत्तानें मला वीस वर्षें सतत छळलें!' ('केसरी' २ एप्रिल १९४६. पान २)

"म्हणून 'विविधवृत्त' पत्र आणि त्याचे संपादक श्री. रामचंद्र काशीनाथ तटणीस यांना आम्ही गंभीर इशारा देऊन ठेवतों कीं, आतांपर्यंत कॉंग्रेसचे तुम्ही जे अनंत अपराध केलेले आहेत, त्याकडे जनतेनें दुर्लक्ष केलेलें आहे. पण आतां मात्र तुमच्या स्वातंत्र्यद्रोही आणि देशद्रोही उपद्व्यापांना जनता मुळींच क्षमा करणार नाहीं. जनतेच्या स्वातंत्र्याच्या चळवळींना आणि त्या चळवळीच्या तेजस्वी पुढाऱ्यांना वाटेल तशी घाणेरडी शिवीगाळ करण्याचा तुमचा पूर्वीचा उद्योग तुम्ही असाच हट्टानें चालू ठेवाल तर तुमचें 'विविधवृत्त' पत्र आणि 'लक्ष्मीनारायण छापखाना' अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडल्यावांचून राहणार नाहींत. जनतेच्या क्रोधाचा अधिक अंत बघूं नका. वेळींच सावध व्हा. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर देशाला गोऱ्या सैनिकांची जरूर राहील असे पाजी उद्गार मौलाना आझाद, पंडित नेहरू आणि बॅ. असफअल्ली यांच्या तोंडीं दुष्टपणानें घालून त्यांची वेअब्रू करूं पाहणाऱ्या या हलकट संपादकाला ठाकुरद्वारच्या रस्त्यावर ओढून काढून खेटरांनीं मारलें पाहिजे."

'विविधवृत्ता'च्या या राष्ट्रद्रोही लेखामुळें मुंबईकर जनता संपादक तटणीसांवर एवढी चिडली कीं दि. २१ फेब्रुवारी १९४६ रोजीं रात्रौ खवळलेला एक मोठा जनसमूह 'लक्ष्मीनारायण' छापखान्याच्या आवारांत शिरला आणि आजपर्यंत कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना आणि आतां ऑगस्टवादी स्वातंत्र्यवीरांना गलिच्छ शिव्या देणाऱ्या त्या तटणीसांना आम्हांला जाब विचारावयाचा आहे असें लोक ओरडूं लागले. रस्त्यावरची 'विविधवृत्ता'ची आणि छापखान्याची पाटीहि कोणी जाळून टाकली. एवढ्या अवधींत त्याच इमारतींत राहणारे वकील माणिकराम तळपदे हे धांवत खालीं आले. आणि तटणीसांच्या वतीनें त्यांनीं जनतेची माफी मागितली अन् पुन्हां 'विविधवृत्तां'त असें लिखाण यावयाचें नाहीं' असें तटणीसांतर्फे त्यांनीं आश्वासन दिलें. तेव्हां मग

लोक आल्या पावलीं मागें फिरले आणि 'लक्ष्मीनारायण' छापखान्यावर आलेलें गंडांतर टळलें.

त्याच दिवशीं संध्याकाळपासून नौकावीरांच्या बंडामुळें मुंबई शहरांतील वातावरण अत्यंत प्रक्षुब्ध होऊं लागलें होतें. त्या रात्रीं साडेनऊ वाजतां कॉंग्रेसच्या निवडणूक प्रचाराचें माझें भाषण ठाकुरद्वार येथें झावबाच्या वाडीमध्यें ठरलें होतें. त्याप्रमाणें मी मोटरमधून चर्नी रोडच्या बाजूनें ठाकुरद्वारला येतों आहे, तोंच रस्त्यावर प्रचंड जनसमुदाय जमलेला असून झावबाच्या वाडींत शिरावयाच्या गल्लीच्या तोंडाशीं एक दुमजली ट्रॅमगाडी धडाक्यानें जळत आहे असें दृश्य मीं पाहिलें. तेव्हां जळत्या ट्रॅमगाडीच्या जाळाची धग आणि जाळाचे चटके चुकवीत मी वाडीच्या गल्लींत शिरलों.

व्याख्यान संपवून परत मुख्य रस्त्यावर येतों आहे तोंच पहिल्या ट्रॅमगाडीची राखरांगोळी होऊन समोरच्या पोस्ट ऑफिसला आग लागलेली आहे, असें मला दिसून आलें. त्यावरून ठाकुरद्वार विभागांतील जनतेच्या प्रक्षोभाला आतां फारच भीषण स्वरूप प्राप्त झालें आहे असें मीं ओळखलें. आणि ह्याच वेळीं कांहीं लोक 'लक्ष्मी-नारायण छापखान्या'कडे गेल्याचें मला समजलें. तेथें काय घडलें त्याचा वृत्तान्त मला दुसऱ्या दिवशीं कळला.

तथापि, तटणीसांना उद्देशून मीं 'नवयुग'मध्यें जें कडक लिखाण केलें त्याबद्दल मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यकारी मंडळापुढें 'नवयुग'च्या तीव्र निषेधाचा एक ठराव आला असल्याचें संघाच्या कार्यवाहांकडून मला समजलें. आणि त्याबद्दल मला कांहीं सांगावयाचें असल्यास, तें मी त्यांना कळवावें अशी त्यांनीं मला विनंति केली. त्यावर मीं त्यांना कळविलें कीं, "'विविधवृत्त' हें पत्र ही महाराष्ट्रीय वृत्तपत्राच्या कीर्तीला लागलेली एक काळोखी आहे असें माझें स्वतःचें मत आहे. मराठी भाषेंत वृत्तपत्रें सुरू झाल्यापासून इतक्या अधम आणि राक्षसी मनोवृत्तीचें दुसरें कोणतेंहि वृत्तपत्र निघालेलें नाहीं. या पत्राचें स्वातंत्र्यद्रोही आणि बदनामीचें धोरण ठेंचून काढणें हें प्रत्येक प्रामाणिक पत्रकाराचें कर्तव्य आहे असें मी समजतों. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांच्या आणि व्यक्तिशः महात्मा गांधींच्या चारित्र्याबद्दल 'विविधवृत्ता'नें जें भयंकर बदनामीकारक लिखाण आजपर्यंत लिहिलेलें आहे, त्यामुळें त्या पत्राविरुद्ध आज लोकमत जें प्रचंड प्रमाणावर प्रक्षुब्ध झालेलें आहे, त्याला केवळ तोंड फोड-ण्याचा मीं थोडासा प्रयत्न केलेला आहे. म्हणून माझ्या लेखनाचा निषेध करणें आपणांस आवश्यकच वाटलें, तर आपण तो जरूर करावा. पण त्याचबरोबर श्री. तटणीस यांच्या पत्रांतील लेखनाबद्दल आणि धोरणाबद्दलहि आपण आपलें मत स्पष्ट-पणें व्यक्त करावें."

माझ्या पत्राचा थोडासा परिणाम कार्यकारी मंडळाच्या ठरावावर झाला. तो असा कीं, 'नवयुग'चा निषेध करण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. त्यांनीं ठराव

या महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांत असा एकहि श्रेष्ठ किंवा बुद्धिमान माणूस होऊन गेला नाहीं कीं ज्याच्या नांवावर आणि चारित्र्यावर चिखल फेकण्याचा प्रयत्न या बेशरम माणसानें केलेला नाहीं. महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडित नेहरू, न. चिं. केळकर, डॉ. श्री. व्यं. केतकर, राम गणेश गडकरी, बॅ. सावरकर, डॉ. आंबेडकर, दे. भ. कन्हय्यालाल मुनशी, बाळासाहेब खेर, प्रा. श्री. म. माटे, दे. भ. शंकरराव देव, डॉ. सुशीला नायर, भालाकार भोपटकर, स. का. पाटील, ॲ. द. ग. दळवी, नगीनदास मास्तर, बॅ. असफअल्ली, दे. भ. काकासाहेब गाडगीळ, अरुणा असफअल्ली आणि अच्युतराव पटवर्धन ह्यांच्या कीर्तीला आणि नीतीला डांबर फांसण्याचा प्रयत्न ह्या माणसानें सतत गेलीं वीस पंचवीस वर्षें केलेला आहे.

"साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण केळकर यांनीं पुण्यांतल्या एका जाहीर व्याख्यानांत अगदीं कळवळून सांगितलें कीं, 'विविधवृत्तानें मला वीस वर्षें सतत छळलें!' ('केसरी' २ एप्रिल १९४६. पान २)

"म्हणून 'विविधवृत्त' पत्र आणि त्याचे संपादक श्री. रामचंद्र काशीनाथ तटणीस यांना आम्ही गंभीर इशारा देऊन ठेवतों कीं, आतांपर्यंत काँग्रेसचे तुम्ही जे अनंत अपराध केलेले आहेत, त्याकडे जनतेनें दुर्लक्ष केलेलें आहे. पण आतां मात्र तुमच्या स्वातंत्र्यद्रोही आणि देशद्रोही उपद्व्यापांना जनता मुळींच क्षमा करणार नाहीं. जनतेच्या स्वातंत्र्याच्या चळवळींना आणि त्या चळवळीच्या तेजस्वी पुढाऱ्यांना वाटेल तशी घाणेरडी शिवीगाळ करण्याचा तुमचा पूर्वींचा उद्योग तुम्ही असाच हट्टानें चालू ठेवाल तर तुमचें 'विविधवृत्त' पत्र आणि 'लक्ष्मीनारायण छापखाना' अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडल्यावांचून राहणार नाहींत. जनतेच्या क्रोधाचा अधिक अंत बघूं नका. वेळींच सावध व्हा. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर देशाला गोऱ्या सैनिकाची जरूर राहील असे पाजी उद्गार मौलाना आझाद, पंडित नेहरू आणि बॅ. असफअल्ली यांच्या तोंडीं दुष्टपणानें घालून त्यांची बेअब्रू करूं पाहणाऱ्या या हलकट संपादकाला ठाकुरद्वारच्या रस्त्यावर ओढून काढून खेटरांनीं मारलें पाहिजे."

'विविधवृत्ता'च्या या राष्ट्रद्रोही लेखामुळें मुंबईकर जनता संपादक तटणीसांवर एवढी चिडली कीं दि. २१ फेब्रुवारी १९४६ रोजीं रात्रौ खवळलेला एक मोठा जनसमूह 'लक्ष्मीनारायण' छापखान्याच्या आवारांत शिरला आणि आजपर्यंत काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आणि आतां ऑगस्टवादी स्वातंत्र्यवीरांना गलिच्छ शिव्या देणाऱ्या त्या तटणीसांना आम्हांला जाब विचारावयाचा आहे असें लोक ओरडूं लागले. रस्त्यावरची 'विविधवृत्ता'ची आणि छापखान्याची पाटीहि कोणी जाळून टाकली. एवढ्या अवधींत त्याच इमारतींत राहणारे वकील माणिकराम तळपदे हे धांवत खालीं आले. आणि तटणीसांच्या वतीनें त्यांनीं जनतेची माफी मागितली अन् पुन्हां 'विविधवृत्तां'त असें लिखाण यावयाचें नाहीं' असें तटणीसांतर्फे त्यांनीं आश्वासन दिलें. तेव्हां मग

लोक आल्या पावलीं मागें फिरले आणि 'लक्ष्मीनारायण' छापखान्यावर आलेलें गंडांतर टळलें.

त्याच दिवशीं संध्याकाळपासून नौकावीरांच्या बंडामुळें मुंबई शहरांतील वातावरण अत्यंत प्रक्षुब्ध होऊं लागलें होतें. त्या रात्रीं साडेनऊ वाजतां कॉंग्रेसच्या निवडणूक प्रचाराचें माझें भाषण ठाकुरद्वार येथें झावबाच्या वाडीमध्यें ठरलें होतें. त्याप्रमाणें मी मोटरमधून चर्नी रोडच्या बाजूनें ठाकुरद्वारला येतों आहे, तोंच रस्त्यावर प्रचंड जनसमुदाय जमलेला असून झावबाच्या वाडींत शिरावयाच्या गल्लीच्या तोंडाशीं एक दुमजली ट्रॅमगाडी धडाक्यानें जळत आहे असें दृश्य मीं पाहिलें. तेव्हां जळत्या ट्रॅमगाडीच्या जाळाची धग आणि जाळाचे चटके चुकवीत मी वाडीच्या गल्लींत शिरलों.

व्याख्यान संपवून परत मुख्य रस्त्यावर येतों आहे तोंच पहिल्या ट्रॅमगाडीची राखरांगोळी होऊन समोरच्या पोस्ट ऑफिसला आग लागलेली आहे, असें मला दिसून आलें. त्यावरून ठाकुरद्वार विभागांतील जनतेच्या प्रक्षोभाला आतां फारच भीषण स्वरूप प्राप्त झालें आहे असें मीं ओळखलें. आणि ह्याच वेळीं कांहीं लोक 'लक्ष्मीनारायण छापखान्या'कडे गेल्याचें मला समजलें. तेथें काय घडलें त्याचा वृत्तान्त मला दुसऱ्या दिवशीं कळला.

तथापि, तटणीसांना उद्देशून मीं 'नवयुग'मध्यें जें कडक लिखाण केलें त्याबद्दल मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यकारी मंडळापुढें 'नवयुग'च्या तीव्र निषेधाचा एक ठराव आला असल्याचें संघाच्या कार्यवाहांकडून मला समजलें. आणि त्याबद्दल मला कांहीं सांगावयाचें असल्यास, तें मी त्यांना कळवावें अशी त्यांनीं मला विनंति केली. त्यावर मीं त्यांना कळविलें कीं, "'विविधवृत्त' हें पत्र ही महाराष्ट्रीय वृत्तपत्राच्या कीर्तीला लागलेली एक काळोखी आहे असें माझें स्वतःचें मत आहे. मराठी भाषेंत वृत्तपत्रें सुरू झाल्यापासून इतक्या अधम आणि राक्षसी मनोवृत्तीचें दुसरें कोणतेंहि वृत्तपत्र निघालेलें नाहीं. या पत्राचें स्वातंत्र्यद्रोही आणि बदनामीचें धोरण ठेंचून काढणें हें प्रत्येक प्रामाणिक पत्रकाराचें कर्तव्य आहे असें मी समजतों. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांच्या आणि व्यक्तिशः महात्मा गांधींच्या चारित्र्याबद्दल 'विविधवृत्ता'नें जें भयंकर बदनामीकारक लिखाण आजपर्यंत लिहिलेलें आहे, त्यामुळें त्या पत्राविरुद्ध आज लोकमत जें प्रचंड प्रमाणावर प्रक्षुब्ध झालेलें आहे, त्याला केवळ तोंड फोडण्याचा मीं थोडासा प्रयत्न केलेला आहे. म्हणून माझ्या लेखनाचा निषेध करणें आपणांस आवश्यकच वाटलें, तर आपण तो जरूर करावा. पण त्याचबरोबर श्री. तटणीस यांच्या पत्रांतील लेखनाबद्दल आणि धोरणाबद्दलहि आपण आपलें मत स्पष्टपणें व्यक्त करावें."

माझ्या पत्राचा थोडासा परिणाम कार्यकारी मंडळाच्या ठरावावर झाला. तो असा कीं, 'नवयुग'चा निषेध करण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. त्यांनीं ठराव

मंजूर केला तो पुढीलप्रमाणें, " नवयुग पत्रांतील लिखाण ज्या संदर्भानें आणि ज्या परिस्थितींत लिहिलें गेलें आहे ती परिस्थिती ध्यानांत घेतां त्याचा हेतु कितीहि उच्च असला तरी सर्वसामान्य वाचकांना चिथावणी देणारा व विपरीत मार्गदर्शन करणार तो मजकूर आहे."

वस्तुतः, 'विविधवृत्त'कार तटणीस हे मुंबई-मराठी पत्रकार संघाचे साधे सभासद देखील नव्हते. उभ्या आयुष्यांत त्यांनीं संघाला कवडीची किंमत दिली नाहीं. उलट संघाबद्दल आणि संघाच्या सभासदांबद्दल वारंवार ते आपल्या बैठकीमध्यें अर्वाच्य मुक्ताफळे काढीत. म्हणून तटणीसांबद्दल 'नवयुग'नें काय लिहिलें याची दखल घेण्याचें पत्रकार संघाला कारण नव्हतें. तथापि, ज्या अर्थी पत्रकार संघानें माझ्या लेखनाबद्दल नापसंती व्यक्त करून तटणीसांच्या वृत्तपत्रीय धोरणावर पांघरूण घातलें त्या अर्थी त्यांचा तो ठराव मान्य करण्यावांचून मला गत्यंतर नव्हतें.

म्हणून 'देशद्रोही तटणीसांची आम्ही माफी मागतों' या मथळ्याखालीं 'नवयुग'मध्यें आम्हीं दोन अग्रलेख लिहून त्यांची पुढील शब्दांत मीं माफी मागितली, " तटणीसांना खेटरानें मारलें पाहिजे असें जें 'नवयुग'मध्यें लिखाण आलेलें आहे, तें सपशेल मागें घेऊन आम्ही त्यांची माफी मागतों. तसें आम्हीं म्हणावयाला नको होतें. कारण तटणीसांसारख्या माणसांना खेटरानें मारा असें आम्ही म्हणणें हा तटणीसांचा अपमान नसून तो त्या खेटरांचा अपमान आहे ही गोष्ट आतां आमच्या लक्षांत आली आहे."

२३ फेब्रुवारी रोजीं मुंबई शहरामध्यें नौकावीरांनीं बंड पुकारलें ही अत्यंत ऐतिहासिक महत्त्वाची घटना ह्या कालखंडांत घडली. हें बंड पुकारल्यानंतर मुंबई शहरामध्यें जी भयंकर दंगल झाली आणि ब्रिटिश लष्करानें निरपराधी नागरिकांचे जे दिवसाढवळ्या खून पाडले त्यामधून देशाच्या अंतिम स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा झाला. ह्या बंडाच्या निमित्तानें 'महात्माजींच्या अहिंसामार्गानें स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होईल का नेताजी सुभाषचंद्राच्या हिंसामार्गानें यशस्वी होईल?' या विषयाची जाहीर चर्चा महात्मा गांधी, अरुणा असफअली आणि पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं आपापल्या निवेदनांतून, पत्रपरिषदांतून आणि जाहीर व्याख्यानांतून सुरू केली. तिचा इत्थंभूत परामर्ष मीं माझ्या 'नवयुग'मधून घेतला.

पंडित नेहरूंनीं चौपाटीच्या वाळवंटावर दोन लाख लोकांपुढें दिलेल्या व्याख्यानांत जे मौलिक उद्गार काढले ते देऊन हें प्रकरण संपवितों.

" आझाद हिंद फौजेचे खटले, हिंदी हवाई दल आणि आरमार यांतील संप यामुळें राष्ट्राची एक फार मोठी सेवा घडलेली आहे. ती ही, कीं यामुळें लष्कर आणि लोक ह्यांच्या मधली रुंद दरी नाहींशी होऊन ते आतां एकमेकांच्या जवळ आलेले आहेत. जनता आणि शिपाई हीं आतां एकमेकांच्या समोर येऊन ठाकलेली आहे.

दोघांचेंहि कल्याण कशामध्यें आहे हें आतां त्यांना कळून चुकलेलें आहे. परकी सत्तेचें जोखड झुगारून देऊन देश स्वतंत्र करणें यामध्यें उभयतांचा मोक्ष आहे, हें आतां त्याना पुरतेपणीं उमगलें आहे!"

# ४३

## माझा काँग्रेस-प्रचार !

फेब्रुवारी १९४६ पासून प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या प्रचाराचें काम सुरू झालें. मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं काँग्रेसच्या प्रचाराचें काम जसें माझ्याकडे सोपविण्यांत आलें होतें, तशीं प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या प्रचाराचीं सूत्रें मुंबई शहर काँग्रेसनें माझ्याकडे सुपूर्द केलीं. मुंबई शहरांत तर एकेका दिवशीं चार चार व्याख्यानें देऊन प्रचाराची मीं धमाल उडवून दिली.

१७ फेब्रुवारी १९४६ रोजीं कल्याण येथें माझी जाहीर सभा झाली. वीस ते पंचवीस हजार श्रोते उपस्थित होते. सतरा अठरा वर्षांत एवढी प्रचंड सभा झाली नव्हती असें लोकांनीं सांगितलें. या सभेच्या वेळीं तेथील एक डॉक्टर रायकर ह्यांनीं सरकारकडून मिळालेलें 'कैसर-इ-हिंद' हें सुवर्णपदक सरकारला परत करून टाकण्यासाठीं माझ्याकडे आणून दिलें. सभा संपल्यानंतर सेवादलाच्या शेंकडों सैनिकांनीं स्टेशनापर्यंत माझी मिरवणूक काढली.

दि. १९ फेब्रुवारी रोजीं कल्याणजी मोती चाळीमध्यें मुंबई काँग्रेसनें निवडणूक

प्रचाराचा नारळ आप्पासाहेब खाडिलकरांच्या अध्यक्षतेखालीं माझ्या हस्तें फोडला. सभेला पंधरा ते वीस हजार लोक हजर होते. प्रारंभीं स. का. पाटील ह्यांचें भाषण झाल्यानंतर मीं एक तासभर भाषण करून कॉंग्रेसच्या विरोधकांची हजेरी घेतली. माझें व्याख्यान चालू असतां हंशाचा नि टाळ्यांचा प्रचंड कडकडाट चालू होता.

दि. २२ फेब्रुवारी रोजीं पुण्याला नाना पेठेंत निवडुंग्या विठोबाच्या चौकांत माझें व्याख्यान झालें. आधल्याच दिवशीं त्या ठिकाणीं अरुणा असफअल्ली यांची सभा झाली होती. तेवढ्यासाठीं त्या चौकांत साट फूट उंचीचा कॉंग्रेस ध्वज उभारण्यांत आला होता. त्याच ध्वजाखालीं श्री. बाबुराव सणस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं तब्बल अडीच तास माझें व्याख्यान झालें. चौकाचे चारहि रस्ते दोन दोन फर्लांगपर्यंत स्त्री–पुरुषांनीं चिक्कार व्यापून गेले होते. एकंदर जनसमुदाय सत्तर ते ऐंशी हजार होता. पूर्वी मंडईत जाहीर झालेलें माझें व्याख्यान काका गाडगीळांच्या मत्सरी कारवाईमुळें तहकूब झालें होतें. त्याचा सारा वचपा मीं या दिवशीं काढला. या व्याख्यानाचे वेळीं नाना पेठेचें ' गांधी पेठ ' निवडुंग्या विठोबाचें ' जयहिंद विठोबा ' आणि त्या चौकाचें ' अरुणा चौक ' असें मीं नामकरण करून टाकलें.

सारांश, पुण्यापासून तों मुंबईपर्यंत प्रत्येक महत्त्वाच्या गांवीं रोजच्या रोज माझ्या जाहीर सभा होऊन कॉंग्रेस प्रचारानें शहर न् शहर मीं दणाणून सोडलें. एवढेंच नव्हे तर १० मार्च १९४६ रोजीं माझ्या ' नवयुग 'चा मीं खास निवडणूक प्रचार अंक काढला. त्यांत कॉंग्रेसच्या वतीनें मुंबईतून आणि महाराष्ट्रांतून प्रांतिक कायदेमंडळाला उभ्या असलेल्या एकूणएक उमेदवारांचे फोटो त्यांच्या चरित्रासह मीं प्रसिद्ध केले. आज या गोष्टी लोक विसरून गेले आहेत. पण सेहेचाळीस सालच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कॉंग्रेसप्रचाराचें काम महाराष्ट्रांत माझ्याएवढें कोणत्याहि कॉंग्रेस-पुढाऱ्यानें केलें नाहीं, हें मीं मोठ्या अभिमानानें सांगतों.

कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळामध्यें पुढें जे मंत्री निवडून आले त्यांच्यापैकीं डॉ. गिल्डर, डॉ. जीवराज मेहता आणि वैकुंठलाल मेहेता ह्यांच्या प्रचाराची धुरा तर सर्वस्वी माझ्यावरच होती. निवडणुकीच्या आधल्या रात्रीं दादर येथील पालनजी सोजपाळ चाळीच्या भव्य पटांगणांत तीस ते चाळीस हजार स्त्री–पुरुषांच्या प्रचंड सभेंत दोन अडीच तास भाषण करून निवडणूक-प्रचाराचा मीं अगदीं उच्चांकच गांठला. ह्या सभेंत मीं जें भाषण केलें, त्यामध्यें वक्तृत्वाचे जे मीं अनेक चमत्कार करून दाखविले ते अद्यापि अनेकांच्या स्मरणांत आहेत. त्या भाषणांतले कांहीं उतारे येथें देतों :—

" सबंध जगाशीं तुलना करतां हिंदुस्थानांतील लोक कोणत्याहि क्षेत्रांत किंवा कोणत्याहि गुणांत जगाच्या मागें नाहींत. असें असतांना अद्याप आम्हीं पारतंत्र्यांत कां ? ह्या प्रश्नाचा प्रत्येक मतदारानें विचार करावयाला पाहिजे. पहिल्या महायुद्धांत लाखों हिंदी लोकांनीं ब्रिटिश सरकारला मदत केली. त्याचें फळ आपल्याला काय मिळालें ?

जालियनवाला बागेंतील अमानुष कत्तल! ह्या अनुभवानें गांधीजी शहाणे झाले. आणि त्यांनीं दुसऱ्या महायुद्धांत इंग्रजांना मदत करण्याचें साफ नाकारलें. जोंपर्यंत ब्रिटिश सरकार आपल्या साम्राज्याचें बोचकें आपल्या उराशीं कवटाळून बसलेलें आहे, तोंपर्यंत तें हिंदुस्थानाला गुलामगिरींतून कधींहि मुक्त करणार नाहीं!

"आम्हीं गेलों तर तुमचें कसें होईल असा प्रश्न ब्रिटिश सरकार आम्हांला विचारतें. पण त्यांना जी काळजी वाटते आहे ती हिंदी लोकांचें कसें होईल ही नसून, हिंदुस्थान सोडल्यानंतर आपलें कसें होईल ही आहे. आपण एकजूट केली तर एका मिनिटांत इंग्रज या देशांतून जातील. पण आपली एकजूट होत नाहीं हीच तर आमच्या देशाची शोककथा आहे. आमचे विरोधक ब्रिटिश सरकारला काय म्हणतात? 'साब, तुम अंदर आव-अंदर आव!' आम्ही काय म्हणतों, 'साब, तुम कृपा करके चले जाव-चले जाव!' इंग्रज लोकांशीं किंवा त्यांच्या सरकारशीं देखील आमचें बिल्कूल वांकडें नाहीं. त्यांनीं आमच्या देशांत जरूर रहावें. पण सत्ताधीश म्हणून नव्हे. मित्र म्हणून. सेवक म्हणून. व्हाईसरॉय साहेबांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे कीं, आपण 'भात सोडला'! ठीक आहे. भात सोडा पण हिंदुस्थान कधीं सोडणार तें आधी सांगा! तुम्ही हिंदुस्थान सोडून विलायतेला जा. मग आम्हीं तुम्हांला भात तिकडे रोजच्या रोज पाठवून देऊं.

"काँग्रेसच्या पाठीमागें साठ वर्षांच्या त्यागाचें, सेवेचें नि पराक्रमाचें सामर्थ्य आहे. महर्षि दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी ह्यांची पुण्याई काँग्रेसची पाठीराखी आहे. सरदार वल्लभभाई पटेल, तरुणांचे कंठमणि पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे जीव कीं प्राण नेताजी सुभाषचंद्र बोस असे एकापेक्षांहि एक पराक्रमी नरवीर भारताच्या मागें उभे आहेत. काँग्रेसच्या विरोधकांना असा कोणाचा आधार आहे? त्यांच्या पाठीमागें आणि त्यांच्या पुढें फक्त तेच आहेत!

"काँग्रेसमध्यें कार्य करण्यास जे अपात्र ठरले, काँग्रेसमध्यें ज्यांना आपलें तेज पाडतां आलें नाहीं अशा असंतुष्ट आत्म्यांनीं निरनिराळे विरोधी पक्ष स्थापन केलेले आहेत. खानावळींच्या मालकांवर रुसलेल्या वाढप्यांनीं आपली नोकरी सोडून आपापल्या स्वतंत्र खानावळी काढाव्यात तसला हा प्रकार आहे. काँग्रेस कधीं असहकार करील तर कधीं प्रतिसहकार करील. पण ब्रिटिश सरकारशीं ती विनशर्त सहकार कधींच करणार नाहीं! हिंसेच्या गप्पा मारणाऱ्या काँग्रेसच्या विरोधकांना मला एकच विनंति करावयाची आहे कीं, 'साहेबा'च्या विजारींतला आधीं ढेकूण मारा नि मग 'साहेबा'ला मारण्याच्या गोष्टी करा.

"हिंसेची भाषा बोलण्याचा अधिकार आज फक्त नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनाच आहे. अहिंसात्मक असहकार हा महात्मा गांधींनीं विसाव्या शतकांत लावलेला एक महान् शोध आहे. निःशस्त्र नि दलित राष्ट्रें पाशवी साम्राज्यसत्तेशीं केवळ ह्याच

एका शस्त्रानें लढूं शकतील. भ्याडपणापेक्षां हिंसा श्रेष्ठ, हिंसेपेक्षां अहिंसा श्रेष्ठ, अशी महात्मा गांधीजींची शिकवणूक आहे. अहिंसा ही आध्यात्मिक शक्ति आहे. आणि आध्यात्मिक बळ वाढविणें हें हिंदु धर्माचें एक आद्य तत्त्व आहे. म्हणून अहिंसेची जे टवाळी करतात ते पर्यायानें हिंदु धर्माची टवाळी करतात, असें मी सांगतों.

"मी बरींच वर्षें शिक्षक होतों. म्हणून मी तुम्हांला एक गणित घालतों. मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकींत कॉंग्रेस नि हिंदुमहासभा ह्यांना पडलेल्या मतांचें प्रमाण शंभराला सात असें आहे. (१०० : ७) त्या वेळीं शंभर माणसांपैकीं दोन माणसांना मताधिकार होता. या दोन प्रमाणांचा गुणाकार केला तर दहा हजाराला चौदा प्रमाण पडतें. त्या चौदांत मी स्वतः माझें एक मत केवळ दयार्द्र बुद्धीनें टाकतों. म्हणजे दहा हजाराला पंधराचें प्रमाण पडलें. त्याला दहानें भागा. म्हणजे एक हजाराला एक पूर्णांक एक द्वितीयांश, असें प्रमाण पडतें. (१००० : १॥) त्याचा अर्थ असा कीं, कॉंग्रेसच्या बाजूला जेव्हां एक हजार शहाणे असतात तेव्हां कॉंग्रेसच्या विरोधकांच्या बाजूनें फक्त दीडशहाणे असतात. तेव्हां तुम्ही जर शहाणे असाल आणि दीडशहाणे नसाल, तर कॉंग्रेसलाच मत द्याल!

"बेचाळीसच्या क्रांतिलढ्यांत कॉंग्रेसला आज शिव्या देणारे हे सारे विरोधक होते कुठें? त्या वेळीं देशांतील राष्ट्रवादी जनता खवळून उठली होती. लहान मुलांनीं सुद्धां देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपले प्राण पणाला लावले होते. राममनोहर लोहियांनीं ब्रिटिश सिंहासन गदगदा हालविलें. नंदुरबारला शिरीषकुमार मेहेता ह्या चिमुकल्या बालवीराचें शरीर छिन्नविच्छिन्न होऊन त्याच्या रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. पण त्या वीर अभिमन्यू बाळानें हातांतलें तिरंगी निशाण कांहीं सोडलें नाहीं. आसामांत कनकलता नांवाच्या वीरबालेनें बंदुकीच्या गोळ्या खाऊन धारातीर्थीं प्राण सोडला. आणि सातान्यानें तर असा इतिहास घडविला कीं, साऱ्या जगाचा इतिहास त्याच्या पुढें तुच्छ आहे.

"आतां देशांतील स्वातंत्र्यपिपासा इतकी तीव्र झाली आहे कीं, लष्कर, आरमार नि हवाई दल ह्यांच्यांतहि हालचाल सुरू झाली आहे. जनतेला लागलेली ही स्वातंत्र्याची तहान भागविणारी देशांत एकच शक्ति आहे आणि ती म्हणजे कॉंग्रेस. देशांतला एकेक तरुण म्हणजे पेट्रोलचा डबा आहे. ह्या डब्यांनींच जिथें आतां पेट घेतलेला आहे तिथें स्वातंत्र्य आतां फार काळ दूर राहूं शकत नाहीं!

"कॉंग्रेसला उद्यां मत द्यावयास जावयाचें म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या मेंदूंत खिळा मारावयाला जायचें. प्रत्येकानें पेटींत आपलें मत टाकतांना आपण हातोडा घेऊन साम्राज्यशाहीच्या मस्तकांत त्या वेळीं खिळाच मारतों आहोंत अन् तिला 'मर–मर–मर' असेंच त्वेषानें म्हणतों आहोंत, अशीच आपली समजूत करून मत टाकावें.

"सूर्याला नमस्कार करा किंवा हिमालय हा सर्व जगांत अत्युच्च पर्वत आहे किंवा गंगेचें तीर्थ घेतल्यानें माणूस पावन होतो हें जसें कोणाला सांगावयाला लागत नाहीं, त्याप्रमाणें काँग्रेसला मत द्या, असें सांगण्याची आवश्यकता वाटत नाहीं. ज्या काँग्रेसच्या तिरंगी ध्वजाखालीं नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनीं 'आझाद हिंद फौज' उभी केली, त्या काँग्रेसला तुम्ही आपलीं मतें देणार, का साम्राज्यशाहीचे बूट चाटणाऱ्या त्यांच्या बगलबच्चांना तुम्ही मत देणार? लक्षांत ठेवा. निवडणुकीच्या दिवशीं कोणीहि आजारी पडायचें नाहीं. कोणीहि घरीं बसायचें नाहीं. मत देतां देतां मरण आलें तरी बेहेत्तर आहे. तुम्हांला मरायचेंच असेल तर काँग्रेसला आधीं मत द्या नि मागाहून खुशाल मरा. आम्हीं तुम्हांला खांदा देऊं!"

भाषण संपण्याच्या थोडें आधीं बाळासाहेब खेरांसकट काँग्रेसचे सारे भावी मंत्री व्यासपीठावर माझ्यामागें कधीं येऊन बसले तें मला समजलेंच नाहीं. माझें भाषण ऐकून ते इतके मंत्रमुग्ध झाले कीं, माझ्या भाषणानंतर आपण मुळींच बोलणार नाहीं, असें बाळासाहेब खेरांनीं सभेच्या व्यवस्थापकांना म्हणविलें. त्या रात्रीं पौर्णिमा असावी असें वाटतें. कारण माझ्या डोक्यावर पूर्णचंद्र ठळठळीतपणें प्रकाशत होता.

त्याच्याकडे पाहून मी म्हणालों, "जगांत दोनच चंद्र आहेत. एक हा आभाळांतला पौर्णिमेचा चंद्र नि दुसरा नेताजी सुभाषचंद्र! पौर्णिमेचा चंद्र पाहून जशी सागराला भरती येते, तशी सुभाषचंद्राच्या नुसत्या स्मरणानें भारतामधल्या जनसागराला भरती येते! चंद्राला बघून ज्याप्रमाणें घुबडें झाडांच्या ढोलींत लपलेलीं आहेत, त्याप्रमाणें सुभाषचंद्राच्या तेजानें काँग्रेसला विरोध करणाऱ्या राजकीय घुबडांनीं आपलीं तोंडें काळीं केलीं आहेत. माझ्या डोक्यावरच्या चंद्राला कधींतरी राहू-केतूचें ग्रहण लागतें आणि तें सुटावें म्हणून 'दे दान-सुटे गिऱ्हाण' असा आक्रोश दलित जनता करूं लागते. तसें आपल्या सुभाषचंद्राला साम्राज्यशाहीचें ग्रहण लागलेलें आहे. तें जर सुटावें असें तुम्हांला वाटत असेल तर 'द्या दान-द्या प्राण!' असा आक्रोश भारतमाता आज तुमच्या कानींकपाळीं करीत आहे, तो नीट ऐका!"

व्याख्यान संपल्यावर बाळासाहेब खेरांनीं अक्षरशः माझी पाठ थोपटली. ते म्हणाले. "आयुष्यांत मीं पुष्कळ व्याख्यानें ऐकलीं आहेत पण असें प्रभावी आणि तेजस्वी व्याख्यान आज माझ्या आयुष्यांत मी प्रथमच ऐकतों आहें."

दुसऱ्या दिवशीं शिवाजी पार्क पोलिंग स्टेशनवर सकाळीं नऊ वाजल्यापासून ते सायंकाळीं सहा वाजेपर्यंत काँग्रेसचा पोलिंग एजंट म्हणून मी एकसारखा काम करीत होतों. सायंकाळीं मतदान संपल्यावर वैकुंठलाल मेहता, वांद्रेकर आणि सोनगांवकर ह्या काँग्रेसच्या उमेदवारांसह जेव्हां मी मंडपाच्या बाहेर आलों, तेव्हां हजारों मतदारांनीं आमच्याभोंवतीं गर्दी केली आणि 'आतांच्या आतां या ठिकाणीं सभा झालीच पाहिजे!' अशा गर्जना करावयाला सुरुवात केली. तेव्हां नाइलाजानें मला त्यांच्या-

समोर भाषण करणें भागच पडलें. मी म्हणालों,

"निवडणुकीमध्यें केवळ उमेदवारच उभा असतो आणि मतदार बसलेला असतो, अशी जी पुष्कळांची समजूत असते ती चुकीची आहे. ज्यांनीं उमेदवाराला उभे केलेलें असतें ते सर्वच मतदार उभे असतात. तुमचे उमेदवार निवडून आले तर तो त्या उमेदवारांचा जय नसून तुमचा जय आहे हें लक्षांत ठेवा. उमेदवार निवडून येत नाहीं, मतदार निवडून येतो. कारण, उद्यां स्वातंत्र्ययुद्धाची हांक कॉंग्रेसनें दिल्यानंतर तुम्हांला तुम्ही निवडून दिलेल्या या उमेदवारांच्या मागोमाग समरांगणावर जावें लागेल!" 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत सर्व जनसमुदायानें एका आवाजांत म्हटल्यानंतर कॉंग्रेसच्या प्रचंड जयजयकारांत ही सभा विसर्जित झाली.

त्यानंतर सात दिवसांनीं मतमोजणी होऊन कॉंग्रेसचे उमेदवार प्रचंड संख्येनें निवडून आले. आणि कॉंग्रेसच्या विरोधकांचा अक्षरशः धुव्वा उडाला. मुंबई कायदेमंडळांत कॉंग्रेसला दुसऱ्यांदा निर्विवाद बहुमत मिळालें. मुंबईंत सयाजीराव सिल्म, भवानजी खिमजी, डॉ. गिल्डर, डॉ. जीवराज मेहता, वैकुंठ मेहता, वांद्रेकर, काजरोळकर नि सोनगांवकर ही मंडळी निवडून आली. ल. ग. थत्ते आणि आर. डी. भांडारे (सध्यांचे एस. टी. वाले) हे सपशेल भुईसपाट झाले.

पुण्यांत बाबा घोरपडे, डॉ. लागू, पोपटलाल शहा, बापूसाहेब गुप्ते, ठाण्यांत अण्णासाहेब वर्तक, कुलाब्यांत भाऊसाहेब राऊत अन् नानासाहेब कुंटे, पूर्व खानदेशांत हरिभाऊ पाटसकर, नगरमध्यें एल्. एम्. पाटील, भाऊसाहेब फिरोदिया, साताऱ्यांत व्यंकटराव पवार नि यशवंतरावजी चव्हाण, सोलापुरांत डॉ. अंत्रोळीकर नि तुळशीदास जाधव, बेळगांवांत अण्णासाहेब लठ्ठे इत्यादि मंडळी निवडून आली. बाळासाहेब खेरांना विरोध करण्यासाठीं भिडे गुरुजी उभे राहिले. पण ते आपल्या डिपॉझिटसकट गारद झाले.

२ एप्रिल १९४६ रोजीं गुढी पाडव्याच्या मंगल मुहूर्तावर कॉंग्रेसचें राज्य मुंबई इलाख्यांत सुरू झालें नि जुन्या हिंदु वर्षाबरोबरच साडेसहा वर्षें अस्तित्वांत असलेल्या ब्याण्णव कलमी सरकारची बेकायदेशीर, बेजबाबदार नि जनता-विरोधी राजवट अस्तंगत झाली. जनतेचें सरकार आलें म्हणून सर्वांना हर्ष झाला. साडेसहा वर्षें सरकारनें जनतेवर चालविलेला जुलूम आतां नाहींसा होईल. काळाबाजार, महागाई, अन्नाची अन् वस्त्राची टंचाई नष्ट होऊन जनता यापुढें सुखी होईल ह्या भावनेनें आशेचें नि उत्साहाचें वातावरण सर्वत्र निर्माण झालें.

कॉंग्रेसचे सव्वाशेंच्या वर प्रतिनिधि कायदेमंडळांत विजयी होऊन जेव्हां आले तेव्हां मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांना आपल्या तीन सल्लागारांना कायमचा निरोप देणें भाग पडलें. बाळासाहेब खेर हे मुख्य मंत्री नि शिक्षणमंत्री झाले. मोरारजी देसाई नि डॉ. गिल्डर हे अनुक्रमें गृहमंत्री नि आरोग्यमंत्री झाले. दिनकरराव देसाई नि ल. मा. पाटील हे अनुक्रमें कायदेमंत्री आणि स्थानिक स्वराज्यमंत्री झाले. वैकुंठलाल अर्थमंत्री,

गुलझारीलाल नंदा मजूरमंत्री, अण्णासाहेब वर्तक अन्नकारी मंत्री अन् गणपतराव तपासे उद्योगमंत्री, असें मुंबई इलाख्याचें पहिलें मंत्रिमंडळ स्थापन झालें. ‘ नवयुग ’नें खास अंक काढून ह्या मंत्रिमंडळाचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. कॉंग्रेसचा प्रचार मी केवळ मुंबईमध्येंच केला नाहीं तर बार्शी, सोलापूर अन् सातारा विभागांतहि केला.

बार्शीच्या ‘ सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल ’च्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन दि. ३० मार्च १९४६ रोजीं माझ्या अध्यक्षतेखालीं भरविण्याचें जाहीर झालें. बार्शीला जातांना वाटेंत ‘ शिवाजी मराठा वसतिगृहा ’च्या विद्यार्थ्यांनीं माझा सत्कार केला. बार्शीमध्यें ‘ जयशंकर मिल्स ’च्या आवारांतील अत्यंत सुंदर अशा ‘ गेस्ट हाऊस ’मध्यें त्या गिरणीचे मॅनेजिंग एजंट श्री. काकासाहेब झाडबुके ह्यांनीं माझ्या रहाण्याची व्यवस्था केली होती. त्या दिवशीं दुपारीं चार वाजतां ‘ सिल्व्हर ज्युबिली ’ हायस्कूलसमोरच्या पटांगणांत च र पांच हजार लोकांपुढें माझें दीड तास व्याख्यान झालें.

त्या व्याख्यानांत मी म्हणालों, “ आज आपल्याला नवीन इतिहास निर्माण करावयाचा आहे. नवीन इतिहास लिहावयाचा आहे. हें नवीन इतिहास लिहिण्याचें काम प्रत्येक मुलाला करतां येण्यासारखें आहे. इतिहासांतील निदान एक ओळ तरी प्रत्येक विद्यार्थ्यानें लिहावी. हें नवा इतिहास लिहिण्याचें कार्य १८५७ सालापासून ह्या देशामध्यें सुरू आहे. पण त्या वेळीं त्या इतिहासाचें फक्त पहिलेंच प्रकरण लिहिलें गेलें. दुसरें प्रकरण लिहिण्याचें काम १९०५ सालापासून म्हणजे वंगभंगापासून सुरू झालें. त्याला १९२० सालापासून नवीन तेज प्राप्त झालें.

“ १९४२ सालामध्यें या इतिहासाचें तिसरें प्रकरण सुरू झालें आहे. त्या वेळीं शेंकडों तरुणांनीं आणि मुलांनीं आपल्या रक्तानें हा इतिहास लिहिला आहे. आतां आपणाला ह्या इतिहासाचें शेवटचें प्रकरण लिहावयाचें आहे. हें प्रकरण जेव्हां खरो-खरच पूर्ण होईल, तेव्हांच ह्या देशाचा इतिहास लिहिण्याचें काम समाप्त होईल. आणि त्याच इतिहासाचा अभ्यास देशांतील भावी पिढ्या करतील. इंग्रजांचा इतिहास आम्हांला नको आहे. ते जुलमी आहेत. कपटी आहेत. दुसऱ्याच्या देशाचें, स्वातंत्र्याचें, नि संपत्तीचें हरण करणारे ते लुटारू आहेत.

“ त्यांच्या साऱ्या इतिहासामध्यें एकच न्यायाची अन् स्वातंत्र्यप्रियतेची गोष्ट त्यांनीं केली आहे. ती म्हणजे जेव्हां पहिल्या चार्लस् राजानें लोकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलें, तेव्हां जनतेनें त्याला फांसावर चढविलें आणि स्वातंत्र्य मिळविलें. एवढाच त्यांचा इतिहास आपणाला शिकतां येण्यासारखा आहे. आणि तोच आपण शिकला पाहिजे. चाळीस कोटि जनतेचें स्वातंत्र्य हिरावून घेणारी राजसत्ता आम्हांला नष्ट करावयाची आहे. असें केलें तरच आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा पहिला इतिहास आपण लिहिल्यासारखें होईल. ”

त्याच दिवशीं रात्रौ बार्शी शहर कॉंग्रेस कमिटीतर्फे त्या गांवांतील तीन कंदिला-

शेजारच्या सुभाष चौकामध्यें प्रचंड सभा भरली. या सभेला हजारों लोक हजर होते. आसपासच्या खेड्यांमधून अनेक शेतकरी बैलांच्या गाड्यांमधून किंवा पायीं आलेले होते. एवढा प्रचंड जनसमुदाय यापूर्वीं बार्शीमध्यें कधींहि जमला नव्हता असें अनेक मंडळींनीं त्या वेळीं मला सांगितलें. प्रारंभीं शहरांतील अनेक व्यक्तींतर्फे आणि संस्थांतर्फे सुताचे नि फुलांचे हार मला घालण्यांत आले. त्यानंतर बार्शी नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. निवृत्ति रंगनाथ सावळे ह्यांनीं नगरपालिकेतर्फे मला मानपत्र दिलें.

त्या मानपत्रामधला सर्वच्या सर्व मजकूर कांहीं ह्या ठिकाणीं देतां येण्यासारखा नाहीं. तथापि, त्यामधला महत्त्वाचा अगदीं लहानसा भाग येथें मी देतों.

" अग्रतः चतुरो वेदाः
पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं क्षात्रमिदं ब्राम्हम्
शापादपि शरादपि ।

अशा प्रकारचें खऱ्या ब्राह्मणाचें नि खऱ्या क्षत्रियाचें तेज आपल्यांत आहे. " यांत सर्व आलें.

त्यानंतर त्या सभेंत दोन तासपर्यंत 'कॉंग्रेसचें राजकारण' या विषयावर माझें भाषण झालें. कॉंग्रेसच्या आणि महात्मा गांधींच्या जयजयकारांत सभा विसर्जित झाली. ह्या जयजयकारांत 'देशद्रोही तटणीस मुर्दाबाद!' अशाहि आरोळ्या उठल्या. दुसऱ्या दिवशीं दुपारीं 'जयशंकर मिल्स'चे मॅनेजिंग एजंट ह्यांनीं आपल्या गिरणीच्या आवारांतील स्वतःच्या बंगल्यांत मला मोठ्या थाटाची मेजवानी दिली.

त्या रात्रीं सोलापूर येथें साडेनऊ वाजतां 'मजूर मैदाना'वर एक लाख लोकांसमोर पं. शिवाजी आर्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं माझें दोन तास व्याख्यान झालें. त्या वेळीं माझ्या गळ्यांत शेंकडो हार पडले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सोलापूरच्या 'कारंजकर हायस्कूल'मध्यें 'अभिनव कलोपासक मंडळा'तर्फे कर्नाटकचे विख्यात कवि प्रा. दत्तोपंत बेंद्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं माझा सत्कार झाला. त्या वेळीं काव्यशास्त्रविनोदाचा पूर अगदीं दुथडी भरून वाहिला. त्या दुपारीं 'महाराष्ट्र साहित्य परिषदे' (सोलापूर शाखा) तर्फे पद्माकर आळंदकर कॉन्ट्रॅक्टर ह्यांच्या दिवाणखान्यांत माझा सत्कार झाला. रात्रौ 'सोलापूर समाचार' कर्ते बाबुराव जक्कल ह्यांनीं मला थाटाची मेजवानी दिली.

त्यानंतर रात्रौ साडेतीन वाजतां मद्रास एक्स्प्रेसनें मी मुंबईला परतलों. अशा रीतीनें कॉंग्रेसच्या निवडणूक प्रचाराचा माझा बार्शी-सोलापूरचा गाजलेला दौरा संपला!

गुलझारीलाल नंदा मजूरमंत्री, अण्णासाहेब वर्तक अबकारी मंत्री अन् गणपतराव तपासे उद्योगमंत्री, असें मुंबई इलाख्याचें पहिलें मंत्रिमंडळ स्थापन झालें. 'नवयुग'नें खास अंक काढून ह्या मंत्रिमंडळाचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. काँग्रेसचा प्रचार मी केवळ मुंबईमध्येंच केला नाहीं तर बार्शी, सोलापूर अन् सातारा विभागांतहि केला.

बार्शीच्या 'सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल'च्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन दि. ३० मार्च १९४६ रोजीं माझ्या अध्यक्षतेखालीं भरविण्याचें जाहीर झालें. बार्शीला जातांना वाटेंत 'शिवाजी मराठा वसतिगृहा'च्या विद्यार्थ्यांनीं माझा सत्कार केला. बार्शीमध्यें 'जयशंकर मिल्स'च्या आवारांतील अत्यंत सुंदर अशा 'गेस्ट हाऊस'मध्यें त्या गिरणीचे मॅनेजिंग एजंट श्री. काकासाहेब झाडबुके ह्यांनीं माझ्या रहाण्याची व्यवस्था केली होती. त्या दिवशीं दुपारीं चार वाजतां 'सिल्व्हर ज्युबिली' हायस्कूलसमोरच्या पटांगणांत चार पांच हजार लोकांपुढें माझें दीड तास व्याख्यान झालें.

त्या व्याख्यानांत मी म्हणालों, "आज आपल्याला नवीन इतिहास निर्माण करावयाचा आहे. नवीन इतिहास लिहावयाचा आहे. हें नवीन इतिहास लिहिण्याचें काम प्रत्येक मुलाला करतां येण्यासारखें आहे. इतिहासांतील निदान एक ओळ तरी प्रत्येक विद्यार्थ्यानें लिहावी. हें नवा इतिहास लिहिण्याचें कार्य १८५७ सालापासून ह्या देशामध्यें सुरू आहे. पण त्या वेळीं त्या इतिहासाचें फक्त पहिलेंच प्रकरण लिहिलें गेलें. दुसरें प्रकरण लिहिण्याचें काम १९०५ सालापासून म्हणजे वंगभंगापासून सुरू झालें. त्याला १९२० सालापासून नवीन तेज प्राप्त झालें.

"१९४२ सालमध्यें या इतिहासाचें तिसरें प्रकरण सुरू झालें आहे. त्या वेळीं शेंकडों तरुणांनीं आणि मुलांनीं आपल्या रक्तानें हा इतिहास लिहिला आहे. आतां आपणाला ह्या इतिहासाचें शेवटचें प्रकरण लिहावयाचें आहे. हें प्रकरण जेव्हां खरो-खरच पूर्ण होईल, तेव्हांच ह्या देशाचा इतिहास लिहिण्याचें काम समाप्त होईल. आणि त्याच इतिहासाचा अभ्यास देशांतील भावी पिढ्या करतील. इंग्रजांचा इतिहास आम्हांला नको आहे. ते जुलमी आहेत. कपटी आहेत. दुसऱ्याच्या देशाचें, स्वातंत्र्याचें, नि संपत्तीचें हरण करणारे ते लुटारू आहेत.

"त्यांच्या साऱ्या इतिहासामध्यें एकच न्यायाची अन् स्वातंत्र्यप्रियतेची गोष्ट त्यांनीं केली आहे. ती म्हणजे जेव्हां पहिल्या चार्लस् राजानें लोकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलें, तेव्हां जनतेनें त्याला फांसावर चढविलें आणि स्वातंत्र्य मिळविलें. एवढाच त्यांचा इतिहास आपणाला शिकतां येण्यासारखा आहे. आणि तोच आपण शिकला पाहिजे. चाळीस कोटि जनतेचें स्वातंत्र्य हिरावून घेणारी राजसत्ता आम्हांला नष्ट करावयाची आहे. असें केलें तरच आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा पहिला इतिहास आपण लिहिल्यासारखें होईल."

त्याच दिवशीं रात्रौ बार्शी शहर काँग्रेस कमिटीतर्फें त्या गांवांतील तीन कंदिला-

शेजारच्या सुभाष चौकामध्यें प्रचंड सभा भरली. या सभेला हजारों लोक हजर होते. आसपासच्या खेड्यांमधून अनेक शेतकरी बैलांच्या गाड्यांमधून किंवा पायीं आलेले होते. एवढा प्रचंड जनसमुदाय यापूर्वी बार्शीमध्यें कधींहि जमला नव्हता असें अनेक मंडळींनीं त्या वेळीं मला सांगितलें. प्रारंभीं शहरांतील अनेक व्यक्तींतर्फे आणि संस्थांतर्फे सुताचे नि फुलांचे हार मला घालण्यांत आले. त्यानंतर बार्शी नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. निवृत्ति रंगनाथ सावळे ह्यांनीं नगरपालिकेतर्फे मला मानपत्र दिलें.

त्या मानपत्रामधला सर्वच्या सर्व मजकूर कांहीं ह्या ठिकाणीं देतां येण्यासारखा नाहीं. तथापि, त्यामधला महत्त्वाचा अगदीं लहानसा भाग येथें मी देतों.

“ अग्रतः चतुरो वेदाः
पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं क्षात्रमिदं ब्राम्हम्
शापादपि शरादपि ।

अशा प्रकारचें खऱ्या ब्राह्मणाचें नि खऱ्या क्षत्रियाचें तेज आपल्यांत आहे. ” यांत सर्व आलें.

त्यानंतर त्या सभेंत दोन तासपर्यंत ‘ कॉँग्रेसचें राजकारण ’ या विषयावर माझें भाषण झालें. कॉँग्रेसच्या आणि महात्मा गांधींच्या जयजयकारांत सभा विसर्जित झाली. ह्या जयजयकारांत ‘ देशद्रोही तटणीस मुर्दाबाद ! ’ अशाहि आरोळ्या उठल्या. दुसऱ्या दिवशीं दुपारीं ‘ जयशंकर मिल्स ’चे मॅनेजिंग एजंट ह्यांनीं आपल्या गिरणीच्या आवारांतील स्वतःच्या बंगल्यांत मला मोठ्या थाटाची मेजवानी दिली.

त्या रात्रीं सोलापूर येथें साडेनऊ वाजतां ‘ मजूर मैदाना ’वर एक लाख लोकांसमोर पं. शिवाजी आर्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं माझें दोन तास व्याख्यान झालें. त्या वेळीं माझ्या गळ्यांत शेंकडो हार पडले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सोलापूरच्या ‘ कारंजकर हायस्कूल ’मध्यें ‘ अभिनव कलोपासक मंडळा ’तर्फे कर्नाटकचे विख्यात कवि प्रा. दत्तोपंत बेंद्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं माझा सत्कार झाला. त्या वेळीं काव्यशास्त्रविनोदाचा पूर अगदीं दुथडी भरून वाहिला. त्या दुपारीं ‘ महाराष्ट्र साहित्य परिषदे ’ ( सोलापूर शाखा ) तर्फे पद्माकर आळंदकर कॉन्ट्रॅक्टर ह्यांच्या दिवाणखान्यांत माझा सत्कार झाला. रात्रौ ‘ सोलापूर समाचार ’ कर्ते बाबुराव जक्कल ह्यांनीं मला थाटाची मेजवानी दिली.

त्यानंतर रात्रौ साडेतीन वाजतां मद्रास एक्स्प्रेसनें मी मुंबईला परतलों. अशा रीतीनें कॉँग्रेसच्या निवडणूक प्रचाराचा माझा बार्शी-सोलापूरचा गाजलेला दौरा संपला !

## ४४

# सातारा जिल्हा झिंदाबाद !

ऐकण्यांत आणि पाहण्यांत पुष्कळच अंतर असतें नाहीं ? पुष्कळ म्हणजे अतिशयच अंतर असतें. ही गोष्ट आपल्याला नेहमींच माहीत असते. पण तिचा प्रत्यक्ष अनुभव असा क्वचित्च येतो त्या काळांत साताऱ्याच्या बाबतींत मी तीनचार वर्षें सतत ऐकत होतों. बरें ऐकत होतों. चांगलें ऐकत होतों. आणि वाईटहि ऐकत होतों. नऊ ऑगस्टच्या आंदोलनामध्यें त्या जिल्ह्यांतल्या जनतेनें फार मोठे पराक्रम केले. असंख्य प्राणांचे बळी दिले. पराकाष्ठेचा त्याग केला. दीडशें वर्षांच्या निःशस्त्र गुलामगिरीनें हिंदुस्थान देश भ्याड झाला आहे, हा आरोप जिल्ह्यानें या आंदोलनामध्यें पार धुऊन टाकला. ह्या काळामध्यें सातारा जिल्ह्यांत काय रामायण किंवा महाभारत घडत होतें, ह्याची बाहेरच्या जगाला सुतराम् कल्पना नव्हती. तथापि, कांहींतरी त्या ठिकाणीं अघटित घडतें आहे, असें अधूनमधून कोणाच्या तरी तोंडून ऐकूं येत होतें.

ऑगस्ट १९४५ मध्यें दुसऱ्या महायुद्धा-वर पडदा पडला अन् सातारा जिल्ह्यावरचा ' लोखंडी पडदा ' वर गेला. २४ ऑगस्टला

साताऱ्याच्या भीषण अत्याचारांची पहिली सचित्र बातमी मुंबई सरकारनें 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रांत प्रसिद्ध करून सर्व देशाचें लक्ष साताऱ्याकडे वेधलें. एकच पत्रक काढून सरकार थांबलें नाहीं तर एकाहिपेक्षां एकेक भयंकर पत्रकें काढून सातारा म्हणजे राक्षसी यमयातनांची एक नरकपुरीच आहे, असें जगाला भासविण्यासाठीं मुंबई सरकारनें आटोकाट प्रयत्न चालविला होता. एवढेंच करून मुंबई सरकार थांबलें नाहीं तर त्यानें साताऱ्याच्या दक्षिण भागांत गोरें लष्कर देखील पाठवून दिलें. सर्वांना वाटलें कीं, आतां तेथें एकादें प्रचंड युद्ध सुरू होतें कीं काय ?

साताऱ्याच्या परिस्थितीवर खरा प्रकाश टाकणारें पहिलें पत्रक सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते सोली बाटलीवाला यांनीं प्रसिद्ध केलें. या पत्रकांत त्यांनीं मुंबई सरकारची बदमाषी उघडकीला आणली. आणि साताऱ्याच्या प्रतिसरकारनें ह्या जिल्ह्यामधल्या जनतेच्या जीवनांत विधायक कार्य करून केवढी क्रांति घडवून आणली हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें.

हें पत्रक वाचून सातारा जिल्ह्याबाहेरील जनतेला पहिल्यानें कळलें कीं, बेचाळीसच्या ऑगस्ट आंदोलनानंतर देशामध्यें इतरत्र जें कोणाला करतां आलें नाहीं, तें करून देशाच्या स्वातंत्र्याचा झेंडा साताऱ्यानें सलामत राखला. सोली बाटलीवाला ह्यांच्या पत्रकामुळें साताऱ्याचें 'प्रतिसरकार' आणि भूमिगत कार्यकर्ते यांच्याबद्दल अधिक माहिती मिळवण्याची जनतेमध्यें विलक्षण उत्सुकता निर्माण झाली.

त्यानंतर मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकींना सुरुवात झाली. तेव्हांपासून तों प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका पुऱ्या होऊन कॉंग्रेस सरकारचें राज्य पुन्हां या इलाख्यांत प्रस्थापित होईपर्यंत 'सातारा प्रकरण' जरा बाजूलाच पडल्यासारखें झालें. कॉंग्रेसची राजवट देशामध्यें सुरू होतांच अनेक राजबंदी तुरुंगामधून सुटूं लागले. आणि अनेक भूमिगतांना अभयदान मिळून ते जनतेपुढें भराभर प्रकट होऊं लागले. साताऱ्याच्या भूमिगतांवरचीं पकडपत्रें रद्द व्हायला त्या मानानें थोडासा वेळच लागला. पण तीं शेवटीं रद्द झालीं आणि ७ मे १९४६ रोजीं सातारा जिल्ह्यामधील 'पत्री सरकार'चे नेताजी क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे शेंकडों पराक्रमी सहकारी मोठ्या वैभवानें एकदम प्रकट झाले आणि सातारा जिल्ह्यामधल्या लक्षावधि जनतेनें त्यांचें मोठ्या हर्षानें स्वागत केलें. सातारा जिल्ह्यामधला हा आनंदाचा सोहळा घडून येण्याच्या आधीं फक्त एकच आठवड्यापूर्वी सातारा जिल्ह्यांत माझा प्रचंड सत्कार झाला होता.

सातारा जिल्ह्यांत दरोबस्त खेड्यांत ग्रामदैवत जो भैरवनाथ किंवा भैरोबा ह्याची एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत सालाबादप्रमाणें जत्रा भरत असते. ह्या जत्रेंत हजारों शेतकरी एकत्र जमतात. शेकडों बकरीं त्या जत्रेंत कापलीं जातात. हजारों रुपयांची दारू त्या ठिकाणीं विकली जाते. आणि तमाशांना तर त्या वेळीं असा कांहीं

ऊत येतो म्हणतां! किती वर्षांपासून तरी हे प्रकार त्या जिल्ह्यांत चालत आले होते. पण सातारा जिल्ह्यांत प्रस्थापित झालेल्या पत्री सरकारनें भैरवनाथाच्या ह्या जत्रेचें स्वरूपच पार बदलून टाकलें. दारू, बकरी, अश्लील लावण्यांचे तमाशे आणि दौलतजादे हे सारे करमणुकीचे गलिच्छ प्रकार या जत्रेमधून पार हद्दपार करण्यांत आले. आणि त्यांची जागा क्रांतिवीरांचे पोवाडे, राष्ट्रीय स्वरूपाचीं गाणीं, खेळ, कुस्त्या आणि मोठमोठ्या देशभक्तांचीं किंवा वक्त्यांचीं सद्यः परिस्थितीवरील व्याख्यानें यांनीं घेतली.

सातारा जिल्ह्यांतील अनेक ठिकाणांहून भैरवनाथाच्या राष्ट्रीय जत्रेचीं मला आमंत्रणें आलीं. वेळेच्या अभावीं सर्वच आमंत्रणें स्वीकारणें मला शक्य नव्हतें. म्हणून फक्त तीनच गांवच्या जत्रेचीं आमंत्रणें मीं स्वीकारलीं. पहिलें आमंत्रण कोरेगांव तालुक्यांतील वाघोली गांवाचें होतें. दि. २५ एप्रिल १९४६ रोजीं मी मुंबईहून निघालों. रात्रौ पुणें येथें मुक्काम करून सकाळच्या गाडीनें मी वाठार येथें पोहोंचलों. स्टेशनवर वाघोलीचे कार्यकर्ते माझ्या स्वागतासाठीं उभे होते. वाठारपासून वाघोली गांव तीन चार मैलांवर आहे. तथापि मुख्य रस्त्यापासून तें एक मैलभर आंत आहे. माझ्या स्वागतासाठीं सातारा जिल्ह्यांतील एक क्रांतिकारक कार्यकर्ते रामानंद महाराज आणि हजारों गांवकरी नि तरुण स्वयंसेवक आधींपासून रस्त्यावर येऊन बसले होते.

त्या रस्त्यापासून गांवापर्यंत एक मैलभर पंचाहत्तर बैलांच्या गाडीमधून दे. भ. रामानंद महाराज, दे. भ. हकीम आणि दे. भ. दादासाहेब सांखळकर आणि मी या चौघांची मिरवणूक निघाली. एका मोठ्या गाड्यावर एक मंडप उभारला होता आणि केळीचे खांब अन् तिरंगी झेंडे लावलेले होते. मिरवणुकींत नगारे, ताशे, बँड, तुताऱ्या वाजत होत्या. गाड्याचे बैल शृंगारलेले असून त्यांवर निरनिराळ्या रंगाच्या झालरी टाकलेल्या होत्या. भर उन्हांत शेतांमधून गर्जत आणि घोषणा करीत चाललेली ती लांबच लांब हजारों लोकांची मिरवणूक बघून शहराच्या लोकांपेक्षां खेडेगांवांतील लोकांमध्येंच आतां अधिक देशप्रेम आणि उत्साह उसळ्या मारूं लागलेला आहे याची कोणालाहि खात्री पटली असती.

मिरवणूक गांवामध्यें येऊन पोहोंचतांच गांवामधील सुवासिनी स्त्रियांनीं मला आणि रामानंद महाराज यांना पंचारतींनीं ओवाळलें आणि आमच्या कपाळांना कुंकुम-तिलक लावले. त्यानंतर गाडीमधून उतरून आम्ही चालत चालत सभास्थानीं गेलों. त्या ठिकाणीं विस्तीर्ण मंडप उभारण्यांत आला होता. अदमासें पंधरा ते वीस हजार शेतकरी स्त्री-पुरुष त्या मंडपांत दाटीवाटीनें बसले होते. प्रारंभीं शेजारील एका गांवचे रहिवासी, 'आझाद हिंद फौज 'मधले एक तरुण सैनिक श्री. पांढरे यांनीं खिशामधून चाकू काढून चटकन् आपलें बोट कापलें आणि रक्ताचे टिळे माझ्या नि व्यासपीठावर बसलेल्या इतर वक्त्यांच्या कपाळीं लावले. आणि ' जय हिंद ' अशी खडी सलामी दिली.

प्रारंभींचीं कांहीं भाषणें झाल्यानंतर श्रीमति कोंडाबाई सावंत नांवाची एक अडाणी प्रौढ स्त्री बोलावयाला उठली. एवढ्या अफाट जनसमुदायापुढें एक शेतकरी स्त्री धीट-पणें बोलावयाला उभी रहात आहे, हें दृश्य पाहून सारी सभा आश्चर्यचकित झाली. एवढ्यांत तिनेंहि चाकू काढून आपलें बोट चटकन् कापलें नि रक्ताचा टिळा माझ्या नि इतर सन्मान्य पाहुण्यांच्या कपाळीं लावला. त्या अनपेक्षित प्रकारानें आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

त्यानंतर कोंडाबाईनें आपल्या कुणबाऊ भाषेंत 'खेडेंगांवांतील सुलतान' म्हणजे जो पाटील त्याची अशी कांहीं खरमरीत शब्दांत हजेरी घेण्यास सुरुवात केली कीं, लोकांना टाळ्या वाजवतां वाजवतां पुरेवाट झाली. मग तिनें स्वतः रचलेलें पुढील गाणें म्हणून दाखविलें.

"पाटील आहे सरकारचा प्यारा,
त्याला धरून पऱ्या मारा !
चला, चला, बायांनो चला,
वेसण ओवूं पाटलाच्या नाकाला !
काय करील तो फौजदार ?
सरकार आपलें उष्टें खाणार !
खाऊ भाकर अन कांदा
करूं देशाचा ग धंदा !
झाडं उगाळूनशान मरा,
पन देश स्वतंत्र करा !"

त्यानंतर मी बोलावयाला उभा राहिलों. मी म्हणालों, "आझाद सैनिक श्री. पांढरे आणि कोंडाबाई सावंत ह्यांचें रक्त कपाळावर लावून घेण्याची माझी लायकी नाहीं. तथापि त्यांच्या रक्तानें माझ्या शरीरामधल्या रक्तामध्यें एक नवीन चैतन्य निर्माण केलें आहे यांत कांहीं शंका नाहीं. देशासाठीं तसें मीं अजून काय केलें आहे ? मघांशीं ज्या बैलांनीं मला ओढीत आणलें त्यांचेहि मला आभार मानावयाला पाहिजेत. इतक्या बैलांनीं एवढे कष्ट घेऊन दुसऱ्या एका बैलाला येथपर्यंत ओढीत आणण्याचें काय कारण होतें ? तुम्ही सातारा जिल्ह्यांतील शूर शेतकरी आहांत. मी तुम्हांला कांहीं सांगायला आलों नाहीं, उलट मलाच तुम्ही सांगा. पुष्कळ सांगा. म्हणजे मग मी तें बाहेर लोकांना जाऊन सांगेन. मला तुमच्याकडून खूप खूप शिकायचें आहे.

"आम्ही पुण्या-मुंबईकडचीं शिकलेलीं माणसें. नुसतें बोलतों आणि बडबडतों. पण तुम्ही लोक कांहीं बोलत नाहीं. काय करायचें तें करून दाखवतां. तुम्हीं गेल्या तीन

वर्षांत ह्या जिल्ह्यांत किती तरी करून दाखविलेलें आहे. या तीन वर्षांत या देशामध्यें मोठमोठ्या घडामोडी झाल्या आहेत. त्यामुळें देश बदलून गेला आहे. लोक बदललेले आहेत. देव देखील बदलून गेलेला आहे. आज तुमचा हा भैरवनाथ सुद्धां बदलला आहे. नाहीं का? पूर्वी ह्याच बहिरोबाला बकऱ्याचें रक्त आवडत असे पण आतां बकऱ्याच्या रक्तानें त्याचें समाधान होणार नाहीं. ह्या देशांतल्या सर्व गोऱ्या राज्यकर्त्यांचें गांठोडें बांधून तें बहिरोबाच्या पायावर तुम्हीं वहाल तर त्याचें आतां समाधान होईल.

"गेल्या गुढीपाडव्यापासून या प्रांतांत आपलें राज्य सुरू झालें आहे. पण तेवढ्यानें कांहीं आपल्याला या देशाचें राज्य मिळालें असें होत नाहीं. म्हणून हुरळून जाऊं नका. जोंपर्यंत या देशांत एक गोरा अधिकारी शिल्लक आहे, तोंपर्यंत हें राज्य आपलें नाहीं. कांहीं लोक म्हणतात, 'चलेजाव'ची चळवळ फसली. मी म्हणतों, मुळींच नाहीं. 'चले जाव'ची चळवळ अधिक जोरदार झाली म्हणून 'आम्ही जातों' असें आपल्या तोंडून साहेब आतां बोलूं लागला आहे.

"पूर्वी 'स्वातंत्र्य' हा शब्द कोणी तोंडून काढला या देशांत तर त्यांना मोठमोठ्या शिक्षा होत होत्या. पण आज ब्रिटिश पंतप्रधानच 'स्वातंत्र्या'च्या गोष्टी आपल्याशीं करूं लागले आहेत. नुसते ते बोलून थांबले नाहींत तर तीन साहेब विमानांत बसवून त्यांनीं इथें पाठवून दिले आहेत. दिल्लीला ते महिनाभर आपल्या पुढाऱ्यांशीं स्वातंत्र्याच्या गोष्टी करीत आहेत. साहेबांच्या जें ओठांत असतें तें त्यांच्या पोटांत नसतें. आज तरी त्यांच्या ओठामधून 'स्वातंत्र्य' बाहेर कां पडलें? तर पंचवीस वर्षें महात्मा गांधी आणि काँग्रेस त्यांच्या छातीवर दणादणा नाचली. तेव्हांच साहेबाचें तोंड उघडलें.

"आपण हिंदुस्थानांतले लोक फार गरीब. फार सोशीक. दीडशें वर्षें आपण ह्या साहेबांचा छळ मुकाट्यानें सोसला. आणखी किती सहन करायचा? मांजर देखील कोपऱ्यांत सांपडलें तर तें उलटून मारणाऱ्याच्या नरड्याचा चावा घेतें. मग आपण तर काय बोलून चालून माणसेंच. आजपर्यंत सर्व जगाला आपण 'अंदर आव' असें म्हणत आलों. पण हे बाहेरचे चोर जेव्हां इथें येऊन आपल्या बोकांडींच बसले तेव्हां अगदीं नाइलाज म्हणून आपण यांना 'चले जाव' म्हणूं लागलों. आपला देश सर्व जगांत श्रीमंत आहे. सोन्याचा देश आहे हा. साहेबांच्या देशासारखा हा कांहीं कोळशाचा अन् लोखंडाचा देश नव्हे. आपल्या देशांत काय कमी आहे? म्हणूनच साऱ्या जगाचा आपल्या देशावर डोळा आहे. गुणी माणसाला शत्रू फार. पोपट सुंदर आहे म्हणूनच माणूस त्याला पिंजऱ्यांत ठेवतो. कावळ्याला कोणी पिंजऱ्यांत ठेवतो का?

"साहेबाचें राज्य जेव्हां पहिल्यानें या देशांत सुरू झालें, तेव्हां लोक फार खूष होते. त्यांना वाटलें कीं, सरकारनें आगगाडी काढली, तारायंत्र आणलें, शाळा स्थापन

केल्या. चला ठीक झालें. पण त्यांना हें कळलें नाहीं कीं, गेनूला किंवा रामूला साताऱ्याहून मुंबईला जायला सरकारनें आगगाडी काढली नाहीं. किंवा महादूला मुलगा झाला म्हणून सोलापुराहून पुण्याला तार पाठवायला कांहीं सरकारनें तारायंत्र केलें नाहीं. साताऱ्याला बंड झालें तर मुंबईहून किंवा पुण्याहून सोजीर पाठवायला सरकारनें

" आगगाडी आणि तारायंत्र केलें. रामभाऊ कुळकर्ण्यांचा मुलगा चांगला कारकून व्हावा अन् विठोबा पाटलांचा मुलगा चांगला पट्टेवाला व्हावा म्हणून साहेबानें ह्या देशांत शाळा सुरू केल्या. देशांतल्या विद्वान् लोकांना साहेबांचा हा कावा फार उशिरां कळला. महात्मा गांधींनीं देश हालवून माणसांना जागें केलें. सात लक्ष खेडीं जागीं झालीं. तेव्हां साहेब देशामधून जाण्याच्या गोष्टी करूं लागला. बाहेर जातो आहे म्हणतो तोंडानें. पण तसा कांहीं तो सुखासुखी जाणार नाहीं.

" त्याचें बळ फार मोठें आहें. त्याच्या जवळ तोफा, बंदुका, विमानें, जहाजें, बॉंब गोळे आहेत. अन् आपल्याजवळ तर यांपैकीं कांहींच नाहीं. म्हणून साहेबाला वठणीवर आणायचा म्हणजे त्याच्याशीं गनिमी काव्यानेंच लढलें पाहिजे. शिवाजी महाराजांनीं हा धडा तीनशें वर्षांपूर्वीं आपल्याला शिकविलेला आहे, तो साताऱ्याच्या लक्षांत होता. गेल्या तीन वर्षांत त्यानें तो बरोबर गिरवून दाखविला.

" पूर्वीं गांधीजींनीं सरकारचे तुरुंग भरून काढले. पण साताऱ्यानें नवीनच युक्ति काढली. सरकारच्या हातांत मुळीं सांपडावयाचेंच नाहीं. साताऱ्याच्या साऱ्या भूमिगतांना लोकांनीं आपल्या पोटांत घेतलें. मग सरकारच्या शिपायांना ते कोठून सांपडणार? साहेबाचें राज्य देशामध्यें आज कोणालाच नको आहे. आतांपर्यंत साहेबाचा लष्करावर विश्वास होता. पण त्याला देखील नेताजी सुभाष बोसांनीं खिंडार पाडलें. आतां या देशांत साहेबाच्या बाजूचें कोणी नाहीं. म्हणूनच तो आतां आपला बिछाना गुंडाळण्याच्या गोष्टी करीत आहे. भैरवनाथ देखील आतां कॉंग्रेसच्या निशाणाखालीं आला आहे. उद्यां स्वातंत्र्याचें तिसरें युद्ध सुरू झालें तर सातारा या युद्धांत आघाडीवर लढेल. मी खात्रीनें सांगतों कीं पुढल्या बहिरोबाच्या जत्रेला साहेबाचें राज्य या देशांत शिल्लक रहात नाहीं ! "

दुसरे दिवशीं वाईला राष्ट्र सेवादलाच्या तीनशें सैनिकांपुढें माझें भाषण झालें. मी म्हणालों, " देशाचा नवीन इतिहास लिहिला जातो आहे. तो शाईनें लिहिला जात नसून रक्तानें लिहिला जातो आहे. तो इतिहास लिहिण्यामध्यें देशामधल्या तरुण मुलामुलींनीं आतां भाग घेतला पाहिजे. दुसऱ्याच्या इतिहासाचा आजपर्यंत अभ्यास करीत होतों, म्हणून आपण आतांपर्यंत गुलाम राहिलों. आतां आपल्या इतिहासाचा आपल्याला अभ्यास करावयाचा आहे. पण त्याच्या आधीं तो लिहिला पाहिजे ना ! तें इतिहास लिहिण्याचें काम १८५७ सालापासून सुरू झालेलें आहे. तें काम अजून पुरें झालेलें नाहीं.

मास्तर लोक म्हणतात, आजकाल शाळेंतलीं मुलें अभ्यास करीत नाहींत. हरताळ पुकारतात आणि शाळेला बुट्टी देतात. देशांत स्वातंत्र्ययुद्ध चाललें असतांना शाळा-कॉलेजांना विचारतें आहे कोण? गेल्या पांच वर्षांत युरोपांतल्या एका देशांत तरी शाळा-कॉलेज शिल्लक होतें का? तिथें शाळा-कॉलेजांना आग लागली होती आग. शिक्षक अन् विद्यार्थी स्वातंत्र्यासाठीं रणांगणावर लढत होते. तसें या देशांत व्हावयाला पाहिजे. अभ्यास बुडाला, परीक्षा बुडाल्या, या शिक्षकांच्या तक्रारी ऐकूं नका. आपली लढाई संपून आपला देश जेव्हां स्वतंत्र होईल तेव्हां मग आपण करूं अभ्यास! अगदीं जगाच्या अंतापर्यंत आपण अभ्यास करूं! मग दुसरा धंदा काय तुम्हांला?"

दुसऱ्या दिवशीं दुपारीं वाईपासून चार-मैलांवर लोहारें म्हणून एक खेडेगांव आहे त्या ठिकाणीं, श्री भैरवनाथाच्या राष्ट्रीय जत्रेमध्यें माझें व्याख्यान ठरलें होतें. लोहारें गांवापासून एका मैलाच्या अंतरावर कीचक ओढ्याच्या कांठीं कोठावळे यांचा नारळींचा सुंदर आणि शीतल बाग आहे. तेथें मला आणि इतर पाहुणे मंडळींना थाटाची मेजवानी देण्यांत आली. मग तेथून साठ सत्तर बैलांच्या गाड्यांमधून अध्यक्ष दे. भ. आप्पासाहेब सोहोनी आणि मी अशी आम्हां दोघांची वाजत गाजत मोठ्या थाटानें मिरवणूक निघाली. भैरवनाथाच्या देवळासमोर बांधलेल्या प्रचंड मांडवांत पंचवीस हजार स्त्री पुरुष जमले होते. ह्या सभेस आजूबाजूच्या सात आठ खेडेगांवांची मंडळीं जमा झाली होती. 'उद्यांच्या लढ्यासाठीं तयार व्हा!' या विषयावर माझें सव्वा तास व्याख्यान झालें.

संध्याकाळीं मी आणि बापूराव जगताप मोटारीनें वाठारवरून नीरा स्टेशनानजिक असलेल्या निंबूत या गांवीं गेलों. निंबूत हें गांव नीरा नदीच्या कांठीं असून उसांच्या शेतीबद्दल तें प्रसिद्ध आहे. तेथें दरवर्षी भैरवनाथाच्या जत्रेमध्यें मोठमोठ्या नामांकित पहिलवानांच्या कुस्त्या होतात. दुसरे दिवशीं दुपारीं दोन वाजतां कुस्त्यांच्या विशाल आखाड्यांत तीस पस्तीस हजार शेतकऱ्यांपुढें आणि पहिलवानांपुढें दे. भ. केशवराव जेधे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दीड तासपर्यंत माझें भाषण झालें.

मी म्हणालों, "पहिलवान मंडळींनीं ताकद कमावली आहे ती कांहीं एकमेकांत कुस्त्या करण्यासाठीं नव्हे. आपल्याला ब्रिटिशाशीं कुस्ती खेळायची आहे. त्याला पेंच घालून चितपट करायचें आहे. ही कुस्ती महात्मा गांधी आणि कॉंग्रेस गेलीं पंचवीस वर्षे खेळत आहेत. आणि तुम्ही मंडळी ती कुस्ती लांबून पहात आहांत. असें चालावयाचें नाहीं. आतां ही कुस्ती तुम्हीं लढली पाहिजे. भैरवनाथाची तुम्हांला अशी आज्ञा आहे.

आपापल्या गांवीं जाऊन तुफान उसळून द्या. आतां आमच्यासारख्या शिकलेल्या लोकांचें राजकारण संपलें. आम्ही शिकलेले लोक नुसता विचार करतों आणि व्याख्यानें देतों. प्रत्यक्ष कांहीं करत नाहीं. बाबू गेनूसारखे वीर एकदम प्राण देतात. साहेब सहजा-सहजीं स्वातंत्र्य देणार नाहीं. तें त्यांच्या पोटांत खोल जाऊन बसलें आहे. दीडशें वर्षे

त्यानें तें खाऊन खाऊन पचविलें आहे. तें त्याच्या तोंडांत असतें तर नाक दाबून बाहेर काढतां आलें असतें. तें त्याच्या घशांत अडकलें असतें तर, मानेवर बुक्क्या मारून तें बाहेर पाडतां आलें असतें. पण तें त्याच्या पोटांत आहे. तें त्याच्या नरड्यांत खोल हात घालून त्याच्या आंतड्यांसकट आपल्याला बाहेर काढायचें आहे. फार ताकदीचें नि विकट काम आहे हें."

दि. ३० एप्रिल रोजीं सायंकाळीं 'जय हिंद' मंडळीतर्फे साताऱ्याला राजवाड्याच्या विस्तीर्ण पटांगणांत तीस चाळीस हजार लोकांच्या प्रचंड जनसमुदायासमोर माझें व्याख्यान झालें. अध्यक्षस्थानीं जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष बाळासाहेब देसाई (सध्यांचे गृहमंत्री) हे होते. सभेच्या प्रारंभीं साताऱ्यामधल्या शेंकडों संस्थांनीं आणि व्यक्तींनीं हार घालून माझा सत्कार केला.

मी म्हणालों, "एवढें हाराचें ओझें तुम्ही माझ्या गळ्यांत घालणार असें जर मला पूर्वीं कळलें असतें, तर व्याख्यानाला इथें येण्याच्या बाबतींत मी हार खाऊन पळालों असतों. तथापि, हे हार माझे आहेत असें मी समजत नाहीं. साताऱ्याच्या स्वातंत्र्यमंदिरांत येऊन स्वतःची पूजा करून घेण्याइतका मी मूर्ख नाहीं. हे हार त्या स्वातंत्र्यवीरांचे आहेत, कीं ज्यांनीं साडेतीन वर्षांत ह्या सातारा जिल्ह्यामध्यें ब्रिटिश सरकार औषधाला देखील शिल्लक ठेवलें नाहीं. मी त्या वीरांचा पुजारी आहे. त्यांच्यातर्फे मी हे हार स्वीकारतों. गेल्या साडेतीन वर्षांत सातारा जिल्ह्यानें स्वातंत्र्याचा ध्वज येथें फडकत ठेवला. यापुढें देशाचें नांव सातारा राखणार. साताऱ्याची ही वीरश्री साऱ्या देशांत संचारली पाहिजे. महात्माजींनीं 'चले जाव'ची घोषणा केली. त्याचा अर्थ साताऱ्याला कळला. त्यानें 'चले जाव' म्हणजे काय हें कृतींत करून दाखविलें. 'चले जाव' म्हणजे चले जावच! अर्धवट तडजोड नाहीं!

"जो 'चले जाव'ला विरोध करील किंवा मुरड घालील त्याला तुम्ही राजकीय क्षेत्रांतून 'चले जाव' म्हणून पिटाळून लावलें पाहिजे. राजगोपालाचारींना मद्रासनें 'चले जाव' कां म्हटलें? तर त्यांनीं 'चले जाव'ला विरोध केला म्हणून! पंतप्रधान ॲटलींनीं सांगितलें 'स्वातंत्र्य देतों!' हा 'चले जाव'चा विजय आहे. हा कॉंग्रेसचा विजय आहे. तरी देखील हिंदुसभा म्हणते कीं हा त्यांचाच तात्त्विक विजय झाला. 'तात्त्विक' शब्दाला कांहीं अर्थ आहे काय? गाढवानें म्हणावें कीं मी 'तात्त्विक' दृष्ट्या घोडाच आहे! हिंदुसभेचे नेते म्हणतात आम्हांला इंग्रजांशीं लढायचंय्-मुसलमानांशीं लढायचंय्-कॉंग्रेसशीं लढायचंय् आणि रक्त गाळायचंय्! ज्या लोकांना आपलीं डिपॉझिटें देखील वाचवतां येत नाहींत, ते काय लढणार अन काय गाळणार? ('ते चहा गाळणार!' असें एक लहान मुलगा म्हणाला तेव्हां खूपच हंशा पिकला.)

"या पुढच्या लढ्यांत कॉंग्रेसचें युद्धतंत्र बदलणार! आतां कॉंग्रेसचे मंत्री

राजिनामे देऊन तुरुंगांत जाणार नाहींत. तेच ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांना तुरुंगांत घालतील. ब्रिटिशांचें राज्य या देशांत आतां कोणालाहि नको. लष्कराला नको आहे. नाविकदलाला नको आहे. पोलिसांना देखील नको आहे. तेव्हां आतां शेवटची आरोळी उठेल, तेव्हां या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत देशामध्यें एकच आगडोंब उसळेल आणि देशाच्या स्वातंत्र्याला जे लोक विरोध करतील त्यांची राखरांगोळी होऊन जाईल!"

कर्मवीर भाऊराव पाटील या सभेला हजर होते. अशा रीतीनें सहा सात दिवसांच्या माझ्या दौऱ्यांत सातारा जिल्ह्यांतील चैतन्यदायक वातावरणाचें मीं प्रत्यक्ष निरीक्षण केलें आणि 'चले जाव'चा संदेश दीड पावणे दोन लाख लोकांना दिला. त्यानंतर दोन आठवड्यांच्या आंतच मीं 'नवयुग'चा 'क्रांतिवीर नाना पाटील विशेषांक' काढून सातारा जिल्ह्यांतील क्रांतिकारक प्रतिसरकारचा रोमहर्षक इतिहास महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोंचविला.

४५

## जग काय म्हणेल ?

माझ्या सर्व नाटकांत तुमचें आवडतें नाटक कोणतें, असें जर मला कोणी विचारील, तर मी सांगेन कीं, 'जग काय म्हणेल ?' हें माझें अत्यंत लाडकें नाटक आहे. त्यामध्यें माझ्या नाट्यतंत्रानें नि नाट्य-संवादांनी पराकाष्ठेचा उच्चांक गांठला आहे, असें मला स्वतःला वाटतें.

हें नाटक मीं कसें लिहिलें ती गोष्ट सांगण्यासारखी आहे, मीं पुष्कळदां म्हटलेलें आहे कीं, मला कल्पनेनें फारसें लिहितां येत नाहीं. समाजांत घडलेल्या लोक-विलक्षण घटना मीं स्वतः पाहिल्यावांचून किंवा ऐकल्याखेरीज माझी स्फूर्ति जागी होत नाहीं.

ल्युइजी पिरेन्डोलो ह्या 'नोबेल प्राईझ' जिंकणाऱ्या एका महान् इटॅलियन नाटक-कारानें Six Characters in Search of an Author (ग्रंथकाराच्या शोधार्थ सहा पात्रें, हें आपलें क्रांतिकारक नाटक लिहिलें आहे. ह्याच नाटकावर त्यानें तें 'नोबेल प्राईझ' मिळविलेलें आहे.

त्या नाटकाची स्थूल भूमिका अशी आहे कीं, ज्यांच्या जीवनामध्यें कांही एक भयानक नाट्य घडलेलें आहे, अशीं सहा

'पात्रें' त्या नाट्याचा प्रत्यक्ष प्रवेश रंगभूमीवर यावा, म्हणून कोणातरी नाटककाराच्या शोधासाठीं हिंडत असतांना एका नाटकगृहांत येत आहेत. येथून त्या अभूतपूर्व नाटकाला प्रारंभ होतो आणि त्या नाटकगृहांतल्या नाट्य-निर्मात्याला तें आपलें जीवननाट्य सांगत असतां असतांच, त्यांतून तें नाटक निर्माण होत आहे. नाट्यतंत्राच्या सृष्टींतला हा एक विलक्षण धाडसी शोध आहे.

पण माझें सर्वच लेखन ह्याच मासल्याचें आहे. म्हणजे, मीं माझ्या लेखनांत रंगविलेलीं किंवा निर्माण केलेलीं बहुतेक सर्व पात्रें हीं आपण होऊन माझा शोध करीत करीत मला प्रत्यक्ष भेटावयाला आलेलीं आहेत.

'जग काय म्हणेल?' ह्या माझ्या नाटकांतील नायिका 'उल्का' ही अशीच एके दिवशीं सकाळीं अकरा वाजतां माझ्या घरीं आपल्या पायानें चालत आली. ती एका खऱ्याखुऱ्या नाटकांतली नायिका होती. आणि नाट्यक्षेत्रांत यश मिळविल्यानंतर चित्रपटक्षेत्रांत तिनें अमाप यश मिळविलें होतें. ती विवाहित होती. आणि दोन प्रौढ मुलींची आई होती. ती एका सुप्रसिद्ध मजूर पुढाऱ्याची मुलगी होती. आणि तिचा धाकटा भाऊ एक नामांकित सिनेमा-नट होता. माझ्या नाटकांत मीं तिचें जें वर्णन केलेलें आहे, तें अक्षरशः तिच्या जीवनामधूनच मीं उचललेलें आहे. त्यामध्यें काल्पनिक असें मीं फारच थोडें मिसळलेलें आहे.

सकाळीं अकरा वाजल्यापासून तों दुपारीं दोन वाजेपर्यंत 'उल्का' आपल्या जीवनाची हृदयद्रावक कहाणी मला जीव तोडून तोडून सांगत होती. ती सांगतांना ती जसें आपलें देहभान विसरून गेली होती, त्याप्रमाणें मी देखील तिची शोककथा ऐकतांना अक्षरशः जडमूढ होऊन गेलों होतों. बरोबर तिनें कांहीं कागदपत्र आणले होते. तेहि तिनें मला दाखविले. आधुनिक सामाजिक जीवनांतली ती एक अत्यंत कारुण्यपूर्ण घटना होती.

'उल्के'च्या जीवनाची सत्यकथा अशी होती: तिला जेव्हां रंगभूमीवर नांव मिळालें आणि चित्रसृष्टींत पैसा मिळूं लागला, तसें तिच्या पतीला-म्हणजे माझ्या नाटकांतल्या 'दिवाकरा'ला वैषम्य वाटूं लागलें. तिनें स्वतःच्या प्राप्तीचा सर्व पैसा आपल्या हवालीं करावा, अशी 'दिवाकरा'ची इच्छा होती. 'उल्का' त्याला म्हणे, "मी मिळविलेला पैसा माझ्याजवळ असला काय नि तुझ्याजवळ असला काय, दोन्ही गोष्टी सारख्याच. हा पैसा मी कांहीं स्वतःवर खर्च करणार नाहीं. तो आपल्या कुटुंबासाठींच खर्च करणार आहें. मग तो आपल्याच हातीं असला पाहिजे, असा तुझा आग्रह कां?" पण तिच्या त्या युक्तिवादानें 'दिवाकरा'चे समाधान होत नसे.

पत्नी ही जशी आपल्या मालकीची 'वस्तु' आहे, तशी तिची कमाई ही सुद्धां आपल्याच मालकीची असली पाहिजे, हा जो नवरेशाहीचा पारंपारिक सिद्धान्त हिंदु समाजांत शेंकडों वर्षें चालत आलेला आहे, त्यावर 'दिवाकरा'चा सारा भरिभार असतो. आपली कमाई 'दिवाकरा'ला देण्याचें उल्कानें नाकारल्यानंतर

दिवाकर तिची सपशेल उपेक्षा करूं लागला. बाकी स्वतःच्या रंगेल जीवनांत त्याला आपल्या पत्नीकडे लक्ष देण्यास वेळ होताच कुठें मुळीं ?

चित्रपटांत मिळालेली आपली सर्व कमाई घर बांधण्यावर खर्च करायचें 'उल्का 'नें ठरविलें. तिच्या नवऱ्याच्या परिचयाचा एक तरुण गृहस्थ—म्हणजे माझ्या नाटकांतला 'प्रकाश ' त्या घरबांधणीच्या कामीं तिला सल्लामसलत देत होता. त्यामुळें त्यांच्या परिचयाचें रूपांतर साहजिकच पुढें प्रेमांत झालें उपेक्षित स्त्रियांना जो पुरुष सहानुभूति दाखवतो, त्यांच्या प्रेमांत त्या प्रथम पडतात हा आयुष्यांतला एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. नवऱ्याला त्याची अजिबात कल्पना नव्हती. त्यानंतर 'दिवाकर 'पासून वेगळें होऊन 'प्रकाश 'बरोबर रहाण्याचें 'उल्का 'नें ठरविलें. ती गोष्ट तिनें एका मित्राच्या मार्फत जेव्हां 'दिवाकरा 'ला कळवली, तेव्हां त्याला अक्षरशः आभाळ फाटल्यासारखें झालें. कारण तो स्वतः जरी आपल्या पत्नीशीं एकनिष्ठ नव्हता, तरी आपल्या पत्नीची एकनिष्ठा मात्र तो गृहीतच धरून चालला होता. म्हणून आपली पत्नी आपल्याला सोडून जाणार असें जेव्हां त्याला समजलें, तेव्हां त्यानें आकाशपाताळ एक केलें. आणि हातांत सांपडेल त्या वस्तूंनीं तो आपल्या पत्नीला झोडपीत सुटला.

त्यानंतर त्या उभयतांना एकत्र रहाणें शक्यच नव्हतें. 'उल्का 'नें आपल्या विवाहित नवऱ्याला सोडून 'प्रकाश 'बरोबर लग्न न करतां तसेंच रहावें, ही गोष्ट तिच्या भावांना किंवा नातेवाइकांना आवडणें शक्यच नव्हतें. म्हणून त्यांच्या रोषालाहि ती पात्र झाली. सगळ्यांनींच तिच्यावर बहिष्कार पुकारला. तशाहि स्थितींत ती आप्तांच्या रागालोभाची किंवा 'जग काय म्हणेल ? ' ह्याची पर्वा न करतां 'प्रकाश 'बरोबर दोन तीन वर्षं कशीबशी राहिली असेल.

त्यानंतर चित्रपटसृष्टींतला तिचा भावहि पुष्कळच कमी झाला. नाटकांत आणि चित्रपटांत तिला कामें मिळेनाशीं झालीं. आणि त्यानंतर एक दिवस तिचा मित्र 'प्रकाश ' अकस्मात् मरण पावला आणि ती जगांत सर्वस्वी निराधार झाली. 'उल्का 'नें आपल्या जीवनाची मला जी कहाणी सांगितली ती मुळांत अशी होती.

ती ऐकून मला 'जग काय म्हणेल ? ' ह्या नाटकाची कल्पना सुचली. अर्थात् मूळ कथाभागांत मला आमूलाग्र बदल करावा लागला. कारण एका जागृत-स्त्रीचें आदर्श चित्र मला उल्केच्या रूपानें समाजापुढें मांडावयाचें होतें. म्हणून तिच्या चरित्राला अनैतिक वर्तनाचा यत्किंचित्ही स्पर्श होतां कामा नये याबद्दल मला काळजी घ्यावी लागली. हिंदु समाजांत स्त्री ही सर्वस्वी पराधीन आहे–धर्माच्या दृष्टीनें, कायद्याच्या दृष्टीनें आणि व्यवहाराच्या दृष्टीनें. आर्थिक दृष्ट्या स्त्री स्वावलंबी झाल्यावांचून ती कोणत्याहि अर्थानें स्वतंत्र होणार नाहीं, ही गोष्ट सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ आहे.

गेल्या शतकाच्या अखेरीस पाश्चात्य देशामधली स्त्री पूर्णपणें 'स्वतंत्र ' झालेली

आहे. पहिलें महायुद्ध संपल्यानंतर आपल्या देशामधली स्त्री जागी झाली आणि स्वतंत्र होण्याची तिची धडपड तेव्हांपासून एकसारखी सुरूच आहे. विवाह ही देवा-धर्मानें आणि ब्राह्मणांनीं स्त्रीपुरुषांची बांधलेली अतूट गांठ आहे. पति हा पत्नीचा परमेश्वर आहे. सौभाग्य हाच स्त्रीचा खरा अलंकार आहे आणि पातिव्रत्य हाच स्त्रीचा धर्म आहे. वगैरे रूढ धर्मानें जे भावनात्मक सिद्धान्त आपल्या समाजाच्या बोकांडीं हजारों वर्षांपासून बसविलेले आहेत, त्यामुळें हिंदु समाजांत स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न तर अत्यंत बिकट होऊन बसलेला आहे. किंबहुना ' पातिव्रत्य ' हा तर स्त्री-स्वातंत्र्याच्या मार्गावरचा एक भला मोठा अडथळा होऊन बसलेला आहे.

या सर्व प्रश्नांचा विचार स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीनें व्हावयाला पाहिजे. पुरुषांनीं आपल्या कपोलकल्पित श्रेष्ठत्वाचें जोखड स्त्रियांच्या मानेवर लादण्याचें आतां थांबविलें पाहिजे. पारंपरिक पातिव्रत्याच्या पोलादी पकडींत सांपडलेल्या स्त्रीचा अधःपात कोणत्या मर्यादेपर्यंत होऊं शकतो, ह्याचें अत्यंत हृदयभेदक चित्र गडकऱ्यांनीं आपल्या ' एकच प्याला ' नाटकांत रंगविलेलें आहे. ' एकच प्याला ' ही दारूच्या दुष्परिणा-माची करुण कहाणी नसून, ती पातिव्रत्याच्या अतिरेकाची शोककथा आहे, असें मला वाटतें.

आर्थिक स्वातंत्र्यासाठीं धडपडणाऱ्या जागृत हिंदु स्त्रीच्या जीवनाचें चित्र प्रथम मी ' घराबाहेर 'मध्यें रंगविण्यास प्रारंभ केला. एका बिकट विषयाला मी प्रथमच हात घालीत होतों. ह्याची जाणीव त्या वेळीं मला होती. म्हणून त्या वेळीं जरा बाचकत बिचकतच मी ' निर्मले 'चें चित्र रंगविलें. ' उद्यांच्या संसारां 'त वैवाहिक पारतंत्र्याचें हृदयद्रावक चित्र ' करुणे 'च्या रूपानें मीं अधिक धैर्यानें आणि आवेगानें रंगवून एक पाऊल पुढेंच टाकलें. त्यामुळें पुष्कळांना तें अतिशयच आवडलें. पण माझ्या मनाचें मात्र त्यामुळें समाधान झालें नव्हतें. म्हणून इतक्या वर्षांनीं पुन्हां हातांत लेखणी धरतांच तें अपुरें राहिलेलें चित्र अगदीं मनमोकळेपणानें रंगवण्याचें मीं ठरवलें.

म्हणून संपूर्ण जागृत स्त्रीचें अत्यंत स्पष्ट आणि प्रामाणिक चित्र उल्केच्या रूपानें ' जग काय म्हणेल ! ' ह्या नाटकांत मीं उभें केलें. निर्मला, करुणा आणि उल्का हीं जागृत स्त्रीचीं तीन उत्क्रांत स्वरूपें मी माझ्या ' घराबाहेर ', ' उद्यांचा संसार ' ' जग काय म्हणेल ! ' या नाट्यत्रिपुटीमधून मराठी नाट्यसृष्टींत मांडण्याचा प्रथमच प्रयत्न केला आहे, असा माझा दावा आहे. उल्केच्या शोककथेला तात्कालीन राजकीय पार्श्वभूमीची जोड मिळाल्यानें तिच्यांतील कारुण्याला एक विलक्षण प्रकारचें उदात्त स्वरूप प्राप्त झालें आहे.

आता ' मीं उल्के 'च्या मूळ कहाणींत काय काय बदल केला तें माझ्या नाटका-मध्यें घडलेल्या घटनांच्या अनुक्रमानेंच सांगतों. उल्का ही दादरच्या हिंदु वसाहती-

मधील एका दोन मजली बंगल्याच्या पहिल्या मजल्यावर रहात असते. संध्याकाळीं साडेपांचच्या सुमारास नाटकाला सुरुवात होते. उल्केची मैत्रीण वर्षा ही एक अविवाहित शिक्षिका असते. ती जेव्हां उल्केच्या बिऱ्हाडीं येते, तेव्हां उल्का घरींच नसते. तिचा नोकर शिवा तिला सांगतों कीं, " बाई आपला थोरला मुलगा सुवास नि धाकटी मुलगी पुष्पा ह्यांना घेऊन डॉक्टरकडे गेलेल्या आहेत." सुवासाला चारपांच दिवसांपासून ताप येत असतो, तर पुष्पाला कांहीं दिवसांपासून फिट्स येऊं लागलेल्या असतात.

उल्का घरांत नाहीं म्हणून आपलें कार्ड ठेवून वर्षा घरांतून जाऊं लागते, तोंच उल्का आपल्या दोन्ही मुलांना घेऊन घरांत शिरते. दोन्ही मैत्रिणींची पुष्कळ वर्षांनीं भेट झाल्यामुळें त्यांच्या प्रेमाला पूर येतो. दोघी आपल्या बालपणाच्या जुन्या आठवणी मनमोकळेपणानें बोलतात. पोट धरधरून हंसतात आणि बोलतां बोलतां पूर्वीचें आनंदी आयुष्य आणि आतांचें दुःखी आयुष्य ह्यांची जाणीव होतांच, उल्का हंसतां हंसतां एकदम ढसढसा रडूं लागते. प्रभावी अभिनयाचा तो उच्चांक असतो.

त्यानंतर उल्काचे फॅमिली डॉक्टर आणि एक उदयोन्मुख नाटककार प्रकाश हे दोघेजण उल्कानें प्रकाशच्या नव्या नाटकांत काम करावें अशी विनंति करण्यासाठीं तिच्याकडे येतात. उल्का ही लहानपणीं उत्तम गायिका आणि नटी होती. पण दिवाकर देशमुखाशीं विवाह झाल्यानंतर तिच्या सर्व गुणांची माती झालेली असते.

पण प्रकाशनें रंगभूमीवरील जीवनाचें जें अत्यंत आकर्षक चित्र तिच्यापुढें उभें केलेलें असतें, त्यामुळें ती क्षणमात्र आपलें देहभान विसरते आणि दहा वर्षांपूर्वीची तेजस्वी ' उल्का ' जिवंत होऊन तिच्या मुखांतून गाऊं लागते.

**ही गुलामगिरीची तोडुनि बेडी**
**मार भरारी मार,**
**पांखरा, मार भरारी मार !**
**स्वातंत्र्याची पुढें पसरली**
**दुनिया अपरंपार !**
**जुलमशाहीचा अन्यायाचा**
**मावळला अंधार !**

त्याच वेळीं तिचा नवरा दिवाकर देशमुख प्रविष्ट होतो. एऱ्हवीं गोगलगाईप्रमाणें गरीब असलेली आपली बायको घरांत आनंदी मनमोकळेपणानें गात असलेली बघून तो आश्चर्यचकित होतो. उल्कानें नाटकांत काम करावें ही प्रकाशची सूचना तो धुडकावून लावतो.

**दिवाकर :** माझ्या बायकोला मी नाटकांत काम करूं देईन असं वाटलं कसं

तुम्हांला ? समजतां कोण तुम्ही तिला ? भाई दीनानाथासारख्या प्रसिद्ध किसान पुढाऱ्याची मुलगी आहे ती–माझ्यासारख्या एका घरंदाज आणि अब्रूदार गृहस्थाची धर्मपत्नी आहे ती–तोंडाला रंग फांसून वाटेल त्या उडाणटप्पूबरोबर ती नाचूं लागली तर जग काय म्हणेल, समाज काय म्हणेल, लोक काय म्हणतील ?

प्रकाश नि डॉक्टर निराश होऊन निघून जातात. उल्का विपण्ण होऊन घरांत जाते.

**दिवाकर :** म्हणे नाटकांत काम करा ! लग्नाच्या बायका जशा रस्त्यावरच पडल्या आहेत ! ( वळून वर्षाकडे पाहतो. सस्मित मुद्रेनें मृदु आवाजांत) कोण वर्षा—

**वर्षा :** (रागानें) लग्नाच्या बायका वाटेवर पडलेल्या नसतात आणि बिनलग्नाच्या बायका काय वाटेवर पडलेल्या असतात ?

दिवाकराच्या छातींत धस्स होतें. कारण वर्षा ज्या शाळेंत शिक्षकीण असते त्या शाळेच्या पत्त्यावर दिवाकरांनीं तिला अनेक प्रेमपत्रें पाठविलेलीं असतात. पण त्याच्या एकाहि पत्राला तिनें उत्तर दिलें नसल्यानें तिच्या शाळेच्या मुख्याध्यापिकेला त्यानें तिच्याविरुद्ध वाटेल तीं निनांवी पत्रें पाठविलेलीं असतात. तो सारा पत्रांचा गठ्ठा उल्केला दाखविण्यासाठीं वर्षा त्या दिवशीं तिच्या घरीं आलेली असते. आपलें सर्व रहस्य आतां आपल्या पत्नीला समजणार हें पाहून दिवाकराच्या छातींत भीतीची धडकी भरते.

वर्षानें दिलेल्या दिवाकराच्या प्रेमपत्रांचा गठ्ठा आपल्या नवऱ्याच्या तोंडासमोर धरून उल्का त्याला कडाडून सांगते कीं, ' आतां आपण प्रकाशच्या नाटकांत काम करणार ! '

**दिवाकर :** जोंपर्यंत तूं माझी बायको आहेस, तोंपर्यंत माझ्या परवानगीवांचून मी तुला कांहीं करूं देणार नाहीं — कुठें जाऊं देणार नाहीं —

**उल्का :** या घरांतलें तुमचें राज्य मवाशींच संपलें ! (पत्रांचा गठ्ठा दाखवून) या ॲटम बॉंबनें तुमची नवरेशाही पार आभाळांत उडाली.

**दिवाकर :** कसली मस्ती चढली आहे तुला आज ?

**उल्का :** ही मस्ती माझ्या रक्तांत आहे. भांडवलशाहीविरुद्ध बंड पुकारणाऱ्या बापाची मी मुलगी आहें. कायदेभंगाच्या लढाईत मी आघाडीवर होतें. तुरुंगांतून बाहेर पडलें तेव्हां मी वाघीण होतें. प्रेमाचें नि खोट्या दहशतवादी राजकारणाचें जाळें माझ्याभोंवतीं फेकून तुम्ही आपल्या संसारांतल्या गोठ्यांतली मला गाय करून टाकलीत. आज मी जिवंत झालें. स्वतंत्र झालें. सात वर्षें तुम्ही दडपून ठेवलेली माझी कला, माझी प्रतिभा, माझें सामर्थ्य आतां मी जगाला दाखवणार नि थक्क करून सोडणार !

दिवाकर तिला मारावयाला तिच्या अंगावर काठी घेऊन धांवतो, तोंच दाराची घंटा वाजते. उल्का दार उघडते तोंच तिचे वडील दीनानाथ, सिनेमानट भाऊ आणि

वडिलांचे मित्र शालिग्राम प्रवेश करतात. तेव्हां आपण आणि आपली पत्नी हें एक अत्यंत प्रेमळ आणि आदर्श जोडपें आहे असें नाटक दिवाकराला आपल्या सासऱ्या-पुढें तडकाफडकी करणें भागच पडतें. येथेंच पहिला अंक संपतो. नि प्रेक्षकांना दिवाकर नि उल्का ह्यांच्या जीवनावर तरंगत असलेल्या भीषण नाट्याच्या धूसर छायेचा पहिला साक्षात्कार होतो.

प्रकाशच्या नाटकांत उल्का काम करूं लागते आणि तिला पराकाष्ठेची लोक-प्रियता प्राप्त होते. पैसा नि कीर्ति ह्यांचा जसा लाभ तिला होऊं लागतो, तसा दिवा-कराला तिचा दुःस्वास नि द्वेष वाटूं लागतो. ती प्रकाशच्या प्रेमांत पडलेली आहे असें तो तिच्या भावाला सांगून त्याचें मन दूषित करतो. एवढ्यांत उल्काची धाकटी मुलगी पुष्पा अपस्माराच्या झटक्यानें अकस्मात् मरण पावते. तेव्हां प्रकाशनें आणि उल्कानें तिला विष देऊन ठार मारलें असलें पाहिजे अशा तऱ्हेचा धादांत खोटा आणि खोडसाळ आरोप त्या दोघांवर करून तो घराबाहेर चालता होतो.

रात्रीं दारू पिऊन बेहोष झालेल्या स्थितींत पूर्वायुष्यांतील एका रखेलीला घेऊन तो घरीं येतो आणि तिच्या समवेत आपल्या पत्नीसमोर बीभत्स धिंगाणे घालून तो तिला बेदम मारतो. येथून तिसऱ्या अंकाला प्रारंभ होतो.

आतां आपल्या घरांतून आणि संसारांतून बाहेर पडल्यावांचून आपल्याला गत्यंतर नाहीं असें उल्काला पुरतेपणीं कळून चुकतें. त्याप्रमाणें ती त्या तयारीला लागते. तिचा तो रुद्रावतार पाहून दिवाकर गर्भगळित होतो आणि तिचे पाय धरतो.

**दिवाकर:** फार मोठा गुन्हा केला आहे मी! देवघरांत व्यभिचार केला. गटारांत गंगा ओतली. अमृतांत शेण कालवलें. मृत्यूवांचून मला मुक्ति नाहीं. जगांतून बाहेर जाण्यापूर्वी मला तुझ्याजवळ एकच मागायचें आहे—

**उल्का:** आयुष्याचें साऱ्या नाटक केलेंत—आतां मरणाचें तरी नाटक करूं नका—

**दिवाकर:** पश्चात्तापानें जळून मी खाक झालों आहें. अंतर्बाह्य बदलून गेलों आहें. मनांत आणशील तर अजून तूं मला नवीन जीवन देशील.

**उल्का:** तें शक्य नाहीं. कारण व्यसनानें आणि व्यभिचारानें तुमच्या माणुस-कीची राखरांगोळी झाली आहे. त्या रात्रीं मुलाच्या मरणानें विव्हळ झालेल्या मातेच्या दुःखाची आणि शोकाची तुम्ही विटंबना केलीत आणि पित्याच्या वात्सल्याला डांबर फासलेंत, त्याच वेळीं मी ओळखलें कीं हा माणूस नाहीं-उलट्या काळजाचा राक्षस आहे—

**दिवाकर:** एक वेळ आणखी क्षमा कर—

**उल्का:** नाहीं, या गुन्ह्याला जगांत क्षमा नाहीं—जें सडलेलें आहे तें तोडलेंच पाहिजे—जें किडलेलें आहे तें कापलेंच पाहिजे. जगांत असे कांहीं गुन्हे असतात कीं

त्यांना क्षमा नसते—

त्याबरोबर दिवाकर एकदम सापाप्रमाणें उलटतो. आणि तिच्यावर भडकून उठतो.

**दिवाकर** : तुला या घरांतून मी सुखासुखीं जाऊं देणार नाहीं. किती केलें तरी मी तुझा नवरा आहें. तूं मला सोडून या घरांतून चालती झालीस तर जगांत माझी केवढी बेअब्रू होईल !

**उल्का** : तुम्हीं आजपर्यंत बाहेर काय वाटेल तें केलेंत, त्यानें तुमची अब्रू गेली नाहीं. आणि मी घरांतून बाहेर पडलें तर मात्र तुमची बेअब्रू होईल होय ? पुरुष जातीची अब्रू सांभाळण्याची जबाबदारी समाजानें सर्वस्वी स्त्रियांच्या डोक्यावर जी लादलेली आहे, ती आम्हांला आतां झुगारून द्यायची आहे. नवरेशाही ही भांडवल-शाहीपेक्षां शंभर पटीनें भयंकर आहे. नवरेशाहीचा निःपात झाल्याखेरीज स्त्रिया स्वतंत्र होणार नाहींत, आणि स्त्रिया स्वतंत्र झाल्याखेरीज जगहि स्वतंत्र होणार नाहीं.

उल्का आतां यापुढें आपल्या घरांत रहाणें शक्य नाहीं अशी जेव्हां दिवा-कराची खात्री पटते तेव्हां तो तिला बजावतो कीं, "एका अटीवर मी तुला माझ्या घरांतून जाऊं देईन. ती अट ही कीं प्रकाशचा संबंध यापुढें तूं सोडला पाहिजेस !"

**उल्का** : मी प्रकाशच्या घरांतच मुळीं राहायला जाणार आहें.

**दिवाकर** : ( भयंकर संतापून ) ढोंगी, कुलटा, बदमाष, बोल तुझें प्रकाशवर प्रेम आहे कीं नाहीं !

**उल्का** : प्रकाशवर प्रेम करायचें नाहीं तर मग काय तुमच्यावर प्रेम करायचें ? स्त्रीनें प्रेम करावें असा कोणता गुण तुमच्या अंगांत आहे ?

**दिवाकर** : जा, खुशाल त्याच्यावर प्रेम कर अन् त्याच्याशीं लग्नहि कर—

**उल्का** : ज्या माणसावर आपलें प्रेम आहे त्याच्याशीं आपल्याला लग्न करतां येत नाहीं हीच तर हिंदु स्त्रियांच्या आयुष्याची शोककथा आहे. एवढ्यासाठींच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे आहे आणि काडीमोडीचा कायदाहि पण हवा आहे.

**दिवाकर** : काडीमोड मिळते आहे तुम्हांला ! केवळ प्रकाशची रखेली म्हणूनच तुला त्याच्याजवळ रहावें लागेल —

उल्का मुलाला घेऊन घराबाहेर पडूं लागते. तसा दिवाकर आपल्या मुलाला तिच्यापासून हिसकावून घेतो आणि काठी घेऊन तिच्या अंगावर धांवतो, तोंच उल्काचे वडील दीनानाथ प्रवेश करतात. प्रकाशच्या नादानें आपली बायको आपल्याला सोडून चालली आहे असा आरोप उल्कावर दिवाकर दीनानाथाकडे करतो. पण वर्षाशीं आपलें नुकतेंच लग्न झालें आहे, हें रहस्य प्रकाश जेव्हां प्रकट करतो, तेव्हां दिवाकर सपशेल कोसळतो. तो दीनानाथाच्या पाया पडून त्यांची क्षमा मागतो.

**दीनानाथ :** असल्या बायकोच्या पातिव्रत्याचा संशय घेणारा पुरुष तिचा नवरा होण्यास नालायक आहे. (उल्कास) बाहेर हो या घरांतून आतां. पत्नी म्हणून तुझें कार्य संपलें. संसाराच्या मोहांत पुन्हां पडूं नकोस–राष्ट्राचा संसार कर!

बापाचा आशीर्वाद घेऊन उल्का आपल्या संसारांतून बाहेर पडते. येथें नाटक संपतें.

प्रारंभापासून तों शेवटपर्यंत एकापेक्षांहि एक नाट्यपूर्ण घटना, प्रभावी स्वभाव-परिपोष आणि थरारून टाकणारे संवाद ह्यामुळें हें नाटक एकसारखें चढत जातें. प्रेक्षकांच्या हृदयाला पीळ पाडणारे कितीतरी करुण प्रसंग ह्या नाटकांत आहेत. दिवाकराची भूमिका नटश्रेष्ठ नानासाहेब फाटक आणि उल्केची भूमिका नटश्रेष्ठ बापुराव माने ह्यांनीं आपल्या अविस्मरणीय अभिनयांनीं मराठी रंगभूमीवर अमर करून ठेवलेली आहे. नाट्यतंत्र, स्वभावचित्रण आणि संवाद या तिन्ही दृष्टींनीं माझ्या सर्व नाटकांमध्यें मला हें नाटक सरस वाटतें.

पुन्हां असें नाटक मला लिहितां येईल किंवा नाहीं कोणास ठाऊक?

# ४६

# लोकमान्यांचें पुण्यस्मरण

१९४६ च्या २८ जुलैच्या ' नवयुग '-च्या अंकांत मी लोकमान्य टिळकांच्या सव्वीसाव्या पुण्यतिथीला जो एक स्मरण-लेख लिहिला, तो त्या काळीं लोकांना अतिशय आवडला. अनेकांचीं अभिनंदनपर पत्रें आलीं. म्हणून आजकालच्या वाचकांसाठीं तो लेख माझ्या चरित्रांत मी अत्यंत अभिमानानें पुनर्मुद्रित करीत आहें.

"लोकमान्य टिळकांना जाऊन आतां सव्वीस वर्षें पूर्ण होतात. आम्हीं ज्या काळांत जन्माला आलों, त्या काळांत टिळकांपेक्षां मोठा पुरुष ह्या देशांत दुसरा कोणीच नव्हता. महाराष्ट्रांतल्या ह्या महापुरुषाचें नांव त्या वेळीं साऱ्या हिंदुस्थानमध्यें दुमदुमत होतें. अहो, महाराष्ट्रांतल्या प्रत्येक माणसाला टिळकांच्या नांवाचा केवढा अभिमान वाटत होता म्हणतां ? स्वातंत्र्यासाठीं आपल्या सर्वस्वाची आहुति देणाऱ्या श्री शिवरायाच्या महाराष्ट्राची ती महान परंपरा पुन्हां टिळकांनीं सुरू केली. आणि स्वातंत्र्याच्या लढ्याचें नेतृत्व महाराष्ट्राला मिळवून दिलें.

" मराठ्यांचें राज्य बुडाल्यानंतर हिंदुस्थानच्या इतिहासांत एवढें मानाचें स्थान

महाराष्ट्राला पहिल्या प्रथम मिळालें. क्रांतिकारक चैतन्याची प्रचंड लाट त्या वेळीं महाराष्ट्रांत उसळली. आणि त्या लाटांचे कंप साऱ्या देशामध्यें उमटले. दर मंगळवारीं पुण्यामध्यें टिळकांच्या ' केसरी 'नें आरोळी मारली कीं देशांतल्या साऱ्या स्वातंत्र्य प्रेमी तरुणांचीं काळजें हर्षानें नाचूं लागत. तर त्या गर्जनेमुळें तिकडे लंडनमध्यें ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या छातीमध्यें भीतीचा थरकांप उडत असे. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' ही भाषा बोलायला देशाला प्रथम टिळकांनीं शिकविलें. आणि त्या हक्कासाठीं ब्रिटिश सरकारशीं छातीठोकपणें टक्कर देणाऱ्या निर्भय कार्यकर्त्यांची आघाडी कॉंग्रेसमध्यें प्रथम टिळकांनीं उघडली. टिळकांच्या या लोकोत्तर कर्तृत्वामुळें देशाच्या राजकारणांत पुण्याला आणि महाराष्ट्राला त्या वेळीं केवढें वैभव प्राप्त झालेलें होतें ! साऱ्या हिंदुस्थानचें नव्हे साऱ्या जगाचें लक्ष त्यावेळीं पुण्यामधल्या या काळ्या सांवळ्या चित्पावन ब्राह्मणाकडे लागून राहिलेलें होतें !

" श्रीशिवछत्रपति आणि थोरले बाजीराव ह्यांच्यानंतर दोनतीनशें वर्षे या आपल्या महाराष्ट्रामध्यें महापुरुष असा निर्माण झालाच नव्हता. या दरम्यानच्या काळांत महाराष्ट्र हा नांवानेच नुसता ' महा ' राहिला होता. आणि लघु प्रकृतीचीं आणि आकृतीचीं माणसें त्याच्या मोठेपणाचें वाटोळें करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें करीत होतीं. तें काम अठराशें अठरा सालीं बाळाजीपंत नातूंनीं पूर्ण केलें. आणि महा राष्ट्राचें स्वातंत्र्य धुळीला मिळविलें. त्यानंतर इंग्रजी भाषेची आणि विचारांची राजवट महाराष्ट्रांत सर्वत्र सुरू झाली. साहेबी संस्कृतीच्या नि ज्ञानाच्या नव्या नवलाईनें महाराष्ट्राच्या पहिल्या दोन पिढ्यांची बुद्धि अगदीं दिपून गेली. त्यामुळें स्वाभिमानशून्यतेचें एक जाड आणि अमंगळ शेवाळेंच जणूं कांहीं महाराष्ट्राच्या बुद्धीवर येऊन बसल्यासारखें झालें.

" ती बौद्धिक ग्लानि आणि मानसिक सुस्ती झुगारून देऊन तिसरी पिढी मात्र खडबडून जागी झाली. आपल्या पायावर उभी राहून ' देशाच्या दुःस्थिती 'चा विचार करूं लागली. या तिसऱ्या पिढीस महाराष्ट्रामध्यें महापुरुषांचें एक भलें मोठें पीकच जणुं काहीं उगवलें. न्यायमूर्ति रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्यायमूर्ती तेलंग, प्रिन्सिपल आगरकर, लोकमान्य टिळक, नामदार गोखले, अशा एकाहिपेक्षां एक कर्तृत्वानें, बुद्धिमत्तेनें आणि विद्वत्तेनें जबरदस्त असलेलीं माणसें त्या वेळीं महाराष्ट्रांत जन्माला आलीं. हीं माणसें कसलीं ? हे एकेक राक्षस होते राक्षस ! इकडचें जग तिकडे फेकून देण्याचें सामर्थ्य होतें एकेकाच्या मनगटांत ! अलौकिक बुद्धीचा एवढा श्रीमंत हंगाम महाराष्ट्रांत पूर्वी कधींच पिकलेला नव्हता. तथापि त्या काळांतल्या सर्व महापुरुषांपेक्षां टिळकांच्या बुद्धिमत्तेचा पल्ला आणि पराक्रमाची झेप फारच मोठी होती. म्हणून साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष महाराष्ट्राकडे एकटे टिळकच खेचूं शकले. महाराष्ट्र हें महान् राष्ट्र आहे, हें शिवप्रभूनंतर आणि थोरल्या बाजीरावानंतर

लोकमान्य टिळकांनीं पुन्हां सिद्ध करून दाखविलें.

"टिळकांच्या भाविक आख्यायिकांनीं आणि दैवी दंतकथांनीं दुमदुमलेल्या काळामध्यें आमची भाग्यशाली पिढी जन्माला आली. आम्हांला कळूं लागावयाच्या आधींच राम आणि कृष्णाप्रमाणें टिळक हे देशाच्या देवघरामध्यें जाऊन बसलेले होते. घरोघर 'लाल, बाल नि पाल' ह्या स्वातंत्र्याच्या नव्या दत्तात्रेयांच्या तसबिरी लटकत होत्या. हिंदमातेच्या गळ्यांत लोंबणाऱ्या रत्नमालेच्या तळवटीं 'बा. गं. टि.' हा कौस्तुभमणि मोठ्या दिमाखानें तळपत होता. त्या वेळच्या सार्वजनिक गणेशोत्सवांत तर खुद्द गजाननापेक्षां टिळकांच्या नांवाचाच जास्त जयजयकार होत होता. 'हिंदमाता आणि तिचा 'बाळ' ह्यावांचून त्या वेळच्या कवींना कविता रचायला दुसरा विषयच मुळीं नव्हता. 'लोकमान्य टिळक महाराज की जय!' ही जागृत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याची एक आरोळीच होऊन बसली होती.

"फार वर्षांनीं महाराष्ट्राला एवढा लोकोत्तर पुढारी लाभलेला होता. म्हणून त्याला कुठें ठेवूं नि कुठें नको ठेवूं, त्याचे कोणकोणते गुण किती किती अन् कसे कमे आठवूं असें महाराष्ट्राला होऊन गेलेलें होतें, टिळकांचें स्वरूप, टिळकांचें चारित्र्य, टिळकांचें कर्तृत्व, टिळकांची विद्वत्ता, टिळकांची निर्भयता आणि टिळकांचा पराक्रम ह्यावांचून त्या वेळीं मराठी जनतेला बोलावयाला दुसरा विषय नव्हता. त्यांच्या नांवाभोंवतीं आणि मूर्तीभोवती अद्‌भुततेचें दैवी वर्तुळ चमकत असलेलें जनतेला त्या वेळीं दिसूं लागलें. टिळकांची पगडी, टिळकांचा सोटा, टिळकांची सुपारी, टिळकांचा वाडा, टिळकांचा छापखाना, टिळकांचा 'केसरी' एवढेंच काय पण टिळकांच्या बैठकींतलीं किंवा त्यांच्या आजूबाजूला वावरणारीं सारीं लहानसान माणसें सुद्धां त्यावेळीं महाराष्ट्राला अद्‌भुतरम्य वाटूं लागलीं.

"अहो, टिळकांच्या हयातींत अडाणी शाहिरानें त्यांच्यावर पोवाडे की हो रचले! पुण्याच्या शनिवार वाड्यासमोर जुन्या मंडइत त्यांचा एक पोवाडा मीं किती वेळ तरी ऐकला होता, त्या पोवाड्याचा आशय असा:

"म्हणे, इंग्लंडच्या राजाकडे साता समुद्रापलीकडच्या एका राजाचा एकदां एक 'कागुद' आला. हा 'कागुद' जो वाचून दाखवील त्याला जगाचें म्हणे राज्य बक्षिस द्यावयाचें होतें. इंग्लंडच्या राजानें हा 'कागुद' आपल्या दरबारांतल्या मोठमोठ्या उमरावांना नि विद्वानांना वाचून दाखवायला सांगितला. पण त्यांतलें एक अक्षर देखील कोणाला वाचतां येईना! त्यामुळें इंग्लंडचा राजा अगदीं हवालदिल होऊन गेला. जगाचें राज्य आतां आपल्या हातून जाणार असें त्याला भय वाटलें. इतक्यांत त्याला कोणी सांगितलें कीं तो 'कागुद' वाचून दाखवणारा एकच माणूस जगांत आहे. आणि तो पुण्यांत रहातो. त्याबरोबर राजाला अतिशय आनंद झाला. आणि त्यानें ताबडतोब टिळकांना पुण्याच्या पत्त्यावर तांतडीचें आमंत्रण पाठविलें.

आवतान आलं
    पुन्याच्या बामनाला
बामन पगडी
    घालुनशान उठला.
म्हनला जाऊन येतो
    जरा इलायतेल
गेला पाच्छायच्या
    दरबाराला
पाच्छानें कागुद
    हातीं त्याच्या दिला
म्हनला वाचून दाव रे
    बामना याला !
टिळकानीं कागुद
    हातामंदि घेतला
अन् मनांत धांवा
    शिवबांचा केला
शिवबा, आतां तूंच रे
    आम्हां राखनेवाला
मग कागुद समोर
    त्यांनी धरला
अन् असा घडा घडा
  असा घडा घडा
    वाचून दावला !
— जि रे — जी — जि रे — जी —

" अशी सूरभरणी सुरू करतांच डफावर कडाडून थाप मारून एका पायावर शाहीर जेव्हां गिरकी घेई, तेव्हां भोंवतालचे भाविक नि अडाणी श्रोते टाळ्यांचा कडकडाट करीत असत. त्यामध्यें एकादा दुसरा पांढरपेशा सुशिक्षित श्रोता उभा असला, तर अडाणी लोकांची टिळकांवरील ती आंधळी भक्ति बघून त्याच्या डोळ्यांमध्यें अश्रू उभे रहात आणि त्याच्या पायापासून डोक्यापर्यंत हर्षाचा थरथरून कांटा उभा राही. हा अनुभव तेथें उभा राहून मी स्वतः अनेक वेळां घेतलेला आहे.

" टिळकांच्या लेखनामुळें, भाषणामुळें आणि राजकीय चळवळींमुळें महाराष्ट्रामध्यें त्या वेळीं अद्भुतरम्यतेचें एक विलक्षण वातावरण पसरलेलें होतें. हरि नारायण

आपट्यांच्या ऐतिहासिक शिवकालीन कादंबऱ्या त्या वेळीं अतिशयच लोकप्रिय होत्या. त्या कादंबऱ्यांनीं अप्रत्यक्षपणें या अद्भुतरम्यतेमध्यें आणखीनच भर घालून ठेवली. गोविंद कवींच्या काव्यांनीं, सावरकरांच्या पोवाड्यांनीं, सन्मित्रसमाज मेळ्याच्या गाण्यांनीं आणि खाडिलकरांच्या पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांनीं महाराष्ट्रांतल्या या अद्भुतरम्य भावनेमध्यें इतकी मस्ती आणि धुंदी निर्माण करून ठेवली कीं, त्या वेळीं महाराष्ट्रामध्यें प्रत्येक जाणत्या आणि नेणत्या माणसाला आपण एखाद्या कादंबरीच्या किंवा नाटकाच्या सृष्टीमधूनच वावरत आहोंत किंवा काय असें वाटत असे.

"रोज कोणा तरी गोऱ्या अधिकाऱ्याचा कुठें तरी खून होत असे. कोणीतरी फांसावर किंवा तुरुंगांत जात असे. असें कांहीं घडलें कीं, डोकीं भडकून जात आणि रक्त उसळ्या मारूं लागे. बॉंब ही काय वस्तु आहे हें त्या वेळींच प्रथम लोकांना कळलें. अमुकजण अमक्या ठिकाणीं बॉंब तयार करीत आहे, तमुक जणानें तमक्या ठिकाणीं पिस्तुल लपवून ठेवलें आहे, फलाण्याच्या मागें सी. आय. डी. चीं माणसें फिरताहेत, अशा गोष्टी एकसारख्या त्या वेळीं कानावर येत. कोण गुप्तपोलिसांत आहे, अन् कोण नाहीं हें कळणें त्या वेळीं अशक्य असल्यानें, महाराष्ट्रांतल्या प्रत्येक माणसाच्या मनामध्यें एक गोड अस्वस्थता निर्माण झालेली होती.

"घरोघर जो तो दारें बंद करून देशांतल्या राजकीय चळवळीबद्दल कानगोष्टी करीत होता. रँड साहेबांचा खून, चाफेकर बंधूंचा पराक्रम, खुन्या मुरलीधराजवळ साडेनवाच्या तोफेच्या धडाक्यांत त्यांनीं केलेला फितुर द्रविडाचा खून, नाशिक येथें भर थिएटरांत जॅक्सन साहेबांना गोळी घालणारा कान्हेरे आणि हिंदी क्रांतीची लाट विलायतेपर्यंत पोहोंचविणारे सावरकर यांच्याखेरीज बोलावयाला महाराष्ट्राला दुसरा विषयच नव्हता. या साहसांचा किंवा अत्याचारांचा आणि टिळकांचा वस्तुतः कांहींच संबंध नव्हता. तथापि महाराष्ट्रांत त्या वेळीं उठलेल्या क्रांतिकारक तरुणांचें स्फूर्तिदैवत टिळकच आहेत, असें जनता मानीत असे. खरोखर त्यावेळीं महाराष्ट्रांत जन्माला येणें हें एक भाग्य होतें, भाग्य ! !

"१९०८ सालीं टिळकांना जेव्हां सहा वर्षांची शिक्षा झाली; तेव्हां ज्याला दुःखाचा जबर धक्का बसला नाहीं असा महाराष्ट्रांत त्या वेळीं एकहि माणूस नव्हता. टिळकाच्या या शिक्षेचें सुतक ज्यानें पाळलें नाहीं असें एकहि घर त्या वेळीं महाराष्ट्रांत नसेल. हरताळ पाळणें किंवा संप पुकारणें हें शास्त्र त्या वेळीं फारसें कोणाला माहीत नव्हतें. विद्यार्थ्यांमध्यें त्या वेळीं कसलीहि संघटना नव्हती. तथापि टिळकांना ज्या दिवशीं ती शिक्षा झाली त्या दिवशीं मुलें शाळेंत गेलीं नाहींत. विद्यार्थी कॉलेजांत गेले नाहींत. तेवढ्यासाठीं दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मास्तरांच्या छड्या खाल्ल्या आणि कांहींनीं तर शाळाकॉलेजमधून आपली कायमची हकालपट्टी करून घेतली !

" टिळकांच्या सहा वर्षांच्या शिक्षेच्या मुदतीमध्यें कोणी साखर खायची सोडली. कोणी चहा सोडला. कोणी अनवाणी पायांनीं चालवयाचें ठरविलें. आणि कोणी जमिनीवर नुसती घोंगडी अंथरून झोंपण्याची प्रतिज्ञा केली ! टिळकांवर महाराष्ट्राचें जेवढें प्रेम होतें, तेवढें अलीकडच्या काळामध्यें दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यावर महाराष्ट्रानें केलेलें नाहीं. राम वनवासामध्यें गेल्यानंतर भरत ज्याप्रमाणें चौदा वर्षे त्यांच्या पादुका पूजित होता, त्याप्रमाणें टिळक सहा वर्षे मंडालेच्या तुरुंगामध्यें असतांना महाराष्ट्रानें टिळकभक्तीच्या पादुका अत्यंत भक्तिभावानें उराशीं धरून ठेविल्या आणि जतन केल्या,

" १७ जून १९१४ रोजीं ऐन मध्यरात्रीं सरकारनें टिळकांना पुण्यांत आणून त्यांच्या गायकवाड वाड्यामध्यें सोडलें. एकाद्या कादंबरीमध्यें किंवा एकाद्या नाटकांत घडावी तशीच ही गोष्ट घडली. मोठ्या माणसांचीं चरित्रें हीं एकाद्या थोर नाटककारानें लिहिलेल्या उत्कृष्ट नाटकाप्रमाणें आपोआप व्यवस्थितपणें घडलीं जातात, असें ऑस्कर वाईल्डनें येशू ख्रिस्ताच्या चरित्राबद्दल जें म्हटलें आहे, तें शिवाजीमहाराजांच्या आणि टिळकांच्या चरित्रांनाहि लागू पडतें. टिळक ज्या दिवशीं सुटून घरीं आले त्या वेळीं मी पुण्यांतच होतों. तोंपर्यंत टिळकांना आम्हीं प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. तेव्हां टिळकांचें प्रत्यक्ष दर्शन घेणें आणि त्यांना डोळे भरून पाहणें हें पुण्यांतील त्या वेळच्या आम्हां विद्यार्थ्यांना एक वेडच लागून राहिलें होतें.

" गायकवाडवाड्यामध्यें प्रवेश करण्याची आमची छातीच नव्हती. वाड्याबाहेर गुप्तपोलिसांचा पहारा असतो. आंत जो कोणी जाईल त्याचें नांव टिपून घेतात, अशाहि बातम्या त्या वेळीं पुष्कळच पसरल्या होत्या. गायकवाडवाड्यावरून इकडून तिकडे उगाच फेऱ्या मारतांना आणि कुठें एकाद्या उघड्या खिडकीमधून टिळकांचा चेहरा आपल्या नजरेस पडेल कीं काय, अशा भावनेनें वर पाहतांना त्या वेळीं मनांत अशा कांहीं गोड उकळ्या फुटत असत, तें कांहीं सांगतां येत नाहीं.

" त्यानंतर पुढच्या चार-पांच वर्षांमध्यें टिळकांना आम्हीं अनेक वेळां पाहिलें. जवळून पाहिलें, लांबून पाहिलें, अगदीं त्यांच्या शेजारीं बसून पाहिलें एकदां तर त्यांच्या उपरण्याचें एक मागलें टोंक क्षणभर मीं स्वतः हातांत धरून देखील पाहिलें ! त्यांचीं अनेक व्याख्यानें ऐकलीं. त्यांच्या मिरवणुकींत सामील झालों. किंबहुना, राजकीय कीर्तीच्या अगदीं कळसाला ते पोहोंचले असतांना त्यांचें सर्व वैभव आणि थाटमाट आम्हांला मनसोक्त पाहावयास मिळाला. टिळकांचें वक्तृत्व म्हणजे खरोखर सिंहाची गर्जना होती. टिळक बोलत नसत. ते गर्जत असत. ते गडगडत असत. आवेशाच्या भरांत उघडझांप करणारे त्यांचे ते रागीट डोळे, त्यांच्या ओंठावरच्या हलणाऱ्या त्या करड्या मिशा आणि भावना अनावर झाल्यामुळें थरथरणारा त्यांचा तो जबरदस्त जबडा बघून मला नेहमीं 'केसरी'वरच्या त्या सिंहाची

आठवण होई.

" टिळकांच्या चेहऱ्यामध्यें आणि सिंहाच्या चेहऱ्यामध्यें कांहींतरी साम्य असल्याचा भास अजूनहि मला होतो. टिळकांचें एकेक वाक्य कानीं पडलें म्हणजे काळजावर कोणीतरी घणाचे घाव घालतें आहे, असें वाटे. दण-दण-दण! ऐकणारा बसल्या जागेवर अगदीं हबकून जाई! इकडून तिकडे नुसती हलण्याची सुद्धां त्याची छाती नसे. छे, छे छे, महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत एवढा जबर-दस्त माणूस पुन्हां पहावयास मिळणार नाहीं!

" इंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांना निरोप द्यावयाला पुण्याच्या मंडईत जी प्रचंड सभा भरलेली होती, ती मीं पाहिलेली आहे. इंग्लंडहून परत आल्यानंतर पुण्याच्या रस्त्यामधून त्यांची जी थाटामाटांत मिरवणूक निघाली ती मीं बघितली आहे. गोखले वारले तेव्हां त्यांच्या स्मशानयात्रेसाठीं मुद्दाम सिंहगडावरून येऊन ओंकारेश्वराच्या स्मशानामध्यें त्यांनीं केलेलें तें हृदयस्पर्शी भाषण मीं ऐकलेलें आहे. गायकवाडवाड्यांत त्यांच्या सत्काराचे अनेक निरनिराळे लहानमोठे प्रसंग मीं दाटीवाटींत बसून अवलोकिले आहेत. आणि—शेवटीं—मुंबई येथें वीस सालच्या एक ऑगस्ट रोजीं रात्रौ पाऊण वाजतां सरदारगृहांत जेव्हां त्याचें प्राणोत्क्रमण झालें, त्या वेळीं त्या इमारतीसमोर खालीं रस्त्यावरच्या अंधारांत पावसांत भिजत असलेला जो हजारों लोकांचा निस्तब्ध समुदाय उभा होता त्यामध्यें मी एक होतों. आणि त्या पहांटेपासून तों त्या दिवशीं संध्याकाळीं साडेसहाच्या सुमारास चौपाटीच्या वाळवंटावर त्यांच्या देहाला अग्नि-संस्कार मिळेपर्यंत मी त्यांच्यापासून फारसा दूर नव्हतों.

" टिळकांच्या विराट् स्मशानयात्रेमध्यें सारी मुंबई सामील झालेली होती. डोक्यावर धों धों मुसळधार पाऊस पडत असतांना लक्षावधि लोक दुःखानें माना खालीं करून उघड्या डोक्यांनीं त्यांच्यामागून चालले होते. टिळकांची स्मशानयात्रा ज्यानें पाहिलेली आहे, तो तें दृश्य जन्मोजन्म विसरणार नाहीं. त्यांच्या स्मशानयात्रेमध्यें चालण्याचें पुण्य ज्याच्या गांठीं पडलेलें आहे त्याला तें पुण्य दहावीस जन्म तरी खास उपयोगी पडेल!

" ज्या दिवशीं लोकमान्य टिळक वारले त्याच दिवशीं रात्रीं मुंबई येथें महात्मा गांधी यांनीं असहकारितेची घोषणा केली. हा योगायोगहि विलक्षण नाट्यपूर्णच म्हटला पाहिजे. देशाच्या रंगभूमीवरून एक महान् विभूति पडद्याआड जावी आणि दुसऱ्या महान् विभूतीनें त्याच क्षणीं त्या रंगभूमीवर प्रवेश करावा तसें तें झालें. लोकमान्य टिळकांचें कार्य जेथें संपलें तेथें महात्मा गांधींचें कार्य सुरू झालें असें अच्युतराव कोल्हटकर जें म्हणत असत, तें अगदीं खरें आहे. लोकमान्य टिळक जर आज हयात असते तर ते नव्वद वर्षांचे असते ही गोष्ट विसरूनहि आजच्या राजकारणांत त्यांनीं कोणती भूमिका घेतली असती असा वाद निर्माण करणें निरर्थक आहे.

" सबंध रामायण ऐकूनहि सीता ही रामाची कोण हें विचारणें जितकें मूर्खपणाचें आहे तितकेंच टिळकांचें सबंध चरित्र बघून आणि कर्तृत्व ऐकून आज ते राजकारणामध्यें कुठें असते, हें विचारणेंहि मूर्खपणाचें आहे. टिळक आणि गांधी यांचा स्वभावधर्म एकमेकांपासून अगदीं निराळा होता. टिळक हे बुद्धिप्रधान तर गांधी हे भावनाप्रधान ! टिळक हे कर्कश आणि कठोर तर्कपंडित, तर गांधी हे श्रद्धेचा कान ' आंतल्या आवाजा 'कडे देऊन बसलेले ! ब्रिटिशांच्या न्यायावर आणि कायद्यावर टिळकांचा पूर्ण विश्वास तर गांधींचा त्यांच्यावर यत्किंचित्‌हि विश्वास नाहीं. इंग्रजांशीं भांडून आणि झगडून जनतेनें आपले हक्क त्यांच्याकडून हिसकावून घेतले पाहिजेत हें टिळकांचें राजकारण. तर सैतानी सरकारशीं जनतेनें असहकार करून त्याला शरण आणलें पाहिजे हें गांधींचें राजकारण !

" शठं प्रति शाठ्यम् ' या मार्गाचा राजकारणांत अवलंब केला पाहिजे, असें टिळक म्हणत आणि ' सत्य आणि अहिंसा ' यांजवरच राजकारणाचें अधिष्ठान असलें पाहिजे, असें गांधी म्हणतात. पण याचा असा अर्थ मुळींच नव्हे कीं, कसल्याहि असत्याच्या आणि हिंसेच्या साधनानें आपलें साध्य हस्तगत करणें ही गोष्ट टिळकांना पसंत होती. दहशतवादी हिंसेचा मार्ग टिळकांना मुळींच पसंत नव्हता नि गांधींप्रमाणेंच टिळकांच्या राजकारणाचें अधिष्ठानहि शंभर टक्के सत्यावर होतें.

" टिळक आणि गांधी यांच्या विचार करण्याच्या पद्धतींत आणि जीवनविषयक तत्त्वज्ञानांत कितीहि मौलिक फरक असला तरी त्या दोघांच्या राजकारणामध्यें विरोधस्थळापेक्षां साम्यस्थळेंच अधिक होतीं. कॉंग्रेस या संस्थेबद्दल दोघांचीहि निष्ठा जबरदस्त होती. हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्यासाठीं मुसलमानांना वाटेल त्या सवलती दिल्या पाहिजेत, असें गांधींप्रमाणें टिळकांचेंहि मत होतें. टिळकांचें स्वदेशीचें वेड गांधींच्या खादीच्या वेडाइतकेंच जबरदस्त होतें, आणि मद्यपानबंदीबद्दल दोघांनाहि मनांतून विलक्षण आस्था वाटत होती. भगवद्‌गीतेकडे बघण्याचे दोघांचे दृष्टिकोन भिन्न असले तरी दोघांचेंहि जीवन गीतेच्या तत्त्वज्ञानावरच आधारलेलें होतें.

" कमीजास्त फरकानें दोघांमध्यें एवढें साम्य असूनहि संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत ब्रिटिशांशीं एकसारखे झगडत राहावयाचें, कोणत्याहि कारणानें त्यांच्या आहारीं जाऊन किंवा त्यांचा मिंधेपणा पत्करून त्यांच्याशीं तडजोड करायची नाहीं, या बाबतींमध्यें टिळक आणि गांधी यांच्यामध्यें विलक्षण एकवाक्यता होती. मिळेल तें खिशांत टाकायचें आणि पुढच्यासाठीं भांडायचें ही टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेची व्याख्या होती. याचा अर्थ असा नाहीं कीं, टिळकांना असहकार मान्य नव्हता. टिळकांचा ' बहिष्कार ' आणि गांधींचा ' असहकार ' यांच्यांत मूलतः कांहींच फरक नाहीं. सरकारवर ' बहिष्कार ' घातल्यावांचून किंवा सरकारशीं कांहीं बाबतींत ' असहकार ' केल्यावांचून जनतेच्या पदरांत कांहींहि पडणार नाहीं, हें टिळक ओळखून होते.

" पंचवीस वर्षे असहकाराची आणि कायदेभंगाची सतत चळवळ करून ब्रिटिश सरकारच्या या देशांतील राज्यकारभाराची चौकट काँग्रेसनें खिळखिळी करून टाकल्यानंतर आतां टिळकांच्या 'प्रतियोगी सहकारिते'चें तत्त्व तिनें उघडपणें स्वीकारलेलें आहे, यावरून आज टिळक असते तर ते काँग्रेसमध्येंच असते आणि अगदीं गांधीजींच्या बरोबरच असते, ही गोष्ट उघड आहे. म्हणून टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकारणाचे खरे वारसदार महात्मा गांधी आणि काँग्रेस हींच ठरतात."

# ४७

## समाजवादाच्या आघाडीवर—

बेचाळीसच्या क्रांतीचा माझ्या ' नवयुग 'मधून मीं त्या काळीं जेवढा प्रभावी प्रचार केला, तेवढा दुसऱ्या कोणीहि केला नसेल. भूमिगत क्रांतिकारक नेत्यांच्या गौरवार्थ ' नवयुग ' चे अनेक विशेषांक काढून त्यांच्या कार्याचें लोण मीं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोंचविलें. त्याचप्रमाणें समाजवादाचा प्रचार करण्यासाठीं मुंबईत ' शिवाजी पार्क 'वर माझें स्वतःचें स्वतंत्र असें व्यासपीठ मी निर्माण केलें. त्या कामीं अनेक समाजवादी तरुण विद्यार्थ्यांचें मला फारच मोठें सहाय्य मिळालें. या आमच्या आघाडीतर्फे ' शिवाजीपार्क 'वर दर आठवड्याला माझीं एकस्याचींच व्याख्यानें होत असत.

९ ऑगस्ट १९४६ रोजीं शिवाजी पार्कवर पंचवीस हजार श्रोत्यांसमोर ' नऊ ऑगस्टच्या क्रांती 'वर माझें जें अत्यंत प्रभावी व्याख्यान झालें, त्याचा सारांश येथें देण्यासारखा आहे. तत्पूर्वी ' नऊ ऑगस्ट ' या विषयावर जाहीरपणें बोलण्याचें कोणी धाडस केलें नव्हतें.

" क्रांतिकारक ऑगस्टवादी तरुण जनहो,

आजच्या मंगल दिनीं नऊ ऑगस्टचें

पुण्यस्मरण करण्याकरितां आपण येथें जमलेले आहोंत. नऊ ऑगस्टचें माहात्म्य आजच्या तरुणांना सांगायला नको. ज्याला 'नऊ ऑगस्ट' म्हणजे काय हें कळत नाहीं, तो मुळीं तरुणच नाहीं. ज्याला नऊ ऑगस्ट उमगत नाहीं असा म्हातारा जगायला लायकच नाहीं. ( हंशा ). ज्याला 'नऊ ऑगस्ट'चें महत्त्व पटलें नाहीं असा कोणताहि माणूस या देशामध्यें रहाण्याला योग्य नाहीं ! ( प्रचंड टाळ्या ). नऊ ऑगस्टची व्याख्या करतां येत नाहीं. नऊ ऑगस्टचें वर्णन करावयाला माझ्याजवळ शब्द नाहींत. नऊ ऑगस्टचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. नऊ ऑगस्ट म्हणजे नऊ ऑगस्ट ! असा दिवस पूर्वीं या देशांत झालाच नाहीं. ( टाळ्या ).

"त्या दिवसाला आज चार वर्षें पूर्ण होतात. गेल्या चार वर्षांमधल्या प्रत्येक वर्षांमधला प्रत्येक दिवस, प्रत्येक दिवसामधला प्रत्येक तास आणि प्रत्येक तासामधला प्रत्येक क्षण 'नऊ ऑगस्ट'चें स्मरण आपल्या मनामध्यें जागें करीत आहे. नऊ ऑगस्टची क्रांतीची धुंदी अजूनहि तरुणांच्या डोळ्यांवर आहे. नऊ ऑगस्टची बेहोषी, नऊ ऑगस्टची मस्त निशा अद्यापिहि तुमच्या आमच्या डोक्यांत आहे. आज पुन्हां नऊ ऑगस्टचें स्मरण करतांना त्या दिवसाच्या किती तरी आठवणी आमच्या मनांत जाग्या होतात. त्यांपैकीं कांहीं आठवणी प्रिय आहेत, तर कांहीं आठवणी अप्रिय आहेत. प्रिय आठवणींनीं आपण भारून जावें, पण अप्रिय आठवणींनीं मात्र घाबरून जाऊं नये. तरुणांनीं घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं. सबंध आयुष्य त्यांच्यापुढें मोकळें आहे. आज चुकलें तर त्यांना उद्यां सुधारतां येईल. मग भ्यायचें काय कारण आहे ? घाबरायचें काय कारण आहे ? म्हाताऱ्यांनीं घाबरावें, कारण त्यांना 'उद्यां' नाहीं, त्यांना भविष्य नाहीं. ( हंशा ). ज्यांना 'उद्यां' आहे त्यांनीं घाबरूं नये.

"मी घाबरत नाहीं. माझा जन्म तरुणांत गेला आहे. आजहि मी तरुणांतच वावरतों आहें. तुमच्याच डोळ्यांनीं आणि डोक्यांनीं मी जगाकडे पाहतों आहें. माझ्यांत एक मोठा दोष आहे. तो म्हणजे मी लढाऊ माणूस आहें. मी एक सैनिक आहें. आजपर्यंत मी अनेकांशीं भांडलों आहें आणि अनेकांना मीं चांगलं लोळवलं आहे ! (खूप हंशा) कॉंग्रेसमधल्या कांहीं लोकांशीं माझं थोडंसं भांडण आहे; पण त्यांना मला लोळवायचं नाहीं. कॉंग्रेसमधली माझी योग्यता मी जाणतों. कॉंग्रेसमधला मी एक साधा शिपाई गडी आहें. आजचा नऊ ऑगस्ट हा कसा पाळावा याच्या सूचना कॉंग्रेस कचेऱ्यांकडून निघालेल्या आहेत. ( कागद दाखवून ) ह्या माझ्या हातांत आहेत. या सूचनांचा अर्थ मला कळत नाहीं.

"मी आपला शिपाईमाणूस. मला जें दिसतें तें मी बोलणार ! दगडाला मी दगड म्हणणार. वाघाला वाघच म्हणणार, वाघोबाहि म्हणणार नाहीं कीं वाघ्याहि म्हणणार नाहीं. ( हंशा ). आम्हांला असें सांगण्यांत आलें कीं, नऊ ऑगस्ट म्हणे फार गंभीर

दिवस आहे. या दिवशीं चेहरा गंभीर ठेवावा ! ( हंशा ). कारण हा दिवस सुतकाचा आहे. ( प्रचंड हंशा ). म्हणून चेहरा श्राद्धाच्या ब्राह्मणासारखा पडका ठेवावा ! ( हंशा ). या दिवशीं आपण घरांत अंधारांत बसावें. आणि आत्मसंशोधन करावें. हरताळ पाडूं नये. मिरवणुकी काढूं नयेत. आणि फक्त दोन तीन पुढाऱ्यांच्या नांवानेंच म्हणे घोषणा कराव्यात ! ( हंशा ).

"मी खरें सांगतों, असा दिवस मला पाळतां येणार नाहीं. मी नाहीं घरांत बसणार. मी नाहीं मऊ बोलणार. माझा आवाज मऊ नाहीं त्याला मी काय करणार ? मी काय म्हणून आत्मसंशोधन करावें ! मीं कोणाचें घोडें मारलें आहे ? मी काय पाप केलें आहे ? पापी माणसांनीं आत्मसंशोधन करावें. सरकारनें पाहिजे तर आत्मसंशोधन करावें. (हंशा). त्यांनीं या दिवशीं जें करूं नये तें केलें. करायचें कांहीं बाकी ठेवलें नाहीं. म्हणे आज फार मोठ्यानें ओरडावयाचें नाहीं. जास्त किंवा कडक भाषण करावयाचें नाहीं. अगदीं नाजूक आणि मऊ आवाजांत सभेचें सारें काम आटपायचें. हें आपल्या बापाच्यानें कधीं जमावयाचें नाहीं ! ( प्रचंड हंशा ). आम्ही काय म्हणून आज इतकें मऊ मऊ बोलायचें हो ? नऊ ऑगस्ट हा काय 'मऊ' ऑगस्ट आहे, म्हणून आम्ही मऊ बोलायचें ?

"ज्या दिवशीं अखिल हिंदी जनता जागृत होऊन ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं दोन हात करायला आपल्या पायावर उभी राहिली, आधल्या दिवशीं महात्माजींनीं शिकविलेला 'चले जाव'चा महामंत्र आचरणांत आणण्यासाठीं ज्या दिवशीं हिंदी जनतेनें आपली कंबर आवळली, त्या दिवसाची आठवण काय आम्ही मऊ मऊ बोलून साजरी करायची होय ! ( टाळ्या ). छे छे ! कदापिहि नाहीं ! नऊ ऑगस्टची आठवण झाली कीं आमचें रक्त सळसळतें. पायांतलें रक्त डोक्यापर्यंत चढतें. शरीरांतल्या धमन्या टराटर फुगून थडाथड उडूं लागतात. देशांतले तरुण नऊ ऑगस्टला थंड कसे राहणार ? तरुणांच्या रक्ताचा धर्म उसळावयाचा आहे; उचंबळण्याचा आहे ! म्हाताऱ्यांचें रक्त जागच्या जागीं थंड राहूं शकतें. कारण त्यांच्या रक्ताचें आईस्क्रीम झालेलें असतें ! ( हंशा ). त्यांच्या रक्ताचें चक्का-दहीं झालेलें असतें. ( हंशा ).

"तरुणांनीं आपल्या रक्ताला काय असें सांगावें कीं, रक्ता, तूं उसळूं नकोस ! शिरांनो, तुम्ही फुगूं नका ! धमन्यांनो, तुम्ही शांत रहा. स्नायूंनो, तुम्ही कठोर होऊं नका ! छे, छे, कसें शक्य आहे हें ! ( हंशा ). जें कधीं होणेंच शक्य नाहीं, तें कोणी कशाला सांगावें बरें ? कॉंग्रेस कचेरींतील अधिकारी विद्यार्थ्यांना आज असें सांगतात कीं तुम्ही शाळेंत जा, हरताळ पाळूं नका. ते विद्यार्थ्यांच्या पालकांना असें बजावतात कीं, तुम्ही आपल्या मुलांच्यावर आज कडक लक्ष ठेवा. पंचवीस वर्षांनंतर विद्यार्थ्यांच्या पालकांची या कॉंग्रेस अधिकाऱ्यांना आजच पहिल्यानें आठवण झालेली दिसते.

( हंशा ). गेल्या पंचवीस वर्षांत त्यांनीं विद्यार्थ्यांना आपापल्या शाळांवर अनेक वेळां हरताळ पुकारायला सांगितलें. शिक्षणावर बहिष्कार टाका म्हणून आदेश दिला आणि त्याप्रमाणें आजपर्यंत विद्यार्थ्यांनीं देशासाठीं आपल्या शिक्षणाचें वाटोळें केलें या-बद्दल त्यांना मुळींच प्रश्चात्ताप होत नाहीं !

" पण आज वाईट इतकेंच वाटतें, कीं जें तुम्ही पंचवीस वर्षें आम्हांला शिकविलें तें तुम्ही आज कसें विसरतां ! आणि तें तुम्ही विसरून जा म्हणून आज तुम्हीं आम्हांला कसें सांगतां ? स्वातंत्र्यलढ्याचे जे मंत्र देशाच्या पुढाऱ्यांनीं आज-पर्यंत जनतेला दिले, ते जनता एकदम कशी विसरून जाणार ! आजपर्यंत आम्ही राष्ट्रीय महत्त्वाचे अनेक दिवस पाळलेले आहेत. ते कसे पाळावयाचे असतात, हें तंत्र आम्हांला आतां पूर्ण माहीत झालेलें आहे. मग आम्हांला हा मुलखावेगळा उपदेश या दिवसाच्या बद्दल कशाला करतां ? ( टाळ्या ).

" आठ ऑगस्ट रोजीं महात्माजींनीं आम्हांला सांगितलें कीं, मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही लढत आहोंत असें तोंडानें सांगून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल एक अवाक्षरहि जेव्हां इंग्रज काढीनात तेव्हां ते संतापून गेले. त्यांनीं सरकारला सांगितलें : " चले जाव " ! त्यांनीं जनतेला सांगितलें, " *करेंगे या मरेंगे* ! " जनता म्हणाली, " अच्छा, करेंगे या मरेंगे " ( टाळ्या ). महात्माजींचा तो तेजस्वी मंत्र आमच्या कानांत अद्यापि घुमतो आहे. आम्हीं त्या दिवशीं केलेल्या प्रतिज्ञेचा जयघोष अजूनही आमच्या अंतःकरणांत निनादतो आहे. देशामधला कोणताहि स्वातंत्र्यप्रिय तरुण हे आवाज विसरणार नाहीं. मग आज आम्हीं याच मंत्राचा आणि जयघोषाचा पुनरुच्चार त्याच स्वरांत आणि त्याच जोरांत करावयाला नको काय ? स्वातंत्र्य मिळेपर्यंत आम्हांला लढावयाचें आहे. ( टाळ्या ). स्वातंत्र्य आमच्या घरांत येऊन मुक्काम करीपर्यंत आम्हांला कांहीं तरी करीत राहावयाचें आहे.

" स्वातंत्र्याचा आपला लढा आतां संपलेला आहे काय ? मग कोठें आहे तें स्वातंत्र्य ? आमचे कांहीं पुढारी आम्हांला सांगतात कीं, दरवाजाच्या पायरीवर स्वातंत्र्य येऊन उभें राहिलेलें आहे. मला जेव्हां हें कळलें तेव्हां मीं दार उघडून बाहेर बघितलें. ( हंशा ). अगदीं डोळे फाडून मीं लांबवर नजर टाकून पाहिलें. मला कांहीं कोठें तें स्वातंत्र्य दिसलें नाहीं. ( हंशा ). मी आजूबाजूच्या लोकांकडे चौकशी केली. म्हटलें तें स्वातंत्र्य तुमच्या दाराशीं येऊन गेलें का हो ? ते म्हणाले, ' नाहीं ' ! ( हंशा ). जें स्वातंत्र्य कोणालाच दिसत नाहीं तें आमच्या पुढाऱ्यांना कसें दिसतें बरें ? छे, छे, स्वातंत्र्य आपण होऊन चालत चालत असें आमच्या दाराशीं येऊन कसें उभें राहील बरें ? स्वातंत्र्य हें खेंचून आणावें लागतें. कीचकानें द्रौपदीची वेणी धरून तिला जसें आपल्या महालांत फरफटत ओढीत नेलें, तसें

स्वातंत्र्याची शेंडी हातांत धरून त्याला आपल्या घरांत फरफरा ओढीत आणलें पाहिजे. तरच तें आपल्या घरांत येईल ! ( टाळ्या ).

"नऊ ऑगस्ट हा त्यागाचा, पराक्रमाचा आणि जनतेच्या क्रांतीचा दिवस आहे. महात्माजींनीं लोकांना सांगून ठेवलें होतें कीं, लोकहो, आतां तुम्हीच तुमचे पुढारी. आतां तुम्ही दुसऱ्या पुढाऱ्यांची वाट पाहूं नका ! महात्माजींचा तो आदेश नऊ ऑगस्ट रोजीं लोकांनीं आचरणांत आणला. देशाचे पुढारी आधल्या रात्रीं सरकारनें जबरदस्तीनें पकडून तुरुंगांत घातले, म्हणून जनता घाबरून गेली नाहीं. जनता गोंधळून गेली नाहीं. त्यामुळें साम्राज्यशाही जास्तच खवळली आणि तिनें जनतेवर दडपशाही सुरू केली. याच–याच शिवाजी पार्कच्या मैदानावर राष्ट्रमाता कस्तुरबांचें भाषण ऐकण्यासाठीं जमलेल्या हजारों निरपराधी आणि निःशस्त्र जनतेवर सरकारनें अश्रुवायु सोडला आणि आपल्या दडपशाहीच्या सत्राची सुरुवात केली ! ( 'शेम-शेम 'च्या आरोळ्या ).

"त्या काळांत सरकारनें जनतेवर जी दडपशाही केली तिला जगाच्या इतिहासांत तोड नसेल. आमच्या नऊ पुढाऱ्यांनीं सरकारचा असा काय अपराध केला होता बरें कीं, त्यांच्या अपराधाची चौकशी न करतां सरकारनें त्यांना तीन साडेतीन वर्षें अन्यायानें कारागृहांत डांबून ठेवावें ! शेकडों कार्यकर्त्यांचीं घरेंदारें जप्त झालीं. शेकडों मुलें-माणसें जुलमी राजसत्तेच्या गोळीबाराला बळी पडलीं. हजारो लोकांचें आयुष्य बरबाद झालें. पण जनता सरकारला शरण गेली नाहीं. हीच ती बेचाळीसची क्रांति ! हाच तो जनतेच्या प्रतिकाराचा बेचाळीसचा लढा कीं जो या नऊ ऑगस्टपासून सुरू झाला ! अंतःकरणाला थरारून सोडणारा, डोकीं बेभान करून टाकणारा, रक्ताला उसळायास लावणारा हाच-हाच तो पवित्र, मंगल आणि रोमहर्षक दिवस. ( टाळ्या ). या दिवशीं आम्ही घरीं स्वस्थ कसे बसणार ? या दिवशीं आम्ही आमचा चेहरा सुतक्यासारखा गंभीर कसा ठेवणार ? आज आम्हांला त्या 'चले जाव 'च्या राष्ट्रमंत्राचा पुन्हां उच्चार करावयाचा आहे ! तो आम्ही आज इतक्या त्वेषानें आणि जोरानें करणार कीं, दाही दिशा दणाणून गेल्या पाहिजेत ! सारें जग हादरून गेलें पाहिजे. ( प्रचंड टाळ्या ).

"आज वीरमरणाचा दिवस आहे. बेचाळीसच्या स्वातंत्र्य युद्धांत ज्यांना राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या प्राणाचें बलिदान केलें त्या वीरांच्या स्मरणाचा आणि त्या स्मरणाला वंदन करण्याचा हा दिवस आहे. हा दिवस त्या वीरांच्या नांवाला आणि त्यागाला शोभेल अशाच प्रखर रीतीनें आपणाला पाळावयाला हवा. आपण त्या वीरांचे वारस आहोंत. त्या वीरांची वीरश्री आज आपल्या अंगांत संचारावयाला हवी सरकारच्या जुलमी दडपशाहीचा आज आपल्याला निषेध करावयाचा आहे. हा निषेध काय मऊ बायकी आवाजामध्यें करतां येईल काय ? ( हंशा ).

"प्रत्येक भावनेचे विशिष्ट आवाज आणि आविष्कार ठरून गेलेले आहेत.

रागाचे आवाज निराळे, प्रेमाचे आवाज निराळे, दुःखाचे आवाज निराळे आणि पराक्रमाचे आवाजहि निराळे! ज्या वेळीं जशी भावना असेल तसाच तिचा आविष्कार व्हावयाला हवा! गंभीर आणि सुतकी चेहरे करावयाचें आज कारण काय? आज अश्रु ढाळावयाची किंवा रडावयाची काय जरुरी? जे वीर धारातीर्थी पडतात त्यांच्यासाठीं कोणी रडत का असतें? जे मरतात त्यांच्यासाठीं लोक रडतात; पण जे मेलेच नाहींत त्यांच्यासाठीं कसें रडतां येईल? राष्ट्रासाठीं जो प्राण देतो तो मरत नाहीं, तो अमर होतो. 'जो देशासाठीं मेला तो जगिं अजरामर झाला!' असें एका कवितेंत म्हटलें आहे तें खरें आहे. (टाळ्या).

"राष्ट्रासाठीं प्राण देणाऱ्या वीरांचें स्मरण करावयाचें म्हणजे त्यांचीं नांवें स्वतःशीं पुटपुटावयाचीं आणि स्वस्थ बसावयाचें असें नव्हे. या वीरांप्रमाणें राष्ट्रासाठीं प्राण देण्याचा आपणहि आज निश्चय करावयाचा! चला, राष्ट्रासाठीं आपल्या प्राणाचें बलिदान देऊन आपणहि देशाच्या इतिहासांत अजरामर होऊं या! नंदुरबारचा तो चिमुकला वीर शिरीषकुमार, तो नाहीं का आपलें रक्त सांडून अजरामर झाला! वडूजचा परशुराम पहेलवान, माथेरानचा वीर कोतवाल, सिंधचा हेमू कलानी, हे नाहीं का स्वातंत्र्यदेवतेला आपल्या प्राणाचे नैवेद्य देऊन अमर झाले! (टाळ्या). मग काय तर!

"आज आपला राष्ट्रीय सण आहे. हिंदुस्थानांतील जनता चार वर्षांपूर्वी याच दिवशीं जशी जागी झाली, तशी पूर्वी कधींच जागी झाली नव्हती! यापुढें आतां जनतेचें खरेंखुरें राजकारण सुरू झालेलें आहे. स्वातंत्र्याचा लढा आतां जनतेनें आपल्या हातीं घेतला आहे. आतां शिकलेल्या पदवीधर लोकांच्या राजकारणाची देशाला जरुरी नाही. पांढरपेशा वर्गाच्या नेतृत्वाची आतां समाजाला जरुरी नाहीं. देशांतले शेतकरी आणि कामकरी लोक आतां शहाणे झालेले आहेत. स्वातंत्र्याचा लढा आतां तेच लढतील. देशाचें स्वातंत्र्य आतां तेच मिळवून दाखवितील. (प्रचंड टाळ्या).

"आपल्या थोर पुढाऱ्यांनीं आपणाला आत्तांपर्यंत जें जें सांगितलें तें तें आतां आपल्या पूर्णपणें लक्षांत आहे. तें आपण विसरून कसें चालेल? लोकमान्य टिळकांनीं आपल्याला सांगितलें कीं, 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' पाशवी साम्राज्यशाही उलथून टाकण्यासाठीं आपण तिच्याशीं अहिंसात्मक असहकार केला पाहिजे, असा महात्माजींनीं आपल्याला आदेश दिलेला आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत परकीय राजसत्तेविरुद्ध सतत बंड करण्याचा जनतेचा हक्क आहे अशी पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं घोषणा केलेली आहे.

"आतां आमचें कांहीं पुढारी आम्हांला असें सांगतात कीं, ब्रिटिश सरकार प्रामाणिक आहे. (हंशा). आमचे स्वातंत्र्य आमच्या हवालीं करून ते या देशा-

मधून जाण्याला खरोखरच म्हणे तयार आहेत. ( हंशा ). इंग्रजांच्या या म्हणण्यावर आमच्या पुढाऱ्यांचा कसा चटकन् विश्वास बसला आहे तेंच आम्हांला कळत नाहीं. गोरे लोक प्रामाणिक असतात ही गोष्ट आम्हांला स्वप्नांत देखील खरी वाटणार नाहीं. शिवराम महादेव परांजपे यांनीं आम्हांला मागेंच सांगून ठेवलेलें आहे कीं, गोरे लोक हे कधींच चांगले नसतात. इंग्रजांनीं आमचें राज्य कसें लुबाडलें हा इतिहास एखादें लहान मूल देखील सांगू शकेल. प्रामाणिक लोक दुसऱ्या देशांचीं राज्यें हिरावून घेत नसतात. देशामधल्या भोळ्या जनतेला फसवून, त्यांना लुबाडून, त्यांच्यामध्यें नानातऱ्हेचीं भांडणें लावून, खोटीं कागदपत्रें तयार करून इंग्रजांनीं हा आमचा श्रीमंत देश आपल्या घशाखालीं घातलेला आहे.

"आतां इंग्रजांचें काळीज एकदम बदलून गेलें आणि आतां ते लोक सच्चे झाले असें म्हणण्यासारखें काय घडलें आहे ? पाश्चात्य देशांत असा एक तरी कोणी मोठा विद्वान् किंवा तत्त्वज्ञानी आहे का कीं जो मनापासून म्हणतो कीं या जगाच्या पाठीवर एकहि राष्ट्र गुलाम राहतां कामा नये ! नाहीं तर आमचे महात्माजी बघा ! जग जर स्वतंत्र झालें नाहीं तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मला मुळींच किंमत नाहीं असें महायुद्धाच्या प्रारंभींच त्यांनीं जगाला ओरडून सांगितलें. ( टाळ्या ). छे, छे, इंग्रज राज्यकर्त्यांना ज्या दिवशीं आपण प्रामाणिक समजूं, त्यांच्यावर विश्वास ठेवूं, त्या दिवशीं आमच्या स्वातंत्र्याचा लढा एकदम लंगडा पडला असें आपण खात्रीनें समजा ! ( प्रचंड टाळ्या ).

"तरुणहो, बेचाळीसच्या आठ ऑगस्ट रोजीं 'चले जाव' च्या घोषणेबरोबर देशांत गरिबांचें, शेतकऱ्यांचें आणि कामकऱ्यांचें राज्य स्थापन करण्याचीहि कॉंग्रेसनें घोषणा केली हें तुम्हांला आठवत असेल. त्या घोषणेचा आज पुन्हां उच्चार करूं या. 'चले जाव' याचा अर्थ केवळ इंग्रजांची साम्राज्यशाही या देशामधून उखडून टाकावयाची नाहीं. तर तिच्याबरोबर भांडवलशाहीहि नेस्तनाबूद करून टाकावयाची. मग ती भांडवलशाही गोऱ्यांची असो अगर काळ्यांची असो ! इंग्रज राज्यकर्त्यांच्या खुर्च्यांवर हिंदी राज्यकर्ते बसवून देशाला स्वातंत्र्य मिळणार नाहीं.

"राजकीय पारतंत्र्याबरोबर आर्थिक पारतंत्र्यहि नष्ट व्हावयाला पाहिजे ! समाजांतले कष्टाळू आणि गरीब लोक आज भांडवलशाहीच्या चरकामध्यें पिळून निघत आहेत. ही पिळवणूक थांबली पाहिजे. राजकीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक आणि सामाजिक समता देशांत प्रस्थापित झाली तरच कोट्यावधि गरीब जनता मुक्त होईल आणि देश स्वतंत्र झाला असें म्हणतां येईल ! ( टाळ्या ). राजकीय सत्ता जनतेच्या हातीं यावी एवढ्यासाठींच हा आपला स्वातंत्र्याचा लढा आहे. म्हणून आज 'चले जाव'चा पुनरुच्चार करतांना तो आपण साम्राज्यशाही आणि भांडवलशाही या दोहोंचें उच्चाटन करण्याच्या भावनेनेंच केला पाहिजे ! ( टाळ्या ).

रागाचे आवाज निराळे, प्रेमाचे आवाज निराळे, दुःखाचे आवाज निराळे आणि पराक्रमाचे आवाजहि निराळे! ज्या वेळीं जशी भावना असेल तसाच तिचा आविष्कार व्हावयाला हवा! गंभीर आणि सुतकी चेहरे करावयाचें आज कारण काय? आज अश्रु ढाळावयाची किंवा रडावयाची काय जरुरी? जे वीर धारातीर्थी पडतात त्यांच्यासाठीं कोणी रडत का असतें? जे मरतात त्यांच्यासाठीं लोक रडतात; पण जे मेलेच नाहींत त्यांच्यासाठीं कसें रडतां येईल? राष्ट्रासाठीं जो प्राण देतो तो मरत नाहीं, तो अमर होतो. 'जो देशासाठीं मेला तो जगीं अजरामर झाला!' असें एका कवितेंत म्हटलें आहे तें खरें आहे. (टाळ्या).

"राष्ट्रासाठीं प्राण देणाऱ्या वीरांचें स्मरण करावयाचें म्हणजे त्यांचीं नांवें स्वतःशीं पुटपुटावयाचीं आणि स्वस्थ बसावयाचें असें नव्हे. या वीरांप्रमाणें राष्ट्रासाठीं प्राण देण्याचा आपणहि आज निश्चय करावयाचा! चला, राष्ट्रासाठीं आपल्या प्राणाचें बलिदान देऊन आपणहि देशाच्या इतिहासांत अजरामर होऊं या! नंदुरबारचा तो चिमुकला वीर शिरीषकुमार, तो नाहीं का आपलें रक्त सांडून अजरामर झाला! वडूजचा परशुराम पहेलवान, माथेरानचा वीर कोतवाल, सिंधचा हेमू कलानी, हे नाहीं का स्वातंत्र्यदेवतेला आपल्या प्राणाचे नैवेद्य देऊन अमर झाले! (टाळ्या). मग काय तर!

"आज आपला राष्ट्रीय सण आहे. हिंदुस्थानांतील जनता चार वर्षांपूर्वी याच दिवशीं जशी जागी झाली, तशी पूर्वी कधींच जागी झाली नव्हती! यापुढें आतां जनतेचें खरेंखुरें राजकारण सुरू झालेलें आहे. स्वातंत्र्याचा लढा आतां जनतेनें आपल्या हातीं घेतला आहे. आतां शिकलेल्या पदवीधर लोकांच्या राजकारणाची देशाला जरुरी नाही. पांढरपेशा वर्गाच्या नेतृत्वाची आतां समाजाला जरुरी नाहीं. देशांतले शेतकरी आणि कामकरी लोक आतां शहाणे झालेले आहेत. स्वातंत्र्याचा लढा आतां तेच लढतील. देशाचें स्वातंत्र्य आतां तेच मिळवून दाखवितील. (प्रचंड टाळ्या).

"आपल्या थोर पुढाऱ्यांनीं आपणाला आत्तांपर्यंत जें जें सांगितलें तें तें आतां आपल्या पूर्णपणें लक्षांत आहे. तें आपण विसरून कसें चालेल? लोकमान्य टिळकांनीं आपल्याला सांगितलें कीं, 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' पाशवी साम्राज्यशाही उलथून टाकण्यासाठीं आपण तिच्याशीं अहिंसात्मक असहकार केला पाहिजे, असा महात्माजींनीं आपल्याला आदेश दिलेला आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत परकीय राजसत्तेविरुद्ध सतत बंड करण्याचा जनतेचा हक्क आहे अशी पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं घोषणा केलेली आहे.

"आतां आमचें कांहीं पुढारी आम्हांला असें सांगतात कीं, ब्रिटिश सरकार प्रामाणिक आहे. (हंशा). आमचे स्वातंत्र्य आमच्या हवालीं करून ते या देशा-

मधून जाण्याला खरोखरच म्हणे तयार आहेत. ( हंशा ). इंग्रजांच्या या म्हणण्यावर आमच्या पुढाऱ्यांचा कसा चटकन् विश्वास बसला आहे तेंच आम्हांला कळत नाहीं. गोरे लोक प्रामाणिक असतात ही गोष्ट आम्हांला स्वप्नांत देखील खरी वाटणार नाहीं. शिवराम महादेव परांजपे यांनीं आम्हांला मागेंच सांगून ठेवलेलें आहे कीं, गोरे लोक हे कधींच चांगले नसतात. इंग्रजांनीं आमचें राज्य कसें लुबाडलें हा इतिहास एखादें लहान मूल देखील सांगू शकेल. प्रामाणिक लोक दुसऱ्या देशांचीं राज्यें हिरावून घेत नसतात. देशामधल्या भोळ्या जनतेला फसवून, त्यांना लुबाडून, त्यांच्यामध्यें नानातऱ्हेचीं भांडणें लावून, खोटीं कागदपत्रें तयार करून इंग्रजांनीं हा आमचा श्रीमंत देश आपल्या वशाखालीं घातलेला आहे.

"आतां इंग्रजांचें काळीज एकदम बदलून गेलें आणि आतां ते लोक सच्चे झाले असें म्हणण्यासारखें काय घडलें आहे ? पाश्चात्य देशांत असा एक तरी कोणी मोठा विद्वान् किंवा तत्त्वज्ञानी आहे का कीं जो मनापासून म्हणतो कीं या जगाच्या पाठीवर एकहि राष्ट्र गुलाम राहतां कामा नये ! नाहीं तर आमचे महात्माजी बघा ! जग जर स्वतंत्र झालें नाहीं तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मला मुळींच किंमत नाहीं असें महायुद्धाच्या प्रारंभींच त्यांनीं जगाला ओरडून सांगितलें. ( टाळ्या ). छे, छे, इंग्रज राज्यकर्त्यांना ज्या दिवशीं आपण प्रामाणिक समजूं, त्यांच्यावर विश्वास ठेवूं, त्या दिवशीं आमच्या स्वातंत्र्याचा लढा एकदम लंगडा पडला असें आपण खात्रीनें समजा ! ( प्रचंड टाळ्या ).

"तरुणहो, बेचाळीसच्या आठ ऑगस्ट रोजीं 'चले जाव' च्या घोषणेबरोबर देशांत गरिबांचें, शेतकऱ्यांचें आणि कामकऱ्यांचें राज्य स्थापन करण्याचीहि काँग्रेसनें घोषणा केली हें तुम्हांला आठवत असेल. त्या घोषणेचा आज पुन्हां उच्चार करूं या. 'चले जाव' याचा अर्थ केवळ इंग्रजांची साम्राज्यशाही या देशामधून उलथून टाकावयाची नाहीं. तर तिच्याबरोबर भांडवलशाहीहि नेस्तनाबूद करून टाकावयाची. मग ती भांडवलशाही गोऱ्यांची असो अगर काळ्यांची असो ! इंग्रज राज्यकर्त्यांच्या खुर्च्यांवर हिंदी राज्यकर्ते बसवून देशाला स्वातंत्र्य मिळणार नाहीं.

"राजकीय पारतंत्र्याबरोबर आर्थिक पारतंत्र्यहि नष्ट व्हावयाला पाहिजे ! समाजांतले कष्टाळू आणि गरीब लोक आज भांडवलशाहीच्या चरकामध्यें पिळून निघत आहेत. ही पिळवणूक थांबली पाहिजे. राजकीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक आणि सामाजिक समता देशांत प्रस्थापित झाली तरच कोट्यावधि गरीब जनता सुखी होईल आणि देश स्वतंत्र झाला असें म्हणतां येईल ! ( टाळ्या ). राजकीय सत्ता जनतेच्या हातीं यावी एवढ्यासाठींच हा आपला स्वातंत्र्याचा लढा आहे. म्हणून आज 'चले जाव'चा पुनरुच्चार करतांना तो आपण साम्राज्यशाही आणि भांडवलशाही या दोहोंचें उच्चाटन करण्याच्या भावनेनेंच केला पाहिजे ! ( टाळ्या ).

"या नऊ ऑगस्टमधून स्वातंत्र्य लढ्याचीं अनेक नवीं तंत्रें जनतेनें शोधून काढलीं. या नऊ ऑगस्टमधून भूमिगत प्रतिकाराचें प्रभावी अस्त्र निर्माण झालें. सरकारच्या हातांत सांपडावयाचें नाहीं. सरकारच्या तुरुंगांत अडकून पडावयाचें नाहीं. या दडपशाहीच्या काळांत जनतेच्या प्रतिकाराची धार वाढविण्यासाठीं अंधारांत रहावयाचें. आणि देशांत परकी राजसत्तेचीं खोलवर पसरलेलीं पाळेंमुळें खालून कुरतडून काढावयाचीं हें भूमिगत लढ्याचें तंत्र होय! बेचाळीसच्या दडपशाहीनें जनता दबली गेली नाहीं. नेहमीचे पुढारी नसल्यानें ती गोंधळूनहि गेली नाहीं. तिनें आपले नवीन पुढारी निर्माण केले. आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं दडपशाहीशीं लढा दिला.

"सातारा जिल्ह्यांतलें प्रतिसरकार ही नऊ ऑगस्टनें देशाला दिलेली तेजस्वी देणगी होय! (टाळ्या). साडेतीन वर्षेपर्यंत त्या जिल्ह्यांत नाना पाटलानें परकी सरकारला औषधाला देखील राहूं दिलें नाहीं. (टाळ्या). साताऱ्यांत जें केलें तेंच जनतेनें देशांत पुष्कळ ठिकाणीं करून दाखविलें.

"नऊ ऑगस्टमधून निर्माण झालेलें दुसरें विराट् शस्त्र म्हणजे नेताजी सुभाष बोस आणि त्यांची आझाद हिंद फौज! (प्रचंड टाळ्या). महात्माजींच्या 'चले जाव' घोषणेची ही सुभाषबाबूंनीं उघडलेली सशस्त्र आघाडी! देशाबाहेर असलेल्या लक्षावधि हिंदी जनतेचा हा प्रतिकार बंडाचें स्वरूप धारण करून कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं उभा राहिला! या लढ्यांत शेंकडों आझाद वीरांनीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण दिले. त्यांचेंहि आज नऊ ऑगस्टला आपण स्मरण केलें पाहिजे.

"त्या हुतात्म्यांच्या स्मरणावरहि आपण प्रेमाचीं आणि आदराचीं फुलें उधळलीं पाहिजेत. त्याखेरीज नऊ ऑगस्टला सुरू झालेला हा स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करण्यासाठीं ज्यांनीं आपल्या घरादारांवर, सुखावर आणि संसारावर जळजळीत निखारे ठेविले आणि जे देशासाठीं फकीर बनून सुभाषबाबूंप्रमाणें बेपत्ता झाले, परागंदा झाले—आज ते कोठें असतील, त्यांना क्षणभर राहावयाला निवाऱ्याची जागा तरी असेल काय, त्यांना अंगावर घालावयाला कपडा तरी असेल काय, त्यांना पोटाला एक घांस तरी मिळत असेल काय, या विचारानें आज आपलीं आंतडीं तुटत आहेत. त्या अगणित आणि अज्ञात वीरांचीहि आज आपण कृतज्ञतापूर्वक आठवण केली पाहिजे! (टाळ्या. श्रोते भावनाविवश होतात.)

"आज सकाळीं बरोबर रस्त्यांवर आणि चौकाचौकांमध्यें पोलिस शिपाई आणि सार्जंट लाठ्या हातांत घेऊन पाहरा करतांना जेव्हां मीं पाहिले, तेव्हां मी क्षणभर गोंधळून गेलों. म्हणालों कीं, हें कोणाचें राज्य आहे? ब्रिटिशांचें—कीं आपलें जनतेचें—कॉंग्रेसचें? ज्या नऊ ऑगस्टच्या सामर्थ्यावर आज देशांतल्या अकरा प्रांतांपैकीं आठ प्रांतांवर कॉंग्रेसचा झेंडा फडकतो आहे, (टाळ्या) त्या कॉंग्रेस सरकारला 'नऊ ऑगस्ट'च्या दिवशीं जनतेची भीति वाटावी? (शेम शेम). नाहीं मित्रहो, कॉंग्रेसचा

धिक्कार करूं नका ! कॉंग्रेसचा धिक्कार मी कधींहि सहन करणार नाहीं. कॉंग्रेसमध्यें जी भ्याड प्रवृत्ति आज निर्माण झालेली दिसत आहे तिचा निषेध करा ! ( प्रचंड टाळ्या ). कॉंग्रेसमधल्या क्रांतिविरोधी प्रवृत्ति मुळासकट नेस्तनाबूद करणें हेंच केवळ तुम्हां तरुणांचें कर्तव्य आहे ! ( टाळ्या ).

"तरुणहो, नऊ ऑगस्टनें देशांत पेटविलेला तो क्रांतीचा अंगार विझतां कामा नये. तो एकसारखा पेटला पाहिजे. भडकला पाहिजे. लक्षावधि हातांनीं तो पालवला पाहिजे. लक्षावधि मुखांनीं तो फुलवला पाहिजे. तो अंगार साऱ्या देशांत पसरून त्याच्या ज्वाला इतक्या धडधडल्या पाहिजेत कीं, त्यामध्यें सारी ब्रिटिश साम्राज्यशाही जळून भस्मसात् झाली पाहिजे ! " ( टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट ).

त्यानंतर 'नऊ ऑगस्ट 'चें 'चले जाव' हें रणगीत मी हजारों श्रोत्यांच्या समवेत गायलें.

## चले जाव

चले जाव, चले जाव, चले जाव !
चले जाव, चले जाव, चले जाव !
हा सारा हा माझा देश
माझा प्यारा भारत देश,
मी राजा ह्या देशाचा,
मालक मी ह्या भूमीचा,
माझीं शेतें, माझे डोंगर,
माझीं गंगा, माझा सागर,
हिमालयाच्या शिखरावरुनी,
सांगुं जगाला साऱ्या गर्जुनि,
खबरदार जर इथे याल तर
सांडतील रक्ताचे सागर,
चले जाव, चले जाव, चले जाव !
हिंदु-मुस्लीम आम्ही भाई,
भारतमाता आमुची आई !
बच्चे आम्ही शूरांचे,
वारस आम्ही वीरांचे
फौज आमुची चाळीस कोट,
फोडूं साम्राज्याचे कोट

शेतकऱ्यांचें कामकऱ्यांचें
   निशाणा धरुनी उंच क्रांतिचें,
फोडूं नरडें जुल्मशाहिचें
   मंत्र गर्जु या स्वातंत्र्याचे
चले जाव, चले जाव, चले जाव !
   देशासाठीं आम्हि मरूं
प्राणांचे बलिदान करूं
   मोडूनि टाकू हे शतखंड !
गुलामगिरीचे साखळदंड
चला, तिरंगी धरून निशाण
स्वतंत्र करूँ या हिंदुस्थान
नव्या युगाचा वाजे डंका
   मानवतेच्या ऐका ।का
   आडवे येतील त्यांना ठोका
एक मुखानें करा गर्जना
चले जाव, चले जाव, चले जाव !

हें ' चले जाव ' गीत जेव्हां मी संपवलें, तेव्हां हजारों लोकानीं टाळ्यांच्या नि जयजयकाराच्या गडगडाटानें सारा ' शिवाजी पार्क ' हादरून टाकला.

## ४८

# संयुक्त महाराष्ट्राची घोषणा

१९२९ सालीं बेळगांव येथें मराठी साहित्य संमेलन दे. भ. शिवराम महादेव परांजपे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यानंतर सतरा वर्षांनीं १९४६ सालीं तिसावें मराठी साहित्य संमेलन नागपूरचे सुप्रसिद्ध पत्रकार, निबंधकार आणि कादंबरीकार गजानन त्र्यंबक माडखोलकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. तथापि, महाराष्ट्र साहित्य संमेलनाची घटना ह्याच वर्षी बदलली गेल्यामुळें संमेलनाच्या अध्यक्षीय स्थानाबद्दल आणि अधिकाराबद्दल गोंधळ आणि घोटाळा निर्माण झाला.

पूर्वीच्या घटनेंत जो कोणी एखाद्या वर्षी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होई, तोच पुढल्या वर्षी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अध्यक्ष म्हणून काम करी. ती पद्धत कांहीं वाईट नव्हती. पण आदल्या वर्षी धुळ्याच्या अधिवेशनांत संमेलनाच्या घटनेमध्यें क्रांति घडवून आणण्याची घोषणा अध्यक्ष मामा वरेरकर ह्यांनीं केली. मामांनीं शिवधनुष्य उचलण्याचा आव आणला खरा पण तें शेवटीं त्यांच्याच अंगावर कोलमडून पडलें. घटनेचा करावयाला गेले ते ‘ विनायक ’ आणि शेवटीं त्यांचें झालें ‘ वानर ’.

संमेलनाची घटना आमूलाग्र बदलली गेली आणि संमेलनाध्यक्ष हा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अध्यक्ष होण्याऐवजीं परिषदेचा अध्यक्ष हा संमेलनाध्यक्षाच्या मानगुटीवर येऊन बसला. त्यामुळें संमेलनाच्या घटनेचा अगदीं विचका झाला. आणि संमेलनामध्यें संमेलनाध्यक्षाला कांहींच किंमत राहिली नाहीं. बेळगांवला सेहेचाळीस सालीं भरलेलें मराठी साहित्य संमेलन हें नवीन घटनेप्रमाणें भरणारें पहिलेंच संमेलन होतें. म्हणून हा ' दोन दादल्यांचा संसार ' बेळगांवला कसा काय यशस्वी होतो, ह्याची बेळगांवला जातांना आम्हांला चिंता वाटत होती.

प्रा. दत्तो वामन पोतदार हे नगर येथील साहित्य संमेलनाचे पूर्वीच अध्यक्ष होऊन गेले होते. ते या वर्षी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्याखेरीज ललित विभागाचे अध्यक्ष म्हणून माडखोलकरांची निवड झाली. वास्तविक, पूर्वीच्या परंपरेप्रमाणें माडखोलकर हेच या संमेलनाचे एकमेव अध्यक्ष व्हावयाला पाहिजे होते. पण नवीन घटनेप्रमाणें साहित्य संमेलनाचे सर्वाधिकारी प्रा. पोतदार हेच झाले. आणि ललित विभागाचें अध्यक्षीय भाषण आणि समारोप करण्यापलीकडे या संमेलनामध्यें माडखोलकरांना कांहींहि स्थान उरलें नाहीं.

ही भानगड खुद्द माडखोलकरांच्या लक्षांत प्रारंभीं तितकीशी आली नाहीं. पण नागपुराहून पुण्यास आल्यानंतर त्यांना आपल्या स्थानाचा योग्य तो बोध झाला. त्यामुळें त्यांना पराकाष्ठेचें वाईट वाटलें आणि ते पुण्याहून नागपुरला परत जायलाहि निघाले. पण परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. बापूसाहेब माटे ह्यांनीं त्यांची मोठ्या प्रयासानें समजूत काढली. तेव्हां मग ते बेळगांवला यावयाला तयार झाले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते धारवाडचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. भुजंगराव दळवी. ते बेळगांवचे रहाणारे. मराठी भाषेचे आणि संस्कृतीचे कट्टर अभिमानी. पूर्वीचें बेळगांवचें संमेलन भरवण्यांतहि त्यांचा फार मोठा हिस्सा होता. पुण्या-मुंबईहून, वऱ्हाड-नागपुराकडून, मराठवाडा, कारवार, गोमंतकांतून अनेक नामवंत साहित्यिक या संमेलनाला आले होते. या संमेलनाचें एक वैशिष्ट्य म्हणजे प्रा. पोतदार, प्रा. माटे, श्री. वि. स. खांडेकर, मामा वरेरकर आणि मी असे साहित्य संमेलनाचे पांच भूतपूर्व अध्यक्ष या अधिवेशनांत एकत्रित उपस्थित होते. संमेलनासाठीं ' बेनिअन स्मिथ हायस्कूल 'च्या विस्तीर्ण आवारांत दोन हजार लोक मावतील एवढा मोठा भव्य मंडप उभारण्यांत आला होता. आणि त्याला ' शिवरामपंत परांजपे मंडप ' असें सार्थ नांव देण्यांत आलें होतें.

मे महिन्याचे दिवस होते. बेळगांवची हवा या वेळीं फारच उत्तम होती. आधीं एकदोन दिवस चांगला पाऊस पडून गेला होता. त्यामुळें हवेंत विलक्षण थंडावा आला होता. आणि भोंवतालचें वातावरण अगदीं ताजेंतवानें आणि हिरवेंगार दिसत होतें. बाहेरून आलेले सर्व प्रतिनिधि बेळगांवच्या थंडगार हवेवर अतिशय

प्रसन्न झाले होते. त्यांत गांवामध्यें हापूसचे आंबेहि फारच उत्तम मिळत होते. त्यामुळें साहित्य संमेलनाला आल्याच्या आनंदांत एक विशेषच भर पडली होती.

संमेलन मंडपाच्या आजूबाजूला असलेल्या हिरव्यागार आम्रवृक्षांमधून कोकिळा एकसारख्या 'कुहू–कुहू' करून संमेलनाच्या मंडपावर आपल्या स्वरमाधुर्याचा वर्षाव करीत होत्या. इतक्या शीतल आणि प्रसन्न वातावरणामध्यें साहित्य संमेलन पूर्वी कधींच भरल्याचें मला आठवत नाहीं.

प्रा. पोतदार ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या कल्पनेशीं सुसंगत अशी साहित्य परिषदेच्या दृष्टीनें प्रादेशिक विभागाची पुनर्घटना कशी करतां येईल ह्याचा आराखडा मांडला. त्यांच्या भाषणाची अखेर अत्यंत स्फूर्तिदायक होती. ते गरजले, "लक्षांत ठेवा कीं, मराठी भाषेचें अधिराज्य महाराष्ट्रांत नांदलें पाहिजे. कन्नड भाषेचें कर्नाटकांत. वंग भाषेचें वंग देशांत अशी क्रांति आपण प्रत्यक्ष मूर्त सृष्टींत उतरून दाखविली पाहिजे. आपण आपसांत आणि इतर प्रांतबंधूंशीं या कामीं प्रेमानें आणि एकोप्यानें वागलें पाहिजे. जग आपणांकडे साकांक्ष दृष्टीनें पहात आहे. स्वतंत्र भारतांत आणि भारतांतील महाराष्ट्र–कर्नाटक प्रभृति उपराष्ट्रांत देशी भाषांच्या आश्रयानें आपण अपूर्व क्रांति घडवून आणून जगाच्या आकांक्षा तृप्त करूं या!"

त्यानंतर ललित विभागाचे अध्यक्ष माडखोलकर ह्यांचा परिचय करून देतांना मी म्हणालों, "माझें अन् माडखोलकरांचें नातें आहे, ते माझे साडू आहेत. कारण पूर्वीच्या एका संमेलनाचा मी अध्यक्ष होतों, आज ते अध्यक्ष झालेले आहेत. (हंशा)- त्यांना मी लहानपणापासून ओळखतों. अर्थात् त्या वेळीं मी देखील लहानच होतों. (हंशा). त्यांच्या माझ्या शारीरिक क्षेत्रफळांत पुष्कळ अंतर असलें तरी आमच्या वयांत एकच वर्षाचें अंतर आहे. (हंशा). ते आरंभीं कवि होते. त्यांचें काव्य गंभीर आहे. आज महाराष्ट्रांत त्यांना जें नांव मिळालेलें आहे तें उत्कृष्ट निबंधकार आणि कादंबरीकार म्हणून.

"माडखोलकर स्वतः म्हणतात कीं, मी साहित्यिक नाहीं. मी पत्रकार आहें. कोठल्याहि पत्राचे सध्यां संपादक नसलेले मामा वरेरकर ह्यांनीं माडखोलकरांचा पत्रकार म्हणून आतांच उल्लेख केला. (हंशा). तथापि, माडखोलकरांची आज महाराष्ट्रांत जी कीर्ति आहे ती 'महाराष्ट्रा'चे माजी संपादक किंवा 'तरुण भारता'चे आजी संपादक म्हणून नसून, 'मुक्तात्मा', 'भंगलेलें देऊळ', आणि 'चंदनवाडी' या उत्तमोत्तम कादंबऱ्यांचे लेखक म्हणूनच महाराष्ट्राला ते जास्त माहीत आहेत. आजहि या ललित विभागाचे अध्यक्ष म्हणून त्यांची जी निवड करण्यांत आली आहे, ती ते ख्यातनाम ललित लेखक आहेत म्हणूनच करण्यांत आलेली आहे. पत्रकार म्हणून नव्हे. (टाळ्या).

" माडखोलकर राजकीय कादंबऱ्या जशा लिहितात, तशा ते उत्तम शृंगारिक कादंबऱ्याहि लिहितात. ते दिसतात वरून गंभीर. पण आहेत मोठे रसिक आणि विलासी. गडकरी म्हणतात त्याप्रमाणें ह्या पिकल्या पानांत पुष्कळच हिरवटपणा आहे. ( हंशा ). खांडेकर आणि सानेगुरुजी ह्यांना त्यागवादी कादंबरीकार म्हणतां येईल, तर फडके आणि माडखोलकर ह्यांना भोगवादी कादंबरीकार म्हणावयाला हरकत नाहीं. (हंशा). तथापि, फडके ह्यांचा शृंगार फार कोमट वाटतो. तर माडखोलकर ह्यांचा शृंगार फार कढत आहे ! ( हंशा ).

" यापुढें आपण आपलें आयुष्य ' संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत घालविणार ' अशी आपल्या छापील भाषणांत माडखोलकरांनीं धमकी देऊन ठेवलेली आहे. पण मला त्यांना एवढेंच सांगावयाचें आहे कीं, ' तें काम तुम्हांला जमावयाचें नाहीं. तुम्ही त्या भानगडींत पडूं नका. उत्तमोत्तम कादंबऱ्या लिहून तुम्ही मराठी भाषेची सेवा करण्यांतच आपलें आयुष्य घालवावें. " (टाळ्या).

माडखोलकरांनीं आपलें एकोणीस पानांचें छापील भाषण वाचून दाखविलें. संयुक्त महाराष्ट्राची कल्पना मराठी भाषेंत आणि महाराष्ट्रांत प्रथमच विस्तारपूर्वक रीतीनें जाहीरपणें मांडण्याचें कार्य माडखोलकरांनीं केलें, ह्या दृष्टीनें त्यांच्या या भाषणाला ऐतिहासिक महत्त्व आहे. म्हणून त्यांतला कांहीं भाग मी येथें देतों. ते म्हणाले,

" नागपूर, वऱ्हाड, खानदेश आणि मराटवाडा हे पूर्व महाराष्ट्राचे चार उपेक्षित विभाग आहेत. महाराष्ट्र संस्कृतीचा उगम आणि महाराष्ट्र भाषेचा उद्धार गोदावरीच्या पलिकडे थेट नर्मदेपर्यंत पूर्वेकडे पसरत गेलेल्या महाराष्ट्राच्या ह्या आदिभूमींत प्रथम झाला. शातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव आणि भोसले ह्या ज्या पांच प्रमुख राजवंशांनीं महाराष्ट्राला भारतीय इतिहासांतील त्याचें आजचें स्थान प्राप्त करून दिलें, त्या राजवंशाचा अभ्युदय गोदाकांठच्या याच पुण्यभूमींत झाला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सीमारेषेवरील या मराठी शहरांत उभें राहून बोलतांना येथें धुमसत असलेल्या मराठी–कानडी वादाची आठवण होणें अपरिहार्य आहे. पण या प्रश्नाबद्दल केवळ भाषेच्या अभिमानानें आपसांत भांडत न बसतां, हिंदुस्थानांतील प्रांतांची भाषावार पुनर्घटना होण्याचा सुयोग येतांच, हाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिति नेमून हा प्रश्न आपण गुण्यागोविंदानें सोडविणेंच समंजसपणाचें होणार नाहीं काय ?

" महाराष्ट्र आणि कर्नाटक हीं सह्याद्रीच्या उत्संगावरील स्वातंत्र्याच्या वातावरणांत वाढलेलीं आणि कृष्णेच्या पुण्योदकावर परिपुष्ट झालेलीं जुळीं राष्ट्रें आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यापुढें आज तो एकच प्रश्न त्यांच्या भवितव्याचा निर्णय म्हणून उभा ठाकलेला आहे. तो सोडवून घेण्याच्या बाबतींत त्यांना परस्परांचें

सहकार्य घेणें अवश्य आहे. आज महाराष्ट्र हा ब्रिटिश, निजाम आणि पोर्तुगीज या तीन भिन्न राज्यसत्तांखालीं, तर कर्नाटक हा ब्रिटिश आणि निजाम या दोन भिन्न राज्यसत्तांखालीं विभागला गेला आहे. या विभागणीमुळें या दोन राष्ट्रांचीं जीं अनेक शकलें पडलेलीं आहेत, तीं एकसंध आणि एकजीव करून भावी हिंदी संयुक्त घटनेंत आपलें स्थान भारतीय राष्ट्रसंघाचे अविभाज्य घटक म्हणून निश्चित करून घेणें हा एकच एक प्रश्न आज या दोन राष्ट्रांपुढें उभा आहे.

" आपल्या राष्ट्रीय ऐक्यासाठीं कर्नाटक ज्या ईर्ष्येनें आज झगडत आहे, ब्रिटिश सरकार आणि राष्ट्रसभा या दोहोंनाहि कर्नाटकानें ज्या निर्धारानें आपली राष्ट्रीय ऐक्याची मागणी सादर केली आहे, ती ईर्ष्या आणि तो निर्धार महाराष्ट्रांत कुठें आहे ? कर्नाटकानें स्वतंत्र प्रांतघटनेची आपली मागणी मुंबई कायदेमंडळाकडून मंजूर करवून घेतली. राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीचें शिक्कामोर्तब तिच्यावर करवून घेतलें. त्या मानानें आपलें राष्ट्रीय ऐक्य आणि स्वतंत्र प्रांतघटना यांच्याबद्दल महाराष्ट्रांत किती उदासीनता आहे ?

" राष्ट्रसभेच्या कारभारापुरता तरी नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पूर्व पश्चिम पसरलेल्या अखिल महाराष्ट्राचा संपूर्ण संयुक्त प्रांत निर्माण करण्याची व्यवहार्यसुलभ कल्पनाहि महाराष्ट्रांत जोर धरूं शकत नाहीं. मग मुंबई आणि मध्यप्रांत–वऱ्हाड यांत विभागलेल्या महाराष्ट्राच्या घटनात्मक एकीकरणाची गोष्ट तर दूरच राहिली. राष्ट्रसभेच्या कारभारांत महाराष्ट्राचे ( १ ) मुंबई शहर ( २ ) मुंबई प्रांतांतील दहा जिल्ह्यांचा पश्चिम महाराष्ट्र ( ३ ) चार जिल्ह्यांचा वऱ्हाड आणि ( ४ ) चार जिल्ह्यांचा नागपूर असे त्याचे चार तुकडे पडून महाराष्ट्राच्या पूर्वीच्या विच्छेदनांत ही आणखी नवी भर पडली. महाराष्ट्राच्या एकीकरणाची मागणी ह्या भागांतील राष्ट्रसभेच्या प्रांतिक समित्यांनीं आणि कायदेमंडळाच्या राष्ट्रीय सदस्यांनीं जर एकमुखानें केली तर ' संयुक्त महाराष्ट्र ' उद्यां अस्तित्वांत येईल.

" वऱ्हाड, मराठवाडा आणि गोमंतक या महाराष्ट्राच्या तीन निरनिराळ्या राजसत्तांखालीं असलेल्या तुटक भागांत सुमारें ९० लाख म्हणजे तीन कोटि लोकसंख्येच्या महाराष्ट्रांतले एक तृतीयांश लोक रहातात. ह्या प्रदेशाचें राजकीय भवितव्य किती अनिश्चित आणि दुर्धर आहे. मराठवाड्यांत जसा उर्दू भाषेचा तसा गोमंतकांत पोर्तुगीज भाषेचा जुलूम लोकभाषेवर चाललेला असून मराठवाड्याप्रमाणें गोव्यांतील जनतेलाहि कोणत्याच प्रकारचें विचारस्वातंत्र्य नाहीं. पण वऱ्हाड, मराठवाडा आणि गोमंतक ह्यांच्या दुःस्थितीकडे राष्ट्रनेत्यांचें लक्ष आहे कुठें ? वऱ्हाडचें सोयरसुतक आपल्याला जणुं कांहींच नाहीं, मराठवाडा आणि गोमंतक यांचा समावेश महाराष्ट्रांत जणुं होत नाहींच, अशा बेपर्वाईच्या वृत्तीनें हे महाराष्ट्रीय नेते महाराष्ट्राच्या या तुटक भागाची आज उपेक्षा करीत आहेत.

" जिथें सलग मराठी प्रदेशाच्या भवितव्याबद्दल इतकी अनास्था आहे, जिथें महाराष्ट्राच्या चतुःसीमांवरील मराठी भाषी भाग भिन्नभाषी भागांत दडपले गेलेले आहेत, त्या भागांत चालू असलेल्या मराठीच्या पीछेहाटीची कोण दाद घेणार? मध्यप्रांत, वऱ्हाडांतील भंडारा, बालाघाट, छिंदवाडा, बैतूल आणि निमाड या जिल्ह्यांत, मुंबई प्रांतांतील बेळगांव, सोलापूर आणि कारवार या जिल्ह्यांत, हैद्राबाद संस्थानांतील बिदर, गुलबुर्गा, उस्मानाबाद, निजामाबाद या जिल्ह्यांत मराठी, हिंदी कानडी आणि तेलगू ह्यांच्याशीं जो संघर्ष चालू आहे, त्यामुळें मराठी त्या त्या भागांतून हळूहळू हटत चालली असून लौकरच हे सरहद्दीवरील भाग महाराष्ट्राला कायमचे पारखे होतील अशी भीति वाटते.

" नभोवाणीच्या विस्ताराची जी योजना नुकतीच हिंदुस्थान सरकारनें तयार केलेली आहे, ती सर्वच प्रांतिक भाषांच्या दृष्टीनें हानिकारक असल्यामुळें महाराष्ट्राप्रमाणें इतरहि प्रांतांतील साहित्यिक आणि पत्रकार ह्यांनीं तिचा निषेध करून प्रांतिक भाषांच्या प्रसाराला पोषक असे बदल तिच्यांत घडवून आणावयाला पाहिजेत. उच्च शिक्षण मराठींतून देणें हाच मराठीमध्यें जगांतील सर्व ज्ञान आणण्याचा आणि महाराष्ट्र संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा एकमेव उपाय आहे. या दोन्ही बाबतींतील संकल्पित ' पुणें विद्यापीठा 'चा व्हावा तितका उपयोग होईल असें वाटत नाहीं.

" मराठी भाषेची प्रतिष्ठा आणि प्रभाव वाढविण्यासाठीं महाराष्ट्राचें एकीकरण आणि महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना या दोन गोष्टी जितक्या आवश्यक आहेत तितकीच आणखीहि एक गोष्ट आवश्यक आहे, ती ही कीं, मराठी साहित्यानें महाराष्ट्राच्या जीवनाच्या सगळ्या कक्षा व्यापल्या पाहिजेत. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्राची अस्मिता मराठी जनतेच्या जीवनांतून कोटिकलांनीं प्रकट होऊं लागली, असें त्याच दिवशीं आपण अभिमानानें म्हणूं शकूं व त्या जीवनापासून ओज आणि तेज घेतलेलें खरें लोकवाङ्मयहि त्याच दिवशीं निर्माण होईल !

" आणि त्या लोकवाङ्मयांतूनच उद्यांचा नवमहाराष्ट्र आविर्भूत होईल. म्हणून भाषिक, प्रादेशिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या आपण एक आहोंत, नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत सारा मराठी समाज हा एकात्म आणि एकसंध आहे, ही जाणीव वाढीला लावण्यासाठीं महाराष्ट्रांतील सर्व जातींना, धर्मांना आणि वर्गांना मानव्याच्या मूलभूत हक्कांचें प्रांजळ अभिवचन देण्यांत आलें पाहिजे. भारतीय राष्ट्रसंघांतील आपलें इतिहाससिद्ध स्थान प्रभुत्वानें घ्यावयाला समर्थ असलेला संयुक्त नवमहाराष्ट्र त्या एकात्मतेच्या जाणीवेंतूनच अवतीर्ण होईल.

" महाराष्ट्रापुढें जो आज मुख्य प्रश्न आहे तो मराठी भाषेच्या लालनाचा आणि मंडनाचा नव्हे, तर रक्षणाचा आणि भवितव्याचा आहे. म्हणून महाराष्ट्राच्या एकीकरणासाठीं झटण्याची ईर्ष्या महाराष्ट्राच्या नेत्यांमध्यें उत्पन्न करण्यासाठीं,

मराठी साहित्याच्या अग्रासनावरून मी ही हांक फोडतों आहें. ही हांक नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत सर्व महाराष्ट्रांत दुमदुमेल! सह्याद्रीच्या आणि सातपुड्याच्या साऱ्या दऱ्याखोऱ्यांत तिचे प्रतिध्वनि उफाळून उठतील!

"ही महाराष्ट्र एकीकरणासाठीं झटण्याची हांक मराठी लेखक आणि पत्रकार ह्यांच्या वतीनें मी महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या, जातींच्या आणि धर्मांच्या कार्यकर्त्यांना देत आहें. त्या हांकेनुसार महाराष्ट्रांतील कार्यकर्ते त्याच्या एकीकरणासाठीं झटावयाला जर खरोखरच उद्युक्त झाले तरच आपण मला दिलेल्या या बहुमानाचें सार्थक झालें असें मी समजेन!"

अध्यक्ष माडखोलकर यांनीं संयुक्त महाराष्ट्राचा जो महत्त्वाचा विचार आपल्या भाषणांत मांडला तो आचारांत आणण्याबाबत योग्य ती तजवीज करण्यासाठीं 'संयुक्त महाराष्ट्र समिति' स्थापन करण्यांत यावी अशा आशयाचा ठराव विषय--नियामक समितीमध्यें आणि प्रकट अधिवेशनांत मांडण्याचें काम माझ्याकडे आलें. त्या ठरावावर भाषण करतांना मी म्हणालों, "भाषावर प्रांतरचनेचें तत्त्व कॉंग्रेसनें पूर्वींच मान्य केलेलें आहे. महात्मा गांधींना बेचाळीसच्या आंदोलनाच्या वेळीं ह्या गोष्टीची माडखोलकरांनीं आठवण करून दिली तेव्हां महात्माजींनीं त्यांना जें उत्तर दिलें तें माडखोलकरांनीं आपल्या भाषणांत छापलेलेंच आहे. तें उत्तर असें, 'बात यह है कि मैं धर्मसंकटमें हूँ. महाराष्ट्र के सब विभाग एक प्रांत बने. उसमें मेरी पूर्ण संमति है. लेकिन, इस समय इस आंदोलन उठानेमें मुझे शंका है. जब सब चीज खतरेमें है, तब यह एक प्रश्नका अलग महत्त्व देने में कहाँतक औचित्य है, मैं नहीं जानता हूँ. अगर अंतमें हिंदुस्थान आझाद बनेगा तो ऐसे सब प्रश्न अपने आप हल हो जायेंगे!' तेव्हां भाषावार प्रांतरचनेबाबत कॉंग्रेसचे नेते उदासीन आहेत असा माडखोलकरांनीं त्यांना जो दोष दिला आहे तो योग्य नाहीं.

शिवाय कॉंग्रेसचे पुढारी दे. भ. गंगाधरराव देशपांडे आणि दे. भ. शंकरराव देव ह्यांनीं 'संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस आपला पाठिंबा आहे' असें माडखोलकरांना स्पष्टपणें कळवलेंहि होतें. म्हणून 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या आपल्या ठरावाला कॉंग्रेसकडून विरोध होईल अशी माडखोलकर ह्यांनीं स्वतःची जी समज करून घेतली आहे, तिला कांहीं आधार नाहीं. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा हा प्रश्न सर्व मराठी भाषिकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. केवळ ह्या एका कार्यासाठीं हें साहित्य, संमेलन भरलें होतें एवढें जरी नमूद झालें, तरी महाराष्ट्राच्या इतिहासांत हें संमेलन अमर होईल यांत मुळींच शंका नाहीं. मात्र हा ठराव मंजूर करतांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीकरितां आपण सर्व मराठी साहित्यिक कायावाचामनें करून झटण्याकरितां आज स्वतःला आजन्म बांधून घेत आहोंत हें विसरूं नये!"

टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत 'संयुक्त महाराष्ट्र'चा तो ठराव एकमतानें

मंजूर झाला. नंतर 'संयुक्त महाराष्ट्राची कैफियत तयार करण्यासाठीं प्रा. पोतदार, शंकरराव देव, केशवराव जेधे, माडखोलकर आणि श्री. शं. नवरे ह्या पांच मंडळींची 'संयुक्त महाराष्ट्र समिति' स्थापन करण्याचा ठराव मीं मांडला. तोहि एकमतानें मंजूर झाला. या समितीच्या कामासाठीं एक हजार रुपयांचा प्राथमिक निधी उभारण्याचें ठरलें. पहिली शंभर रुपयांची देणगी मीच जाहीर केली. त्यानंतर दहा मिनिटांच्या आंत हजार रुपयांच्या वर निधि जाऊन पोहोंचला. सारांश, संयुक्त महाराष्ट्राची मागणी या संमेलनानें एकमुखानें केली हेंच या संमेलनाचें चिरस्मरणीय वैशिष्ट्य होय.

सगळ्यांत गंमतीची गोष्ट ही कीं, ज्या माडखोलकरांनीं संयुक्त महाराष्ट्राची कल्पना इतक्या आवेशानें आणि द्रष्टेपणानें त्या संमेलनांत मांडली आणि 'आपलें उर्वरित आयुष्य संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठीं आपण खर्च करूं' अशी घोषणा त्या वेळीं केली, तेच माडखोलकर पुढें नऊ वर्षांनीं संयुक्त महाराष्ट्राची प्रत्यक्ष चळवळ जेव्हां सुरू झाली, तेव्हां त्या चळवळीपासून मात्र शंभर मैल दूर राहिले. मीं त्यांच्या विषयीं जें भाकित केलें होतें कीं, 'तुम्हीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या भानगडींत पडूं नका, तुम्हीं आपल्या कादंबऱ्या लिहा' तेंच अखेर खरें ठरलें.

आणि 'संयुक्त महाराष्ट्रा'चा ठराव त्या संमेलनांत मांडण्याचें जें अकल्पित भाग्य मला लाभलें, तो तर माझ्या आयुष्यांतला एक विलक्षण योगायोगच होता असें म्हणावें लागेल. त्या चळवळीच्या रणधुमाळींतच मला पडावें लागेल ह्याची त्या वेळीं मला कल्पनाहि नव्हती. पण संयुक्त महाराष्ट्राचा तो ठराव माझ्या हातून त्या संमेलनांत मांडवून माझ्या भवितव्यानेंच माझा गळा त्या चळवळींत गुंतवून ठेवला होता असें मी म्हणतों.

त्या संमेलनांत 'ललित वाङ्मय आणि राजकारण' या विषयावर वि. स. खांडेकर आणि मी अशीं दोघांचीं लागोपाठ दोन दिवस स्वतंत्र व्याख्यानें झालीं. संमेलनाच्या शेवटच्या दिवशीं बेळगांवच्या 'टिळक चौका'त पंधरा हजार जनसमूहापुढें 'आगामी लढा' या विषयावर माझें जाहीर भाषण झालें. हें माझें भाषण एवढें जहाल झालें, कीं पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. कोरीन ह्यांनीं 'जहाल भाषणें बंद करा' अशा आशयाची मुंबई सरकारच्या वतीनें माझ्यावर पुढीलप्रमाणें नोटीस बजावली :

"तुम्ही बेळगांव येथें दि. १४ मे १९४६ रोजीं जसें व्याख्यान दिलें, तशीं जहाल व्याख्यानें न देण्याबद्दल सरकारनें तुम्हांला ताकीद द्यावयास मला सांगितलेलें आहे. मी तुम्हांला कळवितों कीं, हिंसेला उत्तेजन दिल्याबद्दल मला तुमच्या भाषणांविरुद्ध यापुढें खटला भरणें भाग पडेल!"

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या पत्राला मी पुढीलप्रमाणें ठणठणीत उत्तर दिलें.

" जवळ जवळ दहा वर्षें मी कॉंग्रेसमध्यें आहें. अहिंसा तत्त्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. वक्ता आणि लेखक या नात्यानें टीकेसाठीं मी विनोदाचा उपयोग करतों. हिंसेचा प्रचार करणें हा विनोदाचा धर्मच नाहीं. कारण भाषेची अहिंसा म्हणजेच मुळीं विनोद. दि. १४ मे रोजीं मीं बेळगांवला जें भाषण केलें तें जहाल ( intemperate ) होतें आणि त्यांत मीं जनतेच्या हिंसावृत्तीला जागृत करण्याचा प्रयत्न केला, असा सरकारचा जो आक्षेप आहे, तो मला बिलकूल मान्य नाहीं. हा आक्षेप नाशाबित करणारा भरपूर पुरावा मी देऊं शकेन.

" कॉंग्रेस राजकारणावर मी पुष्कळ वर्षांपासून जाहीर व्याख्यानें देत आहें. गेल्या निवडणुकीच्या वेळीं सध्यांच्या कायदेमंडळांतल्या पुष्कळशा कॉंग्रेस आमदारांनीं आणि कांहीं मंत्र्यांनीं सुद्धां माझीं भाषणें ऐकलेलीं आहेत. पण त्यांपैकीं कोणालाहि माझ्या भाषणांमध्यें अशा प्रवृत्ति यापूर्वीं आढळून आलेल्या नाहींत. साताऱ्याच्या प्रतिसरकारनें स्वातंत्र्याशीं द्रोह करणाऱ्या लोकांना कशा कडक शिक्षा दिल्या, हें मी बेळगांवच्या या भाषणांत सांगितलें हें खरें. समाजविरोधी भांडवलवाले, नफेबाज आणि काळाबाजारवाले यांच्या विरुद्ध माझ्या या भाषणांत फार कडक भाषा वापरली आणि त्यांना बजावलें कीं, जनतेचें जर फिरून आंदोलन सुरू झालें तर त्या वेळीं ह्या लोकांना फार जड गेल्यावांचून रहाणार नाहीं.

" तथापि, कॉंग्रेसच्या ध्येयप्रणालीविरुद्ध एक अक्षर देखील माझ्या या भाषणामध्यें मीं उच्चारलें नाहीं. म्हणून माझ्या भाषणावर उपाययोजना करण्याची जी धमकी तुम्हीं मला दिलेली आहे तिनें मी मुळींच घाबरलों नाहीं. जोंपर्यंत प्रांतिक कॉंग्रेस माझ्या भाषणांना शिस्तभंगाखालीं प्रतिबंध करीत नाहीं, तोंपर्यंत मी अशाच तऱ्हेचीं भाषणें यापुढें करीत रहाणार, असें मी तुम्हांला कळवितों. मी केवळ स्वातंत्र्यवादी कॉंग्रेसजनच नाहीं. तर मी समाजवादी पण आहें. साम्राज्यशाहीबरोबरच भांडवलशाहीचाहि संपूर्ण नाश व्हावयाला पाहिजे असें मला वाटतें. आणि या माझ्या विश्वासाबद्दल मी पडेल ती किंमत द्यावयाला तयार आहें ! "

ह्यानंतर हें प्रकरण तेथेंच मिटलें. पण तेव्हांपासूनच मुंबई राज्यांतल्या कॉंग्रेस सरकारला माझ्याबद्दल वैषम्य वाटूं लागलें.

# ४९

## ‘ पाणिग्रहण ’

‘ जग काय म्हणेल ? ’ या माझ्या गंभीर नाटकानंतर अवघ्या सात महिन्यांनीं ‘ पाणिग्रहण ’ हें माझें विनोदी नाटक रंगभूमीवर आलें. त्याचा पहिला प्रयोग पुण्याच्या भानुविलास नाटकगृहांत ११ ऑक्टोबर १९४६ रोजीं ‘ बालमोहन ’नें करून दाखविला. ‘ जग काय म्हणेल ? ’ हें माझें नाटक मीं समाजवादाची क्रांतिज्योत श्रीमति अरुणा असफअली ह्यांना अर्पण केलें होतें, तर ‘ पाणिग्रहण ’ नाटक हें मीं माझे ‘ विद्वान रसिक आणि मायाळू ’ मित्र प्रा. कृष्णाजी पांडुरंग उर्फ नानासाहेब कुळकर्णी ह्यांना ‘ दोन तपांच्या शुद्ध आणि निर्हेतुक मैत्रीची आठवण ’ म्हणून अर्पण केलेलें होतें.

‘ पाणिग्रहण ’ हें माझें दहावें नाटक. १९३३ ते १९४६ पर्यंतच्या तेरा वर्षांच्या काळांत मी एकंदर दहा नाटकें लिहिलीं. आणि तीं दहाचीं दहा नाटकें रंगभूमीवर पराकाष्ठेचीं यशस्वी झालीं.

‘ पाणिग्रहण ’ हें स्वतंत्र नाटक आहे. पूर्वी मी ‘ दिल–की बात ’ नांवाचा हिंदी चित्रपट ‘ अत्रे पिक्चर्स ’ तर्फे निर्माण केला होता. त्याचें कथालेखन आणि दिग्दर्शनहि

मीच केलें होतें. तेंच माझें पहिलें दिग्दर्शन होय. त्याच्याच कथानकावर मी ‘ पाणिग्रहण ’ नाटकाची उभारणी केली होती.

या नाटकाचा विषय अगदीं साधा आणि सामान्य होता. प्रेम कीं पैसा ? त्याच्या भोंवती प्रेमाचा त्रिकोण उभा करून मीं त्याच्यामध्यें एक अद्‌भुतरम्य संघर्ष निर्माण केला होता. तथापि ह्या नाटकाचे संवाद आणि स्वभावचित्रण इतकें विनोदी होतें, कीं प्रारंभापासून तों शेवटपर्यंत नाटकगृहांत हास्यरसाचीं कारंजीं एकसारखीं उचंबळत रहात. हास्यरसनिर्मितीच्या दृष्टीनें या नाटकाची तुलना माझ्या ‘ भ्रमाच्या भोपळ्या ’शीं करतां येईल.

चंडोल नांवाचा एक अत्यंत प्रतिभाशाली आणि तितकाच दरिद्री कवि हा या नाटकाचा नायक असतो. तो एका भिकार चाळींत चार रुपये महिना भाड्याच्या खोलींत रहात असतो. पण तीनतीन चारचार महिन्यांचें त्याचें भाडें थकलेलें असतें. त्याच्या शेजारच्या खोलींत नीरा नांवाची एक तरुण परित्यक्ता स्त्री आणि तिची दहा वर्षांची चंदू नांवाची मुलगी रहात असते. चंडोलची आणि चंदूची चांगली गट्टी असते.

नाटकाची सुरुवात एका सकाळीं होते. आधल्या रात्रीं चंडोलनें एक सुंदर कविता लिहिलेली असते. त्यामुळें त्याला जाग्रण झालेलें असतें. सकाळचे आठ वाजले तरी तो झोपलेला असतो. चंदू खोलींत जाऊन त्याला उठवते. तो चंदूला प्रेमानें जवळ घेऊन तिचा मुका घेऊं लागतो.

**चंदू :** मला नको जा तुझ्या घाण तोंडाचा मुका ! आणखी विड्या ओढ— विड्या ओढ—

**चंडोल :** चंदे, मी कवि आहे हें ठाऊक आहे ना तुला ? विड्या ओढल्या-वांचून आम्हांला मुळीं कविताच करतां येत नाहींत ! शेक्सपिअर विड्या ओढीत होता. कालिदास विड्या ओढीत होता. गडकरी विड्या ओढीत होते. मग मी कां विड्या ओढूं नको ? काल रात्रीं मी विड्यांचीं दोन बंडलें फस्त केलीं म्हणून मला ही एवढी सुंदर कविता लिहितां आली !

कांहीं वेळानें चंदूची आई नीरा च्हा घेऊन तेथें येते. चंडोलच्या खोलींतला अस्ताव्यस्तपणा आणि गबाळपणा पाहून निरेला वाईट वाटतें.

**चंडोल :** नीराताई, आम्ही कवि लोक काय माणसांत जमा असतों ? एकदां आमची ब्रह्मानंदीं टाळी लागली म्हणजे मग आम्हांला भूक नाहीं कीं तहान नाहीं ! ( स्टोव्ह दाखवून ) ही आमची अन्नपूर्णादेवी बघा. घासलेट नसल्यामुळें गेल्या आठ दिवसांत ती पेटली नाहीं—

**नीरा :** मग घेऊन कां आलां नाहीं घासलेट ?

**चंडोल :** महाराष्ट्राचा एवढा मोठा कवि मी ! हातांत टिनपाट घेऊन त्या

घासलेटच्या रांगांत तासन् तास उभा राहूं होय रस्त्यावर ?

**नीरा :** आणि हें तुमचें घड्याळ ! किती दिवसांत किल्ली दिली नाहींत याला ?

**चंडोल :** किल्ली देऊन उपयोग काय ? त्याचा तास-काटा तुटून एक वर्ष झालं ! एका पायावरच लंगडतं आहे तें ! तुम्हांला काय वाटतं, मी या खोलीत राहतों ? वर राहतों मी. वर आढ्याकडे काय बघतां ? वर म्हणजे स्वर्गांत ! अप्सरांच्या गळ्यांत हात घालून आम्हीं नंदनवनांतून सांजसकाळ हिंडतों. चंद्राबरोबर नि चांदण्यांबरोबर फेर धरून आम्ही ढगावर नाचतों. आणि अमृताचें निशापाणी करून कल्पवृक्षाखालीं बेहोष पडलेले असतों.

**नीरा :** आतां खालीं पृथ्वीवर उतरा—आणि रक्तमांसाच्या मुलीबरोबर लग्न करून माणसांमध्यें जमा व्हा——

**चंडोल :** छान, म्हणजे काय एकाच पोटाचा प्रश्न आहे—त्याच्यांत पाच सात पोटांची आणखी भर पडायची.

चंडोल आपली कविता नीराला वाचून दाखवतो. तोंच भाडें वसूल करणारा कारकून अचानक मध्यें येतो. दोघांची खूपच बाचाबाची होते. आणि प्रकरण हात-घाईवर येतें. तोंच ' अर्धांगी ' नांवाच्या स्त्रियांच्या मासिकाचा संपादक चतुर्भुज ऐन वेळीं येतो. तो चंडोलचें राहिलेलें भाडें कारकुनाच्या अंगावर फेकून देतो. कांहीं करून चंडोलचें लग्न जमवून टाका असें नीरा चतुर्भुजला कळवळून सांगते.

**चंडोल :** हा चतुर्भुज माझं लग्न जमविणार ? ह्याच्या नांवावरून तुझा गैरसमज झालेला दिसतोय ? स्वतःचें लग्न जमेना म्हणून यानें ' अर्धांगी ' हें स्त्रियांचें मासिक काढलें तरी याच्या अर्धांगीचा पत्ता नाहीं.

दिवाळीच्या अंकासाठीं चंडोलची कविता घेऊन चतुर्भुज आपल्या ऑफिसाकडे जाऊं लागतो तोंच वाटेंत, त्याला मसाले, लोणचीं, पापड, मुरंबे बनवणारे ' सुप्रसिद्ध घोडके ' भेटतात. चतुर्भुज त्यांना प्रारंभीं ओळखत नाहीं. तेव्हां घोडके म्हणतात, ' अरे, आम्हीं इतके पब्लिक गृहस्थ आहोंत ! आम्हांला ओळखत नाहीं ? एक वेळ गांधी नेहरूंचे फोटो दिसायचे नाहींत तुम्हांला रोजच्या पत्रांत. पण आमचा फोटो प्रत्येक दिवशीं वर्तमानपत्रांत छापून आलाच पाहिजे ! '

घोडके हें या नाटकांतलें अत्यंत विनोदी पात्र. वयाच्या तेराव्या वर्षी ते घरांतून पळून गेले. दहा वर्षें त्यांनीं ' गंधर्व नाटक मंडळीं 'त काढलीं. अर्थात् वाढपी आणि आचारी म्हणून. तेथून ते मुंबईला गेले. काकूबाईच्या खानावळीचे ' पार्टनर ' झाले. मग त्यांनीं पापड मसाल्याचा कारखाना काढला. दुसऱ्या लढाईंत सैन्याला पापड मसाले पुरवण्याचें कॉन्ट्रॅक्ट त्यांना मिळालें. ' खिशांत आमचे पापड आणि हातांत बंदूक ! खाताहेत पापड अन् लढताहेत एकसारखे. असा फडशा पाडला म्हणतां शत्रूचा

त्यांनीं !' युद्धकालीन सहा वर्षांत त्या कंत्राटावर त्यांनीं दहा लाख रुपये मिळविले.

त्यांचे वडील नि आई जिवंत असतात. आई साठ वर्षांची 'वुइडो' (म्हातारी) असते. आपल्याला शिकलेली बायको मिळावी अशी त्यांची 'अॅन्युलन्स' (अॅम्बीशन) असते. म्हणून 'अर्धांगी' मासिकाच्या एक कुमारी लेखिका प्रभात हिच्याशीं आपली ओळख करून द्या अशी ते संपादक चतुर्भुजना विनंती करतात.

चतुर्भुज त्याना सांगतो, 'ती मुलगी सामान्य नाहीं. शिवाय सुशिक्षित आहे.' तेव्हां घोडके म्हणतात 'तुम्हीं तिची नि माझी ओळख तर करून द्या. असं तिच्यावर 'इंजेक्शन' (इम्प्रेशन) मारतों!' इंग्रजी येत नसतांना चुकीचे इंग्रजी शब्द वापरण्याचा घोडक्याला हव्यास असतो. त्यामुळें त्याच्या बोलण्यानें खूपच विनोद निर्माण होतो.

चंदूला गोष्टींचें पुस्तक विकत घेऊन देण्यासाठीं चंडोल बाजारपेठेंत गेला असतांना, तेथें एका चमत्कारिक घटनेमुळें कु. प्रभातशीं त्याची ओळख होते. प्रभात ही चंडोल कवीचा काव्यसंग्रह विकत घ्यावयाला चालली होती. ती अर्थात् चंडोल कवीला व्यक्तिशः ओळखतच नसते. चंडोल प्रभातला चांगलाच बनवतो. तो म्हणतो, 'अहो, ज्ञानेश्वर तुकाराम ह्यांचीं काव्यें वाचत बसावयाचीं सोडून तुम्ही या गांजेकस चंडोलाच्या नादीं कुठें लागलांत?' 'चंडोल कवी' ची बाजू घेऊन प्रभात चंडोलशीं खूपच भांडते. अशा विलक्षण रीतीनें त्या दोघांची ओळख होते.

प्रभातची आई लहानपणीं वारली होती. त्यानंतर तिचें पालन–पोषण अन् शिक्षण तिच्या मावशीनें केलें. मावशी ही फार जहांबाज बायको असते. तिचे यजमान काका हे साठ वर्षांचे होते, तरी मावशीला पाहातांच त्यांना घाम फुटे. त्यांना धूम्रपानाचा जितका षोक होता तितकाच मावशीला त्या व्यसनाचा तिटकारा होता. म्हणून मावशीला चुकवून आपली धूम्रपानाची तल्लफ भागवतांना काकांची जी तिरपीट होई ती पाहून प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळत.

**मावशी :** लग्नाच्या वेळीं माझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगितलं होतंत कीं, जन्मांत मी विडीला न् तंबाखूला शिवणार नाहीं—

**काका :** लग्नाच्या वेळीं माणूस अडचणींत असतो. त्यावेळीं तो काय वाटेल त्या शपथा घेतो.

चंडोलला घेऊन प्रभात आपल्या घरीं येते न येते, तोंच संपादक चतुर्भुज घोडक्यांना प्रभातची ओळख करून देण्यासाठीं तेथें येतात.

**चतुर्भुज :** हे महाराष्ट्राचे अत्यंत सुप्रसिद्ध नि धनाढ्य व्यापारी श्रीमान घोडके—

**घोडके :** यस, आय इझ धी घोडके.

**प्रभात :** कसला व्यापार करतात हे !

**घोडके :** वेल, आय मेक, पापड लोणचीज अन् मसालाज.

नंतर चतुर्भुज चंडोल कवीची घोडक्याशीं ओळख करून देतो. तो चंडोल कवि आहे हें प्रथमच प्रभातला कळतें. ती लाजून घरांत पळते.

**घोडके :** ( चंडोलला ) प्रसिद्ध चंडोल कवि ते आपणच ? [यू मेक पोलट्री ( पोएट्री ) काय ? मग तुम्ही आम्हांला ओळखत असालच.

**चंडोल :** म्हणजे काय, जेवायच्या वेळीं प्रत्येक ठसक्याबरोबर लोकांना तुमची आठवण होते. अन् बायका तर धोंडोपंत कर्वे आणि गोपाळराव देवधर यांच्या आधीं तुमचे नांव घेतात—

**घोडके :** कांहीं विचारूं नका. बायकांमध्यें आम्हीं भयंकर रिपब्लिक.

काकांना ऐकूं जरा कमीच येतें. ते घोडक्यांना पुन्हां पुन्हां 'बोडखे' असें संबोधतात. पण घोडक्यांच्या एकंदर श्रीमंतीवर मावशी फार खूष होते. चंडोल कवि तिला मुळींच आवडत नाहीं.

**मावशी :** पगार किती मिळतो चंडोलना ?

**प्रभात :** कविता करून कुठें पगार मिळतो ?

**मावशी :** मग कशाला करतात कविता हे ?

**प्रभात :** कविता करून नांव केवढं मिळतं ?

**मावशी :** पैसा नाहीं तर नुसत्या नांवाला घेऊन काय जाळायचंय ? महात्मा गांधींचें एवढं मोठं नांव ! पण त्यांना नेसायला धोतर नाहीं कीं घालायला सदरा नाहीं—

**घोडके :** आणि रहातात जाऊन भंग्याच्या वस्तींत.

प्रभातला भेट देण्यासाठीं घोडक्यांनीं आणलेली मौल्यवान आंगठी मावशी मधल्या मध्येंच उपटते. घोडके निघून गेल्यानंतर त्यांची उपेक्षा केल्याबद्दल मावशी प्रभातची खूपच खरडपट्टी काढते.

**मावशी :** त्या 'चांडाळ' कवीशीं मात्र चुरुचुरु बोललीस आणि घोडक्याकडे मात्र ढुंकून पाहिलें नाहींस.

**प्रभात :** मला ठाऊक आहे. तुला वाटतें मी या पापडमसालेवाल्याशीं लग्न करावें ! त्याच्याशीं लग्न करून मी काय ठमाबाई घोडके बनूं अन् लोणच्याच्या बरण्या डोक्यावर घेऊन गांवभर हिंडूं ओरडत 'लोनचं घ्यायचं काय वो लोनचं ?' त्या माणसाचं शिक्षण काय ? 'आय इझ द घोडके !'

**मावशी :** नुसत्या शिक्षणाला काय जाळायचंय ? तो शिकलेला नसला म्हणून तूं तर शिकलेली आहेस ना ? नवरा–बायकोपैकी कोणी तरी एकानं शिकलेलं असलं म्हणजे झालें !

**प्रभात :** ज्या माणसावर प्रेम नाहीं त्याच्याशीं लग्न करणें मला शक्य नाहीं—

**मावशी :** लग्नाच्या आधीं पुरुषावर कुठें प्रेम बसतं ? आयुष्य म्हणजे काय

कादंबरी आहे, नाटक आहे, का सिनेमा आहे ? तुझ्या काकांशीं मी लग्न केलं त्या वेळीं त्यांच्यावर माझं प्रेम का होतं ? त्यांच्यावर कोणाचं तरी प्रेम बसणं शक्य आहे ? मी त्यांच्याशीं लग्न केलं नसतं तर आतांपर्यंत त्यांचं लग्न तरी झालं असतं का ?

येथें नाटकाचा पहिला अंक संपतो. दुसऱ्या अंकाच्या प्रारंभीं घोडके चंडोल कवीच्या घरीं जाऊन प्रभातचा नाद सोडून द्या असें स्पष्ट शब्दांत त्याला बजावतो.

**घोडके :** प्रेमाच्या चार पाणचट कविता खरडल्यानें ही पोरगी तुझ्यावर भाळेल होय रे ?

**चंडोल :** तुझ्या अंगाला येणाऱ्या लोणच्याच्या वासावर ती खूष होईल काय रे लेका घोडक्या ?

**घोडके :** जाऊं दे ! व्हाय चर्चा ?

प्रभातला नि मावशीला घेऊन आपल्याला सिनेमाला जायचें आहे असें सांगून घोडके घाईघाईनें निघून जातो. चंडोलच्या अंगाचा तिळपापड होतो. घोडके आपली मोटार घेऊन जाण्यासाठीं त्यांच्या बंगल्यावर जातो. प्रभात टेनिस खेळायला क्लबवर निघालेली असते. तेथें चंडोल येणार असतो. आपल्याबरोबर प्रभात सिनेमाला येत नाहीं हें पहातांच मावशी भयंकर आकस्ताळेपणा करते. 'तूं जर आमच्याबरोबर आज सिनेमाला आली नाहींस, तर मी अन् तुझे काका पाणी प्यायला या घरांत थांबणार नाहीं !–' अशी मावशी तिला धमकी देते. तेव्हां मग टेनिस रॅकेट फेकून देऊन प्रभात घोडक्याच्या मोटारींत बसते.

तिकडे क्लबवर प्रभातची वाट पाहून पाहून चंडोल थकतो. तेव्हां तिचा शोध घेण्यासाठीं तो तिच्या घरीं येतो, तोंच घोडक्याची मोटार मावशीला नि प्रभातला घेऊन त्याच्या अंगावरून जाते. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नाहीं.

चंडोलचें डोकेंच फिरतें. 'प्रेम हें अमृत नसून विष आहे.' असें तो चिमुकल्या चंदूला सांगतो. तो प्रभातला पुष्कळ पत्रें लिहितो. पण तीं पत्रें प्रभातच्या हातीं न पडतील अशी मावशीनें आधींच व्यवस्था केलेली असते.

मावशी जबरदस्तीनें प्रभातला घोडक्यांच्या बरोबर निरनिराळ्या ठिकाणीं घेऊन जाते. घोडक्यानें पाठवलेल्या मौल्यवान देणग्या ती स्वीकारते. प्रभातला तें मुळींच आवडत नाहीं. ती चिडते, संतापते. मावशी न् तिची वारंवार खडाजंगी होते.

**प्रभात :** लग्न हें दोन अंतःकरणांमध्यें लागतें. शरीरामध्यें नाहीं.

**मावशी :** अशी अंतःकरणाचीं लग्न लावून का कुठं पोरंबाळं होतात अन् संसार चालतात ? अखेर, मी सांगते त्याच्याशींच तुला लग्न लावावं लागेल !

**प्रभात :** मग मी या घरांतून चालती होईन—

**मावशी :** जा, उंबऱ्याबाहेर पाऊल पडलं नाहीं, तोंच येशील परत गळा

काढून–‘ मावशी ग ! ’

**प्रभात :** हीच, हीच तुझी घमेंड आहे. तुला वाटतं आपल्यावाचून कोणाचं चालायचं नाहीं–एवढंच काय पण जग देखील चालणार नाहीं. आजपर्यंत मला पांगळी करून तुझं समाधान झालं नाहीं. म्हणूनच कीं काय, तूं सांगशील त्या माणसाच्या गळयांत मान अडकवून मी जन्माचं दुबळं व्हावं. म्हणून तुझ्या प्रेमाचा हा तमाशा तूं चालविला आहेस ! नाहीं–मावशी इतःपर तुझा हा जुलूम मी मुळींच चालू देणार नाहीं !

प्रभातला आपण इतकीं पत्रें पाठविलीं तरी तिच्याकडून एकाचेंहि उत्तर आलें नाहीं म्हणून चंडोल भ्रमिष्ट होऊन गांवभर भटकत फिरतो. त्यामुळें त्याची शेजारीण नीरा हिला त्याची चिंता वाटूं लागते. चंडोलबद्दल प्रभातचें मन कलुषित केल्यावांचून तिला त्यांच्याबद्दल वाटणारें आकर्षण कमी होणार नाहीं अशी मावशीची खात्री वाटते. म्हणून एक दिवस ती चंडोलच्या खोलीवर जाते. तेथें चंडोल नसतो. पण त्याच्याबद्दल चिंता करीत बसलेली नीरा आणि चंदू तिला आढळते.

त्याबरोबर तिच्या मनांत एकदम कल्पना येते. नीरा ही चंडोलची रखेली असून तिच्यापासून त्याला चंदू ही मुलगी झालेली आहे अशी अफवा आपण चंडोलच्या विरुद्ध उठवली म्हणजे मग प्रभात चंडोलचा द्वेष करूं लागेल आणि घोडक्याशीं लग्न करावयाला ती आपसुखच तयार होईल अशी मनाशीं खूणगांठ बांधून मावशी घरीं परतली.

दरम्यान चंडोल आणि प्रभातचें तिच्या दिवाणखान्यांत प्रचंड भांडण जुंपलें होतें.

**चंडोल :** दहा वेळां मी इथें येऊन गेलों. आतांपर्यंत दहा पत्रें लिहिलीं मी तुला !

**प्रभात :** मीहि दहा पत्रें लिहिलीं असतील तुम्हांला–गेले आठ दिवस मी तुमच्या नांवाची जपमाळ घेऊन बसलें आहे !

**चंडोल :** म्हणूनच तूं त्या हलकट मसालेकुट्याबरोबर गांवभर हिंडते आहेस ! हें तुझं माझ्यावरचं प्रेम होय ? मला कळलं आहे की तूं त्याच्याशीं लग्न करायचं ठरवलं आहेस !

**प्रभात :** फुकट–फुकट तुम्हीं कवि झालात चंडोल ! आभाळांत भराऱ्या मारून कशाला ती ग्रहगोलांचीं नि चांदण्याचीं कोडीं सोडवितां ? तुमच्यासारख्या द्रष्ट्या कवीला दोन हातांवर उभ्या असलेल्या एका स्त्रीचं अंतःकरण कळत नाहीं !

**चंडोल :** माझ्या गालावरच्या प्रेमाश्रूंचे ओघळ अद्याप सुकले नाहींत. माझ्या प्रेमकाव्याची तांबडी शाई अजून वाळली नाहीं. तोंच पैशाच्या मोहानं एका दीड

दमडीच्या माणसाखातर तूं माझ्या प्रेमाचा अन् कवितेचा लिलाव करून टाकलास ! घोडके म्हणाला तेंच खरं. दुनिया हा एक बाजार आहे. ज्याच्याजवळ पैसा असतो, त्याचाच शेवटीं सौदा पटतो.

**प्रभात :** प्रेम म्हणजे पैशानें खरेदी करतां येण्यासारखा बाजारी सौदा वाटतो तुम्हांला ? मग प्रेमाच्या अमरत्वावर कशाला आतांपर्यंत काव्यें लिहिलींत ! काव्य हें तुमचें निव्वळ ढोंग आहे ढोंग ! पोकळ धमक्यांच्या जोरावर स्त्रीवर सत्ता चालवणारे किडलेल्या अंतःकरणाचे तुम्ही एक भ्याड आणि संशयी पुरुष आहांत !

अशा तऱ्हेनें दोघांचें हें भांडण विकोपाला जात आहे, तोंच मावशी प्रवेश करते. आणि ती चंडोलवर अगदीं सरळ सरळ कडाडून आरोप करते.

**मावशी :** ( चंडोलला ) एका विधवा बाईला घेऊन तू आपल्या घरांत रहातोस का नाहीं ? तिच्यापासून तुला एक मुलगी झाली आहे कीं नाहीं ?

तेव्हां चंडोलला असें वाटतें आपल्या नांवाची बदनामी करून आपल्याला आयुष्यांतून सपशेल उठवून लावण्याचा हा डाव असावा, तेव्हां तो चिडून म्हणतो, ‘ अहो, एकच काय, गांवांत छपन्न बायका आहेत माझ्या ! आतां जा, मारा माझ्या नांवानें बोंबा ! ’ असें म्हणून तो त्वेषानें निघून जातो. प्रभात मावशीच्या गळ्याला मिठी मारून ढसढसा रडूं लागते.

मावशीचें कारस्थान अखेर यशस्वी झालें. ‘ तूं सांगशील त्याच्याशीं मी लग्न लावायला तयार आहें ! ’ असें प्रभात मावशीला सांगते. त्यानंतर ‘ मी घोडके यांच्याशीं लग्न करायचें ठरविलें आहे, यापुढें तूं माझ्या घरांत पाऊल टाकतां कामा नये ’ असें चंडोलला उद्देशून मावशी प्रभातकडून तिच्या अक्षरांत पत्र लिहविते.

‘ प्रभात तुमच्याशीं लग्न करायला तयार आहे ’ असें मावशींनीं घोडक्यांना सांगतांच त्यांचा आनंद गगनांत मावेनासा होतो.

**घोडके :** मावशी–मावशी–व्हेअर शाल आय पुट यू !

घोडके प्रभातची भेट घेतो आणि ‘ इंग्लिश कम्स टु मी व्हेरी वेल ’ असें तिला सांगतो.

**प्रभात :** एका अटीवर तुमच्याशीं लग्न करायला तयार आहें. लग्न झालें तरी माझं शरीर तुम्हांला मिळेल. मन मिळणार नाहीं.

**घोडके :** कांहीं हरकत नाहीं. आम्हीं बोलून चालून व्यापारी माणसं ! शरीर काय अन् मन काय ? आमच्या दृष्टीनें दोहोंचा हिशेब एकच.

प्रभातच्या हस्ताक्षरांतलें पत्र मिळतांच चंडोल आत्महत्या करायचें ठरवितो. कारण आतां जगण्यांत त्याला कांहीं अर्थ वाटत नाहीं. नीरा आणि चंदू त्याला अडवून धरतात. तोंच काका त्या ठिकाणीं येतात. आणि आपल्या प्रभावी भाषणाचा ते चंडोलवर एवढा भडिमार करतात कीं चंडोल सर्द होतो.

**काका :** थू : तुझ्या जिनगानीवर लेका, यःकश्चित् एका पोरीसाठीं मरतोस ? तुला मरायचं असेल तर देशासाठीं मर, राष्ट्रासाठीं मर—असें मरण मर कीं, त्या मरणानं सारं राष्ट्र जिवंत झालं पाहिजे ! तुला मरायचं होतं तर त्या बेचाळीसच्या लढ्यांत लहान पोरं गेलीं त्या वेळीं तूं कां मेला नाहींस ? त्या वेळीं तूं कां बसला होतास प्रेमाचीं रंडागीतं खरडीत ? ' करा नाहीं तर मरा ' असें महात्मा गांधींनीं जेव्हां देशाला सांगितलं त्या वेळीं तूं मेला असतास तर लेका, आज अमर तरी झाला असतास ! काय रे प्रेमभंग झाला कीं आत्मत्या केली पाहिजे, हें तूं कुठं शिकलास ! तो लैला-मजनू सिनेमा बघून ! त्या तसल्या भ्याड प्रेमाला जग कवडीची किंमत देत नाहीं. मोठं प्रेम करायला छातीहि मोठी लागते, त्या शहाजहान बाद-शहासारखी ! मुमताज मेल्यानंतर त्यानं आत्महत्या केली नाहीं ! उलट वीस वर्षें तो धैर्यानें जिवंत राहिला आणि त्यानें तिच्यावर ताजमहाल बांधला. असा काव्याचा ताजमहाल बांध तुझ्या प्रेमभंगावर ! म्हणजे जगाला कळेल तरी तुझं प्रेम केवढं मोठं होतें तें !

त्याबरोबर चंडोल काकांचे पाय धरतो.

**चंडोल :** नाहीं, काकासाहेब मी मरणार नाहीं—मी जगणार, आजन्म अविवाहित राहून माझं सारं आयुष्य मी देशासाठीं खर्च करणार ! सारं विश्व आतां मला प्रेममय वाटूं लागलं आहे. चला, प्रभातच्या लग्नाला आपण हजर राहूं नि तिच्यावरचं आपलं प्रेम किती शुद्ध आहे तें साऱ्या जगाला दाखवूं.

चंडोल नि काकांच्या बरोबर प्रभातच्या लग्नाला हजर राहण्यासाठीं नीरा आणि चंदू ह्या देखील गेल्या.

लग्नाच्या आनंदानें घोडक्याचें डोकें स्वर्गाच्या आढ्याला लागलें होतें. त्यांत त्यानें दारू पिण्याचा सपाटा चालवला होता. त्यामुळें तो अगदीं टेर झाला होता. त्या धुंदींत तो मावशीशीं लगट करण्याचा प्रयत्न करतो. मावशी त्याचा प्रतिकार करते. तेव्हां घोडके चिडून तिला म्हणतो, ' प्रभातशीं माझं लग्न जमविण्यासाठीं पंचवीस हजार रुपये तूं माझ्याकडून घेतलेस—अन् तुझ्या अंगाला मला हात लावून देत नाहींस ? ' त्यावर त्या दोघांची झटापट होते. एवढ्यांत प्रभात येते.

**मावशी :** प्रभात, हा माणूस हलकट आहे. दारुड्या आहे. माझा हात धरून यानें माझी अब्रू घेण्याचा आतां प्रयत्न केला.

**घोडके :** साफ खोटं आहे. उलट तुझ्याशीं माझं लग्न लावल्याबद्दल हा पंच-वीस हजारांचा चेक हिनें माझ्याकडून घेतला आहे.

ह्याच वेळीं काका-चंडोल वगैरे मंडळी येतात. काकाला जेव्हां पंचवीस हजारांची भानगड कळते तेव्हां ते मावशीवर भयंकर संतापतात. तेव्हां मावशी काकांचे पाय धरून त्यांना विनवतात, " मी पाया पडतें तुमच्या. माझी चूक झाली.

मला क्षमा करा. पण हें लग्न होऊन देऊं नका!"

**काका** : तूं नको म्हणतेस ना! मग हें लग्न होणार! शास्त्रीबुवा, धरा अंतरपाट अन् करा सुरुवात.

आतां लग्न लागणार तोंच काका ओरडतात, "थांबवा तें लग्न. चंडोल, बोलवा पोलिसांना!" पोलिसाचें नांव काढतांच घोडके घाबरतो. काका त्याच्यावर कडाडतात, "हरामखोर, पहिली बायको जिवंत असतांना आम्हांला फसवून आमच्या मुलीचा गळा कापतोस होय? नीरा, बाहेर ये (नीरा नि चंदू येतात). ही बघ तुझी बायको आणि तुझी ही मुलगी!" तेव्हां घोडक्याला पश्चात्ताप होतो. तो काकांचे पाय धरतो. आणि आपल्या परित्यक्ता बायकोचा नि मुलीचा आनंदानें स्वीकार करतो. मावशी नीराच्या कपाळाला कुंकू लावते.

**काका** : एक कार्य तर झालं–आतां दुसरं–ए कवि, चल ये इकडे—

**चंडोल** : पण मी तर आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केली आहे मघाशीं तुमच्याबरोबर—

**काका** : मी देखील लग्न होण्यासाठीं अविवाहित राहण्याची अनेक वेळीं प्रतिज्ञा केली होती. पण त्यानंतर तीन लग्नें केलीं.

असें म्हणून काका प्रभातचें नि चंडोलचें लग्न लावून देतात.

**मावशी** : आतां मात्र अगदीं माझ्या मनासारखं झालं.

**काका** : मग आतां माझ्या मनासारखं कर. चिरूट आंतून पेटवून आण—

**मावशी** : अहो, पण तुम्ही मला वचन दिलं होतं ना?

**काका** : (ओरडून) वचन गेलं खड्डयांत. आतां चिरूट, चिलीम, गुडगुडी काय वाटेल तें ओढीन मी–अन् वर तुलाहि ओढायला लावीन. आतां ही पोरगी सासरीं जाणार. (मावशी गळा काढते) तेव्हां या घरांत आतां तूं न् मी! पूर्वींचें तुमचें तें राज्य आतां संपलं बरं मावशीबाई! यापुढं या घरांत तुम्हांला रोज स्वयंपाक करावा लागेल, भांडीं घासावीं लागतील, सकाळ-संध्याकाळ नदीवरून 'पाणी-ग्रहण' करावं लागेल! जा, थांबलीस काय? गेट आऊट! अन् डोक्यावरून पदर घे–पदर घे—

हास्यांच्या नि टाळ्यांच्या प्रचंड कल्लोळांत या आनंदपर्यवसायी नाटकाचा असा अत्यंत नाट्यपूर्ण शेवट होतो. जहांबाज बायको आणि तिला घाबरणारा नवरा हा विनोदाचा कधींहि न संपणारा विषय आहे. बायकोला बघून थरथर कापणारा नवरा रंगभूमीवर आला रे आला कीं प्रेक्षक खो खो हंसूं लागतात. ही गोष्ट मीं फार पूर्वींपासून ओळखली होती. 'प्रेमसंन्यासां'त गोकुळ आणि मथुरा हें असेंच एक जोडपें आहे.

माझ्या 'लग्नाच्या बेडीं'त मी गोकर्ण नि गार्गी हें दांपत्य असेंच रंगवलें आहे. माझ्या 'पायाच्या दासीं'त केसूकाका आणि मथुकाकी ही विजोड जोडी रंगवून

मीं तोच हंशा पुन्हां निर्माण केला आहे. आणि त्याच तंत्राचा प्रयोग मीं मावशी आणि काका ह्या भांडखोर पत्नीचा भेदरट नवरा रंगवून फिरून केला आहे.

तथापि, मावशीच्या स्वभावांत मीं निराळा मसाला मिसळला आहे. मावशी हें एक खलपात्र आहे. दुष्टपणा नि विनोद ह्यांचें मिश्रण सहसा कोणी करीत नाहीं. मावशीचें हें पात्र सत्यसृष्टींत मला पहावयाला मिळालें. 'अत्रे पिक्चर्स 'च्या ऐन यशाच्या काळीं माझ्या कंपनीची नायिका 'वनमाला' हिला तिच्या एका मामानें आणि मावशीनें पळवून नेऊन जो गोंधळ निर्माण केला होता, ती हकीगत पूर्वीं एका प्रकरणांत मीं सांगितलेली आहे.

त्या 'मामा 'चें पात्र मीं 'बाईलवेडा' या माझ्या चित्रपटांत रंगविलेलें आहे. आणि 'मावशी 'चें चित्रण मीं या नाटकांत केलेलें आहे. बापू माने ही मावशीची भूमिका इतक्या कमालीच्या कौशल्यानें करीत असे कीं, माझ्या माहितीप्रमाणें कोणाहि पुरुष नटानें स्त्री–भूमिकेचा एवढा उच्चांक मराठी रंगभूमीवर गांठलेला नसेल.

घोडके हा शकाराचा दुसरा नमुना आहे. पैशाच्या जोरावर खालच्या वर्गातला असंस्कृत आणि अशिक्षित माणूस लग्नाच्या मार्गानें बरच्या वर्गांत शिरण्याचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हां तो स्वतःला किती हास्यास्पद बनवितो त्याचें यथार्थ चित्रण या भूमिकेंत केलें आहे. चंडोल हा माझ्या नाटकांत रंगविलेला दुसरा कवि आहे. 'साष्टांग नमस्कारां 'तला कवि भद्रायु हा विनोदी आहे, तर या नाटकांतला कवि चंडोल हा अत्यंत गंभीर आणि भावनाप्रधान आहे.

या नाटकांत अवघीं आठ पात्रें असून त्याचें कथानक अगदीं सोपें, गतिमान आणि संघर्षपूर्ण आहे. म्हणून नाटक वाचायला जितकें सुंदर वाटतें तितकेंच प्रयोगाच्या दृष्टीनें तें प्रभावी आहे.

या नाटकाचे महाराष्ट्रांत जसे पुष्कळ प्रयोग झाले त्याप्रमाणें त्याचें गुजराती रूपांतरहि सुरत–अहमदाबादकडच्या प्रेक्षकांना फार आवडलें. विषय सोपा, स्वभाव-चित्रण साधें, कथानक सरळ आणि भाषा बालबोध, अशीं उत्तम नाट्यलेखनाला आवश्यक असणारीं सर्व वैशिष्ट्यें या नाटकांत एकत्रित असल्यानें माझ्या यशस्वी नाटकांमध्यें या नाटकाचा समावेश होतो.

# ५०

## सहा हजारांचा जामीन

दुसरें महायुद्ध संपल्यानंतर मध्यवर्ति आणि प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकींत मुस्लिम लीगवाल्यांना शंभर टक्के यश मिळालें. कारण त्यामध्यें त्यांना कोणी प्रतिस्पर्धीच नव्हते. प्रांतिक कायदेमंडळाच्या सर्व निवडणुका कॉंग्रेसनें 'चलेजाव'च्या मुद्द्यावर लढवल्या. आणि जिंकल्या. 'मुस्लिम लीग'नें प्रांतिक निवडणुका 'पाकिस्तान'च्या प्रश्नावर लढवल्या आणि त्यामध्यें बंगाल वजा करतां 'लीग'चा सपशेल पराभव झाला. सरहद्द प्रांत, आसाम, पंजाब ह्या मुस्लिमप्रधान प्रांतांतहि लीगचा बोऱ्या वाजला.

त्यानंतर १५ मार्च १९४६ रोजीं ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली ह्यांनीं पार्लमेंटमध्यें संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. एवढेंच नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यामधून इच्छा असल्यास बाहेर पडण्याचा हिंदुस्थानचा हक्कहि त्यांनीं मान्य केला. आणि त्याचबरोबर बहुसंख्यांकांच्या राजकीय मुक्तीच्या गाड्यामध्यें अल्पसंख्यांकांना आतां आपण खीळ घालूं देणार नाहीं, असेंहि त्यांनीं अभिवचन दिलें.

पंतप्रधान ॲटली ह्यांची ही घोषणा म्हणजे हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची आणि अखंडत्वाची जणुं कांहीं सनदच आहे असें देशांतील बहुसंख्य हिंदूंना वाटलें. तर देशाचे तुकडे करूं पाहणाऱ्या मुस्लिम लीगवाल्यांना आपल्या डोक्यावर ॲटलींनीं जणुं कांहीं कुऱ्हाडच मारली असें दुःख झालें. आणि त्यानंतर देशामध्यें मुस्लिम लीगवाल्यांनीं जातीय दंग्याचें रणशिंग फुंकलें.

पाकिस्तानी पुढाऱ्यांनीं पौराणिक नाटकांतल्या राक्षसपात्रांप्रमाणें अक्राळ-विक्राळ धमक्या द्यावयास सुरुवात केली. सर फिरोजखान नून म्हणाले, "पाकिस्तान मिळालें नाहीं तर चंगीझखानापेक्षां भयंकर अशी कत्तल आम्ही देशामध्यें करून टाकूं !" बंगालचे माजी मुख्य प्रधान सर निझामुद्दिन म्हणाले, "इंग्लंडला हा देश सोडून जावयाचें असेल तर त्यानें खुशाल जावें. मात्र जाण्यापूर्वी आपल्या-जवळचीं शस्त्रास्त्रें, तोफा, बंदुका, रणगाडे, विमानें त्यांनीं हिंदुमुसलमानांना वांटून द्यावींत. म्हणजे मग आम्ही 'पाकिस्तान'चा आणि 'हिंदुस्थान'चा जो काय निकाल लावावयाचा आहे, तो आपापसांत लढून लावूं." मुंबईचे पाकिस्तानी नेते चुंद्रीगर म्हणाले, "अहो, आम्ही आठशें वर्षें ज्या हिंदूंवर हुकमत गाजविलेली आहे, त्या गुलाम हिंदूंच्या हातांत हे ब्रिटिश लोक आम्हांला परत देणार काय ?"

यादवी युद्धाच्या, कत्तलींच्या नि रक्तपाताच्या नुसत्या धमक्याच देऊन हे पाकिस्तानी आग्यावेताळ थांबले नाहींत. तर २९ मार्च १९४६ रोजी अलिगड विश्व-विद्यालयांतील मुसलमान विद्यार्थ्यांनीं गांवांत शिरून हिंदु व्यापाऱ्यांच्या बाजारपेठेला दिवसाढवळ्या आग लावून दिली आणि हिंदूंचें पंधरा लाख रुपयांचें नुकसान केलें. त्या आगीमध्यें कित्येक माणसें आणि जनावरें होरपळून मेलीं. त्यानंतर दिल्लीला 'पाकिस्तानी घटना परिषद' भरून त्या परिषदेंत हिंदु जनतेच्या विरुद्ध अत्याचार करण्यासाठीं मुसलमान जनतेला अगदीं उघड उघड चिथावणी देण्यांत आली. त्या चिथावणीचा परिणाम असा झाला, कीं दिल्लीला लाठ्या, तरवारी, सुऱ्या, चाकू आणि इतर बारीक सारीक प्राणघातक हत्यारें ह्यांची धूमधडाक्यानें विक्री सुरू झाली.

त्यानंतर देशांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या नि पुढाऱ्यांच्या सल्ल्यानें आणि सहाय्यानें हिंदी स्वातंत्र्याची सर्वमान्य योजना तयार करण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें त्रिमंत्रिमंडळ ( Cabinet Mission ) या देशांत पाठविलें. या शिष्टमंडळानें '१६ मे' ची जी योजना मांडली, तिच्यांत देशाचें स्वातंत्र्य तर कोठेंहि दिसण्यासारखें नव्हतेंच, पण देशाच्या फाळणीचें भूत बरकरणी गाडण्याचें सोंग करून मुस्लीम लीगनें जें एक पाकिस्तान मागितलें होतें, त्याच्या ऐवजीं शिष्टमंडळानें दोन पाकिस्तानें तिला देऊन टाकलीं होतीं. शिष्टमंडळाची ही योजना म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मानगुटीवर पाकिस्तानचा राक्षस कायमचा बसवून ह्या देशांतलें आपलें

स्थान सुरक्षित करण्याचें तें ब्रिटिश साम्राज्यशाहीचें एक भयानक कारस्थान होतें.

घटना समिति स्थापन होऊन घटना तयार होईपर्यंतच्या काळांत समसमानतेच्या तत्त्वावर हिंदुमुसलमानांचें एक संमिश्र मध्यंतर सरकार स्थापन करण्यांत यावें, असें शिष्टमंडळानें सुचविलें होतें. मुस्लिम लीगला पांच काँग्रेसचे, पांच लीगवाले आणि दोन अल्पसंख्यांक असें बारांचें संमिश्र सरकार हवें होतें. ही संख्या पंधराची असावी आणि त्यांत लीगवाले मात्र पांच असावेत, असें काँग्रेसचें म्हणणें होतें.

पण व्हाईसरॉयांनीं अखेर चौदांचें संमिश्र-मन्त्रिमंडळ जाहीर केलें. त्यांत लीगचे पांच, कॉंग्रेसचे सहा ( एक हरिजन धरून ) एक शीख, एक खिस्ती आणि पार्शी अशी वांटणी करण्यांत आली होती; तथापि, कॉंग्रेसच्या सहा प्रतिनिधींत राष्ट्रीय किंवा बिगर मुसलमानांचा समावेश करण्याचा कॉंग्रेसचा हक्क व्हाईसरॉयांनीं अमान्य केल्यामुळें ' मध्यंतर सरकार 'चा त्यांचा निवाडा कॉंग्रेसनें फेटाळून लावला. मात्र शिष्टमंडळाच्या सोळा मेच्या दीर्घकालीन घटनेच्या योजनेला कॉंग्रेसनें मान्यता दिली.

त्यानंतर अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचें अधिवेशन मुंबईला भरलें. ह्या अधिवेशनांत शिष्टमंडळाच्या १६ मेच्या योजनेला पाठिंबा देण्याचा ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर झाला. त्या प्रसंगीं सरदार पटेल म्हणाले, " या योजनेमुळें ब्रिटिश सरकारच्या हातामधील सर्व सत्ता हिंदी जनतेच्या हातामध्यें अगदीं शांतपणें आणि सुरळीतपणें येईल. म्हणून देशाला झगड्याच्या खाईंत न लोटतां या योजनेचा आपण फायदा घ्यावा असें आम्हांला वाटतें. मुस्लिम लीगला या योजनेंत पाकिस्तान दिसतें. पण आम्हांला या योजनेंत अखंड हिंदुस्थान दिसतें. कोण बरोबर आहे तें घटना-समिति ठरवील ! "

मौलाना आझाद म्हणाले, " सोळा मेची योजना म्हणजे अखंड हिंदुस्थानची घोषणा आणि एकाच केंद्रीय राज्याच्या घटना समितीचा पुकार होय ! हा आमचा अलौकिक विजय नव्हे तर काय आहे ? या घटना समितीमध्यें तुम्ही जाऊं नये अशीच तुमच्या शत्रूची मनामधली खरी इच्छा आहे. बोला, तुमच्या ओंजळींत येऊन पडलेला हा विजय तुम्ही फेकून देऊन पराभवाला आमंत्रण देणार काय ? असें करूं नका ! घटना समितीचा दरवाजा उघडला आहे. आंत शिरा आणि आपल्या देशाची घटना बनवण्याचें काम पूर्ण करून टाका ! "

पंडित नेहरू म्हणाले, " आमची स्वातंत्र्याची कल्पना अशी आहे, कीं हिंदुस्थानमध्यें परकी राज्यसत्ता अजिबात असतां कामा नये. बेहेत्तर आहे, ब्रिटिशांशीं आपल्याला संबंध तोडावे लागले तरी ! आम्हांला हिंदुस्थानचें प्रजासत्ताक राज्य स्थापन करायचें आहे. घटना समितीमध्यें रहाणें जोंपर्यंत देशाच्या हिताचें आहे असें आम्हांला वाटतें तोंपर्यंत आम्ही तेथें राहूं. नाहीं तसें वाटलें तर आम्हीं त्या समितीवर लाथ मारून बाहेर येऊं आणि पुढील झगडा सुरू करूं ! "

पटेल, आझाद आणि नेहरू ह्यांचीं हीं भाषणें आज वाचलीं म्हणजे त्यांचें आज हंसू येतें. पटेल आणि आझाद हें ' अखंड हिंदुस्थान 'च्या आरोळ्या मारीत होते तर ब्रिटिशांशीं संबंध तोडण्याच्या वल्गना नेहरू करीत होते. पण ब्रिटिश साम्राज्यवादी त्यांना हळूहळू देशाच्या फाळणीच्या खड्डयांत कसे ढकलीत होते ह्याची त्यांना त्या वेळीं सुतराम् कल्पना नव्हती.

तथापि, संस्थानिक आणि मुस्लिम लीग यांना हातीं धरून कॉंग्रेसचा स्वातंत्र्याचा लढा ठेंचून काढण्यासाठीं आणि राजकीय सत्तासंन्यासाचें सोंग करून आपलें देशावरील आर्थिक वर्चस्व अधिक मजबूत करून ठेवण्यासाठींच ब्रिटिश शिष्टमंडळानें आपली सोळा मेची योजना तयार केलेली होती, असें माझें मत मात्र मीं माझ्या ' नवयुग 'च्या प्रत्येक अंकांतून सतत दोन तीन महिने मोटमोठ्यानें ओरडून सांगत होतों. आणि निर्भेळ स्वातंत्र्याची क्रांतिकारक भूमिका माझ्या असंख्य वाचकांपुढें मांडीत होतों.

कॉंग्रेसनें घटना समितीला मान्यता दिल्यानंतर मुस्लिम लीगनें ताबडतोब मुंबईत आपली परिषद् भरवून शिष्टमंडळाच्या घटना समितीच्या योजनेवर बहिष्कार घालण्याचा आणि पाकिस्तानच्या प्राप्तीसाठीं ' प्रत्यक्ष लढा ' करण्याचा ठराव मंजूर केला. कॉंग्रेसकडून घटना समितीला मान्यता मिळविण्यासाठीं व्हाइसरॉयनीं मुस्लिम विरोधाचें हें नाटक रचलें होतें, त्याची कॉंग्रेसवाल्यांना कल्पना नव्हती. त्यानंतर १२ ऑगस्ट १९४६ रोजीं ' मध्यंतर सरकार ' बनविण्याची योजना सादर करण्यासाटीं पंडित नेहरू यांना व्हाइसरॉयनीं आमंत्रण केलें. तें त्यांना नाकारणें आतां शक्यच नव्हतें. तें त्यांनीं स्वीकारलें.

' मध्यंतर सरकार 'च्या हातांत कोणतीहि सार्वभौम सत्ता नसतांना आणि व्हाइसरॉयांच्या हातांतलें तें एक खेळणें असतांना असल्या दिखाऊ सत्तेच्या पोकळ सिंहासनावर कॉंग्रेसला मारून मुटकून बसवायचें आणि तिला पदोपदीं प्राणसंकटांत घालून तिची साऱ्या जगासमोर फटफजिती करावयाची हा ब्रिटिश सरकार आणि मुस्लिम लीग ह्यांचा एक डाव होता, हें भाकित मीं त्याच वेळीं केलें होतें.

व्हाइसरॉयांनीं नेहरूंना ' मध्यंतर सरकार ' बनविण्यासाठीं आमंत्रण केलें रे केलें, तोंच ' १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस ' प्रत्यक्ष प्रतिकार दिन ' म्हणून देशभर साजरा करण्याचा मुस्लिम लीगनें फतवा काढला. आणि त्याचें राक्षसी प्रात्यक्षिक तिनें कलकत्ता येथें करून दाखविलें. कलकत्त्याची ही कत्तल त्या प्रांतांत अधिकारारूढ असलेल्या मुस्लिम लीगच्या ' सुऱ्हावर्दी मंत्रिमंत्रिमंडळा 'च्या मार्गदर्शकत्वाखालीं झाली. पाकिस्तानी कसायांनीं सतत पांच दिवस कलकत्त्याला रक्तामांसाचें स्नान घातलें. त्यांनीं म्हातारे पाहिले नाहींत. स्त्रिया पाहिल्या नाहींत. अर्भकें पाहिलीं नाहींत. कॉलेजच्या वसतिगृहांतले विद्यार्थी त्यांनीं वगळले नाहींत. शेकडों स्त्रियांना आणि मुलींना ठार

मारण्यापूर्वी त्यांच्यावर बलात्कार करण्यांत आले.

लढाईच्या वेळीं रणांगणावर प्रेतांचा जसा खच पडतो, तसे कलकत्त्याच्या डांबरी रस्त्यावर शवाचे ढीगच्या ढीग पडले. रक्तामांसाचे पाट वाहूं लागले. गिधाडें आणि कावळे प्रेतांवर बसून त्यांचे कचाकच लचके तोडूं लागले. अदमासें आठ हजार माणसें मारलीं गेलीं. जखमी झालेल्यांची तर मोजदाद करणेंच शक्य नव्हतें. कोट्यवधि रुपयांची मालमत्ता जळून भस्मसात् झाली. मुसलमानांचें पाकिस्तान म्हणजे हिंदूंचें कबरस्तान होय. ही गोष्ट कलकत्त्याच्या या कत्तलीनें सिद्ध झाली. अहमदाबादमध्यें आणि मुंबईमध्यें ह्याच हत्याकांडाची पुनरावृत्ति झाली.

जातीय दंग्याचा असा वणवा साऱ्या देशभर पेटला असतांना २ सप्टेंबर १९४६ रोजीं पंडित नेहरूंच्या ' मध्यंतर सरकार 'ची प्राणप्रतिष्ठा दिल्लीमध्यें झाली. देशामध्यें सर्वत्र आनंदीआनंद पसरला खरा, पण तो आनंद म्हणजे प्रेतावरचा शृंगार होता. कारण मुस्लिम लीगच्या सैतानांनीं आणि आग्या वेताळांनीं राजरोसपणें देशभर जातीय दंग्याचा भयानक धुडगूस आणि धांगडधिंगा घालावयाला अशा बेफामपणें सुरुवात केली होती कीं, त्यामुळें कॉंग्रेस सरकारचें धाबें अगदीं दणाणून गेलें. देशांतल्या या जातीयवादी दंगली थांबवणें कॉंग्रेसच्या धरसोडीच्या धोरणामुळें तिला अगदीं अशक्य झालें.

एवढेंच नव्हे तर देशांतील राष्ट्रीय नेत्यांच्या नि कार्यकर्त्यांच्या जीविताला त्या वेळीं फार मोठा धोका निर्माण झाला. राजगोपालाचारियर यांच्या मोटरीवर गोळी झाडण्यांत आली. आणि सर शफत अहमदखान या केंद्रीय मंत्र्यावर खुनी हल्ला झाला.

मुंबईची एक गोष्ट सांगतों. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यांत मुस्लिम लीगवाल्यांनीं मुंबई शहरांत हलकल्लोळ करून टाकला. त्या दंगलींत पावणेतीनशें माणसें मारलीं गेलीं. त्यानंतर एक दिवस सकाळीं साडेदहाच्या सुमारास एका मोटरी-मध्यें बसून दोन खुनी बदमाष गोळ्यांच्या फैरी बेदरकारपणें झाडीत आणि लोकांचे मुडदे पाडीत काळबादेवीच्या राजरस्त्यावरून खुशाल सहीसलामत निघून गेले. काळबादेवी रस्त्यावर दिवसाढवळ्या खून करणाऱ्या त्या दोन नीच बदमाषांना भोंवतालीं इतस्ततः वावरणाऱ्या हजारों लोकांनीं जिवंत जाऊं दिलें ही सर्वांत आश्चर्याची गोष्ट होती. अनेक व्यापाऱ्यांच्या आणि शेटजींच्या मोटारी आजूबाजूला धांवत होत्या. पण त्या खुनी मोटरीवर आपली मोटर आदळून तिचा चक्काचूर करावयाला एकहि मायेचा पूत मर्द मोटरवाला पुढें धांवला नाहीं.

ही बातमी जेव्हां माझ्या कानीं आली तेव्हां माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली आणि त्या संतापाच्या अवस्थेंत मी ' थूः तुमच्या जिनगानीवर षंढांनो ! ' असा २२ सप्टेंबर १९४६ च्या अंकांत एक जळजळीत अग्रलेख लिहिला.

त्याच अंकांत प्रबोधनकार ठाकरे ह्यांनीं ‘ मुसलमानांच्या वाढत्या गुंडगिरीपासून हिंदूंचें संरक्षण कसें होणार ? ’ या मथळ्याचा एक प्रभावी लेख लिहून त्यांत शेवटीं असा निष्कर्ष काढला कीं, “ अशा प्राणान्ताच्या प्रसंगीं हिंदूंनीं आत्मसंरक्षणार्थ टोल्याला टोला आणि डोळ्याला डोळ्याचा प्रतिकार केला तर त्यांत हिंदु जमातीनें काय पाप केलें ? ”

‘ नवयुग ’मध्यें मीं छापलेल्या या दोन लेखांचें बक्षीस त्या वेळच्या मुंबईच्या काँग्रेस सरकारनें मला तात्बडतोब दिलें. ‘ नवयुग ’चा मुद्रक आणि प्रकाशक म्हणून तीन हजार रुपये आणि ‘ अत्रे प्रिंटिंग प्रेस ’चा मालक म्हणून तीन हजार रुपये असा एकंदर सहा हजार रुपयांचा जामीन काँग्रेस सरकारनें माझ्याकडे मागितला. त्याप्रमाणें कोणाकडूनहि पैशाची मदत न मागतां हा जामीन मी तात्बडतोब प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कचेरींत भरून आलों. माझ्याकडून जामीन घेतल्याबद्दल काँग्रेस सरकारचा निषेध करणारीं शेकडों वाचकांचीं पत्रें मला आलीं. त्यांपैकीं कांहीं मीं छापलीं देखील.

काँग्रेस सरकारनें माझ्याकडून हा जो सहा हजारांचा जामीन मागितला त्याचा हेतु काय ? तर मीं ‘ नवयुगां ’त छापलेलें लिखाण जातीजातीमध्यें वैमनस्य उत्पन्न करणारें नि हिंसेला प्रोत्साहन देणारें आहे, म्हणून अशा तऱ्हेचें लिखाण पुन्हां मीं लिहूं नये वा छापूं नये. काँग्रेस सरकारनें माझ्यावर केलेला हा आरोप बघून मला तर हंसावें का रडावें हेंच कळेना. तोंपर्यंत अशा तऱ्हेचा आरोप माझ्यावर कोणीहि केलेला नव्हता. मी जातीयवादी आहें किंवा हिंसावादी आहें असा माझ्या कट्टर शत्रूला देखील कधीं संशय आला नव्हता.

ज्या काँग्रेस सरकारला जनतेनें निवडून द्यावें म्हणून शेंकडों व्याख्यानें देऊन आणि लेख लिहून मीं आकाशपाताळ एक केलें होतें, त्या काँग्रेस सरकारनें हिंसावादाचा नि जातीयवादाचा ठपका माझ्यावर ठेवून माझ्याकडून सहा हजार रुपयांचा जामीन घ्यावा याबद्दल मला अतिशय दुःख झालें. जन्मभर इमानानें आणि निष्ठेनें वागणाऱ्या एकाद्या पतिव्रतेवर तिच्या नवऱ्यानें शेवटीं शिंदळकीचा आरोप करावा म्हणजे डोक्यावर आभाळ तुटल्यासारखें जसें तिला वाटेल तसें काँग्रेस सरकारनें माझ्याकडून जामीन घेतल्यावर मला वाटूं लागलें.

तेव्हांपासून मला काँग्रेसबद्दल एक प्रकारचा उबग वाटूं लागला. समाजवादी राजकारणाचा मी कट्टर आणि निष्ठावंत पुरस्कर्ता असल्यानें उजव्या काँग्रेसवाल्यांपासून मी आधींच पुष्कळ दूर सरकलों होतों. आणि त्यांत मुस्लिम लीगनें देशांत जातीयवादी दंगे सुरू केल्यानंतर काँग्रेसनें तिच्यापुढें जें शरणागतीचें धोरण पत्करलें होतें तें माझ्यासारख्या कणखर राष्ट्रवादी वृत्तीच्या पत्रकाराला कधींहि मानवण्यासारखें नव्हतें. हिंसा आणि जातीयवाद ह्यांच्याविरुद्ध काँग्रेसजवळ कसलाहि प्रभावी तोडगा नव्हता. खंबीर राष्ट्रवाद हाच त्यावर एक उपाय होता. पण राष्ट्रवाद हा काँग्रेसच्या

अहिंसावादी विचारसरणींत बसण्यासारखा नव्हता. म्हणून जो कोणी राष्ट्रवादी भूमिका घेई, त्यावर जातीयवादाचा शिक्का मारून त्याला निकालांत काढायचें हें काँग्रेसचें झटपट धोरण त्यावेळीं अगदीं ठरून गेलें होतें.

सगळ्यांत गंमत ही कीं, पुढें एकाच महिन्यानें मीरत येथें काँग्रेसचें जें अधिवेशन भरलें, त्यांत मीं जें लिहिलें होतें तेंच जास्त स्पष्टपणें आणि जोरदारपणें सरदार पटेल ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. ते म्हणाले, "तुम्हांला स्वातंत्र्य पाहिजे असेल, तर तुम्हांला स्वतःचें रक्षण करतां आलें पाहिजे. तुम्हांला शेजाऱ्यांचें रक्षण करतां आलें पाहिजे: तुम्हांला दीनांचें रक्षण करतां आलें पाहिजे. 'आमचें रक्षण करा हो!' अशा लष्कराला आणि पोलिसांना तुम्ही हांका मारूं नका. भ्याडपणापेक्षां हिंसा श्रेष्ठ आहे. आत्मरक्षणासाठीं आणि दीनांच्या रक्षणासाठीं हिंसा करणें अवश्य असेल तर ती बेलाशक करा. रक्तपातानें आणि तलवारीनें पाकिस्तान मिळणार नाहीं. तलवारीला तलवारीनेंच उत्तर मिळेल."

सरदार पटेलांचें भाषण ऐकून काँग्रेसवाल्यांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला आणि 'महान् देशभक्त' म्हणून लोक त्यांना डोक्यावर घेऊन नाचले. आणि तशाच अर्थाचें लिखाण मीं 'नवयुग'मध्यें छापलें म्हणून मी जातीयवादी आणि हिंसावादी ठरलों नि माझ्याकडून सहा हजारांचा जामीन काँग्रेस सरकारनें घेतला.

मुंबई राज्याचे त्या वेळचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर ह्यांनीं आपल्या अहिंसावादाचें जें हास्यास्पद प्रदर्शन केलें तें तर अजबच होतें. मुंबईच्या दंग्यांत 'गुंडांच्या सुरीपासून स्वतःचें रक्षण करण्याचा अहिंसावादी मार्ग कोणता?' असा त्यांना कोणी तरी प्रश्न केला. तेव्हां उजवा हात पोटावर आणि डावा हात पाठीवर ठेवून आणि हिजड्यासारखी कंबर मुरडून त्यांनीं आत्मसंरक्षण कसें करावें त्याचें प्रात्यक्षिकच दाखवलें. त्या त्यांच्या पवित्र्याचें जेव्हां व्यंगचित्र मीं 'नवयुग'मध्यें काढवलें, तेव्हां साऱ्या महाराष्ट्रांत त्यांचें हंसू झालें. मात्र तेव्हांपासून त्यांचे माझे संबंध अजिबात तुटले. कायमचे तुटले.

नेहरू आणि बाळासाहेब खेर ह्यांच्यांत कांहीं फारसें अंतर नव्हतें. सगळेच गांधीवादी काँग्रेसवाले एकाच माळेचे मणि. मुस्लिम लीगनें जातीयवादी दंगलीची आणि रक्तपाताची देशभर धमाल उडवल्यानंतर तिकडे नेहरूहि घाबरले आणि दोन महिन्यांच्या आंतच जीनांना शरण जाऊन त्यांनीं आपल्या हंगामी सरकारांत मुस्लिम लीगच्या मंत्र्यांना प्रवेश दिला.

मग काय मुस्लिम लीगचें डोकें स्वर्गाला लागलें आणि त्याचा परिणाम असा झाला कीं पूर्व बंगालमध्यें नौखाली आणि टिप्पेरा ह्या दोन जिल्ह्यांत अमानुष अत्याचारांचा आणि रक्तपातांचा भयानक ज्वालामुखी फुटला. हजारों हिंदु बायकांवर बलात्कार झाले. हजारों हिंदु प्राणाला मुकले आणि त्यांच्या घरादारांच्या होळ्यांचा

धूर पूर्व बंगालभर पसरला. माणुसकीला काळिमा फासणारे जे अनन्वित पाशवी आणि राक्षसी अत्याचार मुस्लिम लीगवाल्यांनीं पूर्व बंगालमध्यें केले, त्याला इतिहासांत तोड सापडणार नाहीं.

दुःखितांचें सांत्वन करण्यासाठीं आणि जातीजातीमध्यें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं महात्मा गांधींनीं नौखालींत दौरा काढला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पूर्व बंगालमध्यें हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा सूड बिहारमधल्या हिंदु जनतेनें तेथल्या मुसलमानांवर घेतला.

तेव्हां मात्र हिंदु दंगेखोरांवर आम्ही तोफा झाडूं अशी नेहरूंनी गर्जना केली, सारांश, कॉंग्रेसच्या नेभळ्या आणि कचखाऊ धोरणामुळें सारा देश हादरून गेला. मुस्लिम लीगचा जातीय वाद जास्तींत जास्त बेफाम, उन्मत्त नि अक्राळविक्राळ बनला. आणि देशाची फाळणी केल्याखेरीज आतां भारताला स्वातंत्र्य मिळणें अशक्य आहे ही गोष्ट कॉंग्रेस नेत्यांना कळून चुकली.

कॉंग्रेस तिकडे फाळणीचा रस्ता चालत असतांनाच कॉंग्रेसमधून आपला मुक्काम हलवण्याच्या तयारीला मी इकडे लागलों. कॉंग्रेस-नेत्यावरील माझ्या श्रद्धेला भेगा पडूं लागल्या. नि त्यावर उभारलेला माझ्या राजकीय जीवनाचा मनोरा डळमळूं लागला.

समाजवादी आणि राष्ट्रवादी माणसाला अशा परिस्थितींत कॉंग्रेसमध्यें राहणें कसें शक्य होतें ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 90624
संदर्भ शाखा
REFBK-0014425

## २६

# नसत्या कटकटी

कोणताहि व्यवहार करतांना माणसानें तो अगदीं उघडे डोळे ठेवून आणि मागचा–पुढचा विचार करून केला पाहिजे. त्याबाबत जरा कांहीं गाफिलगिरी आपल्या हातून घडली, तर आर्थिक दृष्टीनें आणि कायद्याच्या दृष्टीनें आपलें अनन्वित नुकसान होतें. आणि आपण निष्कारण भलत्या अडचणींत सांपडतों. ह्याचा मुंबईच्या व्यावसायिक जीवनांत मला अनेकदां अनुभव आला.

विशेषतः कसलीहि लिखापढी करतांना, किंवा वोटभर चिठ्ठी लिहितांना आणि त्यावर आपण सही करतांना, आपण कशावर सही करतों आहोंत त्याचा कायदेशीर दृष्ट्या आपण प्रथम विचार करावयाला हवा. अशा एका लहानशा चिठ्ठीवर लिहिलेल्या ‘ माझ्या स्वदस्तुरच्या ’ मजकुरामधून फौजदारी आणि दिवाणी फिर्यादींचें भूत निर्माण होऊन माझ्या मानगुटीवर कसें बसलें ती हकीकत या ठिकाणीं सांगितलीच पाहिजे.

माझें नशिब एवढें कीं ह्या लफड्यांतून किंवा अशा तऱ्हेच्या वेळोवेळीं उद्भवलेल्या अनेक लफड्यांतून मी सहीसलामत बाहेर